DESHPANDE FAMILY LIBRARY.

SECTION Marathi Literature

BOOK NO 105.

REMARKS

NARAYAN SITARAM DESHPANDE.

सार्वजनिक वाचनालय, राजगुरुनगर
दाखल क्रमांक : १७६७८
वर्गांक : ६८९

[ काव्येतिहास-संग्रह. ]

१२.

# अनेक-कवि-कृत-कविता

भाग १.

दा-५ (१७६७८)

ग्रंथ 02103 परिगणना

हा

जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए. (डेक्कन कॉलेज)

ग्रंथ 06106 परिगणना

यांणीं

विपुल टीपांसह प्रकाशित केला.

शके १८०५.

## अनेककवि-कृत प्रकरणांची अनुक्रमणिका.


| प्रकरण. | कवि. | पृष्ठ. | ग्रंथ संख्या. |
|---|---|---|---|
| १ ताटकावध | आनंदतनय | १ | ५० |
| २ श्रावणाख्यान | देवनाथ | ७ | ४६ |
| ३ चतुर्मंत्ररामायण | ——— | ११ | ९१ |
| ४ भगवद्गीता सवाईबद्ध | उद्धवचिद्‌घन | १९ | ७०९ |
| ५ रंभाशुकसंवाद | मुक्तेश्वर | १२१ | ४६१ |
| ६ मूर्खांचीं लक्षणें | ,, | १४२ | ११३ |
| ७ शतमुखरावणवध | ,, | १४८ | १३० |
| ८ नारायणरावपेशवे चरित्र | पांडुरंग | १५५ | २२३ |
| ९ शुकचरित्र | अमृतराय | १६५ | १६ |
| १० पदें | ,, | १७९ | ४१ |
| ११ सीतास्वयंवर | चिंतामणि | १९० | ९० |
| १२ चंद्रावळी-आख्यान | धुंडिकुमार | १९७ | १०१ |
| १३ कंदुकाख्यान | आनंदतनय | २०५ | ३२ |
| १४ बालचरित | ,, | २०८ | १५ |
| १५ जयद्रथवध | वामनपंडित | २१० | २७ |
| १६ संकलितरामायण | ,, | २१२ | १०१ |
| १७ पूतनावध | आनंदतनय | २२२ | ४८ |
| १८ बिल्हण-चरित्र | विठ्ठल | १-१८ | ११९५ |

# आनन्दतनयकृत "ताटकावध".

## चूर्णिका.

**श्रीमत्सूर्यवंश**-संभव-भूपाल-मस्तकिंचा मध्य मेरुमणि, दीन-मनोरथ-संपत्तिपूरक चिंतामणि, भक्तभयापहारी, शमदम-विलसित-मुनिजन-सदनहृदय विहारी, त्रिभुवनजन-सुमतिनयन-प्रतिबद्धकारण, निबिडतर-दुरित-[1]तिमिर हरावया, परम दुर्मद-रक्षोवृंदाचिया, प्रताप-तपनस्पर्श-मुकुलित-सुरमन-कुमुदावरि ज्योत्[2]स्नोज्जृंभण कराया, क्षीरार्णवापासुनी, पूर्वदिशोदरीं **श्रीराम चंद्रापरी**, **दशरथ**-गुण-समुद्रापासुनी, **कौसल्या**-गर्भगुहेमाजी अवतरला ॥ १ ॥

नेणो तें वि[3]बुध-विभव-भांडार प्रकटलें, कीं मनोहर मनुजाकृति सहस्रकर-सहस्र-तेज गोठलें, कीं किसलयसम करकमल रुचिर पद कुवलय-दलनिभे[4] नयन युगलें, अति मृदु पदतळ झळझळ तळपति, किळ बहुविध-मणिगण-खचित मुकुटतटी, छतपट-विलसित-कटी, सकलिं ही अवयविं नग झगझगिती, मघमघीत विराजिती माळा, ऐशिया **श्रीपुरुषोत्तमाला**, अंकीं घेउनि खेळवी **दशरथ** भूपाळ देव-आगळा, मोक्षासि अटकरूप तुटली **पुन्नाम** नरकींची अर्गळा, आनंद-समुद्रीं संक्रीडत घडिघडि रोमांच वि[5]जृंभाति ॥ २ ॥

तो कोणेके अवसरीं, कनक निके[6]तना[7]माझारी, जैसा द्विजगणांमाझारि [8]कळाधरू, कीं पद्मनी-स्तोम[9]गणीं होय [10]सहस्रकरू, कीं [11]भूभृत् कुळीं निजृंभमाण [12]हेमधराधरू, **दशरथ** पृथ्वी-वल्लभ लखलखित सिंहासनारूढ विराजे ॥ ३ ॥

## श्लोक.

तों आकस्मिक तत्रि सेवक सभा-प्रांतीं नृपा वंदुनी ।
वार्ता सर्व निवेदिती द्रुतगती [13]**गाधेय** आला मुनी ॥
पायीं वाजति पादुका चटचटां आपाद माथां जटा ।
वाटे [14]धूर्जटि पातला **दशरथें** तो देखिला भूतटा ॥ ४ ॥

## अश्वधाटी.

माला करीं हृदयभालासि तें [15]भसित ज्याला मृगाजिनें[16] कटीं ।
लोला जटा रुळति डोला परी परम कोलाहल ध्वनि उठी ॥
लीला असी म्हणुनि नीलालका सुकृतशीला तयासि नमिती ।
आला मुनी निज घराला म्हणूनि मग झाला पुढें नरपती ॥ ५ ॥

---

१ अंधकार. २ चांदणें. ३ देव ४ सदृश. ५ प्रकटती. ६ गृह. ७ आंत. ८ चंद्र. ९ समूह. १० सूर्य. ११ पर्वत. १२ मेरु. १३ विश्वामित्र. १४ शिव. १५ भस्म. १६ चर्म.

पाटीर हेममय वाटींत घे विनय ताटीं फळें फुल जळें ।
हाटीं च रत्नमय पाटीं मुनीस परिपाटी पुजी करतळें ॥
दाटी सहीत अग्रवाटीं अणूनि च ललाटीं पुजी करतटीं ।
थाटी च ये स्तुति च साठीं उदारतर भाटीं च भूप निकटीं ॥ ६ ॥

## चूर्णिका.

त्या नंतर वदनाभिराम वदनारविंद-विलोकनपरिपूर्ण-मनोरथ, राय **दशरथ** कर्पूर-कुसुम-सुगंध-गंधाक्षत-केसरादि परिमल-द्रव्य, नाना-मुक्ताफलादि सुवर्ण द्रव्य, परम पवित्र विचित्र-चरित्र **विश्वामित्र** षोडशोपचारें पूजिला ॥ ७ ॥

जोडोनि करतल, सुरसरिता-जल-विमलहृदय अजतनय सविनय पुसे काय आज्ञा, अगा हे मुनिकुलप्राज्ञा, भूतभविष्यवर्तमान-त्रिकालज्ञा, निगमागम सारपारज्ञा, जीजी सकल-राज-संभार-अगणित-तुंग-तुरंग-मत्त-मातंग-सौधे-मंडित चतुःसमुद्रवलयांकित भूमी, हा विषय आपुला जी स्वामी, मज दासाप्रत सांप्रत मनोरथ प्रकटिजे ॥ ८ ॥

## दिंडी.

ऐक राया सौभाग्य-घनाकाशा । अम्हां काशासी दारधनीं आशा ॥
काय योगी गुंतती मोहपाशा । जिहीं वरिल्या संपत्ति अवीनाशा ॥ ९ ॥
सौध सद्मे आम्हांसि पर्णशाळा । स्फटिक रुद्राक्षा मुक्त-मणी-माळा ॥
भस्म अंगीं पाटीर योगियाला । उणें केवीं वैराग्य-वैभवाला ॥ १० ॥
ऐक माझा वृत्तांत महीपाला । राक्षसांचा यज्ञांत उठे पाला ॥
विघ्न करिती मोडून यज्ञशाला । येथ आलों यालागिं धी-विशाळा ॥ ११ ॥
यज्ञ रक्षाया दक्ष तुझीं बाळें । राक्षसांते शासिती बाणजाळें ॥
यागसिद्धी होईल शीघ्रकाळें । ऋषी होती संतुष्ट अळूमाळें ॥ १२ ॥
करूं शिकतिल त्वत्तनय सुसंग्रामा ।कीर्ति शोभा येईल **राम**ग्रामा ॥
पुन्हा येतों घेऊनि **राम** ग्रामा । पूर्णकामा कल्याण गुणग्रामीं ॥ १३ ॥
पुत्र द्यावा हा शब्द पडे कानीं । खेद मोठा भूपाळ मनीं मानी ॥
शून्य मानी त्रैलोक्य राजधानी । काय मागा हे थोर गमे हानी ॥ १४ ॥
तपें केलीं निःपाप मुलां साठीं । त्यां हि संवत्सर सहस्र शतें साठी ॥
गुणीं योजूं नेणती चापकोटी । राक्षसांशीं भांडतां लक्षकोटी ॥ १५ ॥
ह्मणे जी जी सर्वज्ञ तपोरासी । कसे देऊं या सांग किशोरांसी ॥
नाहिं केला अभ्यास धनुष्याचा । मार्ग नेणें कीं मंत्र रहस्याचा ॥ १६ ॥

---

१ चंदन. २ दशरथ. ३ वेद-शास्त्र. ४ हत्ती. ५ गच्ची. ६ गृह. ७ मोती. ८ चंदन. ९ समूह. १० बुद्धि. ११ गांव. १२ समूह. १३. दोरी. १४ बालक.

कथा ऐसी भूपाळ वदे कांहीं । मीचि येतों भीडण्या बळें बाहीं ॥
वाहिनींचा संभार सुखें पाही । विघ्न हरती संदेह दुजा नाहीं ॥१७॥
**राम** नेदीं ह्मणवोनि मुनी-नाथा । पदें **साकेताधीश** नमी माथां ॥
उठे कोपें **गाधेय** तूज गोथा । म्हणे राया निःसत्व वृथा चोथा ॥१८॥
माग आधीं बोलोनि सरे मागें । भूप ऐसा देखिला नाहिं मागें ॥
सुखें नांदें सुपुत्रपणें रागें । करी डोळे विस्तीर्ण महारागें ॥१९॥

**श्लोक.**

वचन वदुनि ऐसें चालिला चार पांडें । तंव भुमि-रव जाला फूटलें जेंवि भांडें ॥
जलधिसहित मेरू आणि भूकंप झाला । कुलगुरु नृपगेहा तीव्र धांवोनि आला॥२०॥

**दिंडी.**

वरें येतों ह्मणवोनि उठे चाले ॥ तदां झाला भूकंप धरा हाले ॥
**वसिष्ठादी** धांवोनि ऋषी आले ॥ कासया हे उत्पात नृपा जाले ॥२१॥

**श्लोक.**

**वसिष्ठ** बोले न पडें अपायीं । द्यावीं मुलें शीघ्र पडोनि पायीं ॥
हा कोपल्या जाळिल लोक सारा । कां नेणसी भूपति नीति-सारा ॥२२॥

**दिंडी.**

ज्ञानदृष्टीं पाहोनि ह्मणे राया ॥ भाव नेणें हो मनीं मोह माया ॥
**रामचंद्रा** देवोनि पडा पायां ॥ विजयि तेणें होईल नव्हे वायां ॥२३॥
पुत्र देईं **गाधेय**करीं आधीं ॥ समाधानें कार्यार्थ वहू साधीं ॥
गुरूवाक्यें परिसोनि सर्वसाधी ॥ **कौशिकातें** भूपाल समाराधी ॥२४॥
**रामसौमित्री** वीर चापपाणी ॥ पदीं मुनिच्या लागती सौख्यखाणी ॥
ऋषी जाला सानंद सभास्थानीं ॥ नामघोषें **आनंदतनय** वाणी ॥२५॥

**श्लोक.**

**रघुपती** दिधला मुनिकारणें ॥ सह **सुमित्र** दुजा अवधारणें ॥
मग नरेंद्र ह्मणे ऋषि **कौशिका** ॥ उभयतां प्रतिपाळ किजे निकां ॥२६॥
कशासि आह्मां धनवस्त्रभूमी ॥ निष्काम निर्धूतभव प्रभो मी ॥
केला मखीं घोर निशाचरींनीं ॥ आलों कराया न निशा च रानीं ॥२७॥
अंभोजेक्षण **रामलक्ष्मण** तुझे हे दक्ष रक्षोगणा ॥
शिक्षाया शत लक्ष लक्ष करिती एक्या क्षणीं मार्गणा ।
हे द्यावे मज लक्ष-लक्षणनिधी संरक्षणाकारणें ।
कक्षे नेंघ [ ? ] सपक्ष ही क्षितिपती त्वत्क्षात्र संरक्षणें ॥२८॥

---

१ सेना. २ पूजी. ३ वर्मी. ४ चांगला. ५ यज्ञांत. ६ राक्षसांनीं. ७ कमळनेत्र.

## सवाई.

केवळ हे सकुमार कुमार बहू रजनीचरभारें वनीं ॥
युद्धमखीं रिपु वध्य न यांसि असाध्य अबोध्य तिहीं भुवनीं ॥
नेणाति हे परलोक विलोकन कोकनदा-सम पाणिपदें ॥
वंशि तुझ्या अवतंस मुलें मज संशय हा चि कसा न वदे ॥२९॥

## श्लोक.

पायां नमीं देईन वंशसारीं । पा यां न मी दे इनेंवंश सारा ॥
न या वैयामाजि भला जनां दे । न यावया माँ जिभ लाज ना दे ॥३०॥
**दशरथ** नृप बोले **राम** नेदीं कदापी । मुनिवर मग बोले कोपला तीव्रतापी ॥
बहुत बहु बरें गा तूं सुखी पुत्रदारा। सहित सदनिं नांदें सूर्यवंशीं उदारा ॥३१॥

नमुनि मुनिपदातें **लक्ष्मणा** आणि **रामा** ।
सरस यश वराया देइं लोकाभिरामा ॥
तनय नयगुणाचे शीघ्र घेवोनि येतों ।
सकृप नृप उठोव लोक सारा पहातो ॥३२॥

धावतां नृपति तीव्र गती घे। लागती मुनिपदाप्रति तीघे ॥
दीधला **दशरथें** सुत भावें। हांसिला मग मुनी अनुभावें ॥३३॥

आनंदे मुनिवृंद सुंदर जयध्वानें **अयोध्यापुरा** ॥
आशीर्वादुनि साधु साधु वचनें आले तदा गोपुरा ॥
वाद्यें वाजति भेरि दुंदुभि सभासंद्मीं गुड्यातोरणीं ॥
नारी आरतआरत्या करिति त्या जैशा रतीधोरणी ॥३४॥
संफुल्ल [११]मल्लिकापुष्पें हर्षें वर्षति सुंदरा ।
[१२]भाट आधाट भाटी वा [?] भासती भव्य भूवरा ॥ ३५ ॥
थोपितां मुनिवरें सहसा रे। राहिले नृप जनादिक सारे ॥
चालिला स्वजुनि दूर **अयोध्या** । शौर्यमंडित समागामिं योद्धा ॥ ३६ ॥
जातां नीट अचाट दाट अटवी वाटे [१३]दिठीं लक्षिती ।
पक्षीश्वापद कूट थाट नटती बोभाटती लक्षिती ॥
सिंह व्याघ्र वृकादि शूकर मृगें [१६]दंती दरी राहती ।
वृक्षीं पक्षि सहस्त्र लक्ष फिरती हे कौतुकें पाहती ॥ ३७ ॥
दोघां **दाशरथींस** चालत पथीं शस्त्रास्त्रविद्या कथी ।

---

१ समूह. २ कमल. ३ भूषण. ४ उत्तमांश. ५ सूर्यवंश. ६ वयामध्यें. ७ 'न' कार. ८ नीति. ९ ध्वनीनें. १० गृहीं. ११ मोगरी. १२ स्तुतिपाठक. १३ दृष्टीनें. १४ लांडगा. १५ डुकर. १६ हत्ती.

जेणें चंड रथी रिपूस उलथी पृथ्वी करी पालथी ॥
जाले शिक्षित वीर दीक्षितमुखें तोषोनि त्या कौतुका ।
पायां वंदिति चापपाणि मग ते शिष्यांसवें देशिकां[1] ॥ ३८ ॥
एवं **राम** मुनींद्र **लक्ष्मण** तिघे गांभीर्यलीलागती ।
जातां कौतुक एक अद्भुत दिसे पक्षी नभीं लागती ॥
स्वैर श्वापद संघ[2] धांवति भयें दंती दिगंताप्रती ।
जाती लंघिति काननीं कवण हा कोल्हाळ जी सांप्रती ॥ ३९ ॥
वारा कां सुटला निनाद फुटला कां देश बोभाटला ।
मेघाच्या पटला परी उमटला पांशू नभीं दाटला ॥
बोले राम मुनीसि पाय नमुनी आज्ञा करा नेमुनी ।
काळातें दमुनी न सोडिन शरा क्षेमस्थिती कां मुनी ॥ ४० ॥
ऐसी व्याकुळ वाट कां मुनिवरा हे धावती थाट कां ।
मोठा घोर अचाट काननतटीं वंश क्षिती दाट कां ॥
रक्षोरूप जुनाट कामिनीं फिरे साधूजनीं कांटका ॥
ऐके चिन्मयनाटका **रघुपती** आली दिसे **ताटका** ॥ ४१ ॥
वार्ता ऐकाति **रामलक्ष्मण** असी तों धांवली कर्कसी ।
घोराकार करालदंष्ट्रवदना तद्दृष्टि बालार्कसी ॥
हाडांच्या अेळुमाळ डोलति गळां माळा कटीं कांबळा ।
जिव्हा लोळतसे मुखीं लळलळां येते धरोनी बळा ॥ ४२ ॥
दंतीं चावित सिंह कुंजर मृगें हातीं कितेकां धरी ।
पातीं झांकुनि ऊघडी घडिघडी माती कचाग्रांवरी ॥
कोराकाटलिया मुखीं कटकटा ढोराचियां श्रोणितें ।
घोरावेशशरीर एक नटली थोरा भया आणिते ॥ ४३ ॥
बाळें देखुनि **रामलक्ष्मण** पुढें चाटी अवाळेपरी ।
हुंकारी क्षण हा करीत तंव ते वाढे उडे अंबरी ॥
अट्टाहासुनि मट्टमट्टकरिते **श्रीराम**संघट्टणीं ।
धांवे तों क्षितिकंप हा-रव उठे देवांचिये पट्टणीं ॥४४॥
येतां सन्मुख राक्षसी लघुलघू क्ष्मापालवंशाग्रणी ।
क्रोधें दुर्धर वीर **राम** उठला शिक्षावया तत्क्षणीं ॥
तूणीं बाण गुणीं धरोनि सहसा कर्णांत आणी रणीं ।
हाणी तों धरणीवरी उलथली उत्साह धातांगणी ॥ ४५ ॥

---

१ गुरू. २ समूह. ३ धुरळा, ४ स्त्री. ५विस्तृत . ६ केस. ७ राजा. ८ ब्रह्मा.

लागतां हृदायिं बाण खणाणा । ताटका उलथली च दणाणा ॥
त्या ध्वनीस्तव रवींदु गळाले । यक्ष राक्षस पिशाच पळाले ॥ ४६ ॥

नेणो कोसळला कडा उमळला चंद्रद्रुमांचा थवा ।
किंवा वज्रनिपातपर्वततटीं मानी मनीं माधवा ॥
होतां हृद्गत राम बाण मिरवे मानें विमानावरी ।
शोभे दिव्य शरीर भव्य वचनीं रामस्तुती आदरी ॥ ४७ ॥

केव्हां कोठुनि घेतला शर करीं केव्हां गुणींयोजिला ।
केव्हां वोढुनि घातला चि न कळे कीं वेगळा दाविला ॥
गेला सायक पीनकासम फिरे तूणी मधें संचरे ।
शौर्या साधुनि आर्यकार्य बरवी दासा स्थिती आचरे* ॥ ४८ ॥

हो जी शोभन तूज राजरमणा हो क्षेम या सायका ।
हो कल्याण [सदा] तवांघ्रि[3]कवचा रामा रमानायका ॥
हो जी मंगल संगरांगणतटीं या बाहुदंडद्वया ।
आशीर्वाद वदे असा मुनि तया सच्चिद्घना अद्वया ॥ ४९ ॥

[illegible]ग जयध्वनि नभीं तायिं निर्जरांनीं । वर्षाव फुल्लसुम निर्भर जर्जरानीं ॥
[illegible]चे मुखें स्तविति गर्जुनि सज्जनांचे । आनंदनंदन कवी मग सज्ज नाचे॥ ५० ॥

**समाप्त.**

---

१ सरवत ? २ बाण. ३ पाय. ४ देवांनीं.

* "कदां नेणों वोढी शरधितुनि काढी तरी कदां" इ० रघुनाथ पंडितकृत श्लोकाशीं या श्लोकाचें साम्य फार आहे. आनंदतनय व रघुनाथ पंडित हे परस्पर व्याही होते. आनंदतनयांनीं "सीतास्वयंवर" ग्रंथ केला हें पाहून पंडितांनीं "नलदमयंती स्वयंवराख्यान" केलें. परंतु त्यांत सीता स्वयंवरा इतका रस उतरला नाहीं.

# देवनाथकृत श्रावण आख्यान.

## दिंडी वृत्त

सूर्यवंशीं अजराज पुत्र पाहीं । धीर औदार्यें सदा सर्वदा ही ॥
पुरीं साकेतीं[१] पुण्यग्रामवासी । त्याचि संपत्ती सदा अवीनाशी ॥ १ ॥
पोटिं नाहीं संतान तया योगें । दिवा रजनीं दुःखीत ह्रदयरोगें ॥
तपाचरणीं त्यापुढें काळ गेला । परी नोहे संतान श्रमी झाला ॥ २ ॥
पुढें परिसा वृत्तांत कसा जाला । रात्रि-माजी तो राव सुप्त जाला ॥
तये समयीं त्या स्वप्न काय जालें । तिघां जीवांचे प्राणनाश केले ॥३॥
घाबरोनी तो उठे मनीं शंके । **वसिष्ठासी** प्रार्थुनी पुसे धाकें ॥
स्वामि याशीं वीधान काय कीजे । दुःख निरसाया अभयदान दीजे ॥४॥
मुनी बोले तूं वनामाजि जाईं । श्वापदांस तिघां मारुनियां येईं ॥
हवन करितां अरिष्ठ नाश पाहीं । ऐकुनीयां तो जाय लवलाहीं ॥ ५ ॥
तटासीं तो लक्षोनि पाहि कैसें । गुणीं योजोनी दूर बैसलासे ॥
उदकपाना लागुनी व्याघ्रहरणी । शशक सूकर येतील ह्याचि ध्यानीं ॥६॥
तये समयीं वृत्तांत काय झाले । तया बोलाया चित्त उदित जालें ॥
पुण्यराशी **श्रावण** भक्तराणा । नरक-त्राता तो पुत्र सत्य जाणा ॥ ७ ॥
मातृ-पितृ-सेवेंत रत सदाही । तदा वृद्धें बोलती त्यास पाहीं ॥
सद्या सत्पुत्रा जरी योग्य होशी । आह्मा नेत्रीं दाखवीं क्षेत्र **काशी** ॥ ८॥
वचन ऐकोनी तदा सिद्ध जाला । स्कांधि वाहोनी शीघ्र तो निघाला ॥
पूर्व जन्माची कथा जाण कैशी । सरितजीवानें[२] ते मत्स्ययोनि ऐशी ॥ ९ ॥
उष्ण कालीं तें उदक शुष्क जालें । मीन अवघे ते पूर्ण सलिलिं[३] गेले ॥
तेथ किंचित् जीवनीं[३] मत्स्यबाल । राहतां ही लोटला कांहिं काळ ॥ १० ॥
एक दिवशीं मध्यान्हि बिंब आलें । तदा किरणीं तें उदक उष्ण झालें ॥
होय कासाविस बाल तये वेळीं । कोण त्राता त्याजला तये काळीं ॥ ११ ॥
कपोत पक्षी पाक्षिणी तया स्थानीं । तृषा हरणार्थ येति उदक पानीं ॥
पान करितां तेधवां जीवनासीं[३] । बाळ बोले तें उभय पक्षियांसीं ॥ १२ ॥
उष्ण उदकें मम प्राण पहा जाती । विकळ होतां मज कष्ट बहू होती ॥
मला नेऊनी खोल सलिलिं सोडा । यया कृत्यानें सुकृत-भाग्य जोडा ॥१३॥
संतोषोनी उचलिलें तयें बाळा । तदा धांवें लगबगां अंतराळा ॥
दैवयोगें तें विघ्न आड आलें । वणव्यानें आरण्य ग्रासियेलें ॥ १४ ॥

---

१ अयोध्या. २ नदी. ३ पाणी.

शिखा[1] अग्नीच्या धांवती अंबरातें[2] । थोर घाबरली पक्षिणी तदा तें ॥
धूम्र नेत्रीं लागतां विकळ झाली । बाळ पडलें अग्नींत तये वेळीं ॥१५॥
ह्मणे हर ! हर ! धातया काय केलें । बाळ मुखिचें अग्नींत भस्म झालें ॥
तया विरहानें भ्रांति फार झाली । अग्निमाजी ते त्वरित आंग घाली ॥१६॥
लागवेगें तो पक्षि तेथ आला । अग्नि माजी त्यां बघुनि श्रमी झाला ॥
उभय विरहानें वांचून काय हो मी । सिद्ध झाला तात्काल काय-होमीं ॥१७॥
हाहाकारें अग्नींत उडी घाली । पिता पक्षी पक्षिणी माय जाली ॥
मत्स्य बाळ **श्रावण** पोटीं आला । पूर्व जन्माचा असा योग झाला ॥१८॥
उष्णतेनें श्रमताति मायबापें । रजनि माजी चालोनि दिवा थोपे ॥
मृदू वचनें बोलेनि मायबापां । तोषवूनी त्यां दूर करी तापा ॥ १९ ॥
तदा वृद्धें बोलती सुकुमारा । अरे वत्सा राजसा बा उदारा ॥
तृषा लागे बा जीव होय कष्टी । उदक पाजूनी मना करी तुष्टी ॥ २० ॥
वचन ऐकोनी वृक्ष कावडीला । जाय उदकासीं धरी आवडीला ॥
वना माजी धुंडितां होय कष्टी । अकस्मात कासार पडे दृष्टी ॥ २१ ॥
निकट येवोनी झारि शुद्ध केली । उदक भरित्या संतोष-वृत्ति झाली ॥
तदा झारीचा शद्ब पडे कानीं । **दशरथाचें** संधान तये स्थानीं ॥ २२ ॥
मृगी पानास्तव तटाकासिं आली । असें जाणे संधानिं बाण घाली ॥
चाप-मुष्टींतुनि बाण तो निघाला । उदक भरित्या घातला पूर्ण घाला ॥२३॥
हृदय-वर्मीं खोंचला तीव्र भालीं । विकळ होई भूमीस आंग घाली ॥
हाय ! मेलों ! हा शद्ब पडे कानीं । राव दचकोनी परम खेद मानी ॥२४॥
अहा ! हत्या घडलि कीं नराची । विप्र किंवा सिद्धांत साधकाची ॥
खेद चित्तीं मानुनी जवळ येई । पुसे त्यातें सांग तूं कोण काई ॥ २५ ॥
ऋषी किंवा सिद्धांत पुरुष सांगें । घात केला नेणोनि लागवेगें ॥
महादोषी मी पूर्णपणें पाहीं । तया योगें संतान होत नाहीं ॥ २६ ॥
येरु बोले मी ऋषी नव्हे साचा । वैश्यवंशीं जन्मलों सत्य वाचा ॥
असो जन्माची गती घोर साची । परी चिंता चिंताचि फार जाची ॥२७॥
वृद्ध मातापितरासि वृक्षिं ठेवीं । सलिल न्याया त्यां चरण पुढें ठेवीं ॥
इथें येतां प्रारब्ध आड आलें । असो होणारें तें चि सिद्ध झालें ॥२८॥
हृदयिं सलतो शर काढ लागवेगें । जाय घेऊनी सलिल तूं सवेगें ॥
मुकाट्यानें तूं उदक त्यांसि पाजीं । मृत्युवार्ता तूं कथन करीं माजी॥२९॥

---

१ ज्वाळा. २ अकाश.

प्रथम सांगसि तूं जरि हि वर्तमान। श्राप देतिल ते नव्हे उदकपान ॥
असें ऐकोनी हृद्रोग तया जाला। उदक हस्तीं तो वृद्ध–निकट आला ॥३०॥
साद येतां बोलती पुत्र–राया। सख्या आलासी वंश उद्धराया ॥
गौरवूनी बहु रिती बोलती ते। परी नेदी उत्तरा राव त्यांतें ॥ ३१ ॥
अरे वत्सा तुज कष्ट फार जाले। मुखीं मौन्या कां तुवां साधियेलें ॥
नरी बोलसि तूं आमुशीं सुवाचा। तरी प्राशूं जिविना मान साचा ॥ ३२ ॥
ह्या चि निर्धारा जाण सत्य साच्या। आण वाहूं संकल्प हा जिवाचा ॥
निश्चयातें ऐकुनी राव बोले। होय **दशरथ** मी उदक आणियेलें ॥ ३३ ॥
वृद्ध ह्मणती पुत्र तो कुठें गेला। राव बोले मम हस्तकीं निमाला ॥
पुत्र-मृत्यूचा शद्ब पडे कानीं। पडति धरणीसी हाय शद्बवाणी ॥ ३४ ॥
आंग टाकुनि लोळती दीनवाणी। गुणां स्मरुनी [ते] वदति दीन वाणी ॥
धन्य पुत्रा बा स्ववंशानुसारा। वनीं मोकलुनी जासि कीं उदारा ॥ ३५ ॥
कसें रायासी जीवदान केलें। आह्मां गहनीं त्यजुनियां भुकेलें ॥
अडा माजी अर्धेचि वोढियेलें। दोर कापुनियां आंत सोडियेलें ॥ ३६ ॥
रात्रिमाजी उदकासि धाडियेलें। म्हणुनि रागें त्वां दूर गमन केलें ॥
पुत्र पुत्रा बाहोनी शब्द करिती। तुला कष्टविलें आह्मीं दिवसराती ॥३७॥
अरे बाळा म्हणवूनि रूसलासी। कसा एकट तूं विष्णुपदा जासी ॥
अह्मां अंधांची यष्टि घोरें रानीं। कुणीं चांडाळें घेतली हरोनी ॥ ३८ ॥
मुखीं घालिति ते तदा धूळ साचे। फार कळवळलें चित्त तें नृपाचें ॥
रे **दशरथ** त्यां उदकपान कीजे। उभयवर्गी मग श्राप तया दीजे ॥३९॥
आह्मि जैसें पुत्रासि आठवोनी। प्राण त्यजितों हार्दें प्राण साठवोनी ॥
तूं हि तैसा पुत्रासि आठवीशीं। वियोगानें तात्काल प्राण देशी ॥ ४० ॥
चिता रचुनीयां देह अर्थी लावीं। वदूं * * * * *
मनीं चिंतोनी प्रभुपाय सदा साचे। देह सार्थका लाविले तयांचे ॥ ४१ ॥
क्रियाकर्मा तेधवां आचरोनी। शापवचना आठवी मनीं मानी ॥
ह्मणे मजला संतती नव्हे साची। शकुनगांठी बांधिली आनंदाची ॥४२॥
शाप नोहे हा अनुग्रह चि साचा। धन्य मानितसें दिवस आनंदाचा ॥
फिरे मागें तो **वशिष्टासि** सांगे। हवन मांडी तो नृप हि सानुरागें ॥ ४३ ॥

---

१ मेळा. २ सदृश. ३ टाकून. ४ भयंकर.

तपी याचें हें वचन खरें कीजे । राजयातें सायुज्यपदा दीजे ॥
अंतकाळीं मग स्मरे जो सुवाचा । मुक्तरूपीं देह कीं जाण साचा ॥४४॥
अशा योगें त्यागिला देह जाणा । तया परमा ती गती प्राप्त जाणा ॥
यया अर्थीं प्रभुराज वांशिं आला । भक्तवचनातें पाळणें जयाला ॥ ४५ ॥
**देवनाथाचा** प्रभू दीनबंधू । पूर्ण व्यापक आनंद सांद्रसिंधू ॥
कीर्ति आपुली आपण वर्णिताहे । तया प्रभुचें यश जगीं गाजताहे ॥४६॥

॥ समाप्त ॥

१ मोक्षस्थान.

# चतुर्मंत्र रामायण.*

**श्री** मद्विबुधवरद जो सेवितसे यस्य पाद सतत **श्री** । **श्री** करधर तो स्मरतां तो मग होतो प्रसन्न सहित **श्री** ॥ १ ॥
**रा** क्षसवरे[1]ण्य **रावण** याणें बहु पीडिलें नरा अम **रा** । **रा** खी म्हणवुनि जाती लेखें शरण मुनिहृ[3]दंबुजभ्रम **रा** ॥ २ ॥
**म** धुमर्दन हे **मुरहर** म्हणुनि कृपा भाकितां सुरसें[4]तो **म** । **म** ग तो प्रसन्न होउनि वदला सज्जनमनःकुमुद[5]सो **म** ॥ ३ ॥
**ज** गतीवरि सुरगण हो सर्व हि साधावयासि निज का **ज** । **ज** न्मावें होउनियां वानर भल्लुक ह्मणे विबुधरा[6] **ज** ॥ ४ ॥
**य** मुनाग्रज-जनकान्वय **दशरथ** होऊनि तस्य मी तन **य** । **य** क्षवरावरजातें मर्दुनि रक्षीन भक्त जेंवि न **य** ॥५॥
**रा** त्रिंचरांसि वधितों सर्व हि चिंता स्वमानसीं न क **रा** । **रा** य सुरांचा या परि वदतां आनंद ये सुरानिकं[9] **रा** ॥ ६ ॥
**म** घवा[10]दिक निर्जर दरें[11]-विरहित पावोनि पूर्ण विश्रा **म** । **म** ग भूतलिं अवतरती आज्ञा देतां पयोधरश्या **म** ॥ ७ ॥
**ज** नमान्य तो **अजात्मज** नमिती ज्यातें समस्त ही मनु **ज** । **ज** न्मुनि सौख्य न मानी यास्तव निज अन्वयीं नसे तनु **ज** ॥८॥
**य** ज्ञातें मग करवी **शृंगऋषी**च्या करें महारा **य** । **य** ज्ञाधिपति प्रगटुनि **दशरथ**-नृवरा प्रसन्न तो हो **य** ॥ ९ ॥
**ज** गतीश्वर-करिं अर्पुनि पायस[12] भार्यांस दे ह्मणे चो **ज**[13] । **ज** न्मतिल पुत्र पोटीं परिसुनियां तोषला नरबिडौ[14] **ज** ॥ १० ॥
**य** ज्ञेशदत्त पायस भागुनि तीघी स्त्रियांस दे रा **य** । **य** जमानस्त्री तिसरी भाग तिचा घार घेउनी जा **य** ॥ ११ ॥
**रा** मप्रिय त्या पिंडा पासुनि जाला रवी च तो दुस **रा** । **रा** घव-भजनपरायण वंशीं समरीं पराभवी असु **रा** ॥ १२ ॥
**म** ग त्या दोघी स्वार्द्धा भागा देती तितें न जो विष **म** । **म** हिलौं[15] सगर्भ झाल्या तेणें नृप तोषला मनीं पर **म** ॥ १३ ॥

---

१ राक्षस-श्रेष्ठ. २ देव. ३ हृत्कमल. ४ समूह. ५ कमल. ६ देव. ७ वंश ८ कुबेराचा धाकटा भाऊ रावण. ९ समूह. १० इंद्रादि. ११ भय. १२ क्षीर १३ चमत्कार. १४ नरेंद्र. १५ स्त्रिया.

* हें प्रकरण मोरोपंतकृत ह्मणून एकानें आह्मांकडे पाठविलें; परंतु अंतःप्रमाणांवरून पहातां तें खास पंतांचें नाहीं असें आह्मांस वाटतें. तथापि त्याची रचना चमत्कारिक असल्यावरून त्याचा संग्रह करण्याचें आह्मीं योजिलें आहे. काव्यकाराचें नांव वगैरे पत्ता अद्याप लागला नाहीं.

तो **श्री** राम भजा हो अनुदिनीं जो होय त्या पति **श्री** चा । जो **श्री** मंत करी हो रंका करितां विनाश अ **श्री** चा ॥१४॥
श्री **रा** घवकुलभूषण **दशरथ** तीघी जयास दा **रा** हो । त्या **रा** या सुत जाला मुनि मानिं ह्मणती जया सदा **रा** हो ॥१५॥
कै **म** नीयाकृति **कौस-ल्योदरिं** जो जन्मला **रमार म** ण । क **म** लेक्षण जो भजतां नाहीं मग जन्ममृत्युचें भ्र **म** ण ॥१६॥
अ **ज** पुत्रस्त्री मध्यम नाम **सुमित्रा** ह्मणोनियां जि **ज** ला । स **ज** लांबुद तनुजा वरि तो **लक्ष्मण** पुत्र जाहला ति **ज** ला ॥१७॥
प्रि **य** पात्रा **कैकेयी** केवळ गर्भा मधें ।चि तन्म **य** जे । द्व **य** सुत तिजला झाले **भरतशत्रुघ्नाख्य** *सद्गुणाल **य** जे ॥१८॥
पा **रा** वारचि नाहीं सुखास देखुनि मुखास कुम **रा** च्या । त्या **रा** याला तेंव्हां धन्य ह्मणें मी समान अम **रा** च्या ॥१९॥
कै **म** लाधव अवतरला ह्मणुनी **कौशिक** मुनीस हें स **म** जे । त्या **म** मनुजेंद्रा आला मागाया **रामलक्ष्मणोत्त म** जे ॥ २० ॥
अ **ज** नंदनासि आशीर्वादुनि मुनि मागतों म्हणे तु **ज** ला । सु **ज** ना **रामसुमित्रात्मज** हो मैखरक्षणार्थ दे म **ज** ला ॥२१॥
पा **य** नमुनि राय तदा काय वदे **रामलक्ष्मणोभ य** तां । हा **य** ह्मणे मी नेदीं अजुनी समरीं न ज्यांसि निर्भ **य** ता ॥२२॥
नि **ज** सुत नेदीं ह्मणतां गेला रागें फिरोनि गाँधि **ज** तो । द्वि **ज** वर **वशिष्ठ**—बोधें मग दे **श्रीरामचंद्र** सानु **ज** तो ॥२३॥
ज **य** कारुनि मुनि नेतां करिती रण निपुण ते सुत द्व **य** हो । सा **य** क हाणुनि **रामें** केला पथिं **ताटिका-पराज य** हो ॥ २४॥
या **रा** घवप्रसादें यज्ञाचा मांडिला पसा **रा** हो । जो **रा** क्षसांस मर्दी नेववि सिद्धीस यज्ञ सा **रा** हो ॥२५ ॥
प्र **म** दे लमतुपत्रा पाठवि जो जनक भूपसत्त **म** हा । तो **म** ग शीघ्र निघाला मुनिवर पावुनि मनांत हर्ष **म** हा ॥२६॥

---

१ मनोहर. २ दशरथ. ३ लक्ष्मीपाति. ४ विश्वामित्र. ५ यज्ञ. * "रिपुघ्नाख्य" असतें तर छंदोभंग झाला नसता.

मातृ **श्री** विश्वाची ते जाया यस्य होय **श्री** रामा । स्वस्ति **श्री** चिंतुनियां त्या हो घेउनि सर्वे चि **श्री** रामा ॥ २७ ॥
नग **रा** ला जनकाच्या जातां मार्गीं मुनींद्र **रा** मा ते । देखे **रा** घव मुनिला पूर्वकथा श्रुत ह्मणे क **रा** मातें ॥ २८ ॥
हे प्रे[२] **म** दा कवणाची होउनि पडली असे शिला **म** य हो । ऐसें **म** होग्र शापी कोण ह्मणुनियां पुसे निरा[३] **म** य हो ॥ २९ ॥
गाधि **ज** पूर्वकथा हे ऐक ह्मणे सांगतों चि तु **ज** लागीं । जैल[४] **ज** भवाची कन्या नाम अहल्या ह्मणून इ **ज** लागीं ॥ ३० ॥
तैन **य** मुनी कश्यपुचों[५] कपटें भोगून तो अपा **य** करी । ह्द **य** कठिण कृत शापी गौतम मुनि कीं शिला च हो **य** वरी ॥ ३१
पद **रा** पसरून वंदी देउनि वरदान उद्ध **रा** मातें । अप **रा** ध काय माझा पतिला विनवी ह्मणूनि **रा** मा ते ॥ ३२ ॥
गौत **म** सदय मनानें जाणुनियां अनपराध का **म** करी । तंव **म** ग पूर्ण तिचा हो उद्धार ह्मणे तुझा च रा **म** करी ॥ ३३
पद **ज** लैंजा[६] पासुनियां उद्धरसी धन्य तूं च ये **ज** गतीं । होसी **ज** लजदलाक्षी उतम होईल ते च तू **ज** गती ॥ ३४ ॥
ऐसे **य** म जनकान्वयवर्यां[७] मुनिवर कथूनि का **य** म्हणे । सद **य** मना स्वपदरजें उद्धार करीं समीप जा **य** म्हणे ॥ ३५ ॥
पंक **ज** पर्लाशनयनें पादरजें उद्धरोनि ति **ज** ला हो । कीर्ति **ज** गत्रयिं केली न वर्णवे लेशमात्र म **ज** ला हो ॥ ३६ ॥
ज्याच्या **य** शासि वर्णिति सुरगण ज्यालागिं देवरा **य** नमी । सद्र **य** ह्रदय रघुपति तो तद्गुण गाईन करून गा **य** न मी ॥ ३७ ॥
त्या हो **रा** जसुतांतें घेउनि जनकाचिया पु **रा** ला हो । आला **रा** शि तपाचा कौशिक जो वंद्य निर्जं[९] **रा** ला हो ॥ ३८ ॥
कोटि **म** दन हि न येति तुळितां.ज्याच्या मुखास स **म** तेला । ऐशा **म** नोहराच्या ठायीं धरि जनक भूप म **म** तेला ॥ ३९ ॥

---

१ मुनिपत्नी अहल्या. २ स्त्री. ३ रोगरहित ( ईश्वर ). ५ कश्यप-पुत = इंद्र ४ ब्रह्मदेवाची. ६ कमळ. ७ वंश. ८ पत्र. ९ देव.

भुलली श्री रघुपतिचें भूमिसुता देखतां ।चि श्री मुख हो ।   वदली श्री सीता काशी याविण न रूचे ।चि राज्य श्री मुखहो ४०

जो अज रा मर केवळ सुखसागर वंद्य निर्ज रा मनुजां ।   तो स्वक रा नें भंगुनि भवधनु[1] मग वरि वैसुंध रा तनुजा ॥ ४१ ॥

जनकें म हदानंदें आणविलें दशरथा म हीपाला ।   तंव तो म नुकुळसत्तम गजरें परिवार युक्त म ग आला ॥४२॥

नमुनी ज गतीतनैया[2] रामा दे लक्ष्मणास ।नि ज दुहिता ।   रामानु ज भरतातें शत्रुघ्नातें निजानु ज स्वसुता ॥ ४३ ॥

जयज य कारुनि नरवर लग्न करुनि दे प्रमोद[3]म य मनहो । पादद्व य वंदुनियां आंदण दे रथ अपार ह य धन हो ॥४४॥

परिवा रा सह निघता जाला निजपट्टणासि रा घव जो । तो सामो रा आला क्रोधें धरि बहु जया प रा भव जो ॥ ४५ ॥

तंव रा म त्यासि जिंकुनि निजनगरालागिं ये म नोहार । मेघश्या म तनू जो तामरस[5]नयन जनीं म होदार ॥ ४६ ॥

नृप नि ज मनीं विचारी स्थापावें ज्येष्ठ रा ज पुत्रास ।   भरता ज ननी तेव्हां विघ्न करुनि पाववी ज गत्रास ॥ ४७ ॥

बोले का य नृपाळा कौसल्येचा वनीं तन य वसवीं ।   दे निश्च य वर भद्रीं त्या जो मत्सुत सदा विज य वसवीं ॥ ४८ ॥

या परि ज गतीपतिला तेव्हां वदतां ।चि भरत ज ननी ती । न करीं ज गत्रयीं तूं अकीर्ति हे सांगती सु ज न नीती ॥ ४९ ॥

परि ना य के वधू तें राय विनवि होउनी विन य तिजला । आला का य करावें भूप ह्मणे कठिण हा सम य मजला ॥५०॥

दिधलें रा ज्य समस्त हि तुजला ऐसें वदे धैं रा धर हो ।   गुंतुनि रा जा पडला वचनीं देउनियां पुं रा वर हो ॥५१॥

ज्याची क म [8]नीयाकृति देखुनियां लाज फार म दनासी ।   तो श्रीरा म निघाला विजना जो सर्व दुष्ट म द नासी ॥५२॥

---

१ शिवचाप. २ भुकन्या = सीता. ३ आनंद. ४ नगर. ५ कमलनेत्र. ६ राजा. ७ पूर्वी. ८ सुंदर. ९ अरण्य.

लेखुनियां **श्री** राज्या तृणसम यन्मित्र **श्री** महेशा[1]न । सावरं[2]ज **श्री** सह तो विपिना[3] प्रति जाय **श्री** रमेशानें[4] ॥ ५३ ॥
निजसुत **रा** म वियोगें निश्चेतन तनु न **रा** धिपेशाची । होतां तंव **रा** जस्त्री शोक करी माय **रा** घवेशाची ॥ ५४ ॥
हा हा तूं म **म** रमणा कां ममता त्यागिलीस **म** ज वरिली । बोलसि ना **म** ज संगें किंकारण मति असी **म** नीं धरिली ॥ ५५॥
तेंव्हां सानु **ज** होता आजवळीं भरत त्या **ज** ला चपळ । आणविलें **ज** ननीचें कृत देखुनि शोक मा **ज** वी विपुळ ॥ ५६ ॥
हा हाय का **य** केलें मम हित होऊनि मा **य** मजलागीं । वधितां भ **य** मज वाटे माय म्हणे रामरा **य** तुजलागीं ॥ ५७ ॥
भरतक **रा** नें करवी वसिष्ट कर्मांत **रा** यथायुक्त । तो परिवा **रा** सहित चि शीघ्र निघे भरत **रा** घवासक्त ॥ ५८ ॥
जेथें श्रीरा **म** असे तेथें जाऊनियां **म** नें नामिलें । चरणक **म** ल[8] मग बोले भरत तदां कां प्रभो **म** ला त्यजिलें ॥ ५९
ने संगें म **ज** ला ही तुजविण धीर चि न रा **ज** या धरवे । कैकेयात्म **ज** वदतां समजावी राम त्या **ज** ला बरवें ॥ ६० ॥
येतों निश्च **य** चवदा वर्षीं परतोनि जा **य** नगराशी । श्रीरघुना **य** क ऐसें वदला जो जलदका[5] **य** सुखराशी ॥ ६१ ॥
तोहा नि ज **ज** नवत्सल ज्याचे नामि देवरा[6] **ज** पादकजें । दे त्या अनु[7] **ज** न्मातें तदुपरि निजपदसरो **ज** पा दुक जे ॥ ६२ ॥
रामीं तन्म **य** होतां भरत निघाला चि पा **य** वंदुनियां । राघवरा **य** वियोगास्तव तो नगरीं न जा **य** खेदुनियां ॥ ६३ ॥
काळ क्रमि **रा** ज्यीं स्था-पुनि पादुक वंधु **रा** घवाचा हो । दिवसाणि **रा** त्रि त्याची न चि त्रिसरे राम **रा** म वाचा हो ॥६४॥
जलदश्या **म** रघूत्तम सज्जनविश्राम रा **म** तो विजनीं । करितां श्र **म** न विमर्दी राक्षसराजा प्रिया **म** हा रजनीं ॥६५॥

१ शिव. २ धाकट्या बंधूसह ३ वन. ४ रमापती. ५ मेघश्याम. ६ इंद्र. ७ धाकटा भाऊ. ८ कमल.

रुचिर जिचें श्री मुख तें सीता तिजसहित श्री रमालय[1] तो। सानुज मग श्री राघव ये पंचवटीस श्री भगालयें[2] तो ॥ ६६ ॥
पाठवि असु रा धीश्वर कपटमय सुंद रा कृती हरण। देखुनि अंज[3] रा जसुत-स्नुषाह्मणे रघुव रा स ते धरण ॥ ६७ ॥
तत्कंचुकीस म ज दे तूं म्हणतां तो म नोजवें धावे। शुद्धिस्तव र म णाच्या दारा धाडी म नोरमा धावें ॥ ६८ ॥
रावण मग ज नकसुता घेउनि जातां ज टायुला मारी। नेउनियां ति ज ठेवी अशोकवानीं रा ज सूनुची नारी ॥ ६९ ॥
तो कपटम य मृगातें मारुनि तंव तेव य धि [!] परतला। वंदुनि तन य सुमित्रे-चा तत्पदकुवलु य द्वयीं रतला ॥ ७० ॥
सानुज येतां रा घव परतुनि तंव ती वैं रा नना न दिसे। शोक करी हा रौं मे तुजविण युगसदृश रा त्रि वाटतसे ॥ ७१ ॥
या ऋष्यमुक मुँ हींद्रा समीप वैंलभी म राघावा भेट। भीम पराक्र म दे जो नवळ सगुण धा म संगरीं धीट ॥ ७२ ॥
मग सरसि ज नयनाचें दर्शन तो अं ज नीसतीपुत्र। करवी कपि ज नवर्या सुगळां रघुरा ज होय तन्मित्र ॥ ७३ ॥
वाँसवतन[11] य निमर्दुनि विभु दे कपिना य कास किष्किंधा। सदय हृद य तो राघव-कुळमणि करवि ल य जो महाबंधा ॥ ७४ ॥
मग तो वायु ज गेला लंकेला का ज पूर्ण साधाया। जाळी पौलस्त्य[12] ज पुरि शोधुनि नररा ज सूनुची जाया ॥ ७५ ॥
मारुततन य निवेदी वृत्त रमाना य कास वंदून। मग राम जा य लंके सेतुपथें तो य[13] धीस लंघून ॥ ७६ ॥
मर्दुनि असु रा धीश्वर बिभीषणा लागीं रा ज्य देउनियां। ये निज नग रा सानुज सीते प्रति राम रा य घेउनियां ॥ ७७ ॥
बंधनमुक्ता म रगण जाले भरत हि म नांत हर्षून। वंदी पदक म लातें स्तावीति विबुध[14] सुसु म नास वर्षून ॥ ७८ ॥

---

१ रमापति. २ ऐश्वर्यस्थान. ३ अज राजाचा पुत्र दशरथ याची सून सीता. ४ सुमुखी. ५ हे स्त्रिये. ६ पर्वत. ७ मारुति. ८ गृह. ९ कमल. १० सुग्रीव. ११ वाली. १२ रावण १३ समुद्र. १४ देव.

देखानि नयनीं  **श्री** रा-माच्या त्या **श्री** मुखास माता ते ।  आनंद पावली **श्री** कौसल्या **श्री** महेंद्रकांता ते ॥ ७९ ॥
बैसुनियां मग  **रा** ज्यीं राघव अक **रा** सहस्र वर्षें हो ।  राज्य करी सुख **रा** शी स्तविती अम **रा** दि ज्यास हर्षें हो ॥८०॥*
न गणुनियां शे[2]  **म** नातें पुरजन निर्भय **ज** रानिमरणाचें ।  सदयहृदय **जं**[3] लजानन तो हा रघुरा **ज** राज्य करि साचें ॥८२॥
कुश लव तन  **य** श्रीच्या उदरीं रघुना **य** कास मग होती ।  दुष्टांस भासती **य** म सम जे रणविज **य** ज्यांसि रिपु भीती ॥८३॥
हयमेध यज्ञ  **रा** म स-मारंभ क **रा** वया वसे जेव्हां ।  दाखविला स्वप **रा** क्रम रामात्मज **रा** घवासि पैं तेव्हां ॥ ८४ ॥
ऐशा परिचीं यें[4]  **म** ल मु-लें सीतेचीं **म** नोरमें सगुण ।  पितृसम पर **म** पराक्रमि जे सद्गुणधा **म** सत्कलानिपुण ॥८५॥
दशरथबाहु[5]  **ज** कुलमणिसुत राज्य करी **ज** नास हर्ष महा ।  वंदुनियां पद **जं**[6] लजें स्तविती रघुरा **ज** राजसत्तम हा ॥८६॥
सज्जनसुखदा  **य** क हा भवतरणोपा[7] **य** धन्वशरधारी[8] ।  कमलाधरका[9] **य** सुभंग[10] भक्तांचे भ **य** समग्र संहारी ॥ ८७ ॥
न कळे चरित  **ज** याचें त्या हो कमल[11] **ज** भवादि देवाला ।  अखिलेश्वर अ **ज** तो हा अजपुत्रात्म **ज** जगत्पिता झाला॥८८॥
त्रिगुणातीताद्व  **य** जो अविनाशी अव **य** वादि ज्यासि नसे ।  सर्व हि मायाम **य** जग या परता हो **य** साम्य त्या न दिसे॥८९॥
अवतरलासे  **रा** घव तो हा ता **रा** वयासि दुष्टांतें ।  करुणेचा जो पौं[12] **रा** धार निवा **रा** वया अरिष्टांतें ॥ ९० ॥
सर्वाधीश निरा  **म** य तो हा श्रीरा **म** चंद्र राज्य करी ।  होतां तत्पदक **म** ळीं लीन सदा मग **म** हद्भयास हरी ॥ ९१ ॥

**समाप्त.**

---

१ पृथ्वीपति. २ यम. ३ कमलमुख. ४ जुळीं. ५ राजा. ६ कमलें. ७ संसार. ८ धनुष्य. ९ कमलाचा खालचा भाग. १० सुंदर. * या ८० व्या आर्यें पुढची आर्या उपलब्ध नाहीं. ८२ व्या आर्येचा प्रथम चरण नष्ट झालेल्या ८१ व्या आर्येचा आहे असें चरणारंभापासून सातवें अक्षर "म" आहे यावरुन दिसतें. ११ ब्रह्मादि. १२ समुद्र.

॥ श्री ॥

# विठ्ठलकृत बिल्हण-चरित्र.

**श्रीवीरसेन** नृप गुर्जर-देशवासी ।
वास्तव्यपूर **नळपट्टन** नाम त्यासी ॥
पृथ्वी समुद्रवलयांकित कीर्तिदाता ।
विद्या-विशारद[1] महा श्रुतिशास्त्रवक्ता ॥ १ ॥
पट्टांगना नृपतिची **विमलाभिधानी** ।
बाला **अवंतिपुरिची** वरभोगदानी ॥
कन्या तिची विमल **चंद्रकला** प्रदीपा ।
जाणा तयेवरि असे जनकानुकंपा[2] ॥ २ ॥
देश प्रजाजन सुखी बहु पूरवासी ।
राका[3] निशानगर सत्य गमे जनासी ॥
देखोनि लोक ललनेसि गवाक्षपंथें ।
नेणे दिवा उगवला मुखचंद्र जेथें ॥ ३ ॥
चंद्रोपमा **शशिकला** वयवृद्धि पावे ।
क्रीडार्थ ये निजसभेप्रति तातसेवे ॥
कंदर्प-सिंधु-लहरी जशि दिव्य कांता ।
देखे पिता करि सुताध्ययनार्थ चिंता ॥ ४ ॥
राजा वदे प्रतिदिनीं स्वपुरोहितातें ।
चिंता मनीं निजसुताध्ययनार्थ मातें ॥
जाणे कवित्व गुणमंडित शास्त्रवक्ता[4] ।
घेऊनि ये करिन संग्रह बुद्धिवंता ॥ ५ ॥
चिंता करी नृप-पुरोहित तों स्वभावें ।
**काश्मीरदेश**-कवि **बिल्हणमिश्र** नांवें ॥
देशावरास्तव तया नगरास आला ।
सन्मानिला द्विजवरें सदनासि नेला ॥ ६ ॥
स्वस्थान देश कुळदैवत **बिल्हणातें** ।
मंत्री पुसे कुशळ सर्व ह्मणे तयातें ॥
विध्युक्त पूजन करोनि पुरोहितानें ।

१ निपुण. २ कृपा. ३ पूर्णिमा. ४ "शास्त्रवेत्ता" असें पाठांतर आहे.

[१]दिव्यांबरें भुषण दीधलँ थोर मानें ॥ ७ ॥
मंत्री ह्मणे निजसुताध्ययनार्थ राजा ।
पाहे कवीश्वर प्रतीदिन एक वोजा ॥
भाग्योदयार्थ घडलें नगरासि येणें ।
सांगों नृपास मग जाउन भेट घेणें ॥ ८ ॥
गेला सभेप्रति पुरोहित काय बोले ।
राया मनोरथ तुझे परिपूर्ण जाले ॥
काश्मीरदेशकवि बिल्हणमिश्र नामें ।
आला *नृपाश्रय दिजे नृप सार्वभौमें ॥ ९ ॥
तोषोनि भूपति ह्मणे स्वपुरोहितांसी ।
भेटावया त्वरित घेऊन ये कवीसी ॥
होजी ह्मणोनि गुरुजी सदनासि आले ।
प्रेमादरें प्रभुशिं नेउनि भेटवीलें ॥ १० ॥
प्रज्ञा प्रगल्भ कवितारसवृत्ति मोठी ।
संतोषले नृप सभासद धूर्त पोटीं ॥
छंद प्रबंध यमकें पदबंध दीक्षा ।
वेदोक्त संस्कृत गिरा प्रभु दे परीक्षा ॥ ११ ॥
जाला मनीं परम तोष महा नरेंद्रा– ।
ऽलंकार हेमें[२] वसनें दिधलीं कवींद्रा ॥
विज्ञप्ति भूभुज[३] करी कविचूडरत्नें[४] ।
कन्येसि अध्ययन सांग किजे प्रयत्नें ॥ १२ ॥
आज्ञा समर्थ तुमची कविराज बोले ।
केला मुहूर्त पढतां पद पाठ झाले ॥
प्रज्ञा विशाळ गुणवंत पढों निघाली ।
थोड्या दिसांत तिसि व्युत्पति फार झाली ॥ १३ ॥
केलें च अध्ययन संस्कृतप्राकृताचें ।
पातंजलादिक महाश्रुत शास्त्रचर्चे ॥
गांधर्व वैद्य रस ज्योतिष मंत्रविद्या ।
भाषा कवित्वगुण काव्य कला समुद्या ॥ १४ ॥
तो †बोलला वचन चंद्रकले सुशीले ।

---

१ "पूज्यांवरें दिधलें सुकृत दोर्घ मानें" असांही पाठ आहे. २ सुवर्ण. ३ राजा ४ शिरोमणि. * "गृहाश्रय" पाठांतर. † "मी बोलिलों" पाठांतर.

जाली तुला सकळ व्युत्पति राजबाळे ॥
नाहीं तुला शिकविलें स्मरशास्त्र पाहीं ।
अभ्यासितां विदित होइल सर्व तें ही ॥ १५ ॥
ते बोलतां परम सद्गद मंद वाचे ।
पादारविंद धरिलें कवि **बिल्हणाचें** ॥
तें काम-शास्त्र तुमचेनि मुखें वदावें ।
त्यानंतरें स्वनगरा प्रति शीघ्र जावें ॥ १६ ॥
शोभे निकें तनु तिचें महके सुगंधें ।
* कर्पूर धूप मणिमंडित पावबंधे ॥
श्रृंगारिलें लखलखाट दिसे दिगंतीं ।
सौदामिनी लवत तेज पडे दिगंतीं ॥ १७ ॥
शृंगाार--कानन गमे निज मन्मथाचें ।
देखोनि चित्त रमलें कवि **बिल्हणाचें** ॥
आमंत्रिला †त्वरित मंन्मथ तो शरीरीं ॥
आरंभिलें रति--रहस्य ह्मणे विचारीं ॥ १८ ॥
नानासनें नयन ¶ वर्तन हास्य गोष्टी ।
कंदर्प--‡सिंधु विपरीत कला प्रतिष्ठी ॥
हें सांगतां परम व्याकुळ कामबाणें ।
जाली ह्मणे विविध शास्त्र--विधि प्रमाणें ॥ १९ ॥
हें ऐकुनी खवळलें मन आंवरेना ॥
होणार जाण सहसा लिहिलें टळेना ॥
दैवी कळाऽघटित तें च विचारिलेंसे ।
गांधर्व लग्न सदनीं मग लाविलेंसे ॥ २० ॥
या नंतरें खचित-रत्न-पलंग सेजे ।
क्रीडा करी प्रथम काम सुखासि लाजे ॥
आलिंगनीं दृढ तिला धरितां चि झाडी ।
संघट्टनीं बहुत भी परि मी न सोडी ॥ २१ ॥
त्यां घातला स्वकर जों निरिमोचनातें ।
कंदर्प-मंदिर-कपाट-§सुवेष्टनातें ॥
बाळा वदे सुरत हास्यरसाधिकारी ।

---

१ पादकमळ. २ वीज. ३ अरण्य. ४ समुद्र * 'कस्तुरी' पाठ. † 'मदनभूपतिनें' पाठ. ¶ 'नूतन' पाठ. ‡ 'युद्ध' पाठ. § 'विघट्टनातें' पाठ. 'चित्त' पाठ.

पद्मासनीं कवण तस्कर *वित्त चोरी ॥ २२ ॥
आलिंगिली नृपसुता सुरताभिलाषें ।
आरंभिलें मदन—संगरें[१] सावकाशें ॥
बिंबाधरासि रदें[२]दंश नखक्षतादी ।
संभोग सौख्य रमतांऽनुभवी विनोदी ॥ २३ ॥
झांकी स्वगुह्य वसनें सुरत-प्रसंगीं ।
ठेवी कटाक्ष—कमलावरि हात वेगीं ॥
तल्पीं सुगंधसुमनें मणिरत्नमंचीं ।
क्रीडा कुतूहल करी तनयाँ[३] नृपाची ॥ २४ ॥
[४]पद्मानना बहुत भी मृगशाँ[५]वकाक्षी ।
[६]मातंगकुं[७]भयुगुलस्तनभार साक्षी ॥
रक्त [८]प्रवाल रुचिराधर-बिंब-शोभा ।
कुंदोपमा दशनपंक्ति हिरावली भा[९] ॥ २५ ॥
आम्रप्रवाल करपल्लव राजसेचे ।
†उर्ध्वं [१०]मृगेंद्रकाटि वार्णील कोण वाचे ॥
सौवर्ण—चंपक—तनू मदनाभिरामा ।
साजे मुखास उपमा परिपूर्ण सोमीं[११] ॥ २६ ॥
पद्मासनादि जितकीं श्रुत कोकशास्त्रीं ।
मीं सर्वदाऽनुभाविलीं रति-सौख्य-तंत्रीं ॥
दासी तयेसि परिवेष्टित रक्षणार्थ ।
त्या जाणती पुरुषभुक्तकलापदार्थ ॥ २७ ॥
बिंबाधरासि दशनक्षत रूढ झालें ।
तैसें च चुंबन तयांसि दिसोनि आलें ॥
कामांकुशें उमटती व्रण त्या कुचाग्रीं ।
ते देखिली पुरुषभुक्त वधू समग्रीं ॥ २८ ॥
दूती वृतांत कथिती वरवेत्रधारा ।
जे सर्वदा असति रक्षण राजद्वारां ॥
संस्कारिली गुरुवरें तनया नृपाची ।
तेथें परागमनता प्रति [मति ?] प्राप्त कैंची ॥ २९ ॥

---

१ युद्ध. २ दांत. ३ कन्या. ४ कमळ. ५ बाळ. ६ हत्ती. ७ गंडस्थळ. ८ पक्व. ९ कांति. १० सिंह. ११ चंद्र. १२ कन्या. * 'चित्त' पाठ. † 'ऊर्ध्वे' पाठ.

दूती कृतांतसम केवळ काळदृष्टी ॥
कर्णीं नृपास कथिती निज गुह्य गोष्टी ॥
चित्तीं महींद्र न धरी बहु कोपलासे ।
ऐसें कदापि न घडे तिस बोललासे ॥ ३० ॥
भूपाळ-सेवक-जनीं म्हणिजे कवींद्रा ।
तूं जो पदार्थ करिशी श्रुत तो महींद्रा ॥
या नंतरें अधिक सावध तूं असावें ।
गंतव्य शीघ्र नगरा प्रति तीं करावें ॥ ३१ ॥
राजानुगीं शिकविलें परि नायकें मी ।
गेलों पुन्हा शशिकला-निलयास कामी ॥
जातों ह्मणोनि वदतां न वदे प्रकोपें ।
पायां पडे तंव उभे नृपदूत सोपे ॥ ३२ ॥
दोघां जणां गवशिलें नृपवेत्रधारीं ।
बाळा तयांस विनवी बहुतां प्रकारीं ॥
राखा चुडे पदर मी पसरोनि मागें ।
गेले दिलें धन उदंड करीं प्रसंगें ॥ ३३ ॥
भ्रू विभ्रमा करुनियां बहु कोप आला ॥
कां ते क्षणीं विरह पीडितसे कवीला ॥
दृष्टि प्रसन्न मज सत्वर होय पाहीं ।
चित्तीं कदापि न धरीं गुणदोष कांहीं ॥ ३४ ॥
ऐसा विनोद करितां नृप गुप्तरूपें ॥
द्वारीं उभा चरित देखतसे समीपें ॥
साचोळ तो उभयतांसि सुचावलासे ॥
ग्यां श्लोक दृष्टिसि फिराउनि वर्णिलासे ॥ ३५ ॥
एकासनीं उभयतां प्रति तें धरावें ।
तो जाय सन्मुख तया उडवी स्वभावें ॥
वेष्टोन भाळ नयनोत्पल पल्लवानें ।
कोयाळ-कूजित वदे तशि मंदतेनें ॥ ३६ ॥
बोले कवी मदन-दुःख कदा न साहे ।
ग्यां प्रार्थिली सहज दृष्टि कदा न राहे ॥

---

१ यम. २ त्वा. ३ सेवक. ४ गृह. ५ नेत्रकमळ. ६ पदर. ७ कोकिळ. 'कोकीलकूजित' पाठ. ८ ध्वनि.

कांता*पिता नयन पद्म यथार्थ दोन्ही ।
हे जल्पती भ्रम† नरेंद्र मनीं न मानी ॥ ३७ ॥
वंदोनियां **शशिकला** पद भूपतीचे ।
बोले भयें चकित सद्गद मंद वाचे ॥
तों देखिलें चरित गुप्त विकल्प काय ।
भूपा क्षमा धरुनि शीघ्र निघोनि जाय ॥ ३८ ॥
जाला भयाभित वदे कविराज कांहीं ॥
भाग्योदयें निरासिलें[1] निज विघ्न पाहीं ॥
तूं राहशील परती मज दूत नेतां ॥
आतां तरी मज निरोप दिजे प्रिये ‡तां ॥ ३९ ॥
हें आयकोन उगली नरनाथ बाळी ।
कांपे शरीर पवनें जशि बाळकेळी ॥
वाग्दोर त्यासि रदपंक्ति कपाट लावी ॥
टाकी त्रयोदशगुणी क्षितिभाळ ठेवी ॥ ४० ॥
ज्यां अर्चिले चि पति पूर्व§ऋणानुबंधें ॥
त्यागीतसां मज तुह्मी कवण्याऽपराधें ॥
हा तो विचार करितां न मिळे स्वधर्मीं ।
जीनों[2] मुहूर्त तुमच्या विरहानळें मी ॥ ४१ ॥
विद्युल्लता जलदवर्जित[3] केंवि होय ।
अस्तंगता शशिकला दिसतील काय ॥
कामानळें विरहिणी सहसा न वांचे ।
तैसें त्वदर्शन विना क्षण मी न वांचें ॥ ४२ ॥
मुग्धे तुझ्या सुरत-सौख्य-रसें करोनी ।
पावेन होय झषकेतन[4] सत्य मानी ॥
चित्तीं दृढत्व धरिजे त्वमनित्य पाहीं ।
नाना विपत्ति मज होइल देख तें ही ॥ ४३ ॥
नेतील दूत करुनी[5] सखि बद्ध मातें ॥
सर्वात्मना [?] फिरविती नगरा सभोंते ॥
स्त्री मारमूर्ति मदिरा-सरिता-सुपानें[6] ।

* 'मातापिता' पाठ. † 'जन्मतां मग' पाठ. १ निवारिलें. ‡ त्वां. § 'पूर्ण.' पाठ. २ जगेंना. 'जाणा' पाठ. ३ मेघ. ४ मीनध्वज. 'पावेन मी यम-निकेतन' पाठ ५ 'खरयान करुनि' पाठ. ६ 'सरितांबुपानें' पाठ.

कैसेनि पैं भुलुं न ये [1]मधुपानतेनें ॥ ४४ ॥
कामातुरास भय लाज नसे कदा ही ।
स्त्री-लुब्ध ते *परम मूर्ख विशेष पाहीं ॥
ऐसें ह्मणोनि वदला सुरतानुरागें ।
केलांऽगिकार कविमूढ कलाप्रसंगे † ॥ ४५ ॥
अन्योपभोग मग नित्य करी तियेशीं ।
क्रीडारसें विनटले निज दुर्मतीशीं‡॥
देखोनियां सकळ कौतुक भूप-दासी ॥
सांगे मुखें चरित राजपुरोहितासी ॥ ४६ ॥
मंत्री ह्मणे नर[2]मृगाधिप सार्वभौमा ।
वैरी-[3]मतंग-सुविदारण कीर्ति सीमा ॥
वैदेशिकें[4] बुडविलें कुळ पापकर्मीं ।
जाणोनियां क्षमासि कीं धृति नास्ति धर्मीं ॥४७ ॥
हें आयकोनि व[5]सुंधापति तप्त झाला ॥
कोपध्वनी तइं कसा[6] गगनासि गेला ॥
पाचारिलें मग पुसे [7]परिचारिकेतें ॥
सांगीतलें मग तिनें श्रवणीं नृपातें ॥ ४८ ॥
जाणोनियां महदनर्थ पुरोहितासी ॥
राजा पुसे कवण शासन [8]तस्कराशीं ॥
मंत्री म्हणे परिसिजे कुलशीलरत्नें ॥
शूलाग्रऽरोहण किजे परिवार यत्नें ॥ ४९ ॥
आज्ञा दिली [9]क्षितिभुजें मग वेत्रपाणी ॥
नेती तयासि पुसति जन [10]लीनवाणी ॥
ते सांगती हरिलिसे नरनाथबाळी ॥
लोकापवाद उठला नगरीं सुमेळीं ॥ ५० ॥
द्वारीं महींद्रतनया मजलागिं लक्षी ॥
त्यां देखिली मग ह्मणे कमलायताक्षी ॥
स्वर्गासि **बिल्हणकवीश्वर** जाय मानें ॥
येना पुन्हा [11]सुरसती-सुरताभिनानें ॥ ५१ ॥

---

१ मद्य. * 'पुरुष' पाठ. † 'कलत्रसंगें' पाठ. ‡ 'विसरले निज दुर्दशेसी' पाठ. २ सिंह. ३ हत्ती. ४ गुरु. ५ राजा. ६ 'वाटे धनंजय जसा' पाठ' ७ दासी. ८ चोर. ९ राजा. १० नम्र. ११ अप्सरा.

पाहावयासि मिनले जन पौरवासी ॥
विज्ञापिती धनिक सेवक भूभुजासी ॥
मागेल द्रव्य तरि देउनि भूपतीतें ॥
निर्मुक्तता करिशि त्या कवि **बिल्हणातें** ॥ ९२ ॥
पाहावया नृपसुता गुरुपौरजाया ॥
येती मतंग-गमनी[1] बहु घावरीया ॥
कोणी कटीं वसन खोउनि एक हातें ॥
कोणी करें धरुनि मुक्त हि कंचुकीतें ॥ ९३ ॥
बिंबाधरासि दयितें रददंश केले ॥
पाहात दर्पण[2] करीं सखि एक चाले ॥
वेण्यार्द्ध गुंफित नितंबिनि[3] एक आली ॥
आच्छादुनी कुच करें सरशी निघाली ॥ ९४ ॥
तांबूल घेउन उभी करिं राजपंथीं[4] ॥
गुंफीत हार करिं सूत्र विमुक्तग्रंथी ॥
कोणी उभ्या धरुनि कंठ परस्परें ही ॥
कोणी गवाक्षविवरांतुनि[5] देखते ही ॥ ९५ ॥
संगें शतेंशत वधू-गण-लोक येती ।
वध्यावनांत[6] कवितें नृपदूत नेती ॥
दिव्यांगना सकरुणा वदति स्वभावें ।
**लक्ष्मीपती** कविस या जिवदान द्यावें ॥ ९६ ॥
वध्यावनांत मग रोउनि शूल हेरीं ।
**काश्मीरकासि** वदती हित तूं विचारीं ॥
सुस्नात होउनि भजें **जगदीश्वराला** ।
अंतीं मती गति तशी मग होय त्याला ॥ ९७ ॥
बोलें च ना म्हणुनि बोलति लोक मातें ।
अद्यापि कां न भजसी **भगवंतजीतें** ॥
माझा सुशद्ध न फुठे मज बुद्धि कैंची ।
ज्ञाते पुन्हा वदति भक्ति करीं हरीची ॥ ९८ ॥
संसार दुस्तर भवार्णव थोर तारीं ।
गाती जयासि सुर **शक्र विधी[7] पुरारी[8]** ॥

१ गजगती. २ आरसा. ३ स्त्री. ४ मार्ग. ५ खिडकी. ६ वध्यस्थान. ७ ब्रह्मा. ८ शिव.

जो सर्वलोक-हृदयांबुज-हंस त्यातें ।
ध्यानीं मुनींद्र भजती निजमुक्ति होते ॥ ५९ ॥
हें बोलिजे जनपदें[१] मग म्यां तयांतें ।
जाणोनि उत्तर दिलें हृदयीं वसे तें ॥
हो आयिका नृपसुता-रतिसौख्य जाणें ।
अद्यापि देव दुसरा तिजवीण नेणें ॥ ६० ॥
अद्यापि ते कनक-चंपकवर्ण-गौरि ।
उत्फुल्ल-पद्म[२]नयना तनुरोम[३]हारी ॥
सुप्तोत्थिता च शयनीं मदविव्हलांगी ।
विद्या जशी गति तशी स्मरतों प्रसंगीं ॥ ६१ ॥
अद्यापि चंद्रवदना नवयौवनांगी ।
पीनस्तनी मज पुढें उभि हेम[४]रंगी ॥
माझी तनू स्मरशरें[५] पिडितां चि वेगीं ।
गात्रें सुशीतल करी सुरतप्रसंगीं ॥ ६२ ॥
अद्यापि ते शरदपुष्पदलायताक्षी ।
वक्षोज-वर्तुल-पटद्वय मी निरीक्षीं ॥
आलिंगितां सुरस घे म[६]धुराधराचा ।
जैसा मिलिंद[७] रस घे नवपल्लवाचा * ॥ ६३ ॥
अद्यापि †नाक्रमतनू तिचि तेज-राशी ।
चुंबावया रूळत कुंतल गंड-देशीं[८] ॥
‡ ते वारितां ध्वनि उठे करकंकणाची ।
तेणें करोनि मुरकुंडि वळे मनाची ॥ ६४ ॥
अद्यापि ते सुरत-जागर-घूर्णमानें ।
वक्रा विलोकन करी सुरताभिमानें ॥
श्रृंगारसारनलिनी[१०] गजराज-गामी ।
सलज्जनम्र-वदना शयनीं स्मरें मी ॥ ६५ ॥
अद्यापि ते मदन-मंदिर-वैजयंती[११] ।
म्यां देखिली § विरह-व्याकुल मध्यरातीं ॥

---

१ पुरवासी. २ कमल ३ केश. ४ सुवर्ण. ५ बाण. ६ गोड. ७ भ्रमर. ८ गाल. ९ अंत. १० सरोवर ११ पताका.

* 'पंकजाचा' पाठांतर. † 'निष्कल' पाठ. § 'मदन व्याकुळ' पाठ.

‡ देखोनियां निजमनीं सुख-सिंधु लोटे ।
उद्वाहु-वह्नि पसरूनि कलत्र भेटे ॥ असाही पाठ आहे.

आलिंगिली करलता[1] पसरोनि तीसी ।
सर्वात्मना विसर तो न पडो मनासी ॥ ६६ ॥
अद्यापि कामरति-तांडव-सूत्र-धारी ।
पूर्णेंदुबिंब वदना जाशि दिव्यनारी[2] ॥
बाला विशाल-नयनालक[3]दीर्घचिन्हीं ।
व्योम[4]ासमान कुचमंडल दीर्घ [?] दोन्ही ॥ ६७ ॥
अद्यापि ते मलय[5]-चंदन-लेप-भोगी ।
कस्तूरि-केशर-सुमिश्रित-चार्चितांगी ॥
चातुर्य-चारु[6]शत-चुंबन-दानकामीं । *
सलज्ज खंजन[7]नयना शयनीं स्मरें मी ॥ ६८ ॥
अद्यापि ते शरदचंद्र-मुखी मृगाक्षी ।
लीलाधरा तरल[8]मीनदृशा निलक्षीं ॥
काश्मीरचंद्र मृगनाभि[9]-विलेपितांगी ।
तांबूल देउनि विलासिनि नित्य भोगी ॥ ६९ ॥
अद्यापि ते कनक[10]-कांति कलाभिधानी ।
प्रस्वेद[11]-बिंदु वदनीं रति-खेद मानी ॥
सारंग[12]लोल-नयना सुरताधिकारी ।
गोडी कदापि न विटे तिचि खंति भारी ॥ ७० ॥
अद्यापि एक मनिं विस्मितता तयाची ।
मी शीकलों परि हि जीवित नावळे ची ॥
तें गुप्त चिन्ह कळलें मजलागिं ज्ञानीं ।
तेव्हां सुवर्णदल[13]ें लेवविलें सुकर्णीं ॥ ७१ ॥
अद्यापि ते कनककुंडल-जोड-धारी ।
रात्रीस चंद्र विपरीत-सुखाधिकारी ॥
आंदोलनें करुनियां जलबिंदु येती ।
मुक्ताफळें विखुरलीं मजला गमे तीं ॥ ७२ ॥
अद्यापि ते करि[14]-विदारण-चक्रनेत्रें † ।
‡ दंतक्षतें सुरत-विभ्रम होति गात्रें ॥

---

१ वेल. २ अप्सरा. ३ केश. ४ आकाश. ५ पर्वत विशेष. ६ सुंदर. ७ पाक्षिविशेष. ८ चंचल ९ कस्तुरी. १० सोनें. ११ घाम. १२ मृग. १३ पत्र. १४ हत्ती.

* ‘ चातुर्यतादशन-चुंबन इ० ’ पाठांतर. † ‘ वक्रनेत्रें ’ पाठांतर. ‡ ‘ दंतक्षतें करूनि ’ पाठांतर.

वस्त्रांचलस्खलन होत विलोकितांची ।
तीच्या स्तनांसि उपमा स्मर-कंदुकांची[1] ॥ ७३ ॥
अद्यापि ते *तरुण-पल्लवरक्तपानी ।
चोळी तिची तटतटीत भुजंग[2]-वेणी ॥
तुंडी-फळाधर कपोल-सुवर्ण-पात्रें ।
ते मी स्मरें † सरलहंसगतीवगात्रें ॥ ७४ ॥
अद्यापि हेम[3]रुचिरा मृगशाव[4]काक्षी ।
‡ अंभोजवर्तुल-पयोधर- § पीन[5]वक्षी ॥
बीजे मृगांक[6] उदयो करि तेविं देखा ।
**श्रीचंद्रचूड[7]** ☙ कुचरूपनेंखदुरेखा ॥ ७५ ॥
अद्यापि कज्जल-विराजित- ¶ पूर्ण-नेत्रा ।
कर्णीं सुवर्ण धरि केतकि राज-पुत्री ॥
नीले कलाप **यमुना** सुमनेक **गंगा** ।
भांगीं **सरस्वति** गुलाल बुका **प्रयागा** ॥ ७६ ॥
अद्यापि ते गलतकुंतलपाश पाहे ।
बिंबाधरी[8] $ **जलनदी** चिरकाल वाहे ॥
पीनोन्नत[9]स्तन कठोर हि चक्रवाकें[10] ।
मुक्ताफळें ** सुखद त्यांवर तेज फांके ॥ ७७ ॥
अद्यापि †† रत्न-मणि-दीपजनीलतेचे ।
नाना विचित्र पडदे रसराजकाचे ( जे ) ॥
राजात्मजा मजपुढें उभि मी निरीक्षीं ।
सलज्ज भूत सुविलोकित खंजनाक्षी ॥ ७८ ॥
अद्यापि ते गलित कुंतल[11]-पाश काळे ॥
वक्षोज नम्र वरि मौक्तिक-हार लोळे ॥
**द्रोणाद्रि मंदरगिरी** पयसिंधु[12]पाळी ।
तैसे पयोधर तिचे धरिं भोगकाळीं ॥ ७९ ॥
अद्यापि राजतनया मृगशावनेत्री ।
म्यां देखिली विरह-व्याकुळ-पुष्पगात्री ॥

---

१ चेंडू. २ सूर्य. ३ सोनें. ४ बालक. ५ पुष्ट. ६ चंद्र. ७ शिव. ८ तोंडलें. ९ उंच. १० पक्षि विशेष. ११ केश. १२ समुद्र.

* 'अरुण' पाठ. † 'अलस-हंसगती विचित्रें' पाठ. ‡ 'रंभोरु' पाठ. § 'मी निरीक्षीं' पाठ. ☙ 'निटिलींजशि इंदुरेखा' पाठ. ¶ 'लोलनेत्री' पाठ. $ 'पय' पाठ. ** 'स्फुरत यास्तव' पाठ. †† 'रत्नमय दीप विलोकितों जे' पाठांतर.

आलिंगिली भुजलता पसरोनि शाली ।
ते राजहंसगमना स्मर * अंतकाळीं ॥ ८० ॥
अद्यापि ते कुशल काव्यकलाविनोदी ।
ते मी स्मरें त्रिदशनाथ-सुखासि निंदीं ॥
संकीर्ण † होय सुरतीं सुकुमार बाळी ।
काकूलती स्तव धरी मज कंठनाळीं ॥ ८१ ॥
अद्यापि ते ‡ सुरत-संगर पूर्णताक्षी ।
सन्न स्मरें गलित-चीर-कलाप लक्षीं ॥
शृंगारसारनलिनीसह राजहंसी ॥
जन्मांतरीं निधन कोण वरील तीशीं § ॥ ८२ ॥
अद्यापि बाळ-हरिणी-नयनी स्मरें मी ।
कंदर्प-युद्ध मजशीं करि गुप्तधामीं ॥
वक्षोजकुंभ घन पीन धरीं स्वपाणीं ।
तेव्हां ¶ सुरेंद्र-सुखतुच्छ मनासि नाणीं ॥ ८३ ॥
अद्यापि भूतलवटी वर वामनेत्रा ।
सर्वांग कोमल तनू नवनीत-गात्रा ॥
शृंगार-नाटक-विशारदं गीत-नाना- ।
ऽलंकार-काव्यरसजाण ** कदा तुटेना ॥ ८४ ॥
अद्यापि ते ** मज विना क्षण ही न राहे ।
कामानळें निजवियोग कदा न साहे ॥
मी मागुता छळिन यास्तव फार धाकें ।
प्राणाधिका न विसरे †† मजला स्वभाकें ॥ ८५ ॥
अद्यापि ते प्रथम यौवनभोगदानी ।
तीचा वियोग घटिकावधि कल्प मानीं ॥
‡‡ क्षोमादरी परम लीन विधूतकामी + ।
सोडावया तिज समर्थ कदा नव्हे मी ॥८६॥

---

१ देवराज इंद्र. २ सरोवर ३ गृह, ४ हात, ५ सुंदर, ६ लोणी ७ निपुण, ८ शपथ, ९. (४३,२००००००) वर्षें –कल्प ९ कृश, १० अकाश. १२ हत्ती.

* 'सर्व' पाठांतर. † 'संकीर्ण घाम सुटतां' पाठांतर ‡ 'सुरत-जागर-घूर्णिताक्षी' पाठांतर. § 'कोण त्यजी तयेसी' पाठांतर. ¶ 'सुरेंद्र-पद' पाठांतर. ** 'तसे सुटेना' पाठांतर. ** 'मी तिजविना' पाठांतर †† 'भजलों.' पाठः ‡‡ 'शातोदरी' पाठ + 'असे सकामी' पाठ.

अद्यापि देव मानिं विस्मय मानितातीं ।
ठाकोनियां त्रिदिवें[1] कौतुक इच्छितातीं ॥
प्राण-प्रयाण करणें* मज शीघ्र काळें ॥
यानें नभीं प्रकटलीं दिसती विशाळें ॥ ८७ ॥
अद्यापि वारण[2]मदोत्कटमत्तगामी † ।
दुखें करोनि मदनाग्नित देह होमीं ॥
हस्तोदकें करिकलेवर चीर आले । ‡
ते आठवे घडि घडी अनुचीत जालें ॥ ८८ ॥
अद्यापि सुंदरपणासि रती न ठाके ।
चंद्रीं कलंक मुखिं निर्मळ तेज फांके ॥
कामानळें निजकलेवरें[3] दग्ध केलें § ।
देखेन कैं वदन मागुति दुःख जालें ¶ ॥ ८९ ॥
अद्यापि मी क्षणवियोग तिचा न साहें ।
मुर्छीत जीव धरूनी तनुवाट ‖ पाहें ॥
राजात्मजा त्यजिल देह ह्मणोनिशानें ।
लावीं विलंब गगनीं गमना विमानें ॥ ९० ॥
अद्यापि विस्मयमते ** गवसावयातें ।
आले नृपानुग बळीं मज न्यावयातें ॥
बाला यदर्थिं निजपल्लवदान मागे ।
तें म्यां कसें विसरिजेल भडाग्नि लागे ॥ ९१ ॥
अद्यापि चंद्रवदना करि फार खंती ।
लावण्य[4]सागरलता द्विजराज[5]कांती ॥
रात्रौ दिवा स्मरण होय तिच्या मुखाचें ।
दावा मुहूर्त[6] मुखवारिज[7] वल्लभेचें ॥ ९२ ॥
अद्यापि मीं धरितसें निज-जीविताशा ।
जन्मांतरीं वरिन हे प्रमदा परेशा[8] ॥
अन्योपभोग मजला नलगे च कांहीं ।
ते दाखवा शशिकला कवळीन बाहीं ॥ ९३ ॥

---

१ आकाश २ हत्ती. ३ शरीर. ४ सौंदर्य. ५ चंद्र. ६ क्षणभर. ७ कमळ. ८ हे ईश्वरा.
* 'समयोचित' पाठांतर. † 'मदोन्मत मंदगामी' पाठांतर. ‡ 'श्वासोदकें करिकलेवरिं चीर लोळे' पाठांतर. § 'झालें' पाठांतर. ¶ 'हा प्राण सांडिन तये विण सत्य बोलें' पाठांतर. ‖ 'नृपवास' पाठांतर. ** 'विस्मय मनीं' पाठांतर.

अद्यापि वक्त्रकमळावरि भृंग येती ।
गंड[1]स्थळीं परिमळास्तव चुंबिताती ॥
हे वारितां ध्वनि उठे करिं कंकणांची ।
तेणें करून मुरकुंडि वळे मनाची ॥ ९४ ॥
अद्यापि तन्वि मधुराधरदान* देते ।
ग्यां रोविलें निजनखें स्तनमंडळातें ॥
उद्भिन्नरोम पु[2]लकांकित होय बाळा ।
ते आठवे मदनमंजरि वेळवेळां ॥ ९५ ॥
अद्यापि एक मानिं विस्मय थोर जाला ।
पोटांत राग नसतां धरिला अबोला ॥
पायां पडोनि समजाविलि मंदवाणी ।
मी दास कोप न धरीं गुणरत्नखाणी ॥ ९६ ॥
अद्यापि धांवति करी हित काम नेणें ।
आर्येवरी † सखि उभी सहवर्तमानें ॥
कंदर्पतप्त परिव्याकुळ राजकन्या ।
ती कारणें स्मरतसे सुरता-नु-धन्या ‡ ॥ ९७ ॥
अद्यापि जा[3]णिव नसे निज § निश्चयेसीं ।
मे[4]नेसिं शाप दिधला म[5]घवासभेसी ॥
मोहावया जन ¶ वदे च[6]तुराननानें ।
हें निर्मिलें युवतिरत्न गुणाभिमानें ॥ ९८ ॥
अद्यापि हंस-तुलिकेवरि राजपुत्री ।
संगीत गायन करी रति-सौख्यदात्री ॥
तें आयकोनि रिझल्या सुरराजकन्या** ।
वर्णावया स्मरवधू सुरता दिसेना ॥ ९९ ॥
अद्यापि कज्जळविराजित नेत्रबाणीं ।
भ्रू का[7]र्मुका मदन-शक्ति तसे सुवर्णी†† ॥
कर्णांत ओढुनि ढळे कमळाननेची ।
ते भोगितां ‡‡ कवण पंडित दोष वाची ॥ १०० ॥

---

१ गाल. २ रोमांचित. ३ ज्ञान. ४ अप्सराविशेष. ५ इंद्र. ६ ब्रह्मा. ७ धनुष्य.

* ‘पान’ पाठांतर. † ‘अर्धोदयीं’ पाठांतर. ‡ ‘वंदान्या’ पाठांतर. § ‘दिसे मज’ पाठांतर. ¶ ‘जनपदा’ पाठांतर. ** ‘सुरनाग कन्या’ पाठांतर. †† ‘तसी सुवाणी’ पाठांतर. ‡‡ ‘वर्णितां’ पाठांतर.

अद्यापि निर्मल-शरच्छशी-गौर-कांती ।
तात्काळ ते मन हरी मुनि वश्य होती ॥
ते पूर्णचंद्रमुखचुंबनदान मागें ।
देखोनियां रति करीं मग सानुरागें ॥ १०१ ॥
अद्यापि ते शरदकुंद-सुगंधितांगी ।
देखोनि होय मकर[1]ध्वज वाममार्गी * ॥
दिव्यांगना[2]-सुरततीर्थकृतोपकारी ।
जन्मांतरीं वरिन मी मनिं हेतु भारी ॥ १०२ ॥
अद्यापि या क्षितितळीं प्रतिमा तयेशीं ।
बाळा निरीक्षिली नसे गुणरत्नराशी ॥
दिव्यांगनादिक गुणोत्तम कामसेना[3] ।
वर्णावयास समता दुसरी असेना † ॥ १०३ ॥
अद्यापि राजतनया हित ही न ‡ जाणे ।
वर्ते तशी कुटिल भाव मनासिं§ नेणें ॥
मी एक दैवत तितें दुसरें न मानी ।
ते राजहंसगति चिंतितसे निर्दोनीं[4] ॥ १०४ ॥
अद्यापि ते नृपति-शेखर-राज-पुत्री ।
संपूर्ण-यौवन-मदालस-खंजनेत्री ॥
गंधर्वयक्षसुरकिन्नर-राजकन्या ।
दिव्यांगना परिनितांत वयांतधन्या ¶ ॥ १०५ ॥
अद्यापि वर्तुल-पयोधर-मंडितांगी[5] ।
कंदर्प-सागर-लता कृश मध्यभागीं ॥
ज्यां भोगिले सकल भोग तिच्याऽनुरागें[6] ।
होते व्यथा निशिं[7] दिनीं वनितावियोगें ॥ १०६ ॥
अद्यापि ते कनककांति मदालसांगी ।
सल्लज्जनम्रवदना स्मरतों प्रसंगीं[8] $ ॥
** त्यागीं न औषधसुधा सरिता[9] गुणांची ।
ज्यां वर्णिली क्षितितळीं गुणकीर्ति तीची †† ॥ १०७॥

---

१ मीनकेतु. २ अप्सरा. ३ फौज. ४ संकट. ५ भूषित. ६ प्रेम. ७ रात्र. ८ संकट. ९ नदी. * 'पात वेगीं' पाठांतर. † 'उपमा दिसेना' पाठांतर. ‡ 'निजहीत' पाठांतर. § 'पदार्थ' पाठांतर. ¶ 'परिणितां न पवेति धन्या' पाठांतर. $ 'उठतां पलंगीं' आणि 'लुटितां पलंगीं' पाठांतर. ** 'ती जीवनासि धरितां' आणि 'ती जीवनौषधिसुधा, अशीं पाठांतरें. †† 'प्रतिमा तयेची' पाठांतर.

अद्यापि ते नृपसुता रतिभोगकालीं ।
प्रेमादरें करयुगें धरि कंठनालीं ॥
दंतोष्ट-पीडनक्षतें क्षतभाव दावी ।
ते मी स्मरें मदनमंदिर-देवदेवी* ॥ १०८ ॥
अद्यापि ते वरवधू सुभगावियोगें ।
आली सलज्ज सकलां प्रति मंत्र सांगे † ॥
विज्ञापना करितसे परिसा सुचित्तें ।
लोटांगणीं शरण **बिल्हण**पंडितातें ॥ १०९ ॥
अद्यापि धूर्जटि[1] धरी विष तें स्वकंठीं ।
कुर्मं धरागिरिवरा ‡ धरलें स्वपृष्ठीं ॥
आपोनिधीस § वडवानळ[2] नित्य जाळी ।
केलांगिकार बुध[3] पाळिति सर्व काळीं ॥ ११० ॥
अद्यापि ते प्रथम-संगम-भोगकाळीं ।
म्यां फेडिला हळु च कासवटा सुकाळीं ¶ ॥
$ लाजोनि दीप कर कोपुनि शीघ्र वातें ।
कर्णोत्पलीं विझविले मज आठवे तें ॥ १११ ॥
अद्यापि ते स्मरतसें सरसीरुहाक्षीं[4] ।
मार्गीं व्रजें रमण **बिल्हण** मी निरीक्षीं ॥
कामानळें निजकलेवरें[5] दग्ध जालें ।
हा प्राण सांडिन तियेविण सत्य बोलें ॥ ११२ ॥
प्रत्युत्तरासि सखि सादर शीघ्र** झाली ।
बोले मुखावरि दिशा शशिची झळाळी †† ॥
सौभाग्यपर्वत तुझा न फुटे नखाग्रें ।
चूडे अभंग वरशील सुखें समग्रें ॥ ११३ ॥
नेलें निशाचरवरें[6] जनकात्मजेसी[7] ।
नेदी च खंजनदृशा रघुनंदनासी[8] ॥
ती कारणें रणमहीं[9] जिवदान केलें ।
म्यां एक मस्तक दिलें तरि काय जालें ‡‡ ॥ ११४ ॥

---

१ शिव. २ वडवाग्नि. ३ ज्ञाते. ४ कमल. ५ शरीर. ६ रावण. ७ सीता. ८ राम. ९ रणभूमी. * ‘मदन-मूर्ती मनीं वदावी’ पाठांतर. † ‘संतप्त होय सकलां प्रतिपात्र सांगे’ पाठांतर. ‡ ‘समुद्र-वसना’ पाठांतर. § ‘अंभोनिधीस’ पाठांतर. ¶ ‘समूळीं’ पाठांतर. $ ‘लाजोनि दीपकर कांपति वक्रवातें’ पाठांतर. ** ‘सिद्ध’ पाठांतर. †† ‘पडे ‘दिसे तेजशाळी’ पाठांतर. ‡‡ ‘गेलें’ पाठांतर.

राजा विचार करि होइल ब्रह्महत्या ।
स्त्री घात-पातक घडे सहसा निमित्या ॥
कन्याऽर्पिजे निजकरें कवि **बिल्हणासी** ।
दोघें जणें वसुत देइन वित्त त्यांसीं ॥ ११५ ॥
श्री **बिल्हणासि** मग नेउन **वीरसेनें** ।
पाचारिली **शशिकला** दिधली विधानें ॥
ग्रामें पुरें धन दिलें यश वाढवीलें ।
धूर्तांसि **विठ्ठल*** ह्मणे परिपूर्ण जालें ॥ ११६ ॥

**समाप्त**

---

* हा **विठ्ठल** कवि **बीड** शहराजवळील **गौरीपूर** येथील राहाणारा. हा जातीनें ऋग्वेदी ब्राह्मण असून त्याचें गोत्र कौशिक होतें. तो छत्रपती **शिवाजी** महाराजांचे वेळीं होऊन गेला असें त्याच्या ग्रंथांतील अंत:प्रमाणावरूनच सिद्ध होतें. ह्याचे मुख्य ग्रंथ 'सीतास्वयंवर' व 'रुक्मिणीस्वयंवर' हे होत. दोन्ही नानावृत्तबद्ध आहेत. 'बोले विठ्ठल हा पदार्थ उगवा षण्मासचा वायदा' असें ह्मणून श्लोकबद्ध कूटें रचणारा हाच **विठ्ठल** होय. ह्याचीं उपदेशपर पदें ही पुष्कळ प्रसिद्ध आहेत. रुक्मिणीस्वयंवरांत व सीतास्वयंवरांत त्याणें आपला थोडकासा वृत्तांत दिला आहे तो येणें प्रमाणें :—

आनंदाद्बकशाल्विाहन शके षट् नंद बाण क्षमा [१५९६]
मासांचा नृप मार्गशीर्षक महा बोले कवी सत्तमां ॥
श्रीमत्कौशिकगोत्र वस्ति नगरीं गौरीपुरीं जाणिजे ॥
मुख्यस्थानक बीड नीड़तरफे मध्यें नृपें राहिजे ॥
श्रीमद् रुक्मिणिचें स्वयंवर निकें संपूर्ण हें वाचिजे ॥
ऋग्वेदोत्तम आश्वलायन महाशाखांबुधी जाणिजे ॥
वर्णी विठ्ठल दुग्ध-सागर-कलालंकार-चूडामणी ॥
पद्यें प्राकृत सप्तसर्ग तिनशें त्रेपन्न चिंतामणी ॥
ऋग्वेदोत्तम आश्वलायन महा शाखा कवीची असे ॥
वस्तीचें स्थल बीड त्या तळवटीं गौरीपुरीं पै वसे ॥
जाणा कौशिक गोत्र त्यासि भजणें श्रीराघवा कारणें ॥
सीतेचें रचिलें स्वयंवर जना कल्याण हो मी ह्मणे ॥

स्वस्तिश्री नृप शालिवाहन शके नव्याणऊ पंधरा ॥ [१५९९]
अद्वीं पिंगल चैत्र शुद्ध नवमी श्लोकांक संख्या धरा ॥
तीषट्कें शिवनेत्र श्लोकरचना संपूर्ण झाली कथा ॥
वक्ता सत्कविराज विठ्ठल म्हणे दोषा क्षमा नान्यथा ॥

## उद्धवचिद्घनकृत

# भगवद्गीता.

( सवाया. )

पार्थ सखा म्हण[१] बोधितसे भगवंत पहा महॉ-भारत-युद्धीं
जें परमामृत मुक्तिस दायक आदि-नॉरायण-वाक्य त्रिशुद्धी ॥
व्यास पुराण कथी महॉ-भारत त्यांत गिता जगदंब अनादि
अध्यय हे अठरा अवलोकितॉं होइल मोक्ष-परायण बुद्धी § ॥ १ ॥
त्यास नमूं मुनि व्यास विशाल हि बुद्धि जया प्रति पारचि नाहीं
पद्म-प्रफुल्लित-आयत[२]-लोचन तोचि प्रकाश वियोग दशाही ॥
भारत तैलॅ प्रॅज्वालित त्यांत हि दीपक ज्ञान दिशा दश पाहीं
तो चि प्रकाश जगत्रय व्यापुनि अग्नि शशी रवि दीपत कांहीं ॥२॥
स्वर्ग-सुरद्रुम[३] घेउनि ये हरि ते वनिं राहुनियां वनमाळी
नाम जयाप्रति पारवि ज्यातिस तोत्र[४] नि वेत्र करीं त्रय काळीं ॥
कृष्ण कृपाघन ज्ञानॅ-प्रकाशक योग वरिष्ठ जगा प्रति पाळी
अमृत हें भगवंत चि दोहत तो नमुं माधव दुर्घट काळीं ‡ ॥ ३ ॥

---

१ म्हण=म्हणून. २ आयत=दीर्घ. ३ सुर-द्रुम=कल्पवृक्ष. ४ तोत्रः=चाबूक.

§ पहिले उपोद्घातात्मक नऊ श्लोक गीतेच्या सर्व पुस्तकांत नसतात ह्मणून ते येथें देतोंः—

पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयम्
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्ये महाभारतम्
अद्वैतामृत-वर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनीम् ।
अम्ब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भव-द्वेषिणीम् ॥ १ ॥
नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र ।
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयप्रदीपः ॥ २ ॥

‡ प्रपन्नपारिजाताय तोत्र-वेत्रैकपाणये । ज्ञान मुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः ॥ ३ ॥

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपाल-नन्दनः ।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥ ४ ॥
वसुदेव-सुतं देवं कंस-चाणूर-मर्दनं ।
देवकी-परमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥ ५ ॥

वेद वदे उपनीषद संस्मृति ते सुरभी[५] सुदुधा[६] श्रुति भोरें
दोहक गोपति गो विंद गोकुळिं गोपकुळीं यदुनंदन बारे ॥
वत्स बुभुक्षित पार्थ चि प्राशित आणि उरे पसरे जग सारें
तें परमामृत आदि गिता पहा अध्यय हे अठरा अविकारें ॥ ४ ॥
जो वसुदेव-सुत प्रभु देव समस्त हि ध्याति वसू वसुधेसी
घेउनियां सविदैत्यसमर्दन कंस अरी अणि चाणुर[७]द्वेषी ॥
देवकिला प र मा नं द जाणुनि विश्वगुरू हरि विश्वविलासी
कृष्ण मुकुंद मुरारि रमाधव श्रीमधुसूदन वंदन त्यासी ॥ ५ ॥
भीष्म अणी गुरु द्रोण थड्या जळ जैद्रथ कौरव सर्व कुमोदें[अ]
शल्य सुशीर[ब] कृप जळधार हि कर्णसवेळ[क] कुळांत प्रमादें ॥
श्रीगुरु पुत्र अणीक विकर्ण हि हे मगरे दुरियोधन भेदे
हे शफरी[८] नदि दुस्तर पांडव तारक श्रीहरि युद्ध-विनोदें ‡ ॥ ६ ॥
व्यास-गिरा सरसांत निघे महाभारत हें कमळा परि मानी
त्यांत गिता अतिगंध सुभाषित पर्व कथा बहु केसर पाणी ॥
सज्जन षट्पद आमोद[९] सेविति बोधक वेधक ऐकिति कानीं
तेकलिकल्मष[१०] नासुनि पावति शांति-सुखा प्रति श्रेय निदानीं ॥ ७ ॥
अंगिरसा[११] परि वाचक[१२] होइल गर्भ मुका षडशास्त्र हि वक्ता
पांगुळ धांवत मेरु चढे जशि सैर भिंतीवरि मुंगि पहाता ॥
पूर्ण कृपा तुझि होइल ज्यावर काय अशक्य तयासि पाहता
वंदन हें प र मा नं द माधव यादव रुक्मिणिच्या निजकांता † ॥ ८ ॥

---

५ सुरभी=कामधेनु. ६ सुदुघा=उत्तम दूध देणारी. ७ चाणूर=मल्ल विशेष. अ कुमोदें=कमळें. ब सुशीर=सुसर. क सवेळ=वेला (लाट) इनें युक्त. ८ शफरी=मत्स्यी. ९ आमोद=सुवास. १० कल्मष=मल. ११ अंगिरस=बृहस्पती. १२ वाचक=बोलका.

‡ भीष्म द्रोण-तटा जयद्रथ-जला गांधार-नीलोत्पला
शल्य-ग्राहवती कृपेण वहनी कर्णेन वेलाकुला ।
अश्वत्थाम-विकर्ण-घोरमकरा दुर्योधनावर्तिनी
सोत्तीर्णा खलु पाण्डवै रण-नदी कैवर्तकः केशवः ॥ ६ ॥
पाराशर्यवचः सरोजममलं गीतार्थ-गंधोत्कटम्
नानाख्यानककेसरं हरिकथा-संबोधनाबोधितम् ।
लोके सज्जनषट्पदैरहरहः पेपीयमानं मुदा
भूयाद्भारतपङ्कजं कलिमलप्रध्वंसि नः श्रेयसे ॥ ७ ॥

† मूकं करोति वाचालं पङ्गुं लंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्द माधवम् ॥ ८ ॥

जो प्रपितामह वेदविधी वरुणेंद्र हि रुद्र मरुद्गण सारे
स्तोत्र मुखें करि दिव्य स्तुती गित गात हि सांग च साम तसारे ॥
ध्यात ऋषी मुनि योगि हि पाहति नेणति कोणि सुरासुर बारे
तोचि सच्चिद्घन उद्धव वंदित देव दयाघन पूर्ण कृपा रे ॥ † ९ ॥

---

## अध्याय पहिला.

प्रश्न पुसे धृतराष्ट्र कुरूपति धर्म करी निज क्षेत्र दळाचे
कौरव ही अकरा दळ क्षोणि हि या कुरु क्षेत्रिंच वीर वळाचे ॥
एकवटोनि ‡ युयुत्सव मानुनि मामक[13] कौरव पांडव साचे
काय कसे करिती वद संजय या वरि तो वदतो निज वाचे ॥ १ ॥
पाहुनि पांडव-सैन्य-विभू दृढ राव सुयोधन जो गुढबुद्धि
श्रीगुरु द्रोण-रथा निकटीं मग येउनिया शिरिं पाउल वंदी ॥
जोडुनिया कर किंकर त्यापरि बोलत वाक्य परायण बुद्धी
तें तुजला कथुं गुह्य सविस्तर सावध बैसुनि ऐक त्रिशुद्धी ॥२ ॥
पाह म्हणे गुरुवर्य कृपानिधि पांडव-सैन्य-विभू रण-रंगी
रचियलें दळ नेथिल तेथ चि फार भयंकर युद्ध-प्रसंगी ॥
जो द्रुपदात्मज शिष्य तुझा गुढ सैन्य-पती तिकडे हरि-संगीं
युद्ध-विशारद[14] शुद्ध [15]मनीं + + बुद्धि मतांत हि श्रेष्ठ निसंगी ॥ ३ ॥
वीर तयादळिं धीर पराक्रमि भीम धनंजय या परि पाडे
काळ कृतांत हि सन्मुख पाहुनि साधिती जाउनि युद्धनिवाडे ॥
तो युयुधान विराट महारथ द्रूपद-पुत्र सभे तव चाडे
साह्य सुसैन्य तयादळिं आणिक सांगत आइक ते सुखाडें ॥ ४ ॥
आणिक त्या प्रति साह्य धरापति युद्धसभागति आइक आतां
तो धृष्टकेतु हि आणि चेकीतॉन काशिपती बळवीर्य पहातां ॥

---

† यं ब्रह्मा वरुणेन्द्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवै-
र्वेदैः सांगपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः ।
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो
यस्यान्तं न विदुः सुरासुरगणाः देवाय तस्मै नमः ॥ ९ ॥

‡ युयुत्सव=युद्धोल्लास. १३ मामक=माझे (पुत्र.) १४ विशारद=कुशल. १५ 'मनीं' या शब्दापुढील दोन अक्षरें आम्हांस उपलब्ध झालेल्या पोथींत नाहींत हें दाखविण्याकरितां दोन फुल्या घातल्या आहेत. पुढेंही जेथें जितकीं अक्षरें कमी असतील तेंथे तितक्या फुल्या घातल्या जातील.

भूप पुरुजित कुंतिवभोजाहि शैब्य महा बळि आमुचे॑ घाता
साह्य सुसैन्य यथा पर तें गुरु तूज निवेदिन वीर-विजोता ॥ ५ ॥
वीर युधामनु धीर पराक्रमि उत्तमवंशज सर्व बळानें
सादर संगरकाळ विलोकित सिद्ध उभे सम साह्य दळानें ॥
हा अभिमन्यु महारथि पांच हि द्रौपदिचे सुत मातृछळानें
सिद्ध उभे रथिं बैसुनि पाहति कामुक कामरती अबळानें ॥ ६ ॥
आयिक यावरि आपुलिये दळिं वीर महाबळि जे दळवाडे
श्रीगुरुमूर्ति तुला मि निवेदिन तीं परिसें विरनावें॑ निवाडें ॥
सैन्यपती नृपती मग संगति संगर काज करी पडि पाडें
संज्ञितें[17] सांगत मुख्य प्रसिद्ध चि हे द्विजवर्य तुं ऐक सुरवाडें[18] ॥ ७ ॥
तूं चि गुरुवॅर्य साह्य पुरस्सर भीष्म पुढें अणि कर्ण उभा हा
हा कृपया गुरु पाहु चिरंजिव हा समितिंजय दृष्टिस पाहा ॥
हा तव पुत्र अणीक विकर्ण हि चंड पराक्रमि भूरि॑ श्रवा हा
युद्ध युयुत्सव मानुनि वैभव सिद्ध उभे अरि-काननं[19]-दाहा ॥ ८ ॥
आणिक भूपति वीर महारथि तुच्छ जयां प्रति जीवित झालें
साह्य सखे अति माझे॑ मनोगति ते मज संगति निश्चित आले ॥
आयुध शस्त्र अखंड सुमांडित जे रणपंडित घालिति घाले
युद्ध विशारद सर्व हि सिद्ध चि क्रुद्ध विरुद्ध प्रबुद्ध निवाले ॥ ९ ॥
जे असमर्थ दळीं अमुचे विर भ्याड असंगर त्यांज प्रती
देउनियां धिर रक्षि महा विर भीष्म उभा पुढें॑ सैन्य-पती ॥
पांडव-सैन्य तया परि पूर्तिस रक्षित भीम सहर्ष-मती
सैन्यविभाग करूं अपुला म्हण रंचितसे बहु शीघ्र-गती ॥ १० ॥
भाग विभागुनि सैन्य स्थळोस्थळिं वीर महाबळि त्यांप्रति सांगे
सर्व मिळोनि करा तुम्हि रक्षण भीष्म पितामह सैन्य अपांगे ॥
अग्र विभागुनि सैन्यपती दश दीन + + + नियमित आंगे
या परिचा तव सूत सुयोधन बोलत हर्षसुखावत गांगे ॥ ११ ॥
वृद्ध पितामह तो नृपगौरव पाहुनियां रव सिंहपरी
हर्षसमुद्भव युद्ध-युयुत्सव मानुनि वैभव घोष करी ॥
पूर्णप्रताप सहस्र दहा रथि मारिन हा मनिं नेम धरी
वाजवि शंख निशंकपणें रणकर्कश घोर भया पसरी ॥ १२ ॥
वाद्य धडाडित यंत्र तडाडित शंख दणाणित नाद उठे

---

१६ विजात=उद्भूत. १७ संज्ञित=संक्षिप्त. १८ सुरवाडें=सुखानें. १९ कानन=वन.

भेरि[२०] भयंकर गोमुख उंबर शृंग अणी कहळा[२१] सदटे ॥
साह्य धरापति ते हित ये रिति वाद्य चि वाजति जे न तुटे
एकसरें उठला अति तुंबळ नाद जणूं अवकाश[२२] फुटे ॥ १३ ॥
या उपरी मग श्वेत रथीं हय श्वेत नियोजुनि सज्जुनि सेना
माधव पांडव एक रथीं महती सम आणिक कांहिं दिसेना ॥
शंख महा धरि हो उभया करिं सायुध सिद्ध उभे वदनेना
वाजविती निज शंख महा विर कोणि कुणा प्रति तेथ पुसेना ॥ १४ ॥
वाजवि पांचिं[२३]जिअन्य रमाधव अर्जुन वाजवि देवदत्तू[२४]
पौंड्र[२५] विदध्महि शंख भयंकर भीम बळें मग वाजवितू ॥
हे त्रय शंख दणाणित ते क्षणिं सात हि क्षोहिणि त्यांत कथूं
मुख्य महीवर शंख पुरस्सर ते हि परीकर ऐकसि तूं ॥ १५ ॥
नाम अनंत[२६] जया विजयो करिं घेउनि हर्षित वाजवि राजा
नाम युधिष्टिर धर्मपरायण घोष करी अरि-कंदन-काजा ॥
माद्रि-सुता सहदेव नकूळ हि शंख सुघोष[२७] करी घनगाजा
तो मणिपुष्पक[२८] घे सहदेव हि थोरलिवर वाजत बाजा ॥ १६ ॥
काशिपती अणि वीर महा रथि नाम शिखंडि जयासि पहा
धृषटद्युम्न हि शंख चि वाजवि गाजविता रणश्वास महा ॥
राव विराट विराटक वाजवि कर्कश तो पर सैन्य दहा
हो अपराजित वाजवि सात्यकि शंखरवाकुल होत अहा ॥ १७ ॥
द्रौपद-आदि-करोनि धरापति वाजविती निजशंख मुखें
द्रौपदिचे सुत पांच महा वळि ते स्फुरिती[२९] निज शंख सुखें ॥
तों अभिमन्यु महाभुज वाजवि शंख बळें हरिखें[३०]
घोष महा रण-कर्कश वाजत शंख पहा पृथके पृथके ॥ १८ ॥
भेरि सयानक शंख भयानक हो भय-दायक घोष असा
नाद सणाणित मेरु दणाणित तो रण मानित दाहि दिशा ॥
क ल्लोॅळ तुंबळ होत धरातळ तो नभ-मंडळ या परिसा
तो हृदयासि विदारुनि कौरव मानितसे मनिं योग कसा ॥ १९ ॥
युद्धॅ-व्यवस्थित पुत्र तुझे स्थित पाहुनि कौरव-सैनिक सारे

---

२० भेरी=नोबती. २१ कहला=नगारे. २२ अवकाश=आकाश. २३ पांचजिअन्य=पांचजन्य (कृष्णाच्या शंखाचें नांव) २४ देवदत्तू=देवदत्त (अर्जुनाच्या शंखाचें नांव) २५ पौंड्र-शंखविशेष भीमाचा. २६ अनंतविजय-धर्माचा. २७ सुघोष-नकुळाचा २८ मणिपुष्पक-सहदेवाच्या शंखाचें नांव. २९ स्फुरिती=वाजविती. ३० हरिखें=हर्षानें.

शस्त्र-सुयुक्त प्रयुक्त रणांगणिं हें अवलोकुनि दृष्टि उभारे ॥
अक्षयि [३१]गांडिव अक्षयि सारथि अक्षयि तो ध्वजिं मारुति थारे
घे उचलोनि करीं धनु-बाण हि अर्जुन बोलत है कसा रे ॥ २० ॥
हे हृषिकेश[३२] विशेष विनंति तुलागुनि माझि अनन्यपणें
आहे तुला शरणागत केशव हें सखया शतशा नमनें ॥
सैन्य-द्वया उभयांमधिं नेउनि स्यंदनें[३३] सुस्थिर त्वां करणें
संजय सांगत ऐक कुरुपति अर्जुन बोलत सख्यपणें ॥ २१ ॥
युद्धविरुद्ध प्रबुद्ध समस्त हि आप्त + + + भूप विदेशी
द्वेष धरोनि मनांत सुयोधन बंधु समेत उभा रिपुवेशीं ॥
या इतुक्यां सह भांडुं कसा तरि संशय हा मनिं जी हृषिकेशी
ज्यांसि करूं नये युद्ध ते सन्मुख सिद्ध उभे रणि होउनि द्वेषी ॥२२॥
पाहिन सर्व चि आजि हरी मसिं जे करूं इच्छिति युद्ध-सरी
या अठरा दिवसांत परीवद-शयाॅ उतरेल उरीं ॥
कौरव दुर्मद साह्य करीं जय इच्छुनियां मनिं हर्षभरी
कोण कसे सहसैन्य तरी निज दृष्टिस पाहिन या हि वरी ॥ २३ ॥
संजय सांगत या परि श्रीहरि जो हृषिकेशि गुढारिं[३४] वदे
भारतिं पांडव वीर धनंजय वंदित प्रार्थितसे विशदें ॥
तो पुरुषोत्तम पार्थ नरोत्तम आणि रथोत्तम सैन्यमधें
स्थापुनि आपण पाहत अर्जुन दोन्हि दळीं अपुलीं सुहृदें ॥ २४ ॥
भीष्म अणी गुरु द्रोण प्रमुख्य हि भूप कितीक स्वदेश-विदेशी
साह्य करोनि सुयोधन सन्मुख पाहुनि कौरव ते निकरेसीं ॥
बोलत विस्मय-मानस अर्जुन त्यादळिं यादळिं पाहे विशेषीं
तो अपुले अपणासचि पाहत आपण हो तसिं आपण द्वेषीं ॥ २५ ॥
पाहत पार्थ द्वयारण-क्षेत्रिं + कौरव पित्रैव्य[३५] गोत्रज ते
भीष्म पितामह द्रोण गुरू अणि मातुल शल्य सबांधव ते ॥
पुत्र सपौत्रें[३६] सखे निज मित्र विरोध विचित्र असा दिसते
आणिक पाहत दृष्टि उभारुनि सैनियँ[३७] वारुनि यापरते ॥ २६ ॥
तो ससरा[३८] नृप द्रौपद सर्वहि आप्त समस्त उभे दिसताहे
कुंति-सुतें अवलोकुनि सर्व हि मोहितमानस सद्गदता हे ॥

---

३१ गांडिव ( गांडीव )=अर्जुनाच्या धनुष्याचें नांव. ३२ हृषीकेश=हृषीक+ईश= इंद्रिय-स्वामी=जितेंद्रिय. ३३ स्यंदन=रथ. ३४ गुढार=रथाचा पुढचा भाग. ३५ पितृव्य= चुलता. ३६ पौत्र=नातु. ३७ सैनिय=सैन्य. ३८ ससरा=सासरा.

कोणि दुजें न दिसे चि तया प्रति सूह्रद या दळिं त्या दळिं पाहे
बंधुसमे दिनबंधुसि वंदुनि शंकित रंक[३९]परी वदताहे ॥ २७ ॥
घात कुळाप्रति होत अशी मनिं ये करूणा कृपया पर जाला
सद्गद कंठ हि कुंठित बोलत झेंडु[४०] च त्या प्रति दाटुनि आला ॥
कृष्ण कृपाघन श्रीमधुसूदन स्वोजन सर्व हि सैन्यॅ-द्वयाला
युद्धमिषें समसिद्ध रणीं तरि कारण श्रीहरि कुळॅक्षयाला ॥ २८ ॥
गात्र वहू शिणलें शरिरीं मम होति कळा पडताति पिळे
वाळत तोंड खडा रसने प्रति शुष्क पॉणी तयॉसी न मिळे ॥
पाह किं आंग हें थार्थर कांपत इंद्रिय दाहतसे अनळें[४१]
रोम उभारत कंठ + या तनु ताप तिन्ही दिसती स्वलिले ॥ २९ ॥
शक्ति अशी क्षिण झालि हरी करिं गांडिव हें उचलों न शकें
देहिं धडाडित अग्नि तया परि दाह अधीक चि हो भडके ॥
जीव सले कढवे न उठावत पाय गळोनि गती वसके
भ्रामत हें मन मोहित होउन भ्रांतिभ्रमें करूं काय कसें ॥ ३० ॥
हे जगदीश निमित्त दिसे मज हें विपरीत किं केशवराया !
काय ययांतुनि श्रेय निघे तरि व्यर्थ चि द्वेष धरूं मनिं वायां ॥
फार कठोर असा मग होउनि सांडुनि लौकिक सूह्रद-माया
मारूं यया स्वजनासि जनार्दन हे मुरु[४२]मर्दन वंदित पायां ॥ ३१ ॥
इच्छि च ना जय राज्यसुखादिक भोग भवीं विभवा न मनीं ॥
जीवित ही क्षणभंगुर जाणुनि कां विपरीत करूं करणी ॥
वैभव हें बहु मेळवुनी सुत्ह्रदांस विभागुनि देति जनीं ॥
त्यां प्रति मारुनि वैभव मेळवुं काय अधीक वदें वदनीं ॥ ३२ ॥
ज्यां करितां बहु राज्य-सुखादिक मेळवुनी व्यय सर्व करी ॥
ते चि उभे धनप्राण विसर्जुनि दुष्ट सुयोधन साह्यकरी ॥
त्यां प्राति मारुनि राज्य कसें करूं पाहिल कोण सुदृष्टिभरी ॥
जे इकडे तिकडे विर दीसाति आप्त च भासाति प्राणपरी ॥ ३३ ॥
दोहिं दळीं विर लक्षित अर्जुन तों चुलते गुरु आणिक आजा ॥
वैर परस्पर घेउं जयीं विर वीरॅश्रिनें परिणीत[४३] चिमाजा ॥
मातुळ सासुर पुत्र सपौत्र हि गोत्रज हे मिनले[४४] रण-काजा ॥
होइल निश्चय निक्षय सर्व हि जे मिनले नृप युद्ध-समाज ॥ ३४ ॥

---

३९ रंक=भिकारी. ४० झेंडु=तोंडापुढें फेंस येतो तो. ४१ अनळें=अग्नीनें. ४२ मुरु-मर्दन=मुरु-दैत्य-हंता. ४३ परिणीत=विवाहित. ४४ मिनले=मिळाले.

कौरव मारुनि राज्य मिळे अणि मारिन हे मनिं नाहिं च इच्छा ॥
कीं मरतों मि च त्यांजकरें जरि श्रीहरि होय तुझी अशि इच्छा ॥
हे धरणी तरि काय किती मन त्रीभुवनांत भुमींत स्वइच्छा ॥
हेतु उरे कवणा प्रति माधव भोगिल कोणँ त्रिलोक-चिकित्सा ॥ ३५ ॥
मारुनियां धृतराष्ट्र-सुता प्रति काय जनार्दन! लाभ असे ॥
जातिल हे करतील तसें फळ पावति आपुलें दैव-दशे ॥
श्रेय नसे अति पापच दारूण मी तरि हें करूं कर्म कसें ॥
सिद्धि नसे हरि युद्धिं कदापि हि बुद्धि विशारद होत नसे ॥ ३६ ॥
या धृतराष्ट्र-सुतास न मारुन बंधु सखे सुहृदे अमुचे ॥
सभ्य समर्थ सहाय्य च मानुनि स्वामि करूं अपुल्या चमुचे[४५] ॥
हे करूणाकर माधव स्वामति सांग तुला जि मनांत रूचे ॥
काय असे सुख कौरव मारुनि राज्य मला न रूचे न रूचे ॥ ३७ ॥
मूढमती दृढ पाप न जाणाति लोभ अहंमाति चित्तिं जयांचे ॥
घात कुळासि करीत कुळाधम मानित संत महर्षि तनाचे ॥
द्रोह करी निज मित्र सुखें जनिं शब्द कठोर वदे निज वाचे ॥
पाप असंमत आचरणें हरि योग्य नसे परि सांगत साचे ॥ ३८ ॥
हें न कळे सहसा हि रमाधव पाप-गिरी पडला अडवा ॥
यांतुनि निर्गम होय कसा तरि दाव उपाय मला बरवा ॥
हो कुळधर्म परंपर चालत तो चि कुरुक्षय अवघड बा ॥
पाहत पाहत दोष जनार्दन या गिरिच्या शिखरीं चढवा ॥ ३९ ॥
हा चि कुळक्षय सर्व करीं तरि जातिल ते कुळधर्म हि वांया ॥
कूळ बुडे कुळधर्म उडे मग येत अधर्म तयास मिळाया ॥
जो बचनाग चि खात मुखेंतरि गोड-मिषें मग जात मराया ॥
बांधुनि कंठिं शिळा दृढ त्या परि जात मनं जल-सिंधु तराया ॥ ४० ॥
हा चि अधर्म जयीं मरती शुर या रणिं दोहिं दळीं दिसताती ॥
यांच्यॉ कलत्रै[४६]-कुलस्त्रि घरोघरिं दोषिक होतिल काळ-गती ॥
[४७]वृष्णि-कुळांत वसंत तुं कृष्ण किं होइल + + + धर्म अती ॥
हा वरुणा हरि संकर होतसें यास्तव कुंठित माझि मती ॥ ४१ ॥
जो कुळ-घाताकि यापरिचा करि संकर वर्ण-कुळा बुडवी
रौरव दारुण त्या सह-पूर्वज नर्क महा पितरां घडवी ॥
आब्दिउनाब्दिक वार्षिक मासिक दशयुगादिक श्राद्ध-हनी

४५ चमुचे=सैन्याचे. ४६ कलत्र=पत्नी. ४७ वृष्णि=यादव.

नेदि च पिंड कधीं पितरां जळ लोपत पिंड-क्रिया अवघी ॥ ४२ ॥
दोष विशेष तया कुळ-घातकियास अशास कुलघ्न म्हणावा
कारण जो वरूणा शिवशंकर तो नर पाप-पुरूष गणावा ॥
जाति + स्वार्थ हि बूडविला अणि तो कुळधर्म हि नाहिं च ठावा
शाश्वत धर्म उलंघुनि सर्व हि फार अधर्म करीत उठावा ॥ ४३ ॥
सांडुनि लौकिक धर्म अणी कुळधर्म हि सांडुनि दे अनयासें
जातिस्वधर्म हि सांडुनियां भलते च अधर्म करीत प्रयासें ॥
तो करि वास महा नरकीं श्रम दुर्घट पावत पाप-प्रकाशें
हे मुरु-मर्दन ! कृष्ण ! जनार्दन ! सांग सविस्तर संशय नासे ॥ ४४ ॥
पाप महत्‌करणार असे अम्हि जातिकुळाधम नष्ट अधर्मी ॥
राज-सुखादिक लोभ चि मानुनि झालों प्रवर्तक संगर-कर्मी ॥
स्वजन मारुनि आठवणें कुळनिर्मुळवंश + + परधर्मी ॥
भ्रष्ट कुलस्त्रियाँ होतिल या वरि कोण प्रसिद्धि हि क्षत्रिय-धर्मी ॥ ४५ ॥
मी जंव या रथिं आहें अशस्त्र चि तोंवरि त्या धृतराष्ट्र-सुतानें ॥
घेउन शस्त्र करें शिर छेदुनि घेउन कां न वर्जाय[४८] सुखानें ॥
हा उपकार किमर्थ करी न च होइल क्षेमें[४९] मि जाइन प्राणें ॥
त्रासभरें अति श्वास हि टाकित व्याकुळता शरिरा प्रति वाणे ॥ ४६ ॥
संजय सांगत या परि अर्जुन बोलुनियां रथिं ते च घडी ॥
टाकुनियां शरचाप सगद्गद नेत्रिं च वाहत [५०]नीर-झडी ॥
मौन्य वसे भ्रमें भान नसे मन शोक-समुद्रिंचे ऐलें[५१] थडी ॥
विव्हळ होत धनंजय ते दळि बोधिल या वरि कृष्ण गडी ॥ ४७ ॥

---

## अध्याय २ रा.

सांगत संजय तेथ धनंजय व्याकुळ होय तये समयीं
अश्रु-जळें भरले स्थुळ नेत्र हि चित्तिं विषाद कृपा हृदयीं ॥
ऐकुनियां वचनें मधुसूदन सावध त्या करिताहे उपायीं
उद्धव चिद्घन संत-जना प्रति वीनवितो मतिशुद्ध सवायी ॥ १ ॥
श्री-यश-ज्ञान-विरक्ति-उदार जगत्रयिं एक असा भगवंत
बोधितसे म्हणतो अरे अर्जुन ही विषयी करूणा अनुचीत ॥
[५२]कश्मल आणिक कीर्तिस नाशक घालित नेउनियां नरकांत

---

४८ वजाय=जाय. ४९ क्षेम=कल्याण. ५० नीर=उदक. ५१ ऐल=आलीकडचो.
५२ कश्मल=मूर्च्छा.

जी हि अनावाडि ते दवडोनि वडील तुझे झगडां जयवंत ॥ २ ॥
हे परंतापन[53] अर्जुन तूं परि काय नपूंसकता धरिसी
हें तुज कांहिं बरें न दिसे परि व्यर्थचि आग्रह कां करिसी ॥
आद्यहि तूं बळॅश्रीयुत अंतर दुर्बळता अवलंबुन त्यासी
टाकुन हीन अरे अरिशार्दुळ[54] ऊठविला अरिबाणधनूसी ॥ ३ ॥
अर्जुन वीनवितो मधुसूदन पाय पुढें अवलोकुन द्यावे
ज्यास विरू[55] मनिं कल्पुनियां कसें बाण वरी हरि त्यांस वधावें ॥
भीष्म अज्ञा गुरु द्रोण असे रणभूमिस हे मिनले रिपुभावें
मेळवुनी बहु संपति श्रीपति यांप्रति निश्चित नित्य पुजावें ॥ ४ ॥
आजि गुरू अवध्यांस नमस्कॉर करुनियां करणें हरि भिक्षा
भक्षण तें परमोत्तम कीर्तिस दायक हें मन मानित शिक्षा ॥
सद्दढता धरली जिहिं अंतरिं राज्यसुखादिक-भोग अपेक्षा
ते गुरुच्या रथिं राहुन कोठुन भोगिन मी कसि भोग सुदक्षा ॥ ५ ॥
या वरि युद्ध करू न करूं मज दोहिं मधें हरि कांहिं कळेना
कीं जय ना तरि दुर्जय पावत संशय मानस तें निवळेना ॥
जाणतसे परि आवडिला मज जीवन आप्तहि अन्न मिळेना
ते चि उभे मजसन्मुख कौरव सांग कसी विरवृत्ति गळेना ॥ ६ ॥
माझें मि यांस कसा वधुं कृपणत्व-भ्रमें भ्रमली हरि बुद्धि
धर्म मला न कळे अपुला मुढचित्त नजाणतसे निजशुद्धी ॥
श्रेय तुं निश्चित सांग करीन+मी[56] करूणा-वरुणालय आधी
शिष्य तुझा शरणासि नुपेक्षिसि यावरि काय तें सद्गुरू बोधी ॥ ७ ॥
इंद्रियशोषक शोक मला शमता कवणें परि दीसत नाहीं
राज्य दुज्याविण भूतळिचें जरि देशिल ऋद्धिसि चाड न कांहीं ॥
गोत्रज मारुन इंद्रपदादिक ते अपदा नरकासम पाहीं
निश्चय देवकि-नंदन ! यादव ! माधव ! ते पदपंजक पाही ॥ ८ ॥
जो हृषिकीं[57] सकळा सकळा करि आकळ काळ कुतूहलमाया
त्या सगुणा प्रति वीनवि हे रिति आइक जी मति लोचनराया ॥
श्रीपति युद्ध नव्हे मजला इतुका निज हेतु निवेदुनि पाया
संजय सांगत राहे. उगा मग बोल हरीमुखिचे परिसाया ॥ ९ ॥

---

५३ परतापन=शत्रु-मर्दन. ५४ शार्दुल ( शार्दूल )=व्याघ्र. ५५ विरु=वीर ? ५६ "करीन" आणि "मी" या दोन शब्दांमधील एक ऱ्हस्व अक्षर कमी आहे. ५७ हृषिका ( हृषीका )=इंद्रियें.

त्या वरि तो हृषिकाधिप[५८] बोलतसे करुणाकर हास्यमुखें
दोहिं दळीं अति विव्हळ अर्जुन मारिन गोत्रज याहि सुखें ॥
त्यासि बुझावित[५९] जो न पवे बहुशा करितां हयमेध[६०]-मखें
तारक या भवसागरिंचा हरि वांचुनि आणिक कोण सखें ॥ १० ॥
देव म्हणे जळिं बुद्बुद[६१] लोपति नेणति त्या बहु शोक जनासी
कौरव हे मरती म्हणतों परि व्यर्थ चि शोक-जळीं बुडतोसी ॥
शीकवुं म्हणतो तुज जरि ते वदती धिषणाधिपते[६२] वदतोसी
जाइल तें सहसा तरि जाइल पंडित शोचित नाहिं तयासी ॥ ११ ॥
हे नृप आणिक मीं तुज देखिन आदि असो म्हण सत्य न मानी
सांप्रत ही आम्हि ते चि असूं परि देखसि तूं अपुल्या नयनांनीं ॥
या वरि हे अम्हि सर्व असे च असों निज जाणुनि घेइं निदानीं
नाश नसे सद्[६३]अव्यय[६४] वस्तुस व्यर्थ चि कष्टसि शोक करूनी ॥ १२ ॥
बाळपणा सरतां तरुणा मग वृद्ध हि होय जसा निज देहो
देहि[६५] नव्हे तिन्हि भेद कदाचन जीव जया म्हणती वळवा हो ॥
तेविं जरी घडती पडती वरि फार वृद्धपण आण नव्हे हो
सद्गुण जाणुनि मोह न पावति ते चि चिन्मय जो सुखलाहो ॥ १३ ॥
कां म्हणसी तरि इंद्रिय-वर्ग जयीं विषयामिषें त्यास मिळे
स्पर्श त्वचे प्रति उष्ण-सितादिक हें सुखदुःख जिवासकळे ॥
भोगिति भोग परी क्षणभंगुर येत अकल्पित आदळले
जाणुनि सोसिं सुखें नृप अर्जुन साक्षिपणें अणि ज्ञान-बळें ॥ १४ ॥
ज्या सुखदुःख समान सुमानस मानित नासि न कांहिं कदापी
हो विषयेंद्रिय-योग-वियोग हि त्या कधिं हर्ष अमर्ष[६६] न कल्पी ॥
हे पुरुष[६७] + भिपावत या निज मोक्षपदावर जाइल सोपी
त्या पुरुषासि म्हणे पुरुषोत्तम मीं हि ह्मणो नर तो अनुतापी ॥ १५ ॥
नश्वर[६८] ज्यास म्हणाल तया प्रति ईश्वर भाव कदापि दिसेना
शाश्वत जें सदब्रम्ह पुरातन नित्य नवें कधिं नाश असेना ॥
या उभयांसि बरें अवलोकित त्या हृदयीं कधिं शोक असेना
तत्व दिसे उघडें मग हा भवसांकडिमाजि कधीं गवसेना ॥ १६ ॥

---

५८ हृषिकाधिप=कृष्ण. ५९ बुझावित=समजावीत. ६० मेध=मख=यज्ञ. ६१ बुद्बुद=बुडबुडा. ६२ धिषणाधिप=धिषणा+अधिप=बुद्धि+स्वामी=कृष्ण. ६३ सद्=सत्=ज्यास अस्तित्व आहे तें. ६४ अव्यय=अविनाश. ६५ देही=आत्मा. ६६ अमर्ष=शोक. ६७ 'ष' आणि 'भि' यांचेमधील एक अक्षर कमी आहे. ६८ नश्वर=नाशवंत.

जेंअविनाश जगत्रय-व्यापक चाळक साक्षविलक्षण आहे
हाटक[69] जेविं नगीं पट तंतुंत दृश्य तसेच परब्रॅम्हि च पाहे ॥
ना तरि हें घट आणि मठीं नभ व्यापक कां जळबुद्‌बुद वाहे
शाश्वत त्यास विनाश करूं म्हण शक्त शिवादि विधी हरि नोहे ॥१७॥
हे क्षणभंगुर देह जसें जळ अंजळिंचें गळतां चि सरे
शाश्वत त्यांत शरीरिण जो परमात्मक रूपि सहसा न मरे ॥
भंग घटा नभ शाश्वत तेवि न नासत ब्रम्ह अपार अरे
या करितां उठ युद्ध करीं बहु सावध होवुनि शोक नको रे ॥ १८ ॥
नश्वर हें जग ईश्वर शाश्वत कोण तया वधिता वधवीता
कोणि अशास हि जाणतसे सकळा प्रति आपण संहरिता ॥
कोणि ह्मणे मरता हि तया उभया निज ज्ञान नसे पहाता
सांगतसे तुज तो चि पुन्हा हृदयीं धरिसी म्हण याकरितां ॥ १९ ॥
सर्व हि जन्मतसे जॉणतो पण आपण जन्मत नाहिं कदाही
आणि कदा हि मरणें नसे पहिलें तरि होउनि नाहिं असा ही ॥
याहुनि होइल हें न घडे अज शाश्वत सत्य पुरातन पाही
मारियल्या मरणें न मरे मग वध्य शरीर तया वधिल्या ही ॥ २० ॥
शाश्वत जो अविनाश अनामय अव्यय अद्वय जन्म नसे
जाणतया पुरुषासि कसा मग कोणिहि घातक तो न दिसे ॥
नातरि मारविता अणि कोणिहि हे नृप अर्जुन सांग असे
मुक्त जसा निज देह-पुरीं बसतो परि देहसमंध कसे ॥ २१ ॥
जेंवि नरें मळिना वॅसंना[70] प्रति सोडुन उत्तम अन्य धरावें
जीर्ण गृहा प्रति सांडुन उत्तम धाम विनिर्मुनि तेथ वसावें ॥
तेंवि जुने क्षिण देह विसर्जुन नूतन बालशरीर धरावें
देह मरे परि आपण शाश्वत जन्मत जन्म कदापि न पावे ॥ २२ ॥
या पुँरुषा[71] करिं शस्त्र हि घेउनि तोडुं ह्मणों तरि कांहिं तुटेना
जाळित जो चि जगा प्रति पावत तोहि तया अनु जाळुं शकेना ॥
अल्प जळीं विरवी धरणी परि अल्प तयासि कधीं भिजवीना
ऊडवितो जग प्राण समीर + तो[72] हि तया लव शोषुं शकेना ॥ २३ ॥
छेद्य नव्हे अणि दाह्य नव्हे बुडणार नव्हे अणि आटत नाहीं
नित्य असा अज अव्यय व्यापक थोर बहू अति लाहन पाहीं ॥

---

६९ हाटक=सोनें. ७० वसन=वस्त्र. ७१ पुरुष=आत्मा. ७२ "र" आणि "तो" यांमध्यें एक ऱ्हस्व अक्षर पाहिजे.

चंचळ हें जग निश्चळ हा निज निर्मळ यास श्रुतिस्मृति गाई ॥
शुद्ध सदोदित पूर्ण पुरातन रूप नसे गुण नाम कदा ही ॥ २४ ॥
पाहुं तया तरि व्यक्त[73] नव्हे अविकार अनामय[74] याचि परी ॥
देश न वेद पुराण-समुच्चय[75] बोलति सर्व हि या न सरी[76] ॥
जाणुनियां पुरुषासि असें मग होशिल तूं निजरूप जरी ॥
या वरि योग्य न होसि कदापि तुं वाहसि व्यर्थ चि शोक-सरी ॥ २५ ॥
या वरि नित्य किं जन्मतसे अथवा मरतो जहिं हा चि निजात्मा ॥
मानिसि हें जरि सत्य तुंवा करितां न करी मति शोक सुवर्मा ॥
कां म्हणसी तरि हे जळ-बुद्बुद[77] होउनि नासति तेंवि सुकर्मा ॥
आनुसरे जनुमरणास महाभुज[78] हें म्हण बाहुकनामा ॥ २६ ॥
जन्म जयासि तया पहतां न टळे मग कांहिं करी मरणें ॥
मृत्यु जयासि तयासि च जन्म असे बहुतां परि ओळखणें ॥
राहट माळ रिता भरुनी घट तो चि रिता पडतो भरणें ॥
आणि कधीं करवे न म्हणोनि तुं शोकपुरीसि वसेल झणें ॥ २७ ॥
शून्य मुळीं प्रसवे भुतपंचक इंद्रधनू गगनीं अवचित्तें
व्यक्त तशीं बुझें[79] मध्यें[80] च होत भुतें निधनीं निज निर्गुणजेते ॥
स्वानुभवें परॅब्रम्ह पुरातन नित्य नवी कळली खुण ज्यातें
हारपलें गगनीं जळें किं दुःख करी म्हण मूर्ख तयातें ॥ २८ ॥
दृश्य नव्हे रूप त्या अक्षया प्रति पाहति कोणिहि तमाशा
रीघ नव्हे चि परादिनिं[81] शब्द तया वचनें प्रतिपादिति[82] कैसा ॥
आणिक कोणिहि ऐकति त्या दशनींध्वनि[83] परियेसा
पाहाति बोलति ऐकतिही जरि कोणि न जाणति तथ्यपरेसा ॥ २९ ॥
सर्व हि देहि असे भरला परि वध्य नव्हे म्हणे[84] शाश्वत जाणें
हें भरतोत्तम सर्व भुतें मुळिचीं लटकीं बॉंधिजेतिल कोणें ॥
आणिक ही निज धर्म विचारिसि आइक तो बहु सावध करणें[85]
कांहिं करीं परि योग्य न होशिल शोक करूं शिणसील शिणानें ॥ ३० ॥
पाहासि तूं निज धर्म कतूतरि वाढिव होउन कीर्ति वरावी

---

७३ व्यक्त=दृश्य. ७४ अनामय=रोगरहित. ७५ समुच्चय=समूह. ७६ सरी=बरोबरी. ७७ बुद्बुद=बुडबुडा. ७८ महाभुज=हे महाबाहो. ७९ बुझ=जाण. ८० "जळ" शब्दापुढील दोन अक्षरें कमी आहेत. ८१ परादि=परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी हे चार वाणीचे प्रकार. ८२ प्रतिपादिति=वर्णिती. ८३ 'ध्वनि' शब्दापुढील चार अक्षरें कमी आहेत. ८४ ह्मण=ह्मणून. ८५ करणें=अंतःकरणानें.

आजि च काय तुला नवला परि लक्षण रीति किती शिकवावी ॥
शंकर जितुनियां करिसी किर किंकर भूकर कांपति केंवी
बाहुज[८६] त्या बहु उत्तम श्रेय असे समरांगणि वेत्ति स्वभावी ॥ ३१ ॥
क्षात्रिकुळीं करती सुकृतें बहु इच्छित युद्ध तया न पवीजे
दुर्लभ तें तुज लभ्य सुखें करसी किति आग्रह युद्ध न झुंजे ॥
जे उघडी त्रिदशालय[८७]-द्वार उदार सदा यश कीर्तन कीजे
शोकें[८८] वृथा करसील कपिध्वजे[८९] धीर धरीं वाढिव वोजे ॥ ३२ ॥
या वरि हा निज धर्म पुरातन संगर[९०]रूप तुझा न करीसी
तूं जरि जाण[९१] तरी अपकीर्तिस होउन पात्र जगीं उरतोसी ॥
भूभुज[९२] हे म्हणती बहु भ्याड भयाभित वांचविलें जिवितासी
बोल उरेल असा कुरुनंदन सर्व हि किल्बिषें[९३] आश्रय[९४] होसी ॥ ३३ ॥
बोलति हे जन लोक अकीर्ति सदा बळहीन धनंजय भ्याला
वीर नव्हे धड कोमल कंटक गर्व पराक्रम सर्व बुडाला ॥
वंद्य जगत्रयिं पूज्य सुरासुरिं वंदिति भूपति भीति जयाला
हेळसती मग त्याहुन उत्तम आतुडतां[९५] बरवें मरणाला ॥ ३४ ॥
केसरि-गर्जनें[९६] आइकतां भिति कुंजर मत्त समस्त हि राजे
तेचि तुतें म्हणती हिन अर्जुन भीऊनि येथ रणांत न झुंजे ॥
सर्व महारथि हेळसती तुज झांकुनियां मुख भोगासि लाजे
पावसि हे लघुता असतां बळ विक्रम ही सहसा बिनकाजें[९७] ॥ ३५ ॥
वीर नव्हे पुरता शुर ही नव्हें धीर नसे बळ कांहिं नसे
षंढ नराकृति पांडु-कुळीं कर-कंकण-कंचुकि घालितसे ॥
भीउनियां रणिं देउनि पाठि पळे अधमोत्तम हें चि असे
निंदिति विंधिति शब्दशरें हृदयांतरिं सोशिसि त्यांस कसे ॥ ३६ ॥
येथ जरी मरतां त्रिदशालयिं नांदसि होउनियां सुर-राजा
जिंतिसि तूं जरि भोगिसि मेदिनि[९८] कीति स्त्रिया सहसात हि भाजो[९९] ॥
आणि स्वधर्म हि होशिल रक्षक भोगित सर्व हि भूभुजलाजा
यास्तव ऊठ भला धरिं बाण-धनू करिं भांडण-निश्चय माझा ॥ ३७ ॥

---

८६ बाहुज=राजे. ८७ त्रिदशालय=स्वर्ग. ८८ या चरणांत दोन अक्षरें कमी आहेत. ८९ कपि-ध्वज=हे अर्जुना. ९० संगर=युद्ध. ९१ जाण=ज्ञाता. ९२ भूभुज=राजे. ९३ किल्बिष=पाप. ९४ आश्रय=स्थान. ९५ आतुडतां=पावतां. ९६ केसरी=सिंह. ९७ बिनकाजें=विनाकारण. काज=कार्य. ९८ मेदिनि=पृथ्वी. ९९ भाजा=भार्या. "य" ज्या ठिकाणीं मराठींत "ज" होतो. जसें, योग=जोग; कार्य=काज.

हो सुख यावरि दुःख घडो तरि अंतरि ज्या सम ही बिघडेना
लाभ अलाभ घडे सहज स्थितिनें म्हणं[10] हर्ष अमर्ष[1] पडेना ॥
यो जय नातरि दुर्जय या परि धीर कुळाचळसा[2] उपडेना
तूंहि असे रिति युद्ध करीं मग पाप कुठें तुजलागिं जडेना ॥ ३८ ॥
सांगितली तुज सांख्यमती[3] निज निर्गुण निष्क्रिय नीज निजात्मा
आणि स्वधर्म हि सांगितला अनुकूळ अवश्यक जो निजकर्मा ॥
दोहिंस ही आदिकारण बुद्धि च तो परिसें मति-योग[4] सुवर्मा
बुद्धिस मीसळतां सहजें सकळा सुटिजे दृढ-बंधन-वर्मा[5] ॥ ३९ ॥
आचरितां निज कर्म घडे क्रमसिद्ध समग्र हि सांग जयानें
न्युन्य कदाचित होय न जाणत दूषण आचरल्यानें ॥
भक्षण श्रीतुळशी पळती करितां बहु रोग फळें सुकृतानें
स्वल्प श्रमें बहु हा तरिजेल महा भवसिंधु-समंधुपदानें ॥ ४० ॥
तें चि तुं ऐकसि ही जरि एक करीं निज बुद्धि स्वभावस्वरूपीं
जो व्यवसायि परात्पर-निष्ठ तसा चि तुं होउनि हो अनुतापी ॥
जे बहु कामुक आचरती निगमासन अंतमनोरथ-पुष्पीं
अव्यवसायि तया म्हणिजे सुख किंचित पावत ना तें कदापी ॥ ४१ ॥
हे कुरुनंदन तो अविपश्चित[6] निश्चळ व्याकुळ दुश्चित चित्तें
वेद फळें वदला इह स्वर्ग-सुखादिक भोग अपेक्षित त्यातें ॥
बाळक निंब न घे म्हंण[7] माउलि साखर दाखविताहे तयातें
याहुनि थोर नसे म्हणती परि जाणति ना तें निजात्म-फळातें ॥ ४२ ॥
आणिक ही बहु संपति भोगुनि नित्य क्रिया बहुला[8] असती
काम-फळें इह स्वर्ग-सुखादिक जन्मुनि कर्म-गती मरती ॥
ते चि पुन्हा मग आचरती परमोत्तम इच्छुनि हे चि गती
सांडुनि वारिक तांदुळ आदर तूष[9] दिवानिशि पाखडती ॥ ४३॥
भोग भवीं[10] विभवादिक[11] संभ्रम या चि भ्रमें भ्रमलें मन ज्याचें
भोग तसे परमोत्तम भूषणभेद भुतीं करिं भाग्य तयाचें ॥
पापि तया म्हणतााति अकिंचनें[12] जो न भजे फळ स्वर्ग-क्रतूचें
या परि अल्प नसे चि समाधि हि आरतें[13] फार च पुष्पित[14] वाचे ॥ ४४ ॥

---

१०० ह्मण=ह्मणून. १ अमर्ष=राग. २ कुलाचल=मुख्य पर्वत. ३ सांख्य-मति=ज्ञानबुद्धि. ४ मति-योग=ज्ञानयोग. ५ वर्म=कवच. ६ अविपश्चित=मूर्ख. ७ ह्मण=ह्मणून. ८ बहुला=पुष्कळ. ९ तूष=कोंडा. १० भव=संसार. ११ विभव=ऐश्वर्य. १२ अकिंचन=दरिद्री. १३ आरत=आवड. १४ पुष्पित वाचा=कामुकजनास फल-प्राप्ति होईल असें अभिवचन देणारी वेद-वाणी.

वेद वदे त्रिगुणात्मक जें फळ अत्रें[१५] अमुत्रें[१६] समिश्रित जें
होउनि तूं त्रिगुणातित[१७] राहचि कल्पुं नको मनिं भान दुजें ॥
संग्रह आणिक रक्षण याहुनि शुद्ध गुणीं धरिं आवडि ओजे
या परिच्या परमार्थपरायण आत्मरूपीं रम धी[१८]सम सेजे ॥ ४५ ॥
घोटभरी उदकांत जों अर्थ पहा जळ-डोहिं हि तो चि असे
ताहन ज्या जितकी च तों प्राशिल आणिक ही भरलें उरलें से ॥
त्या परि वेद कधीं बहुतां बहु ब्रह्म पथा पथ येतिल तैसे
ब्रह्मपदीं अधिकार असे गुरुसंमत आचरिजे अनयासें ॥ ४६ ॥
या च निमित्त तुझा अधिकार विचारसि तूं तरि कर्म करावें
कर्म जयीं करसी तइं दे फळ त्या फळ हें तुष[१९] सक्त न व्हावें ॥
नाहसि तूं अधिकारि फळा प्रति जाणुनि हें जरि कर्म त्यजावें
तूं इतुकेनें[२०] न होसि अकर्म न वर्म बुझें कथिजेल स्वभावें ॥ ४७ ॥
कर्मिं च राहुनि कर्म करीं परि संग त्यजीं फळ हें धनुपाणी[२१]
होसिल तूं इतुकेन अकर्मण आइक आणिक ही शुभ वाणी ॥
कर्म घडे जरि सिद्धि असिद्धि तईं अनुहर्ष विषाद न दोन्ही
मानिसि त्यास म्हणों समयोग विचारिल[२२] त्यास सुखास न वाणी[२३] ॥ ४८ ॥
कर्म-फळीं बहु धरिती आवडि हीन तयाहुनि आन असेना
बुद्धिस मिश्रित कर्म समस्त हि योगरूपाहुनि श्रेष्ठ दिसेना ॥
कर्म असे जड बुद्धिस ये शरणागत तूं त्यजि संशय नाना
आइक मात धनंजय! अर्जुन! सांगत देवकिनंदन कान्हा ॥ ४९ ॥
बुद्धिसयुक्त तया म्हणिजे कधि लिप्त नव्हे सुकृता अणि पापा
या[२४]स्तव तूं हि तो चि अनुष्टानि राह नको करूं आळस बापा ॥
कर्म हि कृत्य पहा परि उत्तम दीसतसे मज हा बहु सोपा
आवडता तुज वीण नसे म्हण[२५] सांगतसें धरुनी अनुकंपा[२६] ॥ ५० ॥
कर्म करी परि कर्म-फळीं न धरी अनुराग असा फळ-त्यागी
बुद्धि-बळें परमोत्तम ज्ञान मनीषिण[२७] त्या म्हणती समयोगी ॥
आणिक जन्म-जरा-मरणादिक बंधन त्या न घडे जन-संगीं
अव्यय शुद्ध अनामय जें पद पावति तें विषयीं वितरागी[२८] ॥ ५१ ॥

---

१५ अत्र=एथें. १६ अमुत्र=परलोकीं. १७ त्रिगुणातित ( तीत )=त्रिगुण-रहित. १८ धी=बुद्धि. १९ तुष=कोंडा. २१ धनुपाणी (?) २२ विचारिल=विचार करील. २३ वाणी=कमताई. २४ या चरणांत एक अक्षर कमी आहे. २५ म्हण=म्हणून. २६ अनुकंपा=कृपा. २७ मनीषिण=शहाणा. २८ वितरागी ( वीतरागी )=अनासक्त.

कोण घडीस घडे समयोग असें जरि ऐकसि तरि ऐकें
जे समयीं ममतास्पद मोहक बुद्धि तरे उतरे असके ॥
देह मि हा अभिमान विसर्जुनें[२९] अर्जुन! चूकसि सर्व अशंके ॥
ते समयीं पहॉंतां तुज सार्थक काय अकारण जाणुनि शोकें ॥ ५२ ॥
बुद्धि तुझी श्रुति अर्थ विचारुनि सांडुनि लौकिक निश्चळ होतां ॥
मी परब्रम्ह समाधि च या परमात्मरूपीं दृढता स्थिर चित्ता ॥
लागॅ तईं विषयादिक नासति भेद भुतीं वठतां समचित्ता ॥
योग असा तरि पाळिसि निश्चित हें चि करीं सुख-साधन पार्था ॥ ५३ ॥
अर्जुन वीनवितो गुरु श्रीपाति! निश्चळ बुद्धिस कोण म्हणावा ॥
त्याच परी स्थितप्रज्ञ असें कवणा म्हणिजे बरवें[३०] समजावा ॥
राहतसे परि कवणें परि[३१] वर्तत संशय हा मनिचा निरसावा ॥
श्रांत बहु श्रमलों भवसागरिं सांपडला तव पाय-विसांवा ॥ ५४ ॥
टाकुनियां इह स्वर्ग-सुखादिक काम मनीं वसती तितुके ॥
आपण आपुलिया अवलोकुनि आत्मरूपीं परमात्म-सुखें ॥
तुष्ट सदोदित त्यास म्हणों मुनि याच सुखीं वसती हरिखें[३२] ॥
प्रज्ञप्रतिष्ठित[३३] दाखविलें रूप देव म्हणे बरवें स्वमुखें ॥ ५५ ॥
होत जरी बहु दुःख तरी पण किंचित मात्र उदासिन नोहे ॥
सौख्य अपार घडे परि ज्यामनिं हर्ष-स्पृहा[३४]दिक हेतु न राहे ॥
काम-विषाद-भयादिक-वर्जित आवरिलें मन दृश्य न पाहे ॥
त्यास म्हणों स्थितधी मुनि त्वां पुसिलें तरि आइक सावध तूं हें ॥ ५६ ॥
पुत्र सखे घर दार धनादिक यावरि स्नेह कदापि न बैसे ॥
जें अनुकूळ स्ववृत्तिस ये शुभ प्राप्त जरी तरि कांहिं न हर्षे
सर्व प्रतीकुळ तीं अशुभें भिनलीं निज वृत्तिस सर्व अशेषें ॥
निंदि च ना म्हण प्रज्ञप्रतिष्ठित त्यास असें कथिजे हृषिकेशें[३५] ॥ ५७ ॥
जेंवि प्रभा रवि अस्तुस[३६] घेउनि जाय तसें विषया करणें * ॥
घेउनि आत्मरूपीं निघतां उरला चि न भोगिजे तीं कवणें ॥
ज्या परि संहरती[३७] कमठें[३८] जाशीं पादकरादिक आवरणें ॥
त्या पुरुषा प्रति प्रज्ञप्रातिष्ठित जाण अवश्यक हें म्हणणें ॥ ५८ ॥

---

२९ विसर्जून=टाकून. ३० बरवें=चांगलें. ३१ परि=रीत. ३२ हरिखें=हर्षानें. ३३ प्रज्ञप्रतिष्ठित=स्थिर झाली आहे बुद्धि ज्याची असा. ३४ स्पृहा=इच्छा. ३५ हृषिकेश=हृषिका+ईश=इंद्रियजयी=कृष्ण. ३६ अस्तुस=अस्तास. * करणें=इंद्रियानें. (करणं साधकतमं क्षेत्रगात्रेंद्रियेषुच). ३७ संहरती=आंखडतात. ३८ कमठें=कांसवें.

जो उपवासि तया परमोत्तम गायन घेउनि काय करावें ॥
दृष्टि स्वरूप त्वचे निज आसन घ्रौंणें[39] सुवास विशीं न उठावें ॥
एक रसें[40] विण सर्व अकारण कारण मोक्ष जया प्रति भावे[41] ॥
तो[42] विषयासि तसा चि उदासिन पूर्णपणीं सरतातिभावें ॥ ५९ ॥
आत्मपदीं रत तो चि विपश्चितें[43] त्या पुरुषा म्हणिजेल[44] विवेकी ॥
काष्ठ मथोनि[45] निघे शिखि[46] तो मग जाळिल लावितां काष्ठें अनेकीं ॥
तेंवि सतासत[47]ज्ञान विचारुनि[48] शेषपदाप्रति तो अवलोकी ॥
त्या निज स्वानुभवें मन इंद्रिय शून्य करी नगें[49] कांचन[50] हें कीं ॥ ६० ॥
मत्पर[51] होउनि इंद्रियवर्ग समस्त हि वश्य करी अपणा ॥
संयमयुक्त तया ह्मणिजे निज आधिन वर्तवितो करणें[52]ां ॥
ध्यानीं मनीं वदनीं मम कीर्तन मद्रुप देखत सर्व जना ॥
आसित मद्रुप प्रष्मतिजे[53] हरि प्रज्ञप्रतिष्ठित त्यासि म्हणा ॥ ६१ ॥
ध्यात नसे अविनाश[54]-पदा प्रति ध्यान अहर्निशि ज्या विषयाचें ॥
संग तया विषयीं घडतां खवळे अधिकाधिक कामें[55] चि साचें ॥
इच्छित अर्थ नव्हे पुरता मग क्रोध उठे धुरकूट तमाचें ॥
तो अविवेक पुढें न करी अवलोक तुं आइक नांव तयाचें ॥ ६२ ॥
कार्य अकार्य तईं न सुचे भलतें च करी अति मोह असा ॥
शीकवितां गुरु शास्त्र न मानि च विभ्रम तो स्मृति-भ्रंशदशा ॥
भ्रंशें स्मृती तइ बुद्धि हि नाशत होउनि ठाकत जीव पिसीं[56] ॥
अंध चि मानसिं अंध कुपीं पडल्या वर पावत नाश तसा ॥ ६३ ॥
प्रश्न चतुर्थ हरी हर तो मन वश्य करी निज आत्मरितीनें ॥
इंद्रियवर्ग जरी विषयीं असतां रति[57] द्वेष हि कांहिं न जाणें ॥
भक्ति परायण आसि[58] तया परि सर्व सुखा वरि शांतिस बाणें ॥
पावुनि जाणिव[59] वर्ततसे सम जाण वृजीन[60] तुं या चि खुणेनें ॥ ६४ ॥
शांतिसि येसि तईं जननामरणादिक दुःख अपार हरी ॥
चित्त उदार परात्पर[61]-चिंतन तेथ चि बुद्धिहि धीर करी ॥

---

३९ घ्राण=नाक. ४० रस=गोडी. ४१ भावे=आवडे. ४२ या चरणांत एक अक्षर कमी आहे. ४३ विपश्चित=ज्ञानी. ४४ म्हणिजेल=ह्मणावा. ४५ मथोनि=घांसून. ४६ शिखि=विस्तव. ४७ सतासत ( सदसत् )=खरें खोटें. ४८ विचारुनि=विचार करून. ४९ नग=डागिना. ५० कांचन सोनें. ५१ मत्पर=मदासक्त. ५२ करण=इंद्रिय. ५३ प्रष्मतीजे (?) ५४ अविनाश-पद=मोक्षपद. ५५ काम=इच्छा. ५६ पिसा=वेडा. ५७ रति=प्रीति. ५८ आसि (?) ५९ जाणिव=ज्ञान. ६० वृजीन ( वृजिन )=पाप. ६१ परात्पर=परमेश्वर.

निश्चय[६२] हा मग ते चि ते˘ होउन बुद्धि हि पणा न धरी ॥
सिंधुसि सैंधव जेंवि मिळे तरि येइल गोष्ट वदों दुसरी ॥ ६५ ॥
ज्यास नसे मन वश्य अवश्य तया प्रति बुद्धि हि जाण असेना ॥
तो चि अयुक्त[६३] न इंद्रिय आधिन स्वस्वरूपात्मक ध्यान घडेना ॥
ध्यान जया न घडे गुरुसेवन जीवन शांति तया गवसेना ॥
शांति नसे मग मोक्षसुखा अधिकार कधीं न दिसे मति-हीना ॥ ६६ ॥
नावरणें करणें[६४] विषयीं मन त्याच सवें भवतें बहु धांवे ॥
लंपट होउनियां भटके सुटका चि नसे भ्रम दुर्घट पावे ॥
बुद्धि हरे अवघी अवघी उडिदांत बिजातिस काय पहावें ॥
सागरिं नाविक वीण [६५]तरी [६६]समिरीं सुटली भलतीथ वहावे ॥ ६७ ॥
यास्तव जो करि हे कुरुनंदन निग्रह इंद्रिय-सर्व-कळा ॥
नेमुनियां विषयीं मन पूर्वक बुद्धि रमे स्वरूपीं अचळा ॥
तूज कळों म्हण[६७] शोधुनियां गुज[६८] युक्ति जुन्या कथिल्या समुळा ॥
प्रज्ञप्रतिष्ठित दाखविलें रूप पाह करातळिंचा अवळा ॥ ६८ ॥
ज्ञाननिशींत भुतें विषयी जन सुप्त तईं मुनि जागति ऐसे ॥
इंद्रियनिग्रह जे करिती निज बुद्धिस आत्म-पदीं जडले से ॥
जागति सर्व भुतें मुनि नेणाति हे सहजा निशि त्यां प्रति भासे ॥
जे निशाचर हि नेणाति भानुस आणि दिवाचर रात्रिस जैसे ॥ ६९ ॥
हे विषयीं जन आणि मुनीजन भोगाविशीं समसे दिसती ॥
अंतर काय असे तरि आइक दोन्हि हि पावति कोण गतीं
या इकडे भरती सरतां पण सर्व जळें उदधी मिळताती
संत तसे निज शांतिस पावत आणि अहर्निशि कां मरती ॥ ७० ॥
टाकुनि काम समस्त मनींहुनि निस्पृह वर्ततसे मुनि जो कां
यत्न[६९] कदा न करी विषयार्थ चि मौन धरी भय येशाचि धोका ॥
निर्ममता निरहंकृति निर्मुळ पूर्णपणें असकाचि अशंका ॥
दैव-वशें अनुकूल स्विकारित शांति सुखासनिं तो अवलोका ॥ ७१ ॥
या परि ब्रह्मस्थिति दृढ बाणत आयकिली कुरुनंदन! कानीं ॥
इंद्रिय-अर्थ मिळे करणा[७०] परि बद्ध नव्हे सहसा विषयांनीं ॥

---

६२ या चरणांत दोन अक्षरें कमी आहेत. ६३ अयुक्त=योगरहित. ६४ करणें=इंद्रियें. ६५ तरी=नौका. ६६ समिर=वारा. ६७ म्हण=म्हणून. ६८ गुज=गुह्य. ६९ या चरणांत एक अक्षर कमी आहे. ७० करण=इंद्रिय.

देह-पुरींत घडीभर तो नसतो जंव देह पडे अवसानीं ॥
ब्रह्मपरायण तो परब्रह्मचि साकँरसेंदु[७१] कडू ह्मणि मानी ॥ ७२ ॥

द्वितीयोऽध्यायः समाप्तः

---

## अध्याय ३ रा.

अर्जून वीनवितोहें असें मत निश्चित मानतसे मज आतां ॥
कर्म तयाहुनि बुद्धि विशेष तुवां कथिलें बरवें यदुनाथा ॥
हे असतां तरि ऊठवल्या करिं घे धनु जोडुनि वोढुनि कुंता ॥
हिंसक कर्म करी अति घोर नियोजसि वैर्य उगाचि अनंता ॥ १ ॥
ज्ञान घडीभरि कर्म घडीभरि सांगसि निश्चित गोष्टिस देवा ! ॥
तेंवि[७२] च चाळवितोसि तथ्य चि बोलसि हें न कळे अनुभावा ॥
सावध होउनि मोक्ष वरी मज येक विवेक असा समजावा ॥
तें परिसोनि मि आधिक भ्रांत भ्रमें भुललों न पवें चि विसांवा ॥ २ ॥
देव म्हणे सुख-प्राप्तिस म्यां च पुरातन हे कथिले पथ दोन्ही ॥
या जनिं जो अधिकार वसे निज आचरिजे मग तो च तयानीं ॥
इंद्रियनिग्रह ध्यानउपक्रम आत्मरिती मज पावति ज्ञानी ॥
जे करिती निज कर्म अवश्यक योगि हि पावति मी च निदानीं ॥ ३ ॥
निर्मळ चित्त नव्हे जंव तोंवरि जाण अवश्यक कर्म करावें ॥
कर्म जईं न करी च अकर्मण जाणसि तूं कधिं त्यास न व्हावें ॥
जे परि अस्त नव्हे उदयाविण कीं गमनाविण अस्त न पावे ॥
कर्म जरी फळ ज्ञान न दावि च मोक्ष सुसिद्धिस कोठुनि पावे ॥ ४ ॥
कर्म जरी न करीं म्हणतो तरि कर्म विना क्षण राहुं सकेना ॥
टाकुन कर्म नव्हे चि अकर्मण जें करणें व्यवसाय क्रमेना ॥
पाहति लोचन ऐकति कान करादिक सर्व क्रिया करि नाना ॥
आधिन जे प्रकृतीस स्वभाविक ते तें अवश्यक तीस सुटेना ॥ ५ ॥
शुद्ध नसे निजध्यान विणें करि आठव नित्य सदा विषयांचा ॥
आणिक ही गृहिं तों करणें करकर्मक्रिया चरणादिक वाचा ॥
वावरतें मन बाहिर रोधन दाखवितो जनिं मी नियमाचा ॥
झांकुन लोचन आसन घालून दांभिक जाणवि वेष तयाचा ॥ ६ ॥
इंद्रियें कर्म सुखें करिती परि जो मन नेमित आत्मस्वरूपीं ॥
जें करिती क्रियमाण करादिक तें अवघें परब्रम्हिं समर्पी ॥

---

७१ साकरसेंदु (?) ७२ ह्या चरणांत एक अक्षर कमी आहे.

जाणुनियां सहजस्थितिचें निज कर्म करी फलहेतु न कल्पी ॥
दांभिक त्याहुनि हा परमोत्तम योगविशेषणसक्त स्वरूपीं ॥ ७ ॥
टाकिशि कर्म तयाहुनि आधिक नीयत कर्म करीं धनुपाणी[७३] ॥
तें तुज भाग विशेशिल ते कशि जाण उपेक्षिसि तूं श्रुतिवाणी[७४] ॥
सर्व हि कर्म चि सोडून देशिल तैं भुकताहन त्यांत च आणी ॥
देह चि जाइल मोक्ष अकर्मण कोण प्रसिद्धिल निश्चित हानी ॥ ८ ॥
कर्म करीं तुज यज्ञनिमित्य असें वदलों तरि आइक आतां ॥
यज्ञ च विष्णु इती वदते श्रुति त्याविण बंध जना प्रति पार्था ॥
विष्णु मिषें मज आपण होइल चूकउनीं भवताप अघाता ॥
सांडुनियां फळ संग सुखें निज आचर टाकुनि सर्व अहंता ॥ ९ ॥
ये विषयीं सृजिलें जग तैं सहयज्ञ प्रजापति सांगत धाता ॥
हा चि तुम्हां निज धर्म क्रतूरूप[७५] [७६]देव-तरू-फळ होइल दाता ॥
इच्छित तें प्रसवेल अशी सुरधेनु उभी स्वतसिद्ध समस्तां ॥
सांडुनि काय करा उतरा भव कोण गती न कळे मज आतां ॥ १० ॥
वायु रवी शशि सोम असे सुर तुष्टति सर्व हि यज्ञविभागें ॥
भोजविती जन त्यां अनुमोदन चिंतित पुरवितात निजांगें ॥
भावत[७७] प्रीत परस्पर सांकडि कांहिं नुरे निज कर्म प्रसंगें ॥
अंतर निर्मळ होइल पुण्य पिके पुढिलां प्रति देख हि लागे ॥ ११ ॥
भावित यज्ञमुखें सुर देतिल सर्व हि इच्छित भोग जरी ॥
ते[७८] चि पुन्हा द्विज अग्नि न हवी ममते निज स्वार्थ धरी ॥
जो सुरपाळक विश्वविभावन क्षोभत सर्व हि भोग हरी ॥
चोर जसा करिं सांपडला कुटतील तया परि दंड करी ॥ १२ ॥
तोषुनियां सुर सर्व हि संपति मागितली भजकां प्रति देती ॥
ते[७९] करि यज्ञसमर्पण ब्राह्मणअग्निमुखें जगदीश्वरतृप्ती ॥
दोषविवर्जित शेष उरे मग जेविती घेउनि स्त्रीसुत पंक्ती ॥
भोगिति पाप सदां सुर भूसुर[८०] वंचुनि आपण रांधुन खाती ॥ १३ ॥
वर्णुन हे हरि आद्य कथा मग सांगतसे जग-चक्र कसें ॥
अन्न तयास्तव शोणित[८१] शुक्लित[८२] मीळत पावत भूतदशे ॥

---

७३ धनुपाणी=हे धनुर्धरा: ७४ श्रुतिवाणी=वेद-वचन. ७५ क्रतू ( क्रतु )=यज्ञ. ७६ देवतरू ( तरु )=कल्पवृक्ष. ७७ भावत=आवडते; मानवते. ७८ या चरणांत दोन अक्षरें कमी आहेत. ७९ ते=ती ( संपति ) ८० भूसुर=भूदेव ( ब्राह्मण ) ८१ शोणित=रक्त. ८२ शुक्लित=रेत.

मेघ पडे तरि अन्न हि जन्मत [८३]तो [८४]वरषे सुरयज्ञ वसे ॥
यज्ञसमुद्भव[८५] कर्मक्रियेस्तव ज्यास क्रतू म्हणिजेत असे ॥ १४ ॥
कर्मविधी वहिली निगमें तरि ब्रह्म तया म्हणिजे निगमातें ॥
वेद हि तेथुन उद्भवती मुळ अक्षर[८६] तें अभिधान तयाचें ॥
अक्षर ब्रह्म समुद्भव विश्व दिसे बुझ ब्रह्म चि सर्वगतातें ॥
यास्तव अर्जुन जाणसि कीं रूप यज्ञ अखंडित नित्य क्रियेतें ॥ १५ ॥
कर्म दमार्थ करी तरि हे जलवृष्टि करी बहु अन्न भुतातें ॥
चक्र पुरातन हें भंवतें अनुवर्तति जाण तया परिज्ञातें ॥
इंद्रियसौख्यनिमित्य च वर्तति अर्पिति अन्नव अग्निद्विजातें ॥
जीवित जन्मुनि निर्फळ निर्फळ भोगिति ते बहु पाप तयातें ॥ १६ ॥
म[८७]निव जे निज आत्मरती भगवत्पर कर्म करीती ॥
तृप्त सदां निज आत्मसुखें रति स्वानुभवें रचिले डुलताती ॥
आत्मपणें सम तुष्ट अहर्निशि भोगविती ममता न धरीती ॥
कार्य नसे उरलें अणु त्यां प्रति जन्मति नाचि कदा न मरेती ॥ १७ ॥
त्या पुरुषें करितां निज कर्म हि ब्रह्मस्वरूपक कृत्य असेना ॥
आ[८८]णि जरी न करी दूषण भूषण पाहत कांहिं दिसेना ॥
कां ह्मणिजे तरि तो निरहंकृति ज्या न विधी अवधी अडकेना ॥
सर्व भुतें अविनाश विलोकुनि आश्रय यास्तव मोक्ष धरीना ॥ १८ ॥
यास्तव तूं फळसंगविवर्जित नित्य निमित्य सुखें अचरें ॥
तें निज कर्मक बद्ध न होशिल संग समस्त सुखें विसरे ॥
जो निरहंकृति होउनियां स्थिर इंद्रियज्ञानसुखें विचरे ॥
या परि पावन ब्रह्मपदीं परमोत्तम सद्गति त्या चि नरे ॥ १९ ॥
कर्मफळें कल अंतर शुद्ध जरी निज ज्ञान चढे शुभ हाता ॥
जाण तरी निज कर्म अवश्यक त्याग नव्हे जनकादि महंता ॥
आपण पाहुनियां पर पा[८९]रें जशी मग सांगड वाहत माथां ॥
त्या वरि आणिक ही जन ये उतरोनि तसें करिं कर्म चि पार्था ॥ २० ॥
श्रेष्ठ सुधी विधि आचरती तरि पाहुनि वर्तति हे जन सारे ॥
कां तरि तो पथ मानुनि चालसि अर्जुन[९०] तूं जरिं त्या च विचारें ॥

---

८३ तो=मेघ ८४ वरषे=वर्षे (वृष्टि करितो). ८५ समुद्भव= उत्पत्ति. ८६ अक्षर=अविनाश. ८७ या चरणांत तीन अक्षरें कमी आहेत. ८८ या चरणांत दोन अक्षरें कमी आहेत. ८९ पार=तीर. ९० अर्जुन=हे अर्जुना.

देखिसि दाविसि धर्मपरायण आन[११] जगीं न दिसे तुजसारें[१२] ॥
वृद्धपरंपरस्थापक आइक होशिल आग्रह येथ नको रे ॥ २१ ॥
जाणसि अर्जुन मी पुरुषोत्तम आणिक थार नसे त्रयलोकीं ॥
सर्व हि हें जग म्यां स्रजिलें[१३] मज अर्पित कर्म समस्त हि ये कीं ॥
काय उणें मज श्री मज आधिन हे सुर पाइक[१४] इच्छित हे कीं ॥
[१५]पोळुनि विधान हि कर्मज होउन बद्धक जीवित झांकी ॥ २२ ॥
मी हि कदाचित पूर्ण म्हणोनि च कर्म जरी न करीं अळसानें ॥
लोक तसे परि आधि च आळशि आश्रय त्या वरि होइल यानें ॥
मी करितों तरि हे करिती गिळि[१६] अग्नि धरी गिरि[१७] जो किं नखानें ॥
तें हि नव्हे परि कर्म च टाकुन जारण चोर पहा विधि मानें ॥ २३ ॥
कर्म स्वभाविक मी न करीं तरि सर्व हि लोक तसे करिताती ॥
तेन[१८] प्रजा मलिना[१९] मग होतिल [१००]वर्णकुळाचरणा न धरीती ॥
संकरवर्ण[१] तया म्हणिजे जनि लोपति धर्म पुरातन रीती ॥
हें करणें मन येइल यास्तव आचरतों जनसंग्रहरीती ॥ २४ ॥
कर्मफळीं धरि आस जसा करि कर्म अगत्य च कर्मठ जानें ॥
हे भरतोत्तम! ते चि परी करि मुक्त स्वभाविक कोडिस वाने ॥
आस फळीं न धरी निरहंकृति काय प्रयोजन त्या करण्यानें ॥
देखत देखत आचरती जनसंग्रह कारण वर्तन तेणें ॥ २५ ॥
कर्मफळीं बहु आदर सादर त्या प्रति आपण कर्म कथावें ॥
ज्ञान तया कथिलें तरि निश्चय येऊन बुद्धिस सिद्धि न पावे ॥
ज्ञान नसे धड कर्म नसे धड यापरिचे जड[२] कां श्रमवावे ॥
सुज्ञ तयांनि हि यज्ञ सुलक्षण दीक्षित होउनियां अचरावे ॥ २६ ॥
प्राकृत कर्मगुणें क्रियमाण तसीं करणें[३] निज वर्तति कर्मीं ॥
नेणुनि हें अहंकार वसे नसतां चि म्हणे करितों सकळा मी ॥
बुद्धिहिना प्रति कोण करी उपदेश तया म्हण कर्म च नेमी ॥
सज्जन आपण आचरतो पण मुक्त कसा कथिजेल सुवर्मीं ॥ २७ ॥
तत्त्व जया कळलें गुणकर्म विचारुनि[४] आत्मपणें अपणा ॥
जाणतसे निज निर्गुण अक्रिय पूर्ण परात्पर आत्मखुणा ॥

---

११ आन=अन्य (दुसरें.) १२ तुजसारें=तुझ्यासारखें. १३ स्रजिलें=निर्मिलें. १४ पाइक=चाकर. १५ या चरणांत दोन अक्षरें कमी आहेत. १६ गिळि याचा कर्ता मी. १७ गिरि=गोवर्धन पर्वत. १८ तेन=तेणेंकरून. १९ मलिना=पापी. १०० वर्ण=जाति, रंग. १ संकरवर्ण=वर्णसंकर=जातींची मिसळ. २ जड=मूढ. ३ करण=इंद्रिय. ४ विचारुनी=विचार करून.

हा प्रकृतीगुणकर्मविभाग असें समजे विषयीं करणां[5] ॥
वर्तवितो न धरी च अहंकृति अर्जुन! तो मुनिराज म्हणा ॥ २८ ॥
जे प्रकृतीगुण सत्वरजस्तम कर्म न जाणुनि कर्म करीती ॥
नेणति निर्ष्क्रिय[6] आत्मपणा मुढ मंदमती अभिमान धरीती ॥
त्या प्रति सत्पुरुषीं न कधीं कथिजे अशि हे निज पूर्णप्रतीती[7] ॥
बद्ध तया दृढ कर्म च स्थापुन चालुन ये सुविचारणरीती ॥ २९ ॥
तूं हि तया परि कर्म करीं पण सर्व हि अर्पुनियां मजलागीं ॥
जें करिसी करिं तें उचितादिक कर्म सुखें अभिमान चि त्यागीं ॥
निर्ममता फळसंगविवर्जित मत्पर होऊनियां अनुरागी[8] ॥
सांडुनि शोक सुखें करिल संगर[9] [10]विषी भय मानिशि अंगीं ॥ ३० ॥
हें मत मानुनि उत्तम संभ्रम आवडि नित्य अनुष्ठिल जो कां ॥
[11]दायक दुःख असें न मनीं [12]मानि दुर्गम ही न मनीं च अशंका[13] ॥
ते भवसांकडि सोडविती आणि आपण ही सुटती भवशोका ॥
भक्ति पुरःसर आचरतो अणि येथ रतो[14] [15]म्हण दाखवि लोकां ॥ ३१ ॥
कर्म किजे परमात्मअराधन अर्पण ही करि जेथ तयातें ॥
हें मत निंदिति नाचरती अविधी चरती अभिमान बळातें ॥
सर्व हि कर्म चि ब्रह्म न जाणति मूढमती चळले निज चित्तें ॥
आपण तो बुडतो बुडि घेउनि जाणत अज्ञ जना अपणातें ॥ ३२ ॥
प्राचिन कर्म स्वभाव हि प्राकृत[16] योग अवश्यक ज्यासि जसा ॥
त्यासि तसा अधिकार पुरातन ज्ञानि हि चेष्टतसे[17] सरिसा ॥
कां म्हणिजे तरि सर्वगुणात्मक ऊमटला गुणरूप ठसा ॥
प्राकृत[18] हे जन कर्म गुणोद्भव निग्रह[19] केंवि घडे सहसा ॥ ३३ ॥
आइक घातक मोक्षपथीं पहिला रिपु हर्ष अमर्ष[20] दुजा ॥
इंद्रियवर्ग[21] जईविषयीं[22] मिळती [23]तईं येक उठे विरजा ॥
आणि प्रतीकुळ येर हि तेथ चि लावितये अविचारध्वजा ॥
प्राकृत हे जन यास कधीं वश नोहति यास्तव कर्म भजा ॥ ३४ ॥

---

५ करण=इंद्रिय. ६ निष्क्रिय=क्रियारहित. ७ प्रतीती=खातरी. ८ अनुरागी=अनुराग म्ह० प्रेम आहे ज्याला तो. ९ संगर–युद्ध. १० येथें दोन अक्षरें कमी आहेत. ११ दायक दुःख=दुःख दायक ( २४ वे सवाईतील "संकरवर्ण" यावरची टीप पहा) १२ मनि ( नी )=मानितो. १३ अशंका=शंका. १४ रतो=रमो. १५ म्हण=म्हणून. १६ प्राकृत=स्वाभाविक; प्रकृति (स्वभाव) संबंधीं. १७ चेष्टतसे=वागत असे. १८ प्राकृत= यज्ञ. १९ निग्रह=निश्चय. २० अमर्ष=राग, द्वेष. २१ वर्ण=समूह. २२ जईविषयीं=ज्या विषयांत. २३ तईं=त्यांत.

जें प्रकृतीपरें[24] कर्म पुरातन वर्णविभाग विभागुन वेदें ॥
स्थापियलें करिजे तें अगत्य चि श्रेयसुखादिक जोडुनियां दे ॥
आचरतां परधर्म न ये जरि स्वप्न परीगृहिं जागृति नांदे ॥
मृत बरॉ निज धर्मरता परधर्मरता पडती भवद्वंद्वें ॥ ३५ ॥
अर्जुन वीनवितो हरि ये विषयीं मज संशय वारुनि सांगें ॥
पाप घडे परधर्मरता तरि दाटुनि कां नर तेथ चि लागे ॥
जाणुनियां पथ कूपथ हा परि आवघडी पडिल्या वरि भंगे ॥
दुःख न इच्छित त्यास बळें भटकावित नेउनि कोण विजांगें ॥३६॥
देव म्हणे पुसिलें तरि आइक जो रजसंभव काम म्हणावा ॥
आणि दुजा [25] अरि जाण तेंदानुज[26] क्रोध हि दुर्जन दुष्ट गणावा ॥
या उभयां न पुरे भुवनत्रय दुर्घट मानवराक्षसदेवां ॥
ते अति पातकि घोर भयानक घातक सात्विक लोक वदे वा ॥ ३७ ॥
वन्हि अगोधर धूर निघे मळ सांडुनि सोज्वळ दर्पण पाहा ॥
उल्ब[27] तया विण गर्भ नसे कणभूस समागम लाग तसा हा ॥
तंदुळ तूर्ष[28] विना न घडे जड शुक्तिपुटें[29] विण मौक्तिकलाहा[30] ॥
तेंवि च हें जग आंवरिलें[31] मुळिंहूनि कसे चुकतील अहाहा[32] ॥ ३८ ॥
इंधनें[33] जों जों पडे अधिकाधिक वन्हि धडाडितसे प्रबळें ॥
इंद्रपदादिक पाउनि काम नव्हे पुरता पुढती खवळे ॥
हा रिपु ज्ञानिजना करि अज्ञ धनंजय! आवरितो स्वबळें ॥
जेंवि धुळी भरली बुबुळें मग रात्र दिवा कशि त्यास कळे ॥ ३९ ॥
बुद्धि सुखासन आसन हें मन इंद्रियवाहक काम वसे हो ॥
हिंडतसे बहु तें विषयीं तव त्या विण आणिक गोड नसे हो ॥
सौख्य कधीं कधिं दुःख हि भोगित शोक विना अन[34] लाभ नसे हो ॥
ज्ञान बुडे अभिमान चढे करि मोह जना अविचारेंपिसें[35] हो ॥ ४० ॥
यास्तव [36]हा जंव मोह न पाववि तों करिं इंद्रियनेम विरेशा[37] ॥
लावुनिया भगवद्भजनीं मन बुद्धिस चिंतुनि ठेविं परेशा ॥
जी प्रतिकूळ सदां स्वहिता प्रति पापरूपी भरली बहु आशा ॥

---

२४ प्रकृतीपर=स्वाभाविक. २५ अरि=शत्रु. २६ तदानुज=त्याचा (काम) धाकटा भाऊ. २७ उल्ब=नाळ; मूल उपजतें त्या वेळीं त्याचे सभोंवती असणारें वेष्टण. २८ तूष=कोंडा. २९ शुक्ति-पुट=शिंपीचें पूड. ३० मौक्तिक-लाहा=मोत्याचा लाभ. ३१ आंवरिलें=वेष्टिलें. ३२ अहाहा=खेदोद्गार; हाय हाय. ३३ इंधन=सर्पण. ३४ अन=आन (अन्य). ३५ पिसें=वेड. ३६ हा=काम. ३७ विरेशा (वीरेशा)=वीर-श्रेष्ठा.

तीं करणें[38] जहि[39] जीं करिती अपणा च बरोबरि ज्ञानप्रकाशा ॥ ४१ ॥
इंद्रियनेम कसा करिसी तरि ये परि ज्ञानविवेक विचारीं[40] ॥
देह तयाहुनि उत्तम हीं करणें करिती क्रियमाण शरीरीं ॥
याहुनि चाळक श्रेष्ठ दिसे मन निश्चय बुद्धि तयाहुनि भारी ॥
बुद्धिस घातक जो निज आत्मरूपीं निजरूपें च तूं अवधारीं ॥ ४१ ॥
या परि बुद्धिस जो पर[41] जाणुनि आत्मरूपीं करि स्थीर मनातें ॥
मूरडुनी मन उन्मन आपण स्वानुभवामृत सेउनि मातें ॥
हे भरतोत्तम! या भजनें जहि[42] शत्रु तुझा मुळ काम रूपातें ॥
होशिल तूं सुखि हें निज गूज[43] तुतें कथिलें प्रिय तूं बहु मातें ॥ ४३ ॥

---

## अध्याय ४ था.

जो जलसेन रमावर श्रीगुरु चिद्घन अद्वय श्रीभगवंतू ॥
तो भरतोत्तम अर्जुन त्या प्रति बोधितसे करुणेन अनंतू ॥
हा निज अव्यय योग विवस्वत[1] शीकविला मुळिं म्यां च निवांतू ॥
तो मनुतें शिकवी मनु तो हि अनुष्ठुनि शिष्य करी रविनातू[2] ॥ १ ॥
आणिक क्षत्रिकुळीं बहु भूपति पावति पावन या निज योगीं ॥
हे परतापन[3] हा चि परंपर मार्ग पुढें लपला जन संगीं ॥
जेंवि धना धरणीं पुरती कधिं वृद्धि जधीं निज भाग्यप्रसंगीं ॥
नेणति ते सुत नासु तसा पथ गुप्त तुझा कथिला तुजलागीं ॥ २ ॥
तूं मज भक्त तसा निज आत्म जसा अपणा प्रिय आपण वाटे ॥
आजि तुतें गुज[4] सांगितलें जन लागति आणिक त्याच सुवाटे ॥
उत्तम आवड ती असमाय[5] जिवीं अशि मात कथूं आणि कोठें ॥
या वचनें परिसोनि महद्भुत अर्जुन-मानसिं विस्मय वाटे ॥ ३ ॥
पार्थ म्हणे हरि अर्थ तुझ्या विपरीत मला गमतो वचनाचा ॥
तूं तरि देवकिच्या उदरीं यदुवंशकुळीं दिससी परवांचा ॥
नेणति पूर्वज हि अमुचे कथि कश्यपसृष्टि सुभानु[6] तधींचा ॥
तो उपदेशुनि सोडविला घडता वचनार्थ कसा वद साचा ॥ ४ ॥
सृष्टि जधीं रचिली तधिं होउनि[7] तुझे अमुचे बहु जन्म असे कीं ॥

---

३८ करणें=इंद्रियें. ३९ जहि=स्वाधीन ठेव. ४० विचारीं=विचार कर. ४१ पर=श्रेष्ठ. ४२ जहि=मार ( हन् धातूच्या आज्ञार्थाचें द्वितीय पुरुषाचें एक वचन ). ४३ गूज=गुह्य.
१ विवस्वत=सूर्य. २ रविनातू=ईक्ष्वाकु ( रवीचा पुत्र मनु ह्याचा पुत्र ) ३ परतापन=शत्रुनाशक. ४ गुज=गुह्य. ५ असमाय=न राहे. ६ सुभानु=सूर्य. ७ तधिं होउनि=तेव्हां पासून.

होउनि यांत ह्मणे मधुसूदन मीं स्मरितों चि हि ते बहु ते ची ॥
कां म्हणशी तरि साक्षप्रकृतिस[8] यास्तव बुद्धि कदा न भुलो ची ॥
तूं तिस आधिन जीव अविद्यक भ्रंश मना स्थिर बुद्धि नव्हे चि ॥ ५ ॥
मी परमेश्वर जन्मक्षयातित[9] शाश्वत सर्व भुतांसि नियंता ॥
त्या स्वरूपें प्रकृतीस अधिष्ठुनि आवतरें अवतार स्वसत्ता ॥
कल्पित तूं जशि सर्व भुतीं घडमोडत त्या परि तूंहि अंनता ॥
तो नग[10]भाव असद्रुप[11] सद्रुप[12] कारण तो मज हेम[13] पहातां ॥ ६ ॥
कां धरिसी अवतार असें पुससी तरि आइक त्या चि स्वभावा ॥
धर्म लपे अवघा अणि वाढत पाप अधर्म करीत उठावा ॥
भार बहू धरणीतळ आणि रसातळ एक चि कर्दम[14] व्हावा ॥
ते समयीं अपुलें प्रगटीं रूप आइकतां सुरभूसुर[15]धांवा ॥ ७ ॥
मी अवतार धरीं घरटीं कर होउनि साधुजना धरिं आधीं ॥
दुष्कृतवोढववाडव[16] होउनि भस्म करीं सह मूळ कुबुद्धी ॥
धर्मपदच्युत त्यांवरि छत्र धरीं छळसंघ[17] उपाधि निषेधीं ॥
या करितां मज काळ रिकामठ[18] नाहिं युगायुगिं जाण त्रिशुद्धी ॥ ८ ॥
जन्मक्षयादिक कर्म भुतां परि जाणत वर्म प्रकाशत माझे ॥
जन्मक्षयातित मी परमेश्वर तें चि भुतांशिरिं संचित ओझें ॥
कालिय मर्दुनियां वणवा गिळि अक्रियता मज यावरि साजे ॥
तत्व कळे उघडे नुघडे भव पांडव त्या मग देह समाजे ॥ ९ ॥
मन्मथ होउनिया मजला भजला शिव लाभ जे तो अन नाहीं ॥
जो विषयीं अदला विटला भवभेद नसे भयशोक कदाही ॥
बोधबळें रिपु क्रोध वधी विधि[19] आचरणें मन निर्मळ पाहीं ॥
फार तपे शुभ ज्ञानसमुद्भव ये मज माजि सुखा लवलाहीं ॥ १० ॥
मानवलोक मला शरणागत ज्यांसि जसा उपजे निज भावो ॥
वर्तविती सकळांस तयेपरि मी सहजें अवघ्यांस हि लावो ॥
सर्वभुतीं मजला भजती मिहि सर्व रूपें मग त्यास भजे हो ॥
दर्पणिं[20]चें मुख मुख्य मुखापरि मी जगदर्पण सांगत देवो ॥ ११ ॥
सृष्टिस हे सुर श्रेष्ठ तयांप्रति जे फळ नेच्छुनियां भजताती ॥

---

८ प्रकृति=माया. ९ अतित (अतीत)=राहित. १० नगभाव=दागिन्याची स्थिति. ११ असद्रुप=खोटें स्वरूप. १२ सद्रुप=खरें स्वरूप. १३ हेम=सोनें. १४ कर्दम=चिखल. १५ भूसूर=ब्राम्हण. १६ वाडव=अग्नि. १७ छळसंघ=कपटसमूह. १८ रिकामठ=रिकामा. १९ विधि=ब्रह्मा. २० दर्पण=आरसा.

ते चि फळा मग सिद्धिस पावति सार्थक जे निज कर्म करीती ॥
या नरलोकिं असा व्यवहार नसे अनुकर्म विना निषकृती ॥
तें चि मदर्पण तें निज ज्ञान सुखें मज पावत मोक्ष चि गती ॥ १२ ॥
च्यारिहि [२१]वर्ण मियां सृजिले गुणामिश्रित वांटुनि कर्मविभागें ॥
सत्य च हें परि मी करतां नव्हें तें अकृतत्व कसें म्हणु सांगें ॥
हेतु निमित्य जसा जग चेष्टवि सूर्य तया उठवी निज अंगें ॥
ते परि निष्क्रिय अव्यय दिव्य रूपासि तुं ओळख सज्जनसंगें ॥ १३ ॥
नेणुनियां मज वाटतसे बहु कर्म मला पॉहतां च उडे ॥
मी हि करीं जग देखतसें परि कर्म[२२]स्पृहा मजला न घडे ॥
कर्म मला तम ते जन नांदत अंतर यापरिचे उघडें ॥
जाणतसे निज निश्चयपूर्वक बंधन कर्म तया न घडे ॥ १४ ॥
जाणुनि निष्क्रियता करिं कर्म जसे **जनका**दिक पूर्वरिती ॥
आणिक ही बहु साधक फार युगायुगिं कर्म च आचरिती ॥
कां म्हणसी तरि निर्मळतेस्तव बुद्धिस निश्चय याच रिती ॥
तूं हि करीं निज कर्म अधीं मग देखिं तुझ्या जन ही तरतीं ॥ १५ ॥
तूं करिसी जरि त्यापरिचे जन चालति तत्वविदां[२३]सि विचारीं ॥
कर्म अकर्मण काय कसें [२४]कवि येथ हि मोह न पावति भारी ॥
जाणुनि आचर ते समयीं क्षण लागति ना सुख जें न संसारीं ॥
सांगतसें तुज तें च निधी आधिं बुद्धि करीं स्थिर या च विचारीं ॥१६॥
कर्म तया म्हणिजे विधि वेद विचारुनि तत्त्व चि आचरिजे ॥
आचरतां निरहंकृति कर्म अपूर्वक हें वरवें समजे ॥
दूषक जे जन निंद्य निषेधक कर्म तया अभिधान बुझे ॥
कर्मगती [२५]बुझें कोण्हि हि नेणति [२६]गॅहिन यास्तव हें सहजे ॥ १७ ॥
कर्म करी परमात्मअराधन तें चि अकर्म दिसे निज कर्मीं ॥
कर्म तरी उपजे अणठाहुन तें विलसे अवघें परब्रम्हीं ॥
पाहिल तो मनुजाकृति ईश्वर भिन्न दिसे परि कुंडल हेमीं ॥
योगि हि तो करिं सर्व हि कर्म तयाहुन श्रेष्ठ नसे कथितों मी ॥ १८ ॥
वेदविधी बहि वर्तत सर्व हि त्यागितसे परि कामफळाशा ॥
भर्जित बी नुगवे कवणें परि पेरुनि संचलिया हि विरेशा ॥
ज्ञान[२७]हुताशन पेटवुनी करि दग्ध वना बहु कर्म अशेषा ॥

---

२१ वर्ण=जाति. २२ स्पृहा—इच्छा. २३ तत्वविद=तत्वज्ञ. २४ कवि =ज्ञाता. २५ बुझ=जाण. २६ गाहन=कठिण. २७ हुताशन=अग्नि.

पंडित पंडित त्या म्हणती जिंहिं जाणितलें मज पूर्ण परेशीं[२८] ॥१९॥
कर्म करी फळआस त्यजी निरहंकृतिनें सुखदुःख निवारी ॥
संग्रह आणिक रक्षण [२९]यांतित तृप्त सदा स्वसुखें अविकारी ॥
कर्म अकर्मण येथ निराश्रित बद्ध नव्हे कधिं कर्म विकारी ॥
कर्म करी तरिं तो करिता नव्हे वर्म बुझें पुढती अवधारीं ॥ २० ॥
निर्गतसर्वफळां[३०]स तया पुरुषास म्हणे मुनि **व्यास** निरासी[३१] ॥
दाखविना मन बुद्धिस भ्रामविना अणुमात्र कदा विषयासी ॥
मी मज हें सुतदा[३२]रिपरिग्रह भास नसे सहजें च उदासी ॥
कर्म करी मग केवळ शारिर बाधि च ना सुखदुःख तयासी ॥ २२ ॥
प्राप्त जयासि अयाचित इच्छित स्वल्प बहू परि तुष्ट तयानें ॥
साहतसे सित उष्णसितादिक हर्ष अमर्षण[३३] द्वंद्व[३४] समानें ॥
सर्व भुतीं समता अवलोकुनि सिद्धि असिद्धि अशा स्वसुखानें ॥
कर्म करीपरि बद्ध नव्हे कधिं वर्णविशेष न आचरल्यानें ॥ २२ ॥
का[३५]मे फळीं न धरीं गतसंग अहंकृतिपासुनि होउनि मुक्त ॥
चित्त सदा परब्रह्मविचारण कारण राहतसे मजयुक्त ॥
यज्ञस्वरूपक मी च मला करि अर्पण निर्मुनि कर्म समस्त ॥
तें न उरे च तथा सखे[३६]! यापरि ब्रह्मपरायण नित्य विरक्त ॥ २३ ॥
ब्रह्मपरायणकर्म हि ब्रम्ह चि अर्पण तें परब्रम्हिं च होतें ॥
ब्रम्हहुताशन ब्रम्ह हवी हविशेष हि ब्रम्ह च ब्रम्ह क्रिया ते ॥
सिंधुजळें जळ मेघनद्याजळ जाउनि मीळति त्या जलधी तें ॥
या परि कर्म समस्त हि ब्रम्ह अनूभव येत समा धिषणा[३७] ते ॥ २४ ॥
देव सुरेशर माधिप याप्रति ब्राह्मण मानुनियां यजिताती ॥
अग्नि हि भिन्न घृतादिक भिन्न अहंकार तांत्पुन कर्म करीती ॥
तें फळ पाहुनि जन्मुनियां मरती तरि ते चि तें आचरताती ॥
येक असा अणि येक करी परब्रह्म हुताशनि यज्ञसमाप्ति ॥ २५ ॥
सांडुनियां विषयां सकळां सहजे मग संयम[३८]वन्हि म्हणे ॥
श्रोत्रत्वचानयनारसनादिक प्राणक्रतू[३९] हवि जो करणें ॥
एक असा अणि येक अहर्निशि इंद्रियवन्हिस पेटवणें ॥

---

२८ परेश=पर+ईश. २९ यातित=यां विरहित. ३० निर्गतसर्वफळ=त्यक्त सर्वफळ. ३१ निरासी=आशारहित. ३२ दारा=स्त्री. ३३ अमर्षण=क्रोध. ३४ द्वंद्व=जोडी. ३५ काम=इच्छा. ३६ सख=हे मित्रा. ३७ धिषणा=बुद्धि. ३८ संयमवन्हि=इंद्रियदमनाग्नि. ३९ क्रतु=यज्ञ.

त्यांत हवी विषयावृतिव्यावृति यज्ञ असे विधिनें करणें ॥ २६ ॥
आणिक ही परि यज्ञ तुं आइक इंद्रियप्राणसकर्म तयासी ॥
नेमुनियां मन ध्यानबळें वॉहवी च हवी समयोगहुताशीं ॥
ज्ञानघृतें वरि सिंपित दीपत वाढतसे मग काय न ग्रासी ॥
यज्ञ सरे करणें हि सरे मग आपण पोहविलें अपणासी ॥ २७ ॥
दान करी धन पात्र विलोकुनि द्रव्यक्रतू म्हणजेत तयातें ॥
आणि पुजा तप अध्वर दंडन देह करी बहु फार तपातें ॥
योगक्रतू करि चित्तनिरोधन पाउनियां स्वसमाधिसुखातें ॥
पाठ श्रुतिस्मृति नाम अवर्तन आचरती किति वाक्यमुखांतें[४०] ॥ २८ ॥
प्राण अपान हवी करि रेचकें[४१] प्राण अपान भरी पुरकें[४२] ॥
कुंभकें[४३] दोन्हि विरोधुनियां करि प्राणनिरोधगती तवकें ॥
रेचिसकार हकार पुरीवरि कुंभक व्यंजन जान निकें ॥
या परि प्राणनियामपरायण हा जपयज्ञ नव्हे लटिकें ॥ २९ ॥
आणिक जिंतुनियां अहरासि विचारुनियां स्थळ आसन ठेवी ॥
प्राणि च प्राण हवी[४४] करि शोधन कुंडलनीस प्रसुप्त बठावी ॥
त्या अनळीं[४५] हवि बुद्धिमनादिक प्राणक्रतू म्हणिजेत स्वभावी ॥
द्वादश यज्ञ असे कळल्यावरि त्यासि नसे कलिकल्मष[४६]गोवी[४७] ॥ ३० ॥
यज्ञ करोनि उरे हविशेष तें निर्मळ अन्न सुधा[४८] कुरुराया ॥
सेविल तो विलयाइल किल्बिष जीवित तें न वजाईलें[४९] वांया ॥
त्या उपजे निज ज्ञान सनातन ब्रह्मपदा प्रति येत मिळाया ॥
आणि अयज्ञ शिळा इहलोक न स्वर्ग हि व्यर्थ मरे उपजाया ॥ ३१ ॥
यापरिचे बहु यज्ञ विधी वदला आतिविस्तर यज्ञ मुखें ॥
ते तरि सर्व हि वाङ्मनकायिक कर्मज्ञ हे सहसा न चुके ॥
ब्रह्मस्वरूपक कर्मनिरूपण सांगितलें तुज तें हि निकें ॥
होय असें निज ज्ञान पुरातन जो भवबंध निहो न मुकें ॥ ३२ ॥
द्रव्यमया यजनें सुर याजिति ते फळ देति सकाम तयांतें ॥
तेथ कदा न चुके भवबंधन संसृति[५०] मागति[५१] मागति होते ॥
हे परतापन त्याहुनि श्रेष्ठ विशेषितसे तुज ज्ञानमखातें ॥

---

४० मख=यज्ञ. ४१ रेचक=योगशास्त्रप्रसिद्ध विधि (वायु रिचविणें) ४२ पूरक=वायु भरणें. ४३ कुंभक=वायु सांठविणें. ४४ हवी=होमी. ४५ अनल=अग्नि. ४६ कल्मष=मळ. ४७ गोवी=? ४८ सुधा=अमृत. ४९ व जाईल=जाईल. ५० संसृति=संसार. ५१ मागति मागति=पुन:पुन:

सर्व फळें करि त्या सह कर्म जळे शुभ अशुभ होमित तेथें ॥ ३३ ॥
तें निज ज्ञान कसे [५२] तरि पावसि साधन त्यास परीस उपावा ॥
आत्म अनात्मविवेक विचारुनियां अपरोक्षें [५३] स्वयें निज ठेवा ॥
देखसि त्यां प्रति जाउनियां करिं दंडवत प्रणिप्रात सुसेवा ॥
त्यांसि पुसें भवबंध कसा सुटतो कथिती तुजलागिं च देवा ॥ ३४ ॥
होउनियां निज ज्ञान न पावसि मोह असा मग बंधुवधाचा ॥
आणि भुतें विविधें जरि भासति आत्मरुपीं क्षण देखसि याचा ॥
मी तुज देखिल सर्व हि ईश्वर भाव जसा दृढ होय मनाचा ॥
स्वानुभवें डुलशी अरे पांडव होउनि राहसि रासि सुखाचा ॥ ३५ ॥
तूं म्हणसी जरि यास वधीन असें मग पाप तरे न कसें ॥
पापि वधोनि मि होईन पापि च संशय हा बहुसाल असे ॥
ज्ञान तरी निज हात चढे मग सत्वर स्वात्मसुखें अनयासें ॥
मुक्त पदीं सुखरूप विराजिसि हें निज गूज तुला कथिलेंसे ॥ ३६ ॥
जेपरिचे समिधा घृत इंधन जाळुनि भस्म करी अनळ ॥
ते परि ज्ञानहुताशन जाळुनि कर्म हि भस्म करी सकळ ॥
तेथ उरे हविता हवि दैवत दावितसे सुखदुःखफळ ॥
येथ समस्तहि ब्रह्मस्वरूपकरा हे चिता अनु भस्म मळ ॥ ३७ ॥
आणिक याहुनि उत्तम योग नसे न दिसे बहुसाल विचारी ॥
हे तरि कां जरि ज्ञान न साधित तेथ विते अवघे भवहारी ॥
तें गुरुपूर्णकृपेविण सिद्ध नव्हे गुरुगुह्य असें अवधारीं ॥
तो गुरु ज्यास कृपा करितो निज सिद्धिस ते समयीं अधिकारी ॥ ३८ ॥
आवडि जो धरि सद्गुरुचे पार्दे ज्ञान तयास घेऊ अनयासें ॥
आवडि तो धरि जो हवि इंद्रियनिग्रहतां वितरागें [५४] हुताशें ॥
भक्तिविरक्तिस ऐक्य घडे तयिं ब्रह्म चढे परब्रह्म प्रकाशे ॥
ते चि घडी निज शांतिस पावति बोलियला हरि विश्व विलासे ॥ ३९ ॥
ज्यासि गुरूपार्दे प्रेम नसे तरि ज्ञानविसीं [५५] बहु मूढ तयातें ॥
संशय फार उगा उठतो भवभ्रांति परी मन सैर [५६] वहातें ॥
त्यास नसे इहलोक न स्वर्ग हि पावत नेणासि कोण गती तो ॥
येउनि व्यर्थ चि देह मरे परि स्वप्निं हि नेणत स्वर्गसुखा तो ॥ ४० ॥
जाणुनि कर्म करी विधिपूर्वक जें परब्रह्मिं समर्पितसे ॥

---

५२ कसे परि=कोणत्या रीतीनें. ५३ अपरोक्ष=साक्षात्. ५४ वितराग ( वीतराग )= गतकाम. ५५ ज्ञानविसीं=ज्ञानाविषयीं. ५६ सैर ( सैरावैरा )=चोहोंकडे.

छेदित ज्ञान समस्त हि संशय येथ कदा अनमान नसे ॥
आत्मपरायण कर्म कधीं न बाँधी वडवानळि शीत जसें ॥
आइक **पांडव यादव** बोलत आणिक ही येथ सांगतसे ॥ ४१ ॥
जन्म जया अति मूढ मति स्वयें व्यापुनियां हृदयांत चि राहे ॥
काय कसें करूं भ्रम असा करि नाव तया परि संशय पाहे ॥
ज्ञान करीं तरवार धरीं समयोगवळें अवलोकुनि राहें ॥
भारतभूषण[५७]! कां बससी उठ त्यास वधीं दृढ एकचि घायें * ॥ ४२ ॥

---

५७ भारतभूषण=भरतकुलालंकार ( हे अर्जुना )

* **पुढील चार पृष्ठांवर आंकडे व कवीचें नांव हीं चुकून भलतींच पडलीं आहेत, तर तेवढीं शुद्ध करून मग वाचावीं अशी आमची आमच्या प्रिय वाचकांस प्रार्थना आहे.**

# गीता [ अध्याय ५ वा. ]

यावरि **अर्जुन** पूसतसे हरि सर्व हि कर्म समर्पुनि ज्ञानी ॥
या अंसिनें वाधि संशय सांगसि आणि पुन्हा करिं कर्म निदानीं ॥
या उभयांतुन एक कथीं मज उत्तम कोण जें तें चि मि मानीं ॥
तें चि सुखें अचरोनि सुटेन तुझ्या वचनें भवसांकेडिहानी ॥ १ ॥
**देव** ह्मणे तुज संशय जो निज बंधुवधार्थ मनीं भरला ॥
तो निरसो म्हण ज्ञान तुतें उपदेशुनि **ईश्वर** दाखविला ॥
साधन ज्ञान निमित्त स्वकर्म प्रतिष्ठुनि कर्म चि **ब्रह्म** तुला ॥
सांगितलें तरि निश्चयपूर्वक जाणुनि आचर कर्म भला ॥ २ ॥
कां तरि जो निज कर्म अनुष्ठुनि सर्व हि अर्पितसे भगवंतीं ॥
कर्मफळीं निरहंकृति होउनि द्वेष न कांक्षि न द्वंद्व समाप्ती ॥
बंधन त्यास न बाधि महाभुज पूर्णसुखें सुख अक्षय प्राप्ती ॥
जाणसि ज्ञानिं हि योगिं च तो करिजेत विचार असा बहु संतीं ॥ ३
आचरतां निज कर्म सुनिर्मळ चित्त वरी शुभ मोक्षपदासी ॥
कर्म करी **परमेश्वर** अर्पण ज्ञाननिधी वरि त्याच सुखासी ॥
ज्ञान स्वकर्म उभी फळ एक चि जाणति पंडित या उभयासी ॥
भिन्न तयां ह्मणती नरमूढ अतीशय तो म्हण बाळ तयासी ॥ ४ ॥
सांख्यमतें उपजे निज ज्ञान अनूभव पाववि मोक्षपदासी ॥
कर्म करी **परब्रह्म** समर्पण हा मिळतो पथ योग हि त्यासी ॥
सांख्य स्वकर्म पहा फळ एक च आचर त्या निरूपाधि विदोसी ॥
दो चरणीं मति दोचरणीं श्रुति हे यासि तसें तें हि पहासी ॥ ५ ॥
योग नको मुळ कर्म च टाकून होइल मोक्ष कधीं न घडे ॥
मोडुनि अंकुर जो फळ इच्छिल लाभ तया वद काय घडे ॥
कर्म करी **परमेश्वर** अर्पण ज्ञान तया उघडें उघडें ॥
पावन शीघ्र सुखास मुनी न च ब्रह्मपदाहुनि तो विघडे ॥ ६ ॥
ईश्वर अर्पण कर्म घडे तरि चित्त सुनिर्मळ स्वानुभवें ॥
संभव ब्रह्म समस्त हि भूत समुच्चय ब्रह्म चि हा बरवें ॥
चिंतुनियां मन इंद्रिय निग्रह ब्रह्मपरायण तो विभवें ॥
जाणुनियां जनसंग्रह कारण कर्म करी परि बंध नव्हे ॥ ७ ॥
युक्त समस्तहि कर्म समर्पण ब्रह्म अनूभवे बद्ध नव्हेची ॥

१ खड्ग. २ संकट.

कातरि जो निज तत्त्व विचारुनि किंचित मी करिता न मनीची ॥
पाहतसे रूप ऐकत शब्द करी मृदु शीतळ घृष्टि त्वचेची ॥
प्राणसुखा सरसी रसना पद वीचरताति क्रिया गमनाची ॥ ८ ॥
प्राणसुखीं उससी* न अहर्निशि वाणि न वाणि वदे अति सैरा ॥
आणि करी मळमूत्रविसर्ग हि पायु प्रजापति इंद्रियद्वारा ॥
हात अदानक्रियाग्रहणादि लवे लवती निज नेत्र थरारा ॥
वर्ततसे सकळेंद्रिय निष्फळ ब्रह्मपदीं समबुद्धिस थारा ॥ ९ ॥
ब्रह्मसमर्पण कर्म करी फळसंग नसे निरहंकृति जो कां ॥
आवडिपूर्वक आचरतां निज देखत दाखवितो बहु लोकां ॥
सुकृत पाप घडे जग भोगति स्वर्ग अधोगति नेणत तो कां ॥
जेविं जळीं जळसंभव पत्रजळा न शिवे सम त्या अवलोका ॥ १० ॥
स्नानदानविधि नित्य निमित्तिक ईश्वरध्यान मनें करिताहे ॥
बुद्धिस निश्चय तत्त्वअनूभव ब्रह्मसमाधिसुखें जग पाहे ॥
कीर्तन नर्तन उत्तम संगत्यजी किमपी फळ हेतु न वाहे ॥
योगि असा निरहंकृतिनें करि कर्म दिसे परि केवळ देहें ॥ ११॥
जो परमेश्वर अर्पण कर्म करी फळ त्या न उरे चि स्वभावें ॥
जो निज मोक्षसुखाप्रति पावत नैष्ठिक शांत तयास म्हणावें ॥
कर्म करी परि जो न बहिर्मुख मी करिता फळ हें मज व्हावें ॥
आस धरी विषयीं जन कामुक झुंपियला भवसंकटिं भोंवे ॥ १२ ॥
सांख्य मताहुनि योग विशेष तुतें कथिला तरि या परि साचा ॥
याहुनि ज्ञान विशेष हि आइक कर्मविसर्जन ब्रह्मि तयाचा ॥
आत्मरूपीं मन होउनि उन्मन राहतसे सदनीं स्वसुखाचा ॥
देहपुरीं नवद्वारमया करिना करिना न च तो करणाचा ॥ १३ ॥
तें अकृतत्व कसें तरि ईश्वरस्वानुभवें निज ठायिं पडे ॥
जो अविनाश अनामय त्या जगमारकता गुण नावघडे ॥
हें जग तो न करी करवी न हि कर्मफळीं फळसंग उडे ॥
जेंवि रवी मृगतोय स्वभाविक होय तया जळिं तो न बुडे ॥ १४ ॥
त्या विभुतें कृत कर्म शुभाशुभ अर्पुनियां अणुमात्र भजेना ॥
कर्म अहंकृतिनें करिती अति भोगिति ते सुखदुःख हि नाना ॥

---

१ घर्षण. २ कातडी. ३ आचरतात. ४ कार्य. * लोभ. ५ रात्रंदिवस. ६ स्वेच्छ° ७ त्याग. ८ गुद. ९ शिश्न. ११ नाचणें. १२ ज्ञानी. १३ ज्याची दृष्टि बाह्य वस्तूकडे मात्र असते. १४ गृह. १५ नगरी. १६ रोगरहित. १७ मृगजळ. १८ प्रभु.

ज्ञान तयां नुपजे कदाचित मोह दृढावतसे अभिमाना ॥
सर्व भुतीं सम ईश्वर निष्क्रिय आत्मरूपीं मग त्यास दिसेना ॥ १५ ॥
सर्व भुतीं सम ईश्वर हें निज बुद्धिस ज्ञान जयासि ठसावें ॥
त्यास नसे सम अज्ञ अहर्निशि सर्व हि ब्रह्म चि स्वानुभवावें ॥
जेंवि रवीकिरणें तम नासुनि दीप उडु[1]गण येक चि व्हावे ॥
ज्ञान जईं उदयो जग अस्तें[2] चि कीं बहुतां नगिं[3] हेम[4] दिसावें ॥ १६
बुद्धिस निश्चय तो चि करी मन ध्यान हि तें च अखंड धरी ॥
आणिक वस्तुविना न दिसे दुसरें ह्मणुनी तत्पर निष्ठ तरी ॥
तत्वपरायण यापरि ज्ञानदिपें तम किल्मिष सर्व हरी ॥
जेथुनि नाहिं पुन्हा जननादिक तें पैंद[5] तो अनयासें वरी ॥ १७ ॥
सर्व सुविद्य विनम्र असा द्विज गाय गजीं शुनिं[6] आणि श्वपाकीं[7] ॥
उत्तम मध्यम हीन न भावित[8] एकपणें समतत्व विलोकी ॥
देव तुरंगम श्वान ठसा ठसला कनका[9]वरि एकचि ठाकी ॥
पूजक तीन प्रकार पुजी परि पंडित हेमविना न मनी[10] की ॥ १८ ॥
या परिचे समते स्थिर मानस निश्चित होउनि राहे जयाचें ॥
तो सुखि निर्मळ ब्रह्म सम स्थित अद्वय ब्रह्मस्वरूप चि संचे ॥
सर्ग जिणें ह्मणिजे जननामरणादिक संकट नाहिं भयाचें ॥
लोक तसा दिसतो परि वर्तन आणिक आइक सांगेन त्याचें ॥१९॥
आवडिच्या अविनाशसुखीं सुखरूप स्वयेंह्मण हर्षत नाहीं ॥
द्वेष कदां न धरी विषया वरि स्वानुभवें करि तद्रुपते ही ॥
आवडि नावडि या उभयास असंमुढ[11] तो दृढ नेणत कांहीं ॥
जाणुनि ब्रह्मपणें स्थिर ब्रह्मिच चिद्रुप ब्रह्मस्वरूप चि पाहि ॥ २० ॥
बाहिर या विषया करणां[12] दृढ संग तरी न धरी च असक्ति[13] ॥
अंतरिं आत्मसुखें सुखरूप मनीं[14] मन अद्वययुक्ती[15] ॥
ज्यास घडे परब्रह्मणि बुद्धिस वेदसुरंगित नित्यविरक्ती ॥
भोगित अक्षय मोक्षसुखा अनुलक्षुनि लक्षितसे गुरुभक्ती ॥ २१ ॥
जो विषयीं बहु मानितसे सुखदायक ते बहुदुःख तयातें ॥
जेंवि वरी विष गोड मुखीं उदरीं शिरतां क्षण प्राण चि घेतें ॥
बीज लवोनि सरे मृगतोय[16] जसें दिसतें परि कांहीं च ना तें ॥
तेथ कदा बुध[17] वेध न पावति हंस जसे मळक्या उदकातें ॥ २२ ॥

---

१ नक्षत्रसमूह. २ नाश-अभाव. ३ दागिना. ४ सोनें. ५ स्थान. ६ कुत्ता. ७ चांडाळ. ८ मानितो. ९ सोनें. १० मानितो. ११ ज्ञानी. १२ इंद्रियें. १३ आसक्ति. १४ मानितो. १५ योग. १६ मृगजळ. १७ ज्ञानी.

काम विकार सदां विषयासरिसे निजसंपत्तिनें उठताती ॥
चेतविला जिहिं ज्ञानहुताशन त्यास तया सह जाळुनि ठाती ॥
आत्मसुखें सुखऐक्य पुरातन बाहिर दोहिं जरी दिसताती ॥
ते सुखसिंधुसि युक्त अखंडित तें चि स्वयें सुखसागर मूर्ती ॥ २३ ॥
जो निज अंतर आत्मसुखीं रिझला मग ही न च घे विषयासी ॥
तेथ च अंतर ज्योतिस लक्षित ब्रह्मलयात्मक ध्यान जयासी ॥
पाउनि ब्रह्मपदीं परब्रह्म चि होउनि ब्रह्मसुखीं सुखवासी ॥
काय किती सुख तें वदणें सुखमात्र चि ये न कदां वचनासी ॥ २४ ॥
यास्तव जे समदर्शी ऋषीश्वर याविषयीं क्षिणकल्मष जाले ॥
सांडुनि संशय बुद्धिमनादिक साम्य सुखें मनिं पूर्ण निवाले ॥
सर्व भुतीं हित ईश्वर जाणुनि होउनियां पर तेथ च ठेले ॥
ते लभले अविनाश परात्पर ब्रह्म परा मुळ तेथ न चाले ॥ २५ ॥
क्रोध कॉमा जिहिं टाकुनियां निज कर्मसमर्पण ब्रह्मिं च कीजे ॥
ज्ञानपदीं समचित्त निरोधुनि ते इति सुप्त समाधि सुसेजे ॥
या उभयांसि हि ब्रह्म चि आश्रय वर्तति ब्रह्मसुखें सुखभोजें ॥
यावरि आइक आणिक देहपुरीं तरि काळ कसा क्रमिती जे ॥२६॥
यावरि अंतरज्योतिस लक्षित योगि असे कथिले पहिले ॥
आयिकता तरि त्यागुनियां विषयास मनीं मन संयमिलें ॥
अर्धविमीलन नेत्र भ्रुमध्य धरीं निज दृष्टिस आंवरिलें ॥
रेचक पूरक सांवरुनी सह नासिक कुंभक स्थीराविले ॥ २७ ॥
ते चि स्थळीं मन बुद्धि निरोधुनि तो मुनि मोक्ष परायण जाला ॥
काम नसे भय क्रोध नसे परिपूर्ण सुखें निज अंतरिं धाला ॥
अंतर बाहिर ब्रह्माचि होउनि ताप तिन्ही शमऊनि निवाला ॥
काय म्हणों मग आठविली सुख जीवनमुक्त हें नाम तयाला ॥ २८ ॥
यज्ञतपादिमुखें यजिती तरि ते तपयज्ञविनिश्चयभोक्ता ॥
सर्व हि लोकमहेश्वर मी निगमें नियमी निगमागमवक्ता ॥
सुहृद सर्व भुतां हृदयीं वसतों अणुच्यां कणिका पण रिक्ता ॥
नाहि तयापरि जाणत जो मग शांति तया वरिली निजभक्ता ॥ २९ ॥

इति पंचमोऽध्यायः

---

१ अग्नि. २ गतपाप. ३ निद्रित. ४ योगशास्त्र प्रसिद्ध वायु निरोधादि प्रकार. ५ वेदशास्त्र. ६ सूक्ष्मरज. ७ कण.

## अध्याय ६ वा.

देव म्हणे तुज सांगितलें अति विस्तर कर्म विशेषुनि ज्ञानें ॥
तें आणि कर्म फळें फळ एक चि तो कथिला निज योग विधानें ॥
त्यागुनि कर्म फळा करि कर्म अनाश्रित जो निरहंकृति माने ॥
योगि हि तो परिव्राज[1] हि तो न च कर्म न यज्ञक्रिया त्यजिल्यानें ॥ १ ॥
त्यागुनि कर्मफळा प्रति कर्म करी तरि योगि तया म्हणिजे ॥
तो चि तुं पांडव ब्रह्मअनूभव कल्पुं नको मनिं भान दुजें ॥
जो न त्यजी फळ आस धरी निज कर्म अहंकृतिनें रुढि[2] जें ॥
तो न च ज्ञानि हि योगि हि तो समचित्तसमाधि सुखें न भजे ॥ २ ॥
इच्छिल जो निज ज्ञान मुनीजन योग तईं निज कर्म करावें ॥
होउनियां निरहंकृति कर्मफळा प्रति निश्चित जाण त्यजावें ॥
तो फळ त्याग कसा घडतो तरि हें मन स्वस्वरुपांत दमावें ॥
कोण तईं फळ इच्छिल कर्म चि ब्रह्मस्वरूपक ज्ञान स्वभावें ॥ ३ ॥
जे समयीं मन स्वस्वरुपीं मग इंद्रिय[3]अर्थ सती[4]परि भोगी ॥
यत्न कदा न करी सहज स्थितिनें फळकर्मिं नव्हे अनुरागी[5] ॥
कल्पि च ना अमुकें अमुक्यास्तव वास्तव मूळ अहंकृति त्यागी ॥
अल्प अनल्प सदा समतुष्टत तो चढला निजयोग-तुरंगीं ॥ ४ ॥
हें मन नेमित आत्मरुपीं[6] जइं संतगुरुवचनें विवरोनी[7] ॥
उद्धरितो अपणासि च आपण हा भवसागरपार तरोनी ॥
या परिचा उपकार करी तरि बंधु स्वयें अपणासि च मानी ॥
आपण जे अपणा बुडवा तर शत्रु स्वयें अपणास निर्दानीं[8] ॥ ५ ॥
जें अपुलें मन आपण अक्षयि तो अपणा प्रति बंधु न्यहाळी ॥
ज्यास नसे वश हें मन जीवपणें पडला दृढ संशयजाळीं ॥
आडकला तरि तो अपणास चि आपण शत्रुपणाप्रति चाळी ॥
जन्मक्षयातित आपण जितुन आत्मरुपीं विवरीत समूळीं ॥ ६ ॥
जितुनि जो मन स्वानुभवें सम आत्मसुखें अनुभूतित[9] राहे ॥
हींव[10] उन्हें सुख दुःख समान चि मान हि तो अपमान हि साहे ॥
जेंवि नभा[11] अने[12] कांहिं न बाधत व्यापक[13] तो जरि होउनि आहे ॥

१ परिव्राज=संन्यासी. २ रुढि=वाढे, रुजे. ३ इंद्रिय अर्थ=विषय. ४ सती=पतिव्रता. ५ अनुरागी=आवड ठेवणारा. ६ आत्मरूप=परमेश्वरस्वरूप. ७ विवरोन=विचार करुन. ८ निदानीं=अखेरीस. ९ अनुभूति=अनुभव. १० हींव=हिम (थंडी.) ११ नभ=आकाश. १२ अन=अन्य. १३ एथें 'व्या प क त' अशीं अक्षरें मूळांत दिसतात.

तेंवि समाहित आत्मरूपीं धरि शांतिस अंतरिं आत्मस्थिती हे ॥ ७ ॥
आत्मअनात्मविवेकें[१४] विचारूनि[१५] शास्त्र गुरूवर-संत-मुखें ॥
ज्ञान तया ह्मणिजे श्रुतिसंमत कर्म सरे मग स्वात्मसुखें ॥
तृप्त सदा मन देहपुरीं तरि इंद्रिय जिंतुनि ब्रह्म लखे[१६] ॥
ढेंकुळ[१७] कांचन[१८] अश्म[१९] समान चि योगि तया ह्मणुं युक्त सखे[२०] ॥ ८ ॥
जो हित इच्छित स्नेह करीत उपेक्षक घातक जाण तसा ची ॥
स्थापित[२१] निंदक बंधु तया म्हणिजे पडते समयीं उडि साची ॥
साधु सुकर्मक आणि अकर्मक पापि नव्हे गति उत्तम ज्याची ॥
यास विलोकुन आवडि द्वेष नसे समबुद्धि विशेषित तो ची ॥ ९ ॥
जो करि धीर निरंतर मानस राहत एक पते विनलोके[२२] ॥
संग कदा न धरी सुख शारिर इंद्रियवर्ग[२३] निरोधुनि राखे ॥
या परि जो समधीषणें[२४] योगि च लक्षण हें तरि योग चि ऐकें ॥
आस नसे यॉ परिग्रह ब्रह्मि च योजित दृश्य तदात्मक देखे ॥ १० ॥
देश शुची परब्रम्ह विचारुनि सुस्थिर आसन तेथ मनाचें ॥
उंच नव्हे अति नीच नव्हे जिकडे तिकडे अवघें सम साचें ॥
जेंवि जळावरि बुद्बुद[२५] आसन कीं कनकावरि ठाण नगींचें[२६] ॥
बाहिर हो कुशीं[२७] वस्त्र अजीन[२८] हि वीरचुनी बसला वरि साचें ॥ ११ ॥
तेथ निरोधुनि अंतर निश्चित इंद्रियचेष्टित शांत करावें ॥
एकपणासह जें मन येइल तें मग ब्रम्हसुखें अवरावें ॥
अंतर शुद्ध निमित्य नियोजुनि आत्मरूपें स्वसुखें च भरावें ॥
त्या असना वरि तें चि बसे दुसरें न दिसे म्हण योग स्वभावें ॥ १२ ॥
जेंवि जळीं लहरी सम ते तसि ब्रम्हसमीं विसरे निज काया ॥
निश्चळ मस्तक होय [२९]ग्रिवेवरि सुस्थिरता सहजें च मना या ॥
दृष्टि पडे अखुडे निज नासिकिं पाहचि ना भंवतें निज माया ॥
बाळक पाहे जसें [३०]अनिमेष तसी अविकार स्थिती नयना या ॥ १३ ॥
मी जगदात्मरूपी परब्रम्हप्रतीतिसि[३१] येत प्रशांत[३२]बुद्धि ॥

---

१४ विवेक=विचार. १५ विचारून=विचार करून. १६ लखे=प्रकाशे. १७ ढेंकुळ=ढिपळ. १८ कांचन=सोनें. १९ अश्म=दगड. २० सखे=हे मित्रा (अर्जुना.) २१ स्थापित=मध्यस्थ (मित्र नव्हे व शत्रु नव्हे असा.) २२ विनलोक=एकांत. २३ वर्ग=समूह. २४ समधीषण=समबुद्धि. २५ बुद्बुद=बुडबुडा. २६ नग=दागिना. २७ कुश=दर्भ. २८ अजिन=कातडें. २९ ग्रीवा=कंठ, मान. ३० अनिमेष=पापणीला पापणी न लावतां. ३१ प्रतीति=अनुभव. ३२ "त" आणि "बु" यांचे मध्यें एक ऱ्हस्व अक्षर पाहिजे.

संयमिलें मन तेथ चि मच्चित होउनि पावत मत्परसिद्धी ॥
आचरतो परब्रम्हमया सकळा हि क्रियावृत्त ते चि त्रिशुद्धि ॥
ऐक्यसुखें रचला दुसरेपण किंचित ही भय त्यास न बाधी ॥ १४ ॥
शाश्वत जें परब्रम्ह तया अपणा करि योग इयापरि योगी ॥
जो यतमानस पूर्ण समाधिस पावतसे स्वसुखी अनुरागी ॥
मज संस्थित शांति [33]अनिर्वचनीय उग्या च परादिक[34] चौथी ॥
पावुनि ते स्थळिं होउनि तें पद तें चि अखंडित अद्वय भोगी ॥ १५ ॥
आइक या समयोगरते सहसा कधि आहार फार न खावा ॥
आणि निराहार राहुं नये न च येकठही जनसंग नसावा ॥
फार [35]सुषुप्तिस घेउं नये कधिं जागृति ही उपदा न करावा ॥
चित्त समाधिस ये नृप अर्जुन तोंवरि सर्व हि नेम धरावा ॥ १६ ॥
युक्त विचक्षण युक्तविहार हि इंद्रियचेष्टन युक्त करीतो ॥
पाहत बोलत ऐकत युक्त चि चालत युक्त चि ठातो- ॥
साधकसंगति युक्त करी निज स्वानुभवाप्रति सोडिच ना तो ॥
या परिचा निज योग जया रुचला तरि सर्व हि दुःख हरीतो ॥ १७ ॥
युक्त असें ह्मणिजे कवणाप्रति आइक तें तुज लक्षण सांगे ॥
जे समयीं निज चित्त नियमित आत्मरूपीं स्थिरता लय लागे ॥
सर्व हि काम वितृष्ण अहर्निशि सर्व क्रिया स्वरूपीं स्थिति जागे ॥
ते समयीं परब्रम्हि च निश्चित इंद्रियग्राम सुखेनिव[36] वागे ॥ १८ ॥
योग करी निज चित्तनिरोधन आत्मिक योजित योग मनासी ॥
आत्मसुखें सुख भोगि अखंडित निश्चळ बुद्धि स्थिरे अविनासी ॥
दीप जसा बहु कोंडानिचा बिनवायु अचंबळ दिव्य प्रकाशी ॥
तेपरिचा रमतो मज सम्यक योगि असा परब्रम्हनिकासी ॥ १९ ॥
यापरिचे निज ऊपरमा प्रति पावत जे स्थळिं चित्तसमाधि ॥
रोधुनि राखत योग सुखेनिव जन्मजरादिक नासत [37]आधि ॥
आपण लक्षितसे अपणास चि आपण सर्व हि शुन्य [38]उपाधि ॥
तें स्थळ आत्मस्वरूपक जाणुनि हर्ष तया परि योगसुसिद्धि ॥ २० ॥
जें सुख फार अपार [39]अतींद्रिय वाङ्मन गोचर[40] नो हे कदापी ॥

३३ अनिर्वचनीय=अवर्णनीय. ३४ परादिक—परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी. ३५ सुषप्ति=झोंप. ३६ सुखेनिव=सुखैनैव (सुखानें). ३७ आधि=मनोव्यथा. ३८ उपाधि—पाण्यांत सूर्यबिंब दिसतें. एथें पाणी हें बिंबाची "उपाधि" होय. आरशांत रूप दिसतें एथें आरसा हो रूपाची उपाधि. ३९ अतींद्रिय=इंद्रियांचे द्वारें न समजणारें. ४०. वाङ्मनगोचर=वाणी आणि मन ह्यांस कळणारें.

तें करि बुद्धिस आधिन बुद्धि तयांत चि तद्रुप होउनि स्थापीं ॥
जाणुनि जेथ विरे मन जाणिवनेणिव[४१] नेणत आत्मस्वरूपीं ॥
हे स्थिति पूर्णध्रुवाप्रति निश्चळ कीं सरिता[४२]जळसागर आप[४३] ॥ २१ ॥
लाभत जे स्थिति आधिक लाभ तयाहुनि कांहिं च थोर न मानी ॥
अमृतसागर सांपडला मग काय गणी जळ ही तळ सानी[४४] ॥
जे स्थिति सर्व सुखावरि सत्सुख भोगित अक्षय लक्षुनि ध्यानीं ॥
तो न चळे अति थोर हि दुःख पडो गजताडन कीं सुमनांनीं[४५] ॥ २२ ॥
या परि जाणत दुःख अपार असा भवसागर जेथ निमाला[४६] ॥
तो निज योग जयाप्रति बोलति स्वानुभवें करि वश्य तयाला ॥
अर्पित योगि च चित्त समस्त हि नित्य समाधिसुखें समघाला ॥
निश्चित तो वर[४७] योगिच बोलति संत मुनी जन सज्जन त्याला ॥ २३ ॥
कल्पित काम समस्त हि नश्वर[४८] सांडिल जो अवघा एथ त्यजोनी ॥
आणि मनादिक इंद्रियग्राम[४९]क्रिया सह स्वस्वरूपांत दमूनी ॥
सर्व समान समाधिसुखें निज स्वानुभवें बसतो सुख मानी ॥
तो समयोगि तयासि च साधन सांगत सूलभ आइक कानीं ॥ २४ ॥
स्वस्वरूपीं मन जाण निरोधन येकसरें दमितां श्रम होती ॥
त्यास हळूहळु ऊपरमे विषयांतुनि काढुनि साधनवृत्ती ॥
रोधित रोधित बुद्धिधृतीसह आवरिलें धरिलें दृढ हातीं ॥
आणिक चिंतन चिंति च ना निज आत्मरूपीं मिसळोनि समाप्ती ॥ २५ ॥
चंचल हें मन स्थीर नसे परि राहिल निश्चळ जों अनयासें ॥
तों तों तया परमार्थ चि दावुनि गुंतविजे अनुभूतिविलासें ॥
गोडि हळूहळु लागत येथिल वीट धरी विषयीं तव त्रासें ॥
होइल वश्य अवश्यक आपण[५०] आपनियाचि मुरोनि निवासें ॥ २६ ॥
जें रजरूपक चंचल हें मन निश्चळ पूर्ण सुशांतिस येतां ॥
पापसमुच्चय सर्व हि नासत जेंवि पुढें कनका कसदेता[५१] ॥
मंगल उत्तम मोक्षपदास चि पावत होउनि तद्रूप पार्था ॥
हें सुख योग सुलक्षण ब्रम्ह करी नलगे क्षण पाह तुं आतां ॥ २७ ॥
योजित यापरि आत्मरूपीं मन जाण अकल्मषें[५२] ते निजयोगी ॥

---

४१ जाणिव नेणिव=ज्ञान व अज्ञान. ४२ सरिता=नदी. ४३ आप=पाणी. ४४ सान=लहान. ४५ सुमन=फूल. ४६ निमाला=नाश पावला. ४७ वर=श्रेष्ठ. ४८ नश्वर=नाशवंत ४९ ग्राम=समूह. ५० आपण आपनिया चि=आपले आपण च. ५१ कसदेता=कवास लावणारा. ५२ कल्मष=पाप.

जें मनबुद्धिअगोचर तें परब्रम्ह सुखेनिवें[५३] होत निजांगीं ॥
जेथ नसे दुःख तेंवि असे सुख होवुनियां सुखमात्र चि भोगी ॥
अंतर बाहिर भेद नसे सम सर्व भुतीं भजतो मजलागीं ॥ २८॥
सर्व भुतें अपणांत चि लक्षित सर्व भुतीं रुप आपण पाहे ॥
यापरि तो समदर्शि विलोकित हेम नगीं कनकीं नगता हे ॥
नातरि तंतु पटीं पट [५४]तंतुविं काय जळें लहरी जळवाहे ॥
जो निजयोगपथें मन स्वस्वरूपीं समस्वानुभवें दमिताहे ॥ २९ ॥
जो मज सर्व भुतीं अवलोकित आपणिया गवसोनि पहातें ॥
सर्व भुतें मजमाजि असे तुपस्वाद कणीक निका तुप होतें ॥
तो मज भिन्न न वाटतसे मज भिन्न न मानित तो निज चित्तें ॥
तो मि अतें कथणें हि नसे मुळ एक परी भजतो अधिकेंतें ॥ ३० ॥
सर्वभुतात्मक मी मज जाणुनि जो भजतो निज ऐक्य न मोडी ॥
येकपणें लहरीजळसें परि सिंधुसि सैंधव साकर गोडी ॥
भिन्न जरी दिसतो मिठपर्वत वर्तत तें जळ संग न सोडी ॥
योगि तसा मजमाजि च वर्तत द्वैत निषेधुनि शोधुनि सोडी ॥ ३१॥
जो अपणा सम सर्व हि पाहत जेंवि अवेवें[५५] शरीर जगासी॥
तो सुखकामग होउन सर्व समात्मकभाव जयासी ॥
हे नृप अर्जुन सांगु किती परमोत्तम योगि मि मानित त्यासी ॥
पांडव हें परिसोनि अशंकित वीनवितो हरिच्या चरणासीं ॥ ३२ ॥
हे मधुसूदन हा समयोग तुवां कथिला मज दुर्गमें[५६] वाटे ॥
स्थीर नव्हे स्थिति इंद्रियवर्ग स्वअर्थ[५७] चि ग्राहक [५८]गोदरिं दाटे ॥
चंचल चित्त अचंचल होउनि जाण कदापि न ये समवाटे ॥
या सकळा मुळ नारि च भोगित [५९]संसृति हे हरि हें मन खोटें ॥३३॥
हे मधुसूदन मानस चंचल यासि कधीं थिर अल्प असेना ॥
जेंवि सवें दृढ तस्कर घातक तेंवि बळें करि घातक नाना ॥
त्यासि करी जंव निर्ग्रहें नेमुनि[६१] युक्ति करीं सहसा गवसेना ॥
वायु जसा दामितां न दमे अति दुष्कर त्यापरि हें अवरेना ॥ ३४ ॥
हे जयबाहु! नको धरूं संशय चंचल हें मन निग्रह यासी ॥
अभ्यसनें तुज काय अशक्य निराश्रय येक नभीं गति त्यासी ॥

५३ सुखेनिव=सुखानें. ५४ तंतुविं=तंतुंत. ५५ अवेव=अवयव. ५६ दुर्गम=कठिण. ५७ स्वअर्थ=इंद्रियार्थ ( विषय ). ५८ गोदरिं=इंद्रियरूपी दरींत. ५९ संसृति=संसार. ६० निग्रह=दमन. ६१ नेमुनि=नियमून, निग्रह करून.

दुर्गम वस्तु तया बहु साधन साधुनिया अणिताति करासी ॥
तेंवि विरक्ति बळें[६२] धरिसी तरि येइल आपण शांति सुखासी ॥ ३५ ॥
योग असंशय त्या म्हणिजे न करी कधिं साधन शांति सुखाचें ॥
तो मननिग्रह दुर्लभ हें मत माझें हि निश्चित जाण तुं साचें ॥
जो करिताहे उपाय मनाप्रति नेमित भार त्यजी विषयाचे ॥
वश्य तया सहजें मग होइल पावत तो पदं[६३] योग-स्थितीचें ॥ ३६ ॥
हे गुरु देव हरी उपजे मज एक मनीं बहु फार अशंका ॥
जो अयती म्हाणिजेत अयोग्य च आवडिनें धरिताहे[६४] × × × ॥
अभ्यसितां चळलें मन मध्यें शरीर वीजरि अस्तुस येकां[६५] ॥
अंतरला निजयोगिं कसी गति त्यास घडे मज दावुनि दे का ॥ ३७ ॥
हे वरबाहु यदुत्तम श्रीपति तो मुढ दोहिंकडे चकला चीं ॥
देह न योग मध्यें अपघात विनाश दशा दृढ पावत साची ॥
वोळुनियां घन वात तया उडवी विफळा ऑस होत जनाची ॥
तो परब्रम्हपथीं चळला तरि कोण गती न कळे हरि त्याची ॥ ३८ ॥
संशय हा हरि छेदिसि तूं चि नव्हे दुरि तूजविना कवणासी ॥
हे जगदीश जगद्गुरुचिद्घन मी शरणागत पादरजासी ॥
तारिसि दीन बहू भवसागरिं तो चि तुं आजि सखा मिनलासी ॥
येथ करूं जरि आळस मानस कोठ निये करुणावनरासी ॥ ३९ ॥
देव म्हणे अरिगंजनें[६६] अर्जुन जो कृतमंगल साधक बापा ॥
तो इह आणि परत्र हि नाश न पावत वाहतसे जरि खेपा ॥
दुर्गतितें सहसा न पवे दृढ झोंबतसे अविनाश स्वरूपा ॥
चालत पंथ बहू दिस लागति एक दिनीं स्थळ पावत सोपा ॥ ४० ॥
तो कृतपुण्य बहू सुकृतें सम शाश्वत उत्तम लोकचि पावे ॥
नातरि श्रीमत आणि शुचिष्मत[६७] या उदरीं शुभ जन्म धरावें ॥
योगपथींहुन भ्रष्ट पुन्हा उपजे तरि घेउन सत्वर धावें ॥
तोचि धरा शुभ मार्ग असे भव आणिक ही [६८]कथियें परिसावें ॥ ४१ ॥
ब्रम्हसमात्मक योगिकुळिं उपजे अथवा धिषणा[६९]दिप पोटीं ॥
याहुन दुर्लभ जन्म विचारसि तें तुझि संरि विरा जगजेठी ॥
कांतरि तो हि बहू सुकृता बहुजन्ममुळें मजपाडुनि गांठी ॥

---

६२ विरक्ति बळें=वैराग्यशक्तीनें. ६३ पद=स्थान. ६४ या पादांत तीन अक्षरें कमी आहेत. ६५ या पादांत कांहीं अपपाठ आहे. ६६ अरिगंजन=शत्रुनाशक. ६७ शुचिष्मत=शुद्ध. ६८ कथियें=सांगतों. ६९ धिषणा=बुद्धि.

सार्थक हें करिसी अपुलें मजलागीं विचारुनियां हित गोष्टी ॥ ४१ ॥
हे कुरुनंदन उत्तम सत्कुळिं जन्मुनियां मग काय करीतो ॥
पूर्व सबंधिं शरिरक ज्ञान तया उपजे धरि बुद्धि हि ती तो ॥
पांथिक वस्तिस राहुनि रात्रिस येरदिसीं[७०] पथ तो च धरीतो ॥
तो चि पुन्हा अचरे समयोग चि या रिति निश्चित सिद्धिस येतो ॥ ४३ ॥
साधक जो निर्गमोदित[७१]वर्तत उत्तम कर्म समर्पुनि मातें ॥
तो पहिले जनॅनांतरसंस्कृत[७२] अभ्यसनें अचरे अवचित्तें ॥
शुद्धक्रियावश योगविचारण वोघ जसे मिळती जळधीतें[७३] ॥
चित्तसमाधिस आपण येउनि पाववितें गति पूर्णस्थितीतें ॥ ४४ ॥
यास्तव प्रेत्नें[७३] करी दमितो मन इंद्रियैंअर्थ[७४]विसीं[७५] वितरागी[७६] ॥
तो अति निर्मळ नित्य शुचिर्भुत सर्व हि निर्धुत[७७]किल्मिषभागी ॥
जन्म असे बहु फार दुरी मग जे समयीं रत सद्गुरुसंगीं ॥
सिद्धि तया सहजें सम होइल उत्तम तो गति ते चि प्रसंगीं ॥ ॥ ४५ ॥
सर्वतपस्विय आधिक योगि च ज्ञानि तयाहुनि आधिक तो ची ॥
कर्मठ कर्म बहू करिती पण आधिकता सहसा न पवे ची ॥
आधिक आणिक तीर्थक्रतूहुनि योगिच वाट मिळे सकळांची ॥
यास्तव तूं समयोगि भवार्जुन[७८] लाहसि राणिव ऐक्य सुखाची ॥ ४६ ॥
सर्वहि योगित उत्तम तो मन मद्गत योगपथें करिताहे ॥
आवडिनें भजतो मजलागिं च सर्व भुतीं सम मद्रुप पाहे ॥
तो मजयुक्त अहर्निसि वर्तत कीर्तन नर्तन मद्गुण गाये ॥
उत्तम उत्तम उत्तम तो म्हण उद्धवचिद्घन वंदित पाये ॥ ४७ ॥

---

## अध्याय ७ वा.

देव म्हणे मज देउनिया मन योगि स्वयें मज पासुनि होसी ॥
एक धनुर्धर मी कवणे परि हें जरि तथ्य चि जाणुनि घेशी ॥
हे नग[१] कांचनें[२] कीं बिज वृक्ष पटीं[३] सम तंतुस सर्व भुतांसी ॥
लक्षसि[४] तूं अपरोक्षें[५] स्ववस्तुस भेद नसे कथुं आइक त्यासी ॥ १ ॥

---

७० येरदिसीं=दुसरे दिवशीं. ७१ निगमोदित=वेदप्रोक्त. ७२ जननांतर-संस्कृत=पूर्वजन्माचा संस्कार आहे ज्यास असा. ७३ जळधी=सागर. ७३ प्रेत्न=प्रयत्न. ७४ इंद्रियअर्थ=विषय. ७५ विसीं=विषयीं. ७६ वितरागी=वैराग्ययुक्त. ७७ निर्धुत किल्मिष=गतपाप. ७८ भवार्जुन=भव अर्जुन=हे अर्जुना हो. १ नग=अलंकार. २ कांचन=सोनें. ३ पट=वस्त्र. ४ लक्षसि=पाहसी. ५ अपरोक्ष=साक्षात्.

दृश्य दिसे निज दृष्टिस विश्व विचित्र विवर्त जसा अहि[६] दोरी ॥
शुक्ति[७] रुपें निळिमा[८] नभे[९] मानव स्थाणु[१०] रवी-किरणीं मृग वारी[११] ॥
ब्रम्ह प्रपंच अशा रितिनें तुज मिश्रित सांगतसें अवधारीं[१२] ॥
शब्दविसर्जन खुंटित जाणिव[१३] जाणुनिशान खरे अविकारी ॥ २ ॥
सृष्टित जंतु असंख्य सृजी विधि मानव त्यांत चि कश्चित बापा ॥
येरितिचे शत कीं गणितां मग त्यांत जयावरि श्रीअनुकंपा ॥
सिद्धि तयां शतशा मज जाणति जे प्रकृतीपर स्वात्मस्वरूपा ॥
जो गुरुभक्त करी निज सार्थक जन्म-जरादिक जिंतुनि तापा ॥ ३ ॥
ते प्रकृती बुझ दोपरिची कसि सांगतसें तुज आइक आतां ॥
हे धरणी जळ तेज समीरण[१४] व्योम[१५] गणीं भुतपंचक ताता ॥
षष्ठम मानस सप्तम बुद्धि अहंकृति अष्टम भाव पहातां ॥
हें प्रकृतीष्टक षष्टपरी करूं दुष्ट दुजा परिसें परमार्थ ॥ ४ ॥
जातिविरूद्ध भुतांस परस्पर तीस स्वसाम्य चि वर्तवितें ॥
जीवपणें जडस्थूलप्रकृतिस कर्म क्रिया गति चेष्टवितें ॥
भोग घडे सुखदुःखक्रियेंतिल तों मन मस्तकिं आदळवीतें ॥
जाणिव बुद्धिस दे जग मी म्हण सर्व हि आहंकृती न धरीं बे ॥ ५ ॥
अंडज जारज[१६] स्वेदज[१७] उद्भिज[१८] लक्ष असंख्य कथा जिवयोनी ॥
यांत असंख्य किती जिव निर्मित पाळुनि संहरता हि निदानीं ॥
आकृति कर्म रिती गति भिन्न चि सर्व हि विश्व धरी अभिमानी ॥
जेविं नगीं बहुतां परि कांचन या अवघ्या जगिं मी सम मानी ॥ ६ ॥
प्राकृत[१९] हें तुज विश्व दिसे परि जाण दुजें मजवीण दिसेना ॥
भानु करीं[२०] मृगतोय तळीं परि किंचित निश्चित तीळ भिजेना ॥
वोविलिया मजला जग हें म्हणतां चि विजाति[२१] मुळीं गवसेना ॥
कांचन-सूत्र मणी निरखीं बहु माळ पहा पण येक चि नाना ॥ ७ ॥
जाणसि अर्जुन हे प्रकृती मणि तंतु मि गुंफियली कसि जाळी ॥
जीववितो जग तो उदकीं रस दिव्य प्रभा शशि भानुसमेळीं ॥
ज्या प्रणवें[२२] प्रगटे निगमद्रुम[२३] सांठवल्या पण वात न्यहाळी ॥

---

६ अहि=सर्प. ७ शुक्ति=शिंपला. ८ नीलिमा=काळेपणा. ९ नभ=आकाश. १० स्थाणु=खुंटा. ११ वारी=उदक. १२ अवधारीं=जाण; ऐक. १३ जाणिव=ज्ञान. १४ समीरण=वायु. १५ व्योम=आकाश. १६ जारज=जरायुज (जरायु=गर्भाशय). १७ स्वेदज=ढेंकुण इत्यादि (स्वेद=घाम). १८ उद्भिज=वनस्पति. १९ प्राकृत=प्रकृतिघटित. २० कर=किरण. २१ विजाति=भिन्नजाती. २२ प्रणव=ओंकार. २३ निगमद्रुम=वेदवृक्ष.

शब्द नभांत नरीं पुरुषत्व अहंपण तें मि म्हणे वनमाळी ॥ ८ ॥
जाण अविद्यक कश्मल टाकुनि शुद्ध सुगंध धरे प्रति तो मी ॥
दाहक तेज धुमेंविण निर्मळ भक्षक सर्व हि पावक नामी ॥
जीवन सर्व भुतां प्रति अन्न मि तृप्ति तृणीं जिववीत जना मी ॥
आणि तपी तप आचरती पण त्यांत वि तें तप जें मज कामी ॥ ९ ॥
मूळविजीं प्रणवांकुर विश्वतरू अहळी बहळी वहु फांके ॥
त्यास फळें बिजरूप वहू भरली भुतसृष्टि बहूविध शाखे ॥
नासत वृक्ष सनातन[२४] बीज मधीं मति बुद्धि असी प्रतिराखे ॥
तेज मणी तमिं तेज तयास्तव मोल तया निज तेज विलोकें ॥ १० ॥
आणि बलाबल तें मि स्वभाविक काम हि मी कवणें परि पार्था ॥
धर्मविशीं अविरुद्ध सवर्मत्वि कर्म नसे विषयावरि आस्था ॥
वेदनियामक त्या च पथें विचरे न चळे अणु ही परमार्था ॥
मोक्षपदीं सहज स्थिति रावत साह्य असा चहुं ही पुरुषार्था ॥ ११ ॥
सन्मय सात्विक भाव समस्त हि राजस जे विषयीक विनोदी ॥
तामस जे अति अज्ञ हि कर्म निषेधक दूषियले बहु वेदीं ॥
हे मज पासुनि ओळख तूं पण मी नव्हती रूप आइक शब्दीं ॥
वाढत लांकुड बीज नव्हे धुम अग्नि नव्हे मज मी च अनादि ॥ १२ ॥
हे त्रिगुणात्मक भाव मिळोनि जगा प्रति मोहितसे गुणमाया ॥
अज्ञकरीं सुख संसृतिचें बहु झोंबविते लटक्या फटक्या या ॥
मी परब्रम्ह परात्पर नेणुनि पावति सर्व हि थोर अपाया ॥
घात करी घर बांधुनि कोश-किडा अपणापण पांडवराया ॥ १३ ॥
दुर्गम हे गुणि दैव उलंघुनि केंवि जिवाप्रति सद्गति आतां ॥
पीपिलिकें[२४] परपारमहोदधि कीं मशकें कनकाचलमाथां[२५] ॥
जे भजती मज सर्व भुतपति लागिं सतीशिशु नातरि माता ॥
ते तरती सरिता मम आइक आइक पावति जे नर पाता ॥ १४ ॥
दुष्कृति जो नर ईश्वर नेणुनि भ्रांत भवीं मन कामन वाचा ॥
मंदमती असुरी जन प्राकृत छंद जया न सुटे विषयाचा ॥
अंध सदा हत माय न ज्ञान मि सन्निध चालक जो हृषिकांचीं[२६] ॥
त्या मज येति च ना शरणागत अंधतमें बहु शीण तयांचा ॥ १५ ॥
आइक आणिक चारविधी सुकृती जन जे भजले मज लागीं ॥
ते पहिली धरि आवड माझि च शोध दुजा करि सज्जनसंगीं ॥

२४ पिपीलिक=मुंगळा. २५ कनकाचळ=मेरु. २६ हृषिकें=इंद्रियें.

मी परमेश्वर जाणुनि इच्छित भेटति जे विषयीं गतरागी ॥
आत्मविज्ञानपथें चवथा मज भेद नसे म्हण त्यास च योगी ॥ १६ ॥
होउनि मद्रुप विश्व भरीं भजतो मज आपण आपणियातें ॥
जेंवि जळीं जळवीचि[२७] अभेद वरी करितो बरवे भजनातें ॥
तो मज प्रीय जसा जिव मी प्रिय त्याप्रति जेंवि जिवास जिवातें ॥
तो मि वरीं परि ज्ञान अभेद्य प्रभा विवरीं दिपकादिपकातें ॥ १७ ॥
सर्व हि पर्व जरी विविधाकृति गर्वविवर्जित मद्रुप मानी ॥
आत्मिक तो म्हण विश्वसमात्मक वर्त्तत मानुनि मे ततज्ञानी ॥
आहे ससा मज युक्त चि होउनि सांठवतो मज माजि निदानीं ॥
यापरिचा अवदान्य अशी परमोत्तम सद्गति यास्तव वानी ॥ १८ ॥
सर्व भुतीं भजतां बहु जन्म क्रिया फल दे मजलागिं अहंता ॥
तो शरणागत ये मग मी गुरू होउनि बोधित ज्ञान सुचित्ता ॥
ज्ञान प्रकाशत ईश्वर विश्व करी इति निश्चय बुद्धिस पार्था ॥
दुर्लभ भक्त महात्मन हा बहु जोडति झोंबति जे विषयार्थां ॥ १९ ॥
संतति संपति इच्छिति सिद्धि बहूरिति त्या अति कामधुमानें ॥
जाउनि ज्ञानसुलोचन अंध चुके मज मी जवळी च तमानें ॥
दैवत देवि उपासन शासन मानुनि आचरिती नियमानें ॥
आश करी अविनाश सुखाप्रति नास सदा मरती अभिमानें ॥ २० ॥
जो जन या भजतो तनु दैवत आवडिनें मज अर्थ अपेक्षी ॥
तो चि तया पुरवी कळ मी परि भाव धरोनि मुळास न लक्षी ॥
पत्र फुलें फळ डाहाळिया अति मिश्रित शोभति एक च वृक्षीं ॥
दैवत संचत पासुनि सांडुनि तांदुळ भूस चि भक्षी ॥ २१ ॥
दैवत जें जसें आवडि त्या परि पूजनपद्धति त्या च परीची ॥
इच्छित लभ्यतसे च तया असि जाहलि दाटि धरे बहुतांची ॥
ती मज पासुनि म्यां सृजली तरि आर्ति हि पूरविली भजकाचीं ॥
देव खरा म्हण तोषति नाचति बैसविती प्रित ही पुढिलांची ॥ २२ ॥
दैवत अल्पक आवडि अल्प फळें क्षणभंगुर स्वप्न जसे ॥
पावत त्या च पदाप्रति भक्त अवश्यक भव्य स्वरूप जसें ॥
आणि मला भजती जन हे जगदीश्वर जाणुनि प्रेमवशें ॥
तें असतां हि समग्र मदर्पण नोहति मद्रुप अंतिं कसे ॥ २३ ॥
मी परमेश्वर व्यक्त नव्हे मज व्यक्त चि मानुनियां शिणताती ॥

---

२७ वीचि=लाटा.

ब्रम्ह परात्परभाव न जाणुनि जीवपणें किति ओसनताती ॥
बुद्धिहिनाप्रति कोण करी उपदेश वृथा मरणें मरताती ॥
अव्यॅय[२८] शाश्वत सत्पुरुषोत्तम सान्निध संविते[२९] वीसरताती ॥ २४ ॥
माझि प्रभा जग सर्व असोनि कसे चुकले मुढ आवृत माया ॥
दृष्टिपुढें पटलें रचिलीं म्हण मी न दिसें अणुमात्र भजाया ॥
चित्र[३०] पहा चुकले जळबुद्‌[३१]बुद तंतु चुके पट येति विकाया ॥
मी अज अव्यय त्या मज लाविति लोक समस्त हि लौकिक वांया ॥२५॥
हे सखया बरि सन्मति जाण जन्ही नग होउनि वर्तत सोनें ॥
होत अनेक तरी कनकांत चि मोडति अक्षय तीं कनकानें ॥
तेंवि भुतें भुत वर्तति मद्रुप नाश तया मज माजि निदानें[३२] ॥
हें भुत वर्तन आणि भविष्य हि मी च असें मज कोणि च नेणे ॥ २६ ॥
कां तरि ते मज पासुनि त्यां मज नेणति जे अविनाश परेशा ॥
भ्रांत सदां विषयांत चि वर्तति वाढविती बहु ती विषयाशा ॥
त्या न पुरेति च द्वेष उठे मग जन्मत दोहिंत मोह विरेशा[३३] ॥
तो भुलवी जग मोहुनियां मग जन्मति जन्मति पावति नाशा ॥ २७ ॥
जे विषयेच्छुकपापविवर्जित पुण्य कदा करिती मम सेवा ॥
हें व्रत जे दृढ आचरिती मज लागिं च आळुनियां अँहंभावा ॥
त्यांसि कदा न करी भ्रम मोह मि सत्पथ दे अविनाश विसावा ॥
जाणति ते मजलागिं कसें तरि आइक ज्या घरिं मी निज ठेवा ॥ २९ ॥
जन्मजरामरणास सुटों म्हण आश्रय मत्पद निश्चित केला ॥
जाणति मी परब्रम्ह श्रुतीवचना पडिला मजलागिं अबोला ॥
जाणति ज्ञान हि ते मज मी गवसीत चि येइल देउनि डोळा ॥
शाश्वतता अधि आप्त विचारुनि कर्म अभेद समस्त हि ज्याला ॥ २९ ॥
आधिभुतां मज जाणुनि जाणति मी अधिदैवत सर्व हि व्यक्तीं ॥
अर्य क्रतू मज वांचुनि नेणति ते मज माझि च चित्त पहाती ॥
ते करतील प्रयाण तिये समयीं मज लागिं च चिंतित अंतीं ॥
हें पडतां श्रवणीं अति विस्मित अर्जुन काय म्हणे निज चित्तीं ॥ ३० ॥

---

२८ अव्यय=अविनाश. २९ संवीत=वेष्टित. ३० चित्र=चमत्कार. ३१ बुद्‌बुद=बुडबुडा. ३२ निदान=आदिकारण. ३३ विरेशा (वीरेशा)=हे अर्जुना.

## अध्याय ८ वा.

अर्जुन वीनवितो हरि साच तुझीं वचनें शुभ सत्तम आर्ती ॥
आइकलीं परि अर्थ असाध्य पुन्हां पुसतों वद अद्वय मूर्ती ॥
तें ब्रॅह्म काय कसें अधिआत्म हि कर्म कधीं वळखी अधिभूतीं ॥
देउनि सांग बरें अधिदैवत प्रांजळ ये मज लागिं प्रतीती[३४] ॥ १ ॥
देहपुरींत कसा अधियज्ञ कधीं विधिनें मधुसूदन मातें ॥
आणि प्रयाण कसें करितां तुज ओंळखणें दृढ नेमुनि चित्तें ॥
या परिची ध्वनि दे वचनें अजि गूढ प्रकाशुनि देइं दिनातें ॥
कल्पतरूतळिं वास करी तरि सर्व मनोरथ सिद्ध चि त्यातें ॥ २ ॥
श्रीहरि सद्गुरू सांगतसे अति पातळ जें गगनें क्षरलें ॥
अक्षर तें नवछिद्रघटीं न गळे भरलें जरि हारवलें ॥
तें परब्रम्ह घटादिक नाशत शाश्वत स्वस्थितिनें राचिलें ॥
तें अधिआत्म भुतें घडती पडती अणि वर्तति कर्म भलें ॥ ३ ॥
जो क्षरभाव तया अधिभूत म्हणों घडलें गगनादिक भूतीं ॥
त्यांत नरत्व अहंकृति सत्व तया अधिदैवत जीव वदेती ॥
अक्षर आदि समस्त हि ब्रम्ह करी निज देहिं च द्वैतसमाप्ती ॥
तो अधियज्ञ मि ज्ञानहुताशनिं देउनि जाळित दृश्य अहूती ॥ ४ ॥
या परि जाणुनि वर्ततसे मज मद्रुप देह समंध च नाहीं ॥
तो मग सोडिल देह तयीं मज वांचुनियां गति नेणे कदाही ॥
अंत सुनिश्चित तो चि तयां मज माजि मिळे भजनें लवलाहीं ॥
मी मज अव्यय भाव असंशय नित्य सुखास चि पावत पाहीं ॥ ५ ॥
प्राणिगणीं धरिजे प्रित ज्यावरि तें चि तया मरणीं अठवे ॥
पावति त्या च गतीस अचूक किती भंवती असे जन्म भवे ॥
जागत जे जन हेत धरी निजतां च तयांपरि स्वप्न दिसावें ॥
जाणुनि तूं भज कुंतिसुतां मज होशिल मद्रुप सत्य स्वभावें ॥ ६ ॥
यास्तव जन्म-स्थिती-क्षय जाणुनि तूं मजला स्मर सर्व हि काळीं ॥
मत्पर होउनि युद्ध करीं मग लिंपिसि ना कधिं पापसमेळीं ॥
बुद्धि तुझी निज निश्चय पूर्वक देखिल दे मन मात समूळीं ॥
पावसि मत्पद येथ असंशय हें करूणेन वदे वनमाळी ॥ ७ ॥
जे विषयीं जडलें मन पावत संसृति[३५] फार तया च गतीतें ॥

---

३४ प्रतीति=अनुभव, खातरी. ३५ संसृति=संसार.

त्यास वळूनि पळे पळ निश्चळ अभ्यसनें करि स्वात्मसुखातें ॥
स्वप्नभ्रमीं पुरुषोत्तम दिव्य परात्पर जो पुरुषोत्तम त्यातें ॥
जाय मिळोनि कथीं तुज अर्जुन आणिक आइक त्याच पदातें ॥ ८ ॥
नित्य नवें दिसतें परि स[३६]म्यक जाण जुनें गगनाहुनि आधीं ॥
लाहन तें अणु होउनि मद्रुप सर्व हि व्यापुनि सर्व निषेधी ॥
सर्व [३७]सृजी अणि वांचवि सर्व हि चिंतार्नि चित्त विरे मन बुद्धी ॥
तें स्मरतां तम सर्व हरे उदयें रविच्या परि रात्र प्रबोधी ॥ ९ ॥
या परि जाणतसे मज आधि च प्राणप्रयाण कसें करितो ॥
स्थीर मनें हरिभक्तिसुखें सम कुं[३८]भक योगबळें वळितो ॥
सावध सम्यक स्वस्वरुपें हृदिं मी तरि आंवरिला सरितो ॥
दिव्य परा[३९]त्पर मी पुरुषोत्तम त्या प्रति पावत सत्वर तो ॥ १० ॥
वेदविदां[४०]वर अ[४१]क्षर जें प्रकृती[४२]परें पाउनियां म्हणताती ॥
भोग [४३]उभौ सुख सांडुनियां मग स्वानुभवें वरिजेत विरक्ती ॥
इच्छुनि ज्या प्रति इंद्रियनिग्रह ब्रह्मचरीव्रत आचरिताती ॥
तें तुज प्राप्तिस साधन सांगत आइक सावध होउनि चित्तीं ॥ ११ ॥
मार्ग मना गमना न चळे भजनें असि कोंडित इंद्रियद्वारें ॥
राहिल ते हृदयीं च उगें मग प्राण मना करि एक विचारें ॥
जो हृ[४४]दभीतरिं शीरतसे मन-संगतिनें गगनांतरिं यारे ॥
मूर्धि[४५]त योग[४६]धृती निजध्यान धरी जंव वायु नभात विहारे ॥ १२ ॥
[४१]अक्षर जें परब्रम्ह परात्पर ध्यान धरोनि परा स्मरतां ॥
ओमिति घोष उठे गगनीं मन प्राण विरे तंव देह रिता ॥
ध्येय न ध्यान न ध्यासक ही अवघा चि अनंद मुळीं बघतां ॥
हे परमोत्तम सद्गति पावत त्यास मि मानित मन्मयता ॥ १३ ॥
चित्त अनन्यगती [४७]सरितांपति लागुनियां सरिता मिळताती ॥
एक मला स्मरतां हि अखंडित त्या परि आश्रय त्यासि मि अंतीं ॥
त्यास मि सूलभ माय मुला जसि आइक सादर भारतमूर्ती ॥
तो मज माजि मि त्या आँत बाहिर योगसुखें शरिरांत समाप्ती ॥ १४ ॥
मद्रुप जे परमोत्तम सिद्धिस पाउन अक्षर अ[४८]द्वय झाले ॥

---

३६ सम्यक=चांगलें. ३७ सृजी=उत्पन्न करी. ३८ कुंभक=मडक्यांत घातल्याप्रमाणें वायु शरीरांत कोंडणें. ३९ परात्पर=उत्तमाहून उत्तम. ४० वेदविदांवर=वेदज्ञश्रेष्ठ. ४१ अक्षर=अविनाशी. ४२ पर=पलीकडे. ४३ उभौ=दोन. ४४ हृदभीतरीं=हृदयांत. ४५मूर्धित=मस्तकांत. ४६ योगधृती=योगाभ्यास. ४७ सरितां पति=नदीस्वामी ( समुद्र ). ४८ अद्वय=द्वैतरहित.

ते अतिदुःखसमुद्र अशाश्वत जन्म तयां जरि होउनि धाले ॥
देह पुन्हा न घडे च तया परि जन्मक्षयाँ[४९]तित अक्षय झाले ॥
तूं पण हें दुध भक्त जसेपरि ऊंस न होति च साकरँभेले[५०] ॥ १५ ॥
ऊर्ध्वपथें सुकृतें चढती गति सत्यपुरी[५१] प्रति पावति मानें ॥
पूजन घेति जसा चतुरानन[५२] वावरती[५३] अरुढोनि विमानें ॥
राहटचक्र जसें उतरी धरणीवरि जन्मति काळगतीनें ॥
यादविच्याँ[५४] कुमरा म्हण यादवें[५५] जन्म न जाणाति मत्परज्ञानें ॥ १६ ॥
एरवीं त्यास किती दिसतेंय असी गणना करिजेल दिसांची ॥
एक दिसा तइं चारि सहस्र युगें फिरती धरणीं मनुजाचीं ॥
रात्रि हि तेथ तसी च युगें गणती पुरतां मग पाहट त्याची ॥
या परि ब्रह्मदिना आणि रात्रिस देखति जे जन ख्याति तयांची ॥१७॥
ज्या दिवसें जग व्यक्त समस्त हि वर्ततसे अपुले क्रियकर्मीं ॥
जें दिवसा पसरीत पसार करी क्रयँविक्रय[५६] देखसि ग्रामीं ॥
रात्रि जईं प्रगटे तइं सांठवि तेंवि अकार निराकाति योमीं [ व्योमीं ? ]॥
सांठवुनी रचिताहे पुन्हाऽहँनि[५७] हाचि विलोक कदां हि न कामी ॥१८॥
हा भुतँग्राम[५८] दिसे तिवुका हि निशीमुखिं[५९] सर्व लया प्रति पावे ॥
आणि पुढें पहटे अवघा चि रची तिवुका म्हणसील कथावें ॥
सृष्टि समूळचि सृष्टि करी हरि त्या विधितें[६०] न चुके भँवगोवें[६१] ॥
तेथ वसों म्हँण[६२] जे नर धांवति अक्षयि त्या कवणें वसवावें ॥ १९ ॥
यास्तव सर्व भुतां प्रति नास दिसे अविनाशि चि वस्तुस शोधीं ॥
व्यक्त अँव्यक्त उभावुनि सान परात्पर शाश्वत नित्य त्रिशुद्धी ॥
मृँन्मय[६३] पिंड घटावुनि मातिस कांचन खोटि नँगाँ[६४]हुनि आधी ॥
जाण तया परि मी पर चिद्घन अद्वय अच्युत तो चि सुबुद्धी ॥ २० ॥
व्यक्त दिसे म्हण एक अँव्यक्त उभाउभि जे परब्रम्ह अनादी ॥
अक्षर आणि क्षराक्षर उत्तम जेथुनि संसृति निश्चित नेदी ॥
या परि अक्षर जें म्हणिजे परि प्राप्तिविरें जयिं द्वंद्व उपाधी ॥
तें मम धाम अनाम असंग अभंग अनुस्युत आद्य अभेदी ॥ २१ ॥

---

४९ जन्मक्षयातित ( तीत )=जन्ममरण रहित. ५० भेले=खडे. ५१ सत्यपुरी=ब्रम्हलोक. ५२ चतुरानन=ब्रम्हा. ५३ वावरती=फिरतात. ५४ यादवी=कुंती. ५५ यादव=कृष्ण. ५६ क्रय=खरेदी. ५७ अहनि=दिवसास. ५८ ग्राम=समूह. ५९ निशीमुख=सायंकाळ. ६० विधि=ब्रह्मा. ६१ गोवें=फेरा. ६२ म्हण=ह्मणून. ६३ मृन्मय=मातीचा. ६४ नग=दागिना.

जें सकळां भुतिं अंतरिं बाहिर व्यापित जें भुतभेद न साहे ॥
व्यापक व्याप्य विवर्जित अव्यय नामरूपासि न एक कदा हें ॥
हे पुरुषर्षभ[६५] जें पुरुषापर[६६] वानुं[६७] किती श्रुति वानित राहे ॥
यास उपाय नसे अन्य लाभत भक्ति अनन्यपथें लवलाहें ॥ २२ ॥
हे भरतोत्तम सांगतसें तुज काळ अकाळ विचार करोनी ॥
आवृति[६८] आणि अनावृति[६९] योगिजना प्रति होय कसी अवसानीं ॥
एकमतें सहजे पाँह तेरिति संग्रह हा हि असो तव कानीं ॥
दाटुनियां शशि सूर्य करी तरि नित्य धडाडित अंतरिं अग्नि ॥ २३ ॥
चिन्मय निर्मळ ज्योतिस्वरूप हि सद्गुरु सेवुनि त्याँचे दयेनें ॥
दीवस यावरि पक्ष हि शुद्ध चि उत्तर आयन सा महिन्यानें ॥
ब्रम्हविद त्यजि या समयीं जरि देह सुखावुनि ब्रम्हसुखानें ॥
तो परब्रम्ह चि पावतसे कथिजेल अकाल अकर्णि[७०] सुकानें ॥ २४ ॥
अग्नि जयीं न थरे शरिरांत कफें विझतां जयिं धूम भरे ॥
झांकुळली निज ज्योतिस धूवपडे स्मरणा विसरे[७१] ॥
वद्य तिथी वरि राति हि दक्षिण आयन त्या महिन्यांत मरे ॥
योगि असे तरि तो शशिमंडळ पावुनि कर्मभुमीसम रे ॥ २५ ॥
दो समयीं जागीं जाण अनादि च पावति मृत्यु अयाचित प्राणी ॥
एक निघे पुनरागमना पथ एक जिरे गति जेथ नियेनी ॥
जे समयाधिन दुर्गति सन्मति पावति दैव वसे जरि प्राणी ॥
व्यर्थ तयीं पुजनें भजनें मज यास्तव यास मनास न आणी ॥ २६ ॥
आधिं च जे स्वरूपीं मिनले मग काळ अकाळ न जाणति योगी ॥
जेविं नभीं नभ आधिं च भंग घटा कधिं हो अथवा घटसंगीं ॥
यास्तव सर्व हि काळ मला भज मद्रुप होशिल ते चि प्रसंगीं ॥
देह असो कि कधीं पडलें तरि अर्जुन तूं अविनाश अभंगी ॥ २७ ॥
वेद षडंग[७२]-पथें यजि यज्ञ हि तीव्र तपें तप सर्व हि ज्ञानी ॥
पुण्य जुडे बहु फार तऱ्ही समया न विचारण अद्वय ज्ञानी ॥
आद्य अनाम अणी अभोगत अद्वितिय श्रुति निश्चित वानी[७३] ॥
पावति जें पर स्थान अचंचळ उद्धवचिद्घन योगि निदानीं[७४] ॥ २८ ॥

---

६५ पुरुषर्षभ=पुरुष श्रेष्ठा. ६६ पुरुषापर=आत्म्या पलीकडे (आत्म्याहून श्रेष्ठ). ६७ वानुं=वर्णूं. ६८ आवृत्ति=पुनर्जन्म. ६९ अनावृत्ति=पुनर्जन्माभाव. ७० अकर्णी (आकर्णी)=आइक. ७१ या पदांत तीन अक्षरें कमी आहेत. ७२ षडंगें=शीक्षा, छंद, व्याकरण निरुक्त, ज्योतिष, कल्प. ७३ वानी=वर्णी. ७४ निदान=आदिकारण.

## भगवद्गीता अध्याय नवम

श्रीहरि षड्गुणधाम[1] निरूपम भक्तसुरद्रुम[2] बोलत वाणी ॥
सांगतसे तुज हें गुज उत्तम कां तुं अनिंदक हे धनुपाणी ॥
तें कवणे परिचें तरि ज्ञानप्रपंच समिश्रित बुद्धिस आणी ॥
जाणुनि जे जननामरणाहुनि मोक्षसुखासचि पावति प्राणी ॥ १ ॥
हें प्रभु जाणुनियां सकळा अणि गुह्य समस्त हि यास चि योरी ॥
हें सुपवित्र पवित्रपणासहि उत्तम उत्तम हें अवधारीं ॥
हें उघड सुलभ शुभ लाभत धर्म हि हें सुसुखा सहकारी ॥
अव्यय तेहरिनें घातकाजन जें घडिलें निज स्वार्थशरीरीं ॥ २ ॥
हे परतापन हा निज धर्म अशावरि आवडि नाहिं जयाची ॥
व्यर्थ श्रमें भ्रमले नर नेणति प्रीति पडे अधिका विषयाची ॥
ते मज पावति ना फिरती रिति वाट किती जननामरणाची ॥
मी हि कसा कथितों हि तुला स्थिर सांडुनि आइक भ्रांति मनाची ॥ ३ ॥
व्यापियलें जग म्यां अवघें निज स्वस्वरूपें अहि[3] दोर जसा रे ॥
दोरिंत सर्प तशीं मज भीतरि[4] सर्व भुतें समजोनि असा रे ॥
जोंवरि बुद्धिस सर्प अभासत तोंवरि दोर तयांत कसा रे ॥
तेंवि भुतीं न मि दोर कळे तरि हें जगडंबर संपत सारे ॥ ४ ॥
पाहिं कधीं कनकीं[5] नग[6] नाहिं च हेमें[7] कधीं नग जालें चि नाहीं ॥
हेमनगा धरिलें हि नसे नगभाव दिसे तुज मारक कांहीं ॥
सांडुनि तो मग मी च समस्त हि आत्मरूपीं मम वैभव पाहीं ॥
ना मि भुतीं न भुतें मज माजि असा भुतभाव न टाकुनि ठायीं ॥ ५ ॥
जेंवि नभीं पवनासिपवाउनभा पवना रूप एक चि जाणें ॥
हालवल्या गति सर्व नभीं गगनांतरिं थोर तसा चि हि होणें ॥
आणि नभें धरिला लय त्यांत चि तेंवि भुतां मजमाजि उठाणें ॥
कोण करी तरि आइक सांगत हे प्रकृती कथिली तुज तेणें ॥ ६ ॥
सर्व भुतें प्रकृतींत लयाप्रति जातिल जाणसि कल्पक्षयीं ॥
हेतु[8] इतें मन माझि म्हणें मजपासुनियां दुसरी न तयीं ॥
जेंवि रवीकिरणीं[9] मृगतोय[10] उठे विनठे जळफेन[11] नयीं[12] ॥

---

१. धाम=घर. २ सुरद्रुम=कल्पवृक्ष. ३ अहि=साप. ४ भीतरी=आंत. ५ कनक=सोनें. ६ नग=दागिना. ७ हेम=सोनें. ८ हेतु=कारण. ९ रवी=सूर्य. १० मृगतोय=मृगजल. ११ फेन=फेंस. १२. नयीं=नदींत. ( नदी=नयी; आम्रराजि=आंबराई ).

तेंवि [13]पृथातनया [14]बुझ मी च निमित्त[15] घडे [16]सृजितेसमयीं ॥ ७ ॥
स्वप्रकृतीस अधिष्टित मी सृजि मागति [17]मागति हे भुतसृष्टी ॥
बीज बळें वपितां[18] चि उभारत [19]भारत देखसि [20]पादप दृष्टी ॥
कीं [21]भरितें उदयीं उदधी शशिमंडळ होत नसे अनुकष्टी ॥
तेंवि मि सर्व असें प्रकृतीवश हा भुतगोंधळ [22]व्यष्टि [23]समष्टी ॥ ८ ॥
काय [24]मृगांबु रवी बुडवी धुमठेलिल वायुस केंवि घडे ॥
वाहुटळी उडवी नभ कीं जळबुद्बुद मस्तकिं वज्रपडे ॥
तेंवि मला प्रकृतीकृतकर्मक बंधन जाण अवश्य घडे ॥
चेष्टित भानु जगासि उदासिन तें सुखदुःख तया न घडे ॥ ९ ॥
मी धनि जीस चराचरते रवि झोप जशी बहु स्वप्नि किजे ॥
हेतु मुळीं दिपकद्युति होय घरीं घरचे जन वर्तवि जे ॥
चंद्र नभीं शशिकांत द्रवे तिस हे प्रकृती मजलागिं अजे ॥
कुंतिचिया कुमरा मज मी च तया जग मानित व्यर्थ दुजे ॥ १० ॥
मी परब्रह्म [25]परात्पर आद्य अनामय अव्यय जो अविकारी ॥
ईश्वर भूतमहेश्वर मी मज नेणति मूढ कदां अविचारी ॥
मानिति कीं उपजे मरतो असें माणुसधर्म किती अवधारीं ॥
लाविति सर्व मला च जसे शिशु अभ्रसवें शशि चंचळकारी ॥ ११ ॥
निष्फळ जन्म हि जीवित निष्फळ ते मज नेणुनि निष्फळ जाले ॥
निर्फळ ज्ञान क्रियाफळ निर्फळ चिंतानें चित्त विचेतस ठेले ॥
यापरि क्रूर अघातनि तामसि राक्षसि जे प्रकृतीस मिळाले ॥
मोह करी अविवेकिनि आसुरि साधियले श्रम फार न बोले ॥ १२ ॥
आइक जे मज जाणति सर्व भुतादिक अव्यय दिव्यरूपातें ॥
दैवस्वभाविनि शांति क्षमा निज ज्ञानप्रकृतिस आश्रित होते ॥
आवडिनें मजला भजती मज वांचुनि आणिक नेणति चित्तें ॥
सांठविलें हृदयीं मजला म्हण अंतर वाड तयां म्हणिजेतें ॥ १३ ॥
कृष्ण हरी नृहरी मधुसूदन कीर्तन या परि नित्य करीती ॥
जाणुनियां मज सार्थक अर्थ विचारुनि नाम जिवांत धरीती ॥

---

१३ पृथा=कुंती. १४ बुझ=समज १५ निमित्त=कारण ( निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ) १६ सृजिते समयीं=उत्पन्न करिते वेळीं. १७ मागति मागति=पुनः पुनः १८ वपिता=पेरितां. ( वप् बीजसंताने ). १९ भारत=हे भरतकुळोत्पन्ना अर्जुना. २० पादप=वृक्ष. २१. भारितें=भरती. २२ व्यष्टि=एकटेपणा. २३ समष्टि=सर्वपण. २४ अंबु=पाणी. २५ परात्पर=श्रेष्ठाहून श्रेष्ठ.

सर्व भुतीं मज वोळखती नमिती निज भक्तिस वोळगताती ॥
आणि मला मिळती मज ते रिति सिंधु जसा सरितां भरताती ॥ १४ ॥
ज्ञानहुताशनि दृश्य हवी यजि एकपणें यजनें मज कोण्ही ॥
एक पृथक्पण विश्व दिसे परि मृन्मय भासतसे घटश्रेणी[26] ॥
एक बहूरूप हेम नगाकृति हेम चि जाणतसे बहु नाणी ॥
विश्वमुखें मज अर्पितसे मेखँ[27] हा सहज स्थितिचा धनुपाणी ॥ १५ ॥
वेद विधान कर्यी क्रैतु[28] तो हि मि स्वाँह[29] स्वँधा[30] मि हि मंत्र हि मी ची ॥
औषधि मद्रुप आँज्य[31] मि अग्नि हि मी च क्रिया बहुधा हवनाची ॥
हूतविधी मि हि आणि हवी मि हि स्वस्वरूपें सकळा समधींचीं ॥
या रिति सर्व मि यज्ञ चि जाणति मी स्वरूपें सकळां अमरॉचीं ॥ १६ ॥
मी प्रकृतीरूप माय जगाचि च बाप हि मी उपजे जग जेणें ॥
हीं प्रँकृती[32]पुँरुषें[33] मज पासुनि तो मि अज जगपाळक जाणें ॥
वेद हि मी च पवित्र हि मी प्रँणँवा[34]क्षर जेयुनि वेद उठाणें ॥
ते ऋग साम यजू रूप माझें चि आणिक आइक माझि ठिकाणें ॥ १७ ॥
मी च गती प्रतिपाळक मी प्रभु मी जननी सकळांतरसाक्षी ॥
मी सकळां हृदयीं मज माजि निवास मला शरणास नुपेक्षीं ॥
उत्पति पालन आणि निदान मि मी च निधान तुं या परि लक्षीं ॥
बीज मि अव्यय मी शशिचे परि शुक्ल रचें क्षिण उत्तर पक्षीं ॥ १८ ॥
मी च तपें रविच्या किरणें वरषें नभिं पाउस होउनियां ॥
मी च करीं सकळां प्रति निग्रह मी च सृजीं बहु लोक तयां ॥
मारितसें सकळांस हि मृत्यु मि मी अमृतोपम माझि दया ॥
शाश्वत मी च अशाश्वत मी मज वांचुनि ठाव नसे चरया ॥ १९ ॥
नेणुनि मि त्रय वेदविधी यजिताति सुरा बहु सोमँपें[35] यागें ॥
आणि मनीश्वरकाम चि या चि त्ति पाप समिश्रित पुण्यप्रसंगें ॥
त्या सुकृतें मज चिंतित पावति भोगति ते दिवि[36] भोग निजांगें ॥
कामदुँघा[37] घरिं सांपडली तिस क्षीरँ[38] उपेक्षुनि कांजि[39] च मागे ॥ २० ॥
जों पदरीं धन तों कँळवंतिण[40] जाण जिवाहुनि आधिक मानी ॥

२६ घटश्रेणी=मडक्यांचा समूह. २७ मख=यज्ञ. २८ क्रतु=यज्ञ. २९ स्वाहा=देवांस आहुती देते वेळीं उच्चारावयाचा शब्द. ३० स्वधा पितरांस पिंड देते वेळीं उच्चारावयाचा शब्द. ३१ आज्य=शेळीचें तूप (अजा=शेळी). ३२ प्रकृति=स्वभाव. ३३ पुरुष=आत्मा. ३४ प्रणव=ओंकार. ३५ सोमप=सोमरस पिणारे. ३६ दिवि=स्वर्गांत. ३७ कामदुघा=कामधेनु. ३८ क्षीरदूध. ३९ कांजि=कण्या. ४० कळवंतीण=वेश्या.

पुण्य सरे मग त्या परि दीक्षितें[४१] द्वार हि पाहुनि ये नयनांनीं ॥
भोगुनि स्वर्गसुखासि धरे उतरे बहु भोगित या जिवयोनी ॥
या परिचे [४२]त्रैयिधर्म चि कामुक त्या भवसंगतिनें सुखहानी ॥ २१ ॥
चातक जेंवि घनाश[४३] करी जिवना[४४] परि बाळक चिंतिति माता ॥
तेंवि अनन्यगती मग चिंतिति जे जन जाण उपासति ताता ॥
ते मज माजि मि त्यां आंत बाहिर गारे[४५] जसी जिवनीं[४४] बुडवीतां ॥
हो निज योगें[४६] मि वाहें निरंतर क्षेम[४७]पुरःसर पांडवनाथा ॥ २२ ॥
जाण जरी जन सर्व उपासति आवडिनें विधिपूर्वक देवां ॥
ते हि तरी मज पावति मी मूळ सर्व उपासन सार्थक भावा ॥
पातिं[४८] लवे तित नेत्र सुखावत जेंवि तसे सुखप्राप्तिस पावा ॥
मद्रुप देव समस्त हि अर्जुन भिन्न नसे कधि देह अवेवां[४९] ॥ २३ ॥
यज्ञस्वरूपक मी वदती श्रुति सर्व हि यज्ञमुखें मि च भोक्ता ॥
यज्ञ हि मी च धनी मज अर्पित यज्ञ समाप्तिस मी फळदाता ॥
यापरि नेणुनियां मज अग्निरवीवरूणादिक इंद्र समस्तां ॥
जे भजती गति पावति ते तुज सागतसें धरि अंतरिं पार्था ॥ २४ ॥
देवयजी[५०] तरि देवपदा प्रति पावति याजक[५१] देव चि होती ॥
पितृव्रतें प्रितिपूर्वक आचरतां पितरांवरि निश्चित येती ॥
भूतगणां भजती भुत होतिल जे मज आवडिनें भजताती ॥
मत्पर ते मज पावति निश्चित अक्षय मद्रुप होउनि ठाती ॥ २५ ॥
आइक मत्परनिष्ठ कसा तरि पुष्प समर्पि फलादिक झालें ॥
हें न मिळे तरि काय उणें जळ अर्पण आवडिनें मज केलें ॥
तें मुखिं घालुनि भक्षितसें जणु अन्न नसे बहु काळ भुकेलें ॥
तांदुळ विप्रकरार्पित द्रौपदिशाकमुखें भुवनत्रय धालें ॥ २६ ॥
पाहसि बोलसि ऐकसि चालसि इंद्रियधर्म समस्त करीसी ॥
कीं बहु षड्रस[५२] भक्षण भक्षिसि भोगिसि भोग अपार सुखासी ॥
यज्ञ अनेक विधी यजिसी बहु दान जना धन घेसिल देसी ॥

---

४१ दीक्षित=याज्ञिक. ४२ त्रयी=ऋक्, यजुः, व साम हे तीन वेद. ४३ घनाश=मेघाची आशा. ४४ जीवन=पाणी. ४५ गार=पाण्याची गार, बर्फ. ४६ योग=जी वस्तु आपणाजवळ नाहीं ती प्राप्त करून घेणें. ४७ क्षेम=प्राप्त झालेल्या वस्तूचें रक्षण करणें. ४८ पात=डोळ्याचें पातें. ४९ अवेव=अवयव. ५० यजी=पूजक. ५१ याजक=यजी. ५२ षड्रस=गोड, तिखट, तुरट, आंबट, खारट; कडू हे सहा रस (एक द्वित्र्यादियुक्त्या मधुर कटुकषायाम्लक क्षारतिक्तैरेकस्मिन् षड्रसैः स्युर्गणक कति वद व्यजने व्यक्तिभेदाः ॥ भास्कराचार्यकृत लीलावती )

कां तप आचरसी करसी व्रत अर्जुन तें मज देइं फळेंसीं ॥ २७ ॥
सर्व शुभाशुभकर्मफळा जरि अर्पितसे निरहंकृतिनें ॥
तैं सुखदुःखफळास न भोग हि जीं बहु जन्म किती मरणें ॥
यारिति ज्ञानसमिश्रित अंतर बंधन मिथ्य करी भजनें ॥
मुक्त असा मज मानि च पावसि तूं करसी म्हण हें कथनें ॥ २८ ॥
तो मि कसा तरि सर्व भूतीं सम कांचन जेंवि समस्त [५३] नगांतें ॥
द्वेष कधीं न करी पदिंचा पदिं मस्तकिंचा प्रिय नाहित यातें ॥
आणि मला भजती जिवनीं जळसिन्धुसरी परि येकरसातें ॥
ते मज [५४] भीतरि मी आंत बाहिर भेद तयां मज नाहिं च नातें ॥ २९ ॥
जो हिन कर्म करी हिन जाति हि नाव शुचि स्मित नाणित वाचे ॥
तो अनुताप धरी मज सर्व भुतीं भजनें हरि दोष मनाचे ॥
त्यास मि साधु बरोबरि मानित भागिरथी [५५] मळ गांविं[५६]रसाचे ॥
नीवडती जन त्या परि पावन देखुनि तो मम मानस नाचे ॥ ३० ॥
ज्या घडि ये मजला शरणागत त्या घडि धर्मस्वरूप चि झाला ॥
पाउनि शांतिसुखा प्रति मद्रुप शाश्वत ब्रह्म सुखें सम धाला ॥
हे कुरुनंदन सांगुं किती तुज भक्ति सु[५७]धारस जो नर प्याला ॥
तो कधिं नाश न पावतसे हरिभक्त असें म्हणताति तयाला ॥ ३१ ॥
जे मजला शरणागत निश्चित जाणति ना मज वांचुनि कांहीं ॥
तो पशु कां बहु पापि हि योनिंत जन्म तया परि पावन नाहीं ॥
स्त्री शिशु वैश्य किं शूद्र हि अंत्यज भक्तित जातिस कारण नाहीं ॥
मद्भजनें प[५८]रमा गति पावति कुंटणिका कुबजा निज देहीं ॥ ३२ ॥
या वरि ब्राह्मण क्षत्रिय उत्तम जन्म हि उत्तम कर्म जयांचें ॥
ते मजला शरणागत तैं किति वर्णुं मि पुण्य अगण्य तयांचें ॥
हा बहु दुःखसमुद्र अशाश्वत पाउनि लोक सुनिश्चित कैंचे ॥
यांत तुं जन्मसि तें मज ये भज आइक वर्म कसें भजनाचें ॥ ३३ ॥
हो मज भक्त मनांत मला धरिं सर्व क्रिया मजलागिं समर्पीं ॥
सर्व भुभूतीं मज जाणुनियां नामिं अर्जुन हे बहु पद्धति सोपी ॥
सर्वभुतात्मक मद्रुप होसिल ब्रह्मपरायण अद्वयरूपी ॥
उद्धवचिद्घन सांगतसे गति पावति हे नर जे अनुतापी ॥ ३४ ॥

नवमोऽध्यायः समाप्तः

---

५३ नग=दागिने. ५४ भीतरी=आंत. ५५ भागीरथी=गंगानदी. ५६ रस=पाणी. ५७ सुधा=अमृत. ५८ परमा=उत्तमा.

## भगवद्गीता अध्याय दशम.

सप्तमिं मी उदकीं रस मी क्रतु[५९] पासुनियां नव मीं कथिलेंसे ॥
तें चि पुन्हा हरि सांगत आइक उत्तम वाक्य धनंजय कैसें ॥
जें तुजला कथितां हित हेतु चि सिद्धिस पावति ते अनयासें ॥
कां तुं मला प्रिय आवडता बहु प्राण तुझ्यापरि आप्त न भासे ॥ १ ॥
मी अज[६०] अव्यय[६१] सर्व भुतात्मक[६२] मी भुतभावन मी भुत गोप्ता[६३] ॥
या प्रभवाप्रति[६४] देव न जाणति सिद्ध महाऋषि नेणति पार्था ॥
कां म्हणसी तरि मी सकळां मुळ देवमहर्षिस जन्मवि ताता[६५] ॥
मीं मन बुद्धिस चाळक पाळक मी सकळातित शुद्ध स्वसत्ता ॥ २ ॥
जन्म नसे मज आदि नसे अणि सर्व हि लोक महेश्वर मी ॥
जो मज यापरि जाणतसे निज स्वानुभवें भ्रमभेद श्रमी ॥
मानव हे बहु भ्रांत अशांत हि मूढ नव्हे न भुलेनि तमीं ॥
सर्व हि पावन बंध न तों वरि आइक जो मज भाव नमी ॥ ३ ॥
सार असार विचार निज स्थिति सावधता धरणीपरि शांति ॥
इंद्रियनिग्रह चित्त अचंचळ इच्छित पूर्ण अपूर्ण हि होती ॥
भाषण सत्य दिसे जगदुत्पति त्या च सवें सकळां सम प्राप्ती ॥
भ्यासुर आणि निमासुर देखुनि हो भय कातर[६६] निर्भय होती ॥ ४ ॥
दुःख भुतांस न दाखवणें प्रिय अप्रिय भाव समान च तुष्टी ॥
कायिक वाचिक मानसिकें तप नीति धनेन सुपात्रि च तुष्टी ॥
कीर्ति अपेश असे बहु भाव पृथग्विध व्यापियली भुत सृष्टी ॥
हे मजपासुनि होति समस्त हि आणिक आइक देखसि दृष्टी ॥ ५ ॥
जाण महा ऋषि सप्त हि याहुनि आणिक सांगतसें तुज चारी ॥
जे चवदांतिल[६७] पूर्विल लेखुनि भाव असे अकरा अवधारीं ॥
हे मम मानसिं उद्भवले जणुं बुद्बुद देखि च जाति समुद्रीं ॥
पासुन ज्या बहु लोकप्रजा सुत शिष्य प्रशिष्य परंपरकारी ॥ ६ ॥
वैभवयोग तुतें कथिला नवमीं बहु दावुनियां उपपत्ती ॥
बुद्धिसमुख्य महा ऋषि पूर्वक सांगितल्या निज भाव विभूती ॥
या अवघ्या मज पासुनि निश्चित जाणत जे सम मद्रुप होती ॥
ते निजज्ञानसुखाप्रति पावति संशय कांहिं नसे च यदर्थीं ॥ ७ ॥

---

५९ क्रतु=यज्ञ. ६० अज=जन्मरहित. ६१ अव्यय=नाशरहित. ६२ भूतें=सृष्ट वस्तु. ६३ गोप्ता=रक्षणकर्ता. ६४ प्रभव=उत्पत्तिस्थान. ६५ ताता=बापा, अर्जुना. ६६ कातर=भितरा. ६७ चवदांतील=चवदा मनूंपैकीं.

सर्व जगासि मि उत्पति कारण आणि प्रवर्त्तक मी सकळांचा ॥
यापरि जाणुनियां बुध पंडित जे भजती मज कायिकवाचा ॥
भाव सुनिश्चित अंतर आवडि सोस सदा बहु मद्भजनाचा ॥
सांगतसे करुणाघन श्रीपति सार्थक काळ कसेपरि त्याचा ॥ ८ ॥
चित्त मदर्पण चिंतन मद्रुप इंद्रिय जीवन मी जिहिं केला ॥
स्वानुभवें निजबोध परस्पर बोधविती श्रुति जेथ अबोला ॥
जाणुनियां मज कीर्तन ही करिती करिं घेउनियां जपमाला ॥
हर्षति आणि निवृत्तिसुखाप्रति पावति वर्णुं किती म्हणु त्याला ॥ ९ ॥
आवडिनें बहु जे भजती मज चित्त मदर्पण सर्व हि काळीं ॥
ज्ञान तयांप्रति देत मि ते मज जाणति व्यापक व्याप्य समूळीं ॥
बुद्धिसुयोग जया म्हणिजे कथिला दुसऱ्यांत तयास न्यहाळीं ॥
ज्यास अनुष्ठुनि पावति भक्त मला म्हण बोलतसे वनमाळी ॥ १० ॥
जे भजती मज त्यांस कृपाळु मि देउनि ज्ञान हि कार्य करीं ॥
जाण अविद्यक निर्मित हे भव नाशितसें ढग वायुसरी ॥
कोठ वसोनि कसा हरिशी म्हणसी तरि आइक तेंचि परी ॥
बुद्धिसरीं उजळे मग दीपक ज्ञान प्रभा तम सर्व हरी ॥ ११ ॥
ब्रह्म परात्पर तूं चि हरी शुभ पावन धाम हि तूं चि हरी ॥
सर्व पवित्र हि तूं चि हरी अज व्यापक हें जग तूंचि हरी ॥
नाश नसे तुज तूं चि हरि क्षॅरं अक्षॅरें उत्तम तूं चि हरी ॥
दिव्य सुरांदिक तूं चि हरी तुज पार्थ म्हणे किति वॅनुं हरी ॥ १२ ॥
या च रिती परब्रह्म परात्पर तूं मज सर्व ऋषी कथिताती ॥
नारद नित्य करी हरिकीर्तन गीत स्वयेंच धरुनि प्रतीती ॥
आणिक आसित देवल ही मुनि श्रीगुरु व्यास सदा तुज गाती ॥
तूं चि स्वयें पर ब्रह्म मि सांगसि त्या वचनें हरिली भवभ्रांती ॥ १३ ॥
फार जनीं कथिलें तइं अज्ञ मि शब्दसुखें गित ऐकत राहें ॥
जें अजि सर्व हि सत्य मि मानित जें तुझिया वचनीं रवि पाहें ॥
हे भगवंत तुझे अवतार न जाणति दानव देव कदा हे ॥
निग्रह कीं करिसील अनुग्रह शेष धरातळिं वानित राहे ॥ १४ ॥
तूं आणिकांस न जाणसि हें मज प्रत्यय सत्य हि तूं चि कथीशी ॥
हे पुरुषोत्तम तूं अज अव्यय जाणसि तूं अपणें अपणासी ॥
हे भुतभावन भूतगणाधिप देवपती जगपालक होसी ॥

---

६८ क्षर=नाशवंत. ६९ अक्षर=अविनाशी. ७० वानु=वर्णू.

व्यक्ति तुझ्या हरि जाणसि तूं चि नये सहसा वदतां आणिकाशीं ॥ १५ ॥
निश्चित सर्व हि ज्या अति अद्भुत तूं धरसील हरि निज व्यक्ती ॥
ते अपुल्या कथनार्थ समर्थ तुं ज्यास स्वयें म्हणशील विभूती ॥
लोक दिसे विविधाकृति नारूप नाम हि भिन्न बहूविध जाती ॥
त्यासि जिहीं रुपिं व्यापुनि तिष्ठसि तूं करुणाघन अद्वयमूर्ति ॥ १६ ॥
योगपती हरि मी कवणे रिती जाणें न तूज सदा मनिं ध्याता ॥
कोण विभूति रुपें तुज चिंतुनि राहिन निश्चित हे भगवंता ॥
कोठकुठें तव भाव विचारुनि जाणवसी पहतां चि अनंता ॥
रुक्मिणिच्या रमणा हरणा भव संशय दूरि करीं गुरुनाथा ॥ १७ ॥
श्रीगुरु चिद्घन देव जनार्दन त्वां कथिल्या अनुभूति विभूती ॥
त्या मज सर्व दृढीकरणें हृदयीं जडली गुरुवाक्यप्रतीती ॥
आणिक ही कथिं आत्मसुयोग सविस्तर व्यापक हे निज व्यक्ती ॥
सार तुझें वचनामृत प्राशन मी करितां श्रवणास न तृप्ती ॥ १८ ॥
हे कुरुश्रेष्ठ म्हणे मधुसूदन निश्चय रूप तुतें कथिताहें ॥
उत्तम ज्या आपुल्या विभुती अवध्या हि असोत किं मुख्य चि पाहें ॥
विस्तर कां न कथीं च कदाचित त्या हि असें म्हणसी मनिं पाहें- ॥
अंत नसे मनबुद्धि अगोचर तेथ किती म्हणु वैखरि लाहे ॥ १९ ॥
जिंकियली निज झोंप तयास्तव अर्जुन त्याप्रति ईश गुडाका ॥
बाहुनि कृष्ण म्हणे सकळां भुतिं आत्मरूपीं मनला अवलोका ॥
सर्वभुतें मनपासुनि आदि मि मध्य करीं समरक्षण लोकां ॥
अंत हि मी सकळां जळिं बुद्बुद कीं कनकीं नग त्यापरि होका- ॥२०॥
द्वादश जे अदितीसुत त्यांत मि वामन विष्णुरुपें समजावा ॥
जाण प्रकाशक ज्योतिमयींत मि भास्कर जो नभिं दाखवि यावा ॥
देव मरुद्गण त्यांत मरीच मि कीं मरुतांत मि वायु सदैवा ॥
आणिक ती निशिमाजि लखाकित स्वच्छ मि चंद्र विभुति पहा वा ॥२१॥
वेद समस्त हि मद्रुप त्यांत मि सुस्वर साम बुझें कुरुराया ॥
देव समस्त हि त्यांत मि वासव ज्या बहु नेत्र विराजत काया ॥
जाण दशेंद्रियचाळक हें मन भोगित पंच सदां विषयां या ॥
ते हि मि प्राणिगणीं निज ज्ञान मिं आइक आणिक ही समजा या ॥२२॥
रुद्र दहांवरि एक तयांत मि भर्ग सदाशिव जो त्रिपुरारी ॥
राक्षस आणिक यक्ष तयांत मि जो धनदेश्वर तो अवधारीं ॥

७१ गुडाका=झोंप. ७२ धनदेश्वर=कुबेर.

आठ वसूत मि पावँकँ जो जठरानळ याचित अन्न शरीरीं ॥
मेरू[74] महाशिखरांत मि पर्वत ज्यास रवी शशि घालित फेरी ॥ २३ ॥
सर्व पुरोहित त्यांत मि मुख्य तुं जाण विभूति मनांत धरोनी ॥
हे कुरुनंदन देवगुरू म्हणताति बृहस्पति जो बुध ज्ञानी ॥
आणिक सेनँकें त्यांत मि स्कंदँ सहामुख शोभत द्वादश कानीं ॥
स्थीर सरोवर डोह तयांत मि सागर जो रचिला सगरानीं ॥ २४ ॥
सप्तमहर्षित मी भृगु त्यास्तव चिन्ह उरावरि पाउल वाहे ॥
वाचक सर्व पदीं प्रणवाँक्षर एक च मी वचनीं रचिलाहे ॥
द्वादश यज्ञ तुतें कथिले परि त्यांत मि जो जपयज्ञ तुं पाहें ॥
स्थावर सर्व पदार्थ मि त्यांत हिमालय मौलिमणी म्हण वा हे ॥ २५ ॥
सर्व तरू परि त्यांत मि पिंपळ तेथ तुम्हीं मज येऊनि सेवा ॥
सर्व ऋषींत मि नारद कीर्तन नित्य करी चुकला भवगोवा ॥
चित्ररथासि तुं जाणसि अर्जुन खेचँरँ तो विभुतींत गणावा ॥
सिद्ध जयां परमार्थ अशांत मि जाण कपील मुनी तुजला वा ॥ २६ ॥
पीयूँषँहेतुनिमित्य जधीं मथिला क्षिरसाँगर त्यांत निघाला ॥
तो हँयँ सप्त-मुखी रविच्या रथिं जाण मि निश्चित निश्चय केला ॥
तेथिल जो गँजँ यान सुरेश्वर जाण गजांत मि वोळख त्याला ॥
आणि नरांत मि भूप नरेश्वर शासन जो करितो कुजनाला ॥ २७ ॥
शस्त्र समूह तयांत मि वज्र चि इंद्र करीं धरि वृँत्रँवधातें ॥
कामदुँधाँ करि पूर्ण मनोरथ धेनुंत मी म्हण स्वर्गि रहातें ॥
काम प्रजापति ऊपजवी म्हण तो मि प्रजन्य विभूति गणी ते ॥
सर्प महाविषधारक त्यांत मि वासुकि मंदर वीरढि होते ॥ २८ ॥
निर्विष नाग तयांत मि शेष धरीं धरणी सगळी म्हण माथां ॥
जाण वरूण मि श्रेष्ठ जळीं वसताति बहूत चि याँदँ समस्तां ॥
अर्यम जो पितरांत प्रभू म्हण पित्रुस्वरूप मि आदिजनीता ॥
आणि नियाँमँकें जे यम त्यांत मि दंड करीं सकळां भुतजाँतीं ॥ २९ ॥
दैत्यकुळिं पण भक्तशिरोमणि तो प्रह्राद मि निश्चित मानीं ॥
जो गगनें जग आकळीं तो म्हण काळस्वरूपक मी च निदानीं ॥

---

७३ पावक=अग्नि. ७४ मेरु=पृथ्वीचा आंस ७५ सेनप=सेनापती. ७६ प्रणव=ओंकार. ७७ खेचर=आकाशचारी. ७८ पीयूष=अमृत. ७९ क्षीर=दूध. ८० हय=घोडा. ८१ गज=हत्ती. ८२ वृत्र=राक्षसविशेष. ८३ कामदुघा=कामधेनु. ८४ याद=जलचर, ८५ नियामक=शिक्षा करणारे. ८६ जात=समूह.

श्वापद कोटि गणांत मि सिंह रवें[८७] पळती गज उन्मत श्रेणी[८८] ॥
पक्षिगणीं विनतासुत[८९] जाण गरुड मि वाहत जो मम यानीं ॥ ३० ॥
ऊडति यांत मि वायुस ओळख शस्त्रधरांत मि जानकिनाहो[९०] ॥
जो रविच्या कुळि दाशरथी करि बाण-हुताशनें[९१] राक्षस दाहो ॥
तारियले उदकीं जड पर्वत पावन पायि शिळा शुभ देहो ॥
आणिक मत्स्यकुळीं मकराकृति भागिरथी वहत्या जळिं मी हो ॥ ३१ ॥
जें सृजिलें जग फार पदार्थ तयांत मि जाणसि काय कसा रे ॥
ते मजपासुनि आदि तयांस मि मध्य मि अंत मि संहरिं सारे ॥
जाणुनियां सकळांत मि आत्मविचारण वोळख ज्ञान तसा रे ॥
वाद जयांत मि साधतसे वदती मम नामगुणा अनुसारें ॥ ३२ ॥
सर्व हि वर्ण[९२] तयांत अकार मि जाण प्रमाण श्रुतीवचनानें ॥
व्याकरणीं बहुतेक समास तयांतिल द्वंद्वसमास मि माने ॥
अक्षररूप मि काळ तुला कथिला पहिले क्षय तो गणनेनें ॥
कर्मफळासि मि देत समस्तहि तृप्त अखंडित विश्वमुखानें ॥ ३३ ॥
हारक त्यांत मि मृत्यु हरीं जइं प्राण तरीं मग कांहिं उरेना ॥
जाण भविष्य तयांत मि उद्भव हा नरदेह वपू हित नाना ॥
वर्णुनियां शुभ कीर्ति मि श्री मि हि वाणि हि मी कधि निंद्य वदेना ॥
आणि श्रुती धृति आवडि क्षांति मि नारिमध्यें इति साच चि माना ॥३४॥
साम तयांत मि इंद्रऋच्या स्तवनीं गियमान सुराधिप जेथें ॥
छंद तयांत मि चोविस अक्षरिं ज्याविण ये न द्विजत्व द्विजातें ॥
मास तयांत मि हा मृगशीर्षसमंधिक मास कथीं तु ज येथें ॥
साहिऋतूंत मि जाण वसंत करीं सुमनें फळ सर्व तरूतें ॥ ३५॥
आणि छळें[९३] बहु त्यांत मि द्यूत[९४] नवर्जित राव हि चोर दिवांचा[९५] ॥
तेजवतां बहु त्यांत मि तेज यशीं यश मी जय जो न जयाचा ॥
मी व्यवसाय हि लाभ पुरस्कर जेथ मिळे शुभ स्वात्मसुखाचा ॥
सत्वधरांत मि सत्व न पाहति जे तनु देखिल पाड जिवाचा ॥ ३६ ॥
यादव त्यांत मि देवकिनंदन कंसविदारण रुक्मिणिनाहो ॥
पांडव त्यांत मि अर्जुन तूं ह्मण भेद नसे मज तूज कदा हो ॥
वेदवितांतें[९६] मि व्यास मुनीश्वर सत्यवतीसुत[९७] निर्मलदेहो ॥

---

८७ रव=गर्जना. ८८ श्रेणी=पंक्ति. ८९ विनता=गरुडमाता. ९० नाहो=नाथ (नवरा). ९१ हुताशन=अग्नि. ९२ वर्ण=अक्षरें. ९३ छळ=कपट. ९४ द्यूत=जुगार. ९५ दिवाचा=दिवसास. ९६ वेदवित=वेदज्ञ. ९७ सत्यवती=व्यासमाता.

सर्व कवींत मि दैत्य गुरू उशॅना कवि शुक्र विभूति पहा हो ॥ ३७ ॥
सर्व दमांत मि जो धनदंड जयास्तव सर्व हि लोक भिताती ॥
जिंतिति चॅारि उपाय तयांत मि नीतिरूपें पर जे जिनताती ॥
गुह्य तयांत मि मौन सुनिश्चित जेथ [१]परॅादिक शब्दसमाप्ती ॥
तत्वविदांत मि ज्ञान तुं जाणसि स्वानुभवें धरिं अद्वयशांती ॥ ३८ ॥
ज्या जवळोनि भुतें गगनादिक पावति वृद्धिस सर्व भुतांचें ॥
बीज मि तें तुज सांगितलें तरि यावरि आइक आणिक साचें ॥
ज्या मज वांचुनि स्थावर जंगमरूप नसे अनुप्राणि गणाचें ॥
यास्तव जाण वटस्थ सविस्तर वोळख जें निज बीज कणीचें ॥ ३९ ॥
शत्रु निकॅंतन अर्जुन हे मम दिव्य विभूति न अंत जयांचा ॥
जेंवि नभीं भवला घन बिंदु अनील असी कवणाप्रति वाचा ॥
म्यां कथिल्या तुजलागिं विभूति सलक्ष शती न च अंत तयांचा ॥
यावरि स्पष्ट कयूं तुजला समजे तरि आइक सावध साचा ॥ ४० ॥
भाग्यबळें धनवानबळें निजदैवबळें बहु युक्तिबळें ॥
कीर्तिबळें हरिभक्तबळें बघतां अधिकत्व जया अगळें ॥
रूपबळें उरजीतबळें भलतें नवशासित तूज कळे ॥
पाव खुणेस तुं नीति असी मम तेथ समुद्भव अंश फळे ॥ ४१ ॥
यापरि या बहुता विभुती तुज जाणुनि काय प्रयोजन पार्था ॥
एक अंशेंकुन सर्व हि हें जग व्यापुनि राहतसें सम सत्ता ॥
जे बहु ढीग च साखर गोडिस भेद नसे विवरोनि पहातां ॥
अर्जुन प्रार्थिल ते कवणेपरि विश्वरूपी हरि होईल आतां ॥ ४२ ॥

## दशमोऽध्यायः समाप्तः

---

## अध्याय ११.

श्रीपतितें विनती करि अर्जुन काय किती उपकार वदावा ॥
मी जड मूढ तरें म्हणुं सांगुनि गुह्य हरी हरिला भवगोवा ॥
जे हर नारद व्यास शुकादिक स्वानुभवीं निजज्ञानविसांवा ॥
पावति त्या वचनें अवघा मम मोह चि हारपला गुरुदेवा ॥ १ ॥
आइकलें अति विस्तर सर्व भुतें तुज पासुनि निश्चित होती ॥
आणि जसे उदकीं जळबुंद्[२]बुद लीनें[३] तशी तुज माजि समाप्ती ॥

---

३८ उशना=शुक्राचार्य. ३९ चार उपाय=साम, दान, भेद, दंड. १०० परादि=परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी. १ शत्रुनिकंतन=शत्रुनाशक. २ बुद्बुद=बुडबुडा. ३ लीन=लपलेला.

तूं अज अव्यय हा महिमा तुझिया वचनें मन येत प्रतीती ॥
हे कमला[४]यतलोचन सद्गुरु श्रीहरि दीनदयाकर मूर्ती ॥ २ ॥
हे परमेश्वर तूं अपुणें अपुणा कथिसी मज जे परि जैसा ॥
तो मज प्रत्यय स्वानुभवें समबिंबतसे हृदयांत हि तैसा ॥
एक मनोरथ हा उपजे तुज पाहिन लोचनिं विश्वविलासा ॥
भक्तसुरद्रुम हे पुरुषोत्तम चिद्घन चिन्मय पूर्णपरेशा ॥ ३ ॥
जाणसि तूं मम नेत्र तुझें रूप दाखवशील तयासि पहाती ॥
हे प्रभु देव कुलेश्वर श्रीपति योगपती पुरवीं तरि आर्ती ॥
अव्यय दिव्य निजात्मरूपाप्रति दाविसि हा मन निश्चय चित्तीं ॥
या वचनें हरि प्रेम न सांवरिं एकसरा भुलला प्रियभक्ती ॥ ४ ॥
देव म्हणे भवतापविमोचन दिव्य शतें शत माझि रूपें हीं ॥
हे विर अर्जुन वर्ण बहूविध आकृति दिव्य सहस्त्र तुं पाहीं ॥
काय अशक्य तुझें तुझिया घरिं ग्लानि किती अति सावध राहीं ॥
या स्वरूपांत मनेच्छित देखिसि वाण[५] नसे अवलोकनिं कांहीं ॥ ५ ॥
विश्वरूपीं पृथकाकृसि न्याहळिं दिव्य जया नयनीं रवि बारा ॥
अष्ट वसू मुखि तिष्ठत मेळविती भृकुटी अकराजण रुद्रा ॥
सोम[६]मयादिक वायु धँनाधिप देखसि हा जिवलोकपसारा ॥
दृष्ट नसे पहिले कवणाप्रति अद्भुत चित्रें तुझ्या अधिकारा ॥ ६ ॥
या मज विश्वरूपी शरिरावरि हे कुटिलालक पाहें निवाडें ॥
एकरूपीं जग स्थावरजंगम रोममुळीं दिसती विधिअंडें[९] ॥
आणि तया परतें पहसी तरि त्याविषयीं तुज कांहिं न कोडें ॥
पाहत कीं, न च पाहतसे विर अर्जुन ज्यापरि होउनि वेडें ॥ ७ ॥
काय न पाहसि देव पुसे तंव अर्जुन बोल म्हणे कवणाशीं ॥
स्तन्यप[१०] बाळक त्याप्रति लाडुक घालितसा वदनी प्रतिघांसीं ॥
सत्य म्हणे हरि शक्य नव्हेस तुं या नयनें मज विश्वरूपाशीं ॥
देखसि ते तुज दिव्य सुलोचन देत कृपेस्तव मी हृषिकेशी[११] ॥ ८ ॥
संजय बोलतसे धृतराष्ट्र असें वदतां हरि योगपती ते ॥
दिव्य प्रभा प्रगटे तम नाशित तेज भरे नयनीं गगनातें ॥
देखतसे तव रूप महद्भुत जें निगमासि[१२] न ये वचनातें ॥

४ आयत=दीर्घ. ५ वाण=कमताई. ६ सोम=चंद्र. ७ [illegible] ). [illegible] अत्यद्भुत [illegible] ...त्कारिक. ९ विधिअंडें=ब्रम्हांडें. १० स्तन्यप- [illegible] वतसे=म [illegible] हृषीकेश=हृषीक + ईश=इंद्रिय [illegible] हाग [illegible] ...सें. [illegible] ...सोम्याचा [illegible] सि मिळणारें.

जें परमोत्तम पूर्ण परात्पर अक्षर अव्यय बोलति ज्यातें ॥ ९ ॥
त्यांत प्रभेंत पहांत धनंजय तों दिसती वदनें अगणीतें ॥
लाहन थोर निमासुर भ्यासुर काळकराळ किती अतिशाते ॥
नेत्र उदंडे[13] उदंड चि ते भुजदंड धरी बहुतायुध हातें ॥
दर्शन दिव्य महद्रुप त्यावरि आभरणें अधिकें समकातें ॥ १० ॥
दिव्य पितांबर दिव्य फुलें हरिचंदन दिव्य विलेपन आंगा ॥
ज्या भुति दृष्ट विधी व दें नेणति त्या किरिटी नयनें हरिनोगा ॥
सर्व विचित्रमया हरि विश्वरुपास न ठाकत दिव्य अपांगा[14] ॥
विश्वमुखा श्रुति गाति प्रतीतिस साक्ष अवंत पुरे गुरुसंगा ॥ ११ ॥
ईश्वरविश्वरुपीं च महात्मक त्या हरिचें किति तेज वदावें ॥
द्वादश एक असे दिवि[15] सूर्य शतेंशतशा गणतीस गणावे ॥
ते अवघे उदयाप्रति एक चि वेळ नभीं करिताति उठावे ॥
ते विवसा दिवही परि होइल हो तरि येथ असो उपमावे ॥ १२ ॥
त्या बहु विश्वरुपा हरिची तनु एक तयांत हि अंश पहातां ॥
रोममुळीं विविधाकृति हें जग होउनि जात लया लवें[16] होता ॥
सोहागियांतें[17] जसे भ्रमती अणुरश्मिमुळें[18] दिसताति समस्तां ॥
पाहुनि अर्जुन ते समयीं गति कोण तया श्रुणु कौरवनाथा ॥ १३ ॥
विस्मय दाटतसे मन व्याकुळ होत असे पाहणें पाहण्यातें ॥
चित्त हि चित्तपणा विसरे धिर बुद्धि न घे अहंता हि न तेथें ॥
कंपित सर्व शरीर सगद्गद रोम उभारत सर्व तनूतें ॥
वंदुनियां शिरसा कृत अंजुलि अर्जुन बोलत विश्वरुपातें ॥ १४ ॥
पाहतसें तुज विश्वरुपावरि सर्व हि निर्जर[19] हे स्वपदेशीं ॥
त्या च परी भुत पंचेकं फार यवे दिसती जन भिन्न जगाशीं ॥
हा विधि कीं कमलासन शंकर स्वस्थळ शोभविती स्वगणेशीं ॥
नांदत सर्प तळातळ देखिल हा तपलोक हि + + + + ॥ १५॥
पाहतसें जिकडे तिकडे भुज नेत्र हि त्या परिचे दिसताती ॥
हीं भवतीं उदरें हि अमित्य चि विश्वरुपीं नभ व्यापुनि ठाती ॥
देखतसें हरि विश्वरुपासि [ मि ] आइक तें कथिताहें प्रतीती ॥

---

आर ... १४ अपांग=नेत्रकटाक्ष. १५ दिवि=आकाशांत. १६ लव=अत्य-
आणि जसे उ५. ...खिडकींत. (सोलापूर प्रांतीं धाब्याचे घरांना उजेड येण्या-
१८ उशना=शुक्राचार्य. ११ चार उपावेदणीं म्हणतात) १८ रश्मि=किरण. १९. निर्जर=
श्यंती, मध्यमा, वैखरी. १ शत्रुनिकृंतन=शत्रुनाशक. २कुाशु.

येक मला पहतां न दिसे ऑदि अंत न मध्य कृपाघनमूर्ती ॥ १६ ॥
आणिक ही खुण पाहतसें पण मोडि च ना पहिल्या मुगुटाची ॥
तें चि हरीकरिंचें हि सुदर्शन आणि गदा मग ठाउक ते ची ॥
हे पण दीप्ति विशेष लखाखित झांपड लागत सर्व दृगांची[21] ॥
फार रवी प्रळयानळ देखिल ते समता न पवे चि जयाची ॥ १७ ॥
मानित मी तुज तूं परब्रम्ह परात्पर अक्षर निश्चित होसी ॥
जाणियासि[22] तुं योग्य हरी परि नित्य निधान[23] तुं विश्वे[24] जनासी ॥
अव्यय धर्म पुरातन शाश्वत तूं चि तुं जाणसि आपणियासी ॥
तूं चि सनातन तूं पुरुषोत्तम चिद्घन अव्यय चित्सुखराशी ॥ १८ ॥
आदि न मध्य न अंतविहीन तुं वीर्य उदंड अपार करांचा[25] ॥
नेत्र शशीरवि खेळवि तुंदिल भ्यासुर भासत भाव रुपाचा ॥
आणि मुखीं भडके हुत भक्षक[26] ज्वाळ उठे अति दाह तयाचा ॥
तापन विश्व क्षणें करि लाहि च भें[27] न रिघे उदरीं कवणाच्या ॥ १९ ॥
ठाव रिता तुजवीण नसे चि तुं एक चि व्यापक सर्व दिशांतें ॥
व्योमघरां तळ अंतर बाहिर तूं चि उभा दिससी नयनांतें ॥
हे तव उग्ररुपा प्रति देखुनि लोक तिहीं धरताति भयातें ॥
तूं सकाळांतर आत्मरुपीं तरि अद्भुत कां भय दाविसि येथें ॥ २० ॥
पैल समस्त हि देव मिळोनि तुतें मिळती तुजमाजि च येतां ॥
येक भयें थर कांपति प्रार्थिति श्रीकरुणाघन देव अनंता ॥
आणि महा ऋषि सिद्ध समस्त हि स्तौति तुतें म्हणती गुरुनाथा ॥
सर्व मुखें स्तविती स्तव पुष्कळ त्राहि हरी शरणागत आतां ॥ २१ ॥
रुद्र वसू रवि विश्व मरुद्गण अश्विनिपुत्र गणादिक सारे ॥
यक्ष पिशाचक खेचर सिद्ध समस्त हि निर्जर मेळ पसारे ॥
साधन साध्य स्वयें जग कल्पिति ते तुजपासुनियां भयशारे ॥
काळजि पावत विस्मित लक्षिति दिव्य महद्भुत विश्वरुपा रे ॥ २२ ॥
हे हरि थोर भुजा तुझिया अति रुप भयानक देखुनि वाटे ॥
फार हॅस्त बहु नेत्र बहू पद फार उरु बहु मस्तक पोटें ॥
फार उभें मुख दांत भयानक दीर्घ करों[28] न झांकति वाटे ॥
लोक भयें अति दुःखित ते किति प्रस्तुत मी मज माजि च मोठें ॥२[illegible]
कां पसरोनि मुखाप्रति तिष्ठसि हें जग ग्रास नव्होचि [illegible]भूत [illegible]

२१ दृगांची=डोळयांची. २२ जाणियासि=जा[illegible]तसे=[illegible]त्त. [illegible] प). [illegible]
[illegible] २५ कर=हात. २६ हुतभक्षक=अ[illegible] [illegible] ॥ [illegible]=घुबड. ७ सुधाकर=

वाफ नभा कवळीत धडाडित ज्वाळ उवाळ बहूविध वर्णी ॥
नेत्र विशाळ स्वतंत्र चिता वित देखुनियां तुज या नयनांनीं ॥
झांपडि पावुनि पोळत अंतर धीर हरी गवसे न निदानीं ॥ २४ ॥
भ्यासुर शूळ तसे अति तिक्षण दांत कराळ अती मुखिं काळे ॥
दीप्ति जशी प्रळयानळ जाळित कीं प्रळयीं रविचे बहु मेळे ॥
देखुनियां भय प्राण पिशाच दिशाभुलि अंतर निश्चित पोळे ॥
हे करुणाघन तूं जगव्यापक कीं मजला सुख अल्प न मीळे ॥ २५ ॥
पैल समस्त हि हे धृतराष्ट्रतनूज ससैन्य समस्त हि राजे ॥
सारथि [३०]सैन्ये हया सह हे रथ जे मिनले बहु संगरकाजें ॥
भीष्म गुरू [३१]सुतपुत्र रवीसुत सैनिके [३१] ही अमुचे दळिंचे जे ॥
यापरि सर्व दळें उभयांचि च आजि दिसे वदनीं तुज [३२]खाजें ॥ २६ ॥
येकसरें वदनीं तुझिया निघती अति सत्वर दाटि विरांची ॥
दांत भयानक अग्र न लाविसि ग्रास दिसे पुरता न भरे ची ॥
सिंहमुखीं जसि [३३]पीपिलिका मजभक्षण [३४]सर्षप त्या चवि कैंची ॥
तेंवि तुझ्या वदनीं बहु मस्तक चूर्ण न माखत कोर जिभेची ॥ २७ ॥
जें धरणीवरि वाहतसे जळ त्यास गती उदधीविण नाहीं ॥
सर्व हि त्याच मुखें पळती दिसती मज तैसिच येथ हि घाई ॥
जो उपजे जन तो तुज सन्मुख येत मुखांत न त्या अनवाही ॥
काय करील अकार अकारण दाहकदीप्ति भयासुर खाई ॥ २८ ॥
तोंड तुझें हरि हें प्रळयानळ त्यांत पतंग दिसे जग मातें ॥
दीपक देखुनि थोर [३५]जेंवें करि घालितसे उडि जो मरणातें ॥
तेंवि तुझ्या वदनीं निघते दृढ वोढवला मरणांत तयातें ॥
धांवत सत्वर मोहर आन नसे वदनेंविण तो कवणातें ॥ २९ ॥
लोक समग्र हि ग्रास नव्हे म्हण जीभ हळाहळि चाटित दाढा ॥
ते हि जशी वडवानळज्वाळ स्वतंत्र चि शेषगणा वित गाढा ॥
तेज जगा अवध्या बुडवी गति एक चि सर्व हि धाडक भ्याडा ॥
उग्रपणा किति वाढविसी जग येत मुखांतिल दाविसि झाडा ॥ ३० ॥
हे हरि देव सुखा मनिं उग्ररूपा तुज वीनवितों नमितों ही ॥
दे वर दीनदयाकर होय प्रसन्न कृपा करिं जी लवलाहीं ॥
...पति पाळक चाळकसा विसरे करिसी हरि लाही ॥
आणि जस...

---

२८ उशना=शुक्राचार्य. २९ चार ... ३१ सैनिक=शिपाई. ३२ खाजें=खाद्य. ३३ ...
श्यंती, मध्यमा, वैखरी. १ शत्रुनिकृंतन=शत्रुनाशक. ...वेग.

अस्तगिरी न पवे रवि मध्य चि दोप्रहरां निशि होत ची नाहीं ॥ ३१ ॥
विश्वरूपी हरि बोलतसे जगभक्षक मी क्षय काळ जगाचा ॥
वाढतसें जगसंहरणीं नयनीं तुं हि देखसि नाश तयाचा ॥
तूजविना जग काळवशा पण ये समयीं पुरला दिस यांचा ॥
जे तुजसीं समरांगणि तिष्ठति युद्ध करूं म्हण त्या च दळाचा ॥ ३२ ॥
यास्तव ऊठ त्वरें करिं घे धनुबाण करीं अति दारूण मारा ॥
शत्रु पराभउनी यश पावसि राज्यसंवृद्धिस भोगिसि फारा ॥
म्यां वधिले पहिले चि हे निर्जिव चित्रिंचिया सनल्या दळभारा ॥
नीवँटणें किति क्लेश निमित्त तुं होउनि संहार अर्जुन वीरा ॥ ३३ ॥
द्रोण गुरूवर भीष्म अजा म्हण कां धरिसी मनिं फार अशंका ॥
कर्ण जयद्रथ आणिक ही धिर ते तुज सन्मुख नेविं अँवीका ॥
म्यां वधिले वधिं आधिच निर्जिव शोचुं नको धरिं धीर अवांका ॥
जिंकुनि दाइज दुर्जन अर्जुन सज्जनसे प्रगटें तिहिं लोकां ॥ ३४ ॥
संजय बोलत विश्वरूपाहरिचीं वचनें जंव अर्जुन ऐके ॥
जोडुनियां कर कँर्धर नम्र करी भय अंतरिं सन्मुख ठाके ॥
कंठ सगद्गद लावित लोचन उग्रपणा अवलोकुनि धाके ॥
आणि म्हणे प्रणिपात तुला पुढती पुढती मज सद्गुरु राखें ॥ ३५ ॥
या स्थळिं मी तुझिया महिमें हरि केवळ हर्ष चि पावत नाहीं ॥
कां म्हणसी तरि कीर्ति तुझी जनिं हर्षविषाद करी उभयांहीं ॥
राक्षस भीउनि दूरि दिशा पळती नमिती ऋषि सिद्ध मुनी ही ॥
हे हृषिकेश तुं येक चि कीं भय हर्ष वसे तुजमाजि च पाहीं ॥ ३६ ॥
कोणि हि हा महिमा तव नेणति कां तरि आदि तुं सर्व जगाची ॥
तो सृजिला विधि तेयुनि उत्पति काय कळे तुज जाणसि तूं ची ॥
अंत नसे तुज देव गुरू तुं चि व्यापक अक्षर हे खुण साची ॥
शाश्वत आणि अशाश्वत याहुनि जें पर तें म्हणिजे तुजला ची ॥ ३७ ॥
तूं जगदेव किं आदि पुरूष तुं फार जुना म्हण गाति पुराणें ॥
या हरि विश्वरूपाचि तुं मांदुँसे जाणसि तूं पण कोणि न जाणे ॥
जाणुनि यांस तुं जाण हरी परब्रम्ह तया तुज माजि च ठाणें ॥
व्यापक विश्व तुं येक अनंत रुपें म्हण वोळखिजे तुज कोणें ॥ ३८ ॥
वायु तुं सर्व भुतां प्रति चाळक न्यँामक तूं यम सर्व भुतांचा ... भूत ...

३६. निवटणें=मारणें. ३७ अविक=मेंढा, शेळी. ३खतसे=... ). ... साधन
पेटी ( सं० मंजूषा). ४० न्यामक=नियामक ... काचळ=सोम्याचा
...स मिळणारें. २६

वन्हि तुं सर्व भुतां जठरीं वरूणें जग पोसिसि स्वामि रसांचा ॥
चंद्र भुतां प्रति वाढविसी जग निर्मिसि तूं चि प्रजापति साचा ॥
तूं चि पितामह तूज नमो पुढती तुज वंदन कॉयिन वाचा ॥ ३९ ॥
लक्षगुणी तुजला चि नमो हरि सन्मुख ही तुजला हि नमो ॥
पाठिकडे तुजला चि नमो हरि सर्वरूपा तुजलागिं नमो ॥
फार पराक्रमि तूज नमो बहु वीर्य तुझें तुजलागिं नमो ॥
सर्व हि व्यापक तूज नमो सकळां प्रतिपाळक तूज नमो ॥ ४० ॥
नेणुनियां तुज फार हरी अपराध किती म्हण आठवुं आतां ॥
देहसमंध करूं तुजसीं अरे ये हरि ये हरि ये यदुनाथा ॥
सभ्यसभेसि तुं ठोसर होउनि हीन वदों तुजलागिं अनंता ॥
हा महिमा न कळेचि तुझा करिं सर्व क्षमा मज रुक्मिणिकांता ॥ ४१ ॥
आणिक ही अपराध हरी उपहास विनोद टवाळित जाला ॥
आसनमंचकिं लोळतसें घसटोनि तुतें न धरीं च भयाला ॥
भोजन येउनि नास करीं रुसणें फुगणें समजाव न केला ॥
ते निज माय समाविसि पोटिं च कोटि चुकी विनवूं कवणाला ॥ ४२ ॥
लोक चराचर बाळक हे हरि तूं जनिता लघु हे गुरु होसी ॥
वंद्य जगाप्रति ते तुज वंदिति सेव्य नसे तुजवीण जनासी ॥
तुल्य नसे तुजसीं जनिं श्रीपति गोष्टि अशी न करूं अधिकांसीं ॥
तेथ निरूपम हा महिमा उपमा रवितें करि जे रवि ऐसी ॥ ४३ ॥
वास्तव तूज नमो इश वंद्य तुं सर्व क्षमा करि गा अपराधा ॥
बाप सुताप्रति सज्जनॉ सज्जन कां अथवा ललना प्रति मेधीं ॥
तेविं तुझाच मि आवडता हरि शांत करीं अनिवारण क्रोधा ॥
सांठविं हें रुप थोर भयानक होय बहू मजला भयबाधा ॥ ४४ ॥
देखति तूज न कोणि कधीं म्हण देखिलिया सुख देखुनि भ्यालों ॥
कांपतसे मन धाकत काळिज उग्रपणें बहु दुःखित झालों ॥
श्यामल कोमल रूप मनोहर आठवतें म्हण सन्मुख ठेलों ॥
तें मज दाउनि सांठविं व्यापक पूर्णमनोरथ सद्गुरु धालों ॥ ४५ ॥
हे बहु हात अपार मुखें मज चारि भुजा रूप दाविं कृपेनें ॥
सौम्य शिरीं उजळे शुभ कीरिट चक्र गदा धरिसी अति मानें ॥
आणि जसे तरि दोंचि करीं वदिजे तरि मंजुळ येक मुखानें ॥
...नसें बहु जाकळलों[४३] जिविं विश्वरूपानें ॥ ४६ ॥

३८ उशना=शुक्राचार्य. ११ चार ... श्यंती, मध्यमा, वैखरी. ? शत्रुनिकंतन=शत्रुनाश. ४३ जाकळलों=घाबरलों.

देव म्हणे तुज दाखविलें रूप तत्वविचारण याहि परौतें ॥
जें प्रतिभामय ज्यां च दयेस्तव दृश्य नसे तुजवीण दुजातें ॥
शाश्वत आद्य अनंत निरूपम लक्षिति अंतरिं योगि जयातें ॥
भीउं नको मनिं हें चि धरीं मग उद्धरसी भजनें आणिकांतें ॥ ४७ ॥
यज्ञ करीं बहु लभ्य नव्हे नव्हें सांग हि वेद बहू पठणानें ॥
कर्म क्रिया बहु आचरसी पण देखसि ना बहुधा करिदानें[४४] ॥
[४५]आटण सर्व धरा करितां न दिसे च कधीं करि उग्र तपानें ॥
हे कुरुनंदन मानवलोकिं न देखियलें तुज वांचुनि आनें ॥ ४८ ॥
देखुनियां मम घोर असें रूप या नयनें करिं मूढ न भावो ॥
टाकुनि सर्व भयाभय प्रीत मनें करिं कां दृढतेचॉचि ठावो ॥
देह तुझें करुं सर्व हि कारण चित्त अहर्निशि मद्रुप पाहो ॥
मागति तेथुनि काढिसि तूं म्हणि हे निकरें खुण सांगत देवो ॥ ४९ ॥
बोलत संजय श्रीहरि येरिति बोधुनि अर्जुन लाहन झाला ॥
दाखविलें निज रूप चतुर्भुज आणि [४६]समोखितसे बहु ज्याला ॥
भक्त सुरद्रुम इच्छित सिद्धि च नाचतसे प्रिय पांडव बोला ॥
लाहन थोर पुन्हा रूप लाहन या परिचा हरि होउनि ठेला ॥ ५० ॥
अर्जुन बोलत देखियलें तव मानुष रूप जनार्दन आतां ॥
सौम्य चतुर्भुज हें अतिसुंदर श्यामल आवडतें बहु संतां ॥
स्वस्थ मि निश्चित ये समयीं हरि दुश्चितता हरली भयचिंता ॥
हें परिसोनि हरी झिडकारित सांगितलें चुकसी म्हणि पार्था ॥ ५१ ॥
जें रूप [४७]पहाणिया अतिदुर्लभ तें तुज दृष्टिस गोचर झालें ॥
त्यास उपेक्षुनि यां यव्हां पाहसि सांग चतुर्भुज आवगवीलें ॥
जें रूप देव विधी हर इच्छित त्या च निमित्त अनुष्ठित ठेले ॥
त्या न दिसे तुज ऊघड तें पण काय [४८]गर्वार्पण ऊबगियेलें ॥ ५२ ॥
ना मज जेरिति देखियलें तसें वेद पढो पण शक्य नव्हेती ॥
उग्रतपें करु दान उदंड चि याग यजू मज काय पहाती ॥
निर्फळ ही म्हणसील कदाचित ती हि स्व शक्ति तशा फळ देती ॥
जे मजला भजती फळ त्यांस मि या कथिल्या तुजला बहु युक्ती ॥ ५३॥
चंद्र चकोर किं माय सबाळक यारिति जो मनलागिं उपासी ॥
जो मजवांचुनि आणिक नेणत येक च सर्व हि मी च जगद्भूत [illegible]

४४. करि=हत्ती. ४५. आटण=फिरणें. ४६ समोखितसे=[illegible]त्त. [illegible] ४७ [illegible] साधन
४७ पाहणिया=पाहण्यास. ४८ गवार्पण=ग[illegible] [illegible]काचक=सोम्याचा
[illegible]पास मिळणारें. २६

या निजभक्तिलगें मन जाणति मी अज अव्यय जो अविनासी ॥
देखति अंतरिं त्यापरि बाहिर तत्व मि व्यष्टि समष्टिरूपेंसी ॥ ५४ ॥
कर्म करी मज अर्पण मत्पर संग त्यजी ऋतु कर्मफळाशा ॥
सर्व भुतीं मज लक्षितसे म्हण वैर नसे भुतभेद विरेशा ॥
होउनियां निरहंकृति ऐक्यपणें भजतो मज तो परि कैसा ॥
तो मज पावतसे मग अर्जुन येथकरी विनतीस परीसा ॥ ५५ ॥

---

## अध्याय १२ वा.

अर्जुन वीनवितो हरि शाश्वत भक्ति लगे तुज जे मिळताती ॥
आणि निरामय अद्वय अक्षर योगपथें पथ जाणुनि घेती ॥
या उभयां तुज मानि च संग्रह जाणवला मज निश्चय चित्तीं ॥
एक असे पुसणें सुगमें सद्योग तुझा कवणा प्रति प्राप्ती ॥ १ ॥
श्रीभगवंत म्हणे मज युक्त चि होउनि आवडिनें भजती जे ॥
अर्पुनियां मज मानि मनीं वदनीं श्रवणीं धरि सद्गुण माझे ॥
सर्व भुतीं मजलागिं विलोकित नाचति जे मज जाणुनि भोजें ॥
त्यांस मि मानितसें परमोत्तम युक्त मसीं चुकलें भवओझें ॥ २ ॥
जें प्रणवापर अक्षर अद्वय आणि नव्हे अमुकें मन कांहीं ॥
व्यक्तिस ये न कदा कवणे परि सर्व गत ध्रुव निश्चल पाहीं ॥
चिंतन चित्त करी परि हिंपुटि तें तों अचिंत्य नया लग नाहीं ॥
देहबळें असें येक उपासिति जेविं नभा कवळूं म्हणें बाहीं ॥ ३ ॥
सर्व हि इंद्रियवास्ति जयांत असा मनइंद्रियग्रामें नियामी ॥
षड्डर्मि जो कथिला तुजला सुखदुःखसमी समबुद्धि यॉ नामीं ॥
जे मज पावति सर्व भुतीं हित मी च मला रत भक्ति सवर्मी* ॥
ते चि परी मज हे हि उपासक पावति आधिक कष्ट चि कामीं ॥ ४ ॥
जेथ नसे अविलंब असे स्थळि चित्त असक्त बळें करिता तीं ॥
यावरि हें चि करूं म्हणती तरि क्लेश फळासि च ग्राहिक होती ॥
देहवतें गति अक्षय इच्छिति दुःखविशेष अधीकाचि प्राप्ती ॥
बाहुबळें जसें पार महोदधि सांग कसे रितिनें तरताती ॥ ५ ॥
वर्णविशेष विधीवत कर्म समर्पण आचरणें मज कीजे ॥
आणि वाचिक मानस मत्पर कीर्तन सेवन ध्यान हि माझें ॥

---

४८ उशना=शुक्राचार्य. ४९ अविनाश. ५० अक्षर=अविनाश. ५१ प्रणव=ओंकार. ५२ [पर]श्यंती, मध्यमा, वैखरी. १ शत्रुनिकृंतन=शत्रुघ्न.

पक्षिणिचीं पिलिं मायेस चिंतिति कोकिळिका कुसुमावरि[५४] कूजे[५५] ॥
ज्ञानपथें मनसी निज ऐक्य चि साधुनि सर्वभुतीं भजले जे ॥ ६ ॥
त्यासि मि तारितसें भवसागरिं जो जननें मरणें भरलासे ॥
जे समयीं मजला शरणागत ते चि घडी दृढ लावुनि कासे ॥
भूतहितीं रत यास म्हणो जन उद्धरती भजनें अनयासें ॥
ध्यानमिसें मजला जडले मग भिन्न नव्हे लहरी[५६] जळ जैसें ॥ ७ ॥
यापरि तूं अपुलें मन दे मज माजि समस्त हि व्यावृति सांडीं ॥
बुद्धिस निश्चयपूर्वक ध्यानमिसें सगळी मज माजि च मांडी ॥
यारितिनें मज माजि च येसिल मद्रुप होउनि ठासि अखंडी ॥
यावरि संशय कांहिं नसे मज अक्रिय मी मज हो पडिपाडी ॥ ८ ॥
यावरि चित्त तुझें मन बुद्धिसि नेमुनियां मज देउं सकेना ॥
कां म्हणसी तरि चंचळ फार स्वभाव चि येक निमेष[५७] थिरेना ॥
यासि सदा सिकवीशिल येइल जाण हळू च पळें पळ ध्याना ॥
ध्यानबळें मग मद्रुप होइल अर्जुन येथ नसे अनमाना ॥ ९ ॥
हें हि नव्हे तरि आणिक आइक त्यागुं नको सहसा निजकर्मा ॥
आचरणें विधिनें निरहंकृति पाळण सर्व करी कुळधर्मा ॥
जें करणें तितुकें मजलागिं च मत्पर कर्म अशा निज वर्मा ॥
जाणुनि मत्पर सिद्धिस पावति मद्गुण गा स्मर तूं मम नामा ॥ १० ॥
मत्पर कर्म असा मम योगि निजाश्रय हा जरि होउन ये ना ॥
कां म्हणसी तरि चंचळ चित्त अखंडितता नियमें श्रम नाना ॥
पाहुनि सांगतसें सुगमास हि कर्मफळास चि त्याग कराना ॥
भर्जित[५८] बीं नुगवे कवणेपरि त्याग फळीं तरि संसृति ध्याना ॥ ११ ॥
उत्तम काय असें म्हणसी तरि अभ्यसनें निज ज्ञान करावें ॥
ज्ञान हि तें मज सर्वभुतात्मक येकचि जाणुनि ध्यान धरावें ॥
ध्यासक ध्येय चि होइल यावरि कर्मफळा कवणें उरवावें ॥
त्याग असा घडतां सहज स्थिति अक्षयि मोक्ष सुखास मिळावें ॥ १२ ॥
मद्रुप यास्तव तो निरहंकृति साहतसे सुखदुःख क्षमेतें ॥
माझें[५९] म्हणे परि द्वैत नसे मग निर्ममता सहजें च तयातें ॥
तो कवणेपरि आइक ते स्थिति सर्व भुतात्मक जाणुनि मातें ॥
द्वेष नसे निज आत्मपणें करुणा आणि सख्य हि सर्व भुतां[illegible]

५४ कुसुम=फूल. ५५ कूज=शब्द करणें. ५६ लहर=लाट [illegible] भूत [illegible]
लवण्यास लागणारा काळ. ५८ भर्जित=भाजलेलें [illegible]

लाभ अलाभ निजात्मसुखें सुख तोषत पूर्ण अखंडित योगें ॥
नेमुनियां मन त्या च सुखीं रत बुद्धिस निश्चय अद्वय आंगें ॥
अर्पण ये रितिनें मन बुद्धिस जो मजमाजि करी समसंगें ॥
तो मज आवडतो हरिभक्त किती म्हण आवडितें तुज सांगें ॥ १४ ॥
लोक समस्त हि जाणतसे तनु आणि अवेवें[९] न भिन्न कदा ही ॥
लोक हि त्या प्रति जाणति कीं निव प्राण नया मुळिं द्वैत च नाहीं ॥
हर्ष विषाद नसे जग आपण यास्तव भेद भयादिक कांहीं ॥
बाधि च ना मज तो बहु आवडता निज भक्त कथूं अनकांहीं ॥ १५ ॥
मूळ अनिच्छ असा अनपेक्ष शुची बहु निर्मळ स्वानुभवानें ॥
कोंठ न गुंतत ताप तिन्ही निरसोनि सुखी गुरु देव दयेनें ॥
सर्व हि कर्म करी निरहंकृति अक्रिय त्याग घडे सहजानें ॥
आवडता मज तो निज भक्त तशी प्रिय मी कमळा न हि मानें ॥ १६ ॥
स्व स्वरूपाप्रति पाउनि हर्ष तरी मुळ तें चि तयास्तव ये ना ॥
वस्तुविना दुसरें न दिसे म्हण द्वेषि च ना विषयादिक नाना ॥
नें अपुलें अपुणा जवळी म्हण शोचन कांक्षण कांहि करीना ॥
भक्तिसुखें मज आवडता मग कर्म शुभाशुभ त्यासि बघीना ॥ १७ ॥
घातक हीतक दोघ समान चि त्या च परी अवमान हि मान ॥
संगविवर्जित त्या म्हणिजे दुसरें चि नसे हरलें भवमान ॥
आतप[६] शीत समान चि साहत पूर्णपणें सुख दुःख समान ॥
एकपणें जगव्यापक एक चि पूर्ण सदां भरला नभमान ॥ १८ ॥
निंदक स्तावक दोघ समान चि आपण ही न करी अणिकांची ॥
बोलतसे परमार्थक सार्थक मौन्य तया घडलें सहजेंची ॥
तुष्टत ब्रह्मपणें भलतेंनासि ब्रह्मदशा करितो मिळत्याची ॥
ब्रह्ममति स्थिर भक्ति भजे मज तो नर आवडता मजलाची ॥ १९ ॥
हें इतुकें निज भक्तिकथामृत आइकलें अवघें चि उपासीं ॥
आवडिनें चढता भजतो मज एकपणें रत भक्तिसुखासीं ॥
नातरि भक्तिचरित्र चि वर्णिति भक्तपुजा कुळदैवत तैसी ॥
भक्त तसा प्रिय तो हि मला निज भक्तिस आवड ते मज ऐसी ॥ २० ॥

१२ वा अध्याय समाप्त.

आंग

---

१८ उशना=शुक्राचार्य.
आतप=ऊन.
श्यंती, मध्यमा, वैखरी. १ शत्रुनिकृंतन=

## भगवद्गीता अध्याय त्रयोदश.

देव म्हणे तुज भक्त निरूपण सांगितल्यावरि ज्ञान कथावें ॥
आइक अर्जुन तें कवणेपरि या शरिरास चि क्षेत्रें[61] म्हणावें ॥
यास बऱ्या रिति जाणतसा तरि तो तिवुक्याहुनि भिन्न स्वभावें ॥
क्षेत्र तुं जाण तया म्हणिजे दृढ निश्चय होय तसें परिसावें ॥ १ ॥
हे भरतोत्तम सर्व हि क्षेत्र विचारुनि जाणत क्षेत्रपती ही ॥
तो मिं असें समजें मजवांचुनि क्षेत्र नव्हे अणि क्षेत्रक्रिया ही ॥
क्षेत्रविदां[62] प्रति जाणतसे अणि क्षेत्र हि जाणतसे अवघें ही ॥
ज्ञान तयास चि मानितसे मम उत्तम याहुनि यां मत नाहीं ॥ २ ॥
क्षेत्र कसें किति यांत विकारि[63] अगोचरें[64] गोचरें[65] हो रचिलेंसे ॥
कोण न या मिळती मिळती किति विस्तर आइक सर्व हि कैसें ॥
हें अवघें तुजला चि निरूपिनें[66] सावध होउनि सुस्थिर बैसें ॥
पाहति यासि विचाररिति फार ऋषी अपुले अपुले मनिं ऐसें ॥ ३ ॥
येक म्हणे जिव येक म्हणे शिवें[67] येक म्हणे प्रकृतीस[68] चि वाना[69] ॥
येक म्हणे मुळकारण ईश्वर येक म्हणे निज कर्म चि नाना ॥
ये रितिनें बहु छंद प्रबंधें[70] ऋषी करिती गित गात तनाना ॥
ब्रह्मपदीं ब्रह्म सूत्र वदे विधि निश्चय क्षेत्र नये अनुमाना ॥ ४ ॥
तें तुज सांगत क्षेत्र कसें तरि पंचभुतें[71] अभिमान सहावा ॥
धी[72] जिव आणिक हीं करणें[73] दश येक चि तें मन इंद्रिय भावा ॥
शब्द श्रुति[74] त्वक स्पर्श दृशीं रूप नासिक वास रसीं रसना[75] वा ॥
वाग विलपिन[76] पाणि क्रिया पद चालति मैथुन सर्ग[77] गणावा ॥ ५ ॥
देखुनियां विषयावरि पोखत लभ्य नव्हे तरि द्वेष पुढारां ॥
आदिविधीमशकांत[78] समान चि तें सुख जें सकळांस हि यारा ॥

---

६१ क्षेत्र=शेत. ६२. क्षेत्रविद्=क्षेत्र जाणणारे. ६३ विकार=फेरफार. ६४ अगोचर=अदृश्य, अगम्य. ६५ गोचर=दृश्य, गम्य. ६६ निरूपिन=सांगेन. ६७. शिव=परमात्मा. ६८ प्रकृति=माया. ६९ वाना=वर्णा. ७० प्रबंध=ग्रंथ. ७१ पंचभूतें=पृथ्वी, आप्, तेज, वायु, व आकाश हीं पंचमहाभूतें. यांपैकीं वायु हा तीन चार तत्वांनीं घटित आहे, आप् दोन तत्वांनीं घटित आहे व पृथ्वी ६३ तत्वांनीं घटित आहे, म्हणून या तिहींतून प्रत्येकास महाभूत म्ह० अनेक तत्वघटित पदार्थ असें म्हणतात. आकाशाचा अंत नसल्यामुळें त्याल[illegible] महाभूत म्हणतात. तेज याची दाहकशक्ति मोठी असल्यामुळें त्यालाही महाभूत म्[illegible] ७२ धी=बुद्धी. ७३ करणें=इंद्रियें (करणं साधकतमं क्षेत्रगात्रेंद्रियेषु च). ७[illegible] ७५ रसना=जीभ. ७६ विलापन=बोलणें. ७७ सर्ग=उत्पत्ति. ७[illegible] त=ब्रह्मदेवापासून यःकश्चित् घुंगुरड्यापर्यंत.

यावीण जें मरणांत चि दुःख चि चेतन चेतवि स्थूल शरीरा ॥
आणि भुतें धरितें बरवी धृति मेळ असा म्हण क्षेत्रपसारा ॥ ६ ॥
क्षेत्र विचारुनि ज्ञान जया हृदयीं वसतें परिसें तरि चिन्हां ॥
मान न घे न वदे निज सत्कृत भूतदया वहतो श्रम नाना ॥
[७९]आर्जव सर्व भुतीं गुरुसेवक जो बघतां उपमा चि दिसेना ॥
अंतरबाह्य शुचि स्थिर मानस आवरिलें विषयांसि स्मरेना ॥ ७ ॥
कां तरि तो विषया[८०]करणातित ज्ञानस्वरूपक आपण जाणे ॥
आणि नसे अभिमान कसा तरि वृक्ष जसा फळलें-पण जेणे ॥
जन्म-जरा-मरणादिक दुःख पुढें असतां अधि सावध होणें ॥
वाट पुढें पडतां घन आधिं च ज्यापरि देउनि कागद घेणें ॥ ८ ॥
पुत्र-प्रिया-पशु-धाम-धनादिक संपति सर्व हि दैवगतीनें ॥
जें अनुकूल उदास तया वरि जेंवि जळांत चि [८१]पद्मिनिपानें ॥
नित्य[८२] निरामय[८३] अद्वय[८४] जाणुनि स्वानुभवें रचितां हि समानें ॥
इष्ट अनिष्ट अशा उपपत्तिस जेणुनि वर्ततसे समज्ञानें ॥ ९ ॥
आणि अनन्य मला भजतो [८५]कनकीं [८६]नगीं कां जल[८७]सैंधवन्यायें ॥
इच्छि च ना मजवांचुनि आणिक चातक जेंवि न घे भुमितोयें ॥
तीर्थ वनें सरिता गिरि-कंदर सेवितसे वसिजे शुभ ठायें ॥
देखुनि जाण चि वीट मनांतुनि ज्ञान च तो न शिणे भवजयें ॥ १० ॥
जें भवसर्गिक ज्ञान अनित्य त्यजी मग आत्मअनात्म विचारी ॥
[८८]ईश्वर तें सह जें चि उडे सदचिद्‌घन अद्वय वस्तु स्विकारी ॥
ज्ञानप्रकाशक तत्त्व स्वयें स्वतसिद्ध चि दर्शन तो अवधारी ॥
ज्ञानपदें असिहीं अठरा समजे विपरीत अपूर्वक सारीं ॥ ११ ॥
ज्ञानप्रकाशक तत्त्व तया प्रति ज्ञेय असें म्हणिजे निज वस्तु ॥
जें सकळादि परात्पर ब्रह्म म्हणों सद तें न घडे असदस्तु ॥
जाणुनि जें अविनाश सुखाप्रति होउनि भोगित जाणिव वस्तु ॥
एवमसत्सदभाव न बोलवरी सकळीं सकळात्मक अस्तु ॥ १२ ॥
येक चि सर्व क्रिया करतें करि येक चि सर्व पदीं गमनातें ॥
येक चि सर्व शिरीं वसतें मुखिं भक्षित देखतसे नयनातें ॥

७९. आर्जव=सरळपणा (ऋजु=सरळ) ८० करणातित (करणातीत) इंद्रियवश ... ८१ पद्मिनी=कमळाचें झाड. ८२ नित्य=शाश्वत. ८३ निरामय=रोगरहित. ८४ ...

...८ उशना=शुक्र. ८५ कनक=सोनें. ८६ नग=दागिना. ८७ सैन्धव=मीठ. ८८

...श्यंती, मध्यमा, वैखरी.

आइकतें सकळां श्रवणीं समव्यापुनि तिष्टत या सकव्टांतें ॥
हें चि म्हणों तरि हें नव्ह यांत चि हेम नव्हे नग यारिति जातें ॥ १३ ॥
सर्वगुणेंद्रियव्यक्त अभासक हेम जसें नग पुष्कळ होती ॥
आकृति-वर्जित हेम चि ज्यापरि ते चि नव्हे गुणइंद्रियव्यक्ती ॥
सक्त नव्हे मन गा धरिलें तरि तद्वत सर्व जगें दिसताती ॥
निर्गुण त्या गुणभोग जसा सुत भोगित कां पैटें द्वैत समाप्ती ॥ १४ ॥
स्थावर जंगम सर्व भुतांतर बाहिर व्यापुनि एक चि राहे ॥
स्थूळ विचारुनि सूक्ष्म सुदृष्टिस लक्ष अलक्ष विलक्षण पाहें ॥
दूर कसें मन बुद्धि अगोचर ज्या स्वरुपीं मन बुद्धि न राहे ॥
मंजुळ गोड सुवासित सुंदर स्पर्श हि ज्ञेय चि जाणुनि घे हें ॥ १५ ॥
भिन्न भुतें दिसती बघतां पण एकपणें अवघ्यांत वसे तें ॥
भिन्न जळीं जळ-बुद्बुंद एक चि दीप्ति बहू उजळी दिपकातें ॥
ब्रह्मरुपें सकळांप्रति निर्मित पाळित विष्णुरुपें सकळांतें ॥
रुद्ररुपें करि संहरणा परि ज्ञेय तदेक चि भिन्न पदार्थें ॥ १६ ॥
जें तम हारक तेज रवी-शशि-मंडळ व्यापुनि सृष्टित फांके ॥
जें नयनीं सकळां प्रगटे मनबुद्धिप्रकाशक होउनि ठाके ॥
ज्ञानविना न कळे कवणास हि गैम्य सुखेंनिवें ज्ञान चि एकें ॥
जें सकळां हृदयीं वसतें म्हण ज्ञेय तया म्हणिजे बुध लोकें ॥ १७ ॥
हें इतुकें तुज क्षेत्र सविस्तर सांगितलें मग ज्ञान समूदें ॥
ज्ञेय जया म्हणिजे बरव्यारिति तें उघडे प्रतिपादुनि बोधें ॥
द्वादशिं जो कथिला तुजला मदभक्त हि सत्य मि तो चि अभेदें ॥
पावतसे मदभाव पुन्हा प्रकृतीपुरुषा कथुं चित्त वसों दे ॥ १८ ॥
जें कथिलें तुज क्षेत्र सविस्तर तें चि क्रियारुप येथ प्रकृती ॥
क्षेत्रविदांसि च या प्रकृतीस्तव सांख्यमतीं पुरुषाख्य वदती ॥
या उभया समजें अवघ्यां मुळ याहुनि वस्तु अरीति परीती ॥
सत्वरजस्तम इंद्रिय-भेद समस्त हि ते प्रकृतिस्तव होती ॥ १९ ॥
कारण इंद्रिय हें चि सतां सतकार्य-फळें सुखदुःख उभीं दे ॥
कारण कार्य क्रिया तिन्हि या प्रकृतीस चि हेतुस कर्मसमंधें ॥
भोग मुळीं सहजें पुरुषासि रितें सुख दुःख अवश्यक जें दे ॥
लोहसमागम अग्निशिरीं घन कीं फुलबद्धनिबद्ध अमोदें ॥ २० ॥

---

८९. पट=वस्त्र. ९० बुद्बुद=बुडबुडा. ९१ गम्य=समजण्यासारखें. ९२ [illegible] साधन [illegible] [illegible]काचळ=सोन्याचा
[illegible]नैव )=सुखानें. ९३ अमोद (आमोद )=सुवास. [illegible]से मिळणारें. २६

जो रूप-नामगुणाविरहीत तया प्रकृती पुरुषत्व अरोपी ॥
देखत ऐकत बोलत चालत भोगित भोग हि सूकृत पापी ॥
निर्गुण जो गुण संग धरी अज अव्यय आत्मपणा प्रति लोपी ॥
कारण उत्तम मध्यम योनिस भोगितसे प्रकृती तव रूपी ॥ २१ ॥
जो प्रकृतीस [१४]अँतीत हि साक्ष नियामक पाळक होउनि भर्ता ॥
भोगितसे निज सर्व हि सृष्टि करी पण आपण शुद्ध अकर्ता ॥
यास्तव यास महेश्वर नाम करीं धरिलें जग पाळुनि हर्ता ॥
या शरिरीं परमात्मक वाचक कीं पुरुषाख्य [१५]परेहुनि पर्ता ॥ २२ ॥
जो प्रकृती पुरुषास गुणां सह जाणतसे कथिल्या परि ऐसा ॥
तो जरि कर्मसमस्त हि वर्तत चंचळ चंद्र जळांतिल तैसा ॥
ऊपजला दिसतो परि तो अज नाश कदा न दिसे अविनाशा ॥
आणि पुन्हा न पडे चि कदापि हि जन्मजरामरणादिक-फांसा ॥ २३ ॥
जो अपणें अपल्यास विचारुनि पाहतसे अपणास चि ध्यानें ॥
येक असा दुसरा प्रकृती-पुरुषास विचारुनि सांख्यमतानें ॥
आणिक कर्मसमर्पण ब्रह्मि च होउनियां निरहंकृति ज्ञानें ॥
यावरि आइक सांगतसे हरि सावध होउनियां शुभ कानें ॥ २४ ॥
आणिक येक न जाणति कांहिं च यांसि भले उपदेशिति जैसें ॥
ते चि हितावह मानुनि निश्चयरूप उपासिति सांगति तैसें ॥
ते तरती भवसागर जो जननें मरणें बहुधा भरलासे ॥
यापरि फार उपाय तुतें कथिले अणखी कथितों चि परेसे ॥ २५ ॥
हे भरतोत्तम स्थावर जंगम सर्व हि जन्मत ल्हान मोठें ॥
जेवि [१६]अगोठिस मेघ क्षिती मिळतां उठती तृण दाटुनि बेटें ॥
कां [१७]ऊखरीं रविच्या किरणें [१८]मृगतोय दिसे परि सर्व हि खोटें ॥
यापरि क्षेत्रपति आणि क्षेत्र मिळे तंव तेथ चराचर भेटे ॥ २६ ॥
सर्व भुतीं सम तंतु पटीं अथवा घट सर्व समान चि माती ॥
कीं बहुधा नग हेम समान चि कारण आकृति नासिति होती ॥
होउनि नास तसा दिसतो परि तो अविनाश बहू भुतव्यक्ती ॥
तिष्ठत या परिच्या परमेश्वर कीं बहु चित्रित एक चि भिंती ॥ २७ ॥
व्योमें [१९] जसें घाटें आणि मठीं सम ईश्वर त्यापरि सर्व हि भूतीं ॥

---

...तीत (अति + इत)=पलीकडे गेलेला. १५ परा=परा, पश्यंती, मध्यमा,
१८ उशना=शु... चोहोंपैकीं पहिली. १६. अगोठ=पावसाळ्याचा आरंभ. १७ ऊखर=
श्यंती, मध्यमा, वैखरी. रेताड मैदान. १८ तोय=पाणी. १९ व्योम=आकाश.

जेंवि बहू दिपकांस प्रभा सम कीं घन-बिंदु-जळें सम होती ॥
पाहति जे निज निश्चयपूर्वक ते परमोत्तम प्राप्तिस येती ॥
ते नव्हती शरिरी परि उत्तम आत्मपणें अपणांत समाप्ती ॥ २८ ॥
सर्व हि जें क्रियमाण चि निर्मित तें प्रकृतीकृत जाणत कर्म ॥
जे मन शुद्धि अहंकृतिपूर्वक भोगविशेषित इंद्रिय धर्म ॥
आणि गुणत्रय तीजकडे सहजें मग अक्रिय जाण निजात्मा ॥
निर्गुण सर्व भुतीं सम एक चि ते हि बुझे तरि सांगत बर्मा ॥ २९ ॥
जेंवि जळीं जळ-बुद्बुद फार कि हे परमाणु जसे धरणीचे ॥
त्यां रविचे [१]करं फार तरी किरणें नग फार जरी कनकाचे ॥
तेंवि पृथग्विध हा भुतभेद सविस्तर येक चि व्यापक साचें ॥
पाहत तद्रुप ते चि घडी बहु भोगित वैभव ब्रह्मश्रियेचें ॥ ३० ॥
हें जड नश्वर होय निमे शरिरांत वसे जळबिम्बपरीचा ॥
त्या न करी आणि लिप्त नव्हे रवि तो नभमंडाळिं आपण साचा ॥
अंत न जो अदि पूर्ण अनादि गुणातित अव्यय आत्मरूपाचा ॥
तो शरिरा न करी न च लिप्त हि व्यापक चिन्मय राशि सुखाचा ॥३१॥
जेंवि नसे अवकाश नभाविण व्यापक सूक्ष्मपणें भरलेंसें ॥
अंतर बाहिर कोंदुनि आपण लिप्त नसे अणु कोठ हि जैसें ॥
सर्व हि देहिं तयापरि ब्रह्म चि व्यापक लिप्त न तेथ निवासें ॥
दीप गृहीं गृहकृत्य न जाणत आत्मरूपा बुझ अर्जुन तैसें ॥ ३२ ॥
जेंवि रवी नभमंडाळिं येक चि सर्व हि लोक प्रकाशित तेजें ॥
वर्तवितो सकळांप्रति आपण सर्व अलिप्त तसा समधी जे ॥
हे भरतोत्तम क्षेत्र-पती तुज सांगितलें बुझ क्षेत्र समाजे ॥
सर्व हि क्षेत्रप्रकाशक तो मि असें म्हणती सहजें यदुराजे ॥ ३३ ॥
यापरि क्षेत्रपती अणि क्षेत्र विचारुनि ज्ञानसुलोचनिं पाहे ॥
अंतर जेंवि रवी-किरणीं मृगतोय-अभास जसें पुर वाहे ॥
सर्प दिसे परि दोर खरा प्रकृती-भुत-मोक्ष यथारिति लाहे ॥
जाणति ते परब्रह्मस्वरूप चि चिद्घन अद्वय पूर्वकृपा हे ॥ ३४ ॥

तेरावा अध्याय समाप्त.

---

## अध्याय १४.

सांगतसे भगवंत कृपाघन जें कथिलें पुढती कथिताहे ॥

१०० कर=किरण.

... ३०. ... ३१. तस्कर=चोर.

जें भव-सर्ग-बहूविध ज्ञान तयाहुनि उत्तम अद्वय आहे ॥
आणि यया परका म्हणिजे तरि ब्रह्मविदा करि ब्रह्म स्वदेहें ॥
जाणुनियां मुनिवर्य समस्त हि आत्मसुसिद्धिस पावत आहे ॥ १ ॥
हें निजज्ञान उपासक ते सद चिन्मय पूर्ण सुखास चि येती ॥
सृष्टि रचे तयिं जन्म न पावति आणि प्रळयीं न मरेती ॥
देहपुरीं वसती दिसती परि ब्रह्मस्वरूपक देह न होती ॥
धर्म असे मम मद्रुप ते मग सर्व भुतें मजपासुनि होती ॥ २ ॥
हे मम योनि जिये प्रकृती म्हणिजे स्वरूपीं विसरे इस माया ॥
जेंवि सुषुप्ति[1] करी अपुल्या विसरें बहु स्वप्न विचित्र भ्रमा या ॥
तेंवि मि ईंत मला चुकली म्हणें गर्भ धरीं दुसरेपण वायां ॥
येकि अनेक भुतें प्रसवे जग देखसि हें बहु भारतराया ॥ ३ ॥
षोडश पंचक आधिक चार अशा जिव लक्ष अभासति भिन्ना ॥
स्थावर जंगम योनि अमूप[2] चि मूर्ति बहू दिसती तुज नाना ॥
मी जनिता प्रकृती जननी जग संतति माझि च मद्रुप जाणा ॥
देउनि बीज मि ती उतरी क्षण मी गुणबद्ध गुणींतित[3] माना ॥ ४ ॥
आत्मपणा विसरे प्रकृतीरूप भाव अहं मम मद्रुप होती ॥
अज्ञमुळें गुण सत्वरजस्तम संभव व्यक्त जनीं दिसताती ॥
देहिं वसें गुणबद्ध दिसें पण अव्यय मी मजला रुढवीती ॥
जेंवि जळीं जळ चंचळ चंद्र चि मानिति ते भ्रमले गुणभ्रांती ॥ ५ ॥
सत्वगुणें अति निर्मळ ज्ञानप्रकाशक पूर्ण अनामय आत्मा ॥
ज्ञान-मदें विसरे अवघा निजदेह-सुखा[4] रत इंद्रिय-धर्मा ॥
मी सकळांत वरिष्ठ मि वंद्य पुजा करि माझि च मीच प्रतीमा ॥
ज्ञान पुसे मज बद्ध असा गुण-पाश-बळें पडिला भवकर्मा ॥ ६ ॥
आणि रजोगुणरंजवितो जिव या विषयांत चि सर्व हि काळीं ॥
चौंड बहू खवळे धरणीतळिं मी च धनी वरि स्वर्ग न्यहाळी ॥
याग-क्रिया करि सर्व सकामक क्रूर व्रतें नियमां प्रतिपाळी ॥
यापरि कर्मसमागमबंधन[5] देहि असा पडला भव-जाळीं ॥ ७ ॥
ज्ञान-अपूर्वक तेथुनियां तम सर्व भुतांप्रति मोह करीतो ॥
वृत्ति मनोमय स्तब्ध तमीं मग कृत्य अनावाडि आळस होतो ॥
[illegible]त आंग क्षणक्षण जांभइ झोंप-सुखें पडला न उठे तो ॥

१८ उशना=शु[illegible]
[illegible]श्यंती, मध्यमा, वैखरी. [illegible]प. २ अमूप=पुष्कळ. ३ गुणातित ( गुणातीत )=सत्व, रज, तम [illegible]
[illegible]ाद=इच्छा. ५ देही=आत्मा.

आणिक हो भलतेनसि[6] तो करि बद्ध असा जिव तामस हो तो ॥ ८ ॥
लोहिव पीत सित[7]ासित[8] रंग अभ्यासित शुद्ध शिळा स्फटिकाची ॥
निर्गुण तेंवि गुणें गुणबद्ध त्रिधा करणी दिसते त्रिगुणांची ॥
सत्व सुखीं रूप कर्म रजीं रूप भ्रांति अनर्थ चि मूर्ति तमाची ॥
हे भरतोत्तम जे घडि जो गुण तो चि पुढें मग दोहि सुखाची ॥ ९ ॥
राजस तामस लोपुनि सत्वसुखी बहु मी म्हणवी जन लोकीं ॥
लोपुनि सत्व रजीं श्रम आळस तामस तो पडला हृदशोकीं ॥
सत्व तमा प्रति लोपुनियां रज वाढवि कर्मफळास विलोकीं ॥
हे गुणबद्ध-निरूपण भारत आइक तूं गुण-बद्ध कसे कीं ॥ १० ॥
जैं शरिरीं करि सत्व स्ववृद्धिस तैं करणीं सुविचार प्रकाशे ॥
ज्ञानरवी हृदयीं उगवे निशि सर्व अविद्यक[10] संशय नाशे ॥
पूर्णपणें सुखदुःखविवर्जित सर्व क्रिया भगवंत चि भासे ॥
सत्व-गुणें बळ बुद्धिस आधिक शांति विरक्ति क्षमा धरि तोषें ॥ ११ ॥
लोभ असा कवडीवरि प्राण चि कामिं प्रवर्तत दांभिकवृत्ती ॥
मांझि म्हणे सुत-कामिन-मंदिर वाढवि काम सदा विषयार्ती ॥
कामदुघा[11] सुरभूरुह[12] आंगणि सिद्धि घरीं अशमस्पृह[13] चित्तीं ॥
वांछित स्त्रीधन आधिक आधिक राजस वृद्धिस भारतमूर्ती ॥ १२ ॥
हे कुरुनंदन वृद्धितमोगुण तैं गवु* दे मन बुद्धि भरावी ॥
लोकप्रवृत्ति नव्हे करि पाप चि आपपरादिक हें न सुचावी ॥
जे अपणास्तव तीस्तव त्यास चि व्यर्थ कल्हो[14] भलतेनसि[15] लावी ॥
मोह असा तनुसंपति शाश्वत मानुनि देव कदापि न भावी ॥ १३ ॥
सत्व स्ववृद्धिस देह धरी मग त्या च मध्यें प्रळयास हि पावे ॥
तो शुक नारद कीं सनकादिक देवल व्यास अशीं बहु नांवें ॥
उत्तम जें परब्रह्म तयाविद संशय-वर्जित निर्मळ भावें ॥
पावन या विबुधांत सुख-स्थिति चिद्‌घन अद्वय रूप स्वभावें ॥ १४ ॥
राजस वृद्धिस देह पडे तरि कर्म-भुमीस चि देह धरीतो ॥
कर्म सकामक आचरतां इह स्वर्ग-सुखादिक भोग वरीतो ॥
तामस वृद्धिस देह पडे तरि कीटक[16] वृश्चिक[17] पाथिर[18] होतो ॥

६ भलतेनसि=भलत्याशीं. ७ सित=पांढरा. ८ असित=काळा. ९ करण-...६॥
१० अविद्यक=अज्ञानमूलक. ११ कामदुघा=कामधेनु. १२ सुरभूरुह=...वास । वेग-
अशमस्पृह=हांवरा. * एथें कांहीं तरी अपपाठ असावा. १४ कल्हो-...
नसि=भलत्याशीं. १६ कीटक=किडा. १७ वृश्चिक=विंचू. १...

मूढ असा बहु योनित जन्मत पावे चि ना कधि उर्ध्व गती तो ॥ १५॥
सुकृत सात्विक कर्म तया फळ निर्मळ ज्ञान सुनिश्चित मानी ॥
कर्म शुभाशुभ राजस त्या फळ मी ममता बहु दुःख निदानीं ॥
तामस तें फळ जाण अमानसि घोर घनें विण लोचन दोन्ही ॥
आणिक आइक ही गुण-लक्षण तें चि सुसंद्ढ हो तुज कानीं ॥ १६ ॥
सत्वगुणाउदरीं उपजे म्हण सात्विक ज्ञान तयासि म्हणावें ॥
आणि रजोगुणनिर्मितसे भव-संपति तो म्हणे लोभ स्वभावें ॥
व्यर्थ उगा बरळे मन मानत कार्य नसे भलती सैंव धांवे ॥
जन्म असा अति मोह तमोगुण चंद्र रवी बुडतां तम पावे ॥ १७ ॥
सत्वगुणी वरता चढतो सिम जेथुनि उंच नसे चढण्याची ॥
तें परब्रह्म स्वरूप सुनिश्चित मी जिव हे खुण मध्य रजाची ॥
आणि अधोगति जेथुनियां सिम देहिं मि वृत्ति अशी न सुटे ची ॥
एक त्रिधा गुण भेद करी पण निर्गुणता न चेढ स्वरूपाची ॥ १८ ॥
उत्तम मध्यम आधम हे गुण वर्तवितो परि सर्व अकर्ता ॥
जेंवि रवी तम नासुनि चेष्टति लोक कदापि हि नेणत वार्ता ॥
निर्गुण मी गुण-संग-विवर्जित देखति जे मज यापरि पार्था ॥
पावति ते निज अक्रियभाव तसे परि मद्रुप जाणुनि वार्ता ॥ १९
यापरि हें गुण-कर्म-विवेचन जाणुनि आत्मरूपीं भरलासे ॥
जो त्रिगुणात्मक देहिं दिसे परि देह-समंध नसे नभ जैसें ॥
जन्म-जरा-मरणादिक-दुःख-विवर्जित मुक्त सदा अनयासें ॥
अक्षयि आत्मसुखास चि भोगित अर्जुन वीनवितो हरि कैसें ॥ २० ॥
हे जगदीश गुणत्रय-धर्म बहू इतुक्यातित निश्चित जाले ॥
मूर्त कसे दिसती गुण-वीहिन आचरतां गुण आतित ठेले ॥
वर्तति ते गुण-धर्मि हि भासति अक्रिय केंवि कथीं निज बोलें ॥
हें पुसतां भगवंत सुखावुनि सांगतसे स्वसुख-स्थिति-डोलें ॥ २१ ॥
सत्व प्रकाश प्रवृत्तिक राजस तामस मोह अशा गुण-कर्मीं ॥
वर्ततसे परि जेंवि रवी तिन्हि काळ नव्हे त्रिगुणी गुण-धर्मी ॥
द्वेषि च ना न करी अति साक्षेप आणि न टाकित इच्छित ऊर्मी ॥
सांगतसे हरि आणिक आइक जे स्थिति नीवसतो परब्रह्मीं ॥ २२ ॥
[illegible] गुण-कार्य समस्त हि जाणत आणि गुणीं सहसा हि चळेना ॥
[illegible] बहवे न मृषां जळिं कीं नभ वायु-बळें उडवेना ॥

१८ उशना=[illegible]
श्यंती, मध्यमा, वैखरी[illegible]
मृषा=खोटें.

तिष्ठतसा दिसतो गुण-संगांनि युक्त उदासिनता विघडेना ॥
या परिची खुण जाण गुणातित आचरणें परिसें कशि नाना ॥ २३ ॥
निर्मळ स्वस्वरूपीं भरला मग सर्व समान चि बुद्धि तयाची ॥
दुःखसुखा रवि रात्रदिसा परि वन्हि-प्रियाप्रिय कांहिं नव्हेची ॥
शेण तसें कनका सम मानित रत्नढिगा जशि राशि खड्यांची ॥
वस्तुपणें सम तामस निंदक शब्दपणें समता सहजें ची ॥ २४ ॥
मानिति कीं अवमानित दोहिंस आपण जो सहज स्थिति पाहे ॥
मित्र रिपू तरि आत्मस्वरूप चि आधि च भेद जया सरलाहे ॥
जें पडलें करणां करणें करितो परि तो फळ-हेतु न वाहे ॥
मी-पण-वर्जित तो चि गुणातित आचरणें बरव्या रिति राहे ॥ २५ ॥
सर्व भुतीं परब्रह्म असे कनकीं नगता भुत-भेद दिसेना ॥
अर्पण सिंधुजळीं अपणा सह सैंधव तेय दुजें उमजेना ॥
अव्यभिच्यारिणि भक्ति असे मज सेवितसे गुण भिन्न करीना ॥
जेंवि नदी उदधीस[२१] मिळे तरि सागर तैं न धरी अणु माना ॥ २६ ॥
ब्रह्मिं मिळे परब्रह्म च तो तरि ब्रह्म असें मजला चि म्हणावें ॥
मोक्ष हि मी अज अव्यय शाश्वत शांति-सुखादिक हीं बहु नांवें ॥
एक्क च तो मि अनेक हि मी मज एक अनेक अनंत स्वभावें ॥
बृक्षरूपें क्षर अक्षर उत्तम सांगिन तें सुजनीं परिसावें ॥ २७ ॥

चतुर्दशोध्यायः समाप्तः

---

## अध्याय १५.

देवकि-गर्भ-सुधांबुधिचा शशि पूर्ण सुधाकरें[२२] पार्थ-चकोरा ॥
क्षेत्र सविस्तर तें चि पुन्हा प्रकतीरूप तें कथि वृक्ष उभारा ॥
ब्रह्म तें ऊर्ध्व अधो[२४] डहळ्या जग स्वस्थ न इंद्रिय-ग्रामें[२३]-पसारा ॥
वाढत मोडतसा दिसतो पण अव्यय वृक्ष तुं जाणसि वीरा ॥ १ ॥
आणि गुणें बहु वाढति ज्या डहळ्या अध[२४] ऊर्ध्व महापसरानें ॥
नित्य नव्या विषयप्रवेला[२५] घनदाटुनि व्यापति संसृतिरानें ॥
आणिक ज्या तळिं ही मुळि या अध ऊर्ध्व फळें निज कर्मगतीनें ॥
मानव-लोक मुळें डहळ्या तरु सिद्ध असा अवघा अभिमानें ॥ २ ॥
सर्व हि हा जगडंबर वृक्ष दिसे परि यास न रूप न कांहीं ॥

---

२१ उदधी=समुद्र. २२. सुधाकर=अमृताची खाण. २३ ग्राम=[illegible]=सोन्याचा कि॰ अधो=खालीं. २५ विषयप्रवाला=विषय हा पाला आहे ज्यां[illegible]ास मिळणारें. २६

तोडिसि तो कवणेपरि अंत न मध्य न आदि तया पहातां ही ॥
जेंवि मृगांबु[27] दिसोनि अशाश्वत भ्रांतिमुळें दिसतो जरि पाहीं ॥
ज्ञान करीं तरवार धरीं मग छेदिसि यास विलंब चि नाहीं ॥ ३ ॥
तें पद ज्ञान-पथें क्रमिती नर पावति ते न फिरेत विकारी ॥
आद्य अनामय अद्वय शाश्वत जीर्ण प्रवृत्तिस ते अविकारी ॥
ज्या विसरे जग भासतसे अहिभान जसें असतां मुळ दोरी ॥
शिंपिवरी पसरे रजताकृति[28] कीं पसरे निळिमा नभसारी ॥ ४ ॥
कां तरि मोह मनीं न यरे ह्मण सर्व विकार हि जिंतुनि राहे ॥
काम विवर्जित मान नसे निज वस्तु-विचार स्वरूप चि पाहे ॥
जेंवि दिवा निशि सूर्य न जाणत बुद्धि तशी सुखदुःख न वाहे ॥
अव्यय दिव्य पदाप्रति पावत तें चि तें होउनि साधु स्वदेहें ॥ ५ ॥
जेथ दिवाकर चंद्र शिखी[29] न पवेति तयासि च तेज जयाचें ॥
जेथ मनादिक इंद्रिय बुद्धिस रीघ नव्हे निज निर्गुण साचें ॥
जें अविनाश अनामय चिद्घन अद्वय चिन्मय चिद्रुप साचें ॥
पाउन होसिल तें चि असें पद तें मम धाम[30] तुं जाण निजाचें ॥ ६ ॥
या जिवलोकिं जया जिवसें ह्मणिजे मम अंश कसा तरि ऐकें ॥
जेंवि जळीं जळ गार जळास चि तेंवि सनातन या जिवलोकें ॥
भिन्न मनादिक इंद्रिय पंचक सा विषयीं प्रथमाकृति लेखे ॥
होउनियां प्रकृतिस्थ तरी मि च भासतसें जग हें अवलोकें ॥ ७ ॥
देह धरी तइं इंद्रियवर्ग समस्त हि मांडित तेथ पसारा ॥
त्यास्तव लोक तया ह्मणिजे जिव हा जिवलोक दिसे ह्मण सारा ॥
सांडुनियां शरिरास निघे तरि सर्व समागम सार विसारा ॥
जेंवि रवी जगदृष्टिस अस्तवि कीं सुमनें [31]हरति घेउनि वारा ॥ ८ ॥
तो मग जेथ जसें शरिरा धरि तेथ तसें मन इंद्रिय मांडी ॥
शब्द शितोष्ण दिसे रस ही धृति या विषयां सह इंद्रिय तोडी ॥
आश्रय येथ जिवा मन कारण जें मन तो जिव भाव न सांडी ॥
सैन्य नृपासमवेत चि चालत कीं दिप दीप्ति दिपापडिपाडी ॥ ९ ॥
जात किं राहत या शरिरीं गुण भोगितसा दिसतो मन-योगें ॥
त्यास कसे मुढ पाहति हा जिव बद्धक्रियारूपसा गुण-संगें ॥
ज्ञानसुलोचन या अवलोकिति अक्रिय अद्वय आत्म-प्रसंगें ॥

२६ उशना-[illegible]र. २७ मृगांबु=मृगजल. २८. रजत=रुपें. २९ शिखी=विस्तव. ३० [illegible]श्यंती, मध्यमा, वैख[illegible]शनी.

होउनियां घट आणि मठादिक भंगित त्यांपरि यो मनभंगें ॥ १० ॥
नेमुनि आत्मविशीं अपणास च लक्षित राहुनि आत्मस्वरूपीं ॥
निग्रह त्या करणें करणें सहजें घडलें मुळ द्वैत प्रलोपीं ॥
हें न घडे तरि स्वैर मना विषयानळिं तापवितो त्रय तापीं ॥
तो मज पाहेँ चि ना चि तयास अनोळख अंधसमीप च दीपीं ॥ ११ ॥
जें रविच्या उदयें सगळें जग दावितसे स्थुळ सूक्ष्म विलोकी ॥
जें शशिच्या उदयें निववी बहु धान्य वनस्पति जीवन पोखी[32] ॥
जें अनळें करि दाहन पाचन सिद्धिस हें उघडें अवलोकीं ॥
तें अवघें दृढनिश्चयपूर्वक जाण खरें मम तेज बरें कीं ॥ १२ ॥
आणि धरा धरणीधर होउनि मी धरितों जळ होनें[33] विरें ची ॥
सर्व भुतें वरि उत्पाति लोपति धारक मेदिनि[34] जाण तयाची ॥
सोमरूपें रस पूरवितों करिं वृद्धि मि होउनि जाति रसाची ॥
खारट आंबट तीखट तूरट होउनि मी रसना चवि साची ॥ १३ ॥
तें चि मि अन्न चतुर्विध[35] प्राणिघटीं पचवीं जठरानळ होतों ॥
रेचुनि[36] प्राण अपान दिवानिशि भस्म सुखें अति दीप्ति करीतों ॥
तोचि सुधारुप काळ जना क्षण पाळुनियां प्रळयास हि नेतों ॥
यास्तव भूक मि अन्न मि तृप्ति मि आत्मरूपें सकळांत रहातों ॥ १४ ॥
तो कवणेपरि हें पुससी तरि सर्वभुतीं रुप मी हृदयाचें ॥
सर्व निविष्टुनि मी च वसें स्मृति ज्ञान अजाणिव[37] ही मि च साचें ॥
सर्व हि वेद मि होउनि वानितसें महिमान स्वयें स्वरूपाचें ॥
वेद सरे मज पाहुनि तेहि मि मी निज वेद्य[38] हि वेदविदांचे[39] ॥ १५ ॥
आणिक येक रिती तुज सांगत वोळखसी मज आत्मरूपासी ॥
दोपुरुषीं इह लोक समस्त हि जेंवि अहिर्निशि सर्व अकाशीं ॥
तो क्षर[40] येक समस्त हि दृश्य पदार्थ अभासत नामरुपासी ॥
अज्ञपणा जिव रूप सुषुप्तिस[41] अक्षर[42] नांव तया पुरुषासी ॥ १६ ॥
आणि तिजा तिन्हि लोक भरी भरला करि पालन ईश्वररूपें ॥
जेंवि रवी किरणें मृगतोय तिन्ही मुळ येक चि सूर्यस्वरूपें ॥
ज्या स्मरिजे परमात्मक नाम खरें पण शिंपि नव्हे जगरूपें ॥

---

३२ पोखी=पोषी. ३३ होन=होऊन. ३४ मेदिनी=पृथ्वी. ३५ चतुर्विध अन्न=खाद्य पेय, चोष्य, लेह्य. (खाणें, पिणें, चोखणें, व चाटणें) ३६ रेचुनि=रिकामा करू[illegible] अजाणिव=अज्ञान. ३८. वेद्य=ज्ञानविषय. ३९ वेदविद=वेदार्थज्ञ. [illegible] ४१ सुषुप्ति=झोंप. ४२ अक्षर=अविनाशी.

[illegible]=सौम्याचा [illegible]सि मिळणारें. २६

द्वैत नसे निज प्रत्यय उत्तम त्या म्हणिजे [४३]चतुरानन-बापें ॥ १७ ॥
सर्व क्षरातित अक्षर तो हि मि अक्षर त्याहुनि उत्तम तो ही ॥
मी च मला क्षर अक्षर उत्तम भेद तिन्ही पहतां तरि नाहीं ॥
या परिचा मज जाणुनि वेद-विदीं पुरुषीं पुरुषोत्तम कांहीं ॥
खूण अशी वदलों पण भानुसि भानु म्हणा बहु भूषण नाहीं ॥ १८ ॥
जो मज जाणतसे पुरुषोत्तम यापरि जाणिव ग्रासुनि अंगें ॥
सर्व सुजाण तया म्हणिजे भजतो मज सर्व हि भेद-वियोगें ॥
जेंवि जळीं [४४]जळवीचि अभेद चि कीं कनकीं नग ऐक्य न भंगे ॥
हे भरतोत्तम तो चि असंमुढ तो मि असें तुज द्वैत न संगें ॥ १९ ॥
हें परमोत्तम गुह्य गिताख्य महा अनुभूतिक शास्त्र विशेषा ॥
तूज पुढें कथिलें अति निर्मळ हें श्रवणें हरि संसृति-दोषा ॥
बुद्धिपुरःसर [४५]धीमति जाणति त्यां सरलें कृत-कृत्य विशेषा ॥
युक्ति पुढें न पुसे म्हण चिद्घनउद्धव डोलत सेवुनि [४६]शेषा ॥ २० ॥

पंधरावा अध्याय समाप्त.

---

## अध्याय १६.

पंचदशापरिअंतगिता हरि ज्ञान कथोनि उगाचि न राहे ॥
संपति दैवि दुजी असुरी नवमीं कथिली च पुन्हा कथिताहे ॥
निर्भय अद्वयता स्थिर बुद्धिस वृत्तिस आत्मस्वभावि च राहे ॥
दान दमी मन यज्ञ विचारण स्वस्वरूपीं तप [४७]आर्जव पाहे ॥ १ ॥
दुःख भुतांसि न दाखवणें परमार्थ चि बोलतसे प्रिय वाणी ॥
ब्रम्हरूपीं जन निंदि च ना अपणा सह सर्व भुतां सम मानी ॥
क्रोध नसे अहंकार त्यजी मग मोक्ष सुखासि कदापि न [४८]वाणी ॥
देह मि हें न म्हणे बहु लाजत नम्र अचंचळ चित्त ठिकाणीं ॥ २ ॥
स्वानुभवी अतितीक्षण बुद्धि क्षमा क्षमि ते पण नेणुनि जातें ॥
ताप उपद्रवें धीर अखंडित निर्मळ बाहिर आंत सुचित्तें ॥
जीभ कचे परि दंत न द्वेषित द्रोह न जाणत सर्व भुतांतें ॥
मान्यपणें हर-मस्तकिं [४९]जान्हवि [५०]तोयें जसें अवरोनि रहातें ॥ ३ ॥
सिद्धिस हे गुण दैवि बुझे असुरींत हि दुर्गुण सा परिसीजे ॥
अल्प करी कथि फारच सुकृत संपातिचा मद मानुनि माजे ॥

---

४३ उशना=ब्रह्मदेव. ४४ वीचि=लाटा. ४५ धीमती=शहाणें. ४६ शेष=सर्प.
श्यंती, मध्यमा, वैखरी. ४८ वाणी=कमताई. ४९ जान्हवी=गंगानदी. ५० तोय=पाणी.

ईश्वर ही परि दृष्टिस नाणिच क्रोध दुजा सुख देखुनि फूजे ॥
वाङ्मनसा वपु दुःख चि दायक कृत्यकृत तो विचार न सूझे ॥ ४ ॥
मोक्ष-सुखासन दैवि गुणास चि बंधन तें असुरी करि साचें ॥
दैव-गुणा सगुणा तुज दर्शन ही न घडे असुरी गुण यांचें ॥
कां तरि पांडव जन्म तुतें अणि भोग सदा सुख दैव-गुणाचें ॥
ठाउक रात्र नसे रवितें भय अमृत काय धरी मरणाचें ॥ ५ ॥
लोक समस्त कि मस्तकिं संपति दोनिच या परिसें धनुपाणी ॥
दैवि बरी दुसरी असुरी बुझ येथ नसे तिसरी अणि कोणी ॥
ऐक तुतें कथिली कथिली दुजि विस्तरें सुस्थिर आइक कानीं ॥
वोळखि तेजुनि निष्फळ तें खळकर्म अनिर्गळ दुर्मुख प्राणी ॥ ६ ॥
पुण्य फळे सुख येथ हि तेथ हि उत्तम भोगि न जेय प्रवृत्ती ॥
पाप फळे नरकीं बहु दुःख चि सोसिल कोण म्हणोनि निवृत्ती ॥
ते असुरीजन नेणत ज्यापरि सूकर ग्राम विदीं[51] चरताती ॥
शौच अचार नसे चि अमंगळ स्वप्न हि सत्य नये वचनोक्ती ॥ ७ ॥
बोलति हे म्हणती विधि वेद हि ईश्वर हे अवघे लटिकेची ॥
देह पडे मग कोण चढे सुख स्वर्ग यमालय दुर्गति कैची ॥
प्राण सुखी तंव हे सुख-संपति आणित भोगितसो अणिकाची ॥
कामविना अति उत्तम उत्तम नाहिं च उत्पति काम जगाची ॥ ८ ॥
दृष्टि रिघे परि कांचन कामिनि काम अहर्निसि इंद्रियेंअर्थीं[52] ॥
ईश्वर भाव मनींहुनि सांडुनि कातर अंतर चंचळ वृत्ती ॥
थोडिच बुद्धि तिला शिरवी करि उग्र क्रिया अभिचारिक-पंथीं ॥
ते चि जगा बुडवी करि त्या सह पाडुनियां दृढ पाप- अनर्थी ॥ ९ ॥
राजवठे करि दंभ मदा अधिपत्य तया करि देउनि माना ॥
आश्रय काम कधीं पुरता नव्ह इछितसे जन संपति नाना ॥
मोह-ग्रहें ग्रसिला अशुची व्रत घालितसे जन रौरव-घाणा ॥
वादविलें बहु पापचि संग्रह विग्रह तो असुरी जन माना ॥ १० ॥
आणि नभापरि वाँड[53] करी न सरे चि कधीं मरणावधि चिंता ॥
स्वर्ग-सुखीं शचिं[54] -उर्वशि-भोग चि येय हि ह्या परमोत्तम कांता॥
काम सुखें मज काम चि वाढत हें वदतो असुरी जन पार्था ॥
सर्व सुखें मज मोक्ष फिका मुढ संगति या विकळा सुख-वार्ता ॥ ...

---

५१ विदी=रस्ते. ५२ इंद्रियअर्थ=विषय. ५३ वाड=विस्तृत, ... —सोम्याचा ... इंद्राची बायको. ... वीस मिळणारें.

पाश गळां पडले बहु कामुक बद्ध किं जे बहुता विषयाशा ॥
त्या न पुरेति च क्रोध उठे तरि द्वेष हि हा म्हणिजेत विरेशा ॥
काम जिवीव च क्रोध-परायण साधिति मोहळ मारुनि माशा ॥
त्यापरि द्रव्य चि मेळविती न विचारित ते पुढिलाप्रति नाशा ॥ १२ ॥
तें धन त्यावरि आणिक मेळविलें भजकातिकलंतर चोरी ॥
आणि फुगे म्हणवी धनदेश्वैर जे धरणीवरि संपति सारी ॥
तीस धनी मज वीण नसे बहु सीतरिले धनवंताचि मारी ॥
मी जगिं एक सभाग्य कधीं जग होइल इच्छित सर्व भिकारी ॥ १३ ॥
हे वधिले तितुके रिपु अल्प चि आणिक मारिन फार जनासी ॥
जे मज सन्मुख जोडुनियां कर तिष्ठति निर्धन स्थापित त्यांसी ॥
या परिचा मज वांचुनि ईश्वैर कोण दुजा पाहतां धरणीसी ॥
मी बळवंत समस्त हि सिद्धि मि मी सुख भोगिन जें अमरांसी ॥ १४ ॥
भाग्य तरी मज पाहुनि श्रीपति मागतसे अणिका प्रति भाजी ॥
आचरणें नसरे चतुरानन संपति इंद्र नसे सम ताजीं[57] ॥
तो मज गायक भाँट वधूं रिझवील तया धन देइन आजी ॥
या परि मूढ सदां मदमोहित पोहतसे जळ अंजुळिमाजी ॥ १५ ॥
चित्त बहूविध भ्रांत भ्रमें पडिलें अडकेस कडे मोहजाळीं ॥
कामस्त्रियादिक-भोग-असक्त जगामृग-मत्त-मृगीबहुमेळीं ॥
त्यास गती अति दुर्धर जो यमलोक पिडा नरकांत समूळीं ॥
याग हि तो करितो परि बद्ध चि ते रिति सांगतसे वनमाळी ॥ १६ ॥
स्वर्गसुखाप्रति इच्छुनियां अविधी अविचार अहंकृतिआंगीं ॥
मानितसे अपणे अपणा बहु थोरिव मूढमतीजन-संगीं ॥
याजक मी म्हण वाजवि दुंदुभि गाजवि दीक्षत नाम अयागी ॥
या च मिसें धन मेळवि मान हि पेटवुनीं घरिं कोरडि आंगी ॥ १७ ॥
क्रोध अहंकृति दर्प बळें धरि काम अखंडित गाजविती हे ॥
मी सकळां घटिं आत्मरूपीं पर ते मज दुःख चि देति समोहें ॥
मद्रुप विश्व चराचर नेणुनि भिन्न चि निश्चय या बहु देहें ॥
त्या सकळांप्रति निंदुनि वाळित द्वेष सदा हृदयीं स्थिर राहे ॥ १८ ॥
द्वेषि असे नर आधम त्यांस मि क्रूर बहू रचिं आसुर योनी ॥
[illegible]श्चिक सर्प महाडुळ गेंडुळ कीं नरकीं कृमि दुर्धर घाणी ॥

३८ ... श्यंती, मध्यमा, वै[illegible]=कुबेर. ५६ ईश्वर=श्रीमंत. ५७ ताजीं=ताजव्यांत. ५८ भाट=स्तुतिपाठ-

भूक बहू मुख लाहन इंद्रिय एकचि भक्षण नर्क-निदानीं ॥
दुःख-पुरी बुडवीत असे कधिं नायकती श्रवणीं सुख वाणी ॥ १९ ॥
कॅल्पवरी मरती पुॅढती पुढती धरती मुढ आसुर देहो ॥
तेथुनियां नउ मासभरी सुख घोर तमांत चि टाकुनि दे हो ॥
कुंति-सुता मज नेणाति आधम ते अधमा गति त्यांस सदा हो ॥
सांगतसें तुज एक करीं मनिं गोष्टिस या चुकसील कदा हो ॥ २० ॥
शत्रु जगा तिन राक्षस हे बळि भक्षुनियां उरले तिन्हि लोकां ॥
काम पुढें तंव पाठिसि क्रोध हि लोभ तयावरि देत अवांका ॥
दारवठा उघडा नरकाप्रति हे तिघॅं प्राणि-गणा अवलोका ॥
यांस त्यजीं त्यजिती द्विज अंत्यज यापरि अर्जुन कांहिं न धोका ॥ २१ ॥
हीं तिन बंधनॅं तोडुनि जो नर सांडिल निश्चित द्वार तमाचें ॥
सद्गुरु-सेवन शास्त्रविचारण आचरणें शुभ आत्म-सुखाचें ॥
कृष्ण हरी मधुसूदन माधव अच्युत चिद्घन वर्णित वाचे ॥
संस्मरणें चुकले भ्रम पूर्वक उत्तम तें रूप नीज गतीचें ॥ २२ ॥
हें सुख सांडुनि कामविशीं कधिं मानि च ना गुरु सज्जन वेदा ॥
भोगिन मी इह स्वर्ग म्हणे अवघा करितो अभिच्यारिक धंदा ॥
त्यास नव्हे कधिं सिद्धि हि बुद्धि हि दुःख चि ये गवसी मतिमंदा ॥
नेणति ते परमागति मागति होउनि राहति भाजन खेदा ॥ २३ ॥
शास्त्र पुढें दिप सोज्वळ लावुनि कृत्य अकृत्य बरें कळवावें ॥
टाकविलें तरि राज्य हि टाकुनि घेवविलें विष तत्पर घ्यावें ॥
या विधिनें जरि वर्तसि अर्जुन कर्म न लिंपसि मुक्त स्वभावें ॥
आइकतां मग उद्धवचिद्घन संत जना विनती करि भावें ॥ २४ ॥

सोळावा अध्याय समाप्त.

---

## अध्याय १७ वा.

पार्थ ह्मणे हरि शास्त्र विॅचारुनि आचरणें गति उत्तम होती ॥
तो विधि अश्रुत ज्यांस न शास्त्र हि ठाऊक आवडिनें यजिताती ॥
सत्वरजस्तम हा गुणभेद तयांतहि काय कसा गुरुमूर्ती ॥
निश्चित पावति ते कथिल्या गति जाइल सर्व हि मानस भ्रांती ॥ १ ॥
देव म्हणे परिसें गुण मायिक तीन तयांत हि जन्मति देही ॥

---

६० कल्प= चार अब्ज बत्तीस कोटि वर्षें. ६१ पुढती पुढती=पुनःपु[illegible]सोऱ्याचा विचार करून. [illegible]ांस मिळणारें.

आवडि ते हि त्रिधा[६३] चि स्वभाविक बीज विना तरु आणिक नाहीं ॥
येकि तियेप्रति दोघि प्रलोपिति सात्विक राजस तामस पाहीं ॥
आइकिलें परि आणिक आइक आवडि रूप कसें गुण तेही ॥ २ ॥
हे भरतोत्तम सत्वगुणी नर सात्विक आवडि सत्त्वगुणाची ॥
आणि रजोगुण त्या चि परी तम तामस उद्धव जाण तमाची ॥
आवडि ज्या पुरुषासि जिणें धरिलें मग ते चि क्रिया रहटीची ॥
अंतर बाहिर सांगतसे जासि पारखि सांगत बोल मनाची ॥ ३ ॥
सात्विक स्वर्गसुरां प्रति यांजितें[६४] राजस राक्षस-यक्षगणातें ॥
तामस प्रेतभुतां अभिचारिक सांडत सत्क्रिया अशि राते ॥
जे स्मृति अर्थ चि मूर्त जगा गुरु वर्तति देखिस देखुनि वर्ते ॥
शास्त्रविदां गति ते चि तयास हि आवडि सात्विक जाण सुचित्तें ॥ ४ ॥
शास्त्र हि शास्त्रविदा हि उपेक्षुनि आचरती मन मानस तैसें ॥
घोर क्रिया भुत राक्षस त्यां प्रति यांजिति शोणितें[६५] मांस हुताशें[६६] ॥
दंभ अहंकृति काम चि कामिति[६७]क्रोध बळें धन आवडि तोषें ॥
दुःखविती जिव ते मजलागिं च पावती ते फळ दुःख विशेषें ॥ ५ ॥
लाहन थोर हि सर्व भुतें शरिराकृति मी मज व्यापक त्यांसी ॥
घातक होउनि दुःखविती जन आसुर ते बुझ निश्चयतेसी ॥
पंचभुतात्मक सर्व हि कंचुक कां म्हणसी रिति त्यांस चि ऐसी ॥
सात्विक राजस तामस आहर सेविति ते चि क्रिया शरिरासी ॥ ६ ॥
खाउन भांग भुले तरि ज्या परि घे विष तें जिव निश्चित मारी ॥
पीयुष[६८] घे मरणासि निवारिल तेंवि क्रिया अहरे गति सारी ॥
तेचि अनुक्रम यज्ञ तपावरि दान विभागित दानव[६९] वैरी ॥
आइक तो पहिला गुण अर्जुन आवडि आहर काय स्विकारी ॥ ७ ॥
जे सुरसें सरसे मधुरें अति गोड वरी सहजें सुकुमारे ॥
सानकुळेंसि जळीं धरती हरि अर्चुनियां शुभ सत्व विहारे ॥
नेमुनियां करि भोजन तो जन आयुषबुद्धिबळें पुरता रे ॥
रोग नव्हे सुखप्रीतिविवर्धन सत्व बळावत सत्व विहारे ॥ ८ ॥
आंबट कीं कटु खारट तीखट फार मिरें भरलीं मोहऱ्यांनीं ॥
उष्म भडाडित आगिच सेवित काळिज पोळतसे कंवळांनीं[७०] ॥

---

६३ त्रिधा=तीन प्रकारची. ६४ याजिती=पूजिती ६५ शोणित=रक्त. ६६ हुताश=
[illegible]=इच्छिती. ६८ पीयुष=अमृत. ६९ दानव=दनूचे पुत्र (राक्षस).
श्यंती, मध्यमा, वै[illegible]

नातरि अर्धकचीं बहु कोरडि सेवित शोषितसें[७१] बहु पाणी॥
जेवण राजस रोग समस्त हि जागवुनी करि दुःखित प्राणी ॥ ९ ॥
जें उतरोनि रसा मुकलें बहु आवडि त्यावरि धांवत भारी ॥
अन्न शिळें अपवित्र अमंगळ एक च ताट बहू नर नारी ॥
खात बहू मुखिचें उसिटें वरि लाळ गळे चिवडीत चि पोरी ॥
तामस भोजन हें म्हणसी झणि पोट भरी नर पाप अहारी ॥ १० ॥
यज्ञ हि तीन गुणें परि आइक जो पहिला मँखँ[७२] सात्विक साचा ॥
ब्रम्हसमर्पण याहुनि हेतु न इच्छितसे अणुमात्र फळाचा ॥
वेद विधी युँपँ[७३] मंडप कुँडँ[७४] विचारुनि दीक्षित संग द्विजाचा ॥
च्यारि च्यॉरि द्वय पंच पुन्हा द्वय घोष उठे शुभ सत्व ऋतूचाँ ॥ ११ ॥
राजस याग दिसे बरवा परि स्वर्गसुखावरि आवधि ठेवी ॥
दंभ अहंकृति मान्यपणें जगिं दीक्षित मी अशि कीर्ति हि व्हावी ॥
श्राद्धमिषें नृप आंवतिला तरि श्राद्ध घडे यजमान हि जेवी ॥
या परि हे भरत प्रभु जाण धना जन मान परँत्रँ[७६] हि भावी ॥ १२ ॥
स्वप्निं हि ठाउक वेद नसे मग तेथ विधी मन मानित तैसी॥
हूतक वस्तु निवाड न जाणत भक्षविषीं जन ग्राहक मांसीं॥
मंत्रपिसें[७७] भलतें च वदे वरि दक्षिण नांव न दे उदकासी ॥
यज्ञ करी फुग पर्वत गर्व चढे नुतरे तम जाण मखासी ॥ १३ ॥
आइक हें तप ही त्रिगुणात्मक त्यांत तपा रुप वाङ्मन काया ॥
त्यांत हि कायिक देव द्विजा गुरु संत पुजी शुचि पांडवराया ॥
आर्जव सर्व भुतां प्रिय अद्वय भेद न जाणत स्त्रीपुरुषां या॥
यास्तव कामिनि काम नुठे तृण ही परि चित्त नव्हे दुखवाया ॥ १४ ॥
बोलतसे वचना परमार्थ चि साधक सर्व जना उपकारी ॥
सत्य जसें परमामृतसें प्रिय मंजुळ घेइल त्यास न वारी ॥
नातरि वेदस्मृतीपठनें अथवा हरि अच्युत कृष्ण मुरारी ॥
बोलत डोलत वाङ्मय हें तप सांगतसे मँधुँ[७८]कैँठँ[७९]भँवैरी ॥ १५ ॥
मानस निर्मळ चंचळ तेंवि न पूर्ण शशी च अलांर्छनँ[८०] जैसा ॥
आत्मसुखें मम तत्व विरे तरि मौन घडे मन निग्रह ऐसा ॥
मीठ पडे तरि सिंधुजळीं मग सिंधुमिठास अभाव अपैसा ॥

---

७१ शोषितसे=पीत असे. ७२ मख=यज्ञ. ७३ यूप=खांब. ७४ कुंड=भांडें. ७५ [illegible] यज्ञ. ७६ परत्र=परलोकीं. ७७ पिसें=वेड. ७८ मधु=हें एक राक्षसाचें [illegible] काचळ=सोम्याचा ७८. टीप पहा ८० लांछन=डाग.

[illegible]से मिळणारें. २६

तेंवि नसे मन भाव अनामय जाण मनोतपरूपविलासा[८२] ॥ १६ ॥
वाङ्मन कायिक सांगितलें तप तें चि पुन्हा गुणभेदविभागें ॥
सात्विक आवडिचे नर आचरतां फळवात हि नेदि च लागें ॥
झांकुनियां अनहंकृतिनें रिति दंभें[८३] नसे मति जाण ति चांगें ॥
सात्विक आवडि तूंचि धरीं ह्मण सांगिन या विषि सादर आंगें ॥ १७ ॥
मानपुजाफळ इच्छुनियां नर आचरती तप राजस पार्था ॥
विश्व करो स्तुति आपुलि आसनीं उंच बसोनि कयूं परमार्था ॥
येक हि निश्चय पूर्ण नसे घडि सांडित मांडित मात्र अनर्था ॥
अल्प करी वरि सांगतसे बहु आस मनीं धनकामिनस्वार्था ॥ १८ ॥
मूढ सदा शरिरास चि जाचिति अग्निहिमें सलिलें[८४] उपवासें ॥
जीभउरीं गळ टोंचिति खोंचिति अंगि सुरी जित वोंचिति मांसे ॥
जारण मारण हें फळ इच्छुनि दुःख जना आपणा सह ऐसें ॥
तामस जें तप सांगितलें तुज अर्जुन आइक दान हि तैसें ॥ १९ ॥
पात्र जसा रवि देश कुरुस्थळ त्यावरि तेथ हि उत्तम काळू ॥
तेथ न वंचित गोधन संपत्ति तृप्त करी बहु जीव त्रिकाळू ॥
घेउनि ज्याचें तयास दिल्हें कि जसी जननी निज जेववि बाळू ॥
तोनुपकार तया परि सात्विक दान कथी भुवनत्रयपाळू ॥ २० ॥
दान दिजे जिविका अनुलक्षुनि जेयुनियां अपणासि च कांहीं ॥
आणि अगांतुक याचक ये तरि सर्व फळें मनिं इच्छित पाहीं ॥
देउनि अल्प शिणे बहुतांपरि नागविला वनिं जेंवि भिलांहीं ॥
राजस दान तया म्हणिजे करि दान तया विसरे न कदां ही ॥ २१ ॥
चाहुडि चौक बिदी जन फार मिळे निशी काळ कि फाल्गुनमासीं ॥
सोंग स्त्रिया नट भाट जुवा बहु मेळविलें धन लोकपिडेसी ॥
देत तया मनिं तोषतसे बुझ तामस दान गती नरकासी ॥
सांडुनि राजस तामस तूं रत हो कुरुनंदन सत्वगुणासी ॥ २२ ॥
ॐ तत आणि सताक्षर नाम त्रिधा निगमोदित ब्रह्म सुखाचें ॥
ब्राह्मण वेद क्रिया यजनादिक येथ प्रतिष्ठुनि दे विधि साचें ॥
उत्पति पालन संहरणें जग कर्म स्वभाविक आंग जयाचें ॥
सत्वगुणीं कथिलें तपदानमखादिक येथ विभागुनि साचें ॥ २३ ॥
सत्वगुणीं कथिलें तपदानमखादिक येथ विभागुनि साचें ॥ २३ ॥
ध्याउनि अक्षर येक तया मग ओमिति[८५] वैखरिघोष करूनी ॥

८२ विलास=खेळ ८३ दंभ=ढोंग. ८४. सलिल=पाणी. ८५ वैखरी=...यंती, मध्यमा, वै...

वेद विधि द्विज वन्हि तिन्ही हवनें करि तृप्तिस शुचिर्भुत अग्नी ॥
न्यायउपार्जित पात्र विचारुनि वर्षत मेघ तया परि दानीं ॥
वाङ्मन कायिक सात्विक जें तप आचरणें पण या च विधानीं ॥ २४ ॥
तें तप दान कि यज्ञक्रिया करितां फळ प्राप्त यथोचित पावे ॥
तेथ चि तेंवि न योगि न तत्पद ब्रह्मरूपीं फळ हें तुस ठावें ॥
कर्म समर्पण दोनि हि येक चि भिन्न समर्पक केंवि उरावें ॥
त्यास्तव हें तिसरें हरि सांगत सावध साधुजनीं परिसावें ॥ २५ ॥
सद्रुप आठवितां करितां चि नुरे विनियोगुनि कर्मप्रशस्ती ॥
साधु असाधु क्रिया घडल्या करि पूर्ण सदा परब्रह्मच वस्ती ॥
द्वैत विनाशुनि हा सदशब्द असा तमहारक दिव्य गंभस्ती ॥
त्या परि हें त्रय नाम नव्हे श्रुति धाउनि ढेंकर देत समस्ती ॥ २६ ॥
सांग नव्हे मख कीं न घडे तप दान यथोचित होउ निवेना ॥
तो अवघें परब्रह्म स्वरूपक येक चि ब्रह्म करी जग नाना ॥
अज्ञ अनज्ञ हि सात्विक आवडि आचरतां मुखि या अभिधाना ॥
उच्चरितां पद तें चि तुं होसिल अर्जुन या न करीं अनुमाना ॥ २७ ॥
ब्रह्मपदीं सुख सात्विक आवडि सांडुनि दान करूं धरणीचें ॥
कीं हयमेधें असे बहु यज्ञ तपें करूं कष्ट तरी हवनींचे ॥
ते अवघी जाशि स्वर्गिचि संपति व्यर्थ चि शीण तया करणीचे ॥
ना इह लोक परत्र हि कोठुनि हें वदला हरि ध्यान शिवाचें ॥ २८ ॥

सतरावा अध्याय समाप्त.

---

## १८ वा अध्याय.

यावरि अर्जुन वीनावितो जरि ब्रह्मपदीं विनियोगुनि कर्मा ॥
तो सुटला अणि त्यागुनि कर्म चि तो हि तुझे पदवी प्रति रामा ॥
पाव तया उभया मज संशय ऊपजला परिसें द्वय नामा ॥
हे हृषिकेश कथीं पृथकें मज न्यास दुजा रूप त्याग सुवर्मा ॥ १ ॥
श्रीहरि बोलत एक गमे तुज जाणतसे कवणासि च त्यागा ॥
भेद असे कथिजेत कसा तरि कामिक कर्म चि टाकुनि दे गा ॥
न्यास तया म्हणिजे फळ त्यागुनि नित्य निमित्तक शोधुनि वागा॥
त्याग विचक्षण त्या म्हणती करिती किति आग्रह तो परिसें गा ॥ २
जाणिव घेउनि एक म्हणे अहो कर्म फळास चि केंवि

---

८६ गभस्ती=सूर्य. ८७ मख=यज्ञ. ८८ विचक्षण=शहाणें.

जेविल तो फळतृप्तिस पावत जाणुन कर्म मुळीं न करावें ॥
ऐक म्हणे अळसी जन ठाकति कर्मविना सहसा न सुटावें ॥
यास्तव याग तपें व्रत दानक्रिया करितां गति उत्तम पावे ॥ ३ ॥
निश्चय त्यांत तुं आइक भारत त्याग जया म्हणिजे मत माझें ॥
हे नरशार्दुळ तो त्रिविधा कथिजे उतरे शिरिं कर्मठ ओझें ॥
आणिक जें मज सर्वगताप्रति आवडतें निज बुद्धिस ओझें ॥
तें बुझ कर्म करीत चि उत्तम सत्व बळावत यारिति कीजे ॥ ४ ॥
तृप्तिस पावेँन निश्चित इच्छिल तो काधिं भोजन राहुं सकेना ॥
पोट भरे मग काम सरे सहजें करि निष्क्रिय कर्म हि नाना ॥
यज्ञतपादिक दान करी तरि ज्ञान तया उपजे भ्रम येना ॥
पावन सोडवणें मनुजांप्रति या करणीविन आन दिसेना ॥ ५ ॥
हे इतुकी करणी हि अगत्यचि साडुनियां अहंकार करावी ॥
जेंवि पुरोहित दान करी परि मी करिता हेँ कदापि न भावी ॥
आणि फळास न इच्छितसे करि पक्षिणि पालन बाळक जेंवी ॥
निश्चित हें मत उत्तम माझेँ चि आचरता चुकते भवगोवी ॥ ६ ॥
हांटवटीं[१०] नय आचरती म्हण कर्म दिसे जसेँ फार जयातें ॥
उष्म बहू म्हण अन्न चि टाकुनि लंघन[११] तेंवि त्यजीत हितातें ॥
कर्म चि कर्म निवारितसे पण मोह-भ्रमें भुललें न कळे तें ॥
त्याग त्रिधा तुज सांगितला परि तामस हा म्हणिजे पहिल्यातें ॥ ७ ॥
जाणतसे विधिपूर्वक कर्म परी उबगे[१२] भय मानुनि क्लेशा ॥
आणि म्हणे शरिराप्रति रक्षणधर्म असा मनिं मानुनि तोषा ॥
आदरिलें शुभ कर्म उपेक्षुनि त्याग करी अवघा चि विरेशा ॥
राजस त्याग तया म्हणिजे परि त्याग फळाप्रति नेदिच लेशा ॥ ८ ॥
वर्णविशेष[१३] करी विधिपूर्वक सादर आवडिनें धनुपाणी ॥
संग अहंकृति कर्म फळें त्यजिलीं तरूलागुनि ज्यापरि पाणी ॥
सात्विक उत्तम त्याग असा घडतां हृदयाप्रति संसृति आणी ॥
सात्विक उत्तम त्याग असा घडतां हृदयाप्रति संसृति आणी ॥
कर्म चि कर्म निवारुनि मोक्षसुखाप्रति कांहि *न वानी ॥ ९ ॥
मोक्षपदारूढ बोधबळें मग कर्म शुभाशुभ संशय कैचा ॥
सूर्य निघे तम दीप तयापरि ठाव नुरे कुशळाकुशळाचा ॥
आवडि द्वेष नुठे निज मानसिं आत्मसुखें अवघाचि सुखाचा ॥

१० हाटवटीं=बाजारांत. ११ लंघन=उपास. १२ उबगे=... ... यात. १३ ... श्यंती, मध्यमा, ...त, श्रेष्ठ, मोठा. * येथें कांहीं अक्षरें कमी आहेत.

योग सुयंत्र विरक्ति महौषध कोठुनि ध्यान भरी वरि गोळा ॥
वन्हि गुरूमुख कर्ण शिवे तंव एकसरा भडकोनि उवाळा ॥
साहि रिपू उडवी मग निर्मम अद्वय शांति वरी निज बाळा ॥
ब्रम्हपदा प्रति योग्य असा सरिता उदधी तटिं पावत वेळीं ॥ ५३ ॥
ब्रम्ह स्वयंभु स्वयें घडला फळ देउनियां श्रम सार्थक जालें ॥
ते परमात्म कृपा परिपूर्ण अपेक्षण शोचिं[41] न हेतु निमोले[42] ॥
चांदणिया बहु सूर्य प्रभा सम भेद भुतीं कनकीं नग ठेले ॥
हें कथितां मम भक्तिपरा लभलें जळिं बुद्बुद जेंवि मिळाले ॥ ५४ ॥
ऐक्यपणें मज जाणति निश्चित ते मि असें म्हणतां हि विरेना ॥
सत्य मि हें तुज सांगितलें चवथी निज भक्ति विशेषुनि ज्ञाना ॥
मी अवघा नव्हता अवघेपण कांचन जेंवि नव्हे नग नाना ॥
हें नवमीं कथिलें मज जाणति मीठ निघेल वनांबुधि[43] स्नाना ॥ ५५ ॥
स्वानुभवें मिसळे मज माजि तया मग कर्म शुभाशुभ नाहीं ॥
वोहळ आणि अमंगळ एकचि आश्रय भागिरथी[44]-जळ पाहीं ॥
तेंवि मदर्पण सर्व क्रिया करितां निज ज्ञान ठसावुनि देही ॥
शाश्वत आव्यय अद्वय मत्पद होउनि पावति ते लवलाहीं ॥ ५६ ॥
मत्पर होउनि कर्म समुच्चय सर्व समर्पित ये मजमाजी ॥
मी अवघा मग तूं नुरसी मन बुद्धि अहंकृति चित्त समाजीं ॥
ते अवघे मग मद्रुप होतिल बुद्धिस योग असा जरि योजी ॥
होंचि करीं म्हणतो हरि अर्जुन आळस येय नको सहसा जी ॥ ५७ ॥
जेय अहंपण मद्रुप होइल मद्रुप चित्त दुजें उमजेना ॥
हे स्थिति या भजनें तुज देइन जन्मजरामरणादिक नाना ॥
संशय हा तरसी अति दुर्गम वागुनि अज्ञपणें समजेना ॥
नायकसी अहंता धरूनी तरि हे स्थिति मागुति तुज मिळेना ॥ ५८ ॥
या वरि मी म्हण पांडव अर्जुन कौरव हे मज आप्त तयांसी ॥
युद्ध करूं तरि पाप चि होइल देह अहंमति सांडुनि ऐसी ॥
हा अवघा चि व्यव्हार जसा लटिका मुळ काष्ठ चि बुद्धिबळासी ॥
आणि स्वयें प्रकृती पहतां तुज प्रेरितसे निज जुंझ क्रियेसी ॥ ५९ ॥
बाहुज जाण स्वभाव धनंजय जें कथिलें तुज शौर्य गणूनी ॥

---

४० वेला=लाट. ४१ शोची=शोक करी. ४२ निमाले=नाहींतसे झाले. ४३ वन=पाणी...
४४ भागीरथी=भगीरथ नांवाच्या राजानें तप करून आणिलेली नदी (गंगा)... साधन
हातापासून झालेला ( क्षत्रिय ) ...काचळ=सोन्याचा
...पास मिळणारें.

तो गुण मूर्त्त तुतें घडिलें तरि काय करूं म्हणतोस त्यजोनी ॥
तूं जरि जुंझ कदा न करूं म्हणसी निज दाइज मोह धरोनी ॥
तें करवील अवश्यक कर्म न चालति या रवि हिंडवि रानीं ॥ ६० ॥
या हि वरी सकळां हृदयीं वसतो जगदीश्वर साक्षि भुतांचा ॥
चेष्टवितो भुत-संघैं समस्त हि सूत्र-धरी प्रभु बाहुलियांचा ॥
यंत्र न चेष्टत बाहुलि ही तशि मायिक दावुनि आपण साचा ॥
तो तुझिये हृदयीं करवील तुं व्यर्थ चि आग्रह मांडिसि याचा ॥ ६१ ॥
तो हृदयस्थ तया शरणागत होउनियां भज सर्व हि भावें ॥
जेंवि जळें भरिल्या सरितैं शिरती जळसागरिं अन्य न उठावे ॥
त्या मज आत्मकृपेस्तव शांतिस पावति अर्जुन जाण स्वभावें ॥
शाश्वत जें पद तें चि तुं निश्चित स्वप्निहुनी जसि जागृति यावें ॥ ६२ ॥
या परि जाण जसा म्हणिजे निज वस्तुस होइल जाणत आंगें ॥
हें अति गुह्य गुजा परतें मज तूं प्रिय एकपणें म्हण सांगें ॥
तें अवघें तुझिया श्रवणीं भरलें रस ज्या परिची मुस वागे ॥
तेंवि ठसावुनि मानितसें करिं स्वेच्छपणें उठ सावध वेगें ॥ ६३ ॥
सर्व हि गुह्य तयांतिल उत्तम सांगतसें पुढती तुज पार्था ॥
तें मम वाक्य सुधा न पवे सरि श्रोत्र भरी करिं संग्रह आतां ॥
हे दृढ बुद्धि तुं आत्मसखा मज आवडसी मज हीहानि पार्था ॥
या करितां वदिजे सजणा जशि माय प्रवर्त्तत बाळ-हितार्था ॥ ६४ ॥
एकमनें मजमाजि निघें अवघा चि मि होशिल अद्वय भक्ति ॥
याजक यज्ञक्रिया करि तेनसि मद्रुप आणि फळें हि मि प्राप्ति ॥
सर्व भुतीं मजला चि नमीं जंव होइल निश्चित द्वैत-समाप्ति ॥
आवडसी मज प्रीय प्रिये परि आवडि ये न कदा वचनोक्ती ॥ ६५ ॥
सांडुनि धर्म शुभाशुभ सर्व मला शरणागत ये निज भावें ॥
एक मि जो जग सर्व भरीं जग मात्र नसो मजलाचि पहावें ॥
तेथ मिळे तरि कर्म फळें इह-स्वर्ग-सुखादिक पावन व्हावें ॥
मोक्षपदीं सहज स्थिति अद्वय ठेवित काहिं च शोक न पावे ॥ ६६ ॥
हें न वदें निज गुह्य गिता तप ज्या शरिरास नसे गुरुभक्ति ॥
सज्जन संत न सेवत निग्रह मद्रुप पूर्ण सचेतन व्यक्ति ॥
निंदक जो मज साधु हि निंदिल त्यास नको कथुं हे वचनोक्ति ॥

श्यंती, मध्यमा, ... भाव. ४७ सरिता=नदी. ४८ श्रवण=कान. ४९ सुधा=अमृत. ५० दुरिचारि

सांडुनि तामस राजस सात्विक त्याग असा करिं आदर साचा ॥ १० ॥
प्राकृत मानव देह कदापि तों कर्म अशेष हि टाकुं शकेना ॥
बोलत चालत पाहत जेवत हे करणी अणुमात्र सुटेना ॥
कर्मफळा करि ईश्वर अर्पण मूळ अहंकृति ज्या उपजेना ॥
त्याग तया म्हणिजे फळ आइक तें हि त्रिधा जग भासत नाना ॥ ११ ॥
इष्ट नव्हे कृमि कीटक स्थावर बेधक कर्म फळें रूप याचें ॥
कर्म विधी फळ इष्ट सुरालय पावुनि देह धरी त्रिदेशांचें[१४] ॥
मिश्र क्रिया फळ मिश्र चि लाहुनि देह धरी धरणी मनुज्याचें ॥
त्याग जया न कळे नर बद्धक त्याग फळीं प्रतिधाम सुरांचें ॥ १२ ॥
सत्वबळें गुरु संत कृपे निज निर्गुण वोळखिला निज आत्मा ॥
दीप-प्रभा नग-कांचन बुद्बुद-तोय तसें मुळि ऐक्य चि कर्मा ॥
तेथ परस्पर पंचक कारण आइक हें नय-बाहुक-नामा ॥
सांख्यमतीं कृत निश्चय बोलत व्यास म्हणे कथितो जगदात्मा ॥ १३ ॥
देह उभें म्हण कर्म घडे तरि हें पहिलें दुसरें जिव जाणें ॥
जो विसरे दुसरा म्हणवी तिसरें केरणें[१५] विषयाप्रति घेणें ॥
चेष्टवितो विविधा दशधा चवथें बुझ कारण मारुत[१६] प्राणें ॥
पंचम इंद्र रवी गुरु दैवत मेळ इहीं करि कर्म-उठाणें ॥ १४ ॥
कल्पितसें मन कर्म तयावरि पृष्ठ उभारित बोलुनि वाचा ॥
धांवत पाय करा करणें नर आश्रय आचरतां शरिराचा ॥
संमत शास्त्र तया म्हणिजे विधि ना चि निषेध न मार्ग विघीचा ॥
पांच हि हेतु तया म्हणिजे तुज कारण पंचक ठाउक त्याचा ॥ १५ ॥
येथ तुला कळलें बहु दूर[१७] रवी नभि तद्वत कामिं निजात्मा ॥
आणि जळीं शिशु पाहति बिंब तसें पुढें पाहति आवृत्त कर्मा ॥
तो जळिं लिप्त नसे नभिचा नभि हें पाहति कृतबुद्धि सेवर्मा[१८] ॥
स्वानुभवें निरहंकृति वर्तति नेणति ते कधिं कर्म अकर्मा ॥ १६ ॥
नाहिं च ज्याप्रति भाव अहंमति स्वानुभवस्थिति आत्म स्वसूखें ॥
कारण हेतु वसे सहज स्थिति कर्म उठे परि बुद्धि न माखे ॥
ते करणी च चराचर पाहत हो भलतें बहु तें सुख दुःखें ॥

१४ त्रिदश=देव. १५ करणें=हात, पाय, इत्यादि. १६ मारुत=वारा. १७. दूर रवी-सन १८७४ सालीं शुक्र हा सूर्य बिंबावरुन गेल्या सारखा दिसला तेव्हां ज्योतिष्यांनी दुर्बिनींतून तो चमत्कार पाहून त्याजवरून हिशेब करून असें ठरविलें कीं, र[वी] पासून चार कोटी साडे सासष्ट लक्ष कोस दूर आहे. १८ वर्म=कवच[...]ं.

ब्रह्मपदीं उभयत्र हि नाहिं च होत परस्पर आणिक ऐकें ॥ १७ ॥
कर्मप्रवृत्ति त्रिधा पुससी तरि ज्ञेय असें म्हणिजे विषयातें ॥
त्या विषयीं उपभोग विभोगुनि जाणिव तें म्हण ज्ञान तयातें ॥
जीव तिजा करिता अणि जाणत कर्मक्रिया सकळां करणातें ॥
साधन कर्म त्रिधा परिसें असें तूं सहजें परता सकळातें ॥ १८ ॥
ज्ञान कर्मा करितां गुण वांटुनि देइन तूं करिं सावध चित्ता ॥
सात्विक आचरतां सुटिजे त्यजिजे गुण राजस तामस पार्था ॥
जो पहिलें कथिला गुण सागर तत्व-विचारण संमत मत्ता ॥
सांख्य जया म्हणिजेत तयांतिल हा गुण भेद मि सांगत आतां ॥ १९ ॥
सर्व नगीं कनकास चि जाणत अव्यय सर्व भुतीं निज भावी ॥
मृद्घट माति च तंतु बहू पटिं कीं लहरी जळ वांचुनि दावी ॥
तेंवि दिसे जग भिन्न निजाकृति एक विचारित ऐक्य स्वभावीं ॥
सात्विक ज्ञान तया उपजे बुझ ज्ञेय स्वरूप करूनि च ठेवी ॥ २० ॥
जाण तुं राजस ज्ञान तया म्हणिजे पृथकाकृति हें जग पाहे ॥
कुंभ बहू भरले धरणी तैरेणी तितुकेहि शिशूं म्हणताहे ॥
भिंति उपेक्षुनि चित्र बहूविध अश्वगजादिक मानित मोहें ॥
ज्ञान बहूविध ज्ञेयें गवाळ चि कोण मि हें अपणा हि न लाहे ॥ २१ ॥
ज्ञान नव्हे परि तामस ज्ञान जया विषयीं भर शास्त्र दिसेना ॥
बाळक बागुल देव जसा निज देह चि ईश्वर तत्व कळेना ॥
जें करणें अविधी निज स्वार्थ विना न सुचे उदरा अणि शिस्ना ॥
भक्षविषीं निवडूं न सके वैधु सोयरिके रिति वाचुनि घे ना ॥ २२ ॥
सात्विक कर्मतया म्हणिजे नियतें करि वर्ण-विशेष विभागें ॥
सांग घडे तरि राग नसे चुकलें हि कदाचित द्वेष न लागे ॥
सूर्य प्रकाशित विश्वक्रिया परि तो निरहंकृति तेंवि असंगें ॥
आचरणें जगदीश्वरिं अर्पित बद्ध नव्हे सहसा फळ-त्यागें ॥ २३ ॥
इच्छुनि काम करी वधु-पालन आणि अहंकृति मी करितों हे ॥
हेतु फळीं बहु कष्ट न मानित आंगि उपास वनें फिरताहे ॥
तेंवि करी फळ इच्छुनि कर्म मनीं अहंकार अपार चि वाहे ॥
जेंवि भिके शिरिं सर्प चि वाहत गारुडि राजस कर्म पहा हें ॥ २४ ॥
जें करिती अपणास हि बाधित शीण दुज्या शिणवी बहु क्लेशें ॥

१०० शिशू=मुलगा. १ गज=हत्ती. २ ज्ञेय=जाणण्याचा विषय. ३

ष्यंती, मध्यमा, सर्व

आणि अकारण व्यर्थ अडंबर कष्ट जिवाप्रति देति अशेषें ॥
नेणतसे करणें त्यजणें अविवेक उचाटन मारण ऐसें ॥
कर्म घडे रूप तामस जाणसि त्याग-मिषें कथिजे हृषिकेशें ॥ २५ ॥
जो अपणें अपणास चि जाणत मुक्तपणें फळ होउनि आंगें ॥
शुद्ध क्रिया निगमोदित वेंचित जो हरिखे[४] अधिकाधिक योगें ॥
सिद्ध असिद्ध कदाचित हो परि हा अविकारपणासि न भंगे ॥
वर्ततसे निरहंकृति सात्विक आचरता तुज लागुनि सांगें ॥ २६ ॥
कर्म-फळाप्रति इच्छुनि आवडि लुब्ध धनी बक मत्स्य गिळाया ॥
स्वार्थमुळें शिणवी भलत्यास हि जो न विचारित आप परा या ॥
बाहिर आंत सदा अशुची घडितो शत शें घडि शोक कराया ॥
वेळ नसे बुझ राजस हा करिता मज वाटत भारत-राया ॥ २७ ॥
जन्मत अंध तया रविचे परि त्यक्त अनोळख प्रेम शरीरा ॥
नित्य सचित्त उगा फुगला कपटें जन मोदितसे अपहारा ॥
नाठउनी गुण दोष चि पाहत शुद्ध क्रिये अळसी धन दारा ॥
प्राप्तिस प्रेत्न बहू मनिं क्रोध बुझें नर तामस अर्जुन वीरा ॥ २८ ॥
त्याचि परी धृति बुद्धि गुणी तिहिं भेद विभागुनि देउं किरीटी[५] ॥
आइक ते अवघी पृथकाकृति विस्तरिजेत सख्या तुज साठीं ॥
सांडुनि राजस सात्विक ग्राहिक तामस हो श्रवणें जगजेठी ॥
त्यांतिल बुद्धि च ते पहिली कसि श्रीमधुसूदन दावित ओठीं ॥२९ ॥
शास्त्रदिठी गुरुसंत मुखें निज मोक्ष वरी म्हणिजेत निवृत्ति ॥
शिष्ट रिती जनिं वर्ततसे करणीय क्रिया बहु तेय प्रवृत्ति ॥
कार्य अकार्य बरें निवडी भय निर्भय बंध विमोचन शांति ॥
जे सकळी कुरु-नंदन बुद्धि ते सात्विक शोभत माळ महंती ॥ ३० ॥
जे निज धर्म अधर्म न नीवाडि कार्य अकार्य विचार करीना ॥
सेव्य असेव्य अनोळख त्यांत हि भोगविशीं अनुताप धरीना ॥
होईल लोक किं स्वर्ग अपेक्षित काय करी इतुकें हि कळेना ॥
ते बुझ राजसि बुद्धि धनंजय मिश्र क्रिया उपजे जिस नाना ॥ ३१ ॥
वाटतसे निज धर्म अधर्म दिवाभित[६] जेंवि दिसा करि राती ॥
कावळिया दृढ शत्रु सुधाकर देवहिना धन पायर माती ॥
मूढपणें अवघी भरली म्हण सर्व निषेधि च होय प्रवृत्ती ॥ ... साधन
... काचळ=सोन्याचा

४ हरिखे=आनंद पावे. ५ किरीटी=अर्जुनाचें नांव. ६ दिवाभो...पास मिळणारें. २६
चंद्र.

तामस बुद्धि अशी कुरुनायक त्याग करी न धरोनि असक्ति ॥ ३२ ॥
तीनविधा धृति त्यांतिल सात्विक आइक अर्जुन हे पहिलें हे ॥
जे निरहंकृति दृश्य उलंघुनियां प्रिणवावरि प्राण न वाहे ॥
जेथ नुरे पहता पहवेपण शब्द मनेंद्रिय जेथुनि राहे ॥
एक पणें निज योग बळें धरि ध्यान क्रिया सुख अक्षयि लाहे ॥ ३३ ॥
कामिक धर्म अशाश्वत अर्थ तयावरि जे धृति कर्म अरंभी ॥
भीक मिषा करि घे परडीभरि इंद्रपदा प्रति इच्छित लाभीं ॥
प्राण सरोवरिं व्योमं[9] पडो तरि येक रुका नुमसे अति लोभी ॥
ते धृति राजस जाण तुं अर्जुन सांगतसे नवपंकँज[10]-नाभि ॥ ३४ ॥
तामस जे धृति ते चि तुं आइक झोंप सदा भय देह धनाचें ॥
शोक विषाद निरंतर संग्रह मानुनि शाश्वत या विषयांचे ॥
काम-वयें मद शीळ कुळींरुप अष्ट मदें परिवेष्ठित नाचे ॥
अष्ट अहंमति सोडि च ना जसें पष्ठ चि तें विष मारक सांचे ॥ ३५॥
ज्ञानक्रिया करिता धृति बुद्धि हि सांगितली त्रिगुणीं रुप तूतें ॥
सांगतसें गुणभेद त्रिधा सुख तें हि निरूपण आइक चित्तें ॥
जेंवि पदोपदिं पंथ सरे मग पावति पांथिक वस्तिसुखातें ॥
अभ्यसितां रमतां स्वरुपीं सुख दुःख निवारुनि सूख चि होतें ॥ ३६ ॥
हे विषयें त्यजितां पहिले श्रम सर्प उसें तितुकें जरि कापी ॥
स्वस्त उरे अवघाचि तया परि बुद्धि भरे सुख स्वात्मस्वरूपीं ॥
निंब कडू परि रोग निवारित रांधन तृप्तिस कष्ट प्रलोपी ॥
तेंवि मुळीं विष शेवटिं अमृत सात्विक तें सुख श्रीहरि स्थापी ॥ ३७ ॥
हे विषयें करणां[11] मिळतां सुख पीयुंष[12] ही उपमेस न मानी ॥
वंचित जीवित नाश धना परि सूकृतसें न पडे कधि कानीं ॥
भोग अशाश्वत स्वप्न तसा नरदेह अमोलिक व्यर्थ निदानीं ॥
राजस तें सुख चाळणिच्या परि त्याग करी धरुनी अवधानी ॥ ३८ ॥
जें पहिलें सुख शोक कि ज्यापरि बंधन पावत मोह जिवात्मा ॥
झोंप सुखा न गणी च सुरालय[13] आळस झोंपडि माजि रिकामा ॥
आणि उठे तरि होय प्रमाद[14] चि तें करणें वश होउनि कामा ॥
कृत्य अकृत्य अनोखळ तामस धुंदरु शीकतसे सु* नामा ॥ ३९ ॥

---

९. व्योम=आकाश. १० नवपंकजनाभि=नव्या कमलासारखी आहे ... ११ करण=इंद्रिय. १२ पीयूष=अमृत. १३ सुरालय=देवाचें घर
* येथें एक अक्षर कमी आहे.

फार असो त्रिगुणापरते धरणी [15]त्रिदशालय देव [16]नरा ती ॥
नें घडलें प्रकृतीकृत सर्व हि दाखवि घागरि वेगळि माती ॥
तंतुस त्यागुनि पट्टरूपानय सांडुनियां जळ बुद्बुद होती ॥
सत्वरजस्तम सर्वगुणातित आइक आणिक [17]वर्णविभक्ती ॥ ४० ॥
ब्राह्मण मुख्य धुरे [18]निगमोदित त्या चि परी अधिकारि हि क्षत्री ॥
सत्व-गुणीं रज सत्व मिळे तरि वैश्य तिजे भरले [19]श्रुति-शास्त्रीं ॥
[20]वर्णं तिन्हीहुनि तामस राजस शूद्र चतुर्थ हि होउनि सूत्री ॥
वर्ण विभागुनि कर्म स्वभाविक आइक अर्जुन सावध [21]श्रोत्रीं ॥ ४१ ॥
बुद्धिस आत्मरूपीं स्थिरणें शम इंद्रिय तेथ दमी दमनें ॥
सात्विक सांगितलें तप तें शुचि निर्मळ क्षांति उणें सहणें ॥
[22]आर्जव सर्व भुतीं सम ईश्वर निश्चय ज्ञान तया म्हणणें ॥
जाणिव ग्रासुनियां उरणें बुझ ब्राह्मण या परि कर्मगुणें ॥ ४२ ॥
एकपणें सुरसिद्ध जसा हरि प्राङ्मुख रात्रि जसी रवि-तेजें ॥
धैर्य जसा [23]कनकाचळ दक्ष समस्त हि जाणुनि जाण उरीजे ॥
युद्धिं उभा तुकडे जहले गण प्राण अवश्य शरीर चि झुंजे ॥
दान [24]अवंचक ईश्वर भाव हि सत्य गुणी असे शोभति राजे ॥ ४३ ॥
नागर बीज पशू मुदलें करि शेतकि पाळन गाइखिलारें ॥
घेउनियां [25]संवगें विकती बहु वस्तुस माहग वैश्य-क्रिया रे ॥
ब्राह्मण क्षत्रिय वैश्य तिघां श्रुति सूत्र निजाश्रय दुर्धर वारे ॥
सेवक शूद्र तिघां सजिला करि चाकरि आवडिने अधिकारें ॥ ४४ ॥
सांगितलें तुज कर्म स्वभाविक तें करिती निज वर्ण-विभागें ॥
सत्वगुणें प्रितिपूर्वक आचरतां नर निश्चित [26]मोक्ष चि भोगे ॥
जें अपुलें अपणासि च ठाउक शास्त्रदिपें करि आणिक नेघे ॥
स्वात्म-क्रिया-रत पावत सिद्धिस ज्यापरि आइक तें तुज सांगें ॥ ४५ ॥
जेयुनि भूतसमूह प्रवर्तति जें न गुणी सह जें निज कर्मी ॥

---

१५ त्रिदशालय=देवाचें घर ( स्वर्ग ). १६. नर=अर्जुनाचें नांव. १७ वर्णविभक्ती=अक्षररचना ( शब्द ) १८ निगमोदित=वेदानें सांगितलेला. १९ श्रुति=वेद. २० वर्ण=रंग, जात. २१ श्रोत्र=कान ( "त्र" प्रत्यय साधन दाखवितो जसें वक्त्र=बोलण्याचें साधन, नेत्र=वाट दाखविण्याचें साधन, पात्र=पिण्याचें साधन खनित्र=खणण्याचें साधन इ० ) २२. आर्जव=सरळपणा ( ऋजु=सरळ=( मराठी ) उजू ). २३ कनकाचळ=सोन्याचा पर्वत, मेरु. २४ अवंचक=न फसविणारा. २५ संवगें=थोड्या किमतीस मिळणारें. २६ मोक्ष=सुटका.

व्यापक जें सकळांसि दुजेविण जेंवि नगां[27] स्थिति उद्भव हेमीं[28] ॥
तें मुळ जाणुनि अर्चति आवडिनें विधिपूर्वक वर्ण-स्वधर्मीं ॥
ते नर सिद्धिस पावति निश्चित राहुनि अक्षयि या निज धामीं[29] ॥ ४६ ॥
जो निज धर्म जया कथिला तरि तो चि तया भव-सागर तारी ॥
त्याहुनि तो बरवा परधर्म दिसे परि तेथ नसे अधिकारी ॥
तूप जसें परमोत्तम जाणुनि मीनें[30] न सेवित सांडुनि वारी[31] ॥
यापरि कर्म स्वभाविक तूं करिं कल्मष-पाप समस्त निवारीं ॥ ४७ ॥
जो निपजे सहजे निज कर्म शुभाशुभ ही परि क्लेश चि आधी ॥
इंधन काष्ठ नव्हे न करी तरि लंघन काय चुकेल त्रिशुद्धी ॥
यास्तव टाकुनियां अशुभाशुभ कर्म सदोष न मानुनि साधीं ॥
धान्य शुभासह आगि धुमासह नीवडितां पहिले श्रम बाधी ॥ ४८ ॥
पुत्र कलत्र[32] धना वमना[33] परि बुद्धिस आत्मरूपीं मन ठेवी ॥
निस्पृह[34] पूर्णपणें सहज स्थिति अद्वय सन्यसनें गुरु दावी ॥
कर्म क्रिया करितां न उरे निरहंकृति कोण फळाप्रति भावी ॥
कर्म नुरे परमोत्तम सिद्धिस पावतसे सरितोदधि[35] जेंवी ॥ ४९ ॥
सद्गुरुचे दयें ज्ञान सुनिश्चित पाउनि इंद्रिय-अर्थ[36]-विरक्ति[37] ॥
जे निरहंकृति कर्म-फळें जगदीश्वरिं अर्पण कर्म-समाप्ति ॥
तो परब्रह्म सुसिद्धिस पावत भोजन ग्रास अनुक्रम तृप्ती ॥
जाण तुतें कथिजे विर अर्जुन आयकुनी धरिजे निज चित्तीं ॥ ५० ॥
आत्म विचारण निर्मळ बुद्धिस सत्वधृती धरिलें मन पाहे ॥
जें विषयांतुनि काढुनि घेउनि चंद्र जसा शिवमस्तकिं राहे ॥
देह वसे अनुकूळ प्रतीकुळ तें तरि आवडि द्वेष न पाहे ॥
यावरि ही परिसें कुरुनंदन तो मग काय कसें करिताहे ॥ ५१ ॥
राहतसे विजनीं[38] लघु[39] भोजन बोलत मौन जया निज वाचे ॥
वागवितो शरिरा गुरुभक्तिस आत्मरूपीं स्थिर वेग मनाचे ॥
ध्यापक ध्येयक जें न दिसे निज ध्यान स्वयें फळयोग सुखाचे ॥
त्या अवघ्या मुळ एक विरक्ति च ते धरिली जसि तेज रवीचें ॥ ५२ ॥

---

२७ नग=दागिना. २८ हेम=सोनें. २९. धाम=घर. ३० मीन=मासा. ३१ वारी= ... ३२ कलत्र=बायको (लग्नाची) ३३ वमन=ओक. ३४ निस्पृह=ज्याला कशाचीही ... श्यंती, मध्येंमे ... ३५ सरितोदधि=(सरिता=नदी, उदधि=समुद्र). ३६. इंद्रिय-अर्थ=इंद्रि- ...र्थ-जसें नाकाला सुवास, डोळ्यांना सुंदरपणा, जिभेला गोड पदार्थ, ३७ विरक्ति=प्रीति नसणें. ३८ विजन=एकांत. ३९ लघु=थोडें.

वाल्मिकि असा दुरिचारि हि अंत्यज सेवि नये चुकला द्विजपंक्ति ॥ ६७ ॥
ज्या श्रवणीं प्रिति आणि अनिंदक सद्गुरु दास भजे मन भावें ॥
त्या प्रति हे अति गुह्य गिता गुरुगम्य विचारुनि शास्त्र कथावें ॥
जो नर भक्ति गिता करि एक मला भजतो लहरीजळ भावें ॥
तो मि असें नसें द्वैत असंशय देह दिसो परब्रम्ह म्हणावें ॥ ६८ ॥
तो वर माणुस कोण म्हणे करि वर्तन वैखरि ग्रंथ गितेसी ॥
जे मज भक्त सखे निज सज्जन आवडते श्रवणें पुजि त्यासी ॥
तो मज आवडता निज आवडि सांगत मौन पडे वचनासी ॥
या जगतीवरि आन तसा प्रिय मी हि मला न दिसे नयनासी ॥ ६९ ॥
जो सकळार्थ प्रकाशक धर्म समस्त हि शास्त्र सिमे मुळ ठावो ॥
जो तुजसीं वदलों इतिहास गिता पठनीं कुळिचा कुळ-देवो ॥
अर्थ विचारुनि ज्ञान हुताशनिं दृश्य हवी फळ त्याप्रति पावो ॥
तें चि तया फळ पाठक याजक ते च पदीं गति मे मति पाहो ॥ ७० ॥
भक्ति पुरःसर आणि अनिंदक आइकतां श्रवणीं शुभ गीता ॥
अक्षरशा हयमेध घडे निरसे जड पाप त्रितापें अहंता ॥
जे शुभ लोक शुकादिक नारद व्यास मुनी सनकादिक पार्था ॥
पावत जेथ समागम सज्जन वाहत मुक्ति घरीं जळ माथां ॥ ७१ ॥
हे कुरुनंदन हें चि पुसों तुज आइकिलें कथिल्या परि आम्ही ॥
तें तुझिया श्रवणीं भरलें मननें स्वसुखानुभवीं परब्रह्मीं ॥
अज्ञपणें पहिले हृदयीं अति मोह रवी बिनतेज न व्योमीं ॥
तो हरला किं नसे तम हा कायें दृष्टि तुझी पडली निज कर्मीं ॥ ७२ ॥
अर्जुन बीनवितो हरि अच्युत बोलतसे रवि कोटि प्रकाशें ॥
मोह समूळ नसे स्मृति सावध संशय ही हरला अनयासें ॥
कर्म अकर्म विवर्जित होउनि आत्मपणें तुज मीसळलासें ॥
तूं वचनें करवीशिल तें करितों कळ बाहुलिया मुळ जैसें ॥ ७३ ॥
बाहिर अंतर आंधळिया प्रति संजय सांगत स्वानुभवानें ॥
पार्थ हरी सुख बोलत बोलत बोल सरे मिनले स्वसुखानें ॥
दोन जळोदधि एकजळें मिळतां मि हि लोट धरीं श्रवणानें ॥

---

* वाल्या कोळी. ५० दुरिचारि=दुराचारी=पापी. ५१ वैखरी=बोली. ५२ आन=अन्य=दुसरा. ५३ हयमेध=घोडयाचा यज्ञ, अश्वमेध. ५४ त्रिताप=तीन प्रकारचें [illegible] आधिदैविक म्ह० वीज इत्यादिकांपासून होणारीं; आधिभौतिक म्ह० विस्तव, [illegible]णी [illegible] पासून होणारीं; आध्यात्मिक म्ह० शरीरावरील खरुज इत्यादिकां[illegible]पासून होणारीं [illegible] [illegible]चक=सोन्या[illegible] मिळणारें

मीळतसा विरतो अति अद्भुत कांपत सात्विक भाव अशानें ॥ ७४ ॥
आणि म्हणे गुरु धन्य कृपानिधि उद्धरिलें मज व्यासमुनींद्रा ॥
जो परयोग सदाशिव ध्येय स्वयें वदला हरि गुह्य समुद्रा ॥
स्थापुनियां जग मार्ग-प्रकाशक वेद करी श्रमला सुखनिद्रा ॥
ते मज देसिल पायदळे फळले सुख लोचन लावुनि मुद्रा ॥ ७५ ॥
बोलत हे कुरु-वंश शिखामणि आठवितां पुढती पुढती हा ॥
केशव अर्जुन एक परस्पर बोलियला वचनोदधि पाहा ॥
अद्भुत त्या स्वसुखा पहतां मन हारपलें सह इंद्रिय दाहा ॥
आणि घडीघडि हृद्गत दाटत हर्ष करी विसरा निजदेहा ॥ ७६ ॥
हे महराज मला बहु विस्मय आठवितां हरि-विश्वरूपातें ॥
अद्भुत तें निर्विचें न वचे वरिच्या वरि दाटत सात्विक चित्तें ॥
येरु मनीं म्हणतो न पुसों तुज येश अपेक्ष घडे कवणातें ॥
जाणुनि हृद्गत तें कयि संजय आठवुनी बरवें भविष्यातें ७७ ॥
श्रीपति योगपती कमलापति जेय कृपा करि आत्मसुखानें ॥
पार्थ धनुधरि तें चि कृपामृत प्राशुनि घालित तेय चि ठाणें ॥
तेथ श्रिया विजया सह नांदत व्यासकृपें मज निश्चित बाणे ॥
उद्धवचिद्‌घन स्वानुभवें सुख पावत लेवुनि अद्वय-लेणें ॥ ७८ ॥

उद्धवचिद्‌घनानें केलेलें गीतेचें भाषांतर समाप्त.

## मुक्तेश्वरकृत.

### रंभाशुक-संवाद. (ओंव्या)

तुज कामाक्षीचेनि वरें । कामना जाणीव अंगीं भरे । मग अविकार विकारी अवतरे । इंद्रियासनीं भोगार्थ ॥ १ ॥ सुरतासनाचिये हे डाक । पराच्या पायीं अडकतां देख । घुमों लागे अधिकाधिक । लोळती लोक तिजपायीं ॥ २ ॥ ह्मणोनि त्रैलोक्यवेधकें । त्रैलोक्यक्षोभकारकें । तपसोमकांतउदकें । मुखेंदुकिरणीं करिताति ॥ ३ ॥ ऐशिया अमृतोपम वचनीं । रंभा गौरवी वज्रपाणी । सखियां सहित अप्सरगणीं । तेणें येरी संतुष्ट ॥ ४ ॥ शक्रवाक्येंदुरश्मिस्पर्शें । रंभावदनकुमुद विकासे । हस्त जोडणीयाचेनि मिसें । संकोचलीं करपद्में ॥ ५ ॥ विनय चर्चोनि शरीरीं । रंभा वचन वाटोगारी । सुरेंद्रश्रोत्रलिंगावरी । पूजा बांधी संभ्रमे ॥ ६ ॥ ह्मणे आज्ञा देईं सुरनाथा । कवणा विघ्न करूं आतां । स्वर्गा येतां त्यांच्या पंथा । मार्गार्गळा होऊनि राहूं ॥ ७ ॥ घालूं नेमिष्ठावरी धाडी । पाडूं योगियांच्या मुरकुंडी । तपश्चर्येची पोतडी । हिरोनि आणूं या ठायां ॥ ८ ॥ माझ्या देहाचें वोढण । आड असतां तुह्मां विघ्न । स्वप्नीं ही परि नाहीं जाण । दुश्चित्त मन कां करिसी ॥ ९॥ ऐकोनी रंभेच्या वचना । हर्ष न संटे शक्रमना । आज्ञा देऊनी सुरांगना । शुकाश्रमीं पाठविली ॥ १० ॥ ह्मणे वेगीं जाय सुभद्रे । मदनांगने सम सुंदरे । मदनमेखले मनोहरे । जेथें वसे तो तपी ॥ ११ ॥ तया शुका क्षोभवीं बळें । तपा विघ्न करीं वहिलें । समाधि भंगोनी कामकळे । भुलवोनि करीं आपैसा ॥ १२ ॥ जैसा निरपेक्ष अयाचित । तो ही द्रव्यार्थें होय भ्रमित । तत्वनिष्ठा विवेकवंत । गुरुत्वमानें नाचवी ॥ १३ ॥ तयापरी व्यासतनया । मोहोनि आणीं इया ठाया । जैसें पूर्वीं उर्वसीया । विश्वामित्रा लागोनी ॥ १४ ॥ ऐशीं शचीवराचीं वचनें । रंभेनें केलीं कर्णभूषणें । मग शुकविग्रहा उत्साह मनें । निघती झाली तात्काळ ॥ १५ ॥ आरूढली दिव्य विमानीं । तेजें लोपले द्वादश तरणी । रत्नमाळा घंटा किंकिणी । वरी ढळती चामरें ॥ १६ ॥ उपमेरहित पुष्पकीं शोभा । शिखरें गोपुरें ध्वजस्तंभा । पताका झळकती त्या प्रभा । विद्युल्लता लज्जित ॥ १७ ॥ पैंज बोलोनी शुभानना । बाळा प्रौढा मुग्धांगना । प्रतापें चालिल्या ऋषिकानना । नाना कन्या समवेत ॥ १८ ॥ हस्तिनी चित्रिणी पद्मिनी । चांपेगोरटिया शंखिणी । षोडशवर्षा सुरतासनीं । कुशल कळा जाण-

---

१. कामाक्षी=देवी. २ सोमकांत=चंद्रकांत. ३ इंदु=चंद्र. ४ वज्रपाणी=इंद्र. ५ रश्मि=किरण. ६ कुमद=चंद्रविकासी कमल. ७ पद्म=सूर्यविकासी कमल. ८ अर्गला=अडकाव. ९ मदनांगना=रति. १० मेखला=कमरपट्टा. ११ शचीवर=इंद्र. १२ तरणी=सूर्य. १३ पुष्पक=विमान.

त्या ॥ १९ ॥ कटकें मांडिलीं शुकावरी । म्हणोनि कामाच्या दळें नारी । साह्य घेतल्या झुंझारी । वैराग्याशीं भीडती ज्या ॥ २० ॥ वस्त्रें नितंबीं वेष्टिलीं । तें चि दुर्गें[14] पन्नासिलीं । पुढें निरियांची पौळी[15] । कडेलागीं लागटा ॥ २१ ॥ चरणीं गर्जती नूंपुरें । तींच वाजलीं रणतुरें । योगाभ्यासीं भेदुरे । तयांभ्यानीं सरताती ॥ २२ ॥ रक्त रंगाचीं करारें । तींच मिरवती खड्गाकारें नयनकटाक्षाचेनि शरें । नेमें विंधिती नेमियां ॥ २३ ॥ उदरीं त्रिवळीचिया रेखा । ते चि कटार खोंविली देखा । पाखराचीं कुळें ऐका । खेटकांकारें शोभती ॥ २४ ॥ कठिण कुचाग्र आणि पाळी । ते चि भालियाची फळी । हृदयें नरांचीं कोंवळीं । विदारिती कौतुकें ॥ २५ ॥ अंगीं चंदनाची उटी । तें च वज्रकवच नेहटी । कस्तुरी रेखिली ललाटीं । ते चि टोप बाणले ॥ २६ ॥ भंगावया तपोदुर्गें । गजभार प्रेरिला अनंगें । माजी मुखरिणी निजांगें । रंभा मिरवे मृगाक्षी ॥ २७ ॥ तुरें दुंदुभीचे घोष । भेरी गर्जविती आकाश । रागोद्धारी विणे सुरस । श्रुती देती सुस्वर ॥ २८ ॥ या वेगळीं अप्रसिद्धें । वाद्यें वाजती नानाविधें । सुरसामृताचे स्वादें । गंधर्व गायन करिताती ॥ २९ ॥ ताळमृदंगाच्या मेळीं । नृत्य करिती सप्त ताळी । राग आलाप गदारोळी । विनोद करिती परस्परें ॥ ॥ ३० ॥ सरिसा वसंत कुसुमाकर । परिमळें भरे अंबरें । आणिक नाना विघ्नाकार । देखतां विकार उपनविती ॥ ३१ ॥ मैथुन करिती क्षणक्षणा । तया पक्षियांचीं युग्में जाणा । करीं घेऊनी दिव्यांगना । हास्य करिती विनोदें ॥ ३२॥ हंस हंसिणीच्या प्रेमें । माया कुरवाळिती संभ्रमें । रमों लागती सकामें । सुवर्णपक्ष पसरोनी ॥ ३३ ॥ दोन मर्कटें दोहीं करीं । मध्यें सोडिती * *। दोघे रमतां दो प्रकारीं । कौतुकें नारी हांसती ॥ ३४ ॥ येकींचे हातीं कस्तुरीमृगें । मुखा मुख लावोनि दोघें । सुरत सुखा लागीं स्वांगें । मृगीवरी योळघती ॥ ३५ ॥ येकींचे हातीं विचित्र पट । चौऱ्यांयशी आसनांचे प्रगट । मैथुनें लिहिलीं जीं वीट । वैराग्यातें उपजविती ॥ ३६ ॥ येकीं उघडे टाकिले कुच । येकीं मुक्त केले कच्छ । येकीं फेडुनी आह्याच । वस्त्रें केली वरौतीं ॥ ३७ ॥ सुरतासनाची घडमोडी । येक दाविती कडोविकडी । ऐशा विघ्नरूपाचिया कोडी । रंभा घेउनी पातली ॥ ३८ ॥ ताळपत्राचा निर्घोष । गीत गायन करिती सुरस । जेथें वसे शुकयोगीश । तें पुण्यारण्य टाकिलें ॥ ३९ ॥ तेथें पवित्रतेचेनि तरुवरें । दांगें लागलीं अपारें । ज्याचें नाम घेतां हरे । शीण ताप तापसाचा ॥ ४० ॥ जैसा वरदेवतांचा मेळा । तैसें व्यापिलें वना सकळा । किंवा शक्तीचिया स्थळा । कोढी

१४ दुर्गें=किल्ले. १५ पौळी=तट. १६ नूपुर=पैंजण. १७ रणतुरें=रणवाद्यें. १८ खड्ग=तरवार. [illegible]=ढाल. २० भार=समूह. २१ आकर=खाण. समूह. २२ अंबर=आकाश.

कुब्जीं वेढिजे ॥ ४१ ॥ ममता लोप आत्मप्रभे । कार्पण्य विटंबे यश शोभे । नाना सत्य सामर्थ्यदंभें । आच्छादिजे ज्या परी ॥ ४२ ॥ तैसें व्यापुनी सर्व वना । शोधीत आल्या तया स्थाना । त्यातें वेढोनी अंगना । पहात ठेल्या समस्त ॥ ४३ ॥ शुका भोंवत्या कामिनी । जैशा रत्यर्थयाचकिणी । शुकयोगिया शिरोमणी । कैसेनि पावे भ्रमातें ॥ ४४ ॥ रामासन्मुख शूर्पनखा । उभी व्हावया निर्नासिका । तैशा परी ते योगिया शुका । रंभा उभी सखियांशीं ॥ ४५ ॥ कीं मोहमाहेरींची देवी । कामुकाचे नवस पुरवी । अळंकार ल्याली तेणें रवी । झांकोळला अंबरीं ॥ ४६ ॥ नागवुनी सुरांच्या श्रेणी[23] । हरितलीं मनोलक्षण नाणीं । तीं सांठवितां हृदयस्थानीं । तेणें आलें जडत्व ॥ ४७ ॥ सांठविलें तें सांडल झणी । यालागी कंचुकी गोणी । माजी दाटोनी कसणी । बिरडें कशी सुबद्ध ॥ ४८ ॥ मन्मथोत्सव मदोन्मत्त । अक्षय तारुण्य हेलावत । कामदृष्टी अवलोकित । चेंडू झेलित सुमनाचे ॥ ४९ ॥ श्वेत कृष्ण इक्षुदंड[24] । झाडी तैसा कामकोदंडें[25] । मस्तकतुळीतसे ब्रह्मांड । उणें मानूंनी सौंदर्या ॥ ५० ॥ जे जे दिशा न्याहाळी । ते ते भरे कामानळीं । ऐसा न दिसे कोणी बळी । काम नुपजे देखिल्या ॥ ५१ ॥ देव दानव गंधर्व ऋषी । ब्राह्मण महात्म्ये तपोराशी । लागतां कामबाणाचे पिशी । पिसे होती तात्काळ ॥ ५२ ॥ जिच्या कटाक्षाच्या घायीं । बहु घायाळ झाले हृदयीं । त्यातें उपाय तिसरा नाहीं । दुःखशमनार्थ निववावया ॥ ५३ ॥ एक अधरामृतपान[26] । तें च रसराज सेवन । कुचालिंगन तें लेपन । औषधीचें वेरीतें ॥ ५४ ॥ असो ऐशिया परी रंभा । धरोनि दांभिकतेची शोभा । शुक छळावया लोभा । पुढां उभी विनोदें ॥ ५५ ॥ अवलोकिती शुकाची स्थिती । तो जितेंद्रिय सत्वमूर्ति । चर्चिली निष्ठेची विभूती । तेणें सर्वांग शोभलें ॥ ५६ ॥ ब्रह्मरसें वातिलें । तैसें तेज मुखास आलें । निश्चय कमंडलीं भरलें । ज्ञानोदक सर्वदा ॥ ५७ ॥ सत्य धृती अलोभ क्षमा । ऐशी तपोगुण महिमा । दिधली नसे तया गरिमा । नाहीं आथिलेपणाची ॥ ५८ ॥ संकल्प प्राण मृगाचा । गेलिया निर्विकल्प त्वचा । त्यावरि विदेही तो साचा । पद्मासनीं निश्चळ ॥ ५९ ॥ "कृष्णोहंमस्मि[27]" बोध सतत । तें ची कृष्णाजीन[28] उपवीत[29] । मेखळा गाढ दृढ व्रत । मुद्रा मिरवी शांभवी ॥ ६० ॥ उत्पत्तिविनाशाची पातीं । विचारें सारोनी परौती । अबिनाश नासाग्रीं निरुती । दृष्टि ठेविली निज लक्षीं ॥ ॥ ६१ ॥ पर तत्त्वीं लय मनाचा । तेणें उदय प्रसन्नतेचा । संगीं परम धारणेचा । कुशासनीं मिरवत ॥ ६२ ॥ अगाध सत्वें सत्वाथिला । ऐसा रंभेनें

२३ श्रेणी=पंगत. २४ इक्षु=ऊंस. २५ कोदंड=धनुष्य. २६ पान=पिणें. २७ कृष्णोहमस्मि=मी कृष्ण आहें. २८ कृष्णाजीन=हरणाचें कातडें. २९ उपवीत=उपवस्त्र (आडवस्त्र).

देखिला । कामदृष्टी अवलोकिला । मदनबाण सज्जोनी ॥ ६३ ॥ अनुपम्य लीळा लक्षोनि नयनीं । रंभा परम आश्चर्य मानी । वयें धाकटा परि हा मुनी । तपोज्ञानें अति वृद्ध ॥ ६४ ॥ तुळशीचें रोप जैसें । दृष्टी पाहतां सान दिसे । परि पवित्रपणें मस्तकीं वसे । विश्ववंद्य विष्णूच्या ॥ ६५ ॥ तेंवि वयासी नाहीं चाड । ज्ञान वसे तें चि वाड[३०] । वांचोनि बाभळेचें खोड । काय करावें बहु काळींचे ॥ ६६ ॥ असो ऐसा हा नरी नाला । तपो वैराग्यें थोरावला । तरी मी जिंकीन यया बोला । आन नाहीं सर्वथा ॥ ६७ ॥ पुण्याचें अक्षोभ्य बळ । येकली निंदा करी विकळ । कीं कोटिदानाचे असंख्य मेळ । निष्ठुर वाक्ये विध्वंसी ॥ ६८ ॥ तेंवी **शुकाचे** नेमगहन । भंगोनि क्षोभवीन **मदन** । माझिया भोगा पुढें तृण । वैराग्य मानी ते रंभा ॥ ६९ ॥ ऐसा धिवसा धरोनि चित्तीं । बोलती झाली **शुका**प्रती । तें अनुपम निरूपण श्रोतीं । एकचित्तें परिसावें ॥ ७० ॥ सकळ मुनींच्या नाया । ज्ञान वैराग्य ऐश्वर्यवंता । मिनल्या सुकृताच्या सरिता । तपोनिधी तुजलागीं ॥ ॥ ७१ ॥ तुझिया कीर्तीचा सुगंध । विश्वीं फांकिला विशद[३१] । या लागीं पावोनियां बोध । मी मधुकरी[३२] पातलें ॥ ७२ ॥ आर्त[३३] जनांचा पारिजात[३४] । ऐकोनि आलें अभाग्यवंत । भाग्यतेचें आतिथ्य । तुवां केलें पाहिजे ॥ ७३ ॥ सकळा अभाग्यांत गुरू । म्हणोनी उचित आदरू । ऐसा धर्म मार्गींचा विचारू । नालिया तें करावें ॥ ७४ ॥ आसना द्यावें तृणासन । अन्न भावें उदकदान । देहीं नेटकें तरि वचन । अमृतोपम बोलावें ॥ ७५ ॥ तरी सांगे योगींद्र महाऋषी । कोण कामना वसे मानसीं । निर्वाण तपश्चर्या ऐसी । कोण काळ मांडिली ॥ ७६ ॥ वय तरी नव्हे वैराग्याचें । दिसे कर्तव्य अविचाराचें । शिकविलें तें न मनी कोणाचें । ते दुराग्रहाचे सांगाती ॥ ७७ ॥ जीवात्म्याचें ऐक्य सोसे । परतत्वाचें ध्यानापिसें । न करीं इंद्रियांचे निशेषें । सर्व या माजी जाणावें ॥ ७८ ॥ हें भोजनेंवीण अंचवणें । कदळीनें फळ खांडणें । शुष्क नदीचें पोहणें । वाळुवंटीं पै जैसें ॥ ७९ ॥ न पेरितां नाण शेती । शिमग्यावीण शंखा वाती । प्रसूत समयाची आर्ती । कुमारीतें ज्यापरी ॥ ८० ॥ तोच ये दशे संन्यासविधि । न घडे सांडी हे उपाधी । गुह्य गोष्टी बोल सुबुद्धी । जे जिव्हारीं वसतसे ॥ ८१ ॥ मात ऐकूनि रंभेची । मांदी[३५] देखोनि स्त्रियांची । म्हणे आजि भ्रांतीची । विपरीत कांहीं दिसताहे ॥ ८२ ॥ ऐसें नैवेक[३६] विचारिलें । ज्ञानदृष्टी अवलोकिलें । माझिया तपा विघ्न मांडिलें । हें जाणवलें सर्वज्ञा ॥ ८३ ॥ रंभा धाडिली अमरनाथें ।

---

३० वाड=पुष्कळ. ३१ विशद=उघड. ३२ मधुकरी=भ्रमरी (भुंग्याची बायको). ३३ आर्त=दुःखी. ३४ पारिजात=इच्छिलेलें फळ देणारें झाड. ३५. मांदी=जमाव. ३६ नै... ...पेर.

ते छळावया आली मातें । ऐसें बोलो निश्चितार्थें । बोलता झाला तियेसी ॥८४॥ शुक म्हणे सुखवल्लभे । नंदनवाटिकेचे रंभे[38] । दिव्यकंदर्प कर्पूर गर्भे । शृंगार केली केळवसी ॥ ८५ ॥ ते केळी उपडोनी समूळी । टाकिलीसे मरुस्थळीं[39] । जेथें जनवार्ता कर्णभुली । विरूढी तृणाची दुर्लभ ॥ ८६ ॥ हें घोरारण्य भयानक । विलासियां दुःखदायक । तृषातुरां न मिळे उदक । तेथें आहारार्थ कैं लाहे ॥ ८७ ॥ ऐशा क्लेशरूप ठाया । तूं आलीस कवणा कार्या । कल्याण आहे कीं सुरालयीं[40] । सुरां सहित इंद्राचें ॥ ८८ ॥ दैत्य दानवीं नेदितां त्रास । अमरावती न होतां वोस । तुवां सांडोनि स्वर्गवास । किमर्थ येथें आलीसी ॥ ८९ ॥ कवणा प्रयोजना कारणें । तुज येथवरि झालें येणें । माझा आश्रम कथिला कोणें । निष्कारण द्वेषियें ॥ ९० ॥ म्हणसी महारोगें पीडिलें । तैं वैद्यातें शोधीं वहिलें । अर्थापासीं स्वार्थार्थिलें । धांवे तव उचित ॥ ९१ ॥ तैशी धरोनी भावना । तूं आलीस यया वना । ते वंध्या वेलीच्या सुमना । सारखी निर्फळ जाणावें ॥ ९२ ॥ चंद्रमंडळ भरलें अमृतें । परि तें मृगजल[41] मानवांतें । पाताळधन निर्द्रव्यातें । मृत्तिकेसरी कां न म्हणावें ॥ ९३ ॥ तैसा तुझा हो संकल्प । माझ्या टायीं निर्फळरूप । मी वैराग्य चंपकविटप[42] । तव कामना भ्रमरीये ॥ ९४ ॥ जेणें सर्पें दंशिलें तूंत । त्याच्या विषउतारातें । धन्वंतरी[43] नाहीं येथें । मागें पुढें आतां ही ॥ ९५ ॥ ऐसें जाण निःशेष । न धरीं निराशेची आस । म्हणशी वन पहावयाचा हर्ष । धरूनी येथें आलीयें ॥ ९६ ॥ तरी सुखें अवलोकीं नयनीं । चिर काळ दुःख पावसी मनीं । म्हणसी ऐसीये कठिण स्थानीं । तूं कैसा वसतोसी ॥ ९७ ॥ ऐक रंभे सावधान । भूतां भ्यासूर नव्हे मसण । विषकीटका विष जीवन । नें कां मरण सर्वांसी ॥ ९८ ॥ तैसा मी येथें जाण । तुज संगेंवीण न गमे क्षण । मी निश्चल तुझें मन । दाही दिशा धांवत ॥ ९९ ॥ ज्यां सांडिली कामाची चाड । तूतें सर्व भोगांचें कोड[44] । यालागीं मज हें स्थान गोड । अति अवघड तुजलागीं ॥ १०० ॥ जो भाव धरोनी पोटीं । मज पाहसी कुटिळ दृष्टि । तो अर्थ न लभे हिंपुटी । जीव न करीं सर्वथा ॥ १०१ ॥ आतां आलीस जेणें पंथे । तेणें मार्गें शीघ्र परतें । काळ क्रमणा व्यर्थ येथें । कार्येंविण कां कीजे ॥ १०२ ॥ ऐसें शुकाचें निष्ठुर वचन । रंभेसी वाटलें उदासीन । जैसें असाध्य रोगिया लागुन । निराशा वैद्यें दाविली ॥ १०३ ॥ पुढती वदे मधुर वाणी । अन्यायेंवीण महामुनी । वोखटें मानूनियां मनीं । काय ऐसें

---

३७ वाटिका=वाडी ( बाग ) ३८ रंभा=केळीचें झाड. ३९ मरु=मारवाड देश. ४० आलय=राहण्याची जागा, घर. ४१ मृगजळ=खोटें पाणी. ४२ चंपकविटप=चांफ्याचें झाड. ४३ धन्वंतरी=वैद्य. ४४ कोड=हौस.

बोलिजे ॥ १०४ ॥ मी काय बोलिलें अनुचित । साक्षेपें सांगतसें हित । जितुकें भावितां विपरीत । दुराग्रहें करूनी ॥ १०५ ॥ मोक्षवस्तीची वासना । धरूनी आलें दुराशा ब्राह्मणा । यया घोर दारूण वना । मानी एकटे वसतसां॥ १०६॥ हे नाना दुःखापदा । व्यथेनें विंधिती रोगव्याधा । देहीं शोक संताप खेदा । वाढी धरिती आगळी ॥ १०७ ॥ आधींच शैत्याची धरणी । त्यावरी हिमकराची[45] मिळणी । होतां देहाच्या अंगणी । व्याधी घालिती गोंधळ ॥ १०८ ॥ वायू वाजतां झडझडाडें । स्पर्शतां अंगीं वात चढे । गात्रें होती लांकडे । बळें चाळितां न चळती ॥ १०९ ॥ तृषे न मिळे जीवनें[46] । तेथें भुकेला कैचें अन्न । ऐसें त्रास देतें स्थान । कैसेंनि मन स्थिरावे ॥ ११० ॥ स्थिर न होतां अंतःकरण । कैसें लागे स्वरूपीं ध्यान । यालागीं स्वस्थ चित्त तें साधन । बुद्धि ब्रह्मीं मिळावया ॥ १११ ॥ चित्त तैंच होय स्वस्थ । जैं भोगभोक्तृत्व । येरवीं तुंबा[47] बुडविला त्वरित । उसळोनी ये वरिता ॥ ११२ ॥ तैसें मन प्रपंचीं धांवे । साधक पश्चात्तापीं भावें । विवर्तीं[48] पडलें तें न पवे । ये थडी ना ते थडी ॥ ११३ ॥ कुशाग्रींचें[49] आसन । कीं कंपीत पद्म जीवन । तैसें निश्चळ नव्हे मन । बुद्धि ऐकें तैसी च ॥ ११४ ॥ शरीर दंडनादि तप । ब्रह्मचर्यव्रत संकल्प । वनवासादि खटाटोप । सांडी संतापदायक ॥ ११५ ॥ वाक्य माझें ऐक आतां । प्रसन्न व्हावया सुव्रता । मी आलें ऐसें चित्ता । निश्चय मनीं मानीं तू ॥ ११६ ॥ भला भला महा प्राज्ञा । उत्तम वर देईन दाना । जे आवडी असेल मना । तें सुखें माग मजलागीं ॥ ११७ ॥ तुझ्या वाक्यसुमनापाठीं । सिद्धिफळाची होय भेटी । म्हणोनि अपेक्षा गोड मोठी । असेल ते त्वां प्रगटणें ॥ ११८ ॥ पृथ्वीमंडळामांझारी[50] । अनर्घ्य[51] द्वीपें[52] द्वीपांतरीं । राजकन्या ज्या सुंदरी । गुणलावण्यसमर्था ॥ ॥ ११९ ॥ पुष्करद्वीपींच्या[53] पुष्करनयना । श्वेतद्वीपींच्या चंद्रवदना । प्लक्षद्वीपींच्या[54] आरक्तचरणा । अतिप्रवीणा कामशास्त्रीं ॥ १२० ॥ कल्मषद्वीपींच्या हस्तीणी । क्रौंचद्वीपींच्या चित्रिणी । शाकलद्वीपींच्या हंसिणी । व्यालस्तनी[55] नवयौवना ॥ ॥ १२१ ॥ सिंहलद्वीपींच्या पद्मिणी । दक्षिणदेशींच्या नाचणी[56] । उत्तरदेशींच्या महाराणी । गुर्जरिणी अति गौरा ॥ १२२ ॥ ऐशा कुळभूपकन्या । चतुर सुरतीं परम मान्या । त्या देईन भाग्य धन्या । नित्य भोगार्थ तुजलागीं ॥ १२३॥ जरि ह्मणसील या मानविणी । तरि पाताळींच्या नागपद्मिणी । शृंगारिल्या रत्नाभरणीं । त्या ही आणीन तवाज्ञा ॥ १२४ ॥ तेणें तृप्त नव्हे मन । तरी

---

[45] हिमकर=चंद्र. ४६ जीवन=पाणी. ४७ तुंबा=भोंपळा. ४८ विवर्त=पाण्याचा भोंवरा.
४९ कु... ५० माझारी=आंत. ५१ अनर्घ्य=मौलवान. ५२ द्वीप=बेट. ५३ पुष्कर=
... ५४ प्लक्ष=...स. ५५ व्यालस्तनी=पुष्टस्तनी. ५६ नाचणी=नाचणाऱ्या स्त्रिया.

स्वर्गमांदूसेचीं[57] रत्नें । जीं श्रवणीं दावितां मदनें । सकाम कीजे[58] क्लीबांतें ॥१२५॥
गंधर्वकन्या सुकुमारी । विद्याधरी दिव्याप्सरी । तुज देईन या उत्तरीं । झणी
अन्यथा मानिसी ॥ १२६ ॥ याहूनि ऐश्वर्य अधीक । सुखागार इंद्रलोक । तेथें
राहोनि अनेक । भोग स्वेच्छ भोगणें ॥ १२७ ॥ जैशा आवडती मना । अभुक्त
कीं नवयौवना । देवकन्या विचक्षणा[59] । क्रीडें सुखें तयांशीं ॥ १२८ ॥ कांहीं
कल्पिसी संदेहो । उधार बोलणें कृत्रिम स्नेहो । तरी रोकडा माझा देहो । तुज
भोगार्थ दीधला ॥ १२९ ॥ दिव्य वस्त्रें स्रक्[60] चंदन । गीत तांबूल अमृतपान ।
आसन शयनादि संपूर्ण । भोग मजशीं भोगीं तूं ॥ १३० ॥ जेव्हां पाहिजे जें
वैभव । तें तत्काळ पुरवीन सर्व । आतां ऊठ देईं खेंव[61] । अति प्रीती मजलागीं
॥ १३१ ॥ संशय सांडोनी मनीं । माझे संगीं इंद्रभुवनीं । चिरकाळ क्रीडें
महामुनी । नाना सुखें अनुभवीं ॥ १३२ ॥ अथवा सत्यलोका आंत । कां
वैकुंठीं वसें सत्य । शिवसदनीं ऐश्वर्यवंत । होईं सरी शिवाची ॥ १३३ ॥
लौकिकभोगाची कांहीं । वांच्छा वसतसे हृदयीं । तरी पृथ्वी ताटींचे वाण घेईं ।
कीर्तिदीपें सोज्वळ ॥ १३४ ॥ चक्रवर्तीचें बासींग । भाळीं बांधोनी सुभग ।
धरणी बोहलें अभंग । होईं पती सतीचा ॥ ३५ ॥ एवं तुज जो तो वल्लभ । तो
तो कृतार्थ करीन लाभ । अतां कामना कार्पण्यलोभ । सांडोनि उठीं झडकरी
॥ ३६ ॥ ऐसी अनुवादली रंभा । जैसी मातंगगृहाची[62] शोभा । परि सदाचारी
अंतर्लोभा । पहावया नुपजेची ॥ ३७ ॥ वारांगनेचा[63] शृंगारू । नव्हे उत्तमा
मोहकरू । कुबेराचा सुवर्णमेरू । निरपेक्षा तृणतुल्य ॥ ३८ ॥ वोकोनि टाकिजे
अन्न । तें गोडीनें चाटी श्वान । निर्मळें अवलोकितां आपण । वांती उपजे वि-
शेष ॥ ३९ ॥ तैसें रंभेचें बोलणें । शुकें वाळोनी सांडिलें मनें । जैसा अना-
मिकांच्या[64] ब्राम्हणें । पाक दृष्टी नाणिजे ॥ ४० ॥ यापरि ऐकुनी वचन । कंटा-
ळलें शुकाचें मन । प्रत्युत्तर वदे आपण । अति गंभीर विवेकी ॥ ४१ ॥ रंभे
तुझा वाग्जल्पें । वृथा श्रम करिसी पाप । सन्निपाताचा[66] प्रलाप[67] । तैसा मज
वाटतो ॥ ४२ ॥ सुरापानें[68] झाला मत्त । यद्वा तद्वा बडबडित । सर्पें दंशिला तो
म्हणत । अत्यंत गोड कडू तें ॥ ४३ ॥ सर्व चोर जाणितल्यावरी । कोण त्याचा
विश्वास धरी । काया न जळे वैश्वानरीं[69] । तेथें प्रमाण कायसें ॥ ४४ ॥ तैसे तुझे
घातक बोल । स्वहित सुरस निरस फोल । तुझी बुद्धि जाली बाळ[70] । बोलूं नेणे

---

५७ मांदुस=पेटी (सं० मंजूषा). ५८ क्लीब=नपुंसक. ५९ विचक्षण=शहाणा. ६० स्रक्=फुलांची माळ. ६१ खेंव=मिठी मारणें (सं० क्षेम). ६२ मातंग=मांग. ६३ वारांगना=वेश्या. ६४ अनामिक=म्हार. ६५ वाग्जल्प=बडबड. ६६ सन्निपात=त्रिदोष. ६७ प्रलाप=बडबड. ६८ सुरा=प्यावयाची दारू. ६९ वैश्वानर=विस्तव. ७० बाळ=बालिश, मूर्ख.

ह्मणूनी ॥ ४५ ॥ आतां पुढती हें बोलणें । मज सन्मुख बोलसी वदनें । तरि तें निर्फळ हो तुझें वचन । हा चि शाप तूजसी ॥ ४६ ॥ संसाराचा घेउनी त्रास । म्यां मांडिला योगाभ्यास । तो त्रास कसा जे कां क्लेश । जन्ममरण भोगितां ॥ ४७ ॥ योनिद्वारें जन्मा आलों । मरणमार्गें मरोनि गेलों । जावोनि मेले चि देह पावलों । पावोनि मेलों पुनरपी ॥ ४८ ॥ शीतोष्ण क्षुधा तहान । गर्भवासाचे कष्ट दारुण । अनेक जन्मीं अनेक जाण । साहों न शकें ते साहिले ॥ ४९ ॥ ऐकें रंभे यथार्थ मात । सांप्रत या जन्मांत । अनुताप उपजला अद्भुत । दुःख स्मरोनी मागिलें ॥ ५० ॥ पुढती न पवे जन्ममरण । ऐसें निष्काम साधन । साधीतसें मोक्षसदन । परमात्म्यातें पावावया ॥ ५१ ॥ नाहीं स्वर्ग सुखाची आर्ती[७१] । नाहीं अमरपदाची प्राप्ती । इंद्रें भय घेऊनि चित्तीं । व्यर्थ तूतें पाठविलें ॥ ५२ ॥ सांडिलें प्रेताचें पिशितें[७२] । पूय कृमी दुर्गंधीभरित । तें श्वान सेवी त्वरायुक्त । भय देखे सभोंवतें ॥ ५३ ॥ तेथें भूप ही देखतां दृष्टी । ऐसी भावना करी पोटीं । माझें आमिष[७३] न्यावया निकटी । येतसे लवलाहें[७४] ॥ ५४ ॥ तैसे इंद्रादिक ह्मणसी श्रेष्ठ । परी ते स्वर्गमर्कटें[७५] । तपोधन देखोनि दुष्ट । छळण करीती अपभयें ॥ ५५ ॥ तैसाची सत्यलोकींचा महिमा । कर्में गुंतला मुख्य ब्रह्मा । तेथें निष्कर्म सायुज्य धर्मा । कोण विश्राम पावेल ॥ ५६ ॥ शिवलोकींची ये वस्ती । शिव पाहीं जडत्वस्थिती । सारखी कर्मक्लेशसंपत्ती । असे दिसती विचार ॥ ५७ ॥ शत्रू मित्र यां परिपाठी । जीवाचे ठायीं विषमदृष्टी । तरी शिवाचिये ललाटीं । तृतीयनेत्र वैषम्य ॥ ५८ ॥ जीव आसक्त स्त्रीसंगीं । गौरी शिवाचे अर्धांगीं । सखीसंगा उत्तमांगीं[७६] । मिरवी हें विशेष ॥ ५९ ॥ जीवासि जठरीं क्षुधाग्नि पोळी । शिव तीं ठायीं जळे ज्वाळीं । उदरीं नयनीं कंठनाळीं । अहोरात्र पोळत ॥ ६० ॥ त्रिगुणरजें माखिला जीव । चिताभस्मे लेपिला शिव । जीवाहुनी बहु शिव । दिसे उपाधी कर्मांची ॥ ६१ ॥ जीव व्यवसायी उदरापुरता । शिवासि त्रैलोक्याची चिंता । ऐशा शिवलोकाची आस्था । नुपजे मज कल्पांतीं ॥ ६२ ॥ विष्णूची तैसे परी । सोंग घेवून नानाप्रकारीं । अर्धरात्रीचे अवसरीं । बहुत खेळ संपादी ॥ ६३ ॥ मग डोल लावूनि युगानुयुगीं । देतसे भक्तांच्या वोळगी । दैत्य न भजती त्याचे जगीं । पुतळे पायीं मिरवती ॥ ६४ ॥ म्हणोनि मायेच्या हाता तळचीं । तिन्ही बाळकें हीं गुणाचीं । शंका प्रबळ बागुलाची । दाविती पाविती अव्यक्ती ॥ ६५ ॥ यालागीं निर्भय ब्रह्मपद । याचे चि प्राप्तीचा मज वेध । येर हें सेवितां उन्माद । अति खेद विनाशत्व ॥ ६६ ॥

---

७१ आर्ती=हौस. ७२ पिशित=मांस. ७३ आमिष=मांस. ७४ लवलाहें=जलदीनें. …माकड. ७६ उत्तमांग=डोकें.

ऐसें बोलिला शुक वरिष्ट । जैसा अमृतनदीचा पाट । रंभा विषलता कडुवट । सेवितां नये मधुरते ॥ १६७ ॥ परिस लाविला खापरी । कैसेन ये सुवर्णसरी । वेत वाढला मलयगिरी । कैसेन ये चंदनत्व ॥ ६८ ॥ इक्षुदंड रसाचे निरीं[७७] । लावियल्या विषवल्लरी । पालट नव्हे तैसी परी । पाखंडीया सत्संगें ॥ ६९ ॥ अमान्य करोनी शुकवचना । रंभा म्हणे ऐक ब्राह्मणा । शृंगारशास्त्रीं न होवोनि शाहाणा । वंचलासी सुखातें ॥ ७० ॥ विषयेंद्रियां घालोनी जोडी । नेणसी शरीरसुखाची गोडी । स्त्रीसंगाची अर्ध घडी । क्लेश नाशी जन्माचे ॥ ७१ ॥ प्रत्यक्ष विषयसुखाचें कनक । सांडी ते क्षणीं नाडिले मूर्ख । मोक्षदेहें नाशाची राख । मागती भीक ती लागीं ॥ ७२ ॥ भरली अमृताची कनकवाटी । हातींची सांडोनि करंटीं । धांवती मृगजळापाठीं । तैसी गोष्टी वैराग्या ॥ ७३ ॥ एक विषय इंद्रियां पावे । तें सुख सर्वेंद्रियें भोगावें । सर्वेंद्रिय भोगासवें । तें सुख देवें सभाग्या ॥ ७४ ॥ आधींच नरदेह अनर्घ्य रत्न । विशेष तारुण्य परिसाचे गुणें । जोडलें बहुत सुकृतें करून । परि परीक्षकहीना सांपडलें ॥ ७५ ॥ अजारक्षक अविचारा । हातीं पडलिया हिरा । तेणें रक्षावया तपोक्षेत्रा । यमनियमीं गोफाणिलें ॥ ७६ ॥ आयुष्याचिये तातडी । तारुण्यदेशाच्या सुखाडी । भोगभोगी चढोवडी । धन्य तो एक दैवाचा ॥ ७७ ॥ वसंतमासीं मनोहर । वना पातला कुसुमाकर । पुष्पजाती देती संभार । उचित नाना सुमनांचे ॥ ७८ ॥ जाईजुई राजसेवती । मंदार वाटीगर मालती । चंपक पाटला पारिजाती । वाट पाहती परिमळें ॥ ७९ ॥ तैशी पुष्पवती प्रमदा । देखोनि वल्लभ चढे अत्यानंदा । मग संघटे सुरतयुद्धा । तैसें भ्रमरा होतसे ॥ ८० ॥ उमाधवाचे पूजे । वना माधवें केलें विजें ॥ पुष्पांजळी वोपितां सहजें । वनस्पती भूलिंगीं ॥ ८१ ॥ नारिंगी आणि क्षीर बोरी । साखरनिंबोणी रसभरी । फळें दावोनी अंतरीं । आठव देती स्तनांचे ॥ ८२ ॥ आम्र फळें बिल्वफळें । काठिन वर्तुळ ताळ कौळे । स्त्रीस्तना जिहीं त्यजिलें । हे आठवोनी पडताती ॥ ८३ ॥ जीं तारुण्य दशेचे कौतुकें । वर्जिलीं कुचालिंगनसुखें । त्यांच्या हृदयींचीं स्मरोनि दुःखें । पक्क दाळिंबें उकललीं ॥ ८४ ॥ तेथें रमणीय सरोवरें । आच्छादिलीं पद्मिणीपत्रें । कामिनी अधरामृत अधरें । जेंवि लोपले जन दृष्टी ॥ ८५ ॥ भ्रमराचिये श्रुतीवरी । कोकिला गाती रागोद्गारीं । मृदंगशब्दें जळलहरी[८०] । तीरीं आंदोळती सुताळ ॥ ८६ ॥ तया ताळावरी स्वानंदें । मयूर नाचती आनंदें । हे देखोनि हृदय विंधे । पुष्पधन्वा[८१] निजकरीं ॥ ८७ ॥ मंडप शाइले केतकीतळीं । स्तंभीं लाविल्या कर्पूर

७७ नीर=पाणी. ७८ पुष्पवती=रजस्वला. ७९ धव=नवरा. ८० लहरी=पाण्याच्या लाटा. ८१ पुष्पधन्वा=मदन.

कदळी । कुंडें भरलीं परिमळीं । वाळियांचीं घमघमीत ॥ १८८ ॥ माजी सुमनाचिया सेजा । दाट घालेनियां ओजा । कर्पूरोदकें सिंपोनि माझा । मन्मथातें आणिती ॥ ८९ ॥ कंठीं आपाद सुमनहार । सुमनांचें वस्त्र विचित्र । वेष्टुनी कामिनींचे भार । मध्यें विलासें विराजे ॥ ९० ॥ तेथें येकी बाळस्तनिया । कुसुमकाळिया ऐशीया अणिया । निघती जैशा चांदणिया । गौरपणें दिसताती ॥ ९१ ॥ एकींचीं जैशीं सिंगीफळें । कठिण आणि वर्तुळें । सुरंग नारिंगाचीं युगळें । तैसे एकीचे मिरवती ॥ ९२ ॥ एकींचे जैशीं राजबेलें । एकीचे जैसें पुष्पझेले । बचकें धरितां आणियाळे । कनककलशा सारिखे ॥ ९३ ॥ कंटकहीन कनकफळें । येकींर्कफळें जावळें । येकींचे स्थूळ नारिकेळें । करिकुंभासारिखे ॥ ९४ ॥ सिंधुशत्रूचें जन्मस्थान । तैसे येकीचे पीन स्तन । मर्दें भावोनी करीन । शुंडा घाली स्वानंदें ॥९५॥ कंदुक मढियेले मुक्तजाळीं । तैसीं येकींचीं वाटोळीं । तगटियेलीया कांचोळी । हारावळी त्या वर्त्या ॥ ९६ ॥ स्त्रीकंदुकाच्या तर्कें । इंदुची उगवला ऐसीं मुखें । दर्पणपद्माचीं कौतुकें । कवीश्वर बोलती ॥ ९७ ॥ नयन नव्हती चपळ मीन । कुमुद म्हणों कीं मदनबाण । जिकडे करिती संधान । त्यजती प्राण नरमृगें ॥ ९८ ॥ सुवर्ण कळसाचीं युग्में । उरोजें भासती गुच्छोत्तमें । किंवा पक्षबळाचे गरिमे । उड्डाण व्योमीं करिजेती ॥ ९९ ॥ द्वादश आंगीं अळंकारीं । भासती सौदामिनीची सरी । किंवा नक्षत्राचिया हारी । कनकवल्ली शोभती ॥ २०० ॥ शाल्मली तरूचीं कुड्मळें । किंवा कटुक कटी फळें । वृंदावनाहूनि वर्तुळ । कठिण युगुळें दाटलीं ॥ १ ॥ वनिता हृदयकुंभ लक्षणें । मदनाचें सर्व ठेवणें । कस्तुरी मुद्रिका खुणें । वरी कसणें चोळीचें ॥ २ ॥ किंवा लागेल जन दृष्टि । म्हणोनि सृष्टिकर्ता परमेष्ठी । अंजन घेवोनिया बोटीं लेप केला मुखाब्जीं ॥ ३ ॥ किंवा जनदृष्टिकाळिमा । पाहोनि जाली स्तनयुग्मा । योगियांची शापमहिमा । लज्जावसनीं निघाली ॥ ४ ॥ ऐसीं स्त्रियांचीं कुचयुगुलें जो आपुलेनि वक्षस्थळें । निरंतर मर्दोनि मवाळें । गाढालिंगन न करी ची ॥ ५ ॥ प्रमदावक्षस्थळ शाळुंखा । पयोधर पिंडी त्या सुरेखा । स्वहस्तें चंदन लावोनि जो कां । हृदयीं वंदन न करी ची ॥ ६ ॥ देहस्थ आत्मया शिवाचा कोप । होवोनि हा ।चि घडे शाप । जो जपतपादि संताप । जाचणी मांडी देहाची ॥ ७ ॥ संभोग क्रीडेच्या काळीं । हस्तद्वयाच्यानिमेळीं । खेळूनि स्तनाची चेंडूफळी । हारी नाणी वनितांतें ॥ ८ ॥ जो स्त्रियांपुढें मोडिला । म्हणोनि त्याहोनि हीन बोलिला । सेखीं नपुंसकेंही जिंकिला । पुरुषत्व असोनि अभोगी ॥ ९ ॥ ऐशा

सिंधुशत्रु=अगस्त्य. ८३ पीन=पुष्ट. ८४ करीन=करि+इंन=मोठा हत्ती. ८५ उ-

वनाचे ठायीं । सौख्य न भोगी कांहीं । जो जितेंद्रिय जैसा अही । वायु भक्षी वनस्थ ॥ २१० ॥ धिग् धिग् त्याचें जालें । धिग् धिग् त्याचें अभ्यासिलें । जळो तयाचें तप जें फळलें । देहदंडण दुःखेसी ॥ ११ ॥ तृणाचा कृत्रिमपुरुष । क्षेत्रीं उभा रक्षीत पीक । त्या साच मानिती [८७]जंबुक । परि नव्हे सजीव निर्धारें ॥ १२ ॥ तेंवि तयाचा वृथा देहो । प्रेत ही नव्हे पा वाहो । जो कांतासंगीं नेघे लाहो । विषयभोग सुखाचा ॥ १३ ॥ ऐसी रंभा बोललिया वरी । शुक आश्चर्यहास्य करी । म्हणे कैसी भ्रमचक्रीं । पडिली असे अविद्या ॥ १४ ॥ बोले तितुकें विपरीत । जैसें वोडंबरीचें वित्त । विषा नाम ठेवूनि अमृत । सेवा म्हणे पुढिलांतें ॥ १५ ॥ कीं मैंदाचें साजणें । कीं पारिधीयाचें अळवणें । किंवा कंठभूषणा अर्पणें । उचित काळसर्पातें ॥ १६ ॥ तैसी रंभेची वचनोक्ती । जे साच मानिती चित्तीं । ते प्रत्यक्ष आत्मघाती । नाहीं यदर्थीं संदेहो ॥ १७ ॥ वागनिश्चय नरकाचा । इहीं उत्तरीं होय साचा । जीहीं मनातें पोकळ पांचां । विषयां हातीं दीधलें ॥ १८ ॥ मोक्षरवीच्या दर्शनदृष्टी । जिहीं फोडिली आपुली विचारदृष्टी । जे साच मानोनि गोष्टी । हांव धरती भोगार्थ ॥ १९ ॥ ऐसा निश्चयी श्रीशुक । बोलता झाला निजविवेक । जेणें विषय कामनापंक । शोषोनि जाय श्रोत्यांचा ॥ २० ॥ रंभे ऐक यथार्थ बोला । तो येक जित ची मेला । जो नरदेह पावोनि वहिलां । आत्मसाधन न करी ची ॥ २१ ॥ तें कैसें लक्षण म्हणसी । ऐक सांगेन तुजपाशीं । नित्यानित्यविवेक ज्यासी । नेणवेची अज्ञानें ॥ २२ ॥ इंद्रियें करूनी मार्जारें । राखे विषयमूषकद्वारें । उघडा विषयी अविचारें । तोंड शुची वारिता ॥ २३ ॥ क्षमा संतोष विवेक । चौथा साधुसंग दिख । हे मोक्षद्वारींचे निष्टंक । द्वारपाळ अर्जिले ॥ २४ ॥ त्यांशीं वोळखी झालिया । माजि प्रवेश होय तया । त्यांतें नोळखे जो प्राणिया । तो भवगर्ते लोटिजे ॥ २५ ॥ म्हणोनि तो चि ये संसारीं । ज्ञानहीन प्रेतशरीरी । अमंगळविषयें वेष्टिलें वरी । तनु पाळी शूकरन्यायें ॥ २६ ॥ धिगधिग तयाचें शरीर । धिगधिग तयाचें ऐश्वर्य थोर । जळो तयाचें राजमंदिर । आत्मविचार जेथें नाहीं ॥ २७ ॥ धिगधिग तयाचें शाब्दिक ज्ञान । धिगधिग तयाचें दांभिक भजन । धिगधिग त्याचें तामस मन । स्फितीचे श्वान जे होती ॥ २८ ॥ आत्मसाधनीं सावध । वृथा न दवडिती निमिषार्ध । याती पवित्र शुद्ध । तयाचेनी त्रैलोक्यीं ॥ २९ ॥ ते होत अवमानिले सधनीं । ते होत निंदिले दुर्जनीं । ते होत सांडिले स्त्रीजनी । विषयीं न जोडे म्हणवो

८६ कृत्रिम पुरुष=बुजगावणें, बाहुलें. ८७ जंबुक=कोल्हा. ८८ पंक=चिखल ... गर्ता=खाडा. ९० शूकर=डुकर.

नी ॥ ३० ॥ ते असोत गुरुत्वें हीन । ते असोत शिष्यधर्मविहीन । नेणोत शास्त्रव्याख्यान । सांगीक* * ॥ ३१ ॥ ये रितीचे श्रेष्ठ निश्चित । ते अक्षयी कीर्तिवंत । जे आत्मविचारीं जागृत । ते निद्राभूत प्रपंचीं ॥ ३२ ॥ अत्मानंदामृत रसाळ । सेवोनि ज्याचें चित्त निश्चळ । आत्मचर्चा तांबुळ । निश्चा रंगे मुखपद्मीं ॥ ३३ ॥ उदारपणें मेघनाथ । स्थळास्थळ न विचारीत । तैसा रंभेप्रति परमार्थ । समदर्शनी शुक वदे ॥ ३४ ॥ तितुकें अयुक्त मानूनि येरी । विवाद मांडला प्रत्युत्तरीं । जैशी परिव्रींजकावरी[11] । राजदासी संघटे ॥ ३५ ॥ वेदांतीयाशीं पाषांडी तर्क । भागवताशीं तंडे कोकें[12] । परम पंडिताशीं मूर्ख । तेंवि रंभा शुकाशीं ॥ ३६ ॥ ऐसेनी अविचारें सुरवधू । शुकाशीं करी वितंडवादू । तो चि पुढले श्लोकीं विशदू । अर्थ परिसा आर्त हो ॥ ३७ ॥ रंभा म्हणे महामुनी । व्यर्थ कासया शिणवा वाणी । वळोनी शब्दाच्या श्रेणी । निरंजनीं रचितसां ॥ ३८ ॥ त्याचा काय उपयोग सांग । वृया सांवरीची दांग[13] । कीं मारवाडींचे सुरंग । तांबुल जैसे बोलाचे ॥ ३९ ॥ किंवा विजयादशमीचे दिवशीं । सुवर्ण ह्मणती शमिकेसी । किंवा मंगळ भौमासी । शब्दारोप पैं जैसा ॥ ४० ॥ तैशीं तुझीं हीं वचनें । रंजतशौक्तिकेचीं[14][15] भूषणें । जे साचार मानिती मनें । ते शाहाणे तुज ऐसे ॥ ४१ ॥ जाळिला कामहुतौशन[16] । त्या वैराग्यरश्मीच्या[17] उष्णें । निववीला हें बोलसी वचनें । जेंवि अमर विषपानें ॥ ४२ ॥ तपोक्लेशीं झालें तप्त । त्यास निववावया येय । संभोगछाया आणि अमृत । कामिनीच्या अधरींचें ॥ ४३ ॥ तेंही अधर अति कोमळ । सुरंग जैसें बिंबफळ[18] । दंतपंक्ती देती झळाळ । फांके परिमळ बोलतां ॥ ४४ ॥ वेळा लवंगा दिव्य कर्पूर । मुक्तचूर्ण[19] केतकी खदिर[100] । जातिफळें जातीपत्र । पूगीफळें[1] सोलींव ॥ ४५ ॥ नागलतिकापर्णोत्तमें[2] । जैशीं तगटें घडिलीं हेमें । ऐसी त्रयोदशगुणीं कामें । तांबूल मुखीं सर्वदां ॥ ४६ ॥ तेणें सुगंधें परिमळें । वदन जाहले रक्तोत्पळें । तेथें आपुलें मुख अळिकुळें । होऊन चुंबन जो न करी ॥ ४७ ॥ कस्तूरीतिलकांकित निटिळीं[3] । मस्तक मेळवोनि भाळीं । हस्त ठेवोनि कुचकमंडुळीं । भोगकाळीं संभ्रमें ॥ ४८ ॥ मम अधरामृताची वाटी । चुंबळें लावितसे वोठीं । जो न घे दाटोदाटी । अमृतासाठीं जो नये ॥ ४९ ॥ चुंबोनि अधर धरोनि दशनें । सोडितां मरण न मने मनें । तो अरण्यशवासारिखा जाणें । हें सुख नेणें ह्मणोनिया ॥ ५० ॥ आत्मानुसंधानाच्या शूळीं । ज्यासि

---

११ परिव्राजक=संन्यासी. १२ कोक=कामशास्त्रज्ञ (कामुक). १३ दांग=रान. १४ रजत=रुपें. १५ शुक्ति=शिंपी. १६. हुताशन=विस्तव. १७ रश्मी=किरण. १८ बिंब= [illegible] १९ मुक्तचूर्ण=मोत्यांचा चुना. १०० खदिर=कात. १ पूगीफळ=सुपारी. २ [illegible]=विड्याचें पान. ३ निटिळ=कपाळ.

रोंविलें सर्व काळीं । यम नियमाचे कावुळीं । रक्तमांस आटलें ॥ २५१ ॥ ऐशीं रंभेचीं उत्तरें । जैशीं सोज्वळ सुपात्रें । शुक सेवितां श्रोत्रकरें । विटाळ मानी अंतरीं ॥ ५२ ॥ मग साधूत्तम न वासना । भिजवोनि होईल सचैलें[४] स्नाना । ऐसें वाक्य वदे सज्ञाना । देहदूषण लक्षणीं ॥ ५३ ॥ बरळें ऐक निर्धारें । देह खोंचिजे जेंवि शस्त्राग्रें । तेथें वर्षाव कीजे रुधिरें । घाव पडे बीभत्स ॥५४॥ तें प्रतिदिनीं प्रक्षाळिजे । नूतन औषधीपिंड दीजे । तऱ्हीं च निकें येरवीं माजे । पूय दुर्गंधी कृमी जाळ ॥ ५५ ॥ त्या घायाचे सुरंग वदन । चुंबावया कांक्षीत मन । त्याहोनि कश्मल तें आन । सांग कोण तें संसारीं ॥ ५६ ॥ तेंवि हीं मुखादि रंध्रें । स्रवति लाळरक्तमूत्रें । ते क्षाळूनि दुर्गंधि हरे । तांबूल गंधा लेपिजे ॥ ५७ ॥ विचारितां स्त्रियेचा देहो । नरककूप मूत्रडोहो । फुटेल म्हणोनि बळें पाहाहो । चर्म त्वचेनें बांधिला ॥ ५८ ॥ उद्योगसायास ममता । मूर्खत्व पाप लुब्धता । अशौच्य अलाज निर्दयता । इहीं गुणीं वीवळे ॥ ५९ ॥ रंभा तिरस्कारली चित्तीं । बोललें चि बोले पुढती । जैसा कोढी आपुला हाती । वारंवार लक्षीत ॥ ६० ॥ यापरी ते निर्जरनारी[५] । प्रत्युत्तरें शृंगारशास्त्रीं । देती झाली जीं अंतरीं । विकार करिती अविवेका ॥ ६१ ॥ अनर्घ्य रत्नांची कंचुकी । जडली अमूल्य माणिकीं । पत्रवेली सोडिल्या कनकीं । चित्रविचित्र परिकरा ॥ ६२ ॥ [६]पंखियांवरी मनोहर । मुक्ताफळांचे मयूर । राजहंस शुक चकोर । अतिसुंदर मिरवती ॥ ६३ ॥ जडित मोतियांची जाळी । बिरडें कसिलें कनककमळीं । चंदनमृगमदाचे मेळीं । वरलेपिला अर्गजा ॥ ६४ ॥ सुरतसंग्रामीं शीणला । मग भुजपंजरीं वहिला । मजऐसीये पहुडला । हृदयडोल्हारां तुज ऐसा ॥ ६५ ॥ कीं मज ऐसीये हृदय माचाँ[७] । तुजसारिखा नर दैवाचा । उशीसी करूनि उभय कुचा । सुखनिद्रा अनुभवी ॥ ६६ ॥ तो चि एक धन्य येथ । सार्थक केलें तेणें चि जीवित । जो क्रीडा कौतुकें काढित । वेळ कामिनीसुखसंगें ॥ ६७ ॥ जन्मोनि जननीचे पोटीं । या सुखाची भेटी गोष्टी । स्वप्नीं नेणे तो ह्या सृष्टी । प्रेताहूनी कनिष्ठ ॥ ६८ ॥ व्यर्थ नासारंध्रींचा रोम । व्यर्थ उष्ट्रपृष्ठींचें गुल्मं[८] । व्यर्थ अजाकंठींचें चर्म । स्तन हें नाम जयाचें ॥ ६९ ॥ जवादिजनिताचे वृषण । भूपमौळीं बैसती समान । काय करावें लंबायमान । रासभाचे पैं जैसे ॥ ७० ॥ तैसा तो येक संसारी । दरिद्रसंगीं पडिला कुहरीं । लोक देखोनि पळे दुरी । दिवाभीता सारिखा ॥७१॥ ऐसी धिःकारूनि रंभा । बोले तरी हृदय क्षोभा । शुकाचें न पवे ची मग शुभा । वचनीं उत्तर देतसे ॥ ७२ ॥ जीवें सजीव हा नर देहो । त्या देहार्थ भोगसं-

४ चैल=वस्त्र. ५. निर्जरनारी=रंभा. ६ पंखे=चोळीचे. ७ माचा=मंचक, पलंग. ८ गुल्म=गांठ.

ग्रहो । ते देह दुर्दरें जाले पाहा हो । काळसर्पाचे आननीं ॥ ७३ ॥ कमळदळावरील जळ । तैसें जीवित्व अति चंचळ । गिळिजे नवनीताचा कवळें । त्याहोनि शीघ्र विनाशे ॥ ७४ ॥ हेमाभरणें रत्नादिक । जिहीं डहुळिलें चित्तोदक ॥ तें ही क्षणीक जैसी रेख । व्योमीं इंद्रधनुष्याची ॥ ७५ ॥ आणि शुक्ल बीजेचें चांदणें । तैसें तारूण्य पाहुणें । जातां वार्द्धक्य मेहुणे । हांसवीत या जीवा ॥ ७६ ॥ आतां संभोगाचे जे भोग । कृपणाचें धन सांग । वंध्यासुताचें उत्तमांग । व्योमकुसुंमीं वुरुंविजे ॥ ७७ ॥ कीं अंवसेचे चंद्रामृतें । चित्र चकोरें होतां तृप्तें । मृगजळाचेनि ह्रदोदकें । छायापुरूष न्हाणिजे ॥ ७८ ॥ तैसें शरिर मिथ्या समूळीं । तें ही काळाचे दंष्ट्रेतळीं । चपळविषयांची हे तों फळी । खेळावया सुख कोण ॥ ७९ ॥ जो करी देहाची भावना । तो मोहमल्हारीचा सूणां । असतां नरत्व सोडोनिजाणा । श्वानपणा मिरवीत ॥ ८० ॥ विषयहळदीचें कुट । त्या नांव ठेवी भंडार श्रेष्ट । तेणें ममतेचे लल्हाट । चर्चोनि फिरे भुंकत ॥८१॥ मृत्यू ऐसा व्याघ्र । मुख पसरोनि समोर । तेथें हिरवटाचार । देहधेनूतें केंवि रूचे ॥ ८२ ॥ ऐसेपरी दुर्लभ देह । परमार्थाचें जोडतें गेह । जाणोनि आत्मसाधनीं स्नेह । धरोनि स्वहित जो न करी ॥ ८३ ॥ तो कल्पद्रुमाचे वाटिके । बैसोनि अभाग्य इच्छी भिके । कामधेनु धिःकारी दुःखें । रुचिकाँलागीं दुहितसे ॥ ८४ ॥ पहुडोनि चिंतामणीच्या घरीं । म्हणे मी येक दीन भिकारी । व्यर्थ वांचोनि काय करीं । ये संसारीं हतदैवा ॥ ८५ ॥ परिस घेवूनियां करीं । बळें घाशीत खापरीं । गुण नव्हे मग झुगारी । पाषाण म्हणवोनी हातींचा ॥ ८६ ॥ तैसा नरदेह तत्वतां । अवचट लाहे पुण्यवंता । जेथें ईश्वरप्राप्ति पाहातां । हातातळीं आंतुडे ॥ ८७ ॥ तो विसरोनि कार्यार्थ । वाढवोनि विषयस्वार्थ । आयुष्य नाशी स्त्रीजित । जिवन्मृत जाणावा ॥ ८८ ॥ मोहभ्रमाचे वोहळीं । मिथ्याऐश्वर्य हरळी । विषयरसें अतिरसाळी । मूढ ती जवळी खेंर जैसा ॥ ८९ ॥ ते श्रुतिआढ्यतेचे भावीं । देखोनि प्रमदा गाढवी । पुरूषरासभ वोढवी । नव्हे आडवी लोटितां ॥ ९० ॥ ऐसीये रासभीमागें । जे धांवती विवेकत्यागें । जीवें लाज सांडोनी आंगें । थू थू जगें त्या म्हणिजे ॥ ९१ ॥ चर्मकाचें चर्म जैसें । जमलें पाणी पिऊन पोसे । सेविले चि विषय तैसे । सेवितां विकृती न मानिती ॥ ९२ ॥ ऐसी जीवन्मृताची काहणी । असो काय बोलावी वदनीं । रंभा खोंचोनि अंतःकरणीं । काय उत्तर देतसे ॥ ९३ ॥ मग बोलली त्याहूनि अधिक ।

९ दर्दुर=बेडूक. १० कवळ=घांस. ११ व्योमकुसुम–आकाश पुष्प, खपुष्प. १२ सूणा (सं० श्वान) १३ हाचिक=रुईच्या झाडाचा चीक. १४ हरळी=हिरवा चारा. ...गाढव.

विस्तारी विषयसुख । अनुवाद करितो नावेक । श्रोतेजनीं परिसावा ॥ २९४ ॥ सखोल नाभी अतिगंभीर । जैसें लावण्यसरोवर । वरी त्रिवली सुंदर । श्यामोदकी सुरसरिता ॥ ९५ ॥ जैसें हिमालयाचें युगुल । तैसें स्तनद्वय वर्तुळ । उंच गौर सुशीतळ । स्पर्शतां निववीत संतप्ता ॥ ९६ ॥ तया कुचयुग्मांतरीं । रम्य रमणीय पाठारीं । तपें तपती निरंतरीं । मनें आसक्त पुरुषांचीं ॥ ९७ ॥ जैसे कर्पूरकर्दळीचे स्तंभ । तैसें जानुद्वय स्वयंभ । चीर उकलितां सुप्रभ । गौरपणें भुलवी जें ॥ ९८ ॥ कटिमंडित कटिमंडळा । तें तेज दावी नाभीतळा । तया अंतरीं गुह्यस्थळा । दैवा आगळा तो देखे ॥ ९९ ॥ अधरें न चुंबिती अधरा । करें न शिवती पयोधरा । गुप्त नलिनीमंदिरा । रेतपाटा न लाविती ॥ ३०० ॥ स्त्रीमुख न चुंबिती वोंठें । ते भग्न भाजनाचे कांठ । कुच न मर्दिती कर थोटे । मोडियेले येरवीं च ॥ १ ॥ लेपाँहातीं दिधलें शस्त्र । काय पुरुषार्थ करील थोर । तैसें त्याचें कामागार । निर्व्यापार लडबडी ॥ २ ॥ ऐसे रंभेचे वोखटे । शब्द ऐकतां मन विटे । कर्णरंध्रीं घालोनि बोटें । अधोवदनीं निश्चळ ॥ ३ ॥ मग विचारूनी प्रत्युत्तर । देता झाला चतुरेश्वर । जेणें शृंगाररससागर । दिसे मृगजळासारिखा ॥ ४ ॥ ज्ञानवैराग्यनिरूपण । मग बोलिला विचक्षण । त्याहूनि विस्तारें गहन । निज ज्ञान प्रगटिलें ॥ ५ ॥ बुद्धि बोधा होय मिळणी । चित्त चैतन्या बुजावणी । अहंता सोहंपणी । मन उन्मनीं तल्लीन ॥ ६ ॥ या उभयांचा संयोग । तया नांव ह्मणिजे योग । ते संसारीं सुखसंभोग । तें योगांतर जाणिजे ॥ ७ ॥ कीं तत्पद ऐसें बोलिजे शिवा । त्वंपद नाम ऐसें जीवा । दोघे येती ऐक्यभावा । तें असि पद बोलिजे ॥ ८ ॥ दोघांचिये मिळती संधी । लाधे महत्त्वानंदसमाधी । तेचि योगांत बुद्धी । आत्मविदां मानली ॥ ९ ॥ ते ही कळा करूं उघडी । उकलूं गुह्याची घडी । गुण ग्राहिक जोडी । जो जें स्वरूप ऐकतां ॥ १० ॥ ऐका तत्पद तो ईश्वर । तो जाणावा द्विप्रकार । माया शबळ ब्रह्मविकार । हा वाच्यार्थ तिहींचा ॥ ११ ॥ माया विनिर्मुक्त निष्कंप । सत्यज्ञानानंतस्वरूप । तोचि लक्ष्यार्थ निर्लेप । परमात्म्याचा जाणिजे ॥ १२ ॥ त्वंपद तो जीव सहजें । तो ही द्विधा जाणिजे । वाचोनि लक्ष हें बोलिजे । उभय अंश तयाचे ॥ १३ ॥ देह द्विधा विनिर्मुक्त । प्रत्यक् चैतन्य निर्धूत । तो चि बोलिजे लक्ष्यार्थ । जीवात्म्याचा निर्धारें ॥ १४ ॥ जीवेश्वराचे लक्षांश दोनी । निवडोनि करावी मेळणी । जैसें गंगायमुनेचें पाणी । ऐक्यवादें समरसे ॥ १५ ॥ प्रतिबिंब निजबिंबातें पाहे । तंव बिंबत्व अंगीं लाहे । दर्पणीं गिळलें तरी आहे । प्रतिमुख निज मुखीं ॥१६॥ महदाकाश घटाकाश । मेळविलें हे बोली वोस । लहरी आणि क्षीराब्धीस । वेग-

१६ लेप=चित्र.

ठीक असेना ॥ ३१७ ॥ ऐसी उभयांश बळोपाधी । त्या करोनि विषय बुद्धी । अखंड ऐक्यत्वें अनादी । जाणोनि होती कृतकृत्य ॥ १८ ॥ ते अखंडीत कैसें काय । तरी विजातीय स्वजातीय । स्वयातीभेदय । यारहित अखंड ते ॥ १९ ॥ विजातिभेदरहित । म्हणिजे निष्प्रपंच निर्धूत । स्वयातिभेदातीत । त्या आन भेद असेना ॥ २० ॥ स्वगत भेदातीत म्हणिजे । ब्रह्मीं ब्रह्मत्व विसरिजे । जैसें सैंधव सिंधु होईजे । वेगळेपण नुरवूनी ॥ २१ ॥ तो नित्य शुद्ध बुद्ध मुक्त । सत्य स्वभाव निर्गुणवंत । निरावेवँ सर्वगत । निष्कळंकस्वरूप ॥ २२ ॥ तो अवस्थात्रयातीत । असंगब्रह्मैवाहमस्मीति । योगी योगांतरें पावती । सहजानंदें समाधी हे ॥ २३ ॥ निरामय मायातीत । सर्वकल्पनाव्यतिरिक्त । तया अंतरीं अनंत । सुखसंवाद साधका ॥ २४ ॥ तया सुखासी नाहीं अंत । यालागीं बोलिजे अनंत । ज्याचा अळुमाळ स्पर्शतां वात । संसारभाव विसरीजे ॥ २५ ॥ ज्या सुखाचेनि स्वानंदें । विषयभोग चि आस्पदें । सार्वभौमादि महेंद्रपदें । विरस मानिलीं विरक्तीं ॥ २६ ॥ पृथु पुरूरवा युधिष्ठिर । जडभरतादि नृपवर । राज्य सोडोनि अपार । गेले वना वीतरागें ॥ २७ ॥ ज्या सुखाच्या प्राप्तीलागीं । जाले सर्पव्याघ्रसंगी । वैराग्याचे सबळ आगीं । इंद्रियें करिती इंधनें ॥ २८ ॥ माहायोगाचे सागर । गोष्पदप्राय मानिती नीर । अवघड तपाचे डोंगर । उडोनी मागां सांडिले ॥ २९ ॥ ऐशा सुखाचेनि बोधें । ठावीं नव्हती देहद्वंद्वें । म्हणोनि आघात प्रऱ्हादें । न लेखितां साहिले ॥ ३० ॥ जया सुखसिंधूचा लोट । भरोनि बुडवी मनाचा घट । इंद्रियद्वारीं उत्कंठ । सुखानंद वोसंडे ॥ ३१ ॥ अष्टौ भावांचीं भूषणें । अंगीं बाणती अभिन्नें । तुर्येचेनि आलिंगनें । प्रपंच परता पारुषे ॥ ३२ ॥ तेथें स्वदेहाची विस्मृती । ते चि स्वरूपाची स्मृती । लाज पळाली मागुती । ठायीं न पडे कैं गेली ॥ ३३ ॥ तेथें सुरनदीच्या पैलेंकुळीं । रेतप्रवाह ऐलपाळी । ठायीं न सुख उपजे सर्व काळीं । इंद्रीय कोंदाटे ॥ ३४ ॥ समाधिरतीचा संभ्रम । कामिनीसंगावीण निष्काम । आल्हाद उपजे तो निरूपम । विदेहावस्था सर्वदा ॥ ३५ ॥ कां परमार्थनिंदेच्या आधीं । प्रपंच नागराची समाधि । भाव उपजे तो संवादीं । गुप्त असे सर्वदा ॥ ३६ ॥ तेव्हां दृश्यद्रष्टा दर्शनपणें । सच्चिदानंद भासे तेणें । जैसे दाळिंबाचे दाणे । एकरसें गोठले ॥ ३७ ॥ नातरी द्राक्षांचिये घडीं । भेदली अभेद येक गोडी । इक्षुदंडाचिये भिन्न कांडीं । स्वाद वसे अभिन्न ॥ ३८ ॥ तैसा त्रिपुटीचेनि मिसें । ब्रह्मानंद

---

१७ निरावेव ( निरवयव )=निराकार. १८ निरामय=रोग रहित. १९ अळुमाळ=( अणुमात्र )=किंचित्. २० तुर्या=चवथी. ( अवस्था ). सुषुप्ति, जागृति, व स्वप्न या तिहींचे. २१ पलीकडचें कुळ. कूल=तीर.

कोंदला मुसे । ऐशा सुखाचे दिवसें[२२] । अविद्याराती हरपली ॥ ३३९ ॥ जें सुख सेवोनि म्हणती सुखी । ते वृत्ति विरे सुखोदकीं । तें सौख्यांत हे विवेकी । ब्रह्मनिष्ठ बोलिजे ॥ ४० ॥ त्या निराकुळा नाहीं अवधी[२३] । जैसा कल्पांतीं उदधी । अंत पहातां वेदीं । "नेति[२४]" म्हणोनि परतती जे ॥ ४१ ॥ अथवा माया वर्णातीत । सर्वअवस्थेव्यतिरिक्त । कीं निराकुल म्हणिजेत । तया राहित परमात्मा ॥ ४२ ॥ ज्ञानें चिन्मात्रिक स्फुरण । तद्रहित जें निजभाव शून्य । तें ज्ञानांतर सुविज्ञ । दैवागळे सेविती ॥ ४३ ॥ सेवन म्हणिजे ऐशी युक्ती । "सोहँमस्मि[२५]" या वृत्ती । परमात्म्याचिया स्वरूप होती । कीटकी भृकुटीचे न्यायें ॥ ४४ ॥ कीं नाना पंथीं एक स्थान । नाना उद्योग एक धन । साधिजे तैसें स्वरूप जाण । वाखाणिलें बहु शब्दीं ॥ ४५ ॥ एवं विशेषणीं बहुतीं । आत्माचि प्रतिपादिला ग्रंथीं । जैसीं सोयरिकेचीं नातीं । पुरुषनामें भिन्नभिन्न ॥ ४६ ॥ तया अनुपम आत्मकनका । न पडे वाचकाची टीका । तरी बोलिजे जैसें अर्का[२६] । चित्रामाजी रेखिजे ॥ ४७॥ मुक्यानें वोते अमृतपान । वृक्षमुळीनें सेविलें जीवन । तें न सांगतां अमरपण, सपल्लव जग जाणे ॥ ४८ ॥ तेंवि अनुभवाची खूण । अनुभवी जाणती विचक्षण । बोधितां न बोधिती अज्ञान । ते पाषाण नरदेही ॥ ४९ ॥ येवूनियां नरदेहा । येणें ज्ञानें देहसंदेहा । न खंडितीते भवडोहा । माजी पडले चिर काळ ॥ ५० ॥ एके मरणें न खंडे मरण । म्हणोनि मृतांतर हें वचन । सर्वदा प्रेतप्राय जाण । ज्ञानजीवन त्या नाहीं ॥ ५१ ॥ आत्मज्ञान जालें जया । पंडित ऐसें ह्मणती तया । जे न भुलती लोभविषया । स्त्रीसंगादी कल्मषी ॥ ५२ ॥ स्त्री देह चर्माची कोथळी[२७] । भरली नरकपूयकृमीजाळीं । अधोद्वारीं सदाकाळीं । अधोवात उघडले ॥ ५३ ॥ जैसी पायखोळणी मोहरी । भरणाश्रय आमध्यनीरीं । तैसा द्रव योनिद्वारीं । म्हणोनि सदा अशौच ॥ ५४ ॥ अस्थिर म्हणजे न लागतां क्षण । तंव पालटे नव तारूण्य । जरेनें देतां आलिंगन । होय जर्जर मर्कटी ॥ ५५ ॥ चर्मपात्र द्विधा भिन्न । अपानोद्वारें जडलें जाण । त्या लागीं वेंचिती धन । ते मूढ जन संसारीं ॥ ५६ ॥ विष्टा मूत्राचें भाजन । जाणोनि रमेना ज्याचें मन । ते पंडित विचक्षण । मोक्षसदनीं ठाकती ॥ ५७ ॥ स्त्रीच्या देहीं दोषदृष्टी । देखिजे जैसें विवेकनिष्ठीं । तैसेंच आत्मदेहा निकटीं । विचारवंतें पाहिजे ॥ ५८ ॥ नरदेहींचें तारूण्य प्रबळ । तरंगभंगाहूनी चंचळ । होवोनी नासती चपळ जळ । तैं चंचळ धनलक्ष्मी ॥ ५९ ॥ तृणाग्नि पडतां जळबिंदु । पडतां न लगे क्षण पादु । तैसा स्त्रीसंगाचा आनंदु । रेतपातीं लवमात्र ॥ ६० ॥

२२ दिवस=सूर्य. २३ अवधी=मर्यादा. २४ नेति=न + इति=नाहीं असें. २५ सोहमस्मि=तो मी आहें ( सः अहं अस्मि ). २६ सूर्य. २७ कोथळी=पिशवी.

दर्प करोनि कानवडा । त्यावरि उंडी दानि सरडा । पडतां वेळ लागे केव्हडा । वीर्यस्खळन त्या योगें ॥ ३६१ ॥ कळे न कळे ऐसा संतोष । होवोनि नासतां न लगे निमिष । सेखीं दुःख उरे अशेष । महा पुण्य क्षय करी ॥ ६२ ॥ वृश्चिकनांगीवरी मधुबिंदु । देखोनि धांवे बुद्धि मंदु । चाखों जातां खेदु । ओग आला अपार ॥ ६३ ॥ नातरीं खड्गाचिये धारे । साखरमाखिली ते पामरे । चाखों जातां जिव्हा चिरे । मुख केउतें कळेना ॥ ६४ ॥ तैसें स्त्रीसंगें जें सुख । तें आडनांव मात्र देख । विषें मरण तैसें दुःख । प्राप्त होय निर्धारें ॥ ६५ ॥ स्त्रीरमणीं होय सुख । तें मिथ्या नेणती मूर्ख । स्त्रीचा संग मात्र देख । होतां तोष तेथें नाहीं ॥ ६६ ॥ शिवणीमाजी योनिस्थान । तेथें बिंदूचें आगमन । होतां कंडू उद्भवे गहन । मैथुनानंद ज्या ह्मणती ॥ ६७ ॥ योनीबिंदूची भेटी । सरतां देहीं अल्हाद उठी । तैं दोन्हीं स्तनीं पुरुषानिकटी । बुजती पोटीं कैळाविद[28] ॥ ६८ ॥ म्हणूनि तिळतुल्य सुखाचिये चाडे । सुकृत नासे मेरूएवढें । जाणोनि स्त्रीदेह दोषभांडें । नातळती सज्ञान ॥ ६९ ॥ विष्टा सूकरासी च गोड । श्वानासि स्वादिष्ट हाड । तैसा विषयासक्तमूढ । तो लोलुप स्त्रीसंगा ॥ ७० ॥ ऐशीं वचनें शुकमुखीं । निघालीं जैसा वर्षाव पीयूषी[29] । परी तीं अपमानासारिखीं । रंभेच्या मनीं मानलीं ॥ ७१ ॥ मग उत्तर देत निगुती । मागां दूषिली त्याहूनां मी परती । ऐसें विस्तारित अर्थी । श्लोकसंकेत बोलता ॥ ७२ ॥ रंभा म्हणे योगिराया । तुवां दूषिल्या मानुषी जाया । तयांसारिखी माजी काया । नव्हे हें काय नेणसी ॥ ७३ ॥ वस्तुवस्तूसी अंतर बहुत । ऐसें जाणती परीक्षावंत । एऱ्हवीं कुरूप स्वरूपवंत । गर्भांध काय ओळखे ॥ ७४ ॥ उच्चैःश्रवा रवीचे रथीं । द्वयसहस्र आगळे द्वय शती । दोनी योजनें व्योमपंथीं । निमिषार्धें जो क्रमी ॥ ७५ ॥ तया ऐसे माझे घोडे । ऐसें नर जो बोले तोंडें । तया तुल्य आन वेडें । कोण असे त्रैलोक्यीं ॥ ७६ ॥ काळ खड्गा ऐसी विळी । किंवा असिलते[30] सारखी पळी । गजवेलीसीं भिडे कोहळी । डोकेतवातैसदर्पण ॥ ७७ ॥ ऐरावती देवेंद्राचा । समुद्रमथनीं उद्भव ज्याचा । तो वनकुंजरासमान साचा । म्हणे तो काय विवेकी ॥ ७८ ॥ चंदन चढे देवनिढळा । येक काष्ठ पडे पायखोळा । कल्पतरूसम बाभळा । कीं केळ तैसी रुद्र तोंडे ॥ ७९ ॥ अश्वत्थ लावूनि गंगातीरीं । प्रदक्षिणा करिती पुरुषनारी । त्यांचे संकल्प क्षणामाझारीं । सिद्ध होवोनी प्रत्यक्ष ॥ ८० ॥ आणि लाविलें मद्योदकाचें काष्ठ । स्रवती साध्वीचे लोट । तयाऐसा तरुवरिष्ठ । हरिवृक्ष केंवि सांगे ॥ ८१ ॥ माणिक मुक्ता पाच पेरोज । नीळ वैडूर्य पुष्कराज । गोमेद प्रभाकर मरगज । पद्मराग महामणी ॥ ८२ ॥

२८ विद=जाणते. २९ पीयूष=अमृत. ३० असि=तरवार.

परिस चिंतामणी ज्या म्हणती । जे हे एक पाषाण जाती । म्हणोनि गारे-साठीं देती । ते मूर्ख कीं शहाणे ॥ ३८३ ॥ भरित जांबुंनदाचीं[31] तगटें । पाळवी मुक्ताफळ चोखटे । ऐशा दिव्यांबरेशीं रगटें । काय तुळणे तें पावे ॥ ८४ ॥ करोनी शरीराचा चुना । शतयागांचा तांबूल जाणा । देवुनी उर्वशी-च्या स्तना । स्पर्शावया अधिकार ॥ ८५ ॥ आणिक एक परीचे जाडे । कच्छ फेडुनी रिघे फुडें । त्या मनुष्यदारेचे नि पाडें[32] । दिव्यांगना केंवि होती ॥ ८६ ॥ उदार धीर पवित्र ज्ञानी । दयाशीळ यशस्वी जनीं । शापानुग्रह महामुनी । मूर्त अवतार विष्णूचे ॥ ८७ ॥ कृपण अधीर दोषी मूढ । विश्वपीडक अकीर्ति कावा-ड । आचारभ्रष्ट पाषांडी जड । मुख्य अधिकारी नरकाचे ॥ ८८ ॥ येकाचे नामें जळती दोष । दर्शनें जोडे सिद्धिका मोक्ष । ऐसे महानुभाव पुरुष । संगें लोकां सुखकारी ॥ ८९ ॥ येकाचे स्मरणें पापप्राप्ती । दर्शनें नरकासी नेती । संग पडतां दुःखावर्ती । ते अधम उत्तम कैसेनी ॥ ९० ॥ येक प्रतापें जिंकोनि क्षिती । येक हरविती वडिलांची वृत्ती । येकातें म्हणती चक्रवर्ती । येक भक्षिती कोरान्न ॥ ९१ ॥ येक सुपुत्र कुळातें तारी । येक पूर्वज पाडी अ-घोरीं । म्हणोनि अधर्म पुरुषा सरी । नाहीं जाणा निर्धारें ॥ ९२ ॥ विष्णुतीर्थें वैकुंठ जोडे । सुरापानीं रौरवीं पडे । दोन्ही उदकें येका पाडें । म्हणती मूढा नाडली ॥ ९३ ॥ मंदाकिनी[33] आणी वैतरिणी[34] । सारिख्या म्हणती पापी प्राणी । जगें नाहिने नान्हवीजीवनीं । कर्मनदीतें नातळती ॥ ९४॥ म्हणोनी वस्तुवस्तूसी पाहें । अंतर महदंतर आहे । ऐसें जाणे तो चि लाहे । चतुर नाम विलोकीं ॥ ९५ ॥ तेंवि आम्ही देवांगना । पुण्यावेगळ्या नटे कव-णा । मानिनीच्या देहदूषणा । काया अमुच्या नातळती ॥ ९६ ॥ प्रत्यक्ष पाहीं माझें रूप । दिव्य देहीं लावण्यदीप । येथीचें सुरत सुख अमूप । तें स्वानुभवें जा-णावें ॥ ९७ ॥ हे आनंदरसाची कृपिका । गोडी आणी सर्व सुखा । चाखो-नियां अधरीं पीयूषा । प्रतीति पाहें ययाची ॥ ९८ ॥ मग ग्राहीक होईं शरीरा । संतोष देईन तनुअंतरा । मातें अव्हेरितां चतुरा । महा हाणी समान ॥ ९९ ॥ ऐसी रंभा अनुवादली । परी शुकानें धिःकारिली । जैसा नृसिंहउपासक छळी । महाभूतीं छळिजेना ॥ ४०० ॥ पुढती तिच्या कर्णकुंभा । भरिता झाला वैराग्य-अंभा[35] । ज्या तिरस्कारें लाजोनि रंभा । हृदय फाडी आपुलें ॥ १ ॥ शुक म्हणे रंभे देख । कामें पुरुष झाला मूर्ख । वरी वरी लावण्य सुरेख । कामिनीचें देखोनी ॥ २ ॥ चाफेगोरटी सुकुमारी । डोळस श्यामांगी सुंदरी । वदनीं कुंकुम केशरी । उटी-

---

३१ जांबूनद=सोनें. ३२ पाडें=समान, सारखी. ३३ मंदाकिनी=गंगानदी. ३४ वैतरणी=यम लोकची नदी. ३५ अंभ=पाणी.

साजिरी दिसतसे ॥ ४०३॥ कस्तूरी रेखिली निटिळा। त्यावरी जडित भांगटिळा। मुक्ताहार मिरवे गळां। दिव्याभरणें शोभती ॥ ४ ॥ ऐशी वरी वरी देखतां डोळा। अधोद्वारीं सुटली लाळा। तृष्णा सर्पिणी गुह्यबिळा। तोंड घाली लवलाहें ॥ ५ ॥ परि विचारें सारोनि चीरें[३६]। अंतर न पाहती च पामर। घायमुखासम छिद्र। रक्त स्रवे सर्वदा ॥ ६ ॥ दुर्गंधीचें जन्मस्थान। संयोगाचेनि मिषें जाण। चित्त वित्त आयुष्य हरण। हारोनि सांडी पुरुषाचें ॥ ७ ॥ ह्मणसी मानविनी कनिष्ठ। आपुलें देहवरिष्ठ। हें बहुतांचें उच्छिष्ट ताट। घोंगायलें विकारीं ॥ ८ ॥ खरकटलिया पात्राचे कांठ। चोहाटां चाटिती श्वानांचे थाट। तैसे स्वर्गांगनेचे वीठ। स्वर्गाजात्यानें चुंबावे ॥ ९ ॥ देवळीं मांडिली भेरी[३७]। बडवितीया कोण निवारी। तैसी वक्षस्थळाची परी। आवडे तेणें मर्दावें ॥ १० ॥ कीं वाकळ[३८] पडे वाटेवरी। ते काठीनें उचलिजे वाटसरीं। तैसी नितंबवस्त्राची परी। उघडित्या नाहीं निषेध ॥ ११ ॥ बाळसमुदायाचे साळे। दगड कमाविले वाटोळे। ते उचलावे पुरुषें सबळें। तैसे परी कुचयुग्म ॥ १२ ॥ उखळ रोंविलें धर्मशाळे। भलती कांडी भलत्या वेळे। तैसें कामालय मोकळें। स्वर्गकामें यजिती त्यां ॥ १३ ॥ कीं ग्रामद्वारीं मांडिले खोडे। अन्यायी पायी सुदती देवडे। तरी तृप्ति न मानुनी तोंड। उघडें असिजे सर्वदा ॥ १४ ॥ तैसें बहुतीं बहुतकाळ। शेवशेवूनी केलें यळ। तरी भोगित्या पुढें उतावेळ। सन्मुख सदा पसरलें ॥ १५ ॥ नरक उदर भयानक। भोंवतें वडवाग्नीचें मुख। पुरुषवीर्य सिद्धोदक। नित्य सेवितां शमेना ॥ १६ ॥ भग भडाग्नीच आहे। जानुद्वय करपलें पाहें। त्यावरी आच्छादिलें आहे। रम्या वस्त्रें करोनी ॥ १७ ॥ ऐशी नारी यया नावीं। पुरुष उन्मादलता जाणावी। स्वर्गमोक्षसुखाची आडवी। मार्गार्गळा अवघड ॥ १८ ॥ कळे स्त्रीदेहीं नरक पूर्ण। कळे भोगियां भवबंधन। न कळे कां पा तेथींचें मन। जाणा नेणा च लाधलें ॥ १९ ॥ स्त्रीदेह नरकसमुद्र। जाणोनि तेथें रमती नर। ते नरकरूपी घोर संसार। कैशा परी तरतील ॥ २० ॥ जेथें जन्म तेथें रमती। हे संसारिकांची रीती। विष्टामूत्रद्वारीं रमती। ते कृमीरूप निर्धारें ॥ २१ ॥ ऐसें छी छी करोनी देखा। निंदितां रंभा चढली तवका। मग करिती झाली काय ऐका। जन्मेजया श्रोते हो ॥ २२ ॥ शुकशब्द उल्का शिवतां श्रोत्रीं। रंभा पोळली जिव्हारीं। तें शल्य काढावया बाहेरी। फाड करी स्वहृदया ॥ २३ ॥ दोहीं करींचीं दाही नखें। उदरीं रोवनियां निकें। द्विभाग करून म्हणे देखें। निर्मळ कीं हें कश्मळ ॥ २४ ॥ मौक्तिकशुक्तीचीं पुटें। उकलितां अंतरीं चोखटें। कर्पूरकेळीचे गोटे। सारे पदर सोलिल्या ॥ २५ ॥ ऐसे जठरींचेनि वोटी।

---

३६ चीर=वस्त्र. ३७ भेरी=नगारा. ३८ वाकळ=गोधडी.

म्हणे गुणग्राहका लक्षीं दृष्टी । छेदिल्या नाहीं रक्तवृष्टी । व्यथा मात्र असेना ॥ ४२६ ॥ हे विद्यारत्न वैरागर । निर्मळतेचा क्षीरसागर । सुगंधाचा मलयागर । कीं भार कळांचे ॥ २७ ॥ अंतरीं पाहे योगींद्र । दिव्य कपोत कृष्णागर । वा चंदन नव केशर । चोख जवादी मृगनाभी[३९] ॥ २८ ॥ ऐसीया परिमळाची पेटी । उघडली ते देखतां दृष्टी । परम आश्चर्य वाटलें पोटीं । देहीं रोमांच ऊठले ॥ २९ ॥ साही भाव पातले दये । नेणे विकल्प भेद भय । कन्या अथवा देखिजे माय । तैसें जालें ते काळीं ॥ ३० ॥ मग काय बोले उत्तर । परिसोत श्रोते चतुर । जेणें होय निरुत्तर । वितंडवाद दोहींचा ॥ ३१ ॥ शुक म्हणे ऐक जननी । माझे पूर्व कर्माची काहाणी । द्वादश वर्षें नरकयातनीं । मातृगर्भीं वसिन्नलों ॥३२॥ विष्ठा मूत्र दायर । जठराग्नीची अही थोर । जंतु दुर्गंधी अपार । नाकीं तोंडीं संचरती ॥ ३३ ॥ अत्यंत संकोच तो ठाय । पसरूं न शकें हातपाय । उबाऱ्यानें कोंडलों पाहें । अधोवदनें जाजावलों ॥३४॥ ऐसीं चतुर्विंशती अयनें[४०] । घटिका युगाचे समान । म्यां भोगिलीं आदानें । गर्भवासीं अपार ॥ ३५ ॥ हें जरी जाणवतें अळुमाळ । तरी तुझे पोटीं होतों बाळ । येथें च वसतों अनंत काळ । निर्मळ गर्भीं सुखरूप ॥ ३६ ॥ तुजसारिखी पावतों माता । तरी कां पावतों व्यथा । गेली गोष्टी व्यर्थ आतां । आठवोनी फळ काय ॥ ३७ ॥ तें हें महा हानी समान । मी मानितों येथ जाण । चुकी पडलीया सेखीं मन । पश्चात्तापें तळमळी ॥ ३८ ॥ ऐकुनी शुकाचे अनुवादा । रंभा कापिन्नली गदगदां । अश्रु लोटती नयनारविंदा । खेद कंप सर्वांगीं ॥ ३९ ॥ अवचट पाय लागला लिंगीं । नेणतां अपमानिला योगी । तया प्रस्तावाच्याअंगीं । शारे भरे सुमनाचे ॥ ४० ॥ तैसें जालें तयेचिया जीवा । बोलवया न वळे जिव्हा । नेणीवघेतियाँ[४१] पुढें सर्वा । पृच्छौं[४२] जैशा पारुषती ॥ ४१॥ तेणें निरुत्तरें जाला वाद । गर्भीं सांठविला पुढिला शब्द । युक्तिप्रयुक्तीचा कंद । खाणोनि परता सांडिला ॥४२॥ प्रसूतीनंतर तारुण्य सरे । विशाखांतीं मेघ विरे । गीत परतोनियां भरे । गाणाहृदें लळितांतीं ॥४३॥ कीं शांती पावलिया क्रोधीं । युद्धीं जालिया सामसंधी । मार्गीं जातां महोदधी । पांथीक जैसा पांगुळे ॥ ४४ ॥ कीं गुरुदर्शनें विरे संसारु । विवेक खंडी पापाचारु । तैसा शुकवाक्यें विचारु । सर्व हरपला रंभेचा ॥ ४५ ॥ सुकली अभिलाषाची नदी । प्रगट जाली निष्कामबुद्धी । मग स्तुती मांडिली शुकशब्दीं । श्रीशुकाची तेऐका ॥ ४६ ॥ ह्मणे आश्चर्य त्रिभुवनीं । येवढा अक्षोभ्य महामुनी । नाना परी मोहितां मनीं । विकार नोहे तिळतुल्य ॥ ४७ ॥ योगीयांचा तूं परम

---

३९ मृगनाभी=कस्तुरी. ४० अयन=साहामहिने. ४१ नेणीव=गैर माहिती. ४२ पृच्छा=प्रश्न.

ईश । योगीयांमाजी परमहंस । त्रैलोक्य चराचरीं पुरुष । तुजतुल्य नाहीं विप्रेंद्रा ॥ ४४८ ॥ सुरासुर गंधर्व । सिद्ध विद्याधर सर्व । पाताळ पन्नग आणि मानव । जितेंद्रिय सन्यासी ॥ ४९ ॥ कंदमूळफळाहारी । शुष्कपर्णाशनी अनरी । ऊर्ध्व पादीं अधोवक्त्रीं । वायु भक्षिती तपस्वी ये ॥ ५० ॥ ते ही मातें देखतां त्वरित । कामें होती विव्हळ बहुत । म्हणोनि तुझ पाडें सत्य । तूं चि एक ऋषिवर्या ॥ ५१ ॥ सकळ योगियांत योगसिद्धी । तुजचि लाधली त्रिशुद्धी । सहनशीळ तुझी बुद्धी । तूं चि येक मुनिराया ॥ ५२ ॥ माझिया कटाक्षांचे शर । लागतां भेदले सुरवर । ते शर हाणतां रोमाग्र । वक्रता तुझें न पवेची ॥ ५३ ॥ ऐशी गर्जूनियां गिरा । उभारोनी दक्षिण करा । शुकाचिया वैराग्यधीरा । रंभा वर्णी आगळे ॥ ५४ ॥ मेरू सांडील स्वस्थान । विदेशा नेऊंयेईल सदन । भूतळ सेवील उडुगण[४३] । ध्रुव तो होईल अध्रुव ॥ ५५ ॥ भूगोळप्रदक्षणेलागीं । मंदराचळ निघेल वेगीं । हिमगिरीचे अंगीं । आटों शके सुरसरिता ॥ ५६ ॥ पूर्वेचा चळेल सूर्य । घटीं कोंडिला जाईल वायू । शब्दासारिखा वरूणालय[४४] । मागें मागें फिरवूं ये ॥ ५७ ॥ परी शुकाचा नेम अचळ । कल्पांतीं नोहे चंचळ । हें त्रिसत्य सत्य वाक्य निर्मळ । ऐकती त्यां निज मोक्ष ॥ ५८ ॥ सरला रंभेचा अनुवाद । पुढें व्यासाचा संवाद । पुत्र पित्याचा विवाद । ऐकती त्यां निजमोक्ष ॥ ५९ ॥ जाणें नेणें मी यया । कळस वाहिला तृतीयोध्याया । ध्वज बांधला दत्तात्रेयां[४५] । दर्शन मोक्ष जगातें ॥ ६० ॥ अर्चित कैवल्याच्यादानीं । यालागीं नाम चिंतामणी । सायुज्य मुक्ती तयाचे चरणी । मुक्तेश्वर तेथ मागे ॥ ४६१ ॥

समाप्त.

---

## मुक्तेश्वरकविकृत

### मूर्खाचीं लक्षणें.

॥ श्रीगणेशायनमः ॥ सर्व एकापासून झालें । सर्व एकापासून आवडलें । सर्व एकाशीं पावलें । हें ज्या न कळे तो एक मूर्ख ॥ १ ॥ हरिहरांतें मानी भेद । साधुसज्जनांतें देखोनि पावे खेद । नेणोनि करी वितंडवाद । तो एक मूर्ख जाणावा ॥ २ ॥ नाहीं अर्थाचें अनुष्ठान । आपण मात्रें ज्ञान अभिमान । गर्वें जगास मानी न्यून । तो एक मूर्ख जाणावा ॥ ३ ॥ अर्थ नेणोनि भाषा दूषी । सिद्धांत नेणोनि मताचरेसी । ईश्वर नेणोनि भूतांचा द्वेषी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ४ ॥ वेदशास्त्रपुराण जाणे । पाप म्हणोनि निंदिती जनीं । बळेंच आ-

---

४३ उडु=आकाशांतला तारा. ४४ वरुणालय=समुद्र. ४५ दत्तात्रेय=दत्त + आत्रेय= अत्रीचा दत्त नांवाचा मुलगा.

चरे तो करणी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ५ ॥ आपुले अवगुण नाठवी । पुढिलांचे अपराध माजवी । निर्दोषियां दोष लावी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ६ ॥ शरीरसंपत्ति वयसा जाणा । हें साचार मानी मना । गर्वें जगासी उताणा । तो एक मूर्ख जाणावा ॥ ७ ॥ ईश्वर काळ आणि पापाचें । वेद वडील लोकनिंदेचें । भय नाहीं आयासाचें । तो एक मूर्ख जाणावा ॥ ८ ॥ चंचळ आंवरावया मन । शक्ति नाहीं अर्ध क्षण । मेरुतुल्य शब्द जाण । तो एक मूर्ख जाणावा ॥ ९ ॥ पुढिलां उपदेशी निःपाप । आपण झांकून करी पाप । करूनि म्हणे मी निःपाप । तो एक मूर्ख जाणावा ॥ १० ॥ विरक्त मनीं इच्छावंत । योगी आणि इंद्रियासक्त । वादी क्रोधी शास्त्रपंडित । ते हे तिघे मूर्ख जाणावे ॥ ११ ॥ ब्रह्मनिष्ट आणि अहंकारी । तपस्वी कोपें अपस्मारी । शिष्ट अंतरीं अनाचारी । हे तिघे मूर्ख जाणावे ॥ १२ ॥ ज्ञान आणि वैराग्यहीन । भक्ति करी विश्वासावीण । कुटुंब संग्रहीं निर्धन । हे तिघे मूर्ख जाणावे ॥ १३ ॥ आतां सर्व साधारणें । अनेक मूर्खांचीं लक्षणें । सांगीजतेल सज्ञानें । कौतुकार्थ परिसावीं ॥ १४ ॥ वारिया देऊनि पाठी । वापीकूपीं घाली दिठी । चालतां तृण तोडी बोटीं । तो एक मूर्ख जाणावा ॥ १५ ॥ प्रकाशाचिये तोंडीं । उभा राहूनि वस्त्र फेडी । सांडव्या[1] वरूनि धांवे तांतडी । तो एक मूर्ख जाणावा ॥ १६ ॥ नीच बैसोनि उंचीं मुते । नाकींचा मळ काढी हातें । बोटींचें नख तोडी दांतें । तो एक मूर्ख जाणावा ॥ १७ ॥ बैसोनियां सभास्थानीं । खाकरे शिंकरे प्रतिक्षणीं । पिंका टाकी पवित्र भवनीं[2] । तो एक मूर्ख जाणावा ॥ १८ ॥ समर्थें करितां विनोद । आपण परतोनि दे शब्द । बळवंताशीं चालवी द्वंद । तो एक मूर्ख जाणावा ॥ १९ ॥ स्मश्रुकर्म करितां निकटी । चिरकाळ बैसोनि सांगे गोष्टी । समर्थवनितां[3] न्याहाळी दृष्टी । तो एक मूर्ख जाणावा ॥ २० ॥ एकटिया चाले पंथीं । हाट[4] चोहटा[5] करी वस्ती । कुसंगाचिया संगती । वर्ते तो एक मूर्ख ॥ २१ ॥ उदकपात्रावीण भोजनीं । चूर्णा[6]वीण फोडणी[7] घाली वदनीं । परवस्त्र मागे स्नान करूनी । तो एक मूर्ख जाणावा ॥ २२ ॥ अर्थलोभियाचे घरीं । पुस्तकपंडिताचे घरीं । स्त्रीजाराचे शेजारीं । वसे तो एक मूर्ख ॥ २३ ॥ उधार देऊनि योटा । मग व्यवहार सांगे चोहटा । नसती करी खटपटा । तो एक मूर्ख जाणावा ॥ २४ ॥ दुजयाचे घरा जाणें । अपमानाचेनि दुःखें शिणणें । क्षेत्रीं

---

१ सांडवा=नदींत किंवा ओढ्यांत पाय न भिजवितां जातां यावें ह्मणून जो बांध घालितात तो. पावसाळ्यांत ह्या बांधावरून पाणी जातें. नाशकास पंचवटींत जाण्याकरितां गोदावरींत अशा प्रकारचा एक सांडवा आहे. २ भवन=घर. ३ वनिता=बायका. ४ हाट=बाजार. ५ चोहटा=चवाठा. ६ चूर्ण=चुना. ७ फोडणी=विडा.

सोवळे ओंवळें ह्मणे । तो एक मूर्ख जाणावा ॥ २५ ॥ उधार देऊनि मित्रा मागे । गुह्य स्त्रियेपाशीं सांगे । आपला गुण आपण [८]श्लाघे । तो एक मूर्ख जाणावा ॥ २६ ॥ नीचाचे तोंडीं लागे । शिकवी तयाची बुद्धि नलगे । अहंपणें सर्वदां वागे । तो एक मूर्ख जाणावा ॥ २७ ॥ अल्पभोजी शीघ्रभोजी । अथवा समर्थ-प्रभु-[९]शेजीं । भोजनीं बैसे तया [१०]शेजीं । तो एक मूर्ख जाणावा ॥ २८ ॥ संबंधेंवीण वार्ता पुसे । उगा चि लोकांशीं रुसे । तापिया कोपियांसि हांसे । तो एक मूर्ख जाणावा ॥ २९ ॥ बहुत हानीतें नाठवी । स्वल्पासाठीं कलह वाढवी । वेळ न पाहतां आडवी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ३० ॥ भोजनकाळीं परगृहा जाय । स्त्रीपुरुषांचा एकांत पाहे । हाटचोहटा खाय कीं गाय । तो एक मूर्ख जाणावा ॥ ३१ ॥ दासी तरुणी रूपवंता । रायकुटुंबिनी विरक्ता । गृहीं ठेऊनि निभ्रांता । तो एक मूर्ख जाणावा ॥ ३२ ॥ दरिद्री गोड खाय अंगें । घरींचा [११]सुरवाडें पंथीं मागे । अभाग्यकाळीं भाग्य सांगे । तो एक मूर्ख जाणावा ॥ ३३ ॥ करूनि अनुचित करणी । पश्चात्ताप मानी मनीं । छळूनि करी [१२]बुझावणी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ३४ ॥ मळमूत्र-विसर्जन । सुखें करी भोजन । गोंवीं त्वरें जातया वचना । तो एक मूर्ख जाणावा ॥ ३५ ॥ भोजनीं बैसे [१३]विषमासनीं । उदक प्राशी [१४]खट्वासनीं । प्रभुशेजे उंचासनीं । तो एक मूर्ख जाणावा ॥ ३६ ॥ वर्जितां अन्याय [१५]राहाटणें । अपाय लागल्या वरसी नेणें । माझें प्रारब्ध ऐसें म्हणणें । तो एक मूर्ख जाणावा ॥ ३७ ॥ फिटेल कैसें हें न विचारी । रीण घेऊनि घाली उदरीं । मग भंडमा भोगी पारी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ३८ ॥ मित्रदारा मित्रवैरी । यांशीं एकांतीं मैत्री करी । धणी नसतां रिघे घरीं । तो मूर्ख जाणावा ॥ ३९ ॥ परहातें संपादूनी । यशलाभाचा भरंवसा मानी । ईश्वरभजन न ऐके कानीं । तो एक मूर्ख जाणावा ॥ ४० ॥ जागतया पुढें निजणें । कीं निद्रिस्थापुढें बैसणें । स्त्रीसमाजीं आवडे बसणें । तो एक मूर्ख जाणावा ॥ ४१ ॥ निद्रा करी समर्थाशयनीं । जाऊनि बैसे समर्थासनीं । आरूढे जो समर्थवहनीं । तो एक मूर्ख जाणावा ॥ ४२ ॥ विसांविया उतरे वाटे । अस्तमानीं चढे घाट । ओस पंथीं चाले पहांटे । तो एक मूर्ख जाणावा ॥ ४३ ॥ निद्रा करी मोडके घरीं । स्वल्प मानूनि रिघे पूरीं । समीप म्हणोन नये घरीं । तो एक मूर्ख जाणावा ॥ ४४ ॥ कुटुंबेंसीं परतीरा जाय । अपत्य घेऊनि अवघडी धांवे । एकदां चि बैसवी नावे । तो एक मूर्ख जाणावा ॥ ४५ ॥ माध्यांनीं उष्ण काळीं । सकुटुंबी चाले वाट निर्जळीं । दा-

---

८ श्लाघे=स्तुति करी. ९ शेज=बिछाना. १० शेज=जवळ. ११ सुरवाड=सुख. १२ बुझावणी=समजूत. १३ विषम=उंचसखल. १४ खट्वा=खाट. १५ राहाटणें=वागणें.

टीमाजी रिघे देउळीं । तो एक मूर्ख जाणावा ॥ ४६ ॥ बोल न खंडितां दुजयाचा । आपण असत्य करी वाचा । आपण मध्यें च संचरी वाचा । तो एक मूर्ख जाणावा ॥ ४७ ॥ न बोलवितां परगृहा जाणें । न पुसतां मात सांगणें । समर्थ प्रभु सोयरा ह्मणे । तो एक मूर्ख जाणावा ॥ ४८ ॥ आपण नेणे सारासार । नायके श्रेष्ठाचा विचार । बोले तांतडीभरें थोर । तो एक मूर्ख जाणावा ॥ ४९ ॥ वडला जरी उपकार नाठवी । अपकार तो जीवीं आठवी । आपुलें केलें तें मुखीं रूढवी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ५० ॥ पंक्ति करूनि कदन्न वाढी । आपण सदा मिष्टान्न झोडी । मज न साहे हे संपादी प्रौढी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ५१ ॥ मळीण वस्त्र अंग मळीण । न करी करपाददंतधावन[१६] । भक्ष भक्षी स्नानावीण । तो एक मूर्ख जाणावा ॥ ५२ ॥ समर्थशेजें[१७] बांधी घर । बळवंताशीं अर्थ[१८]व्यवहार । राजपुरोहिताशीं राजमत्सर । तो एक मूर्ख जाणावा ॥ ५३ ॥ पुढें स्तुति मागें निंदा । स्वल्प अपराधें चढे क्रोधा । समयीं जो न मिळे संवादा । तो एक मूर्ख जाणावा ॥ ५४ ॥ एकांत करितां दोघेजण । समीप जाऊनि लावी कान । श्रेष्ठत्व आधीं इच्छी मन । तो एक मूर्ख जाणावा ॥ ५५ ॥ अकारणें हांसे बहु हांसणें । हांसत चि गोष्टी सांगणें । कोण्ही न हांसतां बहु हासणें । तो एक मूर्ख जाणावा ॥ ५६ ॥ प्रभु हांसतां आपण हांसे । जेठा घालूनि सभे बैसे । प्रभु देखोनि आपण हांसे । तो एक मूर्ख जाणावा ॥ ५७ ॥ मळमूत्र सारी जनाचिये दृष्टि । जपतप नाहीं लोकांचे दृष्टि । सभेंत फळ तांबूल एक दिठी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ५८ ॥ बहु व्यवसायी[१९] ऋणग्रस्त । द्विभार्यापति व्याधिस्त । यांचिया वचनीं विश्वासत । तो एक मूर्ख जाणावा ॥ ५९ ॥ परगुणपरीक्षा परवेदना । हे दोन्ही नकळे ज्याचिया मना । त्याचिया संगती सुखवासना । इच्छी तो एक मूर्ख ॥ ६० ॥ अल्प पडदणी अल्प वसन । अल्प पात्रीं बहु भोजन । अल्प स्त्रीस दाखवी मन । तो एक मूर्ख जाणावा ॥ ६१ ॥ गृह त्यागूनि मठाची माया । शिष्यिणी करूनि त्यागी जाया । सुहृद त्यागूनि शिष्य समुदाया । तो एक मूर्ख जाणावा ॥ ६२ ॥ परोपदेशीं कुशळ भारी । आपण अधर्म अकर्म करी । त्याच्या वचनाचा विश्वास धरी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ६३ ॥ तोंडें म्हणे सर्व ही ब्रह्म । आचरे वेदविरुद्ध कर्म । त्याचा शिष्य होय तो परम अधम । महामूर्ख या नांव ॥ ६४ ॥ स्त्रियेचें वचन घेऊनि कानीं । दुऱ्हावी पिता बंधू जननी । वेगळा राहे सुहृदांतुनी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ६५ ॥ अर्थ अथवा वृत्ति स्वार्थ । व्यवहारा बोलावी बापभावांत । अपाय चिंती आप्तांत । तो एक मूर्ख जाणावा ॥ ६६ ॥ मायबापाची हेळणा करी ।

१६ धावन=धुणें. १७ शेज=शेजार. १८ अर्थ=पैसा. १९ व्यवसायी=उद्योगी.

आजर्व आदरें उचित करी । विश्वीं वर्ते मिथ्याचारी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ६७ ॥ कुरूप म्हणोनि स्वस्त्री त्यागी । दासी वेश्यापरस्त्री संगीं । लज्जाविरहित कुमार्गीं । वर्ते तो एक मूर्ख ॥ ६८ ॥ वडिल सुहृद निद्रिस्थ घरीं । अबला अभुक्त रुदितस्वरी । बळात्कारें संग करी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ६९ ॥ परगृहीं गोड तें म्हणे वाढी । स्वगृहीं घाल तें पुसी न रूढि । जेवितया आधीं हात आंखडी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ७० ॥ भोजनाभ्यांगीं मळ सेंगीं[२०] । रैहस्य[२१] बोलतां राजस्वर्गीं । निद्रिस्थ प्रभुस्त्रियां संगीं । तो एक मूर्ख जाणावा ॥ ७१ ॥ झोंपीं जातया कां ध्यानस्था । दाटूनि बोलवी आग्रहता । प्रभूतें पुसे राजवार्ता । तो एक मूर्ख जाणावा ॥ ७२ ॥ प्रज्ञा असोनि अभ्यास न करी । तरुणपणी प्रकाश करी । समर्थाश्रय अनूपकारी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ७३ ॥ ज्ञाता आणि ईश्वर न भजे । भाग्यकाळीं मित्रास माजे । उपदेश घेउनी गुरुसी लाजे । तो एक मूर्ख जाणावा ॥ ७४ ॥ कृपणपणें हेम सांची । उदारपणें कांहींच न वेंची । हा विचारू नेणें आपण ची । तो एक मूर्ख जाणावा ॥ ७५ ॥ ब्रह्म ईश्वर भविष्यार्थु । जाणोनि म्हणे सुवर्ण धातु । त्याचिया वचनीं विश्वासितु । तो एक मूर्ख जाणावा ॥ ७६ ॥ प्रपंच कृत्या लगबग करी । धर्मकृत्या लगबग न करी । न्यायें बोले तयातें वारी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ७७ ॥ इहलोक परलोक जोडणें । तेथ कैंपर्दिक[२२] न वेंची म्हणें । अकीर्ति अंगें करी जीवें प्राणें । सर्व वेंची तो मूर्ख ॥ ७८ ॥ सांप्रदाय मताभिमानी । श्रेष्ठ अश्रेष्ठ मानी मनीं । अयोग्य योग्यत्व पुसणें । तो एक मूर्ख ॥ ७९ ॥ केलें पाप हें झांकेल । या न्यायें तें संपादेल । विष भक्षिलें तें जिरेल । अंगीं मानी तो मूर्ख ॥ ८० ॥ अविश्वासिया अति विश्वास । विश्वासस्थळीं अति अविश्वास । स्वहितकर्ता त्यासी अविश्वास । तो एक मूर्ख जाणावा ॥ ८१ ॥ सभेमाजी खेळवी बाळ । स्त्रियेशीं कटकट करी सर्व काळ । आळसनिद्राकुसंगीं वेळ । क्रमी तो एक मूर्ख ॥ ८२ ॥ सौंली[२३] अथवा मेहुंणी[२४] । रूपवंत कुशल तरुणी । स्त्रियेच्या बाळंतपणा आणी । तो एक मूर्ख ॥ ८३ ॥ ब्रह्मद्वेषी वेद आज्ञा लोपी । कर्म भ्रंशी वेद विकल्पी । भोगीं लोलुंपता[२५] आसक्ति । तो एक मूर्ख जाणावा ॥ ८४ ॥ खाटीक तैंस्कर[२६] मत्स्यविक्रेता । यांसि द्रव्य व्यवहारिता । परांगनेशीं मैत्री कर्ता । तो एक मूर्ख जाणावा ॥ ८५ ॥ गृहदासीसी दे हात । पलांडू सेवी पिसिनांत । अविधी राहाटी श्रेष्ठांत । तो एक मूर्ख जाणावा ॥ ८६ ॥ बाळविधवा वरी घरीं राहत ।

---

२० सर्गी=डाकी. २१ रहस्य=गुप्त गोष्ट. २२ कपर्दिक=कवडी. २३ साली=साल्याची बायको. (साला=बायकोचा भाऊ). २४ मेहुणी=बायकोची बहीण. २५ लोलुपता=लोभ. २६ तस्कर=चोर.

नपुंसका पाशीं पाठवी सुत । शूद्राहातीं अभ्यास करवीत । तो एक मूर्ख जाणावा ॥ ८७ ॥ बहुत काम बहुत कोप । बहुत निद्रा बहुत जल्प[27] । बहु आहार बहुत विकल्प[28] । तो एक मूर्ख जाणावा ॥ ८८ ॥ उत्तर काळीं करी लग्न । जीविकेवीण बांधे सदन । प्राणत्यागीं न वेंची धन । तो एक मूर्ख जाणावा ॥ ८९ ॥ बोल बोलुनी सांडी । मध्यें च व्रतनेम खंडी । स्वदत्त परदत्त विखंडी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ९० ॥ अनुचित कर्मारंभा करी । स्वजनासी विरोध करी । स्त्रीजनासी विश्वास धरी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ९१ ॥ आपण नेणें शिकविलें न करी । विद्याधनावीण अहंकारी । जनीं बळें पाखांड करी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ९२ ॥ जेठियांशीं झोंबी घेणें । व्युत्पन्नाशीं वाद सांगणें । धनवंतरीशीं[29] होडं[30] बांधणें । तो एक मूर्ख जाणावा ॥ ९३ ॥ झोंपीं जाय घोड्यावरी । आडसांगडी निघे पूरीं । रोग परीक्षेवीण औषध करी । तो एक मूर्ख जाणावा ॥ ९४ ॥ राजगृहीं पैशून्य बोले । परनाश देखूनि हरिखें[31] डोले । स्वशक्ति ऐसें मित दर* बोले । तो एक मूर्ख जाणावा ॥ ९५ ॥ बीज्रा भक्षुनि लावी ज्ञान । ममता अंगीं कथीं ज्ञान । बोल आणि करणें वीण । तो एक मूर्ख जाणावा ॥ ९६ ॥ सापत्नमाता कन्या भगिनी । स्नुषा[32] दासी परस्त्री तरुणी । एकटगृहीं एक शयनीं । समीप धांवे तो एक मूर्ख ॥ ९७ ॥ भाग्यें माजे दरिद्रें शिजे[33] । परकीर्ति ऐकूनि मत्सर भजे । निंदितयातें निवेद नवाजे[34] । तो एक मूर्ख जाणावा ॥ ९८ ॥ गर्व करी संतभजनीं । विश्वासुनी महंतसंतवचनीं । दोषारोपी साधूचिये गुणीं । तो एक मूर्ख जाणावा ॥ ९९ ॥ निंदूनि स्वहितधर्मा । स्तवी अविहित परधर्मा । तो चि आचरे परधर्मा । तो एक मूर्ख जाणावा ॥ १०० ॥ विलंब धन प्राप्त संकटीं । त्याची दुराशा धरूनि पोटीं । प्रयत्नालागीं होय हिंपुटी । तो एक मूर्ख जाणावा ॥ १०१ ॥ उपजोनियां संसारीं । आयुष्य वेंची विषयावरी । आत्मप्राप्ति नव्हे पुरी । हें नेणें तो मूर्ख ॥ १०२ ॥ आत्मप्राप्तीचें साधन । एक चि मानुनी गृह जाण । यासि वैराग्य मुख्य कारण । हें चि नेणे तो मूर्ख ॥ १०३ ॥ हरिहरनामा परतें आन । नाहीं प्रायश्चित्त गहन । हें विश्वासें न मनीं ज्याचें मन । तो एक मूर्ख जाणावा ॥ १०४ ॥ काशीमरणें विष्णुस्मरणें । मोक्षप्राप्ती वेदवचनें । यातें अर्थ दुजे म्हणें । तो एक मूर्ख जाणावा ॥ १०५ ॥ सर्व भूतीं भगवंत परिपूर्ण । सर्व दया हें ज्ञानभूषण । हें विश्वास न मनीं जयाचें मन । तो एक मूर्ख जाणावा ॥ १०६ ॥ सन्यासी आणि सालंबी[35] । गृहस्थ आणि

---

२७ जल्प=बडबड. २८ विकल्प=संशय.. २९ धन्वंतरी=वैद्य. ३० होड=पैज. ३१ हरिख=आनंद. * आमच्या पोथींत बरेच अपपाठ आहेत तेथें दुर्बोधता राहिली आहे. ३२ स्नुषा=सून. ३३ शिजे=संतापे. ३४ नवाजे=स्तुति करी. ३५ सालंबी=साश्रय, आसक्त.

निरालंबी । सत्यशील आणि दंभी । हे तिघे मूर्ख जाणावे ॥ १०७ ॥ पुण्यबंधु पापवैरी । लोभ तो क्षय-रोग शरीरीं । आंवरी धैर्य साहंकारी । नेणे तो एक मूर्ख ॥ १०८ ॥ दरिद्री तपातें नाचरे । धानिक अदाता निर्धारें । हे दोघे मूर्ख चि महाधुरे । हे महा मूर्ख जाणावे ॥ १०९ ॥ झालिया विश्वेश्वरकृपा । हें मत न बांधी या संकल्पा । धरूनी भय आचरे जो पापा । तो एक मूर्ख जाणावा ॥ ११० ॥ बहु याचक राज्यधर । यांसीं करूनि उचित पाचार । प्रसन्न करूं म्हणे जो नर । तो एक मूर्ख जाणावा ॥ १११ ॥ देहीं अहंकार गळाला । भूतीं मत्सरु नाहीं झाला । तो आत्मानुभवें भला । हें चि जो नेणें तो मूर्ख ॥ ११२ ॥ एकशत बारोत्तरें । ओव्या लिहिल्या मुक्तेश्वरें । हें परसोनि चतुरें । मूर्खलक्षणें सांडावीं ॥ ११३ ॥ संपूर्णमस्तु ॥

---

## मुक्तेश्वरकविकृत
### शतमुखरावण वध.

सद्गुरुकृपा वसंत-काळ । मन-आरामीं माजला प्रबळ । श्रीराम-कथा जिव्हा-कोकिळ । मधुरस्वर आलापे ॥ १ ॥ रावण-वधाचिये आधीं । युद्ध-समयो प्राप्त संधी । कुंभकर्णाचे वंशजवृद्धी । कारण जालें अवचट ॥ २ ॥ कुंभनिकुंभ उभय कुमारा । त्यांमाजी निकुंभाचि दारा । जाली देखोनी गरोदरा । पितृभवना पाठविली ॥ ३ ॥ ती लंघूनी द्वीपांतरा । सगर्भ पातली माहेरा । नव मास भरतां सुंदरा । दुष्ट कुमारा प्रसवली ॥ ४ ॥ पौंडरीक ठेवूनी नामाभिमान । सुखें क्रमीत असतां दिन । तो कुलक्षय-वृत्तांत बाण । हृदयमर्मीं खडतरला ॥ ५ ॥ रावण बंधु प्रधान कुमार । रामें वधिले सहपरिवार । बिभीषणासी राज्याधिकार । देउनी केला अक्षयी ॥ ६ ॥ हें ऐकोनी निशाचरी । वाहली शोक सरितां-पुरीं । कुमारदृष्टी रक्षण करी । वाढोनी आणी तटाका ॥ ७ ॥ बिभीषण ऊर्जिताची व्याधी । लागली तव दुर्बुद्धी । पुत्रप्रौढत्व दिव्य आधी । औषधीमंत्रा लक्षिती ॥ ८ ॥ बाल्य कौमार स्वप्न सुषुप्ती । सरतां पावला जागृती । तंव तो राक्षस दुष्कर्म जगती । कुबुद्धि दृष्टी देखत ॥ ९ ॥ माउलीलागीं पुसे मात । पूर्वजांचा काय वृत्तांत । तूतें वैधव्य-अंधकूपांत । कोणें सूदलें सांग पां ॥ १० ॥ श्रीरामकुठार अति प्रचंड । तयाशीं बिभीषण बधुं मिळाला द्वंद्व । समुळेशीं केला निखंड । तंव कुळतरू छेदिला ॥ ११ ॥ वृत्तांत परिसोनी मातृगिरा । क्रोध

---

३६ निरालंबी=निराश्रय, विरक्त. ३७ महाधुरे=महाश्रेष्ठ. ३८ पाचार=आमंत्रण.

१ आराम=बाग. २ निशाचरी=राक्षसी. ३ सरितापूर=नदीचा लोंढा. ४ सूदलें=घातलें.

जावरे निशाचरा । ह्मणे गोत्रबंधु पाचारा । प्रायश्चित मी जाणें ॥ १२ ॥ न करूनीयां प्राणनाशा । बिभीषणा लंघवीन दश दिशा । तरी च कुंभकर्णाची स्नुषा । पुत्रवंती एकली ॥ १३ ॥ ऐसें वदोनीयां त्या अवसरा[5] । सवें भरला गगनोदरा । क्षीरसिंधूच्या पैलतीरा । मायापुरा पातला ॥ १४ ॥ तेथें नसती चंद्रसूर्य । निबिड दारूण अंधःकार । माजी असंख्य वृक्ष निशाचर । पर्वतप्राय एक एक ॥ १५ ॥ येउनी शोणितापुरा । नित्य त्राशिती दिनकरा । तयां सकळां मध्ये धुरा । मुख्य रावण शतमुख ॥ १६ ॥ त्याचे वंदुनीयां चरण । पौन्डरीक निघाला शरण । पूर्व वृत्तांत करूनी श्रवण । पुढें विनंती निवेदिली ॥ ॥ १७ ॥ जे जे राक्षस कुळाधम । रामाग्नि लाउनीयां केलें भस्म । तो मम पूर्वजामाजी अधम । निर्भयपणें नांदत ॥ १८ ॥ त्यातें करूनी पदच्युत । म्यां ची होणें लंकानाथ ॥ हा मज याचकाचा मनोरथ । पूर्ण करीजे दातारा ॥ १९ ॥ अवश्य ह्मणोनी शतमौळें[6] । सवें घेउनी अपार दळ । गगनपंथ उतावेळ । मेघाकृती चालिला ॥ २० ॥ सर्व उतरून लंकापूर । दोनी वर्षती शस्त्रभार । बिभीषण होउनी घाबरा थोर । झुंजार वीरा पाचारी ॥ २१ ॥ सज्य करोनी सकळ दळ । युद्ध केलें अति तुंबळ । परंतु तें परचक्र दळ । असंभाव्य आगळें ॥ २२ ॥ बिभीषण सैन्य भद्रजाती[7] । शत्रुशस्त्रें सिंहाकृती । झगटती प्राणयशोकीर्ति । एक ही तेव्हां न लाहे ॥ २३ ॥ जाणोनी तें अलोट विघ्न । चौघां प्रधानां सहवर्तमान । रावणानुज पलायमान । उत्तरदिशे संचरला ॥ २४ ॥ पळतां बिभीषण सद्भाव । दुर्जनीं मांडिला विजयउत्सव । राज्यीं स्थापूनी पौन्ड्रकराव । शतशीर्ष गेला स्वस्थाना ॥ २५ ॥ येरीकडे लंकानाथ । राजा फार चिंताग्रस्त । अयोध्ये येउनीयां त्वरित । राजालयीं प्रवेशला ॥ २६ ॥ तों राम बैसले सिंहासनीं । भोंवत्या बंधूच्या श्रेणी[8] । दाटल्या असतां ते श्रवणीं । राक्षसराजा पातला ॥ २७ ॥ श्रीरामचरण देखतां दृष्टी । रावणानुजें घातली मिठी । रामें आलिंगुनी कंठीं । अति सन्मानें बैसविला ॥ २८ ॥ श्रीरामपदांब्ज[9]पराग । सेवी लंकेशनयनभृंग । तों मंद हास्यें जानकीरंग । निजभक्तासी अनुवादे ॥ २९ ॥ ह्मणें सोडोनी राजासन । दुरी केलें आगमन । वदन-चंद्रीं लांछनें[10] । घन चिंतेचें दिसतसे ॥ ३० ॥ सांग पां यासि कारण कोण । येरू बोले वंदुनी चरण । तुवां दिधलें लंकाधन । तें शताननें हरितलें ॥ ३१ ॥ शतमुख शृंगाल[11]दुराचरण । ऐकोनी श्रीरामपंचानन[12] । क्षोभला जैसा हुताशन[13] । शुषमे[14] इंधनीं स्पर्शता

५ अवसर=प्रसंग. ६ मौल–डोकें. ७ भद्रजाती=हत्ती. ८ श्रेणी=पंगती. ९ अब्ज=कमल. १० लांछन=डाग. ११ शृगाल=कोल्हा. १२ पंचानन=वाघ. १३. हुताशन=विस्तव. १४ शुषमे=पेटे.

॥ ३२ ॥ ते दिवशीं एकादशी । श्रीराम होते उपवासी । लोटली असतां प्रहर निशी । तेव्हां वदतसे प्रतिज्ञा ॥ ३३ ॥ उदया न येतां तँमारी । शतशीर्षासी मारूनी रात्रीं । तुतें स्थापुनी लंकापुरीं । पारणें करीन अयोध्ये ॥ ३४ ॥ साच न करीं जरी बोलणें । तरी माझ्या पूर्वजां उणें । ऐसें वदुनी रघुनंदनें । पूशिलें वास्तव्य त्याचें कोठें ॥ ३५ ॥ रावणानुज सांगे गोष्टी । क्षीरसिंधूच्या पैलतटीं । शोणितेच्या पैलतटीं । मायापुरीं वसतसे ॥ ३६ ॥ जाणोनी ते असाध्य मात । चिंता करी अयोध्यानाथ । म्हणे आमचें मनवृत्त । कैंवी पावे सिद्धीतें ॥ ३७ ॥ पश्चातापनदी आंत । श्रीराम वाहात वाहात जात । नारदागमन अकस्मात । विशाळ तँरू लाधला ॥ ३८ ॥ नमस्कारूनी देवमुनी । बैसविला [17]हेमपीठासनीं । ऋषि संतोषोनी सुधावचनीं । श्रीराम तो अनुवादे ॥ ३९ ॥ तव चित्तगंगाजळ । चिंता कँर्दमीं दिसतसे खडूळ । कोणत्या दुःखाचा विटाळ । पडला तूतें राघवा ॥ ४० ॥ भक्त कैंवारी लागून । दुर्जनाचें किजे हनन । या लागीं युद्धीं पण । त्यां आजी केला सर्वज्ञा ॥ ४१ ॥ तया प्रतिज्ञापर्वतातें । न उचलवे सामर्थ्यहस्तें । म्हणोनीयां माझ्या चित्तें । चिंतार्णवीं हिंडिजे ॥ ४२ ॥ ऐकोनि हांसे ब्रह्मतनय देखिलें महदाश्चर्य । * मृगांबुसरितापूरभयें । अगस्ति कांपे थरथरां ॥ ४३ ॥ तेंवी तूं गा सर्वेश्वरा । आचरतासी लौकिकाचारा । असो आतां हा विचार । सांगतों तें अनुष्ठीं ॥ ४४ ॥ जवळ हनुमंत असतां सुधा । कायशी चिंताक्षयरोग बाधा। ह्या ऐकुनी युक्ति शब्दा । रघुराज स्तवी कपीतें ॥ ४५ ॥ ह्मणे सप्ताब्धिगर्ता प्रवळा । उलंघवीं आह्मां पांगुळां । मायापुरीं राक्षसमेळा । शीघ्र दावीं लोचनीं ॥ ४६ ॥ आज्ञा करितां त्रैलोक्यपाळ । कपी वाटे जळा विशाळ । सप्त लोकां लाउनी मौळ । ठाकला मेरूसारिखा ॥ ४७ ॥ गर्जोनि बोले विश्रेयधामा । वोळंघिजे माझ्या शरीरँद्रुमा । परिवारेंशीं शतमुखग्रामा । आतां चि नेईन क्षणार्द्धे ॥ ४८ ॥ मग बिभीषण आणि ब्रह्मकुमर । बंधूसहित श्रीरामचंद्र । सर्वे घेउनी अपार वीर । कपीतनुपर्वत वळघले ॥ ४९ ॥ अंजनीतनयकायावरी । वीरनक्षत्रांचीया हारी । अवयवसंधीपर्वतागारीं । बैसते जाले समस्त ॥ ५० ॥ कपी वामचरण शरयूतीरीं । सव्य ठेवी मायापूरीं । समस्त उतरोनियां भूमीवरी । कंदनगोंधळा घालिती ॥ ५१ ॥ श्रीरामजगज्जननीचे भुते । पाजळोनी दीपिकापोत । वीरश्रीप्रेमें करूनी तृप्त । पट्टणचौका भोंवते ॥ ५२ ॥ जुंझार वीर अनेकी । सिंहनादाचे चौडकीं । गर्जोनीयां बोलती मुखीं । उदय श्रीअंबेचा ॥ ५३ ॥ कपीभुभुःकारसमेँळें । त्राहटिँलें कांपिनला भूगोळ । तो महाशब्दँव्याळ ।

---

१५ तमारी=सूर्य. १६ तरु=झाड. १७ हेम=सोनें. १८ कर्दम=चिखल. १९ अर्णव=समुद्र. * मृगांबु=मृगजल. २० द्रुम=झाड. २१ समेळ=एका वाद्याचें नांव. २२ त्राहटिलें =वाजविला. २३ व्याल=साप.

शीर्षकर्णी झोंबिला ॥ ५४ ॥ सावध होउनी निशाचर । पाचारूनियां समस्त वीर । ह्मणती शत्रुभूतसंचार । नरां वेष्टित दिसत आहे ॥ ५५ ॥ शीघ्र हाराव-यातें बांधा । तुह्मीं गेलें पाहिजे युद्धा । ह्मणे काळकेतु प्रबुद्धा ॥ प्रधानातें आज्ञा-पी ॥ ५६ ॥ शूर पंचाक्षरी काळिक । आंगबळें तो मांत्रिक । घेउनी महावीरांचें कटक । वैरियां उजू लोटला ॥ ५७ ॥ देखोनी श्रीरामसैन्यभूता । टाकिती श्रीबाणास्त्र-मंत्रा । येरी गणून निर्भयता । वैरियां उजू लोटती ॥ ५८ ॥ हनुमंत महाभूताका-र । देखोनी भ्याले निशाचर । काळकेतें धरूनियां धीर । युद्ध केलें सैत्राणें ॥ ५९ ॥ त्यांत श्रीराम महाकाळें । घालोनियां बाणजाळें । तनुजळाहूनी वेग-ळे । प्राण मत्स्य टाकिले ॥ ६० ॥ काळकेतक पावतां मृत्य । अंगलंग पळोन जात । शतशीर्ष मुख्यालागीं मात । सांग सांगितली युद्धाची ॥ ६१ ॥ म्हणती आम्ही वीर विखारी । वोंणरदें शत्रुजिव्हारीं । डंखिलें परी ते धन्वंतरी । शस्त्र-विष बाधूं नेदिती ॥ ६२ ॥ हें देखोनी महानट । उसळे जैं कालयकालकूट । त्यांत श्रीराम नीलकंठ । कोठोनी केले निर्माण ॥ ६३ ॥ वृत्तांतघृत श्रवणकुं-डीं । पडतां क्रोधाग्नि धडाडी । कुशब्दज्वाला मिती तोडी । रणांगणीं पातला ॥ ६४ ॥ देखोनी मानवांचे वृंद । शतमुखें केला सिंहनाद । मग अति दुर्बोध दुर्मदें । राघवा उजू तळपत ॥ ६५ ॥ सिंह भक्षावया मृत्यु फळे । जाले तुम्हासी डोहळे । कीं पाश घालोनी मृत्युकाळें । भेटावया आणिलें ॥ ६६ ॥ तुटली आयुष्याची दोरी । मृगें शिरती शबैरघरीं । सिंह वसे त्या कांतारीं । गजभार येतां चरावया ॥ ६७ ॥ रामा नोहे हे लंकापुरी । प्रत्यक्ष काळ व्याघ्राची दरी । येथें तुम्हीं मानववीरीं । येइजे हें अपूर्व वाटे ॥ ६८ ॥ दवडावया प्राण-दैना । मागों आलेती मरणधना । तरी स्वहस्तकीं मृत्युदाना । देतसें तुम्हां सक-ळांतें ॥ ६९ ॥ ऐसें बोलोनी दुराचारी । वर्षों लागला खदिरांगारीं । ते लागो-नी सर्व शरीरीं । रामसेना पोळली ॥ ७० ॥ घायें परिवार जाला भस्म । अरी वर्म देखोनी मेघश्याम । शरधारांचे अपार स्तोमें । शतमुखक्षितीं रिचवीत ॥ ७१ ॥ बाणसर्प सोडी उदंड । तितुके खंडी निशाचरगरूड । राम शर वर्षला उदंड । प्रळय रुद्रा सारिखा ॥ ७२ ॥ परीवर्जताराची हारी । पास्ते पाडती वदनागारीं । शतमुखवन्ही कुंडामाझारी । सायकतृणें भस्मती ॥ ७३ ॥ आश्चर्य करती अंग-लंग । विश्वतश्चक्षु जाला दंग । तों नारद म्हणे प्रयोग । असे याचा निराळा ॥ ७४ ॥ तुजसारिखे जगजीवना । जेथुनी अवतार निघती नाना । आनंद

---

२४. केत=केतु=निशाण. २५. सत्राण=जोर. २६. विखारी=साप. २७. रद=दांत. २८. जिव्हार=मर्मस्थान. २९. धन्वंतरी=वैद्य ३०. कालकूट=विष. ३१. शबर=भिल्ल. ३२. कांतार=रान. ३३. भार=जमाव. ३४. स्तोम=जमाव. ३५. विश्वतश्चक्षु=सर्व पहाणारा=राम.

ब्रह्मांडाची रचना । संकल्पमात्रें संभवे ॥ ७५ ॥ ते आदिशक्ति चिरंज्योती । जाळील शतमुखकर्पुराप्रती । राघव म्हणे तये वस्ती । आकाश येणें अघटीत ॥ ॥ ७६ ॥ वर्म नेणे रघुपती । ते चिज्ज्योती जानकी सती । तिंते आणोनी शीघ्रगती । नमस्कारूनी प्रार्थीं कां ॥ ७७ ॥ मुनिवचनोवितषीयूँषपान[36] । घडतां तोषला राजीवैंनयन[37] । कपींद्रातें कर जोडून । विनयशब्दें अनुवादे ॥ ७८ ॥ आम्हां सहित वानरां । आपे शक्तीनें खेळापुरा । तरी जीव वांचवावे त्वरा । त्वां केली पाहिजे ॥ ७९ ॥ अयोध्ये जाउनी पवनबाळा । आणीं जानकी–द्रोणाचळा । आज्ञा होतां चरणकमळा । आकर्षिलें माघारें ॥ ८० ॥ शतमुख मांडुनीयां ठाण । अपार करी शरसंधान । तें वारीत रघुनंदन । रणांगणीं उभा असे ॥ ॥ ८१ ॥ येरीकडे अयोध्यापुरीं । सीता निद्रिस्त निजमंदिरीं । देखोनी कपी मनसागरीं । युक्तिमुक्ता धुंडीत ॥ ८२ ॥ म्हणे करितां शब्दघोष । निद्राभंगाचा घडेल दोष । स्वामीकांतेतें करतां स्पर्श । कामा नये सर्वथा ॥ ८३ ॥ म्हणोन उर्वीतें उकरोन । मग तो हनुमंत श्रीकृष्ण । उचलों जातां गोवर्धन । उचलोनी घेतला कराग्रीं ॥ ८४ ॥ कपीहस्त ते भागीरथी । वरी सदननाव सीतासती । कीं कँर[38] आकाशीं गृह इंदु दीप्ती[39] । माजी जानकी सँतरावी[40] ॥ ८५ ॥ असो तो कपींद्रसुपर्ण । करपृष्टी क्षितिजा नारायण । घेउनी रणसरोवर स्थान । एकेची पाउलें पातला ॥ ८६ ॥ घाबरा रघुनाथगजेंद्र । जाचीतसे शतमुखँनक्र[41] । ते काळीं सीताश्रीधर । भक्तधावण्या धांविनला ॥ ८७ ॥ धाँम[42] ठेउनीयां अँवनी[43] । हनुमंत म्हणे कोदंडँपाणी[44][45] । निद्रिस्त देखोनी जगज्जननी । मंदिरासहित आणिली ॥ ८८ ॥ ऐकोनी श्रीराम उतावेळ । प्रवेशले सदन देऊळ । वोवरीचितूं रक्तकोळ । देखते जाले लोचनीं ॥ ८९ ॥ स्वप्न जाँगृती[46] उपाधी । सेवितसे जगदानंदी । निरखुनी सुँषुप्ति[47] समाधी । मुळीं कां पिटील हस्त ॥ ९० ॥ जाणोनी श्रीराम महेश्वरें । करटाळीच्या हस्तमंत्रें। श्रवणा निकटीं बीजोच्चारें । पुरश्चरण मांडिलें ॥ ९१ ॥ आत्मा नेउनी ब्रम्हांडकमळीं । सीता योगिनी पँहुडली[48] । जाणोनी रामटाळी पावली । श्रोत्रमस्तकीं चर्चित ॥ ९२ ॥ साचळ सजळ घन गर्जतां । झळकली जागृती विद्युल्लता । मग मूळँपीठींची[49] देवता । खडबडोनी उठली ॥ ९३ ॥ सन्मुख पाहे रघुनंदन । म्हणे देखतें काय स्वप्न । मायापूरा गेले रमण । अयोध्येमाजी मी असें ॥ ९४ ॥ केवढी हे दुर्धर भ्रांती । सा-

---

३६. पीयूष–अमृत. ३७. राजीव=कमल. ३८. कर=हात. ३९. दीप्ति=चंद्राची कला. ४०. सतरावी=१७वी कला (चंद्राची). ४१. नक्र=सुसर. ४२. धाम=घर (धाम= Domus Latin). ४३. अवनी=पृथ्वी. ४४. कोदंड=धनुष्य. ४५. पाणी=हात. ४६. जागृती=जागेपणा. ४७. सुषुप्ति=झोंप. ४८. पहुडली=निजली. ४९. पीठ=आसन.

च चि दिसे रघुनाथ मूर्ती । किंवा संकट पडलें पती । ह्मणोनी स्वप्नीं दिसत आहे ॥ ९५ ॥ रघुनाथ म्हणे हें मायापुर । मीं साच कौशल्याकुमर । युद्धीं संकट पडलें थोर । म्हणोनी तुम्हांसी आणिलें ॥ ९६ ॥ असंख्य माझे बाणभार। गिळीत शतमुख अजगर । जैसा जळचरां राक्षसढिवर । उचलों नेदी मस्तक ॥ ॥ ९७ ॥ निशाचरम्हैसा येई क्षिती । जिणोनी गांजिल्या सैन्यपंक्ती । तें तुवां परंज्योती । सामर्थ्य मूळ निवटावें ॥ ९८ ॥ आतां न लाउनी उशिरा । निधन मद्य शतशीर्ष असुरा । कीं अमृतपान आम्हां सुरां । जगन्मोहनी वाढीं कां ॥ ॥ ९९ ॥ यापरी वृत्तांत श्रवण स्तवन । करूनियां स्तुती पूजन । वर्णोपचार मेळवून । सांगोपांग मांडीले ॥ १०० ॥ हरिहराचें ध्यान मूर्ती । जय जय चिद्रूप मूळशक्ती । जय जय अनादिशक्ती । परात्परे तूज नमो ॥ १ ॥ ब्रह्मांडघट प्रसवती धरे । जय जय अरूप लावण्य त्रिपुरे । जय जय निर्गुणबीजाकारे । अजरामर तुज नमो ॥ २ ॥ समाप्त होतां स्तुति पूजन । नैवेद्य अर्पिला धनुष्यबाण । साष्टांग घालोनी लोटांगण । कृपा करीं म्हणतसे ॥ ३ ॥ ते देखोनी भक्ति अनन्यता । संतुष्ट जाली जगन्माता । ह्मणे उगऊं नेदी सामर्थ्यसवितौ । निशाचरतमनाशिनी ॥ ४ ॥ ऐसे बोल बोले महाशक्ती । आली रणभूमी भोंवती - चौभुजांची आकृती । धरती जाली भ्यासूर ॥ ५ ॥ पाशांकुश धनुष्यबाण - करीं वसवी तों रणस्फुरण । पातलें तें वज्रठाण । मांडोनियां ठाकली ॥ ६ ॥ मग संहारवन्हीची ज्वाळा । दीर्घ वाढली अंतराळा । राक्षसकुळप्रळयजळा । शोषावया लागोनी ॥ ७ ॥ ब्रह्मांडाशीं महदाकाश । गिळी ऐसा अद्भुत वेश । देखोनी त्रास पावे शेष । सुरवर चळचळा कांपती ॥ ८ ॥ शतमुख लक्षुनीयां सन्मुख । कौंर्मुकीं एक ची सौंयक । लाउनी सोडितां एक एक । प्रसवुनी जाले शतवरी ॥ ९ ॥ झगटोनी शतकंदरीं । शिरें उडविलीं गगनोदरीं । गरगरां भोंवोनी अँबँरीं । पुनरपी पाडिला अँवनिये ॥ १० ॥ चाप मंत्रोनी यंत्रगोळ । उलटोनी केलें एक मौळ । पडतां राक्षस प्राण जळ । आटोनी गेलें निःशेष ॥ ११ ॥ भ्यासूर राक्षस कैंलेवर । अंकुशें केलें शत जर्जर । अंगलंग निशाचर । मारूनी केले निर्बीज ॥ १२ ॥ मायापुरीं अक्षोभजळें । पोशिलीं होतीं शतमुखकमळें । ती चापशरकरांगुळें । सीतादेवी धुंडाळी ॥ १३ ॥ अंबरीं तोषोनी सुरवर । भूतळीं सांडिती पुष्पभार । सकळां मुखीं जयजयकार । घोष झाला ते काळीं ॥ १४ ॥ मग जनकजा परब्रह्मशक्ती । परिमार्जुनी दीर्घाकृती । येउनीयां पूर्वस्थितीं । रघुनाथ अंकीं आरूढली ॥ १५ ॥

---

५०. सविता=सूर्य. ५१. कार्मुक=धनुष्य. ५२. सायक=बाण. ५३. अंबर=आकास. ५४. अवनि=पृथ्वी. ५५. कलेवर=शरीर.

भूरमा गंगा विशाळरूप । उपमा येतां दिसे स्वल्प । योगमायेची लीला अमुप । ब्रह्मादिकां नानुमाने ॥ १६ ॥ विशाळ रूप नग अनेक । आटोनी पूर्वाकृती कनक । सीता होतां रविकुळटिळक । लंकापुरीं चालिले ॥ १७ ॥ कपीतनु-जाहाजीं सहपरिवार । बैसतां ची जलधिजावर । आज्ञावातें करूनी शीघ्र । मार्ग अंबुधी लंघिला ॥ १८ ॥ हनुमंतें चरणमंदरगिरी । वंदुनी श्रीराम आज्ञा शिरीं । लंकाक्षीराब्धीच्या तीरीं । उचलोनियां ठेविला ॥ १९ ॥ एका पदें लंकाद्वारीं । कपी प्रविष्ट जालिया वरी । तळीं उतरोनी समस्त वीरीं । पौंड्रक आणिला ध-रोनी ॥ २० ॥ त्याचा करावा जों घात । तंव तो म्हणे मी शरणागत । हें ऐकोनी जनकजाकांत । राक्षसातें रक्षीत ॥ २१ ॥ पितामहबंधु अनुदिन । होउनी पाळी आमुच्या वचना । हें ऐकोनी श्रीरघुनंदना । पौंड्रक नमी सद्भावें ॥ २२ ॥ अवलोकोनी कृपादृष्टी । बिभीषण स्थापिला राज्यपीठीं । येरीं जोडि-ल्या करसंपुटीं । राघवा नमिलें साष्टांगीं ॥ २३ ॥ मग परिवारेशीं कौशल्या तनय । वळंघे कापिकायाहय । अयोध्यापुरीं वेगीं जाय । निमिषार्ध न लागतां ॥ २४ ॥ कपिचरण उभयसरिता । शरयूतीरीं संग होतां । अवलोकोनी त्रिवेणी सरिता । रामसेना उतरली ॥ २५ ॥ जिरउनी ब्रह्मद्रोही सर्व । हनुमंत आला यथापूर्व । आज्ञा घेऊनीयां सर्व । जाते जाले स्वस्थळा ॥ २६ ॥ श्रीराम प्रवेशले राउळ । होता जाला प्रातःकाळ । स्नान करूनी उतावेळ । जप जाप्य कर्म स्थापिलें ॥ २७ ॥ पंक्ती घेउनी द्वीजोत्तमासी । साधनी साधली द्वादशी। भोजन करूनी सुखैकराशी । सिंहासनीं बैसले ॥ २८ ॥ श्रीरामप्रतिज्ञा द्राक्षावल्ली । कपितनुमंडपीं विस्तारली । शक्ति सामर्थ्य पीयूष फळीं । सत्कीर्ति-घोंस प्रसवली ॥ २९ ॥ हनुमंतनाटकींची कथा । महाराष्ट्रभाषा यथार्थ उल्था। विश्वंभर जाला वक्ता । मुक्तेश्वर अनुवादे ॥ १३० ॥ इति श्रीहनुमंतनाटकांत-र्गत शतमुखरावणमर्दन संपूर्ण ॥

---

## पांडुरंगकृत नारायणराव पेशवे यांचें चरित्र.* ( ओवीबद्ध. )

वंदूनी आधीं श्रीगजानन । चौदा विद्यांचें जें निधान । हरिहर ब्रह्मा चतुरानन । नमन करितो तयांचें ॥ १ ॥ पेशव्यांचे वंशीं वीर । एका पेक्षां एक धीर । धीर मानव वीर । क्षत्रिय ऐसे जन्मले ॥ २ ॥ बाजीराव मोहरा सुंदर । चिमाजी आप्पा सहोदर । मोठा कठीण काहार । राज्य केलें वक्रानें ॥ ३ ॥ त्याचे पुत्र धुरंधर । नाना भाऊ बंधु थोर । अवतरले जगदीश्वर । गोब्राम्हणरक्षणार्थ ॥ ४ ॥ [1]मन्मथ स्वरूप रवितुल्य । दान धर्म कनकातुल्य । देवालयें आणि पूल । ठांयीं ठांयीं बांधिले ॥ ५ ॥ संतति संपत्ति आणि उल्हास । बहुतां परी भोग विलास । रिद्धिसिद्धिवाल्यास । उपमा द्यावी कोणती ॥ ६ ॥ बाजीराव याचा धाकटा सुत । त्याचें ऐकावें कौतुक । पहिल्या पासून प्रकत । होती ऐसी तयाची ॥ ७ ॥ विश्वासराव भाऊसाहेबास । ते हि राहिले पानपतास । त्याचे काळजीनें उदास । मन जाहलें बहुतांचें ॥ ८ ॥ सर्व संपत्ति करून त्यागास । नाना गेले कैलासास । राघोबा दादा त्या समयास । राज्यासनीं स्थापियले ॥ ९ ॥ माधवराव यांनीं केलें राज्य । नाना मागें साम्राज्य । शरिरभोगें केलें काज । म्हणोन देह त्यागिला ॥ १० ॥ राज्यकारभार चालवायासी । स्थापूनि नारायणरायासी । राघोबा दादा त्या समयासी । आणखी होते मुत्सदी ॥ ११ ॥ राव विष्णूचा अवतार । त्याचा पराक्रम फार । कलियुगीं साचार । महा दुष्ट जाणती ॥ १२ ॥ कैलासीं गेले माधवराव । त्यांचे मागें नारायणराव । त्यांचा ऐकावा अभिप्राय । जो कां सकळीक ॥ १३ ॥ अहो शिक्केकट्यार । दिल्हा राज्याचा अधिकार । वस्त्र भूषणें अलंकार । दिल्हीं पेशव्यांचीं ॥ १४ ॥ राज्य करी एक निष्ठ । जो कां असे कर्मनिष्ट । सभाश्रित पंडित शिष्ट । ब्राह्मण गृहीं असती ॥१५॥ राज्यादिकांचा कारभार । सखाराम बापू कुलअखत्यार । हरिपंतावरी प्यार । तो कां मित्र जिवाचा

---

* या ग्रंथाच्या दोन प्रति आमचे जवळ आहेत. पैकीं एक खर्ची २७ बंदांवर लिहिलेली आहे व दुसरी काळ्या पातळ फुलस्केप कागदाच्या १० बंदांवर लिहिलेली आहे. दोहोंची लिपि मोडी असून बंदांच्या एका बाजूस मात्र लिहिलेलें आहे. खर्ची बंदांवरची बखर शके १७६२ शार्वरी नाम संवत्सरीं फाल्गून वद्य १३ मंदवारीं तिसरे प्रहरीं लिहून समाप्त जाली असा तिचे शेवटीं लेख आहे. फुलस्केप बंदांवरची बखर शके १७८३ दुर्मती नाम संवत्सरीं श्रावण शु० १३ रविवारीं सायंकाळीं समाप्त जाली असा तिचे शेवटीं लेख आहे. हिचें हस्ताक्षर गणेश भिकाजी भुसकुटे राहणार मु० पुणें पेंठ शनिवार ओंकारेश्वरानजिक केळकरांचे वाड्यांत राहणार यांचें आहे. १. मन्मथ=मदन.

॥ १६ ॥ अहो **नाना** **फ**डनीस । आले **रा**याचे मर्जीस । कारभारी वांकनीस । ज्याचा बंदोबस्त बहुत असे ॥ १७ ॥ **ह**रिश्चंद्र जैसा वीर । तैसे ते कां सत्वधीर । जे कां उदार गंभीर । कर्णाचिये सारिखे ॥ १८ ॥ नित्य करिती दान धर्म । स्नानसंध्यादि षट्[२]कर्म । काम क्रोधादि काम । ज्यांचे शरिरीं न राहे ॥ १९ ॥ अखंड **दे**वाचें भजन । नित्य करिती **वि**ष्णू पूजन । शालिग्राम देवतार्चन । जो कां ब्राम्हणभक्त तो ॥ २० ॥ त्याचें स्वरूप सुंदर । जैसा उगवे [३]भास्कर । मी वर्णू कोठवर । जैसा दुसरा मन्मथ ॥ २१ ॥ तैंवी ही शोभा सुलक्षण । त्याची बुद्धि विलक्षण । करी ब्राम्हणसंरक्षण । आणखी प्रजापालन तें ॥ २२ ॥ **बा**जीरायाचा पुत्र । तेणें केलें कलहसूत्र । **दा**दा जाणते सपुत्र । तपश्चर्येचे बळें ॥ २३ ॥ मग गेले **आ**नंदवल्लीस । लागूनि लेकांचे बुद्धीस । नाहीं गेला तो सिद्धीस । मग त्यांचा मनसोबा ॥ २४ ॥ फौजा तमाम धरोन । **मा**धवराव यासी बोलावून । युद्ध केलें दारूण । शेवटीं आलें अपयश ॥ २५ ॥ तेथें दगा देऊन । सरदार गेले पळून । किल्यावरते चढून । मग केली बळकटी ॥ २६ ॥ नाहीं कोणी दुसरा साह्य । तेथें न चाले उपाय । फत्ते केली लवलाय । किल्ल्याखालीं उतरविले ॥ २७ ॥ **रा**व घेऊनि **दा**दास । मग हो आले **पु**ण्यास । आणूनि वाड्यामध्यें त्यांस । मग केली बळकटी ॥ २८ ॥ मनीं धरूनि तो च राग । केला संपत्तीचा त्याग । अनुष्ठान यथासांग । आराधना **सू**र्याची ॥ २९ ॥ पुत्र **ना**नाचे जाण । त्यांचें ऐकावें वर्तमान । दोघे अवतार समान । जैसे **रा**मकृष्ण ते ॥ ३० ॥ ज्याचा पुण्यप्रताप । सुटे बहुतांसी कांप । शरण गेलिया करिती माफ । त्याच्या दहशतीनें ॥ ३१ ॥ **मा**धवरायाचें पुण्य । कोठें न पडे कांहीं न्यून । किती आठविती अझून । तैसा नाहीं होणार ॥ ३२॥ दुर्जन खळांते नासून । काया कष्ट ते सोसून । **ना**ना गेल्या पासून । राज्य त्यानें राखिलें ॥ ३३ ॥ **थे**ऊराचे मुक्कामास । बोलावूनि त्या दादास । दिल्हें हातीं **रा**यास । राज्य सुखी करावें ॥ ३४ ॥ सर्व मुत्सदी मिळून । केलें **बा**पूसी दिवाण । **ना**रायणरायासी जाण । **बा**पूसी फार निरविलें ॥ ३५ ॥ हें असे अज्ञान बाळ । तुम्ही करावा प्रतिपाळ । नानापरि सांभाळ । तुम्ही आधीं करावा ॥ ३६ ॥ **र**माबाई वारंवार । निरवी **दा**दासी फारफार । तुम्हाविण दुसरा आधार । नाहीं याजला कोठें तो ॥ ३७ ॥ सांगून गेले **कै**लासास । विसरून रायाचे दुःखास । त्याचे मागें नवमास । राज्य केलें चांगलें ॥ ३८ ॥ **ना**रायणराव **मा**धवराव । दोघे होते बंधु राव । त्यांचे दहशतीनें काय । फितूर कोणाचा न चाले ॥ ३९ ॥

---

२. षट्कर्मे=अध्ययन, अध्यापन, दान, प्रतिग्रह, यजन, याजन हीं सहा कर्मे. ३. भास्कर=सूर्य.

राव वर्ती गेल्यावर । नाहीं दुसरा पाठीवर । राहिला एक संवत्सर । ज्याचें वय लहान तें ॥ ४० ॥ राव विनवी दादास । आतां सोडूनि रागास । राज्य आणूं रंगास । तुम्ही आम्ही मिळून ॥ ४१ ॥ न करावें अनुचित । तुम्ही आम्ही एक चित्त । करून आपलें स्वहित । दोघे असूं एक मतें ॥ ४२ ॥ ऐसा सांगूनि अभिप्राय । गंगापुरा गेले राय । तरी दादाचा हा भाव । राज्य मी च करावें ॥ ४३ ॥ मग रचून फितुरास । कागद पाठविले हैदराबादेस । ती तों बातमी रायास । अवघी कळली यथास्थित ॥ ४४ ॥ जाहाला चित्ताचा विक्षोभ । पुण्यास आले तावडतोब । मनीं धरूनि तो च क्षोभ । बंदोबस्ती केली ती ॥ ४५ ॥ तें तों विघ्न निवारून । बंदोबस्ती हो करून । फितुरवाले धरून । किल्ल्यावरती घातले ॥ ४६ ॥ नाहीं केला विवेक । करूनि कारखाना एक । सभोंवते गारदी लोक । खडे पाहरे करविले ॥ ४७ ॥ क्रोधें आक्रांतून जिवास । दादा करी उपवास । खेद जाणून चित्तास । तपश्चर्या केली ती ॥ ४८ ॥ तपश्चर्या अनिवार । केली दादांनीं फार फार । म्हणती हा शिव अवतार । दादा तो कां क्षोभला ॥ ४९ ॥ तप केलें भोगून क्लेश । नाहीं पापाचा लवलेश । पुण्य जाहलें विशेष । संकट पडलें देवाला ॥ ५० ॥ होता दादाचा हेत । राज्य करीन हाच बेत ॥ म्हणोन देवानें हा हेत । त्याचा तो कां पुरविला ॥ ५१ ॥ भोगूनियां तपास । कैसें करविलें पापास । ब्रह्महत्यादि दोषास । त्याचे मागें लाविलें ॥ ५२ ॥ देव मोठा चतुर । कैसा करविला फितुर । लिहून आपलें स्वदस्तूर । दिल्हे कागद दादांनीं ॥ ५३ ॥ मोक्षपद प्राप्त त्यास । नऊ लक्ष रुपये पगार गारद्यांस । आणखी देऊन किल्ल्यास । केले ते कां संतुष्ट ॥ ५४ ॥ देऊन रुपये केले संतुष्ट । जे कां मिळोन खळ दुष्ट । कैसी पडली ही जूट । ऐसे महा घातकी ॥ ५५ ॥ खरगसिंग जमादार । जुना चाकर करार । सुमेरसिंग निर्धार । महा खळ दुरात्मा ॥ ५६ ॥ गारदीयांचा कुळअखत्यार । महंमद इसफ सरदार । आणखी तुळाजी पवार । तो कां त्यांसी मिळाला ॥ ५७ ॥ ज्याचे खादलें अन्नास । फिरून पडले हो त्यास । जन्मोजन्मीं नरकवास । कदाकाळीं चुकेना ॥ ५८ ॥ असे गारदी महा खळ । कैसा साधूनियां वेळ । जैसे ते काग तात्काळ । तैसे ते कां धांवले ॥ ५९ ॥ सकाळीं राघोजी आंग्र्यास । गेले होते भेटावयास । दोन घटका दिवसास । गेले होते स्वारीला ॥ ६० ॥ आले त्यास भेटून । देवीचें दर्शन घेऊन । आले पर्वतीहून । लवलाहें वाड्यांत ॥ ६१ ॥ उशीर जाहला स्नानास । लौकर बसले भोजनास । मेजवानी गोसाव्यांस । उद्यां करूं म्हणोन ॥ ६२ ॥ जेवते वेळेस गुणगुण । कळली राया लागोन । हरिपंताला बोलावून । म्हणती आणावें मनास ॥ ६३ ॥ बोले हरिपंत

उत्तर । जेऊनियां आलिया नंतर । गोष्ट गेली आळसावर । नाहीं केला शोध तो ॥ ६४ ॥ जाणून विकल्प चित्तांत । राव गेले महालांत । परी लिहिलें प्रारब्धांत । कदां काळीं चुकेना ॥ ६५ ॥ पुरती बातमी घेऊन । राव निजले जाऊन । तुळाजीनें जाऊन । गारद्यांस कळविलें ॥ ६६ ॥ अशी सांगूनिया खबर । उठा म्हणती लवकर । तुमचा फितूर सविस्तर । कळला आहे वाड्यांत ॥ ६७ ॥ लाग करा अशांत । नाहीं तर पडाल फाशांत । अवघ्या गोष्टी तशांत । त्या ही जाहल्या अनुकूळ ॥ ६८ ॥ घेऊन सामान खबरदार । जाहले गारदी तयार । सुमेरसिंग जमादार । तो कां पुढें चालला ॥ ६९ ॥ जाहले गारदी उतावीळ । होती जेवावयाची वेळ । दिल्ली दरवाज्याजवळ । येऊन ते कां ठेपले ॥ ७० ॥ चौकीदार होते दरवाज्यांत । नका जाऊं म्हणती वाड्यांत । हजीरी साठीं आम्ही आंत । जातों असें बोलले ॥ ७१ ॥ जाऊं न देती चौकीदार । तेथें उपसोनियां तरवार । बुधसिंग जमादार । तो कां तेथें तोडिला ॥ ॥ ७२ ॥ ऐसी देखून मारामार । पळाले ते कां चौकीदार । आला गारद्यांचा भार । जिकडे तिकडे पळाले ॥ ७३ ॥ ठीक दोन प्रहरांत । करोनियां विश्वासघात । गारदी शिरले वाड्यांत । नाहीं खबर कोणासी ॥ ७४ ॥ हत्ती आंत यावयास । मोठा उंच करावयास । म्हणोन पाडिलें दरवाज्यास । शायानीं तो कां ऐका हो ॥ ७५ ॥ त्या दरवाज्यावरून । गारदी गेले चढून । सफेलीवर चढून । वाडा तो कां बळकाविला ॥ ७६ ॥ गारदी मोठे अनिवार । करूं लागले मारामार । सन्मुख भेटला तो ठार । जिवें मारूं लागले ॥ ७७ ॥ इच्छारामपंत पागा हुजुर । जो कां अवघ्यांत महाशूर । येत होता काम जरूर । शायापाशीं जाण तो ॥ ७८ ॥ तुळाजी बोले गारद्यांस । मारा रे या गुलामास । कैसी करुणा देवास । नाहीं आली तयाची ॥ ७९ ॥ हाणूनियां तरवार । होता गाईचा आधार । म्हणूनियां आड मोहरे । तेथें तरी वांचेना ॥ ८० ॥ नाहीं पाहिलें विचारून । जिवें गाईस मारून । तेथें पाडिला तोडून । इच्छाराम पंत तो ॥ ८१ ॥ मोठी गडबड देखून । गारदी आले धाटून । आबाजीपंत उठोन । गेला कवाडें लावावया ॥ ८२ ॥ गारदी बोले दीन दीन । कवाडें लावितां तोडीन । आली वेळ कठीण । ठार तेथें पाडिला ॥ ८३ ॥ नवल जाहलें विख्यात । मारामारी वाड्यांत । खबर दिवाणखान्यांत । गेली शायापाशीं ती ॥ ८४ ॥ उठा म्हणती शायास । नाहीं वाट जाण्यास । गारदी आले मारावयास । गारदी आले चहूंकडे ॥ ८५ ॥ जवळ नाहीं चोपदार । नव्हती एक ही तरवार । चापाजी खिसमतगार । होता जवळ एक तो ॥ ८६ ॥ शायाला तो नाहीं धीर । पडली मोठी फिकीर । नव्हते सदर बारगीर । केले दूर बापूंनीं ॥ ८७ ॥ होता डोईस फेटा ।

अंगावरती दुपेटा । गारद्यांनीं वाटा । धरल्या त्या चहुंकडे ॥८८॥ जिकडे तिकडे होते स्वस्थ । कांहीं नव्हता बंदोबस्त । खरगसिंगानें समस्त । कवाडें तीं कां लाविलीं ॥ ८९ ॥ नावें म्हणे कोठें राव । नाहीं दुसरा उपाय । आतां दादा शिवाय । आश्रा नाहीं कोणाचा ॥ ९० ॥ पुरतें चित्तीं विचारून । बरोबर शिप्या घेऊन । मग देवघरांतून । दादाकडे निघाले ते ॥ ९१ ॥ करिती गारदी बेफंद । जिकडे तिकडे कवाडें बंद । कैसें साधिलें हें द्वंद । त्या हो खरगसिंगानें ॥ ९२ ॥ मग एक्या दारांतून । तेथें कवाडें मोडून । बरोबर शिप्या घेऊन । आले माडी वरते ते ॥ ९३ ॥ लागला दादाचा निजध्यास । चुकावून गारद्यांस । लक्ष्मणभट्ट उपाध्यास । घेऊन ते कां चालिले ॥ ९४ ॥ गारद्यांनीं दाणादाण । मारामारी हाणाहाण । राव कोठीच्या जिन्यानें । दादाकडे चालिले ॥ ९५ ॥ जाऊन दादांचे महालांत । धरिला रायानें हात । गारद्यांनीं वाड्यांत । मोठा आकांत मांडिला ॥ ९६ ॥ तुम्ही केला हा फितूर । गारदी मारती निष्ठुर । याजकरितां जरूर ॥ तुम्हापाशीं आलों कीं ॥ ९७ ॥ राव बोलवी दादास ॥ दादा उठले शोध करावयास ॥ ही बातमी गारद्यांस ॥ मागो माग आली ती ॥ ९८ ॥ मारामारी करीत ॥ जवळ आले त्वरित ॥ जैसा वाघ गुरगुरत ॥ ती हो गाय देखोन ॥ ९९ ॥ गारदी आल्यानंतर ॥ दादा न बोले उत्तर ॥ कैसें पडलें हें अंतर ॥ तेव्हां मनीं खोंचले ॥ १०० ॥ नागव्या तरवारी घेऊन ॥ गारदी आले चढून ॥ मग दादाशीं जाऊन ॥ मिठी घातली रायांनीं ॥१०१॥ राव विनवी दादास ॥ तुम्ही समजावा गारद्यांस ॥ जें मागतील तें त्यांस ॥ देऊन वाटे लावावें ॥ १०२ ॥ आम्ही गरीब ज्वान ॥ द्यावें मजला जीवदान ॥ मजला कैदेंत घालोन ॥ तुम्हीं सुखें करावें राज्य ॥ १०३ ॥ करा राज्याचा कळस ॥ केला दादानीं आळस ॥ सुमेरसिंग ते वेळेस ॥ जाहला निष्ठूर मारावया ॥ १०४ ॥ देखोन गारद्यांचा भाव ॥ न सोडी दादाशीं राव ॥ घाली तरवारीचा घाव ॥ सुमेरसिंग तेधवां ॥ १०५ ॥ काय पाहतोस म्हणून ॥ तुळाजीनें जाऊन ॥ आणिलें रायास ओढून ॥ तेव्हां गेली शुद्धि ती ॥ १०६ ॥ संकट देखोन अनिवार ॥ बोले चापाजी खिसमतगार ॥ लहान लेकरूं सुकुमार ॥ करूणा येऊं द्या कांहीं हो ॥ १०७ ॥ न ऐके सुमेरसिंग ॥ मारूं लागला निःसंग ॥ जवळ होता खरगसिंग ॥ त्याणें घर घेतलें ॥ १०८ ॥ होऊन सुमेरसिंग उदास ॥ जाहला निष्ठूर मारावयास ॥ मग धरिलें रायास ॥ चापाजीनें जाऊन ॥ १०९ ॥ धन्य चापाजी खिसमतगार ॥ जाहला जिवावर उदार ॥ तेथें पडिला तो ठार ॥ जो कां रायापाशीं तो ॥ ११० ॥ जन्मा येऊन सार्थक ॥ दुसरा नारोबा फाटक ॥ एका वारानें मस्तक ॥ उडवून तेथें पा-

दिला ।। १११ ।। मग न धरी कोणी धीर ।। पडला रायावरता मार ।। हाणले वारावर ते वार ।। त्या हो खरगसिंगानें ।। ११२ ।। पृथ्वी समुद्र वलयांकित ।। ज्याचे असोन अंकित ।। नाहीं मारावयाची क्षीत ।।हा धर्म कलियुगींचा ।।११३।। मारून नारायण रायास ।। कैसा घातला हा फांस ।। हा हो त्याणें केला नाश ।। कैसा केला कुलक्षय तो ।।११४।। माता कापी बाळकास ।। कोण रक्षील हो त्यास ।। तैसी गती रायास ।। तेव्हां केली दादानें ।। ११५ ।। युद्धाठायीं अभिमन्यूस ।। करून वेगळें पांडवास ।। चक्रविभूमध्यें त्यास ।। कपटें करोन मारिलें ।। ११६ ।। तैसें केलें यथार्थ ।। तेथें न चाले पुरुषार्थ ।। केला दादानीं हा स्वार्थ ।। त्या कां राजपदाचा ।। ११७ ।। बाळ सुकुमार केवळ ।। नव्हती जागा निर्मळ ।। शव मोरीच्या जवळ ।। पडले होते तेव्हां ते ।। ११८ ।। करून रायाचें काम ।। असें पाहिलें आराम ।। करून दादास सलाम ।। सदरे वरते आणिलें ।। ११९ ।। लूट गारदी यांनीं केली फार ।। नाहीं सोंवळ्याचा विचार ।। कशाचा ही नाहीं सुमार ।। जोड्यासहित फिरले ते ।। १२० ।। गारदी यांणीं अकस्मात ।। तांब्ये सोंवळें धोत्र पात्र ।। नाहीं ठेविलें तिळमात्र ।। नेलें त्यांनीं सर्व ही ।। १२१ ।। केले गारद्यांनीं वेडेचार ।। त्यांचा न वर्णवे विस्तार ।। नाहीं ठेविला आचार ।। केली त्यांणीं शिवाशिव ।। १२२ ।। सर्व जागा विटाळून ।। लुटालुटी हो करून ।। नाहीं पाहिलें विचारून ।। हौदामध्यें थुंकले ।। १२३ ।। आतां मी वर्णू कोठवर ।। दादा होते सदरेवर ।। सुमेरसिंग जमादार ।। आणखी होते गारदी ।। १२४ ।। नाहीं मनामध्यें खेद ।। वाजविती नौबद ।। करिती गारदी आनंद ।। द्वाही फिरवून दादांची ।। १२५ ।। कळली बातमी तहकीक ।। जासूद नारोजी नाईक ।। येऊन दादाशीं ठीक ।। त्याणें केला जाबसाल ।। १२६ ।। काय कीर्ति हे लोकांत ।। केला कुळाचा घात ।। टाकिला गारद्यांनीं हात ।। इशारत होतां ती ।। १२७ ।। नाहीं गारद्यांला धीर ।। उडविलें नारोजीचें शीर ।। नाहीं लागला उशीर ।। गेला त्याचा प्राण तो ।। १२८ ।। जाहली वाड्यामध्यें धूम ।। बाहेर केली सामसुम ।। एकाएकींच धूम ।। लोक पळूं लागले ।। १२९ ।। विचारती एकमेकास ।। नाहीं कळलें कोणास ।। वाड्यापाशीं आसपास ।। माणूस तेथें ठरेना ।। १३० ।। गारदी मोठे अनिवार ।। करिती बंदुकीचे बार ।। होऊन घोड्यावर ते स्वार ।। हरिपंत आले ते ।। १३१ ।। गारदी बोलती निष्ठूर ।। हरिपंत जाले चकित चतुर ।। समजला वाड्यांतील मजकूर ।। तेव्हां मनीं खोंचले ।।१३२।। केला सभोंवतीं बंदोबस्त ।। बोलाविले समस्त ।। नाहीं चित्त स्वस्थ । उपाय न चाले म्हणूनी ।। १३३ ।। बातमी पोहचतां जाऊन ।। आले सरदार धांऊन ।।

---

१. समुद्रवलयांकित=समुद्र हेंच वलय म्हणजे कडें त्यानें वेष्टित. ५. अंकित=स्वाधीन.

वाड्यापाशीं येऊन ॥ पुढें सरसावती ते ॥ १३४ ॥ मोठे मोठे उमराव ॥ तुम्ही ऐका त्यांचीं नांवें ॥ पाटणकर आप्पाजीराव ॥ जो कां मोठा रणशूर ॥ १३५ ॥ बरंगे खंडोजी जगताप ॥ त्याला देखतां सुटे कांप ॥ पराक्रमी त्याचा प्रताप ॥ वीर ते कां मिळाले ॥ १३६ ॥ शास्ते यांचा समुदाय ॥ गणपतराव आनंदराव ॥ दुसरे मामा त्रींबकराव ॥ ज्याची दहशत कर्नाटकीं ॥ १३७ ॥ आप्पाजी बळवंतराव ॥ गायकवाड गोविंदराव ॥ प्रतिनिधि भवानराव ॥ तावडतोब आले ते ॥ १३८ ॥ मालोजी घोरपडे सत्वर ॥ आले ऐकतांच खबर ॥ मालोजी राजे निंबाळकर ॥ आणखी पागा हुजूरती ॥ १३९ ॥ खंडेराव दरेकर ॥ गेले होते भोंसल्यावर ॥ बाळाजीपंताकडे अगोदर ॥ आधीं गेले होते ते ॥ १४० ॥ आले बापू हे दिवाण ॥ ऐका त्यांचें वर्तमान ॥ बजाबा पुरंदरे जाण ॥ आले होते धांवून ॥ १४१ ॥ विसाजी कृष्ण सरदार ॥ हिंदुस्थानचा विचार ॥ नांव राहिलें हजारांवर ॥ इतके शहाणे आणिले ॥ १४२ ॥ असे मिळून अपार ॥ तोफखान्याचे सरदार ॥ भीवराव पानसेकर ॥ आणखी आले कृष्णराव ॥ १४३ ॥ दामले बाळाजीपंत जाण ॥ गारद्यांचें आख्यान ॥ हें कळतां च वर्तमान ॥ गेली शुद्धि त्यांची ती ॥ १४४ ॥ असें सांगूं मी कोठवर ॥ बाळाजीपंत दादा ठोसर ॥ आनंदराव बळवंतराव ॥ सविस्तर जिवाजी लौकर आले ते ॥ १४५ ॥ राघोजी आंग्रे कुलाब्याहून ॥ आले बोलाविलें म्हणून ॥ तेही तयार होऊन ॥ आले होते लवकर ॥ १४६ मोरोबा दादा फडणीस ॥ आले हो कां चिटणीस ॥ किती धरावे गणतीस ॥ होईल तो कां विस्तार ॥ १४७ ॥ सर्व मुत्सद्दी आणि सरदार ॥ असे मिळोन अपार ॥ मिळोन करिती विचार ॥ एका जागीं बसोन ॥ १४८ ॥ खेद करिती चित्तांत ॥ राव गुंतले माहालांत ॥ हत्ती घोडे बुधवारांत ॥ दाटी जाहली मोठी ती ॥ १४९ ॥ जाहला वाड्यांत कहर ॥ बाहेर नये कोणासी खबर ॥ बुधवारचे चावडीवर ॥ सखाराम बापू बैसले ॥ १५० ॥ मोठे मोठे सरदार ॥ मिळोन करिती विचार ॥ करा एकदां च मार ॥ गारदी देऊं उडवून ॥ १५१ ॥ गुंतले वाड्यांत राव ॥ करितां नये उपाय ॥ आम्हा पुढें गारदी काय ॥ करिती हीं बापुडीं ॥ १५२ ॥ नाना फडणीस हरिपंतास ॥ काळजी दोघांचे चित्तास ॥ मोरोबादादा त्या समयास ॥ बसून करिती खलबत ॥ १५३ ॥ बाळाजीपंत हौदावर ॥ बसून आणविती खबर ॥ गारदी यांच्या बरोबर ॥ कांहीं नव्हतें राहिलें ॥ १५४ ॥ मिळोन सरदार अटोकाट ॥ बुधवारांत एक ची थाट ॥ नाहीं माणसांसी वाट ॥ तेथें ती कां जावया ॥ १५५ ॥ दाटी पाहून बुधवारांत ॥ हूल पडली शहरांत ॥ जिकडे तिकडे शहरांत ॥ गडबड मोठी जाहली ती ॥ १५६ ॥ दुकानें ला-

वितां हालेहाल ॥ पळतां लोकांचे हाल ॥ पुण्याचे जे कां कोंतवाल ॥ धोंडोपंत आले ते ॥ १५७ ॥ न चाले कोणाचा उपाय ॥ अवघे करिती हाय हाय ॥ लोक म्हणती पुसावें काय ॥ त्या हो गारद्यांला ॥ १५८ ॥ एक म्हणती करा हल्ल्यास ॥ दुजे वर्जिती त्यांस ॥ खवळितां त्या गारद्यांस ॥ वाड्यांत करिती आकांत ॥ १५९ ॥ गारदी जात उन्मत्त ॥ न चाले कोणाचें मत ॥ बापूचें हें मत ॥ हल्ला करूं नये तो ॥ १६० ॥ तुम्ही त्यांला मारूं जाल ॥ वाड्यांत करितील कल्होळ ॥ काढा दुसरा निकाल ॥ त्या कां हल्ल्या वेगळा ॥ १६१ ॥ ऐकून बापूंचे वचनास ॥ मानलें सर्वांचे चित्तास ॥ नाहीं केला सायास ॥ त्या हो मग हल्ल्याचा ॥ १६२ ॥ मनसुबे नानापरी ॥ करिती आपले घरोघरीं ॥ मग इतक्या उपरी ॥ चोपदार आला वाड्यांतून ॥ १६३ ॥ मुत्सद्दी आणि सरदार ॥ असे मिळोन अपार ॥ आला तेथें चोपदार ॥ म्हणे दादानें पाठविलें ॥ १६४ ॥ पाठविलें कोणत्या कामास ॥ अवघे पुसती हो त्यास ॥ बजाबा मालोजी या दोघांस ॥ बोलावूं आलों मी ॥ १६५ ॥ मग हो त्या दोघां जणांस ॥ चोपदार घेऊन गेला त्यांस ॥ नाहीं येऊं दिलें माणसास ॥ बाहेर ते कीं ठेविले ॥ १६६ ॥ नाहीं बरोबर खिसमतगार ॥ नव्हती एक ही तरवार ॥ मग दादांस नमस्कार ॥ केला बजाबानें तो ॥ १६७ ॥ मालोजीनें रामराम ॥ केला दादासी आराम ॥ जाहलें शयाचें वर्तमान ॥ सर्व त्याणें सांगितलें ॥१६८॥ तो ऐकतां च वृत्तांत ॥ तों च खोंचले मनांत ॥ तुम्ही कीर्ति हे लोकांत ॥ बरी केली चांगली ॥ १६९ ॥ गेली गोष्ट नाहीं येत ॥ असें दादा बोलत ॥ करा पुण्याचा बंदोबस्त ॥ द्वाही फिरवून आमची ॥ १७० ॥ आज्ञा शिरीं वंदोन ॥ आले बाहेर निघोन ॥ अवघ्यांस येऊन ॥ खबर सर्व सांगितली ॥ १७१ ॥ जाहलें नाहीं बरें आतां ॥ अवघे चकले चित्तांत ॥ म्हणती दादानें पुरता ॥ तो कीं दावा साधिला ॥ १७२ ॥ गारदी निष्ठूर हो जाण ॥ घेतला शयाचा तो प्राण ॥ चापाजी तों निदान ॥ जाहला शयाचा सोबती ॥ १७३ ॥ केली वाड्यामध्यें धूम ॥ कितीकांचें केलें काम ॥ हुजूर पागे इच्छाराम ॥ आणखी नारोजी नाईक ॥ १७४ ॥ आणखी तोडिले वाड्यांत ॥ नाहीं जाऊन पाहिलें आंत ॥ ऐसा ऐकून वृत्तांत ॥ शक्ति गेल्या अवघ्यांच्या ॥ १७५ ॥ केलें दादानें अघटीत ॥ आतां नाहीं बरी गत ॥ केलें कर्म अनुचीत ॥ त्या कां गारद्यांनीं ॥ १७६ ॥ आला कठीण वक्त ॥ सरदार मुत्सद्दी समस्त ॥ गेली अवघ्यांची शक्त ॥ गेले आपले घरोघरीं ॥ १७७ ॥ प्रतिनिधि भवान शयास ॥ बोलावून नेलें हो त्यास ॥ त्याणें जाऊन दादांस ॥ उत्तर केलें चांगलें ॥ १७८ ॥ तुम्ही साधूनियां परमार्थ ॥ राजपदाचा केला स्वार्थ ॥ मोठा केला पुरुषार्थ ॥

कीर्ति केली नगीं ही ॥ १७९ ॥ क्षण न लागतां गारद्यांस ॥ मी एकटा पुरेन त्यांस ॥ तुम्हीं केला हा नाश ॥ कर्म केलें अघटीत ॥ १८० ॥ बरें जाहलें अझून काय ॥ गारदी म्हणजे पदार्थ काय ॥ असें बोलतां भवानराय ॥ गारदी भ्याले बापुडे ॥ १८१ ॥ समस्तांशीं हालोहाल ॥ जाहला रायाचा तो काळ ॥ आनंदीबाई राया जवळ ॥ जाऊन ती कां बैसली ॥ १८२ ॥ कपट असे चित्तांत ॥ म्हणे केला मुलाचा घात ॥ दांभिक भक्ति जनांत ॥ दावी राक्षसीण ते ॥ १८३ ॥ चरित्र हें स्त्रियांचें जाण ॥ नकळे पोटांतील कर्म ॥ दादांना ही शिकवून ॥ घात केला रायाचा ॥ १८४ ॥ पार्वती बाईस दुःख फार ॥ रुदन करी अनिवार ॥ मारिला बाळ सुकुमार ॥ नाहीं करुणा आली ती ॥ १८५ ॥ कर्म केलें करूनि भेद ॥ नाहीं चित्ता मध्यें खेद ॥ करी माझा शिरच्छेद ॥ दादानें म्हणे बुडविलें ॥ १८६ ॥ आपलें आपटोनी मस्तक ॥ म्हणे कुळाचा दीपक ॥ पेशव्यांचे वंशीं एक ॥ होता तो कां मारिला ॥१८७॥ याचा पुसिला हो ठाय ॥ लेंकरूं अज्ञान राय ॥ त्यासी वधोनि पुढें काय ॥ मोक्ष पद जाहलें ॥ १८८ ॥ तुमचे हातीं देऊनि रायास ॥ माधवराव गेले कैलासास ॥ नाहीं होऊं दिले नव मास ॥ तेही लाविले ठिकाणीं ॥ १८९ ॥ जाहलें दुःख द्विगुण ॥ आठवून रायाचे गुण ॥ आपले हातें हृदय आपटून ॥ शरीराचे केंस तोडिले ॥ १९० ॥ सगुणा बाई आकांतून ॥ कळवळा आला पोटांतून ॥ गेले राव दुजे ठेवून ॥ पाहूं आतां कोठें मी ॥ १९१ ॥ फुटला सर्वांशीं गहींवर ॥ गहजब गंगा बाईवर ॥ कैसा रुक्मिणीचा वर ॥ देव तो कां क्षोभला ॥ १९२ ॥ निष्ठूर जाहला सीताकांत ॥ कैसा करविला आकांत ॥ पाडिले राव एकांत ॥ दादाच्या त्या महालांत ॥ १९३ ॥ रात्र झाली एक प्रहर ॥ तेव्हां मिळाले समग्र ॥ पुण्यासारखें नगर ॥ आज रायानें त्यागिलें ॥ १९४ ॥ साहित्य करावयासी ॥ सांगितलें त्रिंबकराव मामासी ॥ फुटलें जें त्या आकाशासी ॥ लावितां नये ठिगळ ॥ १९५ ॥ जाहला निश्चय गंगाबाईचा ॥ बरोबर जावयाचा ॥ मोडिला ध्यास सतीचा ॥ अवघ्या बायांनीं मिळोन ॥१९६॥ परंतु म्हणे मी न राहें ॥ आनंदी बाईनें केलें काय ॥ लोटून खोलींत लवलाहें ॥ बाहेरून कडी घातली ॥ १९७ ॥ मग उपाय चालेना ॥ न ये देवासी करुणा ॥ ऋणानुंबध हो जाणा ॥ दोघांचा तितका च ॥ १९८ ॥ आकांत केला कोमळ ॥ पडला मोठा तो घोळ ॥ हृदय जाहलें जळून कोळ ॥ अहो सुटला गहिंवर ॥ १९९ ॥ रात्र दोन प्रहरास ॥ राव नेले नदी-तीरास ॥ अग्नि देऊन त्यास ॥ कर्म केलें यथाविधि ॥ २०० ॥ विजय संवत्सराचें नांव ॥ शके सोळाशें पंचाण्णव ॥ भाद्रपदाचें वैभव ॥ शुक्ल पक्ष होता तो ॥ २०१ ॥ तो

जगन्निवास ॥ सोमवारचे दिवसास ॥ अनंत चतुर्दशीस ॥ वास केला स्वर्गीचा ॥ २०२ ॥ जहालें ऐका वर्तमान ॥ आलें रायासी विमान ॥ राया बरोबर दिल्हे प्राण ॥ ते ही गेले बसून ॥ २०३ ॥ केला रायाचा घात ॥ त्याचा होईल निःपात ॥ बेचाळीस सहीत ॥ नरकांत पूर्वज पडतील ॥ २०४ ॥ विश्वासे राव बापूवर प्रमाण ॥ कैसा केला अभिमान ॥ कळलें होतें वर्तमान ॥ नाहीं रायासीं कळविलें ॥ २०५ ॥ मोठ मोठाले आंत ॥ जे कां होते फितुरांत ॥ त्यांचा होईल निःपात ॥ आणि होईल नाचणी ॥ २०६ ॥ नाहीं पापासी अंत पार ॥ नये नर जन्म वारंवार ॥ याजकरितां सारासार ॥ विचार नाहीं पाहिला ॥२०७॥ असे दुष्ट हे साचार ॥ त्यांचा न करावा उच्चार ॥ जाहला पृथ्वी वरता भार ॥ त्या हो कां दुष्टांचा ॥ २०८ ॥ राव गेले स्वर्गास ॥ काळजी लागली सर्वांस ॥ देवाचे नाहीं चित्तास ॥ कसें आलें म्हणती हो ॥ २०९ ॥ त्याचें स्वरूप सगुण ॥ गड्डींवर येतो आठवून ॥ जाहलें वाईट म्हणून ॥ कष्टी होती लोक ते ॥ २१० ॥ जसें सिंहाचें घर ॥ जाऊन जंबुक भितर ॥ ईश्वर मायेचे कौतुक ॥ कोणाला ही न कळे ॥ २११ ॥ केला राज्याचा कळस ॥ केला दादांनीं आळस ॥ नाहीं पाहिलें पापाचे भयास ॥ अनुचित केलें तें ॥ २१२ ॥ आपुलें नासिक कापून ॥ केले वैऱ्यांसी अपशकून ॥ आपली कामधेनू विकून ॥ लोका घरीं ताक मागे ॥ २१३ ॥ देखोन पुरुष सुंदर ॥ आवडे चित्ता बरोबर ॥ म्हणोनिया भ्रतार ॥ त्यागून जाहली असती ॥ २१४ ॥ चिंतन होई चिंतामणी ॥ तोंही घालून गोफणी ॥ दिल्हा तो हा झोंकूनी ॥ म्हणे गेला किती लांब ॥ २१५ ॥ राज्य आणि श्री सुख ॥ नाहीं कधीं भोगिलें दुःख ॥ आणि परमार्थ वर्तणूक ॥ स्नान संध्या केली ती ॥ २१६ ॥ देव-पूजा नाहीं शरीरा ॥ भोगूनियां राज्य करा ॥ वया योग्य जैसा बरा ॥ गंगेचा ओघ तो ॥ २१७ ॥ फार जाणे फार विचार ॥ बुद्धिवान धार्मिक विचार ॥ याजकरितां वारंवार ॥ कीर्ति रायाची वर्णिली ॥ २१८ ॥ कुफराणे दुष्ट जाण ॥ काय त्यांचें व्यर्थ जिणें ॥ कलियुगींचें महिमान ॥ आली सृष्टि उफराटी ॥ २१९ ॥ जे करिती दानधर्म ॥ त्यांचे पाठीमागें कर्म ॥ जे करिती स्वधर्म ॥ अधर्म चाले तेथींचा ॥ २२० ॥ कलियुगीं गुण ॥ होईल विस्तार म्हणून ॥ किती वर्णावे अवगुण ॥ थोडक्यांत आटोपिलें ॥ २२१ ॥ नारायण रायाचें चरित्र ॥ तुम्ही ऐकावें पवित्र ॥ तेणें-करून होईल मित्र ॥ देव तुम्हा लागीं तो ॥ २२२ ॥ आपळें दिसूं न देई अंग ॥ कौतुक करितो श्रीरंग ॥ कविता करितो पांडुरंग ॥ वर्णी चरित्र रायाचें ॥ २२३ ॥

श्री

## अमृतरायकृत

# शुक-चरित्र.

गर्भीं असतां ज्ञान जहालें । श्री शुकानें जिविं तें धरिलें । जन्म-जरामय[1]-मरण वारिलें । भव[2]-भयातें संहारीलें । तप-सामर्थ्यें ताप हारिले । विवेक-मंत्रें मन आंवरिलें । विषय-पसारे दूर सारिले । असें वेदांतींचें[3] वरिलें । अशेष जेजे भोग भोगिले । शुक-अर्भका[4]-गर्भ-जाचणी । द्वादश वर्षें । अति-प्रकर्षें । अवयव उदरीं आकर्षुनियां । निकर्ष करूनी वर्षें बारा । गर्भदरीचा अती उबारा । क्षुधानैळाचा[5] ताप दुबारा । अधोवदनीं क्लेशा-सदनीं । नार[6]-बंधनीं । मूत्र-आधणीं । दाथर[7] इष्टा पिष्टफळा सम । उकडत होता जठराग्नीनें । त्वचा हि कोमळ । नाकीं तोंडीं जंतू बुळबुळ । वळवळताती । तळतळ होतां । कळकळ जिवास । पूयपंकीं[8] कारागृहवास । कुश्चळ दुर्गंधीचा त्रास । सर्व रोधिले श्वासोच्छ्वास । सोहं सोहं हा निजध्यास । वैराग्याचा जिविं हव्यास । बाहेर पडतां मीं अभ्यास । करीन साधन बहु सायास । ताप हि साहिन शीत ही न । क्षुधेशि खाइन । मनासि घेउन वनासि जाइन । तृषेसि लाविन आले वाटे । हरि-नामाचे घेइन पेटे[9] । उतरूनि भव-नादि जाइन वाटे । फोडिन कर्मांचीं हि कपाटें । सांडिन वासनेचे फांटें । उपडिन अभिमानाचीं बेटें । उत्पाटिन मी मोक्ष-कॅंपाटें[10] । ऐसा गर्भीं ध्यास लागला । मातेचा जिव बहू भागला । व्यास म्हणे इस रोग लागला । उग्र औषधी रेच योजिला । मंत्र-प्रयोगें जाळिन याला । समंध ऐसा कोण जन्मला । ऐसें जाणवि श्रीकृष्णाला । श्रीहरि बोले त्या गर्भाला । शुंका[11]-परी पढवीता जाला । म्हणवुनि शुक हें नाम तयाला । कर्में कथिता जाला श्री हरिला । श्री शुक-योगींद्रानें रंभेचा गर्व हरिला । धृ ॥ १ ॥

पुससी कोण तो मी ऐसा । अनादि जिव तो नामें कैसा । पाप पुण्य मिश्रीत सरीसा । अंगुष्ठा सम-लहान उलीसा । तो मी सूक्ष्म स्थूळीं भरलों । लक्ष चौऱ्याशी भरूनि-पेणें[12] । दुरोनि जालें येथें येणें । दडी दीधली पाप-भयानें । माझीं

---

१ जरामय=जरा + आमय=म्हातारपण व रोग. २ भव=संसार. ३ वेदांत=वेद-ग्रंथांतील शेवटचे ग्रंथ म्हणजे उपनिषदें. ४ अर्भक=मूल. ५ क्षुधानळ=भूक हाच अग्नि. ६ जार=गर्भाच्या सभोंवतीं असणारें वेष्टण (वार). तीन प्रकारच्या जीवकोटी आहेत:-जारज, अंडज, उद्भिज. ७ दाथर=मोदक उकडते वेळीं गवताचा थर भांड्यांत घालतात तो. ८ पूयपंक=पू हाच चिखल. ९ पेटे=नदींतून तरण्याकरितां भोंपळे इत्यादि साधन घेतात तें. १० कपाट=दार. ११ शुकापरी=पोपटासारखा. १२ पेणें=मार्ग चालतांना विश्रांतीकरितां केलेला मुकाम.

ऐका अपूर्व कथनें । स्वधर्म सांडुनि अधर्म वाटे । कुकर्म जीवा गोड वाटे । अनर्थ तेथें कर्मचपेटे । मर्म तयाचें कर्म फळे मग । कृमी होऊनि भ्रमणी चक्रीं । भ्रम-दुखानें काळ क्रमीं मी । मी मी म्हणतां मेंढा जालों । चंडी[१३] पौंशीं मुंडि खुंटलों । काळचक्रामाजि भरडलों । बुरूड होउनि दुरंड्या[१४] केल्या । कोष्टी होउनि पांष्टा[१५] विणिल्या । परस्त्रियेतें पहातां दृष्टी । अंध होय त्या पापें कष्टी । विषय-प्रयोगें अंग कुष्टी । अन्न-दानें स्वदेहपुष्टी । द्रव्य-दानें नित्य तुष्टी । अदत्त-योगें पात्रें उष्टीं । चाटीं श्वान होउनि इष्टी[१६] । भिक्षा तांदूळ न घालि मुष्टी । तरी च कीटक कोरड काष्टीं । हरि-नामाची न करी गोष्टी । दर्दुर[१७] होउनि ओरडे सृष्टी । ब्रह्म-कुळींचा आचार भ्रष्टी । तरीच गर्दभ भार पृष्ठीं । अतिथी उपवाशी ठेवुनि आपुल्या काया पोशी । धनी असोनी विपत्ति सोशी । पुरून ठेवणें ऐसा दोषी । घुशी होउनि घुसे विळांत चि । बिंडाल[१८] काळा मुषक म्हणे मी । सूकर[१९] नामा डुकर होउनि । उकिर उकरडा उकरला । श्री शुक० ॥ २ ॥

सुंदर काया तीर्थ स्नानें । पोट शूळ हा [२०]भूतद्रोहानें । गजादि वहनें कृपाद्रवानें । दुष्ट जन्म घे उपद्रवानें । परद्रव्याचें करितां हरणें । दरिद्रतापें तापुनि मरणें । रक्तपिती चोरितां चि सोनें । क्षय-रोगी हा वृत्ति[२१]-क्षयानें । अनेक दुःखें अनृत भाषणें । व्याघ्रादिक हे गळा-बंधनें । अस्वल होती रीण गिळोन । नेत्र झांकुनि जुंपिति घाणीं । वनीं वाघुळा अधोवदनी । पंक्ति-भेद जिहिं केला त्यांनीं । धर्म करी त्या मोडा केला । गर्भ-खोडा प्राप्त जाला । प्रसूति समयीं अडवा आला । शस्त्रें छेदुनि लुंडवा[२२] केला । लक्ष चौऱ्याशीं हा बाजार । करी बेजार । बहु जोजार । हजार वर्षें कारागार । देह सर्पाचे । काक-बकाचे[२३] । गृध्र-घूकाचे[२४] । स्थावराचे । फिरत फिरत मग ईशदयेनें । कर्मभुमी नरदेहीं येथें । स्मरणी[२५] लागीं मेरू[२६] जैसा शतायूष तें अमोल्य थोडें । जन्मलों मी गर्भीं स्मरतां । सोहं सोहं बाहेर पडतां । विसरें हें मी । देहें गेहें । माया मोहें । मामा-मामी । काका-काकी । ताई-माई । आई-बहिणी । विहिणि-मेहुणी । इत्यादिक हे कर्म-कहाणी । या नात्याच्या गुंडाळ्यानें । गुंडाळुनि बंढाळ चि झालों । चांडाळ चि मी । मोहें याचा । आचावाचा नर-स्तुतीचा । काम वस्तूचा आर्जवाचा । हरीहराच्या

---

१३ चंडी=देवी. १४ दुरड्या=पांट्या. १५ पाष्टा=सुताच्या गुंड्या. १६ इष्टी=यज्ञ. १७ दर्दुर=बेडूक. १८ बिडाल=मांजर. १९ सूकर=डुकर. २० जेथें अक्षर दीर्घ असून ऱ्हस्व वाचलें पाहिजे तेथें त्या दीर्घ अक्षरावर ‿ अशी अर्ध चंद्रकार खूण केली आहे व जेथें अक्षर ऱ्हस्व असून दीर्घ वाचलें पाहिजे तेथें त्या ऱ्हस्व अक्षरावर – अशी कुंकवाच्या चिरीसारखी खूण केली आहे. २१ वृत्ति=उपजीविकासाधन. २२ लुंडवा=हस्तपाद रहित. २३ बक=बगळा. २४ घूक=घुबड. २५ स्मरणी=मण्यांची माळ. २६ मेरू=माळेच्या मध्य भागचा मोठा मणी.

भजना वांचुनि श्रीहरि । जन्मोजन्मीं काळ क्रमिला ॥ ॥ श्रीशुक० ३ ॥

भय पापाचें कां न धरी । पुराण-कीर्तन-देवद्वारीं । तांबुलभक्षण कुष्ट शरीरीं । कर्म वर्म निंदा करी । टिटवीजन्म त्या पक्ष्यांभितरीं[27] । गुरु शिष्यांशीं विद्या चोरी । होय पिंगळा[28] तो निर्धारीं । अनुचित प्रतिग्रह[29] ब्राह्मण घेतां । गंडमाळा होती अद्भुता । परद्रव्याचा अपहार करितां । पर क्षेत्रिच्यां[30] गाई वळितां । अल्प-आयुषी होय तत्वतां । सत्पुरुष आणि प्रजा पीडितां । व्याघ्र सर्प होय तत्वतां । साधु-छळणीं वंश-क्षयता । देवद्वारींचे तरू तोडितां । छाया मोडितां । पांगुळ होती जाण तत्वतां । जारकर्मि ते वेश्या जाण । स्त्री-पुरुषांचें गुह्य श्रवणें । दासी किंवा कुंटिण होणें । सेवकासि जो त्रासी पूर्ण । तोचि मोळ्यावाहक जाण । सेवक होउनि स्वामि जाचणें । श्वान होउनि बहू हिंडणें । ब्रह्म-राक्षस बहु अभिमानें । देवालयाचें तेल चोरणें । मार्जार होउनि गुर्गुरकरणें । त्रास माता-पितया देती । मर्कट होउनि वृक्षीं फिरती । क्षेत्री म्हणवुनि युद्धीं पळती । सिमा लोटिती । कवन निंदिती सत्पुरुषाचें । वृश्चिक[31]-रिसांदि[32] जन्म पावती । वेद-शास्त्र जे उगें निंदिती । द्वेष करिती महा पुरुषांचे । तस्कर[33] होउनि नाश तपाचे । बंधू-बंधू वैर करीती । मत्स्य होउनी जळीं विचरती । दोघी स्त्रीया जे कां करिती । येकीचें जे चित्त राखिती । सारमेयाच्या[34] शिरावर्ती । गोचड होउनि तरतरताती । उदक कोंडितां मूत्रकोंडतो । पृथ्विपतीची निंदा करितो । उदरीं अग्नी मंद होतो । ग्रहण-संधी करितां भोजन । पित्तरोग त्यां होय दारुण । पर-बाळा दुरदेशीं विकणें । वचनीं गुंतुनि पालट करणें । गलित-कुष्ट-दुर्गंधि साहणें । अपराधाविण स्त्रीस जाचणें । एक अंग तें जाय तयानें । ब्राह्मणाचें अन्न हरणें । वंश शून्य हें शास्त्रि पहाणें । गुरु संत आणि माता पीता । त्यां उपहांसितां । वाचा जाउनि होय दुःखिता । ब्रह्म-वृंदा त्रास चि देतां । व्याधी तिडका लागती कुथा । पुराण-श्रवणीं हरी-कीर्तनीं । जाउनि निजतां अजगर जाला । अतिवादें तो सन्निपातला । देव पुजेनें वीट आला । मारि नाहकाला । पुस्तक चोरुनि मुका चि जाला । नमन करीना जो संताला । कठोर वचनें त्रास दीधला । बहु जन्माचा । बहु जोजार । त्रास पावलों वारंवार । नुलंघवे मायापूर । अशि वाक्यें हीं शुक-मूर्खींचीं । ऐकुनि साचीं । श्रवण करी जगदात्मा ज्याचीं । धरी चित्तिं मुक्ति त्या फुकाची । अनुभवाची । जन्मांतरिंची । ऐकतां चि तेधवां श्रीहरिहरासि स्मरुनि

---

२७. पक्ष्याभितरीं=पांखरांत. २८. पिंगळा=पक्षिविशेष. २९. प्रतिग्रह=दानघेणें. ३०. क्षेत्र=शेत. ३१. वृश्चिक=विंचू. ३२. रिस=आस्वल ( संस्कृ० ऋक्ष ). ३३. तस्कर=चोर. ३४. सारमेय=कुत्रें.

काय बोलिला ॥ श्रीशुक० ॥ ४ ॥

पुण्यलता हे फळासि आली । कृष्णें जिभलि । अशि चालविली । पाप-शृंखळा हे तुज कळली । तरि कां माता हे शिणवीली । निघोनि आतां सोड माउली । स्वरूप-सत्ता पाहें आपुली । मनासि बोधुनि वनासि जावें । ब्रह्म भावें जनासि ध्यावें । धनासि आणि स्त्री-जनासि भ्यावें । नातरि माया फिरविल वांया । भरविल या बा आडरानें । रामावांचुनि निकाम रामा[35] । भुलविल तुजला । तुजला देइल टोला । चौऱ्यार्शीचा दाविल झोला । कृष्ण बोलतां शुक निघला । भ्रष्टला या प्रपंच्यांतुनि । गेला तैसा आला नाहीं । पडला षड्-शत्रूंच्या[36] डाईं[37] । वासनेला मारुनि घाई । जाळुनि अंगीं भस्म चर्चिलें । जीवित जाण असें खर्चिलें । वाणि-द्वारा ब्रह्म चर्चिलें । जिवित अर्चिलें । प्रबोध हृदयीं शिरकविला ॥ श्रीशुक० ॥ ५ ॥

हृदयीं धरीत करिं पल्लव ग्रंथीं । प्रेम भरित हृद्-विवेक पंक्ति । छेदित ऐसें जेणें न घडे । जन्म सांकडें । द्वयारोकडें । प्रसूत भूत । नूतन सरिता । संकोच रस्ता । विस्तारें श्रम लिहितां दस्ता । कागद नपुरे । पुरे पुरे हे आस्ता । ऐशी शास्ता घडली । धास्ता खाउनि । द्वयपैंयिन-सुत[38] पैय-पानातें[39] । अव्हेरुनियां घोर वनातें । न घडे जन्म तों तत्क्षणांतें । दर्शित ज्याची । ज्ञान-दशा जग मृषाचि[40] भासे । मृगदृशा[41] भ्रमवि अशा तेव्हां । व्यास मनीं हव्यास उठीला । श्वास सांडिला । अशा अशा बाळासि पाहावें । कास घालुनि पृष्ठिं धांवला । वियोग दुःखें ओष्ठ सूकला । शुक शुक ऐशी हाक मारूनी । शुक डोळीयां मूख दाखवी । अरे पुत्र क्षणमात्र उभा रे । मोह कळवळे येति उबारे । नेत्रीं चळ चळ अश्रूधारा । श्मश्रु[42]-अधरा वरोनि ढळतां । आकळितां नाकळे चि ममता । चक्षू पुसतां पक्षि शुकाचा । वृक्ष आणि तृण पक्षि बोलति । "ॐ शब्दें जो प्रणव[43] महा[44]-वाक्याचा ध्याता । ध्याताध्यात ध्यान धारणा । जन वन ज्ञानामृत-दृष्टिनें । सृष्टि सिंचुनी शीतळ केली । निवांत जाली । हे तात! तात! चित्तांत । आप विख्यात मात हे सर्वांतरी हे । निरंतर असतां । अंतर मानुनि । अभ्यंतर कां जाळुनि घेशी । आलों ना मीं गेलों कोठें । जन्मलोंना मेलों नसतां । भ्रांत दुःख विश्रांत होउनी । शांतपणें सिद्धांत विवरुनि । असें पहावें । आवरण-शक्ती । पंच[45] महा-भूतांची व्यक्ती । उभी ठाकतां । बंध मुक्तिचा । शब्द रूढला ।

---

३५. रामा=स्त्री. ३६. षड् शत्रु=काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर. ३७. डाईं=द्वेषांत. ३८. द्वैपायनसुत=व्यासपुत्र शुक. ३९. पयपान=दूधपिणें. ४०. मृषा=खोटें. ४१. मृगदृशा=स्त्री. ४२. श्मश्रु=दाढी. ४३. प्रणव=ओंकार. ४४. महावाक्य="तत्त्वमसि" म्ह० तें (ब्रह्म) तूं आहेस हें वाक्य. ४५. पंचमहाभूतें=पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश

[46]अविद्या-भ्रम जिवास घडला । अहं ब्रह्म सिद्धांत उडाला । भाव बुडाला मोह जळाचा आला पूर । आत्मा संन्निध असतां दूर । हुर हुर जिवास गुरू ज्ञानाचें । अंजन नसतां [47]कानकोंडा । प्रपंच फोल कोंडा कांडून अभिमानाचा धोंडा बांधुनि । भवलोंडा जो त्यांत चि बुडती । तसें नकोरे । आयुष्याच्या अवधी अधोच । "[47a]सहा वधोनि सावध व्हावें । सत्य [48]सनातन असें पहावें । घटीं घटाकृती । मठीं मठाकृती । अकाश-वि[49]कृति नसतां भासे । प्रतीविकारें तैसा आत्मा पिंडींचा तो ब्रह्मांडींचा । परमात्मा तो उपनाम पावला । अहंतत्व तें सोऽहं असतां । कोऽहं विभ्रमयोगें विसरे वेदीं जें वंदिजे ब्रह्म तें निरामय असे अराम विलसे । नित्य निर्गुण सत्य सनातन । ज्ञानानंतध्यानातीत । सजल नदींत । चंद्र जैसा दिसे उदीत । सत्याधारें तैसें तया । विश्वघटांत । व्यास. न मान । गुरू [50]जमान श्रुति प्रमाण । या वाक्यानें गतागती आत्म्याला नाहीं । देह जेंयिचा तेथें पाहीं । पंच भूतांची असतां खंती । कां बा करसी । भांबावुनियां । वियोग म्हणसी । देहाभिमानें मीं तूं सखया । पंचभुतांच्या संगें जिव हा । वासनेच्या अंगें सोंगें । घेउनि रंगुनि जन्मुनि मरणें । आणि जननीचे जठरीं भरणें । कर्म करणें तीं निस्तरणें । भव तरणें तें न घडे जाणा । गुरुचरणाविण प्रपंच-घाणा । त्यासि जुंपिला अज्ञान जीव हा । मोह अंध पशू द्वंद ग्रामिचा । देह झोंपडी । मध्यें मीं तूं हे चि झांपडी । नेत्रबंधनी फिरति बापुडीं । काळाहि निष्ठुर होउनि थपडी । न कळे हा मीं कोण कैसा । येणें कोठुनि जाणें कोठें । मार्ग दीर्घ तो । क्रमुनि भ्रमुनियां । ऐसें न करितां नाना योनी । माता माझी मी मातेचा । पिता चि जालों । तिचा पुढें मग कांत होउनी अंत पावलों । अकांत करिती । प्रिया पुत्र मग क्रिया अचरती । श्रद्धायुक्त श्राद्धें करिती । निर्मोहत्वें परत परत तूं" ऐसें म्हणतां शूक-कि[51]रानें । म[52]धुर गिरेनें । क्षीर-नि[53]रांचा निवाड करितां । आज्ञानाचें कवाड व्यासें । उघडुनि अंतरिं विवरी तत्वें विवरुनियां मग । आत्मत्वेशीं । मुख्य पदीं निज सख्य करुनियां भागवताख्य पुराण पत्रें । व्यास पवित्रें । करिं तीं धरितां भित्ति-चित्र हें । विश्व मृषा हे विचित्र हरिची लीळा दर्शित आली [54]प्रतीति महा मुनिला ॥ श्रीशुक० ॥ ६ ॥

पाप-भयें वैराग्य जयाला । [55]वसन-विहिन शुक वनासि गेला । [56]अशन त्यजुनि-यां खाय भुकेला । योगासनासि घालुनि बसला । नमन करुनि गुरु कृष्ण

---

४६. अविद्या=अज्ञान. ४७. कानकोंडा=बहिरा, निर्लज्ज. ४७. a सहा=षट् शत्रु (टीप २६ पहा). ४८. सनातन=शाश्वत. ४९. विकृति=बदल, फेरफार. ५०. जमान=जामीन. ५१. किर=पोपट. ५२. मधुरगिरा=गोड वाणी. ५३. क्षीरनीर=दूध व पाणी. ५४. प्रतीति=खातरी. ५५. वसनविहीन=नग्न.

कृपेला । उन्मनिचा[५६] तो मार्ग शोधिला । तत्वमसि[५७] महा-वाक्य बोधिला । काम-क्रोध-समुदाय छेदिला । नित्य ब्रह्म निर्वाणें[५८] लाधला । स्वानंदामृत घटघट प्याला । आनंदाचा ढेंकर दिधला । आत्मा सेवुनि स्वस्थ बैसला । संतोषाचा बाग लाविला । दुराविलें त्या नष्ट अशेला । शाल दुशाला[५९] कशास त्याला । तोडुनि टाकी मोह पॉशाला । काय नियम[६०] यम करिल अशाला । अशासि येथें कशासि आणिता । त्यासि मसाला करील कोणी । ह्मणी कसाला । बोले कृतांत[६१] आत्म दुतांला । जिता चि मेला निकाम जाला । जिवन्मुक्त शुक ह्मणती त्याला । बहु देणें मग नलगे ज्याला । असो बिचारात्याचि विचारा । येईल तैसें बरें म्हणावें । उगें पहावें । इंद्र स्वभावें येउनि प्रेरी । त्या रंभा-सुंदरिला ॥ श्रीशुक० ॥ ७ ॥

अनुष्ठान तप-कळा लोटल्या । तप तेजें दश दिशा दाटल्या । पुण्य नद्या शक्राच्या अटल्या । सुकृत बळें जरि शूक भेटल्या । ऋणानुबंधें गांठि तूटल्या । इंद्रमनीं कल्पना ऊठल्या । तेव्हां त्याच्या शक्ति खुंटल्या । युक्ति खुंटल्या । वृत्ति वीटल्या । जैसें श्वान वमना[६२] साठीं । मार्गस्थाच्या लागे पाठी । स्वभाव दुःखें होउनि कष्टी । तैसा तेणें देवेंद्रानें । यत्न मांडिला । रत्न सुरवरी । सभेसि रंभा आणि मेनका । तिलोत्तमादिक स्वर्ग-गामिनी । पाचारुनियां इच्छित सांगे । म्लान[६३] वदनें पुण्यामृत शुकाचें हरुनी । दोहन करणें । मोहन रूपें । रंभा वहिनी चतुर शहाणी । अवनी-भुवनीं शुकाच्या । परामृशातें । जावें म्हणुनीं अति हर्षानें । शतयज्ञाची[६४] आज्ञा वंदुनि । करी प्रतिज्ञा । शक्र-सभेसी वक्र पाहुनि । हंसोनि बोले देइन झोले । भले भले मी चेववीले । पंचविषयें[६५] ज्यां चेववीले । धाउनि आमुचे सुखरस प्याले । तपक्षयातें सर्वेचि भ्याले । आणिक धांवले वनीं पावले । तपें तापले । नेत्र लाविले झालें गेलें वरें विसरले । तपोधनानें सधन हि जालें । आसन । तुमचें थरारिलें मग । अह्मा प्रेरिलें । तेथें जाउनि । गाउनि नाचुनि । पुण्य-दुधातें । दोहुनि घेउनि । मोहन-यंत्रें विश्वामित्रादिक सत्पात्रें । वात-अंबु[६६] अणि गळीत[६७] पत्रें । भक्षुनि तपती अमुची सूत्रें । वेग वक्त्रें । मुत्रें कुत्रें । जैसें तैसें पाठी लागुनियां क्षणमात्रें । त्याला मुंगी येउनि लुंगी[६८] । सुटली स्मरगुंगी[६९] तें तेव्हां हुंगित हुंगित जवळ चि आलें।

---

५६. उन्मनी= जागृती, स्वप्न, सुषुप्ति, तुरीया, व उन्मनी या पांच स्थितींतील शेवटची म्ह० पांचवी. ५७. तत्वमसि=तें तूं आहेस. (टीप ४३ पहा). ५८. ब्रह्मनिर्वाण=ब्रह्मसुख. ५९. दुशाला=दुहेरी शाला. जोड शाल. ६०. नियम=शिक्षा. ६१. कृतांत=यम. ६२ वमन=ओकलेला पदार्थ. ६३. म्लान=कोमेजलेलें. ६४. शतयज्ञ=इंद्र. ६५. पंचविषय=रूप, रस, गंध, शब्द, स्पर्श. ६६. अंबु=पाणी. ६७. गळीतपत्रें=गळलेलीं पानें. ६८. लुंगी=लहानगी. ६९. स्मर=मदन.

नकों नकों म्हणतां गळां चि पडलें । भुजें वेष्टुनियां । तपा भ्रष्टवुनि । निष्टुन तुमच्या सभेसि आलें ते हे रंभा अंभोदीज्यँ[70] । जाणतसा परि मानितसा मज । द्या द्या वीडा दाविन क्रीडा । मोह-वेडा मीं घालिन खोडा । शुक कीडा थोडा च वयाचा । धडा मनाचा । मोडुनि याचा । कडासनावरुनीयां मग मी । सडा चि धड धड धांवत आणिन । ऐशी रंभा गोड बोलुनि होडँ[71] विडा उच । लुनि हस्तकिं मस्तकिं धरिला श्रीशुक० ॥ ८ ॥

इंद्र ह्मणे गे चंद्र-वदने । चंद्रहार घे चंचलनयने । चित्रविचित्र हिं [72]चिरें भूषणें । चंदन चर्चित सुगंधानें । हार चमेली चंपा-सुमनें[73] । चतुरपणें [74]वंचवीं युक्तिनें । निश्चल मुनि-मन चंचळकरणें । मुखचंद्रानें चंद्रि लावुनि । नयन-चकोरें । करीं भिकारें । बहु प्रकारें विकारवावें । चित्त तयाचें । तपोवित्त हळु जपूनि घ्यावें । [75]सहस्रनयनें गौरवोनियां । सौरभजननी[76] । सहास्य वदनें अवश्य वदली । वश्य करिन मीं । नमन करूनियां गमन करितां । शचिपति लागुनि । रतिपति[77] मागुनि । वसंत घेउनि । हास्यवदना । हृदय द्युतिनें । विद्युत्तेज ते ललना जाल्या । उचिता कृतिनें विकृति पावे । विवेक वृत्ती । तैशा अनृती । तयाचि तृप्ती । गान तान संगीत पयोधर । शीत तेय मंद सुगंध वात सह । सुरवर किन्नर गंधर्वादिक । सर्व चि वय गर्वें स्फुरती । अवघ्या कुशला सकाम कामिनि । सौदामिनिशीं[78] दिव्य शरीरीं । भव्य भूषणें । प्रभाकराच्या[79] उग्र प्रभेचा भोळा जन मग लाभ लाभला । भला मनाला आला प्रेमा । बाळांलिंगानें[80] ताळा घालुनि । भ्याला मग त्या परहिताला । पडेल घाला लोशीं[81] माळा । गळां च घालिती । छळोनि घाला । समुदायें प्रमदा येकसळा[82] । सकळा ही विमान वहनीं । समान नक्षत्रांच्या पंक्ती । दिशा रंगती । निशा भंगती । अंग-प्रभेनें । उजळे तनु ते । सोज्वल वस्त्रें मज्जन[83] करूनी । कज्जल किंचित चिरी लावुनी । दिसति हिरे पाचूचे हार । फार सुमनांचे ते भार मस्तकिं वरिले । हस्तकिं धरिले । सन्मुख सखया अर्पण करिती । दर्पण पाहुनि सिंधुजानना[84] । मुख इंदु वरि तिलक-बिंदु सुरंग रेखिला । अंबुज मुखीनें मुनि-वृंद भेदिला । एक शूक मुनि । त्या हि द्विजवरें । भाळि बिजवरें । धिःकारिले अनुसंधानें । ध्यानयोग हा जुनाट चंदन । नंदन वनिचा । आनंदानें अंग चार्चिलें । हृदय पिंडिका

---

७०. अभोदीज्य=एथें कांहीं अपपाठ असल्यामळें दुर्बोधतरव आहेसें वाटतें. ७१. होड-विडा=पैजेचा विडा. ७२. चिरें=वस्त्रें. ७३. सुमनें=फुलें. ७४. वंचवीं=ठकवीं. ७५. सहस्र-नयन=इंद्र. ७६. सौरभजननी=रंभा ? ७७. रतिपति=मदन. ७८. सौदामिनी=वीज. ७९. प्रभाकर=सूर्य. ८०. बाळा=स्त्रिया. ८१. लोश= ? ८२. येकसळा=एकदम ? ८३. मज्जन=स्नान. ८४. सिंधुजानना=चंद्रमुखी.

त्यांसि अर्चिलें । उद्भेदुनियां आकर्ण हृदया भितरुनि कामें भरुनि पातले । अरुण रंगें । कंचुकींत चित्तें धरुनि राहिले । तरुण जनांचीं हरुनि चित्तें । अशा च येती कितीक जाती । मुनी तापसी ऋषी दिगंबर । अमर तेज परि पामर[८५] जाले । विप्रादिक बहु क्षिप्रीं[८६] भक्षुनि । प्राप्ति इच्छिती स्त्रीअधराची - पयोधराची[८७] । पिवळ्या अंगीं । उट्या केशरी बुट्या भर्जरी[८८] । नक्षत्रासम बेसरें[८९] नाकीं । हातांत गजरे । श्रीहरिनामीं । प्राण्या भजरे । अंतरिं त्यज रे । त्यजरे त्यज रे अशा-मोहातें । अशा नागिणी कुरळकेश त्या । सरळ वेणिया । मुक्ता[९०]-लंकृत श्रेणिं[९१] नगांच्या[९२] । तांबुल वदनीं सिंहकटी त्या । कटिसूत्र । कटिं ज्यां-च्या सुवर्ण-रत्नेंजडित । तडिद्भाससम[९३] । भांग भरुनियां द्वादश अंगीं सांग अभरणें मतंग गमना[९४] । उत्तुंग[९५] कुच ते पतंग जैसे । तंग ताठ हृद्बंधें[९६] अशा परी । अंग बराबर अनंगाचें । दळ[९७] सबळाचें । कवि अबळा यां । बळेंचि म्हण-ती । चपळा एकी । बुबुळा फिरवुनि । लोकत्रय हा दुबळा करिती । चित्त वित तें समस्त हरिती । पुढें प्रेरिती वसंतकामा । अनिळ[९८] रिकामा । सिंधुसमा[९९] । देउनि तयातें । धाडि धाडिली । पावे जेथें अगण्य पुण्यारण्य । शुकाचें निकट वनीं त्या । निकट जाउनी विनोद-वाचा-उपक्रमो आदरिला ॥ श्रीशुक० ॥ ९ ॥

वसंत संतत सुलता[१००] प्रसवी । कंदर्पाची[१] सत्ता बसवी । समीर[२]-दर्प हि वायू सु-चवी । पुष्प-वाटिका[३] रम्य नेटकी । ठाक ठीक वस्ति खेटकी[४] । मंत्रें समान सूत्रें साधुनि कळा कूसरी निबीड दूरी । शीतळ छाई विकसित जाई । जुई शेवती । चमेल चंपा गंधमालती । मंदाराच्या सरळ्या पंक्ती । कोराटी बहु रंग रंगिती । आराटीची[५] नाहीं जाती । फुलें मोगरे पिवळी जाती । गोकर्णी गोकर्ण आकृती । एक सुकृती तुळशी नवती । जैसे चेंडू फुलले झेंडू । गेंद शेंदरे लोक हेंदरें । कानिं खोंविती । तुरे लाविती । घट्ट फुलांचे बट्टमोगरे । द्राड पांगरे निंद्य कळीचे कळवळती । भळभळीत फुलले । मल्लिकांच्या दीर्घ वल्लिका कळिका फुलल्या । अपार जेथें पारिजात । जाळ वारिजात[६] । कर तरंग । भातभांतचे[७] दात त्यांत बहु मात करीतो । वनस्पतीचा गुण विखरीतो । खडे दुपारी[८] । फुले दुपारी ।

---

८५. पामर=गरीब. ८६. क्षिप्रा=खीर. ८७. पयोधर=स्तन. ८८. बुटया भर्जरी=वेलबुटी-दार भर्जरी वस्त्रें. ८९. बेसर=नथ ! ९०. मुक्ता=मोत्यें. ९१. श्रेणि=पंक्ति. ९२. नग=दागिने. ९३. तडिद्भाससम=विजेसारख्या तेजस्वी. ९४. मतंगगमना=गजगामिनी. ९५. उत्तुंग=पुष्ट. ९६. हृद्बंध=चोळ्या. ९७. दळ=सैन्य. ९८. अनिळ=वायु. ९९. सिंधु=समुद्र. १००. सुलता=उत्तम वेली. १. कंदर्प=मदन. २. समीर=वायु. ३. पुष्पवाटिका=बाग. ४ खेटक=खेडेगांव. ५. आराटी=? ६. वारिजात=कमळ. ७. भातभातचे=तऱ्हेतऱ्हेचे. ८. दुपारी=एका प्रकारचें फूल.

सरळ सुपारी । गगन चुंबिती । द्राक्षफळातें पक्षि भक्षिती । क्षितीबराबर शीतळ नितळा । पाट वाहती । थाट दार प्रफुल्ल वृक्षीं । फाट नसे परि वाटे मधिं । चोहाटे बांधिले । रत्न शिळा लखलखाट । त्यांच्या कळा फांकती । मधुर शब्द कोकिला गुंजती । सकळामध्यें । बकुळाच्या । समकुळाभोंवते । [९]अलीकुळाचे । वृंद हिंडती । मंद मारुतें । वृक्ष डुल्लती । [१०]नागकुळें परिमळे झुल्लती शूक शुकातें स्पष्ट बोलती । अरिष्ठ तुज हें आलें म्हणती । यारिष्टातें हलवुं पहाती । मुख्य अघाती । श्रीरागानें । गीत गाती । ऐशी विवशी । तुज खायासी । लक्ष लाविलें । सुदक्ष मुनि तो । अंक्षकपाटें । अक्षय लावुनि । क्षेम-रूपें लक्षित जेणें । [११]शमदम हृदयीं भरिला । श्रीशुक० ॥ १० ॥

कुशासनीं क्षेम कूशल समाधि सम भजनीं रस चढे उन्माद न गणी । कांहीं हर्ष विषाद निर्गुण विवाद । भोगी अद्वय चिन्मय मुद्रा । सौख्य समुद्रा । मध्यें विषय क्षुद्रासि त्या । नातळोनियां । मन बुद्धीचे पैल तिरास । गांठुनि शूक गिरास । भाग्याचा तो वैराग्याच्या । [१२]दुर्गावर्ता । दुर्गाधिप [१३]भर्गा सम साजे । स्वर्गावरुनि स्त्रीवर्गांनीं । शुकोपसर्गा [१४]मोहोरवर्गांत । घेउनि त्या वरि विध्वंसाया । ईर्षा पोटीं आति हर्षानें सुंदरशा त्या संगें घेउनि । [१५]बाळा प्रौढा [१६]मुग्धा नारी । सुरतीं निरता । चतुर चौकसा । चौऱ्यायशी असनीं व्यसनीं शहाण्या । सुंदर [१७]पाहाण्या । कोणी लाहाण्या । मोठ्या गोऱ्या गोमट्या । खोट्या मनिंच्या । कामिष्ठा त्या । नेमिष्ठाचें । चेष्टाया मन । अचाट दळ । अबळांचें कैसें । प्रबळ माजलें । [१८]माजपट्यानें [१९]मांज बांधले । सैन्य साजलें । [२०]नितंबें तेचि [२१]मतंगें त्यांवरि । ध्वजा फरारी तेवी अंचळ । वायू स्पर्शे हलती चळचळ । पाहुनि त्याचें धीरत्व हि चळचळ कांपे । झळझळ भांग । शिरींचा [२२]सांग चि । हृदय तें दुभांग करिती । [२३]भांग जशी सर्वांग व्यापुनि गाढी मूर्छा पाडी भृकुटी-चापें । ताडी नर मृगनयन-बाण [२४]सत्राण विवेकें । प्राण हरती वैराग्याच्या ठाण्या वरुती । उठावणी हे । कठिण कुचांची । अग्रें ज्यांची निज भाले । तेंवि निघाले । [२५]कंदन कराया मदन शुभांगी । [२६]भणंग शिवें तो अनंग केला । यदर्थी चरणावळी

---

९. अलिकुळवृंद=भ्रमरसमूह. १०. नाग=सर्प. ११. शमदम=शम=मनोजय आणि दम=बाह्येंद्रियजय. १२. दुर्गावर्ता=किल्लयावर. १३. भर्ग=शिव. १४. मोहोरवर्गांत= ? १५ बाळा प्रौढा=बाला स्यात् षोडशाब्दावधि तदुपरि तरुणी त्रिंशतो यावदूर्ध्वम् । प्रौढा स्यात्पंचपंचाशदवधि परतो वृद्धतामेति नारी ॥ (रतिरहस्यं). १६ मुग्धा=अंकुरितयौवना मुग्धा. १७. पाहण्या=देखण्या, सुंदर. १८. माजपटा=कमरपटा. १९. माज=कमर (सं० मध्य). २०. नितंब=कुल्ले. २१. मतंग=हत्ती. २२. सांग=एक प्रकारचें शस्त्र. २३. भांग=एक मादक पदार्थ. २४. सत्राण=जोर. २५. कदन=युद्ध. २६. भणंग=भिकारी.

चालविती । ती । कुंजवनीं स्मर संजिवनी ते । मंजुळ मंजुळ ते जप जपती । पैंजण आँदू[27] पैज बोलती । तुरें[28] तीं चि नूपुरें[29] वाँजती । छननं छननं अलाप रागें । तननं तननं मृदंग झल्लरी । झननं झननं विमान घंटा । घननं घननं । रागोद्धारी । हृदय विदारी । सुरासुरी घेउनी बाँसुरी[30] । गात सुस्वरी । किन्नर घे करिं महा हुनेरी । चित्त हरीती विरक्त योगी । सक्त कराया । कामयुक्त हीं । श्वेतरूप पक्षांचीं युग्में वृक्षावरूनी । पक्ष पसरूनी मन्मथ क्रीडा करिती त्यांतें । वेडावुनि उन्मत्त स्त्रिया त्या । करीं घेउनी खदखद हंसती । वसन आणि कुच कैंसणी[31] फेडुनि । ऑसन दाविति चौऱ्यायसीचें । आसन लीला सेउनि दाविति । नाना लीला काम-कळीला । खुलवायास । वपू हि उघड्या कितीएक त्या फेडुनि लुगड्या । धीट धांगड्या । धांगडधिंगा । अंग मोडुनी पिंगा देती । अनंगा-चिया रंगा येउनि । रंग पाहुनि ढंग मांडले छंद तालस्वर थैं थैं थैं थैं । मंद मंद हें नृत्य करीती । गंध फुलांचे गेंद घेउनि भारमदें बहु मार करीती । वारंवारि तरवारीचे वार । परांचें हृदय वेधिती बुद्धि जाउनि शुद्धि हरीती । युद्धीं ज्यापरि शूर चि जैसा । शूक हि तैसा । धीर वीर तो धीमहीच्यौं[32] । अधीन नव्हे पराधीन । अधिष्ठानीं । निचेष्टित मनीं ब्रह्म निष्ठ शिष्ट वाक्य योगवासिष्ठ ग्रंथि-चीया । अर्थग्रंथिची जैंडी[33] छेदुनी अखंड निर्गुण समाधि संधी । अबाधीत सुख रमाधिशाच्या । अनुग्रहें विग्रहें चि अंतरि । आवरिलें त्या मन्मथ अरिला श्रीशुक० ॥ ११ ॥

त्यांत मुख्य ते रंभा रमणी । खंजननेत्री[34] । कुंजरगमनी । पुढें पातली मन्मथ-रमणी । चंचळाक्षि ते अचंळांतुनि । कंदुकाकृति[35] । बंधुकाननी[36] । नेम-संदुके[37] लक्ष लावुनी । निकट जाउनी । स्नेह दाउनी । तपोधनाच्या अपोशनातें[38] वश्य कराया । हास्यकरुनि मग विकसित वदना । मदन त्दष्टवी । मिष्टमिष्टशा गोष्टि वदे परि । दुष्ट अंतरीं जशी कातरी । येकांतीं कांता ते बोले कांता येथें न दिसे तुमची । कांति अशी कां अकांतवीली । न बोलाचिकां अबोला हा । आह्मांसि धरिला । असे कसे तुम्हि तपप्रमत्त । कठोर चित्तें तुम्हां जनांचीं ! तापसांचीं । कापसासम । मृदू असावीं । हृदय निरंतर शुष्क वचनीं । मिथ्या आतिथ्याची रीती । स्नेह भरित सामोरे जाउनी उठा बसा हें कांहिं च नाहीं । परास्त्रिये त्वां दूर असावें । ईश्वरआज्ञा तीस पुसावें । भजनद्वारीं नित्य धसावें ।

---

२७. आंदू=बिडी. २८. तुरें=वाद्यें (सं० तूर्य). २९. नुपुरें=पैंजण. ३०. बासुरी=अलगुजें. ३१. कुचकसणी=चोळी. ३२. धीमही=ध्यान. ३३. जडी=मूळ. ३४. खंजन=एका प्रकारचा पक्षी. ३५. कंदुक=चेंडु. ३६. बंदुकाननी=बंधुकमुखी (बंधुक=एका प्रकारचें फूल) ३७. संदूक=पेटी. ३८. अपोशनातें= ?

ब्रह्मीं अपपर तुम्हां नसावें । करणी वाणी कसें उगें असावें । समर्थ तप हें किमर्थ करितां । उलंघितां ब्रह्म अर्थ सरिता । व्यर्थ देह कां दंडुनि मरतां । काय न लाभे स्त्रीभोग भोगितां । या पहा मार्गे सरतां । छी छी मूर्खे गच्छ गच्छ तूं गच्छ गच्छ तृण तुच्छ अम्हांतें । निरी वरी तूं बरी धरीसि । परि निरीच्छ माझी । स्वच्छ वासना हरिचें देणें । अद्भुत केणें[३९] । खरें ऐक मुनि वारि[४०] पीउनि । जिवासि हा कां त्रास देसी । तनु क्षेत्राशीं यासि त्रासिसी । काय इच्छि मन अशा तपालें । शांतपणें हें अपूर्व दिसतें । पूर्ववयीं हें जेविल्याविणें अंचवणें । हें सेविल्याविणें । स्वाद सांगणें श्लेष्मास्त्रव ही उपद्रव मानुनी । घ्राण छेदणें हर्षें हर्षें । उपजल्याविणें । बारसें करणें । करितां आर्ष ह्मणावा जैसा । तैसा तुमचा पृथक् छंद हा । प्रथमवयीं वैराग्यपिसें[४१] हें । दिसों लागलें योगमिसें । हृद्रोग असे हा विश्वासें । मीं यथासांग सांगतें । तुम्हांस ऐकॉ खरें हें श्री शुकराया । शोक हराया । लोक तराया । कोकपुस्तका[४२] घोक घोक तूं । असे तेथिंचा । विषय इंद्रिया । जोड घालुनि कोडकौतुकें । गोड गोड रति सुखासि सांडुनि । वोढ तपाची द्वाड खोड हे । सोड सोड निग्रहो मनाचा । मद्गमनाचा मार्ग धरावा । स्वर्ग अर्गळा बार्गळ चित्तें । बाष्कळ बाष्कळ वदतां वक्त्रें । न चि तो शुक कामातुरिला ॥ श्री शु० १२ ॥

तरी च येथें जन्मा यावें । तरुणी कुचद्वय-पेटे घ्यावे । मन्मथ सरिता तरुनि जावें । तरुणी-संगें निसंग व्हावें । व्यर्थ चि कां तारुण्य हरावें । तृणासनाला काय करावें । सुख मंचकीं मंदिरीं भरावें । गाढालिंगनिं शयन करावें । मुखामृताचे स्वाद हि घ्यावे । येथें दंडुनि किती झडावें । शीत वातें हुडहुडावें । खुडखुड वाजति दंत स्वभावें । इंद्रियानें किती रडावें । म्हणाल कां हो अह्मां छडावें । हितोपदेशीं न चि चिडावें । भोग-सुखाला ऐक्य व्हावें । गृहाश्रमानें श्रमा हरावें । ज्या प्रीत्यर्थ तप आचरावें । षड्रस[४३] सेउनि तृप्त असावें । जिवात्म्यातें तोषवावें । न कळे तरि कौशिका[४४] पुसावें । अहा कपाळा किती हंसावें । गोंवळें[४५] वचनें व्यर्थ फसावें । श्री गुरु तुमचा

---

३९. केणें=माल, जिन्नस. ४०. वारि पाणी. ४१. पिसें=वेड. ४२. कोकपुस्तक=रतिरहस्य=कामशास्त्र. हा ग्रंथ कुक्कोक कवीनें केल्यामुळें त्या ग्रंथास कोकशास्त्र नांव पडलें. "कुक्कोकनाम्ना कविना कृतोऽयं श्रीवैन्यदक्षस्य कुतूहलेन । विलोक्यतां कामकला-सुधीरैः प्रदीपकल्पो वचसां विगुंफः ॥ १ ॥" ४३. षड्रस=गोड, खारट, कडु, तुरट, आंबट, तिखट. "रसो बहुविधः प्रोक्त ऋषिभिः प्रथितात्मभिः । मधुरो लवणस्तिक्तः कषायोऽम्लः कटुस्तथा" ॥ ३१ ॥ अध्याय १८४ शांतिपर्व-महाभारत. ४४. कौशिक=विश्वामित्र. ४५. गोंवळ=गवळी कृष्ण.

कृष्ण हि भोळा । सोळा सहस्र केल्या गोळा । अणिखी त्या गौळिणिंचा मेळा । भंवत्या अबळा । सुंदर सबळा । तितक्या भोगुनि ब्रह्मचारी । झकविलें तुज बरें विचारीं । वितरागी केला संसारी । अंकीं बैसवि गौरि बिचारी । उगाचि वदनीं नामोच्चारी । स्वामी तुह्मी साळेभोळे । डोळे लावुनी । अज्ञानाचे । खोळे दडतां [46]सांवळी मी षोडशवर्षा । कंवळी तनु हे । उ- तावळी मनिं ॲतां वाटते । ऐशा रानीं । माझि [47]शिराणी । आलिंगिन मीं उभय करांनीं । तुमची राणी । मुख्य घराणी । विकल्प न धरावा चि वरानीं । नेम निष्ठ मी । अनुच्छिष्ट हें शिष्ट वराया । कोरें पात्र । नाहीं स्पर्शिलें तीळमात्र । पवित्र गात्रें सेवीं सखया । उशीर न करीं अधर चुंबनीं । उद्धरिं मातें । करीं धरूनियां करसी अंगीकार । तरी मी तरु- णांगाची । सूख शेगडी । देउनि तूझी शितळ हुडहुडी । शांतवुनियां वेडी बागडी । भक्ती माझी शक्त्यनुसार । ते उपचारी । अर्पुनि फुकट निरंजनिं बसणें । प्रकट चि ऐसा । दास्य-विभागो । माझे मनें दृढ धरिला ॥ श्री शु० ॥ १३ ॥

बोले [48]ब्रह्मरात तपचंड । निश्चळ मळमूत्राचा पिंड । संचय होउनियां उदंड । मातलें हें स्त्रीचें बंड । भुलले कविजन अशासि लंड । मो[49]हमदिरेनें भंड उभंड । बडबडोनि श्रमविति तुंड । निःशंक मुखासि शशांक म्हणती । मृगांक तुळिती । नेत्र नासिका छिद्रें असती । मेकुड शेंबुड थेंबुड नाहीं । बिड- बिड लाळ थुंका पाहीं । मांस गोंठलें ते स्तन उठले । कविसि वाटले हेमकुं[50]भ हे । ऐसे वेडे । मदांध रेडे । मन्मथचाडे । भिडेभिडेनें । गाढवाचे घोडे म्हणती । कुडकुड हाडें । प्रत्यक्ष किडे । क्षतें पडतां चि । चिढे तेधवां आंतड्यावरि कातड्यानें । दुर्गंधि पीडेस्तव वेष्टुनि टाकियले । कुडें मडें हें । [51]अमेध्याचे सडेचि स्रवती । मूढ मोहारूढ होउनि । कुडीवासना । उडी घालिती । पूय-गर्तीं । दडी च देती । गडी तयांचे न हों च आह्मीं । पडी घेउनी । सुखी राहिलों । रंभे आली-वाट धरावी । चाट बोलसी । अचाट भलतें । नष्टे विषय भ्रष्ट वासना । निष्ठा कळली । चेष्टा करिसी । इष्टाचीच प्रतिष्ठा दाविसि । विटाळाचा जन्म गोळा । अधो ऊर्ध्वद्वारा लाळ । द्रवती मूत्र खळाळ । [52]अशुद्ध भळभळ । जंतू वळ वळ तंतू सूक्ष्म । मग गुंतुनि पडती दुष्ट । कोणी कुष्ट वाणी । पुष्ट हि अपान मार्गीं पचती । जैसीं मुतती कुत्रें त्यांचीं छत्रें उठती । तशा तूझिया पासुनि

४६. सांवळी मी षोडशवर्षा=श्यामा षोडशवार्षिकी. ४७. शिराणी=आवड. ४८. ब्रह्मरात=ब्रह्मनिष्ठ ? ४९. मदिरा=मद्य. ५०. हेमकुंभ=सुवर्णकलश. ५१. अमेध्य=अशुद्ध=रक्त.

विषय-वल्लरी । उदकानें टवटवीत तेजें । शृंगारूनियां । नर्कमंदिरीं गर्क जाहलां । मूर्ख अशा तुह्मि तर्क कराया । यौवन जाइल, मग जरा करील । जर्जरा चि यातें । उंच कूच हे दुष्ट मदानें । डंचावले नर लांचावले कां चर्ममयी त्या चर्म-पिशव्या । घर्मजन्य शिरिं केशिं उवा । वदन बोंयरें । नेत्रिं पू भरे । शरीर अवघें । थरयर कांपें । सर सर सर तूं दूर मागें वरि वरि आंगें । वृंदीवनशी । गोड बोलशि तुं खोड स्त्रियांची । गोड बोलणें । मग सद्वृतिला पुढें लावणें । कर्म-कोथळी । वर्म तूमचा । निष्ठुर ऐसें रंभा परिसुनि चित्तीं । शब्द खोंचुनि । लज्जा वेंचुनि । जघनीं मुक्त केलें निरिला । निर्दोष हत्कोश चिरोनि । शुकापुढें दाखविला॥ श्री शु० ॥ १४॥

रंभा भरली क्रोधभरानें । भ्रमा पावली गर्वमदानें । शुंक्तिपुटें सम उदर गोमटें । पदर चाउनि । अधरत्वचेचा । उघडुनि लावण्याची पेटी । पोटीं त्या तेजाची कोटी । चंद्र कोटी । अर्कांचा ही । अर्क संग्रहे । सकर्पूरमृग मदा सहित तो । सुंदर उदरीं गंध सेवितां । प्रकाशल्याची दीप्ति दाटली । तृप्ति वाटली । मधुकरास तो । वसंत चि ये । संपत्तिस तो मैवास येउनि । निवास केला । अक्षय तेथें नंदन वनिंचा । चंदन अत्तर इतर द्रव्य केशर मृगमद मैलागर । कृष्णागरादि सर्व हि कांहीं दर्प दाटले । सर्प पातले । कर्पूराचा । सुगंध रंभागर्भींहुनि संभवला । प्रत्यक्षापरि प्रमाण वाटतो । ऐसें ऐकुनि । नेत्रीं पाहुनि । शुक ही विटला । धिग् धिग् म्हणे मज जन्म जाहला । बारा वर्षें नर्क भोगिला । नव्हतें ठावें खेद वाटला । कळतें येतों या उदराला । ऐसा तो मुनिराज बोलिला । विगत गर्व ते रंभा होउनि । तपोवरिष्ठा । ब्रह्मनिष्ठा । साष्टांगें प्रणिपात घालुनि । बोले मी पातकी दुर्गुणी । तुतें निर्गुणा छळुनि पाहिलें । क्षमा क्षितीशा बहुत साहिलें । मुनिचिद्रूपा कृपा असो दे त्रपा लयातें । गेली अमुची सुरालयातें । येथें येउनि अपनयातें । नेहुनि देतों । वहन जयाचें । चौदंती[57] तो त्याची खंती । येउनि आधोपंथीं । आत्मारामा देखुनि हृदयीं । ओष्ठ चाउनी । कष्टी होइल असो तें आतां । ऐसें बोलुनि । विमान सज्जुनि । अपमानानें जर्जरभूता निर्जरि त्या त्वरें पावल्या हो निर्जर-पुरिला ॥ श्री शु० ॥ १५ ॥

निकट जाउनी श्रुतिरंध्रातें । भृत्य सांगती देवेंद्रातें । लज्जा-लांच्छन मुख-चंद्रातें । रंभादि त्या स्वर्गनायिका । शक्र सायका । पुण्यदायकांच्या नम्र तनूंतें । श्री शुकसमीं । नृत्य करित परि । वृत्ति तयाची ब्रह्मीं जडली ।

---

५२. वृंदावन=कडुवृंदावन नामक फळ. ५३. शुक्तिपुट=मोत्याच्या शिंपीचें पूड. ५४. मृगमद=कस्तूरी. ५५. मवास=लढाऊ, चोर. ५६. त्रपा=लाज. ५७. चौदंती=ऐरावत.

अ[५८]रुणाचळासनि अचळमतीनें । कामास्त्रातें छेदुनि विजयी वस्त्रें त्याला । पातें उघडुनि विनय तपातें । देखुनि तीच्या अवयवातें । लखुनि मातें समान नातें । भावें खें[५९]वों उदित मुनी तो । निष्कामत्वें । शुद्ध सत्वरत । तत्ववेत्ता । जोडुनि हस्ता । बोले प्रशस्त चित्तें । माते माझी जननावस्था । ऐक अ[६०]ळु माळ । कळतें जरि हें मजला तरि । मी बाळक होउनि तुझिये पोटीं काळ कंठितों । माते सांगुं काय । अंगि घाय भरिले । पूर्वकर्मकृत धर्म योगें । श्री कृष्णें अदृष्टि लिहिलें । कष्टें कष्टें मध्यें मुष्टि । शुष्क वोष्टिं शोषुनि । खितपत पूयें जठरीं । ए[६१]क तप मी तपलों । आप्त हरिविणें न दिसे कोणी । हर हर तें दुःख चि आठवतें । घटिका युग सम अटका सोऽहं । भजनीं नव्हे चि उदरीं कदापि सुटका । रस कटु माता तीक्ष्ण भक्षुनि क्षणक्षणां । वांग्यासम आंगीं होरपळें । मांसाचा गोळा । काळ कवळा तधीं पासुनी टपला तेव्हां । त्यातें त्रासुनि उदास जालों । दास हरीचा । आतां माते पुत्र-स्नेहें । रक्षीं म्हणतां । रंभा चित्तीं । करी अचंबा । सांबाहुनि आगळा । पाहुनि रंभा । दंभातीत । सु[६२]नितंबिनि मनीं आपुल्या दंग होउनि । सत्संगाचें वारें आंगीं । सद्गद आंगीं गद्गद कांपे । स्वेदकंपरोमांच थरारा । नेत्रीं धारा । अधरस्फूर्ती रुदन दाटलें । स्तवन मांडिलें । जळीं लवणसें वि[६३]षम सांडिलें । प्रांजळ मग गंगाजळ होउनि । अंजळि जोडुनि । मंजुळ बोले । हे सुज्ञा तुज । अज्ञानें मीं अशुद्ध वचनें । निषिद्ध केलें । नमन करुनियां योगींद्रातें । गुप्त पातली । गृहीं सु[६४]प्तली । ऐसें ऐकुनि इंद्रदुतांतें । प्रेरुनि अणितां । पंकजनयनी । संकोचानें वि[६५]बुधसदनीं धीटपणाचा लोले म्हणतां । स्वस्थ गच्छलों । अ[६६]लाद ठकलों । वचना तुमच्या चुकलों नसतां । त्याचा नेम हराया जपलों । सन्निध जाउनि कामहुकी न मुकलों । बहूत ब[६७]कलों । शेखीं[६८] उकलुनि । काय दाउनि थकलों । अपुले प्रतिज्ञेला मुकलों । वदनीं छकलों । असतां सुकलों । तेथुनि झुकलों । एथें यावया । पाय पाहवया । कारण ऐसा । योगी रोगी भोगीं विटला । वासनेचा आंगीं तुटला । स्वयें चिकित्सा त्याची केली । भोगाची निरीच्छता जाली । समूळ इच्छा शक्ती येथें यावया शक्ति खुंटली । भक्ति मुक्तिचीं पथ्यें सेविलीं । तथ्य भावना । सत्य वळखली । औषधीविणें व्याधि पळाली । सुखी असा निजपदीं बसा । न रुसा आम्हांसि । ऐसी रंभा

---

५८. अरुणाचळ=उदयपर्वत. ५९. खेवा=आलिंगन ? ६०. अळुमाळ=क्षणमात्र. ६१. एक तप=बारा वर्षें. ६२. सुनितंबिनी=सुंदरी-६३. विषम=वांकडें, द्वेष. ६४. सुप्तली=निजली. ६५. विबुधसदन=स्वर्ग. ६६. अलाद=अगदीं ६७. बकलों=बडबडलों. ६८. शेखीं=शेवटीं, अखेरीस (सं० शेषीं)

विनोद करितां। मोदें[६९]-भरानें पुष्प-संभारें । भरित पुष्प वर्टिते मुनिवरा। करावयातें । सकळ बरोबर । सुरवर किन्नर घेउनी । जयजयकारें । झोंका रे झोंका रे । म्हणवुनि दुंदुभिवरि[७०] रोष काढुनी । घोष मांडिला । दोष रहित-मुनि-यशासि वर्णिति आदित्य कदाचित टळेल नेमा । सिंधु कदाचित सांडिल सीमा। चळेल यद्यपि शेषनामा पाताळींचा । उत्तमोत्तमा तुझी ऊपमा । तूज विराजे । साम्राज्य सुख शांति । सुखासनिं । भाळि शुकाच्या अक्षता लावुनि । गेला तेथुनि सुराध्यक्ष तो । अंबरांतुनि[७१] पितांबराचे । रुमाल उडविति । धुमाळ वाद्यें । मार पिच्छकरि स्वच्छ चामरी । अमरेंद्रावरि । वारिति अमरी। अमरावतिला त्वरित पातला । चरित असें शुक विराग ज्ञानें । पराग सेवन करितां करितां । पावन होतो श्रोता वक्ता। उपजेनां तो अभय हरीचें । पुष्कळ पैका । प्राप्त गायका । भव्य भूषणें दिव्य वायका । ऐसा याचा छंद जयातें । घरीं पायका[७२] । सिद्धी सिद्धी रमानायका । प्रिय होउनियां । इंदिरेसैम[७३] मंदिर सुंदर । मंदरधर हरि । स्वैकंधरींची[७४] । प्रसादमाळा कंठी घालुनि । अति उत्किर्ती । भवखुंटीतें । सोडुनि हरि वैकुंठीं नेइल हें। सत्य वचन अमृतराय भक्तांसि वदला ॥ श्री शु० ॥ १६ ॥

समाप्त.

---

## अमृतरायकृत पदें.

अरे अरे कांहिं तरी सोय धरीं ॥ परम वरद कर सुरुचिर तरू नारायणपर धरुनि धरणीधर अनुदिनीं मनिं जप करीं ॥ १ ॥ नंदनंदन गोविंद दीन जन बंधु भवसिंधु उतरीं रे ॥ करुणावरुणालय[१]शरणागतपरिपालनपद वरीं रे ॥ २ ॥ पशुसम होउनि विषयीं न रत तूं परत परत अंतरीं रे ॥ भरीं भरुनि तूं घरीं रमसी परि श्रमसी गहन भवपुरी ॥ ३ ॥ अमृतराय तव पाय धरुनियां विनवी बहू बहू परी रे । दुर्लभ दुर्लभ नरतनु सखया वद वद वद नरहरी रे ॥ ४ ॥ ॥ १ ॥

अजब सखि लेना जगदंबा माताजका ॥ लुटु लुटु चाल चलनका चलना ॥ ध्रु० ॥ मंगलमूरत सूरत खुब सीस हारि गहरी है दूब ॥ येकरदन[२] गजबदन मदन सुख सदन सदन कर दे दौलतबिन तुलना ॥ १ ॥ लंबा पेट बडाना बा फराख मीसरीके मोदकके खुराख ॥ चुवा सुहावे चपल सवारी जडा-

---

६९. मोद=आनंद. ७०. दुंदुभि=नगारे. ७१. अंबर=आकाश. ७२. पायक=चाकर. ७३. इंदिरा=लक्ष्मी. ७४. कंधर=कंठ. १. वरुणालय=समुद्र. २. रदन=दांत.

वके जिननपर वारी ॥ कोउ पुछे तुम कहा जात हो हासत कहये अमृतरायसे मिलना ॥ २ ॥ २ ॥

वो नर कहां पावे निशिदिनी हरगुण गावे ॥ ध्रु० ॥ कुच रोटी कुच लंगोटीमा खुशाल गुजर चलावे ॥ १ ॥ मिनत करकर देवे तो बी पैसा हात न लेवे ॥ २ ॥ दो दिनके दूनया मो बाहवा करकर जावे ॥ ३ ॥ अमृतरायके नामसुधारस मन भर पुरवी लावे ॥ ४ ॥ ३ ॥

हे दारा ॥ मांडी घरीं विदारा ॥ रे रे विषय उदारा ॥ या स्त्रैण[३] कुजन सरदारा ॥ या शरीरमळकेदारा[४] ॥ करीं मुकुंदाराधन भजभज कृष्णा प्रणतमंदारा[५] ॥ १ ॥ दारा० ॥ ध्रु० ॥ हे कांता ॥ इच्छी मनिं एकांता ॥ नातरि करि आकांता ॥ तपते सम रविकांता ॥ गृहकांतारी कांतारीं[६] हे आठविं तूं श्रीकांता ॥ २ ॥ हे जाया ॥ इच्छी बाहिर जाया ॥ बसे स्वहित वर्जाया ॥ प्रीती न हरिसि भजाया ॥ जायाची तनु रक्षीं बाहिर जाऊं नेदि निजाया ॥ ३ ॥ या मारा[७] ॥ वश्य तुं कां सुकुमारा ॥ विसरुनि काळकुमारा[८] ॥ खेळवितोसि कुमारा[९] ॥ नेणसि भवशुशुमारा[१०] ॥ स्वःसुभारा चित्रगुप्त तो लिहितो दुरित तुमारा ॥ ४ ॥ हे नारी ॥ विषयबंध नेणारी ॥ मागे कांचन भारी ॥ कीं लुगडेंजरीकिनारी[११] ॥ नारीकेळतरुछाया त्यज भजत अमृतेश्वर नारी ॥ ५ ॥ ४ ॥

हरिं हा देव तो रे ॥ ध्रु० ॥ शिष्टाईला घरा आलिया न येती सामोरे ॥ म्हणउनि मेलीं कौरवपोरें ॥ १ ॥ पादसेवनीं श्रीलक्ष्मीचे हात जाले गोरे ॥ त्यातें लेववि सोनियाचे दोरे ॥ २ ॥ अमृतकवीचे गुणगण गातां केश जाले भोरे ॥ बुद्धि न चाले म्हणउनि कागद राहिले कोरे ॥ ३ ॥ ५ ॥

हा देह जाईल रे पुण्य कामा येईल ॥ ध्रु० ॥ मोहित होउनियां विषयीं किति करसिल बाइल बाईल ॥ १ ॥ जोंवरि आंगीं शक्ती जवळी धन तोंवरि ते गीत गाईल ॥ २ ॥ अमृत म्हणे सर्व त्यागुनि हा हरि हरि म्हणतांचि सार्थक होईल ॥ ३ ॥ ६ ॥

सखे हो ब्रह्म सदोदित एक ॥ ध्रु० ॥ वेदांतश्रवण जइ कीजे ॥ आत्मानात्म विवेक ॥ १ ॥ जरी गुरुराज करी करपात्रें ॥ अमृताचा अभिषेक ॥ २ ॥ ७ ॥

हें फार खोटें रे हीन केलें पोटें ॥ ध्रु० ॥ साराचें हि सार आयुष्य मोठें ॥ तें चाउलें हात बोटें ॥ १ ॥ रामनाम मुखीं न आलिया काळ ॥ घोटिल एक्याचि घोटें ॥ २ ॥ सर्वांभूतीं राम नेणुनि कैसा ॥ वाहावसि पाहें लोटें ॥ ३ ॥ रामना-

---

३. स्त्रैण=स्त्रीलंपट. ४. केदार=शेत. ५. मंदार=कल्पवृक्ष. ६. कांतार=अरण्य. ७. मार=मदन. ८. कुमार=वाईट मारहाण. ९. कुमार=मुलगा. १०. शुशुमार=पाणडुकर. ११. जरीकिनारी=जरीकांठी.

म जप सांडुनि व्यर्थ ॥ वाग्जल्प कीजे होंटें ॥ ४ ॥ अमृत म्हणे राम चिंतुनि राहीं ॥ संतसमागम जोटे ॥ ५ ॥ ८ ॥

काय केलें रे गुरुचरणीं लागुनी ॥ ध्रु० ॥ वेद पढुनि निज खेद न जाउनि भेदनवतीला जरि न शमवीलें ॥ १ ॥ श्रीमद्भागवताशय ऐकुनि आग्रह बुद्धिस जरि न दवडीलें ॥ २ ॥ सर्वांभूतीं वासुदेव हें नेणुनि हरिचें चित्त दुखवीलें ॥ ३ ॥ अमृत म्हणे सम सकळ हि लोकीं भला भला जरि वाक्य न म्हणवीलें ॥ ४ ॥ ९ ॥

निजपद पावूं ॥ जगदंबा वदनीं गाऊं ॥ ध्रु. ॥ पदतळ भाळीं कुंकुम वाऊं ॥ नेसवुं जरितारी पाटाऊं ॥ मूर्ति चतुर्भुज हृदयीं ध्याऊं ॥ जे जे स्त्रीमात्र ते ते जननी जाणुनि ब्रह्मभावना भाऊं ॥ १ ॥ दैवें मिळेल तें ची खाऊं ॥ लटिका संसार बहकाऊं ॥ नामस्मरणें मन समजावूं ॥ सर्व हि आत्मा मानुनि कोठें येउ न जाऊं ॥ २ ॥ धूप दीप नैवेद्या दाऊं ॥ सच्चित्सुखरूपीं मन लावूं ॥ आई आई हें बोलाऊं ॥ पदिंच्या प्रेमजळानें नैनतनु बोलाऊं ॥ ३ ॥ गुणदोषांचे मागें न जाऊं ॥ लोकीं समतेनें चि समजाऊं ॥ वगटा समूळ ही टाऊं ॥ शीतळ अमृतचरणतरुछाये माजी विसावूं ॥ ४ ॥ १० ॥

हृदयीं आला मनमोहन मुरलीवाला ॥ ध्रु० ॥ मदनतनु जितअतसिकुसुमाला ॥[11] मिरवे पीतांबर वनमाला ॥ मुगुटीं धरित मयूरपिछाला ॥ त्याहुनि वर कलगी खुलला गुल्लाला ॥ १ ॥ रुचली उंच घोंगडी त्याला ॥ प्रिय कोमळ तुळशीचा पाला ॥ चारित वृंदावनिं वत्सांला ॥ वाटे प्राणसखा हा चिमण्या गोपमुलांला ॥ २ ॥ पाहुनि उत्सव व्रजवनितांलों[12] ॥ करताळें ठेवी नवनीताला ॥ अंगुलिकांवरि सारुफळाला ॥ कांखे वेताटी हरि खोंवित जठरपुटीं वंशाला[13] ॥ गोरस गोपवधूंचे प्याला ॥ ढेंकर देउनि उदरीं घाला ॥ चिन्हें शुभ्र दिसती अधराला[14] ॥ ऐकुनि गाऱ्हाणें जननीला बहुत चि भ्याला ॥ ४ ॥ वाचुनि श्रीमद्भागवताला ॥ आशय पुसोनि बरा संतांला ॥ भूतमात्रीं भगवंताला ॥ पाहतां अमृतेश्वर हरि अवघा ची जाला ॥ ५ ॥ ११ ॥

श्रीहरि पूर्णव्यापक जगीं ॥ध्रु.॥ अंतर्बाह्य अभिन्नपणें तो ॥ दोर जसा भुजगीं[15] ॥ १ ॥ आटुनि पीटितां समरस लेशें ॥ जेवि सुवर्ण नगीं[16] ॥ २ ॥ अमृतपणें गोठुनि शशि[17] जाला ॥ अमृतेश्वर कलगी ॥ ३ ॥ १२ ॥

बये बये म्हणउनि पिउनि पय भययुत हरि सयेविण क्षय शिशुवय करवीलें ॥ १ ॥ काय केलें रे या नर देहीं ॥ धृ ॥ तरुणसमयतयिं हृदय विषयमय थै

---

११. अ. अतसी=जवस. अळशी. १२. वनिता=स्त्रिया. १३. वंश=मुरली. १४. अधर=खालचा ओंठ. १५. भुजग=साप. १६. नग=दागिना. १७. शशि=चंद्र.

थै थै सह गायन ऐकीलें ॥ २ ॥ भय नय[18] रय[19] गत मनहय[20] फिरवुनि अविनय तनय तनय आट हे चेवले ॥ ३ ॥ अव्यय[21] विसरुनि नरतनु व्यय कृत अमृत-म्हणे जय जय हरि हरवीलें ॥ ४ ॥ १३ ॥

जय जय श्रीकृष्णा श्रीकृष्णा ॥ दूरी करि भवतृष्णा[22] ॥ ध्रु० ॥ तुझी कथा सत्संगति गंगा यमुना वेण्या कृष्णा ॥ १ ॥ शरयू तापी भीमा गोदा रेवा[23] दिव्य पयोष्णा ॥ २ ॥ परम संकटीं वस्त्रें पुरवुनि बहिण रक्षिली कृष्णा[24] ॥ ३ ॥ अमृत सिधां कृष्णांतें वंदित व्यास कृष्णा नर कृष्णा ॥ ४ ॥ १४ ॥

भजा वो अंजनीसुत बलभीम ॥ ध्रु० ॥ हा भूगोल सर्षपसम[25] तोलित गणकु मुकाम ॥ १ ॥ बळ अद्भुत पावुनि रत चरणीं ॥ कुंतीचा सुत भीम ॥ २ ॥ यवनोत्कर्ष न साहे म्हणुनी ॥ बाटवि फार गनीम[26] ॥ ३ ॥ श्रीहनुमंत अखंड जपावा ॥ करुणाकर निःसीम ॥ ४ ॥ अमृत म्हणे निशिदिनि तो गावा ॥ अक्षय हा चि उदीम ॥ ५ ॥ १५ ॥

राम गावा हो सच्चित्सुख आत्मा ॥ ध्रु० ॥ अमल[27] कमलसम यमल[28] चरणिं मन रमल तरि च भव शमल हो ॥ १ ॥ विदुषमान्य[29] शरधनुष्यधरण कलिकलुष[30]हरण एक निमिषभर[31] गाहो ॥ २ ॥ कुवलयनयनिं[32] सितें[33] पिंवळें दिसतें घनसांवळें म्हणुनी मनिं कवळुनि घ्या हो ॥ ३ ॥ गीता उपदेशित भयभीता पीतांबरधर सीतानाहो[34] ॥ ४ ॥ लक्ष्मणसहित सुलक्षण क्षणभरि अमृतमधुरगुणगण ऐका हो ॥ ॥ ५ ॥ १६ ॥

बसुनि सुखे चिंतित जा रघुवीर ॥ ध्रु० ॥ अल्प सुखास्तव व्यर्थ विकुं नका क्षणिक अमूल्य शरीर ॥ १ ॥ चित्रगुप्त वरदास्त लिहितसे विषयाची तकरीर[34a] ॥ २ ॥ हरिभजनें कामादिक लपती मोठे सबळशरीर[35] ॥ ३ ॥ गुणलेखक मोहरीर[35a] अमृत घरिं बसल्या देत हरीर ॥ ४ ॥ १७ ॥

वाजवि करताळी करताळी ॥ गाउनि मृदंगताळी ॥ ध्रु० ॥ इहलोकीं सुख पावुनि जाउनि श्री हरिपद कौटाळीं ॥ १ ॥ श्रीहरिचे गुण गातां पळती दुःखाची पेटाळीं ॥ २ ॥ लाउनि बसणें टाळी परि मन जयासि जन हो टाळी ॥ ३ ॥

---

१८. नय=न्याय. १९. रय=वेग. २०. हय=घोडा. २१. अव्यय=ज्याचा नाश होत नाहीं असा. २२. भवतृष्णा=संसाराची आसक्ति. २३. रेवा=नर्मदा. २४. कृष्णा=द्रौपदी. २५. सर्षप=मोहरी. २६. गनीम=शत्रु. २७. अमल=स्वच्छ. २८. यमल=जुळें. (रामलक्ष्मण) २९. विदुष=विद्वान्. ३०. कलुष=पाप. ३१. निमिष=अत्यल्प काळ. ३२. कुवलय=कमळ. ३३. सित=पांढरें. ३४. नाहो=नवरा. (सं० नाथ). ३४. a. तकरीर=खोटा आरोप. ३५. सबळशरीर=बळकट आहे शरीर ज्यांचें असे (कामादिक). ३५. a. मोहरीर=देशपांड्याचा गुमास्ता.

निद्रा आळस जरि टाळी उमजे भवभुजंग वेंटाळी ॥ ४ ॥ अमृत कीर्तनीं संसाराची फार करि हेटाळी ॥ ५ ॥ १८ ॥

उंदीर देखुनि वचके ॥ तैसा काळालागीं न दचके ॥ १ ॥ म्हणउनी हरि भजिजे हरि भजिजे ॥ पदोपदीं संस्मरिजे ॥ ध्रु० ॥ दाटती कंठ कफानें। नाना देहीं उठती तुफानें ॥ २ ॥ वरडुनि घाबरे करिती ॥ असली सुबुद्धि ते ही हरिती ॥ ३ ॥ समर्थी म्हणती पैका वेंचू ॥ अंतरिं सहस्र तिडका विंचू ॥४॥ लागली देखुन उचकी ॥ स्त्रीसुतबंधु पैका उचकी ॥ ५ ॥ कंठीं कुडक्या मुद्या ॥ अवघी संपत्ति जाईल उद्यां ॥ ६ ॥ अमृतेंविण मति बरळा ॥ अंतरिं सावध तो एक विरळा ॥ ७ ॥ १९॥

हरि तू येयिं रे दासासि दर्शन देईं रे ॥ ध्रु० ॥ हें वय व्यर्थ चि गेलें पाहीं रे ॥ या संसारीं सार्थक नाहीं रे ॥ संचित मजला न दिसे कांहीं रे ॥ हरि तूं ये० ॥ १ ॥ आस तुझी धरिं कास निरंतर निशिदिनिं सन्निध राहीं रे ॥ हरि० ॥ सजाणा जातीचा कसाई रे ॥ सेना सद्वंशीचा नाहीं रे ॥ तेथें तंव न विचारिलें कांहीं रे ॥ त्याचा वैंपनीं पुरस्कर होउनि नृपतीची डोई त्वां केलीस नाहीं रे ॥ हरि० ॥ २ ॥ शबर किरात कोण बढाई रे ॥ तेथ वनांत वनफळ खाईं रे ॥ भाविक श्रीदामोदर राही रे ॥ अँघमर्षण मिसें कुणबटें सेतांत बांधिलासी नाहीं रे ॥ हरि० ॥ ३ ॥ नामा सुजात शिंपीभाई रे ॥ नेणों त्याची किती कमाई रे ॥ कैसा जालासी सुखदायी रे ॥ संपादुनि लौकिक तया घरीं दुध प्यालासि नाहीं रे ॥ हरि० ॥ ४ ॥ हरि तुझी काय वदूं चतुराई रे ॥ तुजला उत्तम मध्यम नाहीं रे ॥ आपुले चित्तीं विचारुनि पाहीं रे ॥ अमृतरायावरि कृपाळू जालास तरि गांठुडि तुझी कांहीं गेली नाहीं रे ॥ हरि० ॥ ५ ॥ २० ॥

राम गोसावी कीं जाहला अवघे मिळोनि पाहूं चला ॥ ध्रु० ॥ काढुनि मोतीयाची आंगी ॥ दिव्य विभूति लावी आंगीं ॥ जैसा भव्य पुरातन जोगी ॥ शरयूतीरीं बैसला ॥ १ ॥ फेंकूनि दिल्हा बादली चीरा ॥ वाटिला मोतियांचा तुरा ॥ फेडुनि पिवळ्या पीतांबरा ॥ वनीं वल्कलें नेसला ॥ २ ॥ अतां होऊनि बेजार ॥ काढी किनखापाची वीजार ॥ जैसी जुनी तुटकी पैजार ॥ तैसें राज्य झुगारिलें ॥ ३ ॥ धाडुनि लक्ष्मणा सुभटा ॥ चीक आणिला प्रार्थुनि वटा ॥ मऊ केशाच्या केल्या जटा ॥ दिव्य तांबड्या धगधगीत ॥ ४ ॥ उदास होऊनी सुवर्णनगीं ॥ सन्निध सीता बैसली उगी ॥ भेटीस नलगे परवानगी ॥ उघडें दर्शन चांगलें ॥ ५ ॥ भरतें रामातें विनवीलें ॥ त्यासी पादुका भाग्य दिल्हे ॥ चौदा वर्षें राज्य भलें ॥ करितील आतां पादुका ॥ ६ ॥ मर्दुनि रावणा

---

३६. वपन=हजामत. ३७. अघमर्षण=पापनाश.

थै थै सह गायन ऐकीलें ॥ २ ॥ भय नय[18] रय[19] गत मनहय[20] फिरवुनि अविनय तनय तनय आट हे चेवले ॥ ३ ॥ अव्यय[21] विसरुनि नरतनु व्यय कृत अमृत-म्हणे जय जय हरि हरवीलें ॥ ४ ॥ १३ ॥

जय जय श्रीकृष्णा श्रीकृष्णा ॥ दूरी करि भवतृष्णा[22] ॥ ध्रु० ॥ तुझी कथा सत्संगति गंगा यमुना वेण्या कृष्णा ॥ १ ॥ शरयू तापी भीमा गोदा रेवा[23] दिव्य पयोष्णा ॥ २ ॥ परम संकटीं वस्त्रें पुरवुनि बहिण रक्षिली कृष्णा[24] ॥ ३ ॥ अमृत सिघां कृष्णांतें वंदित व्यास कृष्णा नर कृष्णा ॥ ४ ॥ १४ ॥

भजा वो अंजनीसुत बलभीम ॥ ध्रु० ॥ हा भूगोल सर्षप[25]सम तोलित गणकु मुकाम ॥ १ ॥ बळ अद्भुत पावुनि रत चरणीं ॥ कुंतीचा सुत भीम ॥ २ ॥ यवनोत्कर्ष न साहे म्हणुनी ॥ बाटवि फार गनीम[26] ॥ ३ ॥ श्रीहनुमंत अखंड जपावा ॥ करुणाकर निःसीम ॥ ४ ॥ अमृत म्हणे निशिदिनि तो गावा ॥ अक्षय हा चि उदीम ॥ ५ ॥ १५ ॥

राम गावा हो सच्चित्सुख आत्मा ॥ ध्रु० ॥ अमल[27] कमलसम यमल[28] चरणिं मन रमल तरि च भव शमल हो ॥ १ ॥ विदुष[29]मान्य शरधनुष्यधरण कलिकलुष[30]हरण एक निमिष[31]भर गाहो ॥ २ ॥ कुवलय[32]नयनिं सित[33] पिवळें दिसतें घनसांवळें म्ह-णुनी मनिं कवळुनि घ्या हो ॥ ३ ॥ गीता उपदेशित भयभीता पीतांबरधर सीता-नाहो[34] ॥ ४ ॥ लक्ष्मणसहित सुलक्षण क्षणभरि अमृतमधुरगुणगण ऐका हो ॥ ॥ ५ ॥ १६ ॥

बसुनि सुखे चिंतित जा रघुवीर ॥ ध्रु० ॥ अल्प सुखास्तव व्यर्थ विकुं नका क्षणिक अमूल्य शरीर ॥ १ ॥ चित्रगुप्त वरदास्त लिहितसे विषयाची तकरीर[34a] ॥ २ ॥ हरिभजनें कामादिक लपती मोठे सबळशरीर[35] ॥ ३ ॥ गुणलेखक मोहरीर[35a] अमृत घरिं बसल्या देत हरीर ॥ ४ ॥ १७ ॥

वाजवि करताळी करताळी ॥ गाउनि मृदंगताळी ॥ ध्रु० ॥ इहलोकीं सुख पावुनि जाउनि श्री हरिपद कौटाळीं ॥ १ ॥ श्रीहरिचे गुण गातां पळती दुःखाची पेटाळीं ॥ २ ॥ लाउनि बसणें टाळी परि मन जयासि जन हो टाळी ॥३॥

---

१८. नय=न्याय. १९. रय=वेग. २०. हय=घोडा. २१. अव्यय=ज्याचा नाश होत नाहीं असा. २२. भवतृष्णा=संसाराची आसक्ति. २३. रेवा=नर्मदा. २४. कृष्णा=द्रौपदी. २५. सर्षप=मोहरी. २६. गनीम=शत्रु. २७. अमल=स्वच्छ. २८. यमल=जुळें. (रामलक्ष्मण) २९. विदुष=विद्वान्. ३०. कलुष=पाप. ३१. निमिष=अत्यल्प काळ. ३२. कुवलय=कमळ. ३३. सित=पांढरें. ३४. नाहो=नवरा. (सं० नाथ). ३४. a. तकरीर=खोटा आरोप. ३५. सबळशरीर=बळकट आहे शरीर ज्यांचें असे (कामादिक). ३५. a. मोहरीर=देशपांड्याचा गुमास्ता.

निद्रा आळस जरि टाळी उमजे भवभुजंग वेंटाळी ॥ ४ ॥ अमृत कीर्तनीं संसाराची फार करि हेटाळी ॥ ५ ॥ १८ ॥

उंदीर देखुनि वचके ॥ तैसा काळालागीं न दचके ॥ १ ॥ म्हणउनी हरि भजिजे हरि भजिजे ॥ पदोपदीं संस्मरिजे ॥ ध्रु० ॥ दाटती कंठ कफानें । नाना देहीं उठती तुफानें ॥ २ ॥ वरडुनि घाबरे करिती ॥ असली सुबुद्धि ते ही हरिती ॥ ३ ॥ समयीं म्हणती पैका वेंचू ॥ अंतरिं सहस्र तिडका विंचू ॥ ४ ॥ लागली देखुन उचकी ॥ स्त्रीसुतबंधु पैका उचकी ॥ ५ ॥ कंठीं कुडक्या मुद्या ॥ अवघी संपत्ति जाईल उद्यां ॥ ६ ॥ अमृतेंविण मति बरळा ॥ अंतरिं सावध तो एक विरळा ॥ ७ ॥ १९ ॥

हरि तू येयिं रे दासासि दर्शन देई रे ॥ ध्रु० ॥ हें वय व्यर्थ चि गेलें पाहीं रे ॥ या संसारीं सार्थक नाहीं रे ॥ संचित मजला न दिसे कांहीं रे ॥ हरि तूं ये० ॥ १ ॥ आस तुझी धरिं कास निरंतर निशिदिनिं सन्निध राहीं रे ॥ हरि० ॥ सजाणा जातीचा कसाई रे ॥ सेना सद्वंशीचा नाहीं रे ॥ तेथें तंव न विचारिलें कांहीं रे ॥ त्याचा वपनीं[३६] पुरस्कर होउनि नृपतीची डोई त्वां केलीस नाहीं रे ॥ हरि० ॥ २ ॥ शबर किरात कोण बढाई रे ॥ तेथ वनांत वनफळ खाई रे ॥ भाविक श्रीदामोदर राही रे ॥ अघमर्षण[३७] मिसें कुणबटें सेतांत बांधिलासी नाहीं रे ॥ हरि० ॥ ३ ॥ नामा सुजात शिंपीभाई रे ॥ नेणों त्याची किती कमाई रे ॥ कैसा जालासी सुखदायी रे ॥ संपादुनि लौकिक तया घरीं दुध प्यालासि नाहीं रे ॥ हरि० ॥ ४ ॥ हरि तुझी काय वदूं चतुराई रे ॥ तुजला उत्तम मध्यम नाहीं रे ॥ आपुले चित्तीं विचारुनि पाहीं रे ॥ अमृतरायावरि कृपाळू जालास तरि गांठुडि तुझी कांहीं गेली नाहीं रे ॥ हरि० ॥ ५ ॥ २० ॥

राम गोसावी कीं जाहला अवघे मिळोनि पाहूं चला ॥ ध्रु० ॥ काढुनि मोतीयाची आंगी ॥ दिव्य विभूति लावी आंगीं ॥ जैसा भव्य पुरातन जोगी ॥ शरयूतीरीं बैसला ॥ १ ॥ फेंकूनि दिल्हा बादली चीरा ॥ वाटिला मोतियांचा तुरा ॥ फेडुनि पिंवळ्या पीतांबरा ॥ वनीं वल्कलें नेसला ॥ २ ॥ अतां होऊनि बेजार ॥ काढी किनखापाची वीजार ॥ जैसी जुनी तुटकी पैजार ॥ तैसें राज्य झुगारिलें ॥ ३ ॥ धाडुनि लक्ष्मणा सुभटा ॥ चीक आणिला प्रार्थुनि वटा ॥ मऊ केशाच्या केल्या जटा ॥ दिव्य तांबड्या धगधगीत ॥ ४ ॥ उदास होऊनी सुवर्णनगीं ॥ सन्निध सीता बैसली उगी ॥ भेटीस नलगे परवानगी ॥ उघडें दर्शन चांगलें ॥ ५ ॥ भरतें रामातें विनवीलें ॥ त्यासी पादुका भाग्य दिल्हें ॥ चौदा वर्षें राज्य भलें ॥ करितील आतां पादुका ॥ ६ ॥ मर्दुनि रावणा

३६. वपन=हजामत. ३७. अघमर्षण=पापनाश.

कंटका ॥ स्वधर्म स्थापुनियां नेटका ॥ स्वार्जित राज्याच्या पादुका ॥ पायीं घालिल दिसताहे ॥ ७ ॥ येथें बहुत फार कष्टलों ॥ नाना दुःखांहीं वेष्टीलों ॥ ब्रह्मानंदांतुनी भ्रष्टलों ॥ होईल लाभ तेथेंहो ॥ ८ ॥ ब्राह्मण ब्रह्मनिष्ट भवताले ॥ राम दर्शनातें आले ॥ भगवच्चर्या करूनि जाले ॥ ब्रह्मानंदीं निमग्न ॥ ९ ॥ तेथें चांगला एकांत ॥ निवळ होताहे वेदांत ॥ क्षणभरी करूं चला विश्रांत ॥ हा रटधंदा सोडुनियां ॥ १० ॥ रामें सोडुनि दिधला कोप ॥ जटा गुंडाळुनि केला टोप ॥ केवळ वैराग्याचें रोप ॥ अक्षय्य शरीर रामाचें ॥ ११ ॥ करूनि पर्णकुटीची मठी ॥ भगवी ध्वजा उभवी गुढी ॥ नाहीं चोपदार देवडी ॥ दाही दिशा मोकळ्या ॥ १२ ॥ जवळी नाहीं मणी फुटका ॥ तेथें कैचा जरीपटका ॥ हा तव परमार्थ नेटका ॥ विवेकासी आणिला ॥ १३ ॥ सेवक अमृत राय भगवान ॥ त्याला अखंड हें चि ध्यान ॥ आपले जातीचें महिमान ॥ ज्याला त्याला आवडे ॥ १४ ॥ २१ ॥

अखंड हरि हरि वदा बापानों ॥ किति सेवाल धनदुर्मदा ॥ ध्रु० ॥ काय वाटेसी न मिळती चिंध्या ॥ काय भोपळा न मिळे दुध्या ॥ काय सृष्टींत आटल्या नद्या ॥ गेली घडि आजिची नये उद्यां ॥ १ ॥ काय सांडोनि गोष्टी खऱ्या ॥ काय दुष्काळ पडिला कऱ्या ॥ काय महर्ग तृणाचा बोऱ्या[३८] ॥ ह्या तों शुकाच्या गोष्टी बऱ्या ॥ बापानो० ॥ २ ॥ काय लोकीं दारोठे रोधिले ॥ काय न घालिती चार जोंधळे ॥ काय ग्रामांत नसती देउळें ॥ नका सेऊं दुर्मद आंधळे रे बा० ॥ ३ ॥ बाहु असतां आपणापाशीं ॥ तेथें कशास पाहिजे उशी ॥ काय अडचण महदाकाशीं ॥ काय पृथ्वी ठाव नेदी कुशी ॥ रे बा० ॥ ४ ॥ कर जोडुनि अमृत विनवितो ॥ भुज उभारोनी गर्जतो ॥ जो निश्चय धरोनि बैसतो ॥ त्यासी बसले ठायीं देतो ॥ रे बापानो अखंड० ॥ ५ ॥ २२ ॥

वैराग्यभाग्यासारिखें भाग्य नाहीं ॥ ध्रु० ॥ परि तो विवेक मुख्य असावा ॥ साधनमात्रालागी विसावा ॥ संतसमागम वसावा ॥ संशय सकळ पुसावा ॥ किमपि नसावा कांहीं ॥ १ ॥ चिंध्या चिरगुटांची भरती ॥ ममता सारूनी परती ॥ देहींचीं दुःखें साहीं ॥ २ ॥ डोइस टोपी कीं चिंदोटी ॥ गडवा पुरे एक लंगोटी ॥ समयीं भाकरटुकडा रोटी ॥ वस्ती पर्णकुटींत ॥ हरि हरि जपूनी राहीं ॥ ३ ॥ हत्ती घोडे पालख्या उंटें ॥ त्याचे मागें उदंड झटें ॥ कारभाराचें व्यसन खोटें ॥ जैसे फुटके पेटे ॥ बुडविती मध्यप्रवाहीं ॥ ४ ॥ सेवक अमृतराय संतांचा ॥ हा चि पूर्ण मनोरथ त्याचा ॥ अर्पित काया मन वाचा ॥ अंतर्बाह्य साचा ॥ यासि विठ्ठल रुक्मिणी माया ॥ ५ ॥ २३ ॥

---

३८. बोऱ्या=चटई, हांतरी.

अज्ञानाचें जें वारूळ ॥ त्यांत दोरीचें महांडुळ[39] ॥ डसलें नसतां ही समूळ ॥ उगेंच मन हें भय पावे ॥ १ ॥ सखया धांव पाव सद्गुरुराजा ॥ गुणियाच्या गुणिया० ॥ ध्रु० ॥ नव छिद्रांची फुटकी नांव ॥ तींत येकाचाचि टिकाव ॥ मृगजळडोहीं गेला आव ॥ नकळे माव हे याची ॥ २ ॥ शुंक्तिरुप्याचे[40] रुपये केले ॥ त्याजवर स्थाणु चोर आले ॥ अमृतसमान मूर्ख चेले ॥ यास्तव तुजला श्रमविती ॥ सखया ॥ ३ ॥ २४ ॥

सेविता श्रीगुरुकुळब्रह्म त्रैलोक्य गोकुळा ॥ दारापुत्र अनुकूळ ॥ आहे आहे नाहीं नाहीं ॥ १ ॥ तुटली संसाराची झेल ॥ भक्षी वाळला चि बेल ॥ साजोळे दिव्यासी तेल ॥ आहे० ॥ २ ॥ पुरे घोंगडेंसे छीट ॥ भिकेचें चि मूठ पीठ ॥ तेथें भाकरीसी मीठ ॥ आहे० ॥ ३ ॥ पोट मात्र भरायास ॥ न करी कोठें ही सायास ॥ तेथें खेटर पायास ॥ आहे आहे० ॥ ४ ॥ पोटिं लागतां चि भूक ॥ न ह्मणें शिळें साजूक ॥ पोळी पातळ नाजूक ॥ आहे० ॥ ५ ॥ होतां अरि निष्काम ॥ मुखीं आलें रामनाम ॥ मृदंगाचें काम ॥ आहे० ॥ ६ ॥ साचा अमृत परमार्थ ॥ न करि कोणासी वादार्थ ॥ घरी लागला पदार्थ ॥ आहे० ॥ ७ ॥ २५ ॥

जय जय श्रीरामा श्रीरामा ॥ दूरि करीं भवकामा ॥ ध्रु० ॥ तुझी दया तया वरी जेणें धरिलें मनोलगामा ॥ १ ॥ भरतखंडसेताच्या नरतनुशेताच्या साधिन मी हंगामा ॥ २ ॥ व्याही जांवाई सुत कांता न रुचे हा हांगामा ॥ ३ ॥ अमृतराय हरिभजनास्तव धंदा सोडुनि फिरतो रिकामा ॥ ४ ॥ २६ ॥

जय जय मल्लारी मल्लारी ॥ तूं आमुचा कैवारी ॥ ध्रु० ॥ विधि हर सुर नर तुजला ध्याती ॥ आदि करूनि शैलारी[41] ॥ १ ॥ चंपाषष्ठी कुळधर्मी जन ॥ जन अर्चिताती कैल्हारीं[42] ॥ २ ॥ देव्हारा बसवुनि हरि ॥ पूजीतो नंदाचा खिल्लारी[43] ॥ ३ ॥ अमृतेश्वर निज दरिद्र शत्रु ॥ ठोकितसे कैलारी ॥ ४ ॥ २७ ॥

अरे तूं भुलुं नको भुलूं नको ॥ स्वहिता अंतरसील ॥ देह पांचांचें पांचां पांचजण नेतील ॥ जीव हा अज्ञानी नेयाला ॥ धर्मदूत येतील ॥ हिशेब पापाचा पुण्याचाचि ॥ चित्रगुप्त घेतील ॥ १ ॥ केल्या कर्माचें फळ बापा ॥ अवश्य ते देतील ॥ १ ॥ वेदशास्त्राच्या उपदेशें ॥ निराभिमानी होय ॥ राहें लीनपणें सर्वांशीं जैसें पातळ तोय ॥ क्षमा आत्मत्वें धरावी ॥ अबोलणीं जणु भूय ॥ आ[illegible] विचारें पुसावी ॥ संतजनांतें सोय ॥ २ ॥ वैभव जायाचें पापबळें जाईल स[illegible] श्रीहरिची ॥ २ ॥ हरि हिरून नेईल ॥ होई सावध रे ॥ २ ॥ तरि च [illegible] होईल क्षेम कल्याणीं ॥ अमृतेश्वर देईल ॥ ३ ॥ २८ ॥

---

३९. महांडुल=एक प्रकारचा साप. ४०. शुक्ति=जींत मोतें असतात अशी शि[illegible]
४१. शैलारी=इंद्र. ४२. कल्हार=कमल. ४३. खिल्लारी=गुराखी, गोवारी.

या रे सज्जन हो यारे ॥ मनि धरूनि विनया रे ॥ होतो नाश वया रे ॥ यमास नाहीं दया रे ॥ हरिगुणवर्णन श्रवण मनन करूं काशि हे चि गया रे ॥ १ ॥ जारे श्रीगुरु लागिं भजा रे ॥ श्रीहरि लागिं वजारे ॥ निज गुन पर उमजा रे ॥ अंतर्मुख सुखवृत्ति करूनियां विषयस्मरण वर्जा रे ॥ २ ॥ कां रे जोडुनि बहुत टका रे ॥ संसारीं अटका रे घडे केंवि सुटका रे ॥ लोकप्रतिष्ठे साठीं ॥ देशोदेशा किति भटका रे ॥ ३॥ सारें चिन्मयरूपि असे रे ॥ हें गुरुलागिं पुसा रे ॥ महातत्व गंवसा रे ॥ प्रत्यय किमपि न ये तरि क्षणभरि इच्छारहित बसा रे ॥ ॥ ४ ॥ यारे लोभ मनांत वृथा रे ॥ ऐका ईश कथा रे ॥ लागा संतपथा रे ॥ अमृतेश्वर हरि भजनें चुकती जन्ममरणचळथा रे ॥ ५ ॥ २९ ॥

गंगाधर संगा येई रे ॥ ध्रु० ॥ संग असोनि निसंगा येई रे ॥ ध्रु० ॥ धृतचंद्राचें वाहन जाणुनि ॥ करीं धरितोसि [४४]कुरंगा ॥ येई रे ॥ १ ॥ त्रिपुरसुंदरी चिन्मयगौरी[४५]स्मितमुखपं[४६]कजभृंगा ॥ येई रे ॥ २ ॥ गजचर्मांबर खपर मिरविशी भूषण भूति भुजंगा ॥ येईं रे ॥ ३ ॥ अति प्रतिकूल समाधिसी देखुनि करिसी दाह अनंगा ॥ येईं रे ॥ ४ ॥ मृड हर हर हें कीर्तन करितों ॥ घेउनि टाळमृदंगा ॥ येईं रे ॥ ५ ॥ आत्मतरंगाकार असो मति ब्रम्हाकार अभंगा ॥ येईं रे ॥ ६ ॥ शंकर सांब कुटुंबासह ये प्रेरुनि नंदितुरंगा ॥ येईं रे ॥ ७ ॥ अमृतेश्वर कवि कल्पतरूवरि अद्वयपक्षिविहंगा ॥ येईं रे ॥ ८ ॥ गंगा० ॥३०॥

उमाकांत कइ दाखविल चरण मला ॥ ध्रु० ॥ दशभुज कर्पूरगौर गौरी अर्धांग सांग गां[४७]गं शिरीं आर्द्र जटा तळिं शरच्चंद्रकला ॥ १ ॥ बह्मविद्र्यवर [४८]सैरिसृपोत्तरीया शिव तुरीय गिरिदरि गरि असित विष्णु मानवला ॥ २ ॥ निटि[४९]लीनन ॰टल भ्रूवल्लीमुलि पटविरहित कटि अजीन कुटी चका रामसमस्फाटिकाशिला ॥ ३ ॥ इंदीव[५०]रं करिं धरोनि उंदिरावरि बसोनि तिंदि विघ्नासि करि कुंदि तो सुत गमला ॥ ४ ॥ नंदिवरि आनंदि आनंदिसाहित देव बंदिजन वंदिति संस्तवतीं सुराशिवा अमला ॥ ५ ॥ अमृतकल[५१]शैंपाणि [५२]सांब मृत्युंजय नृत्यप्रिय श्रुत्यर्थाकार तो कृत्यकृत्य भृत्यपाल भला ॥ ६ ॥ ३१ ॥

चूर्णिका ॥ रे रे आदि[५३]राजवंशाव[५४]तंसीं ॥ स्वराज्यसरोवरवियोगितबालकलहंसा ॥ [५५]अंसावरूनि गलितोत्तरी[५६]यें पुं[५७]सीं ॥ चौसाचा गर्भ कं[५८]सारिगवसावयालागि धिं[५९]वसा

४४. कुरंग=हरिण. ४५. स्मित=गालांत हसणें. ४६. पंकज=कमल. ४७. गांग=[भा]गीरथीचें पाणी. ४८. सरिसृप=साप. ४९. निटिल=कपाळ. ५०. इंदिवर=कमल. ५१. [अ]मृतकलशपाणि=अ ृताचा घट आहे हातीं ज्याच्या. ५२. सांब=स + अंब (अंबे [स]हवर्तमान) ५३. आदिराजवंश=मनुवंश. ५४. अवतंस=भूषण. ५५. अंस=खांदा. ५६. [उत्त]रीय=अंगवस्त्र. ५७. पुंसा=हे पुरुषा. ५८. कंसारि=कृष्ण. ५९. धिवसा=उत्कृष्ट इच्छा.

करूनि वाजवितोसि निश्वसनधंसा ॥ तरि येथें पाहिजे अहिंसा ॥ तेव्हां चि हरि-दर्शनें होसील हिंसा[६०] ॥ अंगीकारावी उत्तरमीमांसा ॥ शीर्ण[६१]पर्णानिला[६२]हारें शुष्क करावें स्वदेहमांसा ॥ सांसारिक दुःख विध्वंसावयालागिं आत्मप्रशंसा ॥ विवर्जित परमहंसा[६३]चिया पादपांसा[६४]माजि सांसारिक जनरहित असावें ॥ केवळ विविक्तदेशीं[६५] संत्यक्तदुर्वासनारचितमृदुआसनावरी कैशादिवासनायुक्त हरिउपासना करित बसावें ॥ ब्रह्मादिभुवन भोगीं रुसावें ॥ यदृच्छालाभ[६६] संतुष्ट द्वंद्वातीत[६७] विमत्सरपणें विलसावें ॥ अमानित्वादि साधनें भगवद्गीतेसी पुसावें ॥ अंतर्बाह्य वैराग्य भाग्यामाजी योग्य सदाचरणें मनास कसावें ॥ दुराग्रह वितंड वाद न करूनि सच्छास्त्र सद्गुरुवाक्य परिसावें ॥ तार्तीय[६८]भागउर्वरीत[६९] शार्वरीत[७०] उठावें ॥ निर्लज्जपणें चित्त वठावें ॥ ब्राह्म मुहूर्ता[७१] पासुनि शय्यासनस्थ नित्य परीक्षा परब्रह्म वस्तु अनुभवुन सहस्र दळपंकजीं[७२] सद्गुरुध्यान मानसपूजन आजपाजपानंतर प्रातःस्नान संध्या ब्रम्हसनातन[७३] जप करूनि यथापद्धति वैदिक तांत्रिक मिश्रित परमेश्वरार्चन आरंभावें ॥ पुरुष-सूक्तोक्त षोडशोपचारें यथापद्धति लब्धोपचारें तन्मयतेनें शैली[७४] दारुमयी[७५] लेप्या[७६]-लेख्या सैकती[७७] सूर्यमंडळीं जळीं स्थळीं अष्टमूर्तिस्वरूप श्रीहरिस पुजावें ॥ स्वस्ति-कासनिं निमीलिताधरा[७८]वियोगी दंतपंक्ति अस्पष्टरशनासमकाय[७९]शिरोग्रीवं[८०] अर्धोन्मीलित नेत्र तत्परमुद्राधृत हृत्कमलीं महाविष्णुचें ध्यान धरावें ॥ चरणकमळीं नाभिकमळ कमळमाळामंडित हस्तकमळीं मुखकमळीं नेत्रकमळ हा विमळ कमळविग्रहा भक्त मनोभ्रमर जीवन साधक नेत्र षडद्वंद्वाराम सजल जलदश्याम कनक मुकुट कनक-हार कनककुंडल कनककेयूर कनककटक सौंदर्य कटकाकाति अकपट अतिं निकट कनकवृष्टिकारक परम प्रसन्न ईषद्धास्य वरदानाभिमुख चतुर्भुज शंखचक्र-गदापद्मपीतांबरधर आपादलंबिनी वनमाला ॥ कालत्रयाबाधित सत्यज्ञानानंदैक-मुर्तीच्या एकैका अवयवीं चित्त स्थिर करित जावें ॥ शनैः शनैः अजितरूप चिंतावे ॥ चिंतितां चिंतितां नखशिख चिंतावें स्वेद[८१] रोमांच वाक् गदगदादि भगवत्प्रेमानंदमग्नतेनें साक्षात्कारें सकलमनोरथसिद्ध होउनि निजानंदपदीं पावावें ॥ ऐसा बहु बहु प्रकारें सज्जनसांप्रदायें शिक्षिला ॥ मग दीक्षाधिकारार्थ पूर्णकृपा-

---

६०. हिंसा=थंड गार. ६१. शीर्ण=सुकलेले. ६२. अनिल=वारा. ६३. परमहंस=संन्यासी. ६४. पांस=धूळ. ६५. विविक्त=एकांत. ६६. यदृच्छालाभ=नशीबानें होणारा लाभ. ६७. द्वंद्वातीत=सुखदुःखादि जाड्यरहित. ६८. तार्तीय=तिसरा. ६९. उर्वरीत=शिल्लक. ७०. शार्वरी=रात्र. ७१. ब्राह्ममुहूर्त=पहाट. ७२. पंकज=कमल. ७३. सनातन=शाश्वत. ७४. शैली=दगडाची. ७५. दारुमयी=लांकडाची. ७६. लेप्य=चित्र. ७७. सैकत=वाळवंट. ७८. निमीलिताधर=मिटलेले ओठ. ७९. काय=शरीर. ८०. ग्रीवा=मान, कंठ. ८१. स्वेद=घाम.

कटाक्षें लक्षिला ॥ दक्षिण श्रवणि लागुनि श्रवणें मनादि इंद्रियांसि न कळतां प्रणवसहित द्वादशाक्षर वासुदेवमंत्र उपदेशिला ॥ आत्मकंठकोपनिषदोक्त स्वात्योदक बिंदु श्रवणशुक्तिपुटीं प्रवेशला ॥ अहमादि वासुदेवेत्यनुभवें अंतसमुद्रीं उज्वलित मुक्ताकारें आवेशला ॥ कंठगत चामीकरवत् गुरूपदिष्ट अदर्शदर्शनें लाभला ॥ एवं देशिकराय प्रदक्षणुनि नमस्कारिला ॥ प्रशस्त कालिंदीतीरीं स्थिर जाहला ॥ तो निर्गुणप्रतीति पावला ॥ असतां ही सगुणसाक्षात्कारार्थ मधुवनीं चालिला ॥ १ ॥

कडवें ॥ पांचा वरूषाचें मूल ॥ कदा न करी मुळमूळ ॥ खाउनि कंद फळ मूल करि पातक निर्मूल ॥ मूल मंत्र जपुनि देव पूजी जाणुनि वाहे फूल ॥ सेवुनि कालिंदीचें कूल ॥ नेसुनि वल्कलें दुकूल ॥ ध्यात मानस अनुकूल ॥ जेव्हां भुकेची ये भूल ॥ तेव्हां म्हणे वायु भूल ॥ बांधूनि धैर्याचा पूल ॥ कदा न पेटवी चूल ॥ जसा शूलपाणी कंथा ना झूल ॥ तसा सुखें झुल्लतसे भक्तिपंथें टाकितसे पाउल ॥ शुद्ध इळु जेंवि तूल ॥ वस्तुमात्र वासुदेव हें चिंतन करि वसूल ॥ कदा व्याकुळ नोहे गोकूळ ॥ पतिस बकुळसुम सुकलसें वाहे ॥ मोकली तनु उकलुनि मग सकळ दिवस ढकलुनि स्वीय कलेवर शिशु कि विकळ तो आकळुनि मानसिं कल करूनि शाकशकल पिकलेंसें फळ तुळसीचें दळ अंजुळिनें जळ ॥ घेऊनि असुनि विजनीं वसुनि अर्चन हरिचें पूजन करित भजन चि प्रिय जाहला ॥ १ ॥

संतपदांची जोड दे हरि० ॥ ध्रु० ॥ संतसमागमें आत्मत्वाचा सुंदर उगवे मोड ॥ १ ॥ सुफलित करूनि पूर्ण मनातें ॥ पुरवित सर्व हि कोड ॥ २ ॥ अमृतेश्वर श्रीहरिभक्तांचा ॥ शेवट करितो गोड ॥ ३ ॥ ३६ ॥

गमन नसे ज्या गांवीं तेथिल वाट कशास पुसावी ॥ होऊनि गोसावी ॥ हरिकथाचि परिसावी ॥ ध्रु० ॥ भिक्षा मागुनि निस्पृहतेनें ॥ संगतिची पोसावी ॥ २ ॥ सुखें मिळो खंबाइत अथवा भगवी नेसावी ॥ ३ ॥ दुर्वाक्यें सोसावीं आपण अमृतवृष्टि वर्षावी ॥ ४ ॥ ३७ ॥

कोठें नव जावें नव जावें श्रीहरिलागिं भजावें ॥ ध्रु० ॥ दोचौदिवसां घाटा भरवुनि ॥ उदक करूनि च प्यावें ॥ १ ॥ समयीं आल्या अतीताशी ॥ यथाशक्ति भोजन द्यावें ॥ २ ॥ स्त्रीपुत्रादिक छळिती ॥ त्यांचें वचन उगीच सोसावें ॥ ३ ॥ श्रीमद्भागवतालागिं वाचुनि आपण आपणा उमजावें ॥ ४ ॥ स्वच्छंदें उठतां बसतां ॥ नामीं अमृतेश्वरासी गावें ॥ ५ ॥ ३८ ॥

---

८२. श्रवणशुक्ति=कान हीच शिंप. ८३. चामीकर=सोनें. ८४. देशिक=गुरु. ८५. कालिंदी=यमुना. ८६. प्रतीती=अनुभव. ८७. कूल=तीर. ८८. दुकूल=वस्त्र. ८९. तूल=कापूस. ९०. सुम=फुल. ९१. कलेवर=शरीर. ९२. विजनीं=एकांतीं. ९३. कोड=हौस.

मोहित होऊनियां फिरती अज्ञानाच्या राती ॥ ज्याला त्याला आवडे पिंवळी माती ॥ नगबज घालुनि त्रैलोक्यांत न मातीं ॥ वितभर पोटासाठीं देशोदेश जाती ॥ ऐशा योगें भगवंत कैसा भेटे ॥ विषय सेवितां आयुष्य सर्व हि आटे ॥ ॥ ध्रु० ॥ रात्रिंदिवस अवघा काळ लोटे ॥ रुपये ढवाळिती माती त्याचे भूषण मोठें ॥ जोडुनि आणिती हिरवे पिवळे गोटे ॥ रचिती उराशिरावरि लोक मोठे ॥ २ ॥ बिंदुगोळक शुक्तिकेंत पडतां स्वाती ॥ त्याला भोळे लोक नेणुनि म्हणती मोती ॥ पाणीयाची किंमत करिती लक्षुनि ज्योती ॥ हरिगुण श्रवणा वांचुनि कंठीं श्रवणीं धरिती ॥ ३ ॥ कीटक मारुनि देशीं आळवितातीं जंतु ॥ शालारिवरमेंहे न व कांतण्याचे तंतू ॥ भूषण मानूनि गौरवितात नातू पंत तपायोगें म्हणवितात पंडित किंवा पंतू ॥ ४ ॥ करिति अलंकार गौरीवरि कापसाचे ॥ आपण कानीं घालिति काप साचे ॥ सेवुनि आशीर्वाद न घेती तापसांचे ॥ तेणें योगें पावती ताप साचे ॥ ५ ॥ आत्मज्ञाना विरहित देहीं ममता गाढी ॥ पाहुनि आरशांत सरसी करिति दाढी ॥ घेवुनि चिमटा पांढरे केंस काढी ॥ आपण सदन्न भक्षुन इतरा कदन्न वाढी ॥ ६ ॥ नश्वर देहा साठीं अक्षय करितो वाडे ॥ गुंतुनि ममता ते कामिनीचे चाडे ॥ पुराण ऐकुनि देखत देखत शहाणा नाडे ॥ तो हा अमृत इच्छितो संसाराचे सॅडे[94] ॥ ६ ॥ ३९ ॥

ॲतशी[95]कुसुमसम कांति हरिची ॥ सूक्ष्म तंतूचि उंच घोंगडी ॥ पदरीं तकटि कोर जरीची ॥ १ ॥ हे मथितां ममताचि गळाली ॥ रुॅक्म[96] दोरी दो करींची ॥ ॥ २ ॥ अमृत सदुदित चिंतीतसे ते ॥ मूर्ती यशोदेच्या हृदयींची ॥ ३ ॥ अतसीकुसुमसम कांति हरीची ॥ ४ ॥ ४० ॥

मन शमीं रंगलें ॥ अरुणतरणि[97]निभ किरण चरणतळ मम हृदया लागलें ॥ सगुण दिसे परि निर्गुण निष्फळ निज्ञानंदमय परब्रम्ह तें जिह्म[98]रहित सुब्राम्हण जाणती ॥ स्वसंवेद्यं[99] उगलें ॥ २ ॥ सत्वलभ्य अमृतत्व तत्वगत शांति परमळीं ॥ श्रांति पावूनि सकलावस्थातीत वीत[100]भय अनवरत[1] जागलें ॥ ३ ॥ ४१ ॥

ते हि माय पंढरीशी पाहिली ॥ ध्रु० ॥ जो जो येईल भेटि ॥ तो तो तराया साठी ॥ कटि कर ठेवूनिया राहिली ॥ ते हे माय पं० ॥ १ ॥

---

९४. साडे=समाप्ति. ९५. अतसी=जवस. ९६. रुक्म=सोनें. ९७. तरणि=सूर्य. ९८. जिह्म=कपट, वांकडें. ९९. संवेद्य=समजण्यासारखें. १००. वीत=गत. १. अनवरत=निरंतर.

## ॥ चिंतामणि विरचित सीतास्वयंवर ॥

होते अधी च सीतास्वयंवरोत्सव महीप जन कानें ॥
ऐकुनि गमनोत्सुक तों पाठविलें लग्नपत्र जनकानें ॥ १ ॥
झाली भोगार्ह वयें गुणें हि महिजा नवीन कनकलता ॥
यापरि धांवति यावद्भूगत भूपालभृंगजन कळतां ॥ २ ॥
होते सुरूप आधी परि भूषवितीं स्वदेह कनकानें ॥
नृप कीं पाहुन रूपा द्यावी सीता अम्हांस जनकानें ॥ ३ ॥
येतां नृप जनकानें बैसविले सर्व मांडवामाजी ॥
तों पाहति खिडकींतुन सीतेसह सर्व मांडे वामा जी ॥ ४ ॥
सिंहासनें नृपति ते आक्रमिती जेंवि केसरी शिखरें ॥
याला अनुगुण उपमा हे च मला भासली बरीशि खरें ॥ ५ ॥
पाहत असतां तनया विकसितनयना बरोन वसुधेची ॥
सर्व म्हणाति हे धारा क्षितिपतिनयना वरो नव सुधेची ॥ ६ ॥
चित्तें सीते वर नृप होते केवळ सभेंत देहांनीं ॥
मग सहज बाह्य विषयीं पदोपदीं अनवधान दे हानी ॥ ७ ॥
मग आणविलें धाडुनि गज हय वृषभाद्यनेक सामानें ॥
चाप तयांचें होतो जो सत्वर तुष्ट देवसा मानें ॥ ८ ॥
कथितां काय पशूंचीं पाहुं नका यातना थको दंडा ॥
आणिति असे जन यत्नें शकटशतें भूतनायकोदंडा ॥ ९ ॥
त्यजितां सभांगणीं तो जनकें हरचाप सापसा पडला ॥
भूपतिगण ही सज्जीकरणव्याधींत साप सांपडला ॥ १० ॥
तों येउनि चारानीं कथिलें जनका बहूत मोदानें ॥
कीं तो गाधिज आला ज्या लाजावें बहू तमोदानें ॥ ११ ॥
मग तो सत्वर भूपति जाय पुढें कीं तपःपद घराशी ॥
आलें सुकृतें दुर्लभ तरि गेला सत्य सापदघराशी ॥ १२ ॥
वंदुनि पूजुनि मग त्या जनक पुसे बा मुनीश सुकुमार ॥
सुगुण सुरूप सुलक्षण हे कोणाचे लसत्प्रभकुमार ॥ १३ ॥
ज्याचा न शत्रुहृदया त्यजुनि स्वप्नीं हि भयद शर यारे ॥

---

१. महीप=राजे. २. महिजा=सीता. ३. मांड=थाट. ४. वामा=सुंदर स्त्री. ५. केसरी=सिंह. ६. अनुगुण=योग्य. ७. सुधा=अमृत. ८. अनवधान=दुर्लक्ष्य. ९. भूतनाथ=शिव. १०. कोदंड=धनुष्य. ११. चार,=हेर, दूत. १२. मोद=आनंद. १३. तमोद=सूर्य. १४. सापदघराशी=विपत्तिसह पापपर्वत. १५. लसत्प्रभ=सुंदर.

त्याला च हे सुत नृपा बाप असें मानिती दशरया रे ॥ १४ ॥
नामें करूनि बापा सद्गुणसौजन्यधाम हा राम ॥
हा लक्ष्मण दोघेही शौर्यश्रीचे नृपा [16]महाराम ॥ १५ ॥
येणें चि पूर्ण केला मद्यज्ञ वधूनियां त्वनीक वनी ॥
याच्या च सतत रिझला भूपा [17]वल्मीकभू मुनी कवनीं ॥ १६ ॥
याच्या च [18]मार्गणीं ती भूपा सत्कारि ताटका [19]असुनीं ॥
पावे सद्गति कीं ते पावति दुर्गति न देति जे असुनी ॥ १७ ॥
येणें सुबाहु वधिला हें तरि किति शौर्य रामरायाचें ॥
एतत्करें च सर्व हि राक्षसगण भूवरा मरायाचे ॥ १८ ॥
जे स्त्री होय शिला तें कौशल याच्या च बा पदरजाचें ॥
हा तो च नृपा धरितो [20]घननादाचा हि बाप [21]दरें ज्याचें ॥ १९ ॥
भूपवरा हे आले स्वयंवरमहोत्सवा पहायास ॥
न कळे वाल्यें दुष्कर कीं सुकर [22]ज्याधिरोप हा यास ॥ २० ॥
मग तो शौर्य श्रीधर अवडे रघुराज तेंवि जनकमना ॥
देश जसा ज्यांत स्त्री वररूपा राजते [23]विजन [24]कमना ॥ २१ ॥
बहुवार रघुवरा मग पाहे वर्णुनि मनांत ही अपणा ॥
निंदी जनक स्मरुनी अविचारकृते[25]शधन्वभंगपणा ॥ २२ ॥
मग आदरें बसविला सभेंत कौशिक सशिष्य सर्षिगण ॥
तैं तींत शोभती ते रविशशिसे [26]भास्करान्वयाभरण ॥ २३ ॥
गुरुसह सभेंत येउनि बसतां [27]सूर्यान्ववायहीरमणी ॥
म्हणाति मनीं भूप दुज्या लभ्य न रामाशिवाय ही रमणी ॥ २४ ॥
तैं येक सखी वर्णुनि गुण भूपां दाखवी [28]धराजेतें ॥
तें ऐकुनि तोषविती चित्ता क्षणमात्र विविध राजे ते ॥ २५ ॥
हा तूं पहा महा गे गुणशाली [29]गुर्जरावनीप कधीं ॥
न त्यजुन यास सीते विषय करी [30]निर्जरावनीपकधी ॥ २६ ॥
यद्दंडभयें परधनवस्त्रा न शिवोन वायु वावरतो ॥
जो नाथ [31]अवंतीचा रुचल तरी गे नवा [32]युवा वर तो ॥ २७ ॥

---

१६ महाराम=मोठे बाग. १७. वल्मीकभू=वाल्मिकी. १८. मार्गण=बाण. १९. असु=प्राण. २०. घननाद=मेघनाद ( रावणाचा पुत्र ) २१. दर=भीति. २२. ज्याधिरोप=धनुष्यांला दोरी लावणें. २३. विजन=एकांत. २४. कमना=सुंदर.- २५. ईशधन्वभंगपण=शिवाचें धनुष्य मोडण्याचा पण. २६. अन्वय=कुळ, वंश. २७. अन्ववाय=वंश. २८. धराजा=सीता. २९. गुर्जरावनीप=गुजराथचा राजा. ३०. निर्जरावनीपकधी=इंद्राचें मन. ३१ अवंती=उज्जनी सभोंवतालचा मुलूख. ३२. युवा=तरणा.

हा शौर्योदार्यश्रीसदन मदनसा कलिंगनवराजा ॥
सत्वर वर हा च दिसे सीते तुज योग्यसंग नवरा जा ॥ २८ ॥
हा तरि पहा सुलक्षणशौर्यनिधी नाथ वंगवसुधेचा[33] ॥
हाच तुझा भोग करो एक जसा देवपुंगव[34] सुधेचा ॥ २९ ॥
हा तैलंगमहीपति ज्याच्या राज्यांत विप्र ताकास ॥
प्राशुनि राखिति अमृतद सुरभीची[35] जेंवि विप्रता कास ॥ ३० ॥
तो दावितो पहा वर सारुनि भूपाल [36]अंगदें शौला ॥
यातें वरुनि सीते शाश्वत तूं पाल अंगदेशाला ॥ ३१ ॥
तो निषधनाथ सीते जो झेलितसे महीप हारमणी ॥
याची हो तूं हा ची येक जगीं रिपुमहीपहा[38] रमणी ॥ ३२ ॥
हा काश्मीरमहीपति ज्याची पिळदार परम ही पगडी ॥
वक्र तुला हा च दिसे योग्य सये विजितपरमहीप[39] गडी ॥ ३३ ॥
किंचिद्वक्रितकंधर सखि तो च नरेंद्र मालवा वाहे ॥
मन्मन याजवळ तुझा न्हीनें मुखचंद्रमा लवावा हे ॥ ३४ ॥
केरलभूप पहा सखि बसलासे धरुनि तो कठार करीं ॥
जो बाल्यीं च रिपुगणा करिस जसा सिंहतोक ठार करी ॥ ३५ ॥
या परि नाना भूपां दावुनि मग ते रघूत्तमा दावी ॥
तैं सीतेचें किंचित् न्हीनें आंत चि मुखाब्ज मोदा वी ॥ ३६ ॥
किति मधुर पहा दिसतो सीते वीरासनस्थ हा राम ॥
धामनिधि श्यामतनु क्षाम नसे कामसा महाराम ॥ ३७ ॥
कुंडलमंडितगंड [40]श्रीखंडक्षोदलिप्त भुजदंड ॥
चंडद्युतिकुलमंडन[41] शोभवि यत्तनु अखंड कोदंड ॥ ३८ ॥
भूप त्वदर्थ सारे वहति मनीं जरि वहोत देवाचें ॥
ध्यान परी मन्मानस याचें नि तुझें च होतदेवाचें ॥ ३९ ॥
सीता वदे मला ही रुचला राघव शरत्सुधाकर[42] हा ॥
परि हे तातपणस्मृतिसवत वदे दाखऊन धाक रहा ॥ ४० ॥
अतिमधुरमृदुलतनु हा रघुनंदन वज्रसार हें चाप ॥
उचली कसा अशा गे कां फसला घालुनी पणा बाप ॥ ४१ ॥

---

३३. वंगवसुधा=बंगाल प्रांत. ३४. देवपुंगव=देवश्रेष्ठ. ३५. सुरभी=गाय. ३६. अंगदें=बाहु भूषणें. ३७. शाल=शालजोडी. ३८. रिपुमहीपहा=शत्रुनाशक. ३९. विजितपरमहीप=जिंकिले आहेत शत्रुरूपी राजे ज्यानें. ४०. श्रीखंड क्षोदलिप्त=चंदनाची पूड ज्याला चोपडली आहे असा. ४१. चंडद्युतिकुलमंडन=सूर्यवंशभूषण. ४२. सुधाकर=चंद्र.

तों कथिलें ध्या हें शिवधनु सगुण हि भूपजन करा ज्यानें ॥
करिजेल तद्वधू ही सीता हे स्पष्ट जनकराजानें ॥ ४२ ॥
ऐकुनि तें वच पाहुन चंड हि कोदंड नृप विचारांत ॥
पडले किति किति म्हणती जाउं पळुन तरि असे दिन न रात ॥ ४३ ॥
किति वदति अह्मा बांधुनि सीतावरणोत्सवें न दाव्यानें ॥
अणिलें इथें हराया तेज कशाचा विवाह दाव्यानें ॥ ४४ ॥
थकले ज्यास अणाया अनेक हस्त्यश्ववृषभ[४३]कासर हा ॥
तें धनु सज्य कराया नृप हो कसतां कशास कास रहा ॥ ४५ ॥
सीतामिष करुनि पुढें घालूं पाहे धनुष्यभंग गळां ॥
प्राण हराया कळला जनकाचा बेत हा अह्मां सगळा ॥ ४६ ॥
किति वदती सीतेस्तव काय म्हणुन हें धनू सजा उचला ॥
पडली न वोस पृथ्वी मिळल दुजी स्त्री पुरास जाउं चला ॥ ४७ ॥
तों रावण माशीरस्थित वाद्य[४४]ग्राम कडकडा गाजे ॥
तें दचकले नृप तसे पशु हि न ते प्राप्त कडक डागा जे ॥ ४८ ॥
अभिमुख जावुनि मग त्या बैसविलें अणुनि [४५]यातुरायास ॥
सत्कारुनि हि नृप ह्मणे हार तसा लावुं या तुरा यास ॥ ४९ ॥
पडतां दृष्टि अकस्मात् दशवदनाचा विरूप काय महा ॥
पळती दडती मानुनि सीतेसह सर्व बायका यम हा ॥ ५० ॥
मग तद्गुरू वदे हा सीतार्थ अला स्वयें च दे यास ॥
जोड नृपा सख्य सुता कोणास तरी हवी च देयास ॥ ५१ ॥
परि जनकें सूचवितां मंत्रिमुखें ज्याधिरोप दशवदनें ॥
करुनि [४६]स्मयें हि विस्मय केलीं प्रोत्फुल्लगल्ल दश वदनें ॥ ५२ ॥
बोले जनका न कसी मत्कीर्ति अली श्रुतींत सुरसा रे ॥
कीं घातले दशमुखें जिंकुनि कारागृहांत सुर सारे ॥ ५३ ॥
म्यां तो शैल उचचिला सेश्वर ही भूप जो [४७]नगामाजी ॥
मग या न कांबटावर शक्ति नृपा चढल काय गा माजी ॥ ५४ ॥
अणि सांगतों नृपा हें धनु गुरुचें शंभुचें जरी नसतें ॥
तरि म्यां मघां च उचलुनि मोडुन ही टाकिलें किं रे असतें ॥ ५५ ॥
मग नृप वदे हंसुनि तुज आली येथें च रावणा शंका ॥
गुर्वपमानाचि नगोद्धारिं न वदतोस काय निःशंका ॥ ५६ ॥

---

४३. कासर=रेडा, टोणगा. ४४. ग्राम=समूह. ४५. यातु=राक्षस. ४६. स्मय=हंसणें.
४७. नग=पर्वत.

मग रोषभरें रावण उचलूं धनुरुत्तमा जंवर धांवे ॥
तों विघ्नार्थ हराचे आरंभी स्त्रीसमाज वर धांवे ॥ ५७ ॥
लावुनि विंशति भुज ही कष्टें तेणें धनू उभें केलें ॥
परि गरिम[48]गुणें रावणबला न गणुनी अनल्प घे झोले ॥ ५८ ॥
तितक्यांत तो उचलिलें धनु द्या सीतेस म्यां च शर्वाचें[49] ॥
गर्वाचें सदन वदे तों होय म्लान तोंड सर्वांचें ॥ ५९ ॥
परि त्या झोल न साहे मग धनुसह भूतलीं अपटला जें ॥
दुःख न तें त्यास परी स्मितमुख भूभृद्गणा[50] निपट लाजे ॥ ६० ॥
रावणगतितें पाहुनि सर्व नृपांच्या भरे उरीं धडकी ॥
रडकी होय मुखश्री म्हणाति न गति आज हो दिसे धड की ॥ ६१ ॥
हृद्गत धनु मग काढुन सावध ही करुनि तोषवी राजा ॥
त्या अणि सचिवा सांगे उठिव अतां या अशेष वीरां जा ॥ ६२ ॥
मग तें सचिवें कथितां नृप हो धनुला गुणास योजावें ॥
कथुनि निमित्या वदले न उठूं आम्ही तुह्मीं पुढें जावें ॥ ६३ ॥
ते नृपदशा विलोकुनि बोले मिथिलेश तप्त रागानें ॥
राहो धनु हें ऐका नृप हो सोडुनि तरी दरा गानें ॥ ६४ ॥
राहो गुणा[51]धिरोपण परि एकहि भूप उचलुं ही न इला ॥
शक्त धनुर्वल्लीला झालि कशी हंत वीरहीन इला[52] ॥ ६५ ॥
झाली निर्वीर धरा हें वच रामा न शल्यसें साहे ॥
राहे विमनस्क[53] क्षण आज्ञेच्छू मग गुरुकडे पाहे ॥ ६६ ॥
द्या आज्ञा या धनुतें उचलुन वोढुन गुणाहि चढवीन ॥
कढवीन हृदय रिपुचें न वद कुवच हें नृपाहि पढवीन ॥ ६७ ॥
हें जीर्ण धनुष्य किती न पुरल माझ्या बलास हेमगिरी[54] ॥
परि सानुकंप[55] द्यावा गुरुजी कर वरद हा मदीय शिरीं ॥ ६८ ॥
गुर्वाज्ञा मग घेउनि उचलाया चाप राम तो कास ॥
कसि ते होय मुनिजना मुद्गर[56] तदधिक तदीय तोकांस[57] ॥ ६९ ॥
मग दडपितां पदाग्रें अग्रीं रामें उभेंच तें राहे ॥
धनु म्हणती मुनि भासे जाया मुनिचीच नीट हेरा हे ॥ ७० ॥

---

४८. गरिमगुण=मोठेपणा. ४९ शर्व=शिव. ५०. भूभृद्गण=राजसमूह. ५१. गुण=दोरी. ५२. इला=पृथ्वी. ५३. विमनस्क=दुःखी. ५४. हेमगिरी=मेरुपर्वत. ५५. सानुकंप=सकृप. ५६. मुद्गर=आनंदातिशय. ५७. तोक=बालक.

वांकवि वैरिमुखासह कीर्तिसह हि त्या गुणास मग जोडी ॥
वोडी सीता चित्तासह भृगु[58]जाहंकृतीसहित मोडी ॥ ७१ ॥
होतां भंग धनूचा कडकड भीम ध्वनी जगीं पसरे ॥
घसरे रविरथ विसरे रामजपा जानकी वरूं हि सरे ॥ ७२ ॥
मिटले डोळे किटले कान जगाचे समुद्र हि अटले ॥
तुटलें नभ [?] तों फुटलें ब्रम्हांड भयें झरे नगा सुटले ॥ ७३ ॥
भ्याले दिग्गज बोले नभ मेले भीरु भूमितल डोले ॥
सोले अहिशिर न्हाले घर्मभरें लोकपति भया त्याले ॥ ७४ ॥
विधि मातृहिंसका[59]च्या शिवलें तें बहुत हस्तराजीवां[60] ॥
शुध्यर्थ म्हणुनि वाटे रामकरीं करुनि दे त्वरा जीवा ॥ ७५ ॥
वधिले तद्योगें बहु नृप रामें करुनि जित्वराजीवा ॥
शुध्द्यर्थ म्हणुनि वाटे रामकरीं करुनि दे त्वरा जीवा ॥ ७६ ॥
जातां पण सिद्धिस तो नृप कौशल्यादि सर्व ज्या माता ॥
अणवि दशरथा ही कीं हो राघव शास्त्रपूर्व जामाता ॥ ७७ ॥
मग आनंदें जनक स्वसुतेचा सविधि हो विवाह करी ॥
तैं वाटलें समस्तां पडली साक्षाद्रमा विवाह[61]-करीं ॥ ७८ ॥
जातां विवाह अटपुनि राम स्वपुरास होय हो अडवा ॥
कडवा बहु तो भार्गव नृपकुलजलधीस मूर्त जो वडवा[62] ॥ ७९ ॥
तैं रामातें सूचवि लक्ष्मण ते कार्तवीर्यबाहु तरू ॥
झाले यत्परशुदवीं दशशत ही त्वरित जेंवि बा हुत रू[63] ॥ ८० ॥
वधितां जेंवि हरीनें पति कांपाति बहु करेणु[64] कापोत ॥
तेंवि नृपस्त्री म्हणुनी झाला जो एक रेणुकापोत ॥ ८१ ॥
जेणें रुधिरक्षालित केलि करुनि भूमिभृद्व्रण कु[65]ठार ॥
ज्याचा च ख्यात जगीं एक नृपति शोणितार्हण[66] कुठार ॥ ८२ ॥
तो हा गुरुधन्ववधक्षुभितमना पातला असे वाटे ॥
जमदग्निसूनु तरि त्या साधु वचें लाव राघवा वाटे ॥ ८३ ॥
तो भंज्यद्धनुरारवरुष्ट[67] वदे भार्गवार्षि रामातें ॥
वरिली कोणी शिवधनु मोडुनि भा वर्गवार्षि रामा ते ॥ ८४ ॥

---

५८. भृगुजाहंकृति=परशुरामगर्व. ५९. मातृहिंसक=आईला मारणारा ( परशुराम ). ६०. राजीव=कमल. ६१. विवाह=विष्णु ( गरुडवाहन ). ६२. वडवा=वडवाग्नि. ६३. रू=कापूस. ६४. करेणुकापोत=हत्तिणीचे बच्चे. ६५. कु=पृथ्वी. ६६. शोणित=रक्त. ६७. भंजद्धनुरारवरुष्ट=मोडलेल्या धनुष्याचे आवाजानें रागावलेला.

राम ह्मणे धनु मोडे मत्करयोगें स्वयें च किडकें कीं ॥
नसतां मंतु[६८] वदाया गरुडा ही धरिल काय भिड केकी[६९] ॥ ८५ ॥
रे भंगिलेंस रामा स्वर्थ शिवधनू न तें अघ स्मरतां ॥
परि जाण म्यां न धरिली अजुनी क्षत्रियकुलीं अघस्मरता[७०] ॥ ८६ ॥
राम वदे ते च न या द्विजभंगद शक्ति भार्गवा रामीं ॥
होइल तें हो हा तव परशूद्धृत भुजगमार्ग वारा मी ॥ ८७ ॥
मग मुनि बोले कोपुनि घे नव मच्चाप राम हा मोड ॥
मग तुज ह्मणेन राघव कुलांत रिपुवातसह महा मोड[७१] ॥ ८८ ॥
मग तें हि धनू चढवुनि दावाया राघव प्रताप सतां ॥
ईशत्व हरी मग तो अवलंबी भृगुज विप्र तापसता ॥ ८९ ॥
मग तो निर्विघ्नपणें सवधू श्रीराम पावला गांवा ॥
गावा ध्यावा वाटे हाचि मला सत्स्वभाव लागावा ॥ ९० ॥
इति श्रीज्योतिर्विद्राजजीवसूनु चिंतामणिविरचितः सीतास्वयंवरः समाप्तः ॥

---

६८. मंतु=अपराध. ६९. केकी=मोर. ७०. घस्मरता=घातुकपणा. ७१. मोड=अंकुर.

## धुंडिकुमार मोरेश्वरकृत

# चंद्रावळी[1]-आख्यान.

कुटिला[2] विमला मतिनें वंचितसे जो व्रजांत[3] जायांतें ।
नमुं त्या श्रीहरिचरणा दुर्धर संसार व्रजिनें[4] जायातें ॥ १ ॥
श्रवणीं वंशी वंशिध्वनि[5] संचरतां स्मरोनि कुंजातें ॥
युवतिजन चालिला त्या सुरभिसमय[6]समलता निकुंजातें ॥ २ ॥
त्या एकसरें उठल्या वाटाति गोकुलघनांतुनी चपला[7] ॥
किंवा व्रजकुंडांतुनि निघति स्मरवान्हिच्या शिखी[8] चपला[9] ॥ ३ ॥
स्वस्व गृहाहुनि सर्वहि गोरसविक्रय करावया रमणी ॥
निघतां सत्वर मार्गीं पाहति सहसा मुकुंद जारमणी ॥ ४ ॥
गोपावृत गोपाळा पाहुनि गोपी सशंक चालाया ॥
होउनि काय करावें म्हणती पशुपाळका कुचाळा या ॥ ५ ॥
चंद्रावळि या नावें मुखरिण गोपी बहीण रांहीची[10] ॥
धीट सुरूपा चतुरा संगति अवध्या दृढा धरा ईची ॥ ६ ॥
या परि निश्चय करूनी चालति मार्गें समस्त ही वनिता ॥
वनिं तांडव करि खांडव-रिपु[11]चा सारथिहि आत्मभू[12]जनिता ॥ ७ ॥
तों पथिं पेंधाप्रमुखा धांवति शिशु मुररिपू दयालु गडी ॥
अवरोधुनि तरूणीजन झोंबाति अर्वाच्य फेडुनी लुगडीं ॥ ८ ॥
सरकुनि चंद्रावळिनें पेंधा बडवुनि सवेग टाळीला ॥
स्फुंदत स्फुंदत सांगे हरि चल आणूं तये खटाळीला ॥ ९ ॥
अतिरूप सुवय यांनीं मानी तृणतुच्छ ऊर्वशी रंभा ॥
हंसगती पदिं चमके गमती नमितााति ऊर्वशी रंभा ॥ १० ॥
सूच्यग्रा परि मुळिंचा खंडित दिसतो वलित्रया मांज[13] ॥
विश्रुत मदनास तशा जपुनि चला हरि हरीं तिचा मांज[14] ॥ ११ ॥
पीनोन्नत[15] कुचं[16] वर्तुल स्मर[17]दुर्जयदुर्गयुग्मसे दिसती ॥
तनुवाङ्मन अति चंचल म्हणवी कुटिलालका[18] अनादि सती ॥ १२ ॥

---

१ चंद्रावळी=राधेची बहीण. २ कुटिला=कपटी. ३ व्रज=गोकुल. ४ व्रजिन=पाप, मल. ५ वंशिध्वनि=मुरलीरव. ६ सुरभिसमय=वसंतकाळ. ७ चपला=विद्युल्लता. ८ शिखा=ज्वाळा. ९ चपला=चापल्य युक्ता. १० राही=राधी ( राधा ). ११ खांडवरिपु=अर्जुन. १२ आत्मभूजनिता=ब्रह्मदेवाचा बाप ( कृष्ण ). १३ माज=कंबर. १४ माज=उर्मटपणा. १५ पीनोन्नत=पुष्ट व उंच. १६ कुच=स्तन १७ स्मर=मदन. १८ कुटिलालका=कुरळकेशी.

आति मृदुला करवल्ली सल्लील हि जीं सनाल कीं कमळें ॥
अद्भुत वदनश्रीची सुषमा[19] जो पाहतां मृगांक[20] मळे ॥ १३ ॥
विद्रुम[21] भंगाचे परि शोभे अधरोष्ठ नासिका सरला ॥
तिलसुम शुक[22]चंचूचा पाहुनि मदगर्व सर्व ओसरला ॥ १४ ॥
सर्वोत्कृष्ट विराजे चपलायत दृष्टि ते निकी लाली ॥
लज्जित शत[23]पत्रश्री मज्जन करिते गभीर कीलालीं[24] ॥ १५ ॥
यापरि सौंदर्याची सीमा कथितां हरि त्वरें उठिला ॥
खंडिन गर्व तियेचा दाखवि मजला कुठे उभी कुटिला ॥ १६ ॥
पेंधा श्रीकृष्णातें दाखवि दुरुनी सगोरसा महिलो[25] ॥
जीच्या सौंदर्यातें साम्यचि न मिळे ससागरा[26] महिला ॥ १७ ॥
चंद्रावळिच्या रूपा पाहुनि इच्छी हरी मनीं सुरता ॥
ते क्षणिं मूर्च्छित होउनि देवहि दवडी समग्र तो सुरतां[27] ॥ १८ ॥
ऐशा मतिनें यदुकुलभूषण तेव्हां सर्वे किशोरांसी[28] ॥
घेउनि गोपस्त्रीला मागत दधि दुग्ध तो यशोरासी ॥ १९ ॥
मस्तु[29]मिषें निजवस्तुसि याचित निस्तुलगुणी[30] स्त्रियांजवळी ॥
कस्तुरिलिप्त-स्तनिचा चित्तें [हरूनी?] हरी समाज वळी ॥ २० ॥
शपथपुरःसर करिसी जरि तूं संकल्प देहदानाचा ॥
तरिच घडेल सुकृत बहु नातरि यापरि घना सदा नाचा ॥ २१ ॥
बोलुनि मिथ्या पदरीं दुष्कृत कां व्यर्थ घेसि वाचाळा ॥
ठकविसि गोकुळतरुणी या तो स्याळिं सोड सर्व ही चाळा ॥ २२ ॥
नायिकसी चंद्रावळि जरि साधुत्वें मदुक्ति या परमा ॥
दाविन जनदृष्टीसी निरसुनि चैलीं[31] दिगंबरा परमा ॥ २३ ॥
सर सर परता दुष्टा क्लिष्ट न बोलें वरिष्ट मी जाया ॥
काय वदूं तुजसंगें पशुपा तटलें निजाश्रमीं जाया ॥ २४ ॥
दुर्धर सर्पिणि देहा स्पर्शिल हस्तानिं कोण तो भलता ॥
रक्षक असतां विपिनीं[32] रंका लाभेल केवि पुष्पलता ॥ २५ ॥
गरुडध्वजगारुडिया भारुड हें तूं किमर्थ दाखविसी ॥
तुजविषयीं मी न ढळें पंचाक्षरिमंत्र ज्या सदा खविसी[33] ॥ २६ ॥

---

१९ सुषमा=शोभा. २० मृगांक=चंद्र. २१ विद्रुम=पोंवळें. २२ शुक=पोपट. २३ शतपत्र =कमल. २४ कीलाल =पाणी. २५ महिला=स्त्री. २६ ससागरामहिला=समुद्रवलयांकित पृथ्वी. २७ सुरता=देवपणा. २८ किशोर=मुलगे. २९ मस्तु=लोणी. ३० निस्तुलगुणी= निरुपम आहेत गुण ज्याचे असा. ३१ चैल=वस्त्र. ३२ विपिन=वन. ३३ खविसी=जखीण.

अर्भक गगनफळातें रडतां श्रमले करोनि लोळणिसी ॥
त्यापरि यत्न मृषा[३४] ते मज तूं करिसी समर्थ गौळणिसी ॥ २७ ॥
एक पदाही न पुरे त्या सुरवर्या फळे कशी जगती ॥
रवि शशि तारागण हे मुष्टिंत अवघी धरील हें जग ती ॥ २८ ॥
विधि[३५]वर्जित पुरुषातें लाभेल कि काय खाणि परिसाची ॥
दैवहता गुणहीना करिसी तृष्णा तया परी साची ॥ २९ ॥
नाना परि बडबडुनी मिरविसि लोकीं मृषा सदा शीला ॥
परिसांचीं मीं सदनें बांधुनि दिधलीं स्वदासदासींला ॥ ३० ॥
श्रोत्रिय[३६]शालांतरिंची अरणी[३७] कैसी मिळेल मातंगीं[३८] ॥
अथवा सिंहवधूसीं संगम कैंचा घडेल मातंगीं[३९] ॥ ३१ ॥
जगरक्षणयज्ञीं मी दीक्षित अध्वर्यु वीतिहोत्राही ॥
नरसिंह मि तव वदनें वदविन हरि तूं आम्हांसि हो त्राही[४०] ॥ ३२ ॥
यापरि केशिनिहंता या संकेतासि गोप-जायांतें ॥
बोलुनि सत्वर उठिला निजसदनाप्रति सगोप जायातें ॥ ३३ ॥
गोपाळे गोरक्षक संनिध बसउनि अनेकधा त्यांसीं ॥
गोष्टी बऱ्या शिकविल्या सृष्टिक्रमयुक्ति तेवि धात्यासी ॥ ३४ ॥
मायामय ची तेची मी धरितों सांग जगत्सूत्रा मा ॥
रुचिराकृति राहीचीं नुमजे ते व्यक्ति विशद सूत्रामा[४१] ॥ ३५ ॥
नटवेषाकृति योषा होउनि दास्यत्व अंगिकारावें ॥
सर्व हि अति सौंदर्यें भासति जीतें तिला स्विकारावें ॥ ३६ ॥
सर्वाधीश निदेशें वनितावेषें शिशूतती[४२] व्रजिंची ॥
चंद्रावळिच्या मागें निघति अहंकृतिमदोर्मि[४३] तीव्र जिची ॥ ३७ ॥
श्रीमद्वृष्णिकुलेशें सुंदर वरिलें स्वरूप राहीचें ॥
लीलानिधिगर्भीचें रत्न चि निर्मळ नवे पराईचें ॥ ३८ ॥
श्रीहरि चंद्रावळिच्या कृत्रिम वेशें गृहा करी गमन ॥
भगिनी-आश्लेषा[४४]ची उत्कट धरितो स्पृहा करीगमन[४५] ॥ ३९ ॥
प्रेमालिंगन घडतां ठसली दृढताष्ट सात्विका भावीं ॥
चंद्रावळि भगिनीच्या मोहें ते मूर्ति आत्मिका भावी ॥ ४० ॥

---

३४ मृषा=व्यर्थ. ३५ विधिवर्जित=दैवहीन. ३६ श्रोत्रिय=अग्निहोत्री. ३७ अरणी=समोध. ३८ मातंग=अतिशूद्र. ३९ मातंग=हत्ती. ४० त्राही=रक्षण कर. ४१ सुत्रामा=इंद्र. ४२ तति=समूह. ४३ ऊर्मी=लाटा, अतिशय. ४४ आश्लेष=आलिंगन. ४५ करीगमन=हत्तीसारखें चालणें आहे ज्याचें असा.

शिणली बाई म्हणउनि घडिघाडि कुर्वाळुनी वरा ईतें ॥
घेत असे परि न कळे सुरवरऋषि मोहिनी बलाईतें ॥ ४१ ॥
व्रतदानादिक सुकृतें देव हि जाले वसुंधरे वरिले ॥
तुज पहतां त्रिभुवनिचें वाटे साम्राज्य सुंदरी वरिलें ॥ ४२ ॥
अष्टावष्टसहस्रा असतां युवती करीत जो जारी ॥
म्हणवी श्रेष्ठ नियंता खळजनहंता बहूत जोजारी ॥ ४४ ॥
तव वदनें ऐकावी वाटे मनिं कांतलोभवार्ता ते ॥
पुण्यश्लोका ललिता ऐकत सुख देति कीं भवार्तातें ॥ ४३ ॥
श्रीवल्लभ तुजसंगें रतिविरतीतें कसा धरी सांगें ॥
अनुमत होउनि विवरीं बहु दिन राहे प्रबुद्ध रीसां गे ॥ ४५ ॥
असती बहु जरि योषा तोषा मजविण नये सये हरिला ॥
गर्व प्रमदावलिचा मजसीं अनुरक्ततान्वयें हरिला ॥ ४६ ॥
भामाप्रमुखा सवती शिकविति कुमती हरीस एकांतीं ॥
परि अनुरागें माझ्या न दिसे अणु वक्रता सये कांतीं ॥ ४७ ॥
पडतां वदनें जडली तत्पतिसुखकर कथावली श्रवणें ॥
प्रेमोत्कर्षें हृदयीं चंद्रावळि बहु सुखावली श्रवणें ॥ ४८ ॥
अतिशय अनुरागलें कौस्तुभपद्मादि उत्कटा ठेवी ॥
हरि ठेवी मजपाशीं कां करिसी या सये उठाठेवी ॥ ५० ॥
प्रक्षाळुनि पदकमळा कमळाक्षी ते न लावितां उशिरा ॥
शिशिरांबु प्राशविते एलाकर्पूर[४६] घोळुनी उशिरीं[४७] ॥ ५१ ॥
पाय धुतां पायातें पाहुनि पुसते स्वसेसें[४८] पर्याई ॥
हरिपदपाद्मिचि चिन्हें दिसती तरिही कसीच पर्याई ॥ ४९ ॥
आंगीं लाउनि बाई लेप चमेली सुगंधरायाचा ॥
ठेउनि वसनें व्हावें नाहीं संशय दुजा धरायाचा ॥ ५२ ॥
स्वकरें ग्रंथि खुणेची दिधली हरिनें निरीस कंचूला ॥
विघड पडे जैं त्यातें जाचिल मजला धरूनि कंचूला ॥ ५३ ॥
विंचरुनि वेणि करितो हरि तो घनकांतिजित्वरां[४९] कशां ॥
मृगमदें[५०]तिलक ललाटीं स्वकरें करिताति वक्र राकेशीं[५१] ॥ ५४ ॥
वदती उत्तम हें कीं लोकीं पतिचा निदेशीं[५२] मानावा ॥
त्यांत यशश्रीकीर्ती चढते सुषमा पराक्रमा नावा ॥ ५५ ॥

---

४६ एला=वेलदोडा. ४७ उशिरा=वाळा (पाण्यांत घालण्याचा). ४८ स्वसा=बहीण. ४९ घनकांतिजित्वर=काळे कुळकुळीत. ५० मृगमद=कस्तुरी. ५१ राकेश=चंद्र. ५२ निदेश=आज्ञा.

अस्ता दिनमणि जातां जनार्दना तूं विंचना रीते ॥
उठवी भुक्तिसि जीचीं करणें सुरतीं विंच नारी ते ॥ ५६ ॥
गोष्टि असो हे जाली भुक्तिचि तुझिया बहु त्वरा मातें ॥
म्हणुनि कराब्जीं धरुनी ये निज सदनांत गोपरामा ते ॥ ५७ ॥
बहुविध पक्वान्नोदन खीरहि लेह्यादि षड्रसें भरित ॥
कर्मटि पापड शाका कोशिंबरि तिक्त फारसें भरित ॥ ५८ ॥
तिखटें विविध वरान्नें रुचिकर वडिया किसूनि कुष्मांड ॥
जेववितें बहिणीतें ते जरि आली करोनि कुष्मांड ॥ ५९ ॥
पंक्तिसि सारुनि भुक्ती बोलत युक्ती स्वकेलिगेहांत ॥
स्वस्थ निजूं बो सखये तेथ म्हणत धरुनि चाल गे हात ॥ ६० ॥
रात्री राहुनि विपिनीं रक्षिति पाति साभिमान गे शाला ॥
व्याघ्रवृकादि ससेही जागृत चढउनि कमान गे शाला ॥ ६१ ॥
ऐकुनि वचनें राही लीलासदनांत सत्वरा गेली ॥
पूर्विल चंद्रावळिचें पाहुनि जे नामसत्व रागेली ॥ ६२ ॥
सरस सुपारी चिकणी वीड्या करुनी सुपक्क पानांच्या ॥
भगिनीस देत जीच्या तृष्णा दिसताति ओष्टपानाच्या ॥ ६३ ॥
विविध सुगंध द्रव्यें शय्या मृदु गेह चित्र शालेचें ॥
प्रावर्ण हि ज्या स्थानीं कार्पासान्वित विचित्र शालेचें ॥ ६४ ॥
सुखगोष्टी विमलांगी बसुनि पलंगीं परस्परें करिती ॥
स्वस्वपतींचीं चरितें प्रणयाचरितें तशाच लोकरिती ॥ ६५ ॥
झोंपिस जातां गोपी जगदाटोपी त्यजोनि वेषातें ॥
जो पीनस्तनिं वोपी कर अति सोपी करोनि योषा ते ॥ ६६ ॥
गाढालिंगन ओष्टग्रह कुचपीडा क्रमें रमाकांतें ॥
सुरतारंभण केलें वंचक मतिनें मनोरमाकांतें ॥ ६७ ॥
निधुवन निज कांताचें मानुनि बाला खलद्रिरा पतिला ॥
राहि असे शेजारीं पाहुनि विधि हा चढेल कोप तिला ॥ ६८ ॥
दुजिया संनिध रमतां दोष विशेषें अयोग्य हें करणें ॥
त्यांताहि माझे बहिणी देखत अर्वाच्यता कशी करणें ॥ ६९ ॥
सुरतायासें तरुणी जागृत होउनि बरें विलोकी जों ॥
हृदयावरी मुरलीधर रमतो व्रजवेष दावि लोकीं जो ॥ ७० ॥

५३ करणें=इंद्रियें. ५४ कुष्मांड=कोहळा. ५५ केलि=क्रीडा. ५६ प्रावर्ण=पांघरूण.
५७ कार्पास=कापूस. ५८ शाल=काश्मिरांतील लोंकरीचें उत्तम वस्त्र. ५९ निधुवन=सुरत.

थरकुनि सरकुनि पाहे परी मुकुंदें चहूं भुजीं धरिली ॥
निरखुनि रागें गरकुनि बोले बरि खुण समग्र उद्धरिली ॥ ७१ ॥
शिव शिव करूणामूर्ते सांबा मति घोर संकटीं पडली ॥
विपिना माजी निशिं या व्याघ्रकरीं जेंवि धेनु सांपडली ॥ ७२ ॥
कृष्णा पुरविलि तृष्णा लावुनि माझ्या कलंक वंशातें ॥
वंचाया कुलयुवती फिरसी स्वकरीं धरूनि वंशातें ॥ ७३ ॥
आज्ञापावी तनु ते श्रीहरि हरिसुतनुता सुवास्तव्या ॥
स्थिरचर विश्वव्यापक मूर्ती जे हीच मानवा स्तव्या ॥ ७४ ॥
भरतां मन्मथ देहीं सुरतीं तेही रती धरी दुपटा ॥
निष्कपटा श्रीहरिसीं विहरे गतवास कंचुकी दुपटा ॥ ७५ ॥
चतुरधिकैंशिति बंधें करुनि मुकुंदें वृहत्तरा रजनी ॥
रत केलें परि कोणा न कळे तिलमात्रही विचार जनीं ॥ ७६ ॥
गोपि सकामा केली अतिशय निष्काम पूर्णकामानें ॥
दीनोद्धरतनुसंगें युवती अपवर्ग कामुका माने ॥ ७७ ॥
श्रीमच्छ्रीपतिहस्त-स्पर्शें गोपांगना सदाचरणीं ॥
राहुनि नटली कुटिला मति ते त्यागुनि सुखें सदाचरणीं ॥ ७८ ॥
सदसद्वस्तुविचारें चिन्मयपदलाभ जोडला सहजें ॥
अद्वयवातें उडती आनंदाब्धित तरंग त्या सह जे ॥ ७९ ॥
सुरतांतीं हृदयावरि ठेऊनि कर चीर सत्रपा हुडकी ॥
वस्त्र न दे हें जाणुनि म्हणते हा नंदपुत्र पाहुड कीं ॥ ८० ॥
नम्र मुखें सखि विस्मित होउनि सुस्मित हरीस मागतसे ॥
देइं दयाळा लुगडें उघडें वपु नष्टकांति भासतसे ॥ ८१ ॥
वास न दे तो कालिय-शासन ललना कृशानुसी दिसते ॥
कुतुकें बोले तिजला नाठविसी काय मानसीं दिस ते ॥ ८२ ॥
सामर अमरावतिचें जेणें वैभव दिलें शतक्रतुला ॥
त्या प्रति नेणसि म्हणसी नेदीं दधि दुग्ध लेश तक्र तुला ॥ ८३ ॥
सर्व असो तें प्रस्तुत घडलें हें मान्य कर्म योगानें ॥
देउनि वसनें माझीं सुकृत तनू हो गृहोपयोगानें ॥ ८४ ॥
त्या नंतर यदुराजें त्या व्रजभाजेस देउनि वासा ॥
प्रेमें हृदयीं धरुनी इच्छित गमनासि देव नीवासा ॥ ८५ ॥

---

६० चतुराधिकाशि=चवऱ्यायशी आसनें. ( हीं कामशास्त्रीं प्रसिद्ध आहेत. ) अनंगरंग दहावा भाग पहा ). ६१ अपवर्ग=मोक्ष. ६२ कालियशासन=कृष्ण. ६३ कृशानु=अग्नि.

धन्य तुझी करणी हे कृष्णा जननी तुतेंचि हो व्याली ॥
व्रजजन यापरि सर्व हि गाती विटचौर्यशौर्यवोव्याली[६४] ॥ ८६ ॥
तुटती यातायातें जे नर मज ते अनन्य वोळगती ॥
निरसुनि दुरहंकृतितें देइन त्यांतें सखे विशाल गती ॥ ८७ ॥
बकशकटादिक कपटा ब्रह्मेंद्रकृता निवारि घोषांच्या[६५] ॥
उभवति कामें गुढिया उभवति इहपर सुकीर्ति घोषाच्या ॥ ८८ ॥
यमनियमाद्यष्टांगें जें पद न मिळे महर्षि सिद्धांतें ॥
तें गोपीप्राति दिधलें धुंडिति जें शास्त्र वेद सिद्धांतें ॥ ८९ ॥
यापरि करुणापांगें सुख करि अज्ञान बंधुरा जीवा ॥
तोषवि सर्वां जैसा समुदित शतपत्रबंधु[६६] राजीवां[६७] ॥ ९० ॥
बहुविध युक्ति विचारें बोधुनि आभीरभीरु[६८] मांकांतें[६९] ॥
दर्शवितां निजरूपा त्यजिना मग सर्वहि भ्रमा कां ते ॥ ९१ ॥
चंद्रावळिसह सुरतें क्रमिली राहुनि तिचे गृहीं दोषा[७०] ॥
जगदीशें या कलिच्या विलया ने जो समग्र ही दोषा ॥ ९२ ॥
आश्वासुनि गोपस्त्री अभिरत जी कांत नाथ गोकुळिचा ॥
निजसदना प्रति जाया उठिला निस्तुल शिशू शशीकुळिचा ॥ ९३ ॥
शिशुपालांतक शिशुंतें अवध्या जागें करुनि वेशाला ॥
सोडुनि सत्वर गेला सार्भक सूर्योदयीं निवेशाला[७१] ॥ ९४ ॥
हरि तो प्रातःकाळीं कालिंदितटीं निकुंजकांतारीं[७२] ॥
गोप शिशूंसह विहरे जो निजभजनेंचि भाउकां[७३] तारी ॥ ९५ ॥
कर्कश रूप सितेचें[७४] प्रथमाचि अम्लस्वभाव गोस्तनिंचें[७५] ॥
चंद्रावळिचरिताग्रीं क्षीर हि नीरस समग्र गोस्तनिंचें[७६] ॥ ९६ ॥
क्षैण्यविगर्हित[७७] लोकीं एकचि सकलंक चंद्रमा विधिनें ॥
जाणुनि चंद्रावळि ही सृजिली[७८] निर्दोष अब्द या विधिनें ॥ ९७ ॥
बहुत चरित्रें बहुतां कविनीं केलीं तथापि या चरितीं ॥
गुणरसिकां पुरुषांचे अद्भुत श्रद्धादि भाव आचरितीं ॥ ९८ ॥

---

६४ विटचौर्य शौर्यवोव्याली=जार कर्म, चोरी, शौर्य यांविषयींच्या ओव्यांचा समूह. ६५ घोष=गोकुळ. ६६ शतपत्रबंधु=सूर्य. ६७ राजीव=कमल. ६८ आभीरभीरु=गवळण. ६९ माकांत=कृष्ण. ७० दोषा=रात्र. ७१ निवेश=घर. ७२ कांतार=वन. ७३ भाउक=भाविकभक्त. ७४ सिता=खडी साखर. ७५ गोस्तनी=द्राक्षा. ७६ गोस्तन=गाईचा स्तन. ७७ क्षैण्यविगर्हित=क्षीणत्वामुळें निंद्य. ७८ सृजिली=निर्मिली.

पर्युषितत्वें[७९] कथना सांडुनियां जरि दुजेंचि वानावें ॥
धीरोदारगुणोत्तर[८०] या सम तरि कोण दाखवा नावें ॥ ९९ ॥
धुंडलिं **धुंडिकुमारें** हिंडुनि निगमादिकें भ्रमें श्रमुनि ॥
परि फळ तें व्रजि लाभे शोधिति जें निग्रहें अजस्र[८१] मुनी ॥ १०० ॥
**अग्निपुराणीं** कथना सांगे जें **सूत शौनकप्रमुखां** ॥
त्या कथनीं आज्ञापी **श्रीहरि मोरेश्वराख्य** विप्रमुखा ॥ १०१ ॥

चंद्रावळी चरित समाप्त.

---

७९ पर्युषित्व=शिळेपणा. ८० धीरोदारगुणोत्तर=चातुर्य व औदार्य या गुणांनीं युक्त.
८१ अजस्र=निरंतर.

## *आनंदतनयकृत-

# कंदुकाख्यान.

कोणी ते प्रमदा[1] तया व्रजपुरा[2] जातां रणन्नूपुरा[3] ।
तेथें ये त्रिपुरारिचा[4] प्रियसखा तो योग वानू[5] पुरा ॥
शोभे कल्पतरूतळीं करतळीं पांवा तया मोहरी ।
वाहे मंजुळ कंजलोचन[6] जना नांदे हरी मोहरी ॥ १ ॥
ज्याची भासुर[7] भा[8] प्रभाकर[9]-निभा व्यापूनि लंघी नभा ।
तो हा संतसभाभिवंदित उभा ते दिव्य देखोनि भा ॥
भ्याली बल्लववल्लभा[10] मग इभा[11] ऐशी रमावल्लभा ।
चाले दूरुनि हा धरील म्हणुनी शंके जगद्दुर्लभा ॥ २ ॥

याची सदां समजते बरि लोकलीला । मातें करीं धरिल देखुनि येकलीला ॥
चाले चुकावुनि पुढें चमकोनि घोषीं[12] । बिंबाधरा[13] शशिमुखी पिकमंजुघोषा[14] ॥ ३ ॥
भ्याली पुढें सरकली गजराजचाली[15] । कित्येक दूर पथ लंघुनियां निघाली ॥
ये पाठिशीं हरि दयाघन मंद वाहे । जातां विलोलनयना परतूनि पाहे ॥ ४ ॥
परतुनि जंव पाहे गोकुळा जातजातां । निकट चि हरि आला वंद्य जो वेदसंतां॥
पदर धरुनि तीचा जो उभा ज्ञानगाभा । पशुपयुवति जाली पात्र चिद्भाग्य लाभा ॥५॥

---

* विजापूर तालुक्यांत आनंदराव नांवाचा अरणीगांवचा कुळकरणी होता, त्याचा पुत्र आनंदतनय. हा शिवाजीचा बाप शहाजी याचा गुरु होता असें म्हणतात. याची यमकबद्ध कविता असून पदेंही पुष्कळ यानें केलीं आहेत. शिवाजीचा जन्म शालिवाहन शके १५४९त झाला त्यामुळें त्याचा बाप जो शहाजी त्याचा गुरु आनंदतनय हा सोळाव्या शतकाच्या आरंभींच असला पाहिजे असें दिसतें. बहुत करून अरणीकर आनंदतनय व पैठणकर एकनाथ स्वामी (शके १४७०-१५३१) हे उभयतां समकालीन असावे असें वाटतें. पंत या कवीच्या यमकरचनेविषयीं म्हणतात कीं:—

आनंद-तनय अरणीकर शोभवि फार कवन यमकांहीं ।
तत्सूक्ति पाठ ज्याला त्याचें पाहे न भवन यम कांहीं ।

सन्मणिमाला.

१. प्रमदा=स्त्री. २. व्रजपुर=गोकुळ. ३. रणन्नूपुरा=खुळखुळत आहेत पैजणें जीचीं अशी. ४. त्रिपुरारि=शिव. ५. वानूं=वर्णू. ६. कंजलोचन=कमलासारखे आहेत डोळे ज्याचे. ७. भासुर=तेजस्वी. ८. भा=कांति. ९. प्रभाकर=सूर्य. १०. बल्लववल्लभा=गवळ्याची स्त्री. ११. इभ=हत्ती. १२. घोष=गवळवाडा. १३. बिंबाधरा=तोंडल्यासारखा आहे खालचा ओंठ जीचा अशी. १४. पिकमंजुघोषा=कोकिलासारखा आहे मंजुल स्वर जीचा अशी. १५. गजराजचाली=उत्तम हत्तीसारखी मंद आहे गति जीची अशी.

ते सोडवी धरुनि अंचळ चंचळाक्षी । वोढी बळें स्वबळ बांधव लोकसाक्षी ॥
पायीं तुझ्या हरि पडेन म्हणे कृपाळा । रे सोडिं सोडिं मज फार उशीर जाला ॥ ६ ॥
मी योषितें[16] वंशधरा[17] सुशीळा । कां झोंबसी वंशधरा[18] सुशीळा ॥
**शौरी** म्हणे मानवतों अशीलीं[19] । न स्वीकरी मानव तो अशीलीं[20] ॥ ७ ॥
प्रार्थी गोपशिखामणीस[21] रमणी गोपीगणीं तूं धनीं ।
राणी हे करणी उणीव सखया कोणी गणीना धनी ॥
पाण्यालागुनि गौळणी बहुजणी येतील येथें झणीं ।
चोर्टी त्या धरितील तूज तरूणी होती मला गांजणी ॥ ८ ॥
ऐशी बोलत ते उभी हरि न भी ते भीरु पाहे दिठी ॥
हा आभीर[22] गभीर भूपति असा सोडी च ना ते मिठी ॥
ते वोढी परि हा न सोडि च गडी ते हात जोडी सती ।
ते जोडी मज भासते **स्मर**रती दोघें तशीं दीसती ॥ ९ ॥
येरीकडे **नं**दवधू यशोदा । धुंडी तया भक्तदयायशोदा[23] ॥
खेळावया बाळक संगसंगें । गेला असे क्रीडत रंगरंगें ॥ १० ॥
निघाली बाहेरी हुडकित हरीतें चहुंकडे ।
फिरे नाना मार्गीं करिं धरुनि त्याचे संवगडे ॥
पुसे ज्याला त्याला तुह्मि निरखिलें मूल सखये ।
उठावे खेळाया सहज गुण त्याचा जगति ये ॥ ११ ॥
ऐशी शोध करीत हंसगतिनें लंघीत आली पथा ।
तीतें देखुनियां दुरी मग हरी लीला करी अन्यथा ॥
गोपीतें पदरीं न सोडि च करीं लोळे धरारंगणीं ।
दावी स्फुंदन मंद रूदन मुखीं भांबावली गौळणी ॥ १२ ॥
आला राग तिला म्हणे युवतिला कां गे खट्याळे कशी ।
नाहीं लाज तुला मुलासि धरूनी रानीं उभी ठाकसी ॥
नेणें कांहिं च मी स्वभाव-गतिनें मामी* घरा जातसें ।
मार्गीं हा पदरीं धरी मज हरी नेणा तुम्ही कां तसें ॥ १३ ॥
**श्री**हरी परम स्फुंदत लोळे । वाष्पयुक्त बहु दाखवि डोळे ॥
वाटला कळवळा जननीला । घे कडेवरि तदा **घन**नीळा ॥ १४ ॥

---

१६ योषिता=स्त्री. १७. वंशधरा=कुलीन. १८. वंशधर=मुरलीधर. १९. अशीला=अशा प्रकारचीला. २०. अशीला=शील रहित ह्मणजे वाईट स्वभावाची. २१. गोपशिखामणि=गवळयांत मुख्य (कृष्ण). २२- आभीर=गवळी. २३. भक्तदयायशोद=भक्तांवर दया करून त्यांस यश देणारा. * मामी=सासूबाई.

नेणें चि मीं कांहिं विदोष दोषा । ते भीत बोले पशुपाळयोषा ॥
तेव्हां तया सज्जनलोकपोषा । माता दटावीत वदे सरोषा ॥ १५ ॥
दटाविते माय तया हरीतें । चरित्र ज्याचें दुरितें हरीतें ॥
मारावया धांवलि कृष्णजीतें । तो वाटला व्रात्य अचाट जीतें ॥ १६ ॥
व्रजांगना सांगत येत होत्या । यथार्थ वार्ता गमल्या अहो त्या ॥
मारावया घे मग फोक हातीं । समग्र ही लोक तया पहाती ॥ १७ ॥

पशुपयुवति ऐशी दाटली लोकराजी ।
अनिमिष नयनानें पाहती श्रीधरा जी ॥
तंव हरि जननीतें स्फुंदस्फुंदोनि सांगे ।
अमइ निरखिली म्यां चोरटी चौंदिसां गे ॥ १८ ॥

हे अशी च अमणी करि चोरी । मागतां प्रगट ते शिरजोरी ॥
नंदसुंदरि म्हणे तिजलागीं । कां असें करिसि होसि बजागी ॥ १९ ॥

तेव्हां व्याकुल ते वदे कुळवधू हा शब्द माझ्या कुळा ।
कल्पांतीं न लगे चि मां सहज मीं जातां घरा गोकुळा ॥
याची मात खरी म्हणूनि धरितां हे आण घ्या मासिसें ।
नेणें कूड कदापि मी करि हरी विस्तार नस्त्या मिसें ॥ २० ॥

अम्हीं सर्व मुलें विर्दीत अमई चेंडूफळी खेळतां ।
अभ्री उंच उफाळला क्षितितळीं तो येथ आंदोळतां ॥
तो आला इचिये घरीं मग इणें चोरूनियां ठेविला ।
नेदी मागति मागुता म्हणुनियां चेलांचळीं गोंविला ॥ २१ ॥

अगइ सत्य वदे किति वैखरी[२४] । गमतसे सकळांस हि ते खरी ॥
हरि वदे मनिं कल्पुनि मासिसें । मज धरी पदरीं भलत्या मिसें ॥ २२ ॥
करूनियां विक्रय गोरसाचा । मी ये घरा भाव असा च साचा ॥
याचा मला कंदुक[२५] तो न ठावा । माझ्या कुळा बोल असा उठावा ॥ २३ ॥
रोषें वदे शपथपूर्वक सारसाक्षी[२६] । नेणें चि मी कपट कृत्रिम भूमि साक्षी ॥
मिथ्या कदापि न वदें चि म्हणे मुरारी । चेंडू इच्या जवळि साक्ष असे पुरारी ॥ २४ ॥
वक्षस्थळीं सहज उन्नतता स्त्रियांसी । हें तों तुह्मां विदित संशय कासयासी ।
चेंडू म्हणूनि बहुधा भ्रम या मुलाला । नाहीं ह्मणोनि उचकीन करें फुलाला ॥ २५ ॥
हरि म्हणे जरि सोडिल कंचुकी । तरि धरेसि पडेल नव्हे चुकी ॥
व्रजवधू मग दाखवि ते घडी । कुचपटा चळचंचळ ऊघडी ॥ २६ ॥

---

२४. वैखरी=वाणी. २५. कंदुक=चेंडू. २६. सारसाक्षी=कमला सारखे आहेत डोळे जीचे ती.

न दावितां दाटुनि होय चोरी । म्हणोनि जाऊं तरि जाय थोरी ॥
आतां करूं काय जना समोरी । टाकूं कशी मां हंसताति पोरी ॥ २७ ॥
[27]वक्षोजेंगोळ [28]अळुमाळ [29]तमालनीळें । लक्षूनि मंद रुदना करिजे सुशीळें ॥
माता म्हणे रुदसि कां लटकें वदोनी। चेंडू तुझा उसळला न कळे उडोनी ॥ २८॥
हरि म्हणे अमये कमळेक्षणा । जरि पटा उकलील सुलक्षणा ॥
हरपला इशिं कंदुक सांपडे । अनृत हें न वदें धरणी पडे ॥ २९ ॥

तों ते गोपवधू विधूत[30]वसनीं सोडी [31]निवीग्रंथिका ।
झाडी वस्त्र पुनः पुन्हा गमतसे आश्चर्य या पांयिका. ॥
चेंडू भव्य पटींहुनीं क्षितितटीं अंदोळला कौतुकें ।
देखोनी जन हांसती खदखदां आले तदां जीतुके ॥ ३० ॥

गोपी तदा विसरली तनुभावनेला । कृष्णें तिचा निजगुणें तनुभाव नेला ॥
ऐशी चरित्ररचना रचिजे अनंतें । संसारसिंधु तरिजे चि जगें अनंतें ॥ ३१ ॥
ज्याची अतर्क्य करणी [32]धरणीधराला । ठावी नसे आजि तया करुणाकराला ॥
ज्या गौळणी प्रियतमा हृदयाभिरामा । आनंदनंदन म्हणे वरिताति [33]रामा ॥ ३२ ॥

॥ इति श्रीकंदुकाख्यान समाप्त ॥

---

### आनंदतनयकृत

## बालचरित्र.

यादवेंद्रचरितामृत सेवा । लोक हो श्रवण सज्जुनि सेवा ॥
त्या सुखें तुह्मि नमाल जगीं या । भारती अजि यदर्थ मदीया ॥ १ ॥

नाना छंद करी हरी व्रजपुरीं बालस्थिती आदरी ।
मातेला पदरीं धरी निज करीं मोत्यांचिया झालरी ॥
ज्याचें नाम उमा सदाशिव सदा जो चिंतिती अंतरीं ।
तो हा कृष्ण विभू जपे जननिची नामावळी साजरी ॥ २ ॥

घरा येतां जातां दधि घुसळितां पाक करितां ।
विडे घेतां देतां सहज दुहितां दुग्ध भरितां ॥
नदी पाण्या जातां जन निरखितां ही परिसतां ।
फिरे माते मागें पदर धरुनी छंद नसता ॥ ३ ॥

---

२७. वक्षोज=स्तन. २८. अळुमाळ=किंचित. २९. तमालनीळ=तमालपत्रासारखा निळा. ३०. वसन=वस्त्र. ३१. निवी=ओढीळ. ३२. धरणीधर=शेष. ३३. रामा=स्त्रिया.

फिरसि कां उगा पाठिसी हरी । सरसिजानना[३४] सांग लौकरी ॥
हरि म्हणे मला घेउनी कडे । स्थिरपणें उगे बैस ईकडे ॥ ४ ॥
जननि हांसली खदखदां तदा । सकळ काम हें मी करूं कदा ॥
करिसि कां बहू छंद बा उगा । उठ मुलांसवें खेळ जा उगा ॥ ५ ॥
जा जा खेळ मुलां सवें मज नको कां जेविसी तें नको ।
कृष्ण दूध पिसी नको निज घरा बाहेर येसी नको ॥
चेंडू देउं तुला नको निजवितें ये ऊठ तें ही नको ।
नारी ह्या तुज नोवऱ्या करिन मी तेव्हां म्हणेना नको ॥ ६ ॥
हूं हूं यशोदे मजलागिं तें दे । राधे उरीं कंचुकिमाजि तें दे ॥
हांसोनि बोले जननी यशोदा । मागों नये रे उगला मुकुंदा ॥ ७ ॥
कृष्णा घेउनि कडे निज सद्मा[३५] । चालिली नयननिर्जितपद्मा[३६] ॥
हालवी जननि पालख[३७] शय्या । सज्जनीं सरस गात जि जो या ॥ ८ ॥
निजेला कीं जागा म्हणुनि जननी जों निरखिती ।
दयाब्धीची मूर्ती तंव उघड नेत्रींच दिसती ॥
कशी येना निद्रा तुज गुणसमुद्रा यदुपती ।
पुन्हा गाऊं लागे तंव वदत देवो मृदुगती ॥ ९ ॥
माते मला झोंप न ये चि कां कीं । तूं काहणी सांगसि पूर्विकां कीं ॥
तेणें गुणें येइल नीज माते । निजेलिया या पुरुषोत्तमातें ॥ १० ॥
कृष्ण मूर्ति किति सुंदर शाहणी । सांगणें म्हणत पूर्विल काहणी ॥
हालवी जननि पालख माउली । ते कथा वदत शीतळ साउली ॥ ११ ॥
होता राम म्हणोनि हूं क्षितिसुता तत्पत्नि हूं तत्पिता ।
वाक्यें दंडक हिंडतां दशमुखें ते चोरिली योषिता ॥
निद्रेलागिं कथा अशी जननि ते सांगे हरी ऐकतां ॥
दे दे बाण धनुर्धनुष्य अनुजा बोले उठे त्वतां ॥ १२ ॥
यावें शंकरजी बसा अजि असे डावीकडे धातया ।
स्कंदीं[३८] क्षेम[३९] सुराधिपा कुशल कीं वित्तेशजी[४०] येथ या ॥
ऐसा शब्द निजेलिया हरिचिया माता मुखीं ऐकुनी ।
कां कां वोसणसी मुला म्हणउनी धू धू करीं घेउनी ॥ १३ ॥
जागें करी जननि त्या गरुडध्वजाला । तो बैसुनी मुदित सावध शीघ्र जाला ॥

---

३४. सरसिजानन=कमला सारखें तोंड आहे ज्याचें असा. ३५. सद्म=घर. ३६. नयननिर्जितपद्मा=डोळ्यांनीं जिंकलें आहे कमल जीनें अशी. ३७. पालख=पाळणा. ३८. स्कंद=कार्तिकस्वामी. ३९. क्षेम=कुशळ. ४०. वित्तेश=कुबेर.

घुसी मुखांबु जननी नयना स्वधारीं । दावी असें कपट नाटक सूत्रधारी ॥१४॥
मी नंदनंदन शिशु व्रजभूमिवासी । हें नाठवे निज हिता नत बांधवासी ॥
कीं मींच राघव अशी गति दाखवीतों । आनंदनंदन विभू रस चाखवितो ॥१५॥

इति श्रीबाळचरित्र संपूर्ण ॥

---

## वामनपंडितकृत

# जयद्रथ-वध.

सौभ[४१]द्रशोकवि[४२]शें रचिलें पणातें । कुंतीसुतें समजल्या विण आपणातें ॥
तें वाक्य सत्य करवी तव पूर्वजाचें । श्रीकृष्ण नाम भज त्यासि अपूर्व ज्याचें ॥१॥

मी मारीन जयद्रथासि समरीं जों भानु आहे नभीं ।
नाहीं होमिन देह हा हु[४३]तवहीं सर्वात्मना ही नभीं ॥
ऐसें बोलुनि वाक्य त्या परिस तो केला असा नेम रे ।
रक्षूं त्यासि बळें घडो मग तसें तो स्वापमानें मरे ॥ २ ॥

यानंतरें जयुनि कौरवराजसेना । आली कसी अवनिमंडळ जें दिसेना ॥
तों पार्थसैन्य हि सर्वेचि निघे रणाला । ज्या इंद्र ही परि नव्हे क्षणवारणाला ॥ ३ ॥

सूचीव्यूह तयांत पद्म रचिलें राहे तदभ्यंतरीं ।
राजा सैं[४४]धव तो जयद्रथ तरी चिंता करी अंतरीं ॥
व्यूहाच्या वदनीं कृतांत समसा आचार्य राहे बळें ।
जे जे ज्या स्थाळीं ठेविले नृपवरें ते राहिले तुंबळें ॥ ४ ॥

वदे कृष्ण पाहें नरा द्रोण हा रे । समच्छास्त्रवत्ता रणीं जो न हारे ॥
जयाचे श[४५]रव्रात भात्यांत कोरे । तयाशीं वृथा झुंज लावूं नकोरे ॥ ५ ॥

पं[४६]चाशीति जयासि वर्षगणना आपांडु[४७]ता मस्तकीं ।
युद्धीं द्रोण तथापि दुर्धर दिसे हस्ती जसा मस्त कीं ॥
पार्था तूं न भिडें तयासह नको तो आजि नाटोपतो ।
पाहा दुःसह वाटतो मज रणीं याचा खटाटोप तो ॥ ६ ॥

नमस्कार दूरोनियां सव्यसा[४८]ची । करी बाणयोगें गुरूला तसाची ॥
सवेगें पुढें तो पृथापुत्र धांवे । यदर्थ प्रतिज्ञा तयातें वधावें ॥ ७ ॥

आले वीर समस्त धीर धरुनी जे सैनि कीर्तिस्वरें ।
कोपाविष्ट विशिष्ट दीप्ति मिरवे ज्यांची सुवार्तस्वरें ॥

---

४१. सौभद्र=अभिमन्यु. ४२. शोकविवश=दुःखाधीन. ४३. हुतवह=विस्तव. ४४. सैंधव=सिंधु देशचा. ४५. शरव्रात=बाण समुदाय. ४६. पंचाशीति=पंचायशी. ४७. आपांडुता=पांढरे केंस. ४८. सव्यसाची=अर्जुन.

सोडी बाण अनेक पार्थ समरीं बाणासि ने मस्तकीं ।
वीराचा शर एक ही न चुकतां लागेच नेमस्त कीं ॥ ८ ॥
सव्यापसव्यकृतसायकतांडवानें । केलें पराजित रणीं रण पांडवानें ॥
घालूं शके कवण या वरि वीर घाला । जैसा मृगांत मृग[४९]राज तसा निघाला ॥९॥
कौंतेयाप्रति देवकीय वदला हे भागले वाँह[५०] रे ।
जाले फार तृषार्थ यत्न करणें जेणें पिपाँसा[५१] हरे ॥
बोले पार्थ जळासि यासि जपतों मी वारुणास्त्रा रणीं ॥
या वीरांस हि वारितों गज जसा सक्रोध आधोरणीं ॥ १० ॥
तत्काळ वापी रचिली च पार्थें । वारोनियां वीरबळें अपार्थें ॥
केले युगाँ[५२]पासुनि मुक्त देवें । सेवे चि ते घोटँ[५३]क वासुदेवें ॥ ११ ॥
आर्द्रपृष्ट हय पाजुनि पाणी । दों करीं चतुर नीरजपाणी ॥
देखती कुतुक सैनिक सारे । बोलती प्रबळ पार्थ कसा रे ॥ १२ ॥
धों धों दुंदुभि वाजल्या उचलला सैन्यीं धुरोळा नभा ॥
गेला सर्व दिशा तमोमय पहा जाला रवी हीनभा ॥
मारावा व्यसनस्थ पार्थ वदती आहे रथावेगळा ॥
होतां सज्ज कदापि हा न उतरे काळाचिया ही गळां ॥ १३ ॥
राजे भद्रप शाल्व सैंधव शिवी त्रैगर्तकांबष्ट जे ॥
होगंधांग कलिंग वंग यवन प्राग्ज्योतिषावंत जे ॥
इत्याद्यद्भुत कोप कोपनिभृत स्वाकर्ष चाप स्वरें ॥
आले सन्मुख ते क्षणीं विमुख ते केले प्रतापें नरें ॥ १४ ॥
शाखामृँ[५४]गध्वज बहूत विशाळ वाटे । यासी भिडाल तरि लाविल मृत्युवाटे ॥
गांडीव मुक्त शर वाजति हे सणाणा ॥ ऐसा धनुर्धर कसा स्वमनासि नाणा ॥१५॥
कां उकावत असा परतावें । आमुच्या तरि मतें परतावें ॥
गर्जतो विजय दुर्गम रॉँवें[५५] । कां अशासि खवळोनि मरावें ॥ १६ ॥
संजोगिले तुरग शीघ्र रथासि देवें । केलें पहा सुकृत पांडुसुतें सदैवें ॥
दे हात पार्थ चढतां स्वरथावरी तो । एक्या करें हयचतुष्टय सांवरीतो ॥ १७ ॥
होता असा अरुपदाहक कंठभारी । बोले नरा मन तुझें न भया उभारी ॥
अस्ताचला स्वतिलकीकृत भानु गेला । वेड्या जयद्रथ वधास्तव तूं भृकेला ॥१८॥

---

४९. मृगराज=सिंह. ५०. वाह=घोडे. ५१. पिपासा=तहान. ५२. युग=जूं. ५३. घोटक=घोडे. ५४. शाखामृगध्वज=वानर आहे ध्वजाच्या ठायीं ज्याचा असा अर्जुन. ५५. राव=शब्द.

हें क्लिष्ट वाक्य पडतां श्रवणीं विलोकी । सूर्याकडे मग म्हणे मुख कोंवि लोकीं ॥
दावूं अतःपर करूं न शकें पणातें । हें वाक्य सत्य करिं होमिन आपणातें ॥१९॥
अच्यूत हें समजला जगदांतरात्मा । बोले शतक्रतुसुता[56]प्रति तो महात्मा ॥
कां धाकलास इतक्यांत चि या वधाया । पाहें कशी रचितसें निज योगमाया ॥२०॥

तुझें उणें या स्वजनीं दिसावें । रथीं तुझ्या म्यां मग कां बसावें ॥
मनीं असे कार्य तुझें सजावें । उगेचि वाटे मज तूं खिजावें ॥ २१ ॥
साधावया अर्जुनकामनेला । अस्तासि मार्तंड[57] निकाम नेला ॥
प्रमोद जाला धृतराष्ट्रजाला । कीं आज हा सैंधव वीर झाला ॥ २२ ॥
समीप आले नृपलोक सारे । पाहों मरे अर्जुन हा कसा रे ॥
कोणी नरासी करिती खटाळी । ते मारिती हांसुनि मूर्ख टाळी ॥ २३ ॥

पार्था वो रवि हा जयद्रथ हि हा हें लक्ष लावीं बरें ॥
बोले अर्जुन लाविलें हरि वदे मारीं जगच्छेखरें[58] ॥
ऐसें त्याप्रति बोधितां झडकरी त्या सैंधवाचा[59] गळा ॥
गेला तोडुनि अर्धचंद्र विशिखें[60] कीं मस्तका वेगळा ॥ २४ ॥

आधीं च पार्था सुचवोनि देवें । तो वारिला योग हि वासुदेवें ॥
तों देखिला भास्कर सैनिकांहीं । उपाय तेव्हां न चले चि कांहीं ॥२५॥

दुर्योधनादिक सशोक सलज्ज जाले । त्यांचे प्रमोदभरदीपक ते विझाले ॥
केला जईं विजय दुर्जय वासुदेवें । हें वाचिजे हरिकथामृत कीं सदैवें ॥ २६ ॥
श्रीशाक्ति कर्ण मग भीमसुतासि[61] मारी । त्याचा प्रताप बहु तीव्र विरांसि मारी ॥
तें आयका वदत वामन लीन वाचा । मेला पुढें तनय द्रोण अशी कुवार्चीं[62] ॥२७॥

---

## वामनपंडितकृत

# संकलितं[1] रामायण.*

करिति चरण तूझे जे शिळों[2] दिव्य रामा[3]
हरुनि दुरितें[4] माझें होउ तें सौख्य रामा ॥

---

५६. शतक्रतुसुत=इंद्रपुत्र अर्जुन. ५७. मार्तंड=सूर्य. ५८. जगच्छेखर=कृष्ण. ५९. सैंधव=जयद्रथ. ६०. विशिख=बाण. ६१. भीमसुत=घटोत्कच. ६२. यावरून घटोत्कचवध व द्रोणवध हीं प्रकरणें वामनानें रचलीं असावीं असा ध्वनितार्थ निघतो.

१ संकलित=संक्षिप्त. * हें प्रकरण मौजे चिंचोडी तालुके खेड जिल्हा पुणें एथील देशपांडे यांजकडे मिळालें. त्यांचे एथें वामनी प्रकरणांची एक चांगली लिहिलेली व सकलादीनें बांधलेली वही आहे. तींत वामनी प्रकरणें आणखी पुष्कळ आहेत. परंतु तीं सर्व पूर्वी छापून प्रसिद्ध झालेलीं आहेत. २ शिळा=अहल्या शिळा. ३ रामा=स्त्री. ४ दुरित=पाप.

भ्रमरमन पदाब्जीं[5] पाववीं त्या विरामा
भव हर भवचापध्वंस विश्वाभिरामा[6] ॥ १ ॥
जगीं तूं असा कीं घटीं एक माती । गुण श्लोक कोटींत तूझे न माती[7] ॥
निरूपीन त्या सिंधुच्या बिंदुमात्रा । पुरे ते चि संसाररोगास मात्रा ॥ २ ॥
महा औषधांतूनि थोडें चि कांहीं । करी सेवितां नाश वातादिकां ही ॥
पुरे आमुची हे अविद्या[8] मराया । तुझें एकलें नाम जी रामराया ॥ ३ ॥
जरी नाशिली आमुची जी अविद्या । जितां ही दिली मुक्ति देऊनि विद्या ॥
तुझी कीर्ति मुक्तीहुनी गोड वाटे । शुकादीक ही चालती याच वाटे ॥ ४ ॥
म्हणोनि जे भागवतीं शुकानें । लीला तुझी वर्णिलि कौतुकानें ॥
टीका तिची मी क्षितिलोकवाणी[9] । करीन जेयें न सुखास वाणी[10] ॥ ५ ॥
बहू ग्रंथीं वृद्धी न करुनि वदावी यशसुधा[11] ।
प्रतिश्लोकीं जे कां करि अमृतसंतृप्ति वसुधा ॥
समश्लोकी टीका[12] म्हणुनि करितों जी रघुपती ।
जिला मंत्रप्राय स्मरति वदती लोक जपती ॥ ६ ॥
निजाश्रमा राघव कौशिकानें[13] । नेला कथा तेथुनि हे शुकानें ॥
आरंभिली मंगळ त्यास गातें । गातो मुनी उद्धरि जो जगातें ॥ ७ ॥
चाले वना प्रति पुलस्त्यसुतास[14] मारी । पाळी स्वकोसल[15] वरा सह भूकुमारी[16] ॥
या मंगळाचरणपद्यरसें शुकानें । संक्षिप्त वर्णिलि कथा प्रिति कौतुकानें ॥ ८ ॥
टाकी तातार्थ राज्यावन[17] वन विचरे त्या पदीं ज्यास वाटे ।
सीताहस्ताब्ज भारी अनुज कपिपती[18] सेविती नित्य वाटे ॥
बोलें निर्नासिकेच्या[19] असुर[20] जनकजा[21] ने तईं क्रोध लेशें ।
बांधी दापूनि सिंधू वधि रिपुकुळ त्या रक्षिजे कोशलेशें ॥ ९ ॥
अहो विश्वामित्रें दशरथ नृपा प्रार्थुनि जयीं ।
स्वयज्ञातें नेला प्रभु असुर मारूनि विजयी ॥
तया संगें जातां करूनि मिथिला ग्राम गमनीं ।
शिळा शापें मार्गें करि पदरजें हंसगमनी[22] ॥ १० ॥

---

५ अब्ज=कमल. ६ अभिराम=सुंदर. ७ माती=मावती ( राहाती ). ८ अविद्या=अज्ञान. ९ क्षितिलोकवाणी=देशभाषा ( मराठी भाषा ). १० वाणी=कमताई. ११ सुधा=अमृत. १२ टीका=भागवता नवव्या स्कंधांत संक्षित रामायण आहे त्याची ही टीका होय. १३ कौशिक=विश्वामित्र. १४ पुलस्त्यसुत=रावण. १५ कोसल=देशविशेष. १६ भूकुमारी=सीता. १७ अवन=रक्षण. १८ कपिपति=वानरस्वामी ( सुग्रीव ). १९ निर्नासिका=जिचें नाक कापिलें आहे अशी शूर्पणखा. २० असुर=राक्षस ( रावण ). २१ जनकजा=जनकाची कन्या ( सीता ). २२ हंसगमनी=स्त्री.

सीतास्वयंवरगृहीं भवचाप[23] हातीं । भंगी मुख क्षितिप[24] वीर अहो पहाती ॥
लीलें करूनि गजबाळक इक्षुदंड[25] । मोडी तसा भय करी ध्वनि तो उदंड ॥११॥
जिंकोनि ने स्वगुणरूपवयें समान । सीता रमा स्वहृदयावरि लब्धमान ॥
निःक्षत्रिया क्षिति करी हरि गर्व वाटे। त्याच्या जया नृपतिबीजें[26] असह्य वाटे ॥१२॥
जो स्त्रीस लंपट सकाम तथापि त्याची । मायां धरूनि करि गोष्टि खरी पित्याची॥
राज्यादिकें त्यजुनि जाय वनास दार[27]। प्राणावरी जित चि मुक्त जसा उदार॥१३॥
लंकापती भगिनिच्या[28] मुखदूषणातें । केलें महारण तया खरदूषणातें ॥
मारी चतुर्दश सहस्र हि चाप हातीं । कोदंडें[29] चंड वॉनि कष्ट मुनी पहाती ॥१४॥
सीताकथा परिसतां स्मरविव्हळानें । जो निर्मिला दशमुखें मृग हो खळानें ॥
मारीच तो युधिं तया प्रभुकार्य[30] दक्षा । जाऊनि दूरि शिव संहरि जेंवि दक्षा ॥१५॥
तों राक्षसाधम हरी जनकात्मजा ते । नेतां वृकें[31] जसि अजा[32] प्रतिदीन जाते ॥
तेव्हां वनीं रघुपती अति शोक दावी । कीं स्त्रीप्रियास गति शेवटिं हे वदावी॥१६॥
जातां स्वकार्य मृत देह कबंध मारी । जे मित्र होति कपि शोधुनि भूकुमारी ॥
वाळीवधा उपरि सांगति ते च वेळे । ये विश्ववंद्य मग त्यां सह तो सुवेळे ॥ १७ ॥
सक्रोधलोचनभयें चि पडे समुद्रा । आंदोळतां जळचरें अति मौन मुद्रा ॥
जाला समूर्त[33] शिरिं घेउनि पूजनातें । ये पाय वंदुनि वदे भवभंजनातें[34] ॥ १८ ॥
जो तूं अनंतसम जो न कुबुद्धि त्यातें । कूटस्थ आदि पुरुषा जगपाळित्यातें ॥
देव प्रजाधिपति भूतपति क्रमानें । मायापती सृजिसि सत्वरजस्तमानें ॥ १९ ॥
मानें तसें जलधितें अजि लंघिं मातें । श्री पाव मारूनि पुलस्त्यसुताधमातें ॥
पाषाण तारिं पसरे यश जेंवि लोकीं । गातील कीर्ति नृपसेतुपथा विलोकीं ॥ २०॥
सुग्रीव नीळ हनुमंत कपींद्रसेना । ते आणितां गिरिशिखा[35] नभ तें दिसेना ॥
त्या सेतुनें रघुपती कपिदग्ध लंका । देखे बिभीषण वदे मति निष्कलंका ॥२१॥
वेष्टूनि ते नगरि वानर ते निघाले । लंकेंत घालिति गृहादि करूनि घाले[36] ॥
हस्ती जसे डहुळिती ऱ्हदिंच्या[37] जळाला । देखोनि रावण अहो हृदयीं जळाला ॥२२॥
पुत्र प्रहस्त अतिकाय त्रिकंपनादी । धूम्राक्ष दुर्मुख दिशा भरिती स्वनादीं ॥
सर्वांस त्यांस सह कुंभ निकुंभ धाडी । तो कुंभकर्ण हि उठे जग झोडि धाडी ॥२३॥

---

२३ भवचाप=शिवधनुष्य. २४ क्षितिप=राजे. २५ इक्षुदंड=ऊंस. २६ नृपतिबीज=राजांचें बीज. २७ सदार=स्त्रीयुक्त. २८ लंका- पतिभगिनी=रावणाची बहीण (शूर्पनखा) २९ कोदंड=धनुष्य. ३० प्रभुकार्यदक्ष=प्रभु रावण त्याचें काम करण्याविषयीं कुशल. ३१ वृक=लांडगा. ३२ अजा=शेळी. ३३ समूर्त=सशरीर. ३४ भवभंजन=संसारनाशक (राम). ३५ शिखा=शिखर. ३६ घाले=हल्ले. ३७ ऱ्हद=डोह पाण्याचा.

येतां निशाचर[३८]चमू अतिवीर्यशक्ती । हातीं धनुष्य शर तोमर शूळ शक्ती ॥
सुग्रीव लक्ष्मण मरुत्सुतें[३९] [४०]ऋक्ष नीळ । या अंगदादि सह ये प्रभु मेघनीळें[४१] ॥२४॥
त्या अंगदादि रघुनायक-वानरांनीं । शस्त्रीं गदा गिरि तरू शर तोमरें[४२]नीं ॥
ते मारिली निघनिघों [४३]चतुरंगसेना । सीतापहारक[४४]-दळीं शुभ तें दिसेना ॥ २५ ॥
लंकेश लक्षुनि बळें क्षय कोपतापें । ये वाहनावरि चढोनि महाप्रतापें ॥
तों ये सुरेंद्र[४५]रथ त्यावरि रामराया । हाणी शर त्रिशत रामशरें मराया ॥ २६ ॥
बोले रघूत्तम खळा मळ राक्षसांचा । तूं श्वान शून्य गृह भोजन भक्ष साचा ॥
सीता परोक्ष[४६] हरिसी तुज नि[४७]स्त्रपातें । मी काळ मारिन [४८]अमोघबळास्त्रपातें ॥२७॥
जों घे दशानन असा [४९]व्यवसायकानीं । दापूनि त्यास रघुनायक [५०]सायकांनीं ॥
भेदूनि ऊर वधि आननिं रक्त नाकीं । जैसा [५१]व्यथे सुकृत संचित रिक्त [५२]नाकीं॥२८॥
रघुपति विजयी त्या रावणातें वधूनी । श्रमबहु परि केला राक्षसांच्या [५३]वधूनीं ॥
शुक मग वि[५४]भुलीला दिव्य जे तीस वर्णी । [५५]स्वपितृकृत वदे हे श्लोक बत्तीस[५६]वर्णी ॥२९॥
श्लोक वृत्त कथिले यमकांनीं । गाति त्यांस न पडे यम कानीं ॥
पावतील रघुनाथपदातें । जे सदा स्मरति नाथपदातें ॥ ३० ॥
अष्टाक्षरी चरण तो यमकीं न साजे । लीला च त्यांतिल सुखावह मानसा जे ॥
नेत्रांस ही दिसति ज्यास बरें कदापी । कीं काळ मृत्युस तदर्थ चि एक दापी ॥३१॥
समश्लोकीमध्यें रघुपति करीतो नियम कीं
कथावे श्लोकार्थ स्वगुणरचनायुक्त यमकीं ॥
अनुष्टुप्पद्यातें म्हणुनि विषदच्छंदें[५७] निकरें[५८]
करीतों रामाचे चरण शिरिं ते वंदुनि करीं ॥ ३२ ॥
मृता राक्षसाचीचिया वृंदसेना । रडे आफळे अंत दुःखा दिसेना ॥
स्त्रिया आणि मंदोदरी शोकरीती । निघोनी पुरींतूनि भारी करीती ॥ ३३ ॥
मेले सुमित्रात्मजसायकांनीं । आलिंगुनी त्यांस हि बायकांनीं ॥
केला बहू शोक अनेक रीती । उच्च स्वरें रूदन ज्या करीती ॥ ३४ ॥

---

३८ निशाचरचमू=राक्षससेना. ३९ मरुत्सुत=वायुपुत्र (मारुती). ४० ऋक्ष=आस्वल. ४१ मेघनीळ=घनश्याम. ४२ तोमर=शस्त्रविशेष. ४३ चतुरंग=रथ, घोडा, पायदळ, व हत्ती हे चार प्रकार जींत आहेत अशी. ४४ सीतापहारकदळीं=रावणाचे सैन्यांत. ४५ सुरेंद्ररथ=इंद्राचा रथ. ४६ परोक्ष=नकळत. ४७ निस्त्रप=निर्लज्ज. ४८ अमोघ=सफळ. ४९ व्यवसाय=उद्योग. ५० सायक=बाण. ५१ व्यथे=दुःख पावे. ५२ नाकीं=स्वर्गी. ५३ वधूनीं=बायकांनीं. ५४ विभुलीला=रामाची लीला. ५५ स्वपितृकृत=शुकाचा बाप व्यास त्यानें केलेले. ५६ बत्तीसवर्णी=ज्यांत बत्तीस अक्षरें आहेत असे अनुष्टुप छंदाचे श्लोक. ५७ छंद=वृत्त. ५८ निकर=समुदाय.

रडति दशमुखाच्या त्या स्त्रिया नाथ ! नाथ !
तुजविरहित लंका आणि आम्ही अनाथ ॥
नगरिवरि रुसोनी वीरसेजे निजावें
तरि शरण पुरीनें आजि कोणास जावें ॥ ३५ ॥
होउनी वश तुवां मदनातें । आणिली प्रभुवधू सदनातें ॥
क्षोभली जनकराजकुमारी । जे प्रभाव चि असा तुज मारी ॥ ३६ ॥
लंका स्त्रियां सहित ते विधवा चि केली । गृध्रा न ते तनु हि जे विषयीं भुकेली ॥
सद्वंशभूषण हि तो नरकासि जासी । केला अनर्थ सकळां तनुजानुजासी ॥ ३७ ॥
पुसोनि रामास बिभीषणानें । क्रिया मृताच्या कुळभूषणानें ॥
केल्या स्वशास्त्रें परलोकरीती । तिलोदकें लोक जसे करीती ॥ ३८ ॥
देखे रघूत्तम अशोकवनांत सीते । नेत्रीं स्रवे विरहशोकवना तशी ते ॥
नाहीं च बिंदुभरि ही जल जात कंठीं । कंठीतसे दिन अशी जलजातकंठी॥३९॥
पावली स्वविरहें तनु कंपा । राम तीवरि करी अनुकंपा ॥
होय तो चि सुखवासर सीते । ध्यान राम सुखवा सरसी ते ॥ ४० ॥
जवळि अनुज सीता राम बैसे विमानीं । कपिपति सह जातो बंधुतें जेंवि मानी ॥
दशमुखअनुजा दे उत्तमश्लोक लंका । पवनज सह यानीं घे तया निष्कलंकी॥ ४१॥
प्रभु करि चिरजीवी शत्रुच्या सोदरासी ।
रवि शशि गगनीं जों राज्य दे मोदराशी ॥
रघुपति परते हो तें सुरां सौख्य वाटे ।
स्तविति कुसुमवर्षें त्या विमानांत वाटे ॥ ४२ ॥
गोमूत्रपक्क जव भक्षुनि वाट पाहे । येणें तदर्थ भरतावरि हो कृपा हे ॥
कीं स्थंडिलीं वरि निजेक्षण कल्प कंठी । तो प्राण ठेउनि असे बसला स्वकंठीं ॥४३॥
श्रवणिं भरत ऐके राम आला अयोध्ये। अभिमुख विभुतें ये येति आमात्य योद्धे ॥
पुरजन गुरुसंगें पादुका मस्तकांतीं । करिति रवि शशीच्या ज्या अहो ध्वस्त कांती ॥४४॥
वसे नंदिग्रामीं परि हृदय रामीं भरत तो ।
विना त्याचे पाय त्रिभुवनिं न जो लाभ रततो ॥
वसे वेदध्यायी धरि इतर ठायीं न मन तो ।
करी वाद्या गीता सहित पदपद्मा नमन तो ॥ ४५ ॥

---

५९ तनुजानुज=पुत्र व बंधु. ६० शोकवन=शोकोदक (अश्रु). ६१ जलजातकंठी= जलजात म्ह० शंख त्याचे सारखा आहे कंठ जीचा अशी. ६२ अनुकंपा=कृपा. ६३ दशमुख अनुज=बिभीषण. ६४ निष्कलंक=निष्पाप. ६५ सोदर=बंधु. ६६ मोदरासी=आनंदरासी. ६७ गोमूत्रपक्क=गाईच्या मुतांत शिजविलेले. ६८ जव=सातु (धान्य). ६९ स्थंडिलावर=नुसत्या जमीनीवर. ७० कल्प=अतिदीर्घकाळ. ७१ अमात्य=प्रधान.

कनकमयपताका वृंद चित्र ध्वजांचे ।
रथ चपळ तुरंगी स्वर्णसन्नाह[७२] ज्याचे ॥
कवच सहित योद्धे मुख्य मुख्य प्रजांचे ।
प्रभुप्रति मुळ[७३] येती दास पादांबुजांचे ॥ ४६ ॥

चिन्हें महा विभव राजविलास मुद्रा । आणी पुढें भरत त्या करुणासमुद्रा[७४] ॥
प्रेमें पदावरि पडे विसरोनि देहा । आलिंगनें प्रभु भुजा पसरूनि दे हा ॥ ४७ ॥

प्रथम शिरिंहुनी त्या पादुका पादपद्मा ।
जवळि भरत ठेवी ज्या पदीं नित्य पद्मा[७५] ।
मग चरणिं पडे त्या क्षेमं[७६] दे सूख भावा ।
प्रभु नयन जळीं सप्रेम न्हाणी स्वभावा ॥ ४८ ॥

ब्राह्मणासि करि वंदन पादीं । हे मला प्रिय असे उपपादी ॥
लक्ष्मणा क्षितिसुते सह पायीं । लोक वंदिति जयासि उपायीं ॥ ४९ ॥

कोसलाधिपति कोसललोकीं । देखिला बहु दिशा अवलोकीं ॥
नृत्य वस्त्र उडवूनि करीती । पुष्पवृष्टि वरि कौतुकरीती ॥ ५० ॥

धरी मस्तकिं[७७] पादुका व्यजनं[७८] चामरें वीजिती[७९] ।
बिभीषण कपींद्र जे निज सुखें तयाच्या जिती ॥
सुधाकर धरी मरुत्सुत असीतपत्राकृती ।
प्रवेश करि राघव स्वनगरीं पवित्राकृती ॥ ५१ ॥

धरुनि सधनु भाते दास्य शत्रुघ्न मानी ।
धरि करिं जळझारी रामकांता विमानीं ॥
धरियलिं तयिं जैसी अंगदें ऋक्षपाळें ।
विभव नगर लोकां दाविलें लोकपाळें ॥ ५२ ॥

रघुपति अति शोभे पुष्पकीं व्योम वाटे । द्विजगुरु सह नेत्रां उत्पळा सोमं[८०] वाटे ॥
नटति युवति गाती कीर्ति बंदी[८१] विमानीं । प्रियतम जन आत्मा आपुला जेंवि मानी॥५३॥

रचित कुसुम आले श्रीअयोध्यापुरीतें ।
जन अमृत रसाच्या वाहती त्या पुरीतें ॥
नृप गृहिं गुरुपत्न्या माउल्या त्यांस भावी ।
नमन करि तयांतें तोषले बंधु भावीं ॥ ५४ ॥

---

७२ सन्नाह=घोड्याचें सामान. ७३ मुळ येतीं=सामोरे येती. ७४ करुणासमुद्र=कृपासागर. ७५ पद्मा=लक्ष्मी. ७६ क्षेम=आलिंगन. ७७ एथें "स्वशिरिं" असें असतें तर छंदोभंग न होता. ७८ व्यजनचामरें=विंझणे व चवऱ्या. ७९ वीजिती=वारा घालिती. ८० सोम=चंद्र. ८१ बंदी=भाट, स्तुतिपाठक.

वंदिलें अवघिया वडिलां हो । धाकुट्या स्वपदवंदनलाहो ॥
राम लक्ष्मण धरातनया ही । घेतलें पुजुनि पूजन यांहीं ॥ ५५ ॥

वसे नंदिग्रामीं जननि हि विना राम नयनीं ।
न पाहे शत्रुघ्ना सह भरत जो भूमिशयनी ॥
म्हणोनी चौघां ही भिजविति तिघी एक समयीं ।
तनुप्राणन्यायें नयनजळिं माया रसमयी ॥ ५६ ॥

मग उकलि जटा ते राम कोदंडपाणी ॥
कुळगुरु जइं न्हाणी ये चतुः सिंधुपाणी ॥
त्रिदशगुरु सुरेंद्रा ये रिती रामचंद्रा ।
द्विज वडिल हि देती मान वंशाब्धि चंद्रा ॥ ५७ ॥

सुस्नात होउनि असा करुणांबुराशी । अंगीकरी मग विभूषण-अंबुराशी ॥
प्रार्थूनि दे भरत वंदुनि आसनातें । घेतो पद प्रभु दरा कमळासनातें ॥ ५८ ॥

प्रजा स्ववर्णाश्रमधर्म वाटे । लावी जया बाप चि राम वाटे ॥
प्रजा गमे संतति त्या पित्याला । स्पर्शों न दे दुःख कदापि त्याला ॥ ५९ ॥

त्रेतायुगीं कृतयुगापरि काळ जाला । देखूनि राज्य करितां रघुवंशजाला ॥
धर्मज्ञ राम सुख दे सकळां प्रजाला । प्रेमें प्रजा भजति त्या भरताग्रजाला ॥६०॥

वनें नद्या पर्वत सर्व खंडें । द्वीपां समुद्रा सहितें अखंडें ॥
हे कामधेनू सकळां प्रजांला । देखूनि होती भरताग्रजाला ॥ ६१ ॥

बहु भिति यमलोका श्रीवरा रामराया ।
जनन मरण पावे जो न बैसे मराया ॥
वळखति न जराधीर्व्याधिशोकादिकां या ॥
क्रमभय असुखातें नेणती लोक काया ॥ ६२ ॥

रघुपती निज एकवधुव्रता ॥ शिकवि हो जनाचित्त सध्रुवर्ता ॥
स्फुट करी गृहधर्म समस्त कीं । धरुत लोक कथारस मस्तकीं ॥ ६३ ॥

करि जनककुमारी नित्य निर्व्याज सेवा ॥
तुम्हि हि जनमती हो हा महाराज सेवा ॥
सगुण कुलज सीता भाव जाणे पतीचे ।
मन हरित पतीचें प्रेमसंल्लाप तीचे ॥ ६४ ॥

---

८२ लाहो=लाभ. ८३ सिंधु=समुद्र. ८४ करुणांबुराशी=कृपासागर. ८५ विभूषण अंबुराशी=दागीन्यांचा समुद्र. म्ह० पुष्कळ दागिने. ८६ आधीव्याधि=मनोव्यथा व शारीरपीडा. ८७ एकवधुव्रत=एकपत्नीव्रत. ८८ सध्रुवता=सदृढपणा. ८९ निर्व्याज=निष्कपट. ९० भाव=मनोगत. ९१ संल्लाप=भाषण.

रामवृत्त कथिलें यमकांनीं । गाति त्यांस न पडे यम कानीं ॥
भिन्न अर्थ रचना सम जावी । काव्यरीति चतुरीं समजावी ॥ ६५ ॥
तदुपरि शुक सांगे राम मांडी मखातें[92] ।
निजपद चि यजी नें हें जगद्धाम खातें ॥
गुरुवचन विधानें लंकनायारि पूजी ।
सुरमय सुर सेवी तद्रिपूचा रिपू जी ॥ ६६ ॥
दिशा पूर्व होत्याँ[93] दिली दक्षिणा हो । दिली ब्रह्मयातें दिशा दक्षिणा हो ॥
प्रतीची स्वअध्वर्यु देतो जयाला । उदीची दिशा देत उद्गातयाला ॥ ६७ ॥
आचार्य जो मध्यम भू तयाला । देतां महा उत्सव दातयाला ॥
हें निस्पृहो ब्राह्मण सर्व लाहे । गोडी म्हणे राममतीस लाहे ॥ ६८ ॥
तनुस अंबर[94]मात्र चि भूषणें । इतर सर्व दिलें रघुभूषणें ॥
करि असें रघुनंदन दान कीं । उभि समंगळसूत्र चि जानकी ॥ ६९ ॥
घेऊनियां ब्राह्मण सर्व लाहो । ते बोलती ब्राह्मणवत्सल हो ॥
जो ब्राह्मणांचा स्वयमेव देव । प्रभूसि त्या बोलति भूमिदेव[95] ॥ ७० ॥
न जी दीधलें काय आम्हांसि देवा । दिले फार याहूनि ही देवदेवा ॥
प्रकाशोनि चित्तीं अविद्यातमातें । हरी देखतों त्या चि सर्वोत्तमातें ॥ ७१ ॥
सर्वज्ञता दशशतानन[96] ही न मोजी । ब्राह्मण्य देव रघुराज तुतें नमो जी ॥
तूं पुण्यमूर्त्ति अजि मस्तकरत्न[97] देवा । जो दे स्वपाद रज हंसजना[98] सदैवा ॥ ७२ ॥
जयाचा जगीं कीर्तिसंल्लाप हा तो । स्वयें गूढ राती जना हो पहातो ॥
वदे एक कोणी स्वभार्येस वाचा । तितें आयके श्रोत्र तो राघवाचा ॥ ७३ ॥
स्वयें जासि दुष्टे पराच्या गृहातें । नव्हें राम मी कीं धरूं तूज हातें ॥
दशग्रीव लावूनि ने हात सीते । वधूलुब्ध[99] अंगीकरी हा तशी ते ॥ ७४ ॥
दुराराध्य जे अज्ञ ते लोक रीती । न जाणोनि वार्ता अशा ही करीती ॥
म्हणूनी सितेतें वियोगश्रमातें । करी जाय ते वाल्मिकी आश्रमातें ॥ ७५ ॥
ऋषिजवळि असे ते गर्भिणी रामराणी ।
वन विभव हि मानी डोहळ्यांची शिराणी[100] ॥
कुश लव सुत दोघे होति ते दिव्य काळीं ।
मुनि करि विधिकर्मे उत्सवाच्या सुकाळीं ॥ ७६ ॥

---

९२ मख=यज्ञ. ९३ होता, ब्रह्मा, अध्वर्यु, व उद्गाता असे चार ऋत्विज यज्ञांत असतात. ९४ अंबर=वस्त्र. ९५ भूमिदेव=ब्राह्मण. ९६ दशशतानन=शेष. ९७ मस्तकरत्न=शिरोभूषण. ९८ हंसजन=परमहंस, म्ह० सन्यासीजन. ९९ वधूलुब्ध=स्त्रीलंपट. १०० शिराणी=आवड.

ऐसे च लक्ष्मणकुमार हि वंशकेतू[1] । तो एक अंगद दुजा सुत चंद्र केतु ॥
तक्षाख्य पुष्कळ अशीं भरतात्मजांचीं । नामें कुळें बहुत विस्तरणार ज्यांचीं ॥७७॥
शत्रुघ्नपुत्री स्वसमाजसाची । नामें सुबाहू श्रुतसेन[3] साचीं ॥
शत्रुघ्न मारी असुरास आणी । तद्वित्त रामार्पण हेतु आणी ॥ ७८ ॥
शत्रुघ्न नाम गत दाखवि अर्थ साचा । कीं पुत्र जो लवण त्या मधुराक्षसाचा ॥
मारूनि तो मधुवनीं मधुरा स्रजी[4] कीं । जीमाजि कृष्णतनु[5] राम खळास जिंकी ॥७९॥
पतीची पदें काननीं रामरामा[6] । स्मरोनी ह्मणे आननीं रामरामा ॥
मुनीच्या करीं पुत्र आणूनि घाली । क्षितींत स्वयें माय पोटीं[7] निघाली ॥ ८० ॥
आयकोनि जरि शोक निवारी । चालिले चि नयनांतुनि वारी[8] ॥
राखिले गुण तिचे हृदयातें । नावरे चि अजि त्या सदयातें ॥ ८१ ॥
सीता हेतु क्लेश आधींत रामा । एवं लोकीं दुःखमूळाच रामा[9] ॥
थोरां थोरां कष्ट यांच्या चि संगें । दावी ऐसें राम सीताप्रसंगें ॥ ८२ ॥
जया ही वरी अग्निहोत्रादि याजी । करी ब्रह्मचर्य स्वयें तो क्रिया जी ॥
अखंडाग्नितें राम हस्तीं[10] अ होमी । करी ख्याति कीं कर्म कर्त्ता अहो मी ॥८३॥
पदयुग मृदु जें कां पल्लवातुल्य वाटे । तदपि तुडवि कांटे दंडकारण्य-वाटे ॥
स्मरति चरित त्याला ठेउनी तो चि ठेवा । गमन करि मनीं ते लोक हे पाय ठेवा॥८४॥
आश्चर्य कीं अधिक साम्य जया असेना । त्याला सहाय समरीं कपिऋक्षसेना ॥
बांधी समुद्र वधि रात्रिचरांदिकां[11] ही । हे कीर्ति तारक हि त्यास न थोर कांहीं ॥८५॥
गाती ऋषी नृपपतीप्रति या यशातें । पापघ्न शुभ्र करि दिग्गज तो दिशांतें ॥
तो राम मी शरण तच्चरणांबुजातें । संभाविती सुरनरेंद्र किरीट ज्यातें ॥ ८६ ॥

रघुपति-चरणाचा दर्शन स्पर्श लाहो ।
निघति परम योगी भाग्य तें कोशला हो ॥
उठत बसत चिंती राघवस्पर्श लाहो ।
जित चि भव जयाचा राघवीं नाशला हो ॥ ८७ ॥
पुरुष रघुपतीच्या आयके जो कथा रे ।
भवभय नत याचे हें घरीं एक थारे ॥
तुटति सकळ कर्मे होय दुःखाग्नि हिंसा[12] ।
परम करुण मूर्ती होय टाकूनि हिंसा[13] ॥ ८८ ॥

---

१ केतु=ध्वज. २ एथें दुर्बोत्व आहे. ३ "श्रुतसेन" याबद्दल "बहुश्रुत" असें नांव रघुवंशकाव्यांत आढळतें. ४ स्रजी=निर्माण करी. ५ कृष्णतनु=मेघश्याम. ६ रामरामा-ची=रामाची स्त्री सीता. ७ मायपोटीं=आईच्या उदरांत. ८ वारी=पाणी, अश्रु. ९ रामा=स्त्रिया. १० एथें कांहीं अपपाठ असावासें वाटतें. ११ रात्रिचर=राक्षस. १२ हिंसा=थंडसा. १३ हिंसा=जीव हानि.

नृप पुसत शुकातें वर्तला कोंवि राम ।
स्वजन अनुज लोकीं सर्व लोकाभिरांम[१४] ॥
वद सकळ जनीं ही कोंवि तो पूर्णकाम ।
प्रियतर वरिला जी हा करी पूर्ण काम ॥ ८९ ॥

सिंहासनीं बसलिया वरि ही जयातें । धाडी स्वबंधुवश सर्व हि तेज यातें ॥
भृत्यांसह प्रभु फिरे नगरीस पाहे । श्रीमूर्ति दाखवि जनास करी कृपाहे ॥ ९० ॥

गजमदसलिलांचे[१५] कीं सडे चंदनाचे ।
सुरवरमुकुटांचे वोवसे चंद नाचे ॥
नगर विविध दावी भाव हे मानसाचे ।
रघुपतिपदपद्मीं लाधले मान साचे ॥ ९१ ॥

गोपुरें उपरमाडिया सभा । हेमकुंभ वरि देति यास भाँ[१६] ॥
मंदिरीं सुरगृहीं ध्वजाचिया । साउल्या निबिड नित्य ज्याचिया ॥ ९२ ॥
प्रतिद्वारिंरंभाँ[१७] दिंपूगी[१८] फळाचे । तरू घोंस केले फुलापोफळांचे ॥
प्रभा तोरणांमाजि कीं आरशांची । महादीप्ति हेमांबराफारशांची ॥ ९३ ॥
स्थळीं स्थळीं आणुनि पूजनातें । ते पूजिती लोक निरंजनातें ॥
ते बोलती पाळिं अजी क्षितीतें । पूर्वीं तुवां उद्धरिलें चि तीतें ॥ ९४ ॥

देखूनि काळें बहु राघवास त्या । त्या पाहती टाकुनियां गृहें सत्या ॥
ज्या सुंदरी वेंघति मंदिरोपरी । पुष्पें बहू वर्षति हो परोपरी ॥ ९५ ॥

ये त्यावरी निज गृहाप्रति जेंवि राजे । कीं देखिलें सकळ पूर्ण जयांत राजे ॥
वस्तू अमूल्य गणना न धना कदापी । जे कां कुबेरवरुणेंद्रगृहास दापी ॥ ९६ ॥

स्वयंभा वैडूर्यी[१९] करुनि रचिले स्तंभ बरवे ।
तया च्यारी पंक्ती क्षितिवरि बरी पाच मिरवे ॥
प्रवाळांची द्वारें स्फटिकमय भिंती विरचिता ।
गृहाच्या रामाच्या सकळ रचना दिव्य उचिता ॥ ९७ ॥

शृंगारिल्या चित्रविचित्र हारी । मुक्तादिकीं रात्रितमोपहारी ॥
सर्वोपभोगार्थ समृद्धिकारी । सर्वे गृहीं त्या प्रभु निर्विकारी ॥ ९८ ॥

सुगंधीं सदा धूपदीपीं विराजे । जन स्वामि त्याच्या गृहीं जेंवि राजे ॥
स्त्रिया जेंवि देवांगनाँ[२०] दासदासी । अशा मंदिरीं चित्त रामीं उदासी ॥ ९९ ॥

---

१४ अभिराम=सुंदर. १५ सलिल=उदक. १६ भा=कांति १७ रंभा=केळ. १८ पूगफळ=पोफळ, सुपारी. १९ वैडुर्य=रत्नविशेष. २० देवांगना=अप्सरा.

प्रभु करि सह सीता त्या गृहीं लोकलीला
श्रवणपठणमात्रें नाशिती ज्या कलीलें[21] ॥
स्वसुखरतविरक्तां सेव्य जो राम होतो
स्मरत दुरत काळीं श्रीघनश्याम हो तो ॥ १०० ॥
स्वधर्मानुकूळ प्रभू भोग सारे । यथाकाळ भोगूनि वर्णी असा रे ॥
बहू वर्षवृंदें[22] जरी राहिलाहो ! दिला वामनाला पदध्यानलाहो ॥ १०१ ॥
॥ इति श्रीसंकलित रामायण संपूर्ण ॥

---

## आनंदतनयैंकृत

## पूतना-वध.

राया सादर बादरायणि[1] म्हणे एकें जगत्पालकें ॥
केलें अद्भुत बाळकें रिपुकुळां भंगोनि भृंगालकें[2] ॥
जेव्हां दुर्धर पूतना निवटिली[3] कृष्णासि तैं बारसें
लोकाश्चर्य अनंत वीर्य मिरवे गांभीर्य नाना रसें ॥ १ ॥
सांग तो मज सविस्तर गाथा[4] । पुण्य पावन करी मुनिनाथा
ऐक गा श्रवणभाग्यनिधाना । श्रीहरी-कृत चरित्र-विधाना ॥ २ ॥
जन्मोनि कृष्ण मथुरेंत जगीं लपाला । तेणें भयें चकितबुद्धि तया नृपाला ॥
भासे दिठीं सजन कानन कृष्णरूपें । मानी जसा भ्रमित शुक्तिदलासि[5] रूपें[6]॥ ३॥

---

२१ कलि=कलियुग संबंधीं पाप. २२ वर्षवृंदें=वर्षसमूह.

* आनंदतनयकृत कंदुकाख्यानाच्या आरंभीं आम्हीं या कवीचें थोडें वृत्त देऊन तो अरणी एथें राहणारा होता असें लिहिलें आहे. आज जें प्रकरण छापण्यास आरंभ केला आहे त्याच्या अखेरीस त्यानें आपणास "आरणीचा शिपायी" म्हणजे अरणी येथील शूर असें म्हटल्याचें वाचकांस आढळून येईल. हा कवि एकनाथाचा समकालीन असावा असें अनुमान आम्ही मागेंच कळविलें आहे. माधवचंद्रोबाच्या सर्वसंग्रहांत व आमच्या काव्येतिहास-संग्रहांत मिळून आजपर्यंत या कवीचीं श्लोकबद्ध प्रकरणें अकरा छापून प्रसिद्ध झालीं आहेत त्यांची ग्रंथसंख्या येणेंप्रमाणें:—

१ सीतास्वयंवर—७९, २ सेतुबंध—४१, ३ सुदामचरित्र—४१, ४ गणिका उद्धार—१३, ५ शबरीआख्यान—२१, ६ उमारमासंवाद—१३, ७ मार्कंडेयाख्यान—६०, ८ ताटकावध—५०, ९ कंदुकाख्यान—३२, १० बालचरित्र—१५, ११ पूतनावध—४८, एकूण ४१३ चारशें तेरा. या वरून आजपर्यंत या कवीचा चारशांवर ग्रंथ छापून प्रसिद्ध झाला असें होतें.

१ बादरायणि=बादरायण म्हणजे व्यास त्याचा पुत्र शुकाचार्य. २ भृंगालक=भुंग्यासारखे काळेकुळकुळीत आहेत केंस ज्याचे असा. ३ निवटिली=मारिली. ४ गाथा=हकीकत. ५ शुक्ति=शिंपला. ६ रूपें=चांदी.

कंसभूपति असा बहु भ्याला । कृष्णरूप चि दिसे जग त्यांला ॥
बैसला निजसभादलोकीं । अंतरीं मन बुडे भयशोकीं ॥ ४ ॥
चाणूरमल्लादिक दैत्यकोटी । तो मेळवी भीति धरोनि पोटीं ॥
पाचारुनी पातकि पूतनेला । वधावया कृष्ण विचार केला ॥ ५ ॥
बोले रोषुनि पूतना प्रभु म्हणे कां वाहतां काळजी
काळातें दमणार मी उमगितें बांधोनियां बाळ जी ॥
पाताळीं नभमंडळीं क्षितितळीं तो जेथ जैसा असे
तैसा शोध करोनि साधिन तुझें कार्यार्थ राया असें ॥ ६ ॥

॥ दिंड्या ॥

कंसरायें देऊनि चीरँमाळा । महा तोषाचा घेउनी उमाळा ॥
प्रेरियेली पूतना नाम बाळा । जगीं धुंडाया देवकिच्या बाळा ॥ ७ ॥
कथा ऐकें कल्याण कौरवेशा । बाळकृष्णाच्या पहा महावेशा ॥
फिरे फेरे फीरता फार सारें । ग्राम कुग्राम पुऱ्या अग्रहारें ॥ ८ ॥
मुलें सर्वत्र हि जीं तिं सकूमारें । तशा सर्वांच्या पेटालिसे मारें ॥
होति कृष्णा जन्मोनि दिवस दाहा । तशा बाळा देखुनी उठे दाहा ॥ ९ ॥
कामरागादिक मोह जिथें साहा । तेथ कैंचा वीवेक फारसा हा ॥
हरी साठीं बाळकें लक्षकोटी । जिणें भक्षीली दीर्घ दंतकोटी ॥ १० ॥
गोकुळासी येतां चि तदा मोटी । दिसे माया चेटकी कपट पोटीं ॥
वयें सोळा वर्षांत उभी ठेली । सुतारुण्यें तारुण्य गुणठेली[१०] ॥
नंदपुत्राच्या दर्शना भुकेली । दिंडि ऐशी आनंदसुतें केली ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥

एथें असेल बहुधा शिशु कंसहंता । शोधोनि साधिन म्हणे धरुनी अहंता ॥
लक्ष्मीविलास दिसतो नगरांत भारी । तो सांपडेल मज दानववल्लभारी ॥ १२ ॥
जेथें पद्मवनें अपार तुलसी जेथें बहू गोधनें
जेथें वैष्णव वेदपाठ करिती सद्वाक्य संबोधनें ॥
जेथें पुष्पफळीं सपल्लवदलीं शृंगार आला वना
तेथें क्रीडतसे हरी कविवरीं हे वर्णिली भावना ॥ १३ ॥
पूर्वीं हे स्थिति हा विलास सुख हें नाहीं च या गोकुळीं
आला साच गमे हरी नरहरी या नंदजीच्या कुळीं ॥

---

७ चीर=लुगडें. ८ बाळा=स्त्री. ९ दाहा=आग. १० गुणठेली=गुणांची पिशवी.

सालंकार सुवल्लवी[११] मिरवती सौवर्णवल्ली वनीं
तैसी होइन मी न मंजुनयना मी येउनी यौवनीं[१२] ॥ १४ ॥
जाली तत्काळ रंभा दिसत मृदु जिचे ऊरु[१३] कर्पूररंभा[१४] ॥
गंगेच्या चंचदंभासम[१५] तरळ गळां हार ल्याली सदंभा ॥
मत्तेभाच्या[१६] निकुंभाकृति[१७] कठिण उरीं दावि वक्षोजकुंभा[१८]
भासे ऐसी स्वयंभा मनिं कुटिलपणें ते रती कीं स्वयंभा ॥ १५ ॥
जाती नूतन नूतना व्रजवधू तत्संगती पूतना
आली नंदनिकेतनासि[१९] निरखूं पक्षींद्रसंकेतना[२०] ॥
तेथें गोवळराज नृत्य करिती कृष्णास नीरंजना
बैसे त्या च सभाजनांत निरखी योगीशहृद्भाजना[२१] ॥ १६ ॥
पुढें बैसलीसे जसी मानवी ते । हरी देखुनी क्रोध दुर्मान वीते ॥
सभे अंगसौभाग्यभा[२२] मानवीते । यशोदा पुसे कोण भामा[२३] नवी ते॥ १७॥
स्वयें वदे स्वागत गोपिकांला । जें जिंकितें कंठरवें[२४] पिकांला[२५] ॥
म्हणे यशोदे तुझिया मुला मा । पाहोनि धालें व्रज भूभूललामा[२६] ॥ १८ ॥

॥ दिंड्या ॥

काय वानूं कापट्य कामिनीचें । इंद्रचंद्रा नेणवी रूप जीचें ॥ ध्रु० ॥
भूमिपर्यंत रुळे नीळ वेणी । वरी शोभे ती भव्य नगश्रेणी[२७] ॥
चंद्र आणी शीसफुल फुलावाणी । भाळिं भांगटिला नासिकीं सुपाणी॥ १९॥
चुडे कंगाणिया हातसरे दोरे । कटीं शोभति ते भव्य कडेदोरे ॥
फार साजे सौंदर्य दैत्यदारे । कामिलोकांचे चित्त जें विदारे ॥ २० ॥
बाळ्या भोंकरें जडित ते काप कानीं । हार कंठीं दैदीप्य माणिकांनीं ॥
करीं मुद्रा वीराजमान मानी । कोणि ऐसी देखुनी धैर्य मानी ॥ २१ ॥
वांकि बाहुवटें बाजुबंद बाळी । ल्यालि चोळी ते मोतियांचि जाळी ॥
हेमवसनाचा घोळ तळीं घोळी । मनीं कपटी बाहेरि दिसे भोळी ॥ २२ ॥
पदीं साखळिया नूपुरादि वाळे । बिदीं[२८] चालतसे दाखवीत चाळे ॥
डोळे मोडतां चि गोपवृंद[२९] भाळे । जो तो पाहे तल्लीन राजबाळे[३०] ॥ २३ ॥

---

११ बल्लवी=गवळणी. १२ यौवन=तारुण्य. १३ ऊरु=मांडया. १४ कर्पूररंभा=कर्पूरकदली (केळ). १५ चंचदंभ=हलणारें पाणी. १६ मत्तेभ=मदोन्मत्त हत्ती. १७ निकुंभ=गंडस्थळ. १८ वक्षोजकुंभ=स्तनकलश. १९ निकेतन=घर. २० पक्षींद्रसंकेतन=गरुडध्वज (कृष्ण). २१ योगीशहृद्भाजन=योग्यांच्या हृदयांत राहणारा (कृष्ण). २२ भा=कांति. २३ भामा=स्त्री. २४ रव=शब्द. २५ पिक=कोकिल. २६ ललाम=भूषण. २७ नगश्रेणी=दागिन्यांची पंक्ती. २८ बिदी=वाटेंत. २९ वृंद=समूह. ३० राजबाळा=उत्तमस्त्री (अशा प्रकारचीं दुसरीं उदाहरणें:—राजमार्ग, राजहंस, राजविद्या, रायआंवळी इ० ).

ऐसि सुंदरि ते मंदहास्य चाली । नंदरायाच्या मंदिरासि आली ॥
द्वारपाळा मारितां तीव्र भ्याली । मोह पाडोनी मंदिरीं निघाली ॥ २४ ॥
पंकजाक्षी निःशंक शांत [31]बंकी । रक्षपालां पाडुनी मोहपंकीं[32] ॥
जाति जाली कृष्णासि घेउं अंकीं[33]। जो हा दाता आनंदतनय रंकीं ॥२५॥

॥ श्लोक ॥

संतानाविण फार दीन क्रमले हे फार चिंता मला
होती हो बहु आजि देखुनि सुता हा जीव विश्रामला ॥
पात्रीं रत्नमणी फळावळि विडे खर्जूरही खोबरें
ठेवी बाण पुढें म्हणे मज सये दे बाळ पाहों बरें ॥ २६ ॥

बाई तुझा पाहुनि कृष्ण तान्हा । आला पहा वो मजलागिं पान्हा ॥
मिथ्या असा तेथ करुनि [34]बान्हा । येवोनि घे शीघ्र [35]मनोज्ञ कान्हा ॥ २७ ॥
जालें बहू मन उताविळ वो यशोदे । दे बाळ लौकर करीं हृदयीं धरूं दे ॥
पान्हा भरोनि न धरे मजलागिं बाई । दे दे म्हणोनि चमके करि फार घाई॥२८॥
बहुत आवडती मज लेंकरें । म्हणुनि खेळउं धाविनलीं करें ॥
त्वरित खेळवि आननकोमला । तुजविना मज आन नको मला ॥ २९ ॥
प्रेमा ऐसा दाविते [36]दैत्यभाजा । तेणें तोषे नंदभार्या [37]सभाजा ॥
मी दैवाची माझिया बाळकाला । पाहों येती लोक [38]नीलालकाला ॥ ३० ॥

लखलखित विराजे पाळणा [39]हाटकाचा ।
खचित मणिगणानें त्या जगन्नायकाचा ॥
झळकत वरि भारी घोंस मुक्ताफळांचा
सहज हरि निजेला माजि हंता खळांचा ॥ ३१ ॥
झडकरि मग आली घ्यावया बाळकृष्णा
घडिभर मुख पाहे कृष्णमाता सतृष्णा ॥
उचलुनि हरि अंकीं सोयरा सज्जनांचा ।
निजहृदयिं धरीते साध्य जो साधनांचा ॥ ३२ ॥

नंदा मना त्वरित [40]नंदकुळावतंसा । देखोनि तल्लिन मुख[41]द्युति पाहुं कैसा ॥
घे मांडिये क्षणिक मानसराजहंसा । ते राक्षसी अनुमिते रिपु हा चि कंसा ॥३३॥
ठावें नसे किमपि नंदनितंबिनीला[42] । दे कौतुकें म्हणुन त्या नवमेघनीला ॥
साधूजना कुटिल ते वरि काज नाहीं । नाहीं च आपपर काहिं च योजना ही ॥३४॥

---

३१ बंकी, बकी=पूतना. ३२ पंक=चिखल. ३३ अंक=मांडी. ३४ बान्हा=मिष. ३५ मनोज्ञ=सुंदर. ३६ दैत्यभाजा=पूतना. ३७ सभाजा=स्त्रियांसह. ३८ नीलालक=निळे आहेत केंस ज्याचे असा. ३९ हाटक=सोनें. ४० नंदकुलावतंस=नंदकुलभूषण कृष्ण. ४१ द्युति=शोभा. ४२ नितंबिनी=स्त्री.

तों पूतना कपटपाशभरोनि डोळे । घे मांडियेवरि हरी स्वमनांत पोळे ॥
रत्नें म्हणोनि भरि इंगळ[४३] जेवि खोळें[४४] । घे काळ बाळमति पाहति लोक भोळे॥ ३५॥

दनुजयुवति[४५] बोले तूं सखी राजबाळा
कनककुसुमगौरी केंवि व्यालीस काळा ॥
खदखद हरि हांसे बोलिली सत्यशीळा
बळदमन खलांचा दाखवी लोकलीला ॥ ३६ ॥
कमलनयन कान्हा घेतला वो रसानें[४६] ।
उचलुनि निज अंकीं भाउनी बाल सानें[४७]
कुपित[४८]फणिगव्हाला हार मानूनि तीणे ।
स्वकरि धरुनि कंठीं बांधिला दुर्मतीनें ॥ ३७ ॥

जाणोनियां माव[४९] तिची स्वभावें । झांकी हरी लोचन बाळभावें ॥
शास्ता जगाचा जरि आकळीला । तरी न बोले धरि बाळलीला ॥ ३८ ॥
लक्षोनि कंजरुचिरेक्षण[५०] राक्षसीला । हांसे तदा खदखदां दमि तो अशीला ॥
ते खेळवीत चुचकारुनि बाळ यानीं । लावी सतोष मग पूर्वमनोरथानीं ॥ ३९ ॥

देखा माखुनियां विषें स्तन मुखीं लावी मुखा संमुखें
चोखी लोकशिखामणी[५१] सुरसखा शोषावयातें सुखें ॥
पाखाळोनि विखा तिच्या नखशिखा शाखांशु चाखावया
शेखीं लेखुमि खेचरी तृणशिखा जे पातली खावया ॥ ४० ॥

पयोधिसंक्रांतपयोधराचे । परी धरी अग्र पयोधराचे[५२] ॥
शोषी अशेषांगरसासि गा तो । ब्रह्मादिदेवोत्कर[५३] ज्यासि गातो ॥ ४१ ॥
स्तनाननीं तो जडला जळूसा । जाला तिला हा परता टळूसा ॥
मिठी प्रयत्नें न सुटे हरीची । भांबावली बुद्धि महासुरीची ॥ ४२ ॥

रक्तातें अनुरक्त देखुनि हरी आरक्त डोळे करी
युक्तीनें बहु शक्ति वेचुनि करीं सोडोनि घे लौकरी ॥
तो कांहीं न सुटे चि तों दृढ मिठी दाटे भयें साहसी
खासी काय मला मुला मग म्हणे शोषूं किती पाहसी ॥ ४३ ॥

आंगीं जियेस नव नाग[५४]सहस्रशक्ती
ते सोडवी कुटिल दाउनि बाळभक्ती ॥

---

४३ इंगल=निखारे. ४४ खोळ=वस्त्रादिकांची खोळ. ४५ दनुजयुवति=पूतना. ४६ रसानें=प्रीतीनें. ४७ सानें=धाकटें. ४८ फणि= साप. ४९ माव=कपट. ५० कंजरुचिरेक्षण =कमला प्रमाणें सुंदर आहेत डोळे ज्याचे. ५१ लोकशिखामणि=त्रैलोक्यभूषण कृष्ण. ५२ पयोधर=स्तन. ५३ उत्कर=समूह. ५४ नाग=हत्ती.

आतां किती स्तन पिसील धरूनि कृष्णा
ऐसी असे तुज कसी मज सांग तृष्णा ॥ ४४ ॥
ते बाळ दैत्यकवँळासि असे भुकेलें
रक्तें तिच्या म्हण अपोशन आजि केलें ॥
तत्प्राण जाण हरिले निज विक्रमानें
प्राणाहुती मॅागति पांच अनुक्रमानें ॥ ४५ ॥
सौजन्यस्तन्यपानें घुटघुटुनि तिचे प्राण सत्राण नेले
व्याघ्रें ते उग्रतेनें चरफडुनि मनीं शब्द निःशब्द केले ॥
सोडीं सोंडीं म्हणोनी प्रगट घडिघडीं रंगणीं अंग घाली
घोराकारें शरीरें तळपुनि पडली पूतना भूतजाळीं ॥ ४६ ॥
माथां पिंगट झिपऱ्या मुखबिळीं विक्राळ दंतावळी
डोळे वर्तुळ रक्त कर्कश तनू कंठध्वनी आंवळी
अभ्रीं वाढुनि वाड धाड पडली तेणें थरारी धरा ॥
मूर्छाग्रस्त समस्त कोण धरिती कोणासि शोणाधरा ॥ ४७ ॥
गोपी गोपाळ गाई पडुनि महितळीं शब्द तीतें अगाई
ऐशी राया नवाई जनिं वनिं पसरे राक्षसीची अवाई ॥
तें।हांसे शेषशायी भवतपनतपक्रांत संतोषदायी
त्या कृष्णाचे च पायीं नमन करितसे आरणीचा शिपायी ॥ ४८ ॥

समाप्त.

---

५५ कवळ=घांस.